अर्थज्ञान (जुलै ते डिसेंबर २०२५) ISBN NO. 978-81-990957-8-6

संस्कृतीतुन संस्काराकडे.... संस्कारातुन अर्थज्ञानाकडे....

अर्थज्ञानातुन समृद्धिकडे.... समृद्धितुन शाश्वत विकासाकडे... शाश्वत विकासातुन विश्वगुरुकडे ....

अर्थज्ञान

जुलै ते डिसेंबर २०२५

अर्थव्यवस्थेतील चालू घडामोडीची माहिती तसेच व्रतपत्रातील बातम्यांचे संकलन करणारा अंक

नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदेड.

अर्थशास्त्र विभाग

(MKCL, iLike Credit Course)

:: प्रकाशक ::
प्र. प्राचार्य डॉ. एस. बी. फड
:: मार्गदर्शक ::
माजी प्र. प्राचार्य डॉ. एम. वाय. कुलकर्णी
प्रा. के. जे. कांबळे

:: संपादक ::
डॉ. राजेश गंगाधरराव उंबरकर

विद्यार्थी संपादक / संकलक :
कु. गजानन गंगाधर राजरवाड
सहसंपादक / संकलक :
कु. कार्तिका अंजय्या पगडाला
सर्व MKCL's iLike Credit Course चे आणि अर्थशास्त्र विषयाचे विद्यार्थी ....

सिध्दी
पब्लिशींग हाऊस, नांदेड

ISBN NO.: 978-81-990957-8-6

:: संपादक मंडळ ::

कु. पायलकौर जाधव	बी. ए. द्वितीय वर्ष
कु. साक्षी ठाकूर	बी. ए. द्वितीय वर्ष
कु. राणी बुलबुले	बी. ए. द्वितीय वर्ष
कु. शैलेजा कोपलवाड	बी. ए. द्वितीय वर्ष
कु. वैष्णवी औंढेकर	बी. ए. द्वितीय वर्ष
कु. शिवानी यादव	बी. ए. द्वितीय वर्ष
कु. निकिता तोमर	बी. ए. द्वितीय वर्ष
कु. अंकिता तोमर	बी. ए. द्वितीय वर्ष
कु. प्रतीक्षा घरणे	बी. ए. द्वितीय वर्ष
कु. सावित्रा पावडे	बी. ए. द्वितीय वर्ष
कु. निकिता गाजलवाड	बी. ए. द्वितीय वर्ष
कु. राधिका नरहिरे	बी. ए. तृतीय वर्ष
कु. पाणेरी खिल्लारे	बी. ए. द्वितीय वर्ष
कु. कृष्णा वर्ताळे	बी. ए. तृतीय वर्ष
कु. साधना मुंडे	बी. ए. द्वितीय वर्ष
कु. भूमीका नागडा	बी. ए. तृतीय वर्ष
कु. दुर्गा संतोष साखरे	बी. ए. प्रथम वर्ष
कु. संभाजी तोटरे	बी. ए. तृतीय वर्ष
कु. गुरप्रीतकौर मोगलीवाले	बी. ए. प्रथम वर्ष
कु. संध्या पदमगिरवार	बी. ए. द्वितीय वर्ष
कु. तनुजा सूर्यवंशी	बी. ए. प्रथम वर्ष
कु. स्नेहा जोंधले	बी. ए. प्रथम वर्ष

Published By:
SIDDHI PUBLISHING HOUSE, SHRINAGAR, NANDED – 431605 (Maharashtra) **National Publication.**
Mob. No. 9623979067 - Mrs. Pallavi L. Shete
Email :shrishprakashan2009@gmail.com
Printers:
Anupam Printers, Shrinagar, Nanded. 431605.
Technical Advisor and Editorial Reviewer.:
Gajanan Rajrwar B. A. III rd (Economics)
Bhumika Nagda B. A. III rd Year (Economics)
Cover Designing: Gajanan Rajrwar B. A. III rd Year (Economics)
Price : 150 /-
Date: 15/02/2026

 ISBN NO. 978-81-990957-8-6

मनोगत

नमस्कार,

अभिनव भारत शिक्षण संस्था संचलित, नेताजी सुभाषचंद्र बोस कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नांदेड, च्या अर्थशास्त्र विभागातर्फे नेहमीच नाविन्यपूर्ण असे उपक्रम राबवले जातात. त्या अनुषंगाने **एमकेसीएल च्या आयलाईक क्रेडिट कोर्स** या विद्यार्थ्यांनी व अर्थशास्त्र विषय असलेल्या विद्यार्थ्यांनी अर्थव्यवस्थेशी संबंधित वृत्तपत्रातील बातम्यांचे संकलन करून हा अंक प्रकाशित करण्याचा मानस पूर्णत्वाला नेला त्याबद्दल मला या विद्यार्थ्यांचा सार्थ अभिमान वाटतो. अर्थशास्त्र विभाग हा पुस्तकी ज्ञानाबरोबरच **विद्यार्थ्यांमध्ये स्किल विकसित होतील असे उपक्रम** राबवत असते व त्यातील हा एक स्किल विकसित करणारा उपक्रम आहे. या संकलनातून विद्यार्थ्यांची संगणकीय ज्ञानाबरोबरच अर्थशास्त्र या विषयाचे ज्ञान निश्चितच विकसित होईल असा विश्वास मला वाटतो. वर्तमानपत्रातील अर्थ विषयाच्या बातम्यांकडे त्यांचा पाहण्याचा दृष्टिकोन विकसित होईल व अर्थविषयक ज्ञानात भर पडेल. या उद्देशाने हा उपक्रम अर्थशास्त्र विभागाने राबवला आहे.

हा उपक्रम अर्थशास्त्रातील विद्यार्थ्यांनी गेली पाच ते सहा महिन्यापासून म्हणजेच जुलै महिन्यापासून ते डिसेंबर महिन्यापर्यंत सातत्याने अर्थशास्त्राशी संबंधित बातम्यांचा संकलन करून राबवला आहे. यासाठी इकॉनॉमिक्स ऍक्टिव्हिटी नावाचा ग्रुप त्यांनी तयार केला व दोन दोन चे गट तयार करून प्रत्येक गटाला एक वार निश्चित करून दिला. त्या त्या गटाने त्यांच्या वारानुसार त्या दिवशी येणारे वर्तमानपत्रातील अर्थविषयक बातम्या संकलित करून ग्रुप वर टाकाव्यात व एक गट असा निर्माण केला की, तो संगणकीय ज्ञान असलेला असेल. ज्या गटाने महाविद्यालयात चालू असलेल्या एमकेसीएलच्या माध्यमातून आयलाईक कोर्स द्वारे संगणकीय ज्ञान प्राप्त केले आहे. अशा विद्यार्थ्यांनी संबंधित संकलित माहिती संगणकात वर्ड फाईल मध्ये घेऊन सेटिंग करण्याचे काम रोजच्या रोज सातत्याने केले. अशा प्रकारे हा माहिती पूर्ण व संशोधनास उपयुक्त असा **'अर्थज्ञान'** नावाचा अंक तयार केला. हा अंक विद्यार्थ्यांनी स्वतः सेटिंग करून निर्माण केलेला आहे.

या संदर्भात **माजी प्रभारी प्राचार्य डॉ. एम वाय कुलकर्णी** सरांनी मान्यता दिल्यामुळे हा उपक्रम सातत्याने चालू होता. त्याबद्दल मी व अर्थशास्त्र विभाग त्यांच्या कायम ऋणात राहूत. तसेच विद्यमान प्रभारी प्राचार्य डॉ. एस. बी. फड सरांनी हा अंक प्रकाशित करण्यास परवानगी दिली त्याबद्दलही मी त्यांचे आभार व्यक्त करतो. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. कल्पना कदम मॅडम यांनी संबंधित कोर्स व्यवस्थित चालवण्यासाठी योग्य ते सहकार्य केले त्याबद्दलही मी त्यांचे आभार व्यक्त करतो. त्याचबरोबर अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. के. जी. कांबळे यांनी आम्हाला हा उपक्रम राबवण्यास पूर्णपणे मोकळीक दिली व मार्गदर्शन केले त्याबद्दलही मी त्यांचे आभार व्यक्त करतो. तसेच कनिष्ट महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अर्चना भवानंकर, प्रा. रवी शिराढोनकर, प्रा. बंगाळे मॅडम, प्रा. जाधव मॅडम व प्रा. एस. अवधानी यांनी विद्यार्थ्यांना iLike कोर्स करण्यास प्रोत्साहित केले त्याबद्दल त्यांचे मी आभार व्यक्त करतो. सर्वांचे या ठिकाणी नाव घेणे शक्य नसल्याने या उपक्रमास ज्यांनी ज्यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत केली त्या सर्वांचे मी आभार मानतो.

धन्यवाद !!!

प्रा. डॉ. राजेश गंगाधरराव उंबरकर
अर्थशास्त्र विभाग
नेताजी सुभाष चंद्र बोस महाविद्यालय नांदेड.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

अनुक्रमणिका

अ.क्र.	विषय	पुष्ट क्र.
1.	आता EPF चे पैसे एकाच वेळी काढता येणार	01
२.	यशोगाथा	02
3.	NTPC ला ग्रीन एनर्जीमध्ये 20 हजार कोटींपर्यंत गुंतवणूक करता येणार	03
4.	24 तासांत मिळतोय ITR रिफंड	03
5.	रुपयाचं चिन्ह् कोणी डिझाइन केलं? दोन आर्किटेक्टची कहाणी	04
6.	जीएसटीमध्ये होणार मोठा बदल	05
7.	गृहकर्ज पुन्हा एकदा स्वस्त होणार	05
8.	ग्रीन वेअरहाऊसिंग क्षेत्रात भारताची मोठी झेप, पुढील ५ वर्षांत ४ पट वाढ होण्याची शक्यता	06
9.	प्रश्नावली	07
10.	युद्धग्रस्त जागतिक अर्थव्यवस्थेत भारतच तारणहार	08
11.	ट्रम्प लादणार नवीन टॅरिफ	09
12.	Net Asset Value (NAV) म्हणजे काय?	10
13.	तुमचा मुलगा सरकारी शाळेत शिकतोय; तर मिळणार २०,००० रुपये, काय आहे NEEEV योजना?	11
14.	प्रश्नावली	11
15.	27 ते 40 पर्यंत... पेट्रोल आणि डिझेलचे दर लवकरच कमी होणार	12
16.	32 अब्ज डॉलरची निर्यात धोक्यात	13
17.	आयटी कंपनी देणार २५०% लाभांश.	13
18.	स्टेट बँकेची तब्बल २,१२२ कोटींची फसवणूक	13
19.	गृहिणी झाली उद्योजिका, अवघ्या 8 हजारात उभारलं 29 कोटींचं साम्राज्य	14
20.	पतंजलीच्या स्वदेशी चळवळीनं अर्थव्यवस्थेला दिलं पाठबळ	14
21.	रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया {RBI}	14
22.	प्रश्नावली	16
23.	Agriculture in India : भारत कसा विकसित होईल?	17
24.	अर्थकारण : बँकांच्या खासगीकरणावर प्रश्न	18
25.	बँकांमध्ये ३६ हजार कोटींची एक लाख ७९ फसवणुकीची प्रकरणे	18
26.	प्रश्नावली	19
27.	यशोगाथा	20
28.	गृहकर्जा वरील उपाय	21
29.	बारावी नंतर स्टॉक ब्रोकर कोर्स	22
30.	सीमेन्स लिमिटेड आणि टाटा स्ट्राइव्ह यांनी व्यावसायिक प्रशिक्षणात गाठला महत्त्वाचा टप्पा, १.२ लाखांहून अधिक तरुणांना केले सक्षम	24

 ISBN NO. 978-81-990957-8-6

31.	पाम तेल उत्पादनात भारताची स्वयंपूर्णतेकडे वाटचाल	24
32.	प्रश्नावली	25
33.	Stock Market Opening	26
34.	आम्ही तुमची अर्थव्यवस्था चिरडून टाकू; रशियन तेल खरेदीमुळे अमेरिकेचा भारताला इशारा	27
35.	२००० रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या UPI व्यवहारांवर किती GST आकारणार?	28
36.	यशोगाथा	28
37.	अर्थव्यवस्थेशी संबधित अहवाल	29
38.	इंडिया रेटिंग्जने दिला धक्का	30
39.	जागतिक बँकेचा इशारा	30
40.	प्रश्नावली	31
41.	पोस्ट ऑफिसच्या 'या' योजनेत तुम्हाला दरमहा ९२५० रुपये मिळतील, कसा लाभ मिळवता येईल?	32
42.	8 सरकारी कंपन्या विकण्याची तयारी! डिसेंबरपर्यंत 'ही' बँक विकणार; सरकारला किती कोटी मिळणार?	33
43.	IDBI बँकेच्या विक्रीतून किती पैसा मिळणार?	33
44.	₹1600 वर पोहोचू शकतो इलेक्ट्रिक बस बनवणाऱ्या कंपनीचा शेअर, खरेदीसाठी उडालीय लोकांची झुंबड; करतोय मालामाल	34
45.	बँकांकडून १२ लाख कोटींचे कर्ज बुडीत	35
46.	नफा वाढला, तरी बजाज फायनान्सचा शेअर आपटला	35
47.	अवघड कामं करा, इथं स्पर्धा नसते!'	35
48.	ब्रिटिश कंपन्यांना भारतात उत्पादन करण्याची मोठी संधी	36
49.	भारत-ब्रिटन मुक्त व्यापार करारामुळे 'मेक इन इंडिया'च्या नवयुगाची सुरुवात	36
50.	बजाज ऑटोला ऑगस्ट २०२५ पासून त्यांच्या इलेक्ट्रिक वाहनांचे उत्पादन थांबवावे लागू शकते.	37
51.	गुंतवणूकदारांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर शेवटी एनएसडीएलचा IPO	37
52.	UPI व्यवहारामध्ये मोठ्या बदलाची शक्यता, मध्यमवर्गाच्या खिशावर होणार थेट परिणाम; RBI कडून महत्वाचे संकेत	38
53.	१ ऑगस्ट 2025 पासून मोठे बदल	39
54.	या' कारणांनी कोसळतोय शेअर बाजार	39
55.	शेअर बाजाराची कमकुवत सुरुवात ; सेन्सेक्स, निफ्टी पुन्हा घसरले	40
56.	सोन्याच्या किंमतीत मोठी उलथापालथ! 4 दिवसांच्या घसरणीनंतर दराबाबत सर्वात मोठी अपडेट, नवीन भाव काय?	41
57.	अमेरिकेनं भारतावर 25 टक्के टॅरिफ लावला	42

58.	ट्रम्प 'टॅरिफ'मुळे भारताच्या टेक्सटाईल्स, फार्मासह 'या' ५ उद्योगांना बसणार फटका, पाहा संपूर्ण लिस्ट	43
59.	टीसीएसकडून पुढील वर्षभरात 12,000 कर्मचाऱ्यांची घट; AI मुळे मध्यम व वरिष्ठ पदावरील कर्मचाऱ्यांना फटका	45
60.	10 ते 15% टॅरिफची चर्चा झालेली, देशहितासाठी...; US टॅरिफवर सरकारनं संसदेत काय सांगितलं?	46
61.	करदात्यांसाठी आनंदाची बातमी! आता आयटीआरचा परतावा काही तासांत येणार	47
62.	सोने खरेदी करणाऱ्यांना गुड न्यूज सोने-चांदीच्या दरात मोठी घसरण, सोन्याचे दर 603 तर चांदीचे दर 1655 रुपयांनी घसरले...	48
63.	अमेरिका ने सहा भारतीय तेल खरेदीदार कंपन्यांवर निर्बंध लादले आहेत	49
64.	महिन्याच्या पहिल्याच दिवशी सरकारच्या तिजोरीत विक्रमी वाढ	50
65.	25 टक्के टॅरिफ भारतासाठी संधी की संकट ?	51
66.	जुलैमध्ये पीएमआय ५९.१ वर	51
67.	बाजारात 'ब्लॅक फ्रायडे'! ट्रम्प टॅरिफमुळे गुंतवणूकदारांचे ५.२७ लाख कोटी पाण्यात	51
68.	पोद्दार प्लंबिंगची कर्नाटकात 758 कोटींची गुंतवणूक, 12,000 रोजगार निर्मिती	52
69.	GST: भारताला 'डेड इकोनॉमी' म्हणणाऱ्या ट्रम्प यांच्या तोंडावर चपराक! महिन्याच्या पहिल्याच दिवशी सरकारच्या तिजोरीत विक्रमी वाढ	53
70.	शेअर मार्केट कोसळण्याची कारणं	53
71.	आर्थिक व व्यापारी घडामोडी	54
72.	लाडक्या बहिणींसाठी महत्त्वाची बातमी	56
73.	Post Office Scheme	56
74.	शेअर बाजार	57
75.	राज्यातील प्रमुख शहरातील आजचे सोन्याचे दर	57
76.	अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासोबत व्यापार करार (Trade Deal) करण्यास स्पष्ट नकार दिला आहे	58
77.	स्टेट बँकेला पहिल्या तिमाहीत १९,१६० कोटी रुपये निव्वळ नफा	59
78.	सरकारने आयकर विधेयक २०२५ मागे घेतले	59
79.	भारतासाठी धावून आला हा देश, डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबतच्या भेटीचे ठिकाण आणि तारीख ठरली.	59
80.	शेअर मार्केट धडाम! ट्रम्प टॅरिफच नव्हे तर 'या' कारणांनीही बाजारात घसरण, अनेक शेअर्समध्ये लक्षणीय घट	60
81.	Stock Market Closing Today Update:	61
82.	9 महिन्यात 24 हजार 541 रुपयांनी वाढले सोन्याचे भाव? सोन्या चांदीचे भाव किती वाढणार वाचा	61

83.	सेन्सेक्स ९६ अंकांनी घसरला, सुरुवातीच्या व्यवहारात धातू आणि बँकिंग शेअर्समध्ये विक्री	62
84.	सेबीच्या रिपोर्टनुसार आर्थिक वर्ष 2024-25 विदेशी गुंतवणूकदारांनी भारताच्या इक्विटी सेगमेंटमधील 1.27 लाख कोटी रुपयांचे शेअर विकले.	63
85.	एसअँडपीच्या मते पुढील 2 ते 3 वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेची वाढ वेगानं होण्याची आशा आहे	64
86.	स्वातंत्र्य दिनानिमित्त SBI चा मोठा निर्णय! अग्निवीरांसाठी सुरु केली खास योजना, जाणून घ्या सविस्तर माहिती	65
87.	15 ऑगस्टनंतर SBI ग्राहकांच्या खात्यातून होणार अशी कपात, जी अनेकांना करेल आश्चर्यचकित.	66
88.	बस बनवणाऱ्या कंपनीला ₹५९४ कोटींचा नफा; शेअर खरेदीसाठी उड्या, ₹१२१ वर आला भाव	67
89.	Patanjali Foods Share Price	68
90.	दिवाळीत मोदी देशाला देणार मोठे गिफ्ट, GST बद्दल केली मोठी घोषणा, करात मिळणार दिलासा	68
91.	'ज्ञान भारतम' योजना'	69
92.	स्वातंत्र्यदिनी सोन्याचे दर ११०० रुपयांनी घसरले	69
93.	मोदी सरकार दिवाळीपूर्वी GST सुधारणा आणणार काय होणार स्वस्त	69
94.	प्रधानमंत्री विकसित भारत योजना आजपासून लागू तरुणांना मिळणार 15 हजार	70
95.	३००० रुपयांचा फास्टॅग पास, वर्षभर करता येणार मोफत प्रवास	70
96.	देशातील सर्वात मोठ्या सरकारी बँकेने होम लोन केले महाग	71
97.	शेअर बाजारात नुकसान होतंय? सुरक्षित परताव्यासाठी 'या' 6 योजनांमध्ये करा गुंतवणूक	71
98.	2050 मध्ये आजच्या 1 कोटी रुपयांचे मूल्य किती असेल?	72
99.	मिनिमम बॅलेन्सच्या नावाखाली बँकांची 'इतक्या' कोटींची कमाई; आकडे हादरवणारे	73
100.	सेन्सेक्स 46 अंकांच्या वाढीसह उघडला; बँकिंग शेअर्समध्ये विक्री, कोणते शेअर्स तेजीत?	74
101.	सेन्सेक्स 27 अंकांच्या वाढीसह उघडला; बँकिंग शेअर्समध्ये विक्री, कोणते शेअर्स वाढले?	75
102.	HDFC Bank	76
103.	तुमचा CIBIL आताच सुधारा, जर तुमचा सिबिल खराब असेल तर नोकरीही मिळणार नाही	77
104.	फक्त 'या' कारणांमुळे सोन्याचे भाव कोसळले; आज काय आहे 24 कॅरेचा भाव?	78
105.	अमेरिकेच्या टॅरिफविरोधात लढण्यासाठी रशिया भारतासोबत! म्हणाले, भारतीय वस्तूंचे स्वागत, तेलही देणार	78
106.	इक्विटी डेरिव्हेटिव्ह्जचा कालावधी वाढवण्यासाठी एक सल्लामसलत पत्र जारी केले जाईल असे सेबीचे अध्यक्ष म्हणाले.	79

107.	Share Market मध्ये मोठा गोंधळ, गुंतवणूकदारांसाठी महत्त्वाची माहिती; SEBI अध्यक्षांच्या विधानाने टेन्शन वाढलं	80
108.	Poker Baazi कंपनीचा शेअर कोसळला, 2 दिवसांत 20 टक्के घसरण	81
109.	कररचनेत ऐतिहासिक बदल! आता जीएसटीत फक्त दोनच दर, केंद्राचा प्रस्ताव मंजूर	82
110.	ट्रम्प टॅरिफचा फटका अमेरिकेलाच बसला! 446 कंपन्या दिवाळखोर; बेरोजगारीही वाढली	83
111.	टॅरिफची चिंता शेअर बाजारात दिसून आली	83
112.	भारताच्या करप्रणालीत ऐतिहासिक बदल घडवण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले गेले आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेले 'आयकर विधेयक 2025' सोमवारी लोकसभेत आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले	84
113.	शिवाजी महाराजांच्या काळात पुण्याचा महसूल किती होता?	86
114.	देशाच्या तिजोरीत मोठी भर, परकीय चलनसाठ्यात 1.48 अब्ज डॉलर्सची वाढ, RBI ने जाहीर केली आकडेवारी	86
115.	रिझर्व्ह बँकने ATM च्या नियमांत केले बदल	87
116.	कृषी निर्यातीने यावर्षी इतिहासातील सर्वोत्कृष्ट कामगिरी केली आहे	87
117.	1 शेअरवर 1 शेअर फ्री, HDFC बँक देणार बोनस शेअर; कधी आहे रेकॉर्ड डेट?	88
118.	केवळ शेअर्सच नाही तर एफआयआयनेही बाँड मार्केटमधून पैसे काढण्यास सुरुवात केली आहे.	88
119.	यशोगाथा	89
120.	अमेरिकेला भारताकडूनच खरेदी कराव्या लागतील 'या' वस्तू, ट्रम्प यांच्याकडे दुसरा पर्याय नाही	90
121.	सर्व पिकांचे नवीन हमीभाव जाहीर; 2025 चे नवीन हमीभाव दर पहा	91
122.	अखेर नवीन आयकर संसदेत मंजूर झाल्यानंतर याच आठवड्यात 21 ऑगस्टला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्याच्यावर स्वाक्षरी केली	92
123.	AI गुंतवणूक अयशस्वी? ९५ टक्के कंपन्यांना कोणताही ठोस फायदा मिळाला नाही, जाणून घ्या	93
124.	आता म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक करणे झाले सोपे, पोस्ट ऑफिस आणि MFI चा महत्वाचा करारा	95
125.	भारतावर 50% टॅरिफ लावून ट्रम्प यांनी स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारली	95
126.	२०३८ पर्यंत भारत जगातील दुसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल	96
127.	जीएसटी सुधारणांमुळे अमेरिकेच्या टॅरिफचा प्रभाव कमी होईल, अर्थव्यवस्थेला आधार मिळेल.	97
128.	भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा तेल आयात आणि निर्यात करणारा देश आहे.	98
129.	सोन्याचे दर	99
130.	भारतीय शेअर बाजारांमध्ये आज सप्टेंबर महिन्याची सुरुवात घसरणीसह झाली.	100

131.	SMBC ने मे महिन्यात येस बँकेतील २० टक्के हिस्सा खरेदी करण्याची घोषणा	100
132.	एक वर्षाच्या एफडीवर विविध बँका आकर्षक व्याजदर देत आहेत. खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील प्रमुख बँकांचे व्याजदर आणि तुमच्या गुंतवणुकीवर मिळणारा संभाव्य परतावा खालीलप्रमाणे आहे	101
133.	DMart मध्ये कोणत्या दिवशी सामान जास्त महाग असतं? खरेदीला जाण्यापूर्वी हे एकदा बघाच	102
134.	डोनाल्ड ट्रम्पच्या टॅरिफमुळे अमेरिकन लोकांवर महागाईचा डोंगर कोसळला	103
135.	GST सवलतीमुळे दुचाकी वाहनांपासून SUV पर्यंत. ऑटो क्षेत्र पुन्हा उभारी घेतेय	104
136.	भारत, चीन, रशिया हे ट्रम्प टॅरिफला टक्कर देणार, अमेरिकेच्या तुलनेत किती मजबूत ठरणार त्रिकुट	104
137.	ट्रम्प टॅरिफमुळे तामिळनाडूला 34000 कोटींचे नुकसान, नोकऱ्यांवर मोठे संकट	105
138.	भारत जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था होणार; RBI गव्हर्नर मल्होत्रांचा मोठा दावा	107
139.	अमेरिकेला टॅरिफ पडणार महागात	107
140.	भारताकडे किती सोन्याचा साठा	108
141.	चीन आणि भारत यांचे चलन	108
142.	रशियाकडून तेल खरेदी करणार, ट्रम्प टॅरिफदरम्यान निर्मला सीतारमण यांचे मोठे विधान	108
143.	CIBIL स्कोअरशिवाय मिळणार लोन	109
144.	नमो शेतकरीचे 2000 रुपये लवकरच खात्यात येणार, राज्य सरकारकडून 1932 कोटी रुपये मंजूर	109
145.	युपीएल सस्टेनेबल टेक्नॉलॉजी विद्यापीठ आणि ऑक्सफर्ड विद्यापीठात सामंजस्य करार	109
146.	आठवड्याच्या शेवटच्या दिवशी सोन्याचे दर वाढले; १० तोळयामागे ८,७०० रुपयांनी वाढ, वाचा आजचे भाव	109
147.	जीएसटी दर कपातीमुळे महागाई कमी होणार, अर्थव्यवस्थेला मिळेल नवी गती - निर्मला सीतारमण	111
148.	अनुपम मित्तल यांची यशोगाथा!	111
149.	गौतम अदानी यांचा भूतानसोबत मोठा करार, 6000 कोटींची गुंतवणूक करणार	111
150.	सरकारच्या तिजोरीत सोने आणि परकीय चलनाचा पाऊस	112
151.	देशाचा गोल्ड रिजर्व (Gold Reserve) वाढला	112
152.		
153.	पीककर्ज वाटपात बँकांचा हात आखडता	113
154.	नांदेडला पीककर्ज वाटपात राष्ट्रीय बँका अद्याप उदासीन	113
155.	आता २० हजारांपेक्षा जास्त रोख रकमेचा व्यवहार महागात पडणार, आयकर विभागाचा नवीन नियम तुम्ही वाचलात का?	114
156.	आता हॉस्पिटलच्या खर्चासाठी काढावे लागणार नाही कर्ज, टपाल विभागाची 'ही' योजना आहे खास; ५ लाखांपर्यंत होणार उपचार	114

157.	केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी खूशखबर! लवकरच वेतन आयोग स्थापन होणार, दिवाळीत मिळणार गोड बातमी	115
158.	देशातील १२ सरकारी बँकांचे विलिनीकरण होणार	116
159.	नेपाळमधील हिंसाचारामुळे भारतीय कंपन्यांना फटका	117
160.	18 Carat Gold Jewellery	117
161.	EMI नाही भरला तर Smartphone होईल लॉक	117
162.	Donald Trump चा G-7 देशांवर दबाव	118
163.	एकेकाळी ५००० रुपये होता पगार, आता त्यांची कंपनी आणतेय ३८२० कोटींचा IPO	118
164.	देशातील १२ सरकारी बँकांचे विलिनीकरण होणार	118
165.	२०२५ मधील जीएसटी दर	118
166.	वर्षभरात सोन्याच्या दरात 32 टक्क्यांची वाढ, दर वाढण्याची नेमकी काय आहेत कारणं? जाणून घ्या सविस्तर माहिती	119
167.	शेअर बाजारातील हालचाल	120
168.	जिओचा मोठा धमाका! AI स्मार्ट ग्लासेस लाँच, फोटो-व्हिडिओपासून कॉलिंगपर्यंत मिळतील भन्नाट फिचर्स	120
169.	शेअर बाजार	121
170.	भारताच्या बँकिंग क्षेत्राला मोठा धक्का! 12 प्रमुख सरकारी बँकांचे 'महा'विलीनीकरण; ग्राहकांच्या खात्यांवर काय परिणाम?	122
171.	टाटा टेक्नॉलॉजीज ने जर्मनीतील ईएस-टेक ग्रुपचे धोरण केले अधिग्रहणपुढील पिढीतील मोबिलिटी सोल्युशन्स बनवण्याच्या त्यांच्या जागतिक क्षमतांना बळकटी देण्याचा उद्देश	123
172.	भारतातील सर्वात मोठी सोन्याची बाजारपेठ कोणती	124
173.	GST कपाती नंतर मध्यमवर्गींना आणखी एक भेट मिळणार? ऑक्टोबरमध्ये RBI घेणार मोठा निर्णय	125
174.	जगावर येणार महायुद्धापेक्षाही भयंकर संकट	125
175.	अदानी ग्रुपचे शेअर्स कोसळले तेव्हा गुंतवणूक केली, आता NRIने एक दिवसात कमावले १८४० कोटी	126
176.	सरकारी कर्मचाऱ्यांसाठी सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय! २०२६ पासून जुनी पेन्शन पुनर्संचयित होणार	127
177.	अनिल अंबानी यांना दणका; येस बँक कर्ज घोटाळा प्रकरणात CBI कडून चार्जशीट दाखल	128
178.	टॅरिफनंतर H-1B व्हिसाच्या निर्णय	129
179.	टॅरिफ लावला तरी भारताने मारली मोठी मजल	129
180.	12 मोठ्या सरकारी बँकांचे 'महा'विलीनीकरण	130
181.	कर्जाचे व्यवस्थापन	130
182.	भारताच्या 28 राज्यांवर 'कर्जाचा बॉम्ब', 59.6 लाख कोटीचा धडकी भरवणारा आकडा, 10 वर्षात 'कुठे नेऊन ठेवलाय.'	131
183.	सणासुदीला नागरिकांना दिलासा! जीएसटी कपात जाहीर, २२ सप्टेंबरपासून 'इतका' कर आकारला जाणार	132

184.	डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयानं आता अमेरिकेत नोकरी करणे महाग; भारतीयांना बसणार फटका	133
185.	भारतीय आयटी कर्मचाऱ्यांना बसणार मोठा फटका	133
186.	GST रिफॉर्मची पंतप्रधान मोदींकडून घोषणा, म्हणाले, 'नागरिक देवो भव'	134
187.	सिमेंट शेअर्समध्ये गुंतवणुकीची मोठी संधी! ब्रोकरेजने रेटिंग अपग्रेड केले; लक्ष्य किंमत 45 टक्क्यांनी वाढली	135
188.	वेदांतच्या स्टॉकमध्ये येऊ शकते मोठी तेजी! ब्रोकरेजने दिले 'BUY' रेटिंग, जाणून घ्या	136
189.	रशिया, चीननं जगाला अंधारात ठेवून आखला सर्वात खतरनाक प्लॅन, रिपोर्ट लिक	138
190.	10 दिवस, 3520000000 रुपये, 36 मशीन्स., ट्रकमध्ये भरावे लागल्या नोटा; भारतातील सर्वात मोठा आयकर विभागाचा छापा	138
191.	DMart मध्ये कोणत्या वस्तूंवर किती GST लागतो?	140
192.	पत्नीच्या नावे Post Office मध्ये ₹१,००,००० ची FD केली तर २४ महिन्यांनंतर किती रुपये मिळतील?	141
193.	कॅन्सरच्या प्रमाणात जगभरात घट, मात्र भारतात वाढ	142
194.	सेन्सेक्स'ची ८३ हजारांना गवसणी	142
195.	वर्षातील सर्वात मोठा IPO येणार; दिवाळीपूर्वी टाटा कॅपिटलचे शेअर्स खरेदी करण्याची सुवर्णसंधी	143
196.	अंदमान समुद्रात असलेल्या श्री विजयपुरम २ मध्ये नैसर्गिक वायूचे साठे सापडले	144
197.	यशोगाथा	144
198.	टॅरिफ वॉर'ला तोंड देण्यासाठी भारतासोबत इटली	145
199.	डिजिटल पेमेंटचा नियम बदलणार	146
200.	सोलापूरच्या समर्थ बँकेवर RBI ची मोठी कारवाई	147
201.	बचत खाते आणि चालू खाते, यात काय फरक? जाणून घ्या	148
202.	आयुर्वेदाला नवी ओळख मिळवून देणं	149
203.	सणासुदीच्या काळात कार खरेदी करणे झाले स्वस्त! जीएसटीमध्ये मोठी कपात, कर्जही झाले स्वस्त	150
204.	मागील दहा महिन्यात चांदीचे दर दुप्पट	150
205.	सोनाली सेन गुप्ता आरबीआय कार्यकारी संचालकपदी	151
206.	सणासुदीच्या काळात कार खरेदी करणे झाले स्वस्त! जीएसटीमध्ये मोठी कपात, कर्जही झाले स्वस्त	151
207.	वर्षभरात चांदीच्या दरात 68 हजारांची वाढ; तर सोने 1.30 लाखांच्या पार	152
208.	जगभरातील केंद्रीय बँकांची सोन्याला पसंती, ऑगस्ट महिन्यात 15 टन सोने खरेदी	152
209.	सोने-चांदीच्या दरात ऐतिहासीक वाढ; चांदी 19 हजारांनी महागली, ही 3 कारणे आहेत	153
210.	५ दिवस... ४५,००० कोटी रुपयांची कमाई, 'या' कंपनीने दिवाळीपूर्वी गुंतवणूकदारांना दिला सर्वाधिक फायदा	155
211.	या' स्टॉकवर तज्ज्ञांचा विश्वास, लक्ष्य किंमत १९,०००; 'खरेदी' ची दिली शिफारस	156
212.	वेदांतच्या स्टॉकमध्ये येऊ शकते मोठी तेजी! ब्रोकरेजने दिले 'BUY' रेटिंग, जाणून घ्या	157

213.	डोनाल्ड ट्रम्प यांचं भारताला सर्वात मोठं सरप्राईज	158
214.	भारताचा रशियाला सर्वात मोठा झटका, तेल खरेदीचा खळबळजक निर्णय	158
215.	सोने 35 टक्क्यांनी घसरणार, चांदीची किंमतही कमी होणार ! लक्ष्मीपूजनापर्यंत सोने स्वस्त होणार का ? तज्ञांचा मोठा अंदाज	159
216.	शेअर बाजारात मोठी वाढ!	160
217.	सोन्या-चांदीचे दर	160
218.	मध्यमवर्गीयांना हक्काचं घर मिळणार, मोदी सरकारची सर्वसामान्यांना दिवाळीची भेट	161
219.	अफगाणी रुपया झाला बलशाली	162
220.	देशातील या 7 राज्यांकडे सोन्याचा खजिना	163
221.	चीनने दुखती नस दाबताच अमेरिका नरमला! भारताकडे मागितली मदत	163
222.	रशियन तेल खरेदी थांबवण्याच्या धमक्या देत भारताला दबावात ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना भारत जुमानत नसल्याचे पुन्हा सिद्ध झालं आहे.	164
223.	रिझर्व बँकांनी खरेदी केले 600 टन सोने ; किंमती आणखी वाढणार!	164
224.	एका घोटाळ्यामुळे ११७ वर्षांचा इतिहास संपुष्टात! 'हा' शेअर बाजार कायमचा बंद होणार; सेबीची विक्रीला मंजुरी	165
225.	ऑक्टोबरमध्ये एफपीआय गुंतवणूक ६ हजार कोटीच्या पुढे	166
226.	सणासुदीच्या काळात मिळाली भारतीय अर्थव्यवस्थेला गती	166
227.	MEIL ला कुवेतमध्ये मिळाले एवढ्या दशलक्ष महत्त्वपूर्ण प्रकल्पाचे काम; जागतिक ऊर्जा क्षेत्रात भारतीय कंपनीची यशस्वी वाटचाल	167
228.	RBI	168
229.	Success Story	169
230.	IT सेक्टरमध्ये तेजीचे संकेत, Wipro कंपनीचा नफा 3,243 कोटींवर, महसूलात 2 टक्के वाढ	170
231.	टॉप क्लास बिजनेस आयडिया!	171
232.	सप्टेंबरमध्ये बेरोजगारी वाढली! भारताचा दर 5.2 टक्क्यांवर, ग्रामीण भागात संकट तीव्र	171
233.	ना जन... ना धन... खाती धूळखात; २६ टक्के लोक करतच नाहीत वापर	172
234.	शेअर बाजारात जोरदार वाढ; सेन्सेक्स 575 अंकांनी वधारला, कोणते शेअर्स तेजीत	173
235.	बचत खाते आणि चालू खाते, यात काय फरक? जाणून घ्या	174
236.	सोनं १० हजारांनी स्वस्त, चांदीच्या भावातही ३३ हजारांची घसरण; आज काय आहेत दर?	175
237.	भारताच्या GDPपेक्षा Appleची मार्केट व्हॅल्यू जास्त	176
238.	आठव्या वेतन आयोगात किती सदस्य असणार ? वेतन आयोग कधीपासून लागू होणार ?	176
239.	आता अमेझॉनमध्ये लेऑफ्सचं वारं, 14000 कर्मचाऱ्यांना कामावरुन काढणार	177
240.	छठ पूजा सणादरम्यान देशभरात ५०,००० कोटींची उलाढाल	177
241.	भारताचा रशियासोबत विमान निर्मीतीचा ऐतिहासिक करार	178

242.	देशाच्या अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे महत्त्वपूर्ण योगदान	179
243.	सेन्सेक्स तब्बल 593 अंकांनी घसरला, तर निफ्टी 25,878 वर; कारण काय?	180
244.	1 नोव्हेंबरपासून बदलणार 5 मोठे नियम	181
245.	विश्व बचत दिवस	182
246.	शेअर बाजारात मोठी घसरण	182
247.	बँक खातेधारकांसाठी मोठी बातमी	183
248.	लग्नाचे मूहूर्त: सोन्याचे दर	184
249.	अमेरिकन डॉलरला धोबीपछाड! RBI चा धाडसी निर्णय काय? सोन्यावर काय परिणाम होणार	184
250.	स्टार्टअपचा गेमचेंजेर! डिजिटल युगात टिकायचंय? मग शिका सोशल मीडियाचं मार्केटिंग कौशल्य	185
251.	सोने 10000 तर चांदी 20000 रुपयांनी झाले स्वस्त, का घसरले सोन्याचे भाव?	186
252.	शेअर मार्केट	187
253.	चीन पाकिस्तानने केला भारताचा मोठा गेम, मालदीवने भारताला दगा देत थेट तुर्कीसोबत	188
254.	अमोल मुजुमदार	189
255.	भारताने जगाला दाखवली ताकद; १८ महिन्यांतील सर्वोत्तम आकडे, जीडीपी'त ८.२% दराने वाढ	190
256.	कोणत्या कामांसाठी क्रेडिट कार्ड वापरू नये? जाणून घ्या	191
257.	अमेरिकेनं भारतावर ५० टक्के टॅरिफ: जीडीपीची	191
258.	कोणत्या कामांसाठी क्रेडिट कार्ड वापरू नये? जाणून घ्या	193
259.	खात्यात ३३१ कोटी रुपये, तरीही चालवतोय बाईक टॅक्सी; ED घरी पोहोचली, समोर आलं अवाक् करणारं प्रकरण	193
260.	अमेरिकेकडून रशियाची कोंडी, सराफ बाजारात मोठा गेमचेंज! चीनने सगळा खेळ पलटवला, भारतात सोन्याच्या दरांचं गणित बदलणार?	194
261.	नवीकरणीय ऊर्जा ते जैव-अर्थव्यवस्था! 2047 पर्यंत भारतात 48 दशलक्ष हरित रोजगार निर्माण होणार	195
262.	टॅरिफ: निर्यात	195
263.	सिगारेटचा झुरका महागणार! गुटख्यासह पान मसाल्याच्या किमतीही वाढणार, नवा कायदा येणार	196
264.	जगात सर्वाधिक सोने कोणत्या देशाकडे ? भारताचा क्रमांक कितवा ? पहा टॉप देशांची यादी	196
265.	एका रशियन रुबलचे भारतात किती रुपये होतात? रुपया मोठा की रुबल ?	197
266.	रुपयाचे गडगडणे किती धोक्याचे?	197
267.	श्रम संहितेतील ठळक बदल	198
268.	रेपो दर	200

269.	नोव्हेंबरमध्ये एफपीआय का पळाले? परदेशी गुंतवणूकदारांनी एका महिन्यात 3,700 कोटी विकले	201
270.	सोनं आणखी महागणार, 2026 मध्ये सोनं 35 -40 हजारांनी वाढणार	201
271.	सोन्याचे दर	202
272.	विमान उड्डाणे रद्द करणं इंडिगोला पडलं महागात! तब्बल 7 हजार 160 कोटी रुपयांचं नुकसान	202
273.	झिरो कमिशनसोबत 'भारत टॅक्सी' सेवा लॉन्च; मिळणार अल्प दरात राइड्स, जाणून घ्या दर आणि बुकिंग प्रक्रिया	203
274.	अर्थमंत्र्यांकडून 'आरोग्य सुरक्षा ते राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक २०२५' सादर	204
275.	भारत-रशियाने टॅरिफला तोंड देण्यासाठी काढला 'ब्रह्मास्त्र'; 5 वर्षे अमेरिकाला होणार पश्चात्ताप	205
276.	RBI ची मोठी घोषणा: रेपो रेटमध्ये 0.25% कपात; कार लोन EMI कमी होणार	206
277.	डॉलरच्या तुलनेत रूपया कमकुवत; सोने-चांदीच्या किमती आणखी वाढणार?	207
278.	फक्त ७.१०% च्या व्याजदरावर 'इकडे' मिळतंय होमलोन; ₹८० लाखांच्या कर्जासाठी किती हमी मंथली सॅलरी, EMI किती?	207
279.	सलग तिसऱ्या महिन्यात जागतिक खाद्य किमती कोसळल्या..; पण धान्य मात्र महाग	208
280.	फ्लाइट्सच्या गोंधळात बाजारात धुव्वा उडाला, नुकसानीचा आकडा वाचून गुंतवणूकदारही थक्क; कोट्यवधींची राखरांगोळी	209
281.	आता घर घेणं सोपं होणार! केंद्र सरकार २५ लाख रुपयांपर्यंत कमी व्याजदराने गृहकर्ज देणार; पण कुणाला?	210
282.	भारत आणि अमेरिका व्यापार	211
283.	भारताच्या बासमतीनं मैदान मारलं	211
284.	मेक्सिकोने भारतावर लादला 50% टॅरिफ; भारताच्या 11 अब्ज डॉलर व्यापारावर संकट! कोणत्या वस्तूंना बसणार फटका?	212
285.	फेड रिझर्व्हने केली सलग तिसऱ्यांदा व्याजदरात कपात; भारतीय शेअर बाजार आणि सोन्याच्या किमतींवर काय परिणाम होणार?	213
286.	भारतात वाढणार जीसीसी क्षेत्राचे वर्चस्व	214
287.	सोनं की शेअर बाजार! पुढच्या वर्षी कोण देणार सर्वात जास्त रिटर्न? ब्रोकरेज फर्मने केली भविष्यवाणी	214
288.	रुपया 91 पार; 1 डॉलर = 91.07 रुपये! कारण काय? महागाई वाढणार का?	216
289.	रुपाया घसरणीचे कारण काय	216
290.	बेरोजगारी 9 महिन्यांच्या नीचांकी पातळीवर	217
291.	जागतिक AI रँकिंगमध्ये भारत तिसऱ्या क्रमांकावर; एका वर्षात चार स्थानांनी घेतली झेप	218
292.	नोव्हेंबरमध्ये महागाई थंडावली; अन्नधान्याच्या किमती ०.३२ टक्क्यांनी घसरल्या	219
293.	EV कार	219
294.	रुपयाचे अमेरिकी डॉलरपुढे ९२ पर्यंत लोटांगण	221

 ISBN NO. 978-81-990957-8-6

295.	जगात सर्वाधिक कर्ज कोणत्या देशावर, यादीमध्ये भारत कितव्या स्थानी?	221
296.	'लाडकी बहीण' सारख्या योजनांमुळे महाराष्ट्र महसुली तुटीत गेला; केंद्रीय आर्थिक पाहणी अहवालात ताशेरे	222
297.	Economic Survey Of India : महाराष्ट्रातील पिकांच्या पॅटर्नमध्ये लक्षणीय बदल	223
298.	Table and Chart	224-230

 ISBN NO. 978-81-990957-8-6

अर्थज्ञान

16 / 07 /2025

सेन्सेक्स 82634

निफ्टी 25212

सोने 9100 /9928

चांदी 114

पेट्रोल 104

डिझेल 90

आता EPF चे पैसे एकाच वेळी काढता येणार

EPF म्हणजे काय ?

EPF म्हणजे कर्मचारी भविष्य निधी - भारतातील सर्वात मोठी निवृत्ती बचत योजना आहे. यामध्ये कर्मचारी आणि कंपनी दोघंही त्यांच्या वेतनाचा ठराविक हिस्सा जमा करतात आणि त्यावर व्याजही मिळतं. यामागचा उद्देश निवृत्तीनंतर आर्थिक सुरक्षितता देणं आहे. जर सरकारचा हा नवा प्रस्ताव लागू झाला, तर तो EPFच्या इतिहासातील सर्वात मोठा बदल ठरेल.

2025 पासून खातेदारांना 90% पर्यंत रक्कम घर बांधण्यासाठी किंवा जमीन खरेदीसाठी काढण्याची परवानगी मिळणार आहे. पूर्वी यासाठी किमान 5 वर्षांचा योगदान कालावधी आवश्यक होता, जो आता 3 वर्षांपर्यंत कमी करण्यात आला आहे. याशिवाय, ऑटो-सेटलमेंटची मर्यादा 1 लाखांवरून 5 लाखांपर्यंत वाढवण्यात आली आहे, त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत निधी त्वरीत उपलब्ध होईल.

शासकीय अधिकाऱ्यांनुसार, गेल्या काही काळात EPFच्या नियमांमध्ये लवचिकता आणण्यामागचं उद्दिष्ट म्हणजे खातेदारांना त्यांची कमाई त्यांच्या गरजेनुसार वापरण्याची मुभा मिळावी. दहा वर्षांच्या अंतराने रक्कम काढण्याची संकल्पना देखील याच विचारधारेचा भाग आहे.

कु. पायलकौर जाधव

कु. साक्षी ठाकूर

यशोगाथा

राहुल सिंह यांनी अनोखा व्यवसाय सुरू करत 5 वर्षात उभारलं 280 कोटींचं साम्राज्य

राहुल यांनी सरकारी शाळेत शिक्षण घेतले, जिथे अनेकदा पंख्यांसारख्या मूलभूत सुविधाही नसायच्या. राहुल यांनी अरविंद गणेशन यांच्यासोबत इकोसोल होमची (EcoSoul Home) स्थापना केली.

हा इको-फ्रेंडली प्रोडक्ट ब्रँड असून, त्यांनी सुरुवातीच्या फक्त तीन वर्षांत २८० कोटी रुपयांचा टर्नओव्हर मिळवला आहे. त्यांची कंपनी बांबू आणि ताडपत्रांपासून उत्पादनं बनवते.

छत्तीसगडमधील दुर्ग जिल्ह्यातील भिलाई या छोट्या शहरातून आलेल्या राहुल सिंह यांच्या यशाचा प्रवास प्रेरणादायी आहे. २००१ मध्ये १२वीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर राहुल यांनी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सुरत येथून मेकॅनिकल इंजिनीअरिंगमध्ये बीटेक केले आणि २००५ मध्ये ते पदवीधर झाले. त्यानंतर त्यांनी XLRI – जेवियर स्कूल ऑफ मॅनेजमेंट, जमशेदपूरमधून एमबीए केले. २००८ ते २०१९ पर्यंत त्यांनी अमेरिकेतील अनेक मोठ्या कंपन्यांमध्ये काम केले आणि एक यशस्वी कॉर्पोरेट करिअर घडवले. बोस्टनमध्ये एका प्रसिद्ध ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म वेफेअरमध्ये ते उच्च स्तरावर पोहोचले. वेफेअरमध्ये काम करत असताना राहुल आणि त्यांचे सहकारी अरविंद गणेशन यांनी टिकाऊ उत्पादन श्रेणी विकसित करण्यात महत्त्वाची

 ISBN NO. 978-81-990957-8-6

भूमिका बजावली. याच दरम्यान, त्यांनी पर्यावरणपूरक उत्पादनांच्या मोठ्या बाजारपेठेची मागणी ओळखली.या अनुभवातूनच इकोसोल होमच्या कल्पनेचा जन्म झाला.अरविंद गणेशन यांच्याकडे ड्यूक युनिव्हर्सिटीमधून एमबीएची पदवी आहे. तसेच, उत्पादन व्यवस्थापन, मार्केटिंग आणि पुरवठा साखळी व्यवस्थापनात १५ वर्षांपेक्षा जास्त अनुभव आहे. त्यांनी या व्यवसायात आपल्या अनुभवाचा उपयोग केला.

छत्तीसगडमधील दुर्ग जिल्ह्यातील भिलाई या छोट्या शहरातून आलेल्या राहुल सिंह यांच्या यशाचा प्रवास प्रेरणादायी आहे. २००१ मध्ये १२वीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर राहुल यांनी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सुरत येथून मेकॅनिकल इंजिनीअरिंगमध्ये बीटेक केले आणि २००५ मध्ये ते पदवीधर झाले. त्यानंतर त्यांनी XLRI – जेवियर स्कूल ऑफ मॅनेजमेंट, जमशेदपूरमधून एमबीए केले. २००८ ते २०१९ पर्यंत त्यांनी अमेरिकेतील अनेक मोठ्या कंपन्यांमध्ये काम केले आणि एक यशस्वी कॉर्पोरेट करिअर घडवले. बोस्टनमध्ये एका प्रसिद्ध ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म वेफेअरमध्ये ते उच्च स्तरावर पोहोचले. वेफेअरमध्ये काम करत असताना राहुल आणि त्यांचे सहकारी अरविंद गणेशन यांनी टिकाऊ उत्पादन श्रेणी विकसित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. याच दरम्यान, त्यांनी पर्यावरणपूरक उत्पादनांच्या मोठ्या बाजारपेठेची मागणी ओळखली.या अनुभवातूनच इकोसोल होमच्या कल्पनेचा जन्म झाला.अरविंद गणेशन यांच्याकडे ड्यूक युनिव्हर्सिटीमधून एमबीएची पदवी आहे. तसेच, उत्पादन व्यवस्थापन, मार्केटिंग आणि पुरवठा साखळी व्यवस्थापनात १५ वर्षांपेक्षा जास्त अनुभव आहे. त्यांनी या व्यवसायात आपल्या अनुभवाचा उपयोग केला.

सुरुवातीच्या काळात त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. त्यांच्याकडे इतकी कमी आर्थिक उपलब्धता होती की त्यांना १४ महिने पगार घेता आला नाही. त्यांची पत्नी प्रियंकाने देखील सुरुवातीपासूनच कंपनीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

पर्यावरणपूरक ब्रँडच्या तुलनेत २५% कमी किमतीत उत्पादने

इकोसोलने कर्नाटकच्या तुमकूरमध्ये ५,००० चौरस फुटांच्या उत्पादन युनिटसह सुरुवात केली, ज्यात सुमारे २५ कर्मचारी होते. कच्च्या मालाची सहज उपलब्धता असल्यामुळे तुमकूरची निवड करण्यात आली. सुरुवातीला, त्यांनी बांबू, उसाचे चिपाड आणि ताडपत्रांपासून बनवलेल्या किचन उत्पादनांवर लक्ष केंद्रित केले, जसे की चॉपिंग बोर्ड, सर्व्हिंग यूटेंसिल्स, प्लेट आणि कटोरे.त्यांचा उद्देश असा होता की लोकांना जर ऑर्गेनिक अन्न आवडते, तर मग किचनशी संबंधित उत्पादनांपासून सुरुवात का करू नये. ते आपले उत्पादन थेट शेतकऱ्यांकडून खरेदी करतात आणि मोठ्या प्रमाणावर उत्पादन करतात. यामुळे ते बाजारात इतर पर्यावरणपूरक ब्रँडच्या तुलनेत २५% कमी किमतीत आपली उत्पादने देऊ शकतात.

११ देश ३८०० स्टोअर्स, २८० कोटींची उलाढाल

कंपनीने आता आपल्या कॅटलॉगमध्ये ४२ प्रकारची उत्पादने आणि १६०० SKUs समाविष्ट केली आहेत. २०२२ मध्ये इकोसोलने अमेरिकेतील रिटेल स्टोअर्समध्ये उत्पादने लाँच केली आणि २०२३ मध्ये ११ देशांतील ३८०० स्टोअर्समध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर विस्तार केला. त्यांनी २०२१

 ISBN NO. 978-81-990957-8-6

आणि २०२२ दरम्यान दोन टप्प्यांत १२५ कोटी रुपये जमा केले, ज्यामुळे त्यांना जागतिक स्तरावर विस्तार करण्यास मदत मिळाली. आज, इकोसोल जगभरात १२० लोकांना रोजगार देते. भारत, चीन, व्हिएतनाम, मलेशिया, मेक्सिको यांसारख्या अनेक देशांमध्ये त्यांची उत्पादन युनिट्स आहेत. आज २८० कोटींची उलाढाल करत आहेत.

कु. पायलकौर जाधव
कु. साक्षी ठाकूर

NTPC ला ग्रीन एनर्जीमध्ये 20 हजार कोटींपर्यंत गुंतवणूक करता येणार

केंद्र सरकारनं सार्वजनिक क्षेत्रातील ऊर्जा कंपनी एनटीपीसीला ग्रीन एनर्जीची क्षमता वाढवण्यासाठी 20 हजार कोटी रुपयांच्यागुंतवणुकीला मान्यता दिली आहे. यापूर्वी एनटीपीसी ग्रीन एनर्जीसाठी 7500 कोटी रुपयांची गुंतवणूक करु शकत होतं.नवीकरणीय ऊर्जा क्षमतेत भर घालण्याच्या उद्देशाने घेतलेल्या या निर्णयामुळे देशाला वर्ष 2032 पर्यंत 60 गिगावॅटनवीकरणीय ऊर्जा क्षमतेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

रोजगाराच्या संधी वाढणार.

कॅबिनेटच्या निर्णयानुसार नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील प्रकल्पाची उभारणी आणि त्यानंतर ते प्रकल्प सुरु होणे आणि देखभाल यामुळं स्थानिक लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराची संधी मिळेल. यामुळं स्थानिक पुरवठादार, स्थानिक उद्योग, लघू उद्योग या क्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. देशातील उद्योजकतेच्या संधी वाढतील. याशिवाय रोजगार आणि सामाजिक, आर्थिक विकासाला देखील प्रोत्साहन मिळेल.

कु. पायलकौर जाधव, कु. साक्षी ठाकूर

24 तासांत मिळतोय ITR रिफंड

रिटर्न भरण्याची प्रक्रिया सुरू झाली असून यंदा रिफंड लवकर मिळतोय. 15 सप्टेंबर 2025 ही ITR भरण्याची शेवटची तारीख आहे.जास्त वीजबिल, परदेश प्रवास, किंवा मोठे व्यवहार असणाऱ्यांसाठी ITR भरनं बंधनकारक आहे .

ITR कसं भराल? सोपी प्रक्रिया.

- incometax.gov.in या वेबसाइटवर लॉग इन करा.
- PAN क्रमांक टाका आणि पासवर्डसह लॉग इन करा.
- 'e-file' टॅबवर क्लिक करून 'File Income Tax Return' निवडा.संबंधित वर्ष निवडा आणि तुमची श्रेणी (Individual/HUF/Other) निवडा.
- ITR-1, ITR-2, ITR-3, किंवा ITR-4 यापैकी योग्य फॉर्म निवडा.आवश्यक माहिती भरा आणि शेवटी ITR ई-व्हेरिफाय करणं विसरू नका.

टीप: ITR भरल्यानंतर 30 दिवसांच्या आत E-Verify न केल्यास तुमचा रिफंड अडवला जाऊ शकतो.

कोणते कागदपत्र आवश्यक आहेत?

- पॅन कार्ड व आधार कार्ड
- बँक स्टेटमेंट
- फॉर्म 16 (जर तुम्ही सॅलरिड असाल तर)
- डोनेशन रिसीट्स (जर कर सवलतीसाठी दावा करत असाल)

 ISBN NO. 978-81-990957-8-6

- शेअर ट्रेडिंग स्टेटमेंट (जर गुंतवणूक केली असेल तर)
- बँक खातं जे पॅनशी लिंक केलेलं असेल

कोणासाठी ITR भरणं बंधनकारक आहे?

- जर तुम्ही परदेशी प्रवासावर ₹2 लाखांपेक्षा जास्त खर्च केला असेल
- वर्षभरात ₹1 लाखांहून अधिक वीजबिल भरलं असेल
- एका किंवा अधिक चालू खात्यांमध्ये ₹1 कोटींपेक्षा जास्त रक्कम जमा केली असेल
- तुमच्या व्यवसायातील एकूण उलाढाल ₹60 लाखांहून अधिक असेल
- TDS/TCS रक्कम ₹25,000 पेक्षा जास्त असेल
- सर्वसामान्यांनी ITR भरणं बंधनकारक आहे

ITR कधीपर्यंत भरायचा आहे?

2024-25 साठी आयकर रिटर्न भरण्याची अंतिम तारीख 15 सप्टेंबर 2025 आहे.

रिफंड किती दिवसांत मिळतो?

जर सर्व माहिती बरोबर असेल तर रिफंड 24 तासांत किंवा 5 ते 10 दिवसांत मिळू शकतो.

ई-व्हेरिफिकेशन करावं लागतं का?

हो, ITR भरल्यानंतर 30 दिवसांच्या आत ई-व्हेरिफाय करणं आवश्यक आहे.

ITR भरण्यासाठी कोणते डॉक्युमेंट्स लागतात?

PAN, आधार, बँक स्टेटमेंट, फॉर्म 16, डोनेशन रिसीट्स, शेअर ट्रेडिंग स्टेटमेंट.

सर्वसामान्य व्यक्तीसाठी ITR भरणं बंधनकारक आहे का?

हो, काही आर्थिक निकष पूर्ण झाल्यास सर्वसामान्य नागरिकांनाही रिटर्न भरावा लागतो.

कु. राणी बुलबुले
कु. शैलेजा कोपलवाड

रुपयाचं चिन्ह कोणी डिझाइन केलं? दोन आर्किटेक्टची कहाणी.

2010 पूर्वी भारताकडे अधिकृत रुपया चिन्ह नव्हतं, फक्त 'Rs' हे संक्षिप्त रूप वापरलं जात होतं. उदयकुमार यांनी 'र' आणि 'R' यांचं मिश्रण करून अधिकृत रुपया चिन्ह डिझाइन केलं आणि स्पर्धा जिंकली. नोंदिता कोरेया-मेहरोत्रा यांनी 2005 मध्येच असंच डिझाईन सुचवलं होतं, पण त्याला अधिकृत प्रतिसाद मिळाला नाही.

उदयकुमार यांचं डिझाईन

या स्पर्धेत विजेते ठरले आर्किटेक्ट उदय कुमार. त्यांनी डिझाइन केलेलं चिन्ह म्हणजे देवनागरी 'र' आणि इंग्रजी 'R' यांचं सुंदर मिश्रण होतं. त्यात दोन समांतर रेषा आडव्या होत्या - जणू भारतीय संस्कृती आणि आधुनिकतेचा संगम. हे चिन्ह आधुनिक असूनही सहज ओळखता येईल असं होतं. उदय कुमार यांना प्रसिद्धी मिळाली आणि रुपया चिन्हाचे ते अधिकृत डिझायनर ठरले.

भारतीय रुपया चिन्ह अधिकृत कधी स्वीकारलं गेलं?

जुलै 2010 मध्ये भारत सरकारने भारतीय रुपया चिन्ह अधिकृतपणे स्वीकारलं.

रुपया चिन्हाचं डिझाइन कोणी तयार केलं?

आर्किटेक्ट उदय कुमार यांनी हे चिन्ह डिझाइन केलं, ज्यात देवनागरी 'र' आणि इंग्रजी 'R' यांचं संयोजन आहे.

नोंदिता कोरेया-मेहरोत्रा यांचा या प्रक्रियेत काय सहभाग होता?

नोंदिता यांनी 2005 मध्येच असं चिन्ह रेखाटून RBI आणि पंतप्रधान कार्यालयाकडे पाठवलं होतं, मात्र त्यावर काहीच प्रतिसाद मिळाला नव्हता.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

रुपया चिन्ह निवडण्यासाठी सरकारने काय प्रक्रिया राबवली होती?

सरकारने राष्ट्रीय स्तरावर डिझाईन स्पर्धा आयोजित केली होती, ज्यात हजारो डिझाईन सबमिट करण्यात आले आणि त्यातून विजेता निवडण्यात आला.

रुपया चिन्हात कोणती लिपी आहे?

या चिन्हात देवनागरी 'र' आणि इंग्रजी 'R' या दोन लिपींचं मिश्रण आहे, ज्यावर दोन समांतर रेषा आहेत.

कु. राणी बुलबुले
कु. शैलेजा कोपलवाड

जीएसटीमध्ये होणार मोठा बदल

GST मधील 12% कर स्लॅब हटवण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात असून, ऑगस्टमध्ये यावर निर्णय होण्याची शक्यता आहे. या बदलामुळे कररचना सुलभ होईल आणि वस्तू 5% किंवा 18% स्लॅबमध्ये हलवल्या जातील, त्यामुळे काही वस्तू स्वस्त किंवा महाग होऊ शकतात.सरकारचा विश्वास आहे की या सुधारणेमुळे उद्योगांना दिलासा मिळेल आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.गुड्स ॲण्ड सर्व्हिसेस टॅक्स (GST) अंतर्गत 12% स्लॅब हटवण्याचा प्रस्ताव आता अंतिम टप्प्यात असून, पंतप्रधान कार्यालयानं (PMO) या निर्णयाला हिरवा कंदील दाखवला आहे. सध्या भारतात पाच प्रमुख GST स्लॅब आहेत - 0%, 5%, 12%, 18% आणि 28%. याशिवाय सोनं-चांदीसारख्या मौल्यवान धातूंसाठी 0.25% आणि 3% असे दर आहेत. केंद्र सरकारचा प्रस्ताव आहे की, 12% स्लॅब पूर्णपणे रद्द करून त्यात येणाऱ्या वस्तूंना 5% किंवा 18% स्लॅबमध्ये टाकण्यात यावं. या बदलामुळे करप्रणाली आणखी सुलभ आणि पारदर्शक होईल, असा सरकारचा विश्वास आहे.

सध्या-

- 5% स्लॅबमध्ये - 21% वस्तू
- 12%स्लॅबमध्ये - 19% वस्तू
- 18%स्लॅबमध्ये - 44% वस्तू आहेत

GST रचना आता स्थिर झाली असून, भारताची अर्थव्यवस्था मजबूत स्थितीत आहे. त्यामुळे असा मोठा बदल करण्यासाठी हा योग्य काळ आहे. भारत सध्या अनेक देशांशी फ्री ट्रेड एग्रीमेंट्सवर काम करत आहे. अशा वेळी स्थानिक उद्योगांना फायदा होण्यासाठी GST सुधारणा आवश्यक आहेत.

आयकर कायद्यातही काही मोठे बदल होण्याची शक्यता आहे. हे सुधारणा विधेयक संसदेच्या पावसाळी अधिवेशनात मांडलं जाऊ शकतं.

थोडक्यात माहिती

GST च्या 12% स्लॅबचं काय होणार आहे?

→ सरकार 12% स्लॅब रद्द करून त्या वस्तूंना 5% किंवा 18% स्लॅबमध्ये वर्गीकृत करण्याचा विचार करत आहे.

हा बदल कधी लागू होऊ शकतो?

→ GST काउन्सिल ऑगस्टमध्ये निर्णय घेऊ शकते, आणि सर्व राज्यांची सहमती मिळाल्यास नवीन दर लवकर लागू होऊ शकतात.

या सुधारणेचा उद्देश काय आहे?

→ कर प्रणाली अधिक सुलभ करणे, व्यापाऱ्यांसाठी प्रक्रिया सोपी करणे आणि आर्थिक विकासाला चालना देणे हा उद्देश आहे.

या बदलामुळे ग्राहकांवर काय परिणाम होईल?

→ काही वस्तूंवरचा करदर कमी होऊन त्या स्वस्त होतील, तर काही वस्तूंवर कर वाढून त्या महाग होऊ शकतात.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

GST काउन्सिल कोणते निर्णय घेते?

→ GST काउन्सिल अप्रत्यक्ष कर व्यवस्थेशी संबंधित सर्व धोरणात्मक निर्णय घेते आणि त्यासाठी सर्व राज्यांची सहमती आवश्यक असते.

कु. राणी बुलबुले
कु. शैलेजा कोपलवाड

गृहकर्ज पुन्हा एकदा स्वस्त होणार.

भारतीय रिजर्व बँक मागच्या पुन्हा एकदा रेपो रेट मध्ये कपात करू शकते. एचएसबीसी ग्लोबल रिसर्चच्या अहवालात म्हटले आहे की डिसेंबरमध्ये होणाऱ्या चलनविषयक धोरण समिती (एमपीसी) बैठकीत रेपो दरात आणखी २५ बेसिस पॉइंट्सची कपात केली जाऊ शकते.

२०२५ च्या अखेरीस रेपो दर ५.२५ टक्क्यांपर्यंत खाली येऊ शकतो. कमी होणारी महागाई आणि विकासातील मंदी हे रेपो रेट कमी होण्याची मुख्य कारणे आहेत. त्यामुळे तुमच्या डोक्यावरचे गृहकर्ज आपोआप कमी होईल. गृहकर्ज दीर्घ कालावधीचे असतात आणि त्यातील कर्ज देखील जास्त असते, त्यामुळे व्याजदरात कपात केल्याने थेट घर खरेदीदारांना फायदा होईल.

एचएसबीसी ग्लोबल रिसर्चच्या अहवालात म्हटले आहे की ऑगस्ट आणि ऑक्टोबरच्या बैठकांमध्ये रेपो दरात (Repo Rate) कोणताही बदल केला जाणार नाही असा आमचा अंदाज आहे. परंतु, डिसेंबरच्या बैठकीत आरबीआय २५ बेसिस पॉइंट्स रेपो रेट कमी करू शकते. सध्या रेपो रेट ५.५०% आहे. मात्र डिसेंबर अखेर हाच दर ५.२५ टक्क्यांपर्यंत पोहोचू शकतो.

दरम्यान, महागाईचा दर 3.7 टक्क्यांपेक्षा खाली जाण्याची शक्यता आरबीआय गव्हर्नरांनी व्यक्त केली आहे. जून महिन्यात किरकोळ आणि घाऊक महागाई (सीपीआय आणि डब्ल्यूपीआय) दोन्ही कमी झाले आहेत. मे महिन्यातील ग्राहक किंमत निर्देशांक २.८ टक्क्यांवर होता, तो जून महिन्यात २.१ टक्क्यांपर्यंत खाली आला. अन्नपदार्थ स्वस्त झाल्याने महागाईत घट झाली असं बोललं जातंय.

कु. वैष्णवी औंढेकर
कु. शिवानी यादव

ग्रीन वेअरहाऊसिंग क्षेत्रात भारताची मोठी झेप, पुढील ५ वर्षांत ४ पट वाढ होण्याची शक्यता

हरित गोदाम पर्यावरणपूरक आणि शाश्वत आहे. ते वीज वापर आणि कचरा कमी करताना संसाधनांचा कार्यक्षम वापर करण्यास प्रोत्साहन देते.

गेल्या ५ वर्षांत ए ग्रेड गोदाम साठा २.५ पट वाढला आहे. २०३० पर्यंत भारतातील एकूण गोदाम साठा ८८५ दशलक्ष चौरस फूट पर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. २०२४ पर्यंत तो ४३८ दशलक्ष चौरस फूट नोंदवला गेला.

गोदाम क्षेत्रात ए ग्रेड संस्थात्मक गोदामांचा वाटाही वेगाने वाढत आहे. जेएलएलच्या या अहवालानुसार, २०१९ मध्ये एकूण ए ग्रेड गोदाम साठा ८८० लाख चौरस फूट होता, ज्यामध्ये ए ग्रेड संस्थात्मक गोदामाचा वाटा २.८ कोटी चौरस फूट होता, २०२४ मध्ये एकूण ए ग्रेड गोदाम साठा जवळजवळ २.५ पटीने वाढून २३.८० कोटी चौरस फूट झाला. यासोबतच, ए ग्रेड संस्थात्मक गोदामाचा वाटा २०१९ मध्ये २.८० कोटी चौरस फूट होता, जो तीन पटीने वाढून ९ कोटी चौरस फूट झाला.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

भारताची अर्थव्यवस्था आधुनिक होत असताना आणि ई-कॉमर्स वेगाने विस्तारत असताना ही वाढ उच्च दर्जाच्या गोदाम आणि वितरण सुविधांची वाढती मागणी दर्शवते. तसेच, ही वाढ प्रमुख जागतिक गुंतवणूकदारांच्या वाढत्या विश्वासाचे प्रतिबिंब आहे, जे भारतीय बाजारपेठेत आंतरराष्ट्रीय शाश्वतता मानके आणत आहेत.

कु. निकिता गाजलवाड
कु. राधिका नरहिरे

❖ प्रश्नावली

खालीलपैकी योग्य तो पर्याय निवडून रिक्त जागा भरा.

1. - - - - - सरकारने ऑगस्ट 2002 मध्ये पहिला राजवित्तीय जबाबदारी कायदा संमत केला. (STI Main's, 2012)

A) पंजाब
B) तामिळनाडु
C) कर्नाटक
D) केरळ

2. भारतातील अन्नधान्य अनुदाने यात याचं समावेश होतो.

अ) शेतकऱ्यांसाठीची अनुदाने
ब) उपभोक्त्यांची अनुदाने
क) भारतीय अन्नधान्य महामंडळासाठीची अनुदाने

(STI Mains July, 2022)

A) फक्त ब आणि क
B) फक्त अ आणि क
C) वरीलपैकी सर्व
D) फक्त अ आणि ब

3. अर्थसंकल्पातील तुटीच्या बाबतीत खालीलपैकी कोणते विधान बरोबर नाही? (राज्यसेवा -(मुख्य) - 2018)

A) महसुली तूट म्हणजे सरकारच्या महसुली खर्च आणि वर्तमान महसुल यामधील फरक होय.

B) प्राथमिक तूट ही सरकारच्या एकूण संसाधन पोकळीचे परिमाण आहे.

C) प्राथमिक तूट म्हणजे वित्तीय तूट वजा व्याजदेयक.

D) वित्तीय तूट म्हणजे पूर्ण सरकारी खर्च आणि अनुदानासहीत पूर्ण सरकारी महसूल यामधील फरक होय.

4. - - - - ही भारतातील सार्वजनिक खर्चामध्ये वाढ होण्याची कारणे आहेत.

अ) लोकसंख्या वाढ
ब) नागरीकरण
क) प्रशासकीय यंत्रणाचा विस्तार
ड) विकासाचे प्रकल्प

(राज्यसेवा मुख्य, मे, 2022)

A) अ, ब आणि क
B) अ, ब आणि ड
C) ब, क आणि ड
D) अ, ब, क आणि ड

5. राजकोषीय तूट = महसुली प्राप्ती + -------- - एकूण खर्च

(STI Mains-2017)

A) महसुली प्राप्ती
B) सरकारने बाजारातून उभारलेले कर्ज
C) भांडवली प्राप्ती
D) अंदाजपत्रकीय तूट

6. आर्थिक वृद्धीची श्रेणी आणि - - - - - दरडोई उपभोग यामध्ये थेट सहसंबंध आहे. (STI Mains - 2016)

A) उर्जेचा
B) दूरसंचार सेवांचा
C) विविध वस्तूंचा
D) पाण्याचा

7. केंद्र सरकारच्या भांडवली उत्पन्नामध्ये कोणत्या घटकांचा समावेश होतो ?

(a) अंतर्गत कर्जापासून उत्पन्न.
(b) बर्हिगत कर्जापासून उत्पन्न.
(c) अल्प बचतीपासून उत्पन्न

 ISBN NO. 978-81-990957-8-6

(d) भविष्य निर्वाह निधीपासून्चे उत्पन्न.
(राज्यसेवा मुख्य - 2015)

A) (c) आणि (d)

B) (a), (c) आणि (d)

C) (a) आणि (b)

D) वरील सर्व

8. मार्च 2009 अखेरीस भारतावरील परकीय कर्ज - - - - - कोटी रु. एवढे होते.
(कृषी सेवा पूर्व - 2011)

A) 1143518

B) 1142618

C) 1142518

D) 1142718

9. खालील पैकी कोणते वित्तीय धोरणाचे साधन नाही?
(संयुक्त गट ब - 2017)

A) कर आकारणी

B) सार्वजनिक खर्च

C) सार्वजनिक कर्ज

D) खुल्या बाजारात कर्जरोख्यांची खरेदी-विक्री

10. शून्याधारित अर्थसंकल्पामध्ये
अ) गतवर्षीपासून आरंभ असतो.
ब) प्रत्येक कृतीचे समर्थन करावे लागते
क) खर्च नियंत्रण महत्त्वाचे असते.
ड) परिणामकारकता महत्त्वाची असते.
(STI Mains - 2013)

A) अ, ब आणि ड

B) क आणि ड

C) ब आणि ड

D) अ आणि ब

उत्तरे

1 - C	2 - C	3 - B	4 - D	5 - C
6 - A	7 - D	8 - B	9 - D	10 - C

17/07/25

सेन्सेक्स:- 82,259

निफ्टी :- 25,111

सोने :- 9,105/9,933

चांदी :- 114

पेट्रोल:-104

डिझेल:- 90

आधार कार्डचा गैरवापर रोखण्यासाठी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाने (UIDAI) मृत व्यक्तींचे आधार कार्ड ब्लॉक करण्यास सुरुवात केली आहे. UIDAI ने आतापर्यंत १.१७ कोटींहून अधिक १२-अंकी आधार क्रमांक निष्क्रिय केले आहेत.

युद्धग्रस्त जागतिक अर्थव्यवस्थेत भारतच तारणहार

जागतिक पार्श्वभूमी

जगात १९५ देश आहेत, त्यातील १९३ देश संयुक्त राष्ट्रसंघाचे सदस्य. युद्ध, करप्रणाली, व्यापार बंधने यामुळे जागतिक अर्थव्यवस्था अस्थिर झाली आहे.

युक्रेन-रशिया आणि इस्त्राइल-पॅलेस्टाईन युद्ध अजूनही सुरु आहेत. इराण-इस्त्राइल तणावामुळे आणखी अस्थिरता वाढली आहे. अनेक देशांत महागाई, बेरोजगारी आणि मंदीचे वातावरण.

अर्थव्यवस्थांचे ४ गट

- ❖ विकसित देश – अमेरिका, ब्रिटन, जर्मनी.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

- ❖ विकसनशील देश – भारत, मलेशिया, ब्राझील.
- ❖ अविकसित देश – खूपच मागे असलेले.
- ❖ युद्धग्रस्त/अस्थिर देश – वाढती संख्या.

भारताचे विशेष स्थान

भारताची अर्थव्यवस्था स्थिर आणि मजबूत. तरुण लोकसंख्या, मोठी ग्राहक बाजारपेठ. तंत्रज्ञान, अन्नधान्य, नेतृत्व यामध्ये भारत आघाडीवर. ५०+ देशांशी मुक्त व्यापार करार. रुपयामध्ये व्यवहार स्वीकृत होतोय. पायाभूत सुविधांमुळे परदेशी गुंतवणूक वाढतेय.

भारताची भूमिका – विश्वशांतीचा संदेश

भारताची तटस्थ भूमिका योग्य आणि गरजेची. कोणत्याही देशाच्या बाजूने न राहता सर्वांना संवादाचा सल्ला.भारताचा अजातशत्रू दृष्टिकोन – कोणताही दुश्मन नाही.

भारतच जगाचा तारणहार ठरतोय.

निष्कर्ष

आजच्या अस्थिर आणि युद्धग्रस्त वातावरणात भारतच एक विश्वासार्ह देश आहे. जागतिक अर्थव्यवस्थेला दिशा देण्यासाठी आणि शांतता टिकवण्यासाठी भारताची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरत आहे.

कु. कार्तिक पगडाला
गजानन राजरवाड

ट्रम्प लादणार नवीन टॅरिफ

जपान, ब्राझील, कॅनडा, इंडोनेशिया आणि दक्षिण आफ्रिकेला शुल्क पत्र पाठवल्यानंतर, आता राष्ट्राध्यक्ष ट्रम्प १५० हून अधिक देशांना शुल्क पत्र पाठवणार आहेत आणि हे ट्रम्प यांनी स्वतः उघड केले आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी आता फार्मा आणि सेमीकंडक्टरवर 200% किंवा त्याहूनही जास्त आयात शुल्क लादण्याचे संकेत दिले आहेत ज्याचा थेट परिणाम भारतावर होऊ शकतो. याशिवाय, ट्रम्प 1 ऑगस्टपासून परस्पर शुल्क लागू करण्याची योजना आखत आहेत, ज्याचा फक्त भारतच नाही तर जगातील इतर देशांवरही विपरीत परिणाम होणे अपेक्षित आहे. स्थानिक पातळीवर कंपन्यांना उत्पादन करण्यासाठी वेळ देण्याचे राष्ट्रपतींचे उद्दिष्ट आहे, त्यानंतर असे न करणाऱ्या कंपन्यांवर कडक दर लादले जातील.

अमेरिकन ग्राहकांना बसेल फटकामात्र, कोणत्याही टॅरिफचा थेट परिणाम एली लिली अँड कंपनी, मर्क अँड कंपनी आणि फायझर इंक सारख्या औषध कंपन्यांवर होऊ शकतो, ज्या परदेशात औषधे तयार करतात. परिणामी अमेरिकन ग्राहकांसाठी खर्च वाढण्याचा धोका आहे. त्याचवेळी, सेमीकंडक्टर टॅरिफ योजनेमुळे ॲपल इंक आणि सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स कंपनी लिमिटेड सारख्या लोकप्रिय उत्पादनांच्या किमती देखील वाढू शकतात.

भारतावर काय परिणाम होणार

भारतीय औषध कंपन्यांच्या एकूण उत्पन्नापैकी 30-40% उत्पन्न अमेरिकेतून मिळते. 2024 मध्ये भारताने 12.72 अब्ज अमेरिकन डॉलर्स किमतीची औषध उत्पादने अमेरिकेला पाठवली तर, अमेरिकेतून 800 दशलक्ष अमेरिकन डॉलर्स किमतीची औषध उत्पादने भारतात पाठवली जातात. अशा परिस्थितीत, ट्रम्प यांनी औषधांवर मोठ्या प्रमाणात आयात शुल्क लादले तर मोठ्या कंपन्या किमती वाढवून त्यांचे नुकसान भरून काढतील पण, लहान कंपन्यांना बाजारात टिकून राहणे कठीण होईल.

कु. कार्तिक पगडाला
गजानन राजरवाड

 ISBN NO. 978-81-990957-8-6

Net Asset Value (NAV) म्हणजे काय?

NAV म्हणजे म्युच्युअल फंडाच्या एका युनिटची किंमत.याच आधारे गुंतवणूकदाराला किती युनिट्स मिळतील हे ठरते.

NAV कसं काम करतं?

तुम्ही ₹9,000 गुंतवले आणि NAV ₹90 असेल → तुम्हाला 100 युनिट्स मिळतील.

जर पुढे NAV ₹100 झाला → तुमचं गुंतवणूक मूल्य = ₹10,000 (100 × ₹100)

NAV ची गणना कशी होते?

दैनंदिन बाजार बंद झाल्यावर NAV ठरते

सूत्र:-

(एकूण मालमत्ता - दायित्वे) ÷ युनिट्स = NAV

यामध्ये शेअर्स, बाँड्स, इतर मालमत्तेचं मूल्य धरलं जातं.

महत्त्वाच्या गोष्टी

NAV वाढली → गुंतवणूक वाढली

NAV घसरली → गुंतवणूक कमी झाली

फक्त कमी NAV असलेला फंड "स्वस्त" समजणे चुकीचे आहे.

फंडाची कामगिरी, व्यवस्थापन, तुमचे उद्दिष्ट महत्त्वाचे आहेत.

कु. कार्तिक पगडाला
गजानन राजरवाड

तुमचा मुलगा सरकारी शाळेत शिकतोय; तर मिळणार २०,००० रुपये, काय आहे NEEEV योजना?

केंद्र सरकारने विद्यार्थ्यांसाठी अनेक योजना राबवल्या आहेत. त्याचसोबत अनेक राज्य सरकारनेदेखील या योजना राबवल्या आहेत. दिल्ली सरकारने विद्यार्थ्यांसाठी खास नीव योजना लाँच केली आहे.

या योजनेत त्यांना सरकारकडून २० हजार रुपये मिळणार आहे. फक्त सरकारी शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनाच या योजनेचा लाभ मिळणार आहे.

दिल्ली सरकारने मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत काही प्रोजेक्टवर काम करण्यासाठी २० हजार रुपयांची मदत केली जाते.

विद्यार्थ्यांना नवीन विचार, समस्या सोडवण्यासाठी आणि स्वतः च्या पायावर उभं राहण्यासाठी मदत केली जाते. या योजनेत ८वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांना मदत मिळणार आहे. ही योजना फक्त शिक्षणासाठी नाही तर बिझनेस कसा करायचा हेदेखील शिकवणार आहे.

दिल्लीतील या योजनेचं नाव न्यू एरा ऑफ इंटरप्रिन्यूरियल इकोसिस्टम अँज व्हिजन (NEEEV) असं आहे.

NEEEV मध्ये असणार हे ४ टप्पे

१. NEEEV डायलॉग

यामध्ये उद्योगविश्वातील विविध लोक आणि बिझनेसमॅन विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहे. यामधून त्यांना शिक्षणाची प्रेरणा मिळणार आहे.

२. स्टार्टअप स्टॉर्मर्स

यामध्ये स्पर्धा घेतल्या जाणार आहे. त्यामध्ये विद्यार्थी नवनवीन बिझनेस आयडिया एकमेकांना सांगणार आणि त्यावर काम करणार

३. फंड

ज्या विद्यार्थ्यांच्या समूहाला निवडले जाईल. त्यांना आपली आयडिया प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आणि बिझनेस सुरु करण्यासाठी २० हजार रुपये दिले जातील.

४. उपकरणांची मदत

ज्या शाळांमध्ये अटल टिकरिंग लॅब आहे तेथील विद्यार्थ्यांना 3D प्रिंटर, इंटरनेट ऑफ थिंग्स किट,AI, रोबोटिक्सशी निगडीत सायन्स, टेक्निकल, इंजिनियरिंग, गणित या विषयातील उपकरणे मिळणार आहेत.

❖ प्रश्नावली

1. राष्ट्रीय उत्पन्नाच्या गणनेत खालीलपैकी कोणते समाविष्ट नाही?

[A]वार्षिक वस्तू उत्पादनाचे मूल्य

[B] वार्षिक सेवांचे मूल्य

[C] विकल्या जाणाऱ्या जुन्या वस्तूंचे मूल्य

[D] नवीन तंत्रज्ञानाचे मूल्य

2. भारतातील GDP मोजण्यासाठी खालीलपैकी कोणते मंत्रालय जबाबदार आहे?

[A] अर्थ मंत्रालय

[B] वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय

[C] केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय

[D] ग्राहक व्यवहार मंत्रालय

3. वितरणाच्या आधारावर, संसाधनांचे खालीलपैकी कोणत्या प्रकारात वर्गीकरण करता येते?

[A] संभाव्य संसाधने

[B] सर्वव्यापी संसाधने

[C] प्रत्यक्ष संसाधने

[D] अजैविक संसाधने

4. खालीलपैकी कोणते सूक्ष्म-आर्थिक परिवर्तनशीलतेचे उदाहरण आहे?

[A] राष्ट्रीय उत्पन्न

[B] ग्राहकांचे समतोल

[C] एकूण पुरवठा

[D] रोजगार

5. लोरेन्झ कर्व्ह' खालीलपैकी कोणता दर्शवितो?

[A] महागाई

[B] उत्पन्न वितरण

[C] रोजगार

[D] चलनवाढ

6. उत्पादन कार्याचे प्रतिनिधित्व करण्याचा पर्यायी मार्ग खालीलपैकी कोणता आहे?

[A] सरासरी उत्पादन

[B] दीर्घ कालावधी

[C] समविभाज्य

[D] अल्प कालावधी

7. खालीलपैकी कशाला GDP डिफ्लेटर म्हणतात?

[A] नाममात्र आणि वास्तविक GNP चे गुणोत्तर

[B] नाममात्र आणि वास्तविक CPI चे गुणोत्तर

[C] वास्तविक आणि नाममात्र GNP चे गुणोत्तर

[D] नाममात्र आणि वास्तविक GDP चे गुणोत्तर

8. मागणीच्या नियमाबाबत खालीलपैकी कोणते बरोबर आहे?

[A] हा उत्पन्न आणि वस्तूच्या किंमतीमधील संबंध आहे

[B] ग्राहकाचे उत्पन्न बदलू नये असे गृहीत धरते

[C] वस्तूच्या किंमती बदलू नये असे गृहीत धरते

[D] हे उत्पन्न आणि मागणी केलेल्या प्रमाणातील संबंध आहे.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

9. खालीलपैकी कोणते मागणी वक्रशी संबंधित आहे?

[A] वस्तूची मागणी आणि किंमत यांच्यातील संबंध

[B] वस्तूच्या मागणी आणि पुरवठ्यातील संबंध

[C] ग्राहकाचे उत्पन्न आणि वस्तूची मागणी यांच्यातील संबंध

[D] वरीलपैकी काहीही नाही

10. वस्तूच्या मागणीची कमी किंमत लवचिकता काय दर्शवते?

[A] चांगल्याची आवश्यकता

[B] ते विलासी चांगले आहे

[C] त्याला महत्त्व नाही

[D] ते कनिष्ठ चांगले आहे

1.D	2-C	3-B	4-B	5-B
6-C	7-D	8-B	9-A	10-A

18/07/2025

सेन्सेक्स:- 82,693

निफ्टी :- 24,936

सोने :- 9,110/9,938

चांदी :- 113

पेट्रोल:-104

डिझेल:- 90

शहरं 22 कॅरेट सोन्याच्या प्रति 10 ग्रॅमचा दर 24 कॅरेट सोन्याच्या प्रति 10 ग्रॅमचा दर 18 कॅरेट सोन्याच्या प्रति 10 ग्रॅमचा दर

- चेन्नई ₹91,110 ₹99,390 ₹74,550
- बंगळुरु ₹91,110 ₹99,390 ₹74,550
- पुणे ₹91,110 ₹99,390 ₹74,550
- मुंबई ₹91,110 ₹99,390 ₹74,550
- केरळ ₹91,110 ₹99,390 ₹74,550
- कोलकाता ₹91,110 ₹99,390 ₹74,550
- हैद्राबाद ₹91,110 ₹99,390 ₹74,550
- नागपूर ₹91,110 ₹99,390 ₹74,550
- दिल्ली ₹91,260 ₹99,530 ₹74,670
- चंदीगड ₹91,260 ₹99,530 ₹74,670
- जयपूर ₹91,260 ₹99,530 ₹74,670
- लखनौ ₹91,260 ₹99,530 ₹74,670
- नाशिक ₹91,140 ₹99,420 ₹74,580
- सुरत ₹91,160 ₹99,430 ₹74,590

27 ते 40 पर्यंत... पेट्रोल आणि डिझेलचे दर लवकरच कमी होणार

कच्च्या तेलाच्या आंतरराष्ट्रीय दरांमध्ये स्थिरता राहिल्यास पुढील 2-3 महिन्यांत पेट्रोल-डिझेल दर कमी होऊ शकतात.

भारताने क्रूड ऑइल खरेदी नेटवर्क 27 देशांवरून वाढवून 40 देशांपर्यंत नेले आहे, ज्यामुळे पुरवठा सुरक्षित झाला आहे.रशियाचा सध्या भारताच्या एकूण तेल आयातीत 40% वाटा असून, कमी दरांमुळे ग्राहकांना फायदा होण्याची शक्यता आहे.

कु. निकिता तोमर
कु. अंकिता तोमर

32 अब्ज डॉलरची निर्यात धोक्यात

इंडिया सेल्युलर अँड इलेक्ट्रॉनिक्स असोसिएशन (ICEA) ने सरकारला यासंदर्भात पत्र लिहिले आहे.

त्यात म्हटले आहे की, चीन औपचारिक सूचना न देता जाणूनबुजून निर्बंध लादत आहे. चीनकडून

 ISBN NO. 978-81-990957-8-6

हे निर्बंध कॅपिटल इक्विपमेंट, मिनरल्स आणि टेक्निकल पर्सनलवर आणले आहेत. त्यामुळे शिपमेंटमध्ये विलंब होत आहे आणि खर्च वाढत आहे. यामुळे भारताला सुमारे 32 अब्ज रुपयांचे नुकसान होऊ शकते. भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाला धोका निर्माण होऊ शकतो.

कु. निकिता तोमर
कु. अंकिता तोमर

आयटी कंपनी देणार २५०% लाभांश

भारतातील आघाडीची आयटी सेवा कंपनी विप्रो लिमिटेडने आपल्या भागधारकांसाठी एक आनंदाची बातमी दिली आहे.

कंपनीने प्रति शेअर ६ रुपये अंतिम लाभांश जाहीर केला आहे, ज्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

विप्रोनेशेअर बाजारात केलेल्या फाइलिंगनुसार, या लाभांशासाठी २८ जुलै २०२५ ही 'रेकॉर्ड तारीख' निश्चित करण्यात आली आहे. याचा अर्थ असा की, ज्या गुंतवणूकदारांकडे या तारखेपर्यंत विप्रोचे शेअर्स असतील, त्यांना या लाभांशाचा फायदा मिळेल. हा लाभांश १५ ऑगस्ट २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी थेट गुंतवणूकदारांच्या खात्यात जमा केला जाईल.

एकत्रित निव्वळ नफा : कंपनीचा निव्वळ नफा ९.८७ टक्क्यांनी वाढून ३,३३६.५ कोटी रुपये झाला आहे. गेल्या वर्षी याच तिमाहीत कंपनीने ३,०३६.६ कोटींचा नफा कमावला होता.

कार्यवाही महसूल : या कालावधीत कंपनीचा परिचालन महसूल २२,१३४.६ कोटी रुपये होता, जो आर्थिक वर्ष २५ च्या पहिल्या तिमाहीतील २१,९६३.८ कोटी रुपयांवरून ०.७८ टक्क्यांनी वाढ दर्शवितो.

स्टेट बँकेची तब्बल २,१२२ कोटींची फसवणूक

सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठ्या स्टेट बँक ऑफ इंडियात गेल्या आर्थिक वर्षात 2,122 कोटींची फसवणूक झाली आहे. माहिती अधिकारातून माहिती उघडकीस आली आहे. स्टेट बँकेच्या देशभरातील शाखांमध्ये फसवणुकीची एकूण संख्या 13,782 एवढी आहे.

सायबर गुन्हेगारांनी 10 हजार 260 प्रकरणांमध्ये ही फसवणूक केली आहे. तब्बल 66.70 कोटींची फसवणूक केली आहे. आरटीआय कार्यकर्ते अभय कोलारकर यांनी माहितीचे अधिकारात ही माहिती प्राप्त केली आहे.जवळपास 5,002 लोकांची फसवणूक झाली आहे. या फसवणूकीतून 37.26 कोटींची रुपये उकळण्यात आले आहेत. इंटरनेटच्या माध्यमातून ही फसवणूक झाली आहे.

याशिवाय यूपीआयच्या माध्यमातून 4,829 लोकांकडून 26.46 कोटी रुपये घेतले आहे. एइपीएस ने 265 लोकांची 46 लाख रुपयांची फसवणूक झाली आहे. तर स्टेट बँकेचे स्वतःचे मोबाईल ऍप 'योनो'वरुन 156 जणांची 2.34 कोटींची फसवणूक झाली आहे.

कु. निकिता तोमर
कु. अंकिता तोमर

गृहिणी झाली उद्योजिका, अवघ्या 8 हजारात उभारलं 29 कोटींचं साम्राज्य

कोईम्बतूरच्या कृतिका कुमारन त्यांनी आपल्या मुलीच्या त्वचेच्या समस्येवर उपाय शोधण्यासाठी घरगुती साबण बनवण्यास सुरुवात केली आणि

 ISBN NO. 978-81-990957-8-6

हाच व्यवसाय आज कोट्यवधींची उलाढाल करत आहे.

सुरुवातीला केवळ 8,000-10,000 रुपयांच्या गुंतवणुकीतून कृतिकाने क्लासिक बकरीच्या दुधाचे साबण, चारकोल साबण आणि गुलाब साबण यांसारखी विविध उत्पादने बनवण्यास सुरुवात केली. यात बकरीचे दूध हे मुख्य घटक राहिले.

व्यवसाय विस्तार 1 कोटी ते 29 कोटींची उलाढाल .मागणी वाढू लागल्याने विल्व्हचा विस्तार झाला. कृतिकाने अमेझॉन, फ्लिपकार्ट आणि नायका यांसारख्या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर आपल्या उत्पादनांची नोंदणी करून आपली पोहोच वाढवली.

विल्व्हने पहिल्याच वर्षी 1 कोटी रुपयांची उलाढाल केली. त्यानंतर हा ब्रँड सतत वाढत आहे. 2023 मध्ये ची उलाढाल 29 कोटी रुपयांपर्यंत पोहोचली.

कु. निकिता तोमर
कु. अंकिता तोमर

पतंजलीच्या स्वदेशी चळवळीनं अर्थव्यवस्थेला दिलं पाठबळ

भारताच्या झपाट्याने बदलणाऱ्या आर्थिक परिस्थितीत पतंजली कंपनीला केवळ व्यावसायिक यशच नाही तर स्वदेशी चळवळीच्या माध्यमातून आत्मनिर्भरता आणि आर्थिक विकासाला चालना दिल्याचा दावा पतंजली करते.

स्थानिक शेतकऱ्यांकडून कच्चा माल खरेदी करून ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला बळ दिलं गेलं. तसेच कारखाने, वितरण केंद्रं आणि किरकोळ विक्रीच्या माध्यमातून हजारो लोकांना रोजगार मिळाला. कंपनीनं अनेक राज्यांमध्ये उत्पादन युनिट्स स्थापन केल्यामुळे स्थानिक औद्योगिक विकासालाही गती मिळाली.

कु. निकिता तोमर, कु. अंकिता तोमर

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया {RBI}

1 एप्रिल 1935 रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना झाली. स्वातंत्र्योत्तर काळात बँकांना सामाजिक उद्दिष्टांसाठी कार्य करणेही गरज होते. त्यामुळे 1 जानेवारी 1949 रोजी भारतीय रिझर्व्ह बँकचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. 1 जुलै 1955 मध्ये इम्पीरियल बँक ऑफ इंडियाचे राष्ट्रीयीकरण करण्यात येऊन स्टेट बँक ऑफ इंडिया या सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठ्या बँकेची निर्मिती झाली.

त्यानंतर तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली 19 जुलै 1969 रोजी अलाहाबाद बँक, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ महाराष्ट्र, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, कॅनरा बँक, देना बँक, इंडियन ओव्हरसीज बँक, इंडियन बँक, पंजाब नॅशनल बँक, सिंडिकेट बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, युनायटेड बँक ऑफ इंडिया, यूको बँक या 14 प्रमुख खासगी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. यानंतर 15 एप्रिल 1980 रोजी तत्कालीन सरकारच्या आदेशांनुसार आंध्र बँक, कॉर्पोरेशन बँक, न्यू बँक ऑफ इंडिया, ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स, पंजाब अँड सिंध बँक, विजया बँक या बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

दुसऱ्या टप्प्यातील राष्ट्रीयीकरणामुळे, भारत सरकारने भारतातील सुमारे 91% बँकिंग व्यवसाय नियंत्रित केला. सन 1951 ते 1968 या दरम्यान वाणिज्य बँकांनी वितरित केलेल्या कर्जात उद्योगाचा वाटा जवळजवळ दुप्पट झाल्याने

 ISBN NO. 978-81-990957-8-6

शेतीला एकूण कर्जाच्या 2% पेक्षा कमी कर्ज मिळाले.तसेच अन्न सुरक्षेत देशाला स्वयंपूर्ण बनवण्याच्या उद्देशाने भारतात हरित क्रांती सुरू झाल्यानंतर शेतीला भांडवलाची आवश्यकता होती. त्यामुळे बँका खासगी क्षेत्राच्या मालकीच्या आणि व्यवस्थापित असल्याने बँकिंग सेवांचा आवाका मर्यादित असून, सर्वसामान्यांना बँकिंग सेवेची सुविधा उपलब्ध नव्हती.

यामुळे सरकारने संसाधनांचे निर्देश अशा प्रकारे करणे आवश्यक होते की अधिकाधिक सार्वजनिक फायद्यासाठी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. बँकांच्या राष्ट्रीयीकरणामुळे देशाला नक्कीच मोठा फायदा झाला. राष्ट्रीयीकरण झाल्यामुळे बँकांच्या निधीत वाढ झाली आणि त्यामुळे देशाची आर्थिक स्थिती सुधारली तसेच कार्यक्षमता वाढली. देशाच्या ग्रामीण, कृषी क्षेत्राला चालना देण्यास मदत झाली. यामुळे रोजगाराची मोठी संधी उपलब्ध झाली. सरकारने बँकांना मिळालेल्या नफ्याचा वापर लोकांच्या कल्याणासाठी केला जाऊ लागला. स्पर्धा कमी होऊन कामाची कार्यक्षमता वाढली.

राष्ट्रीयकृत सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना स्थिरता व नफा मिळवून देण्यासाठी सरकारने भारतीय बँकिंग उद्योगातील विविध सुधारणांचे व्यवस्थापन करण्यासाठी एम. नरसिंहम यांच्या नेतृत्वाखाली एक समिती स्थापन केली होती. कालांतराने रिझर्व्ह बँकेने 10 खासगी क्षेत्रातील बँका स्थापन करण्यासाठी परवाना दिला. या बँका म्हणजे, ॲक्सिस बँक, एचडीएफसी बँक, इंडसइंड बँक, आयसीआयसीआय बँक, कोटक महिंद्रा बँक, बंधन बँक, आयडीएफसी फर्स्ट बँक, आयडीबीआय बँक, करूर वैश्य बँक, सिटी युनियन बँक इत्यादी. भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे फायदे पाहता सार्वजनिक क्षेत्रातील बँका दुर्गम भागातही असतात आणि भौगोलिकदृष्ट्या दूर असलेल्या किंवा कमी प्रवेशयोग्य असलेल्या प्रदेशांमध्ये त्यांच्या सेवांचा विस्तार करतात. बँकांना सरकारचा पाठिंबा असल्यामुळे ग्राहकांना पैसे गुंतवणुकीबद्दल सुरक्षितता वाटते.

सार्वजनिक क्षेत्रातील बँका अनेकदा स्पर्धात्मक दराने कर्ज देतात, त्यामुळे कर्ज अधिक सुलभ होते. सरकारी मालकी आणि नियमांमुळे ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करून सार्वजनिक क्षेत्रातील बँका आर्थिक मंदीच्या काळात स्थिरता दाखवतात. बँका या ग्राहक सेवेला प्राधान्य देत असल्याने विविध श्रेणीतील ग्राहकांना समाधान देतात. देशाच्या उद्योगात वाटा असलेल्या ठेवीच्या बाबतीत भारतातील एकूण बाजारपेठेतील जवळपास 59% हिस्सा असतो थेट परकीय गुंतवणूक करण्यासाठी. या बँका 20% पर्यंत थेट परकीय गुंतवणुकीला परवानगी देतात. तर खासगी बँकांचे फायदे पाहता खासगी बँका ग्राहकांना जलद सेवा देतात आणि ग्राहकांचे प्रश्न सोडवतात. या बँकांचे जास्तीत जास्त नफा मिळवण्याचे उद्दिष्ट असते. सहसा बँकेच्या ग्राहकांची संख्या कमी असते.

मध्यंतरी सरकारने भारतीय स्टेट बँकेच्या इतर समूह बँकांचे विलीनीकरण केले. त्यानंतर इतरही काही सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचेही सरकारने विलीनीकरण केले. याचा नाही म्हटलं तरी बँकेच्या सर्व ग्राहकांना नाहक त्रास झाला. सरकारने सामान्य माणसाचे बँकेशी नाते जोडले जाण्याच्या दृष्टीने तसेच आर्थिक लाभाच्या दृष्टीने जनधन खाती उघडण्याचे आवाहन केले. याचा बँकिंग क्षेत्रावर मोठा बोजा पडला असे आजही अनेकजण म्हणत आहेत. आता ही जनधन खाती सर्व बँकांची मोठी डोकेदुखी ठरत आहे.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

मध्यंतरी पंजाब नॅशनल बँक व कॅनरा बँक या बँकेने बचत खात्यात किमान शिल्लक ठेवण्याची अट शिथिल करून ग्राहकांना मोठा दिलासा दिला आहे. हा नियम भविष्यात इतर बँकांही लागू करतील अशी अपेक्षा आहे. पण खासगी बँकेत आजही किमान रक्कम शिल्लक ठेवण्याची अट आहे. सध्या देशात खासगीकरणाचे वारे वाहत असून, याचा बँकांनाही मोठ्या प्रमाणात फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जर संपूर्ण बँकिंग क्षेत्राचे खासगीकरण झाले तर सामान्य माणूस बँकिंग क्षेत्राच्या विकासाच्या वर्तुळाबाहेर जाण्याची शक्यता आहे.

याशिवाय ठेवी हाताळणाऱ्या बँका सुरक्षित राहतील का? सन 1969 ते 2020 या काळात खासगी क्षेत्रातील अडचणीत सापडलेल्या 25 बँकांना इतर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी वाचवले होते. जर बँकांचे खासगीकरण झाले तर मनमानीचा कारभार नक्कीच वाढेल. लोकांना कर्जे मिळण्यास कठीण जाईल, सर्वसामान्यांच्या नोकऱ्यांचा प्रश्न निर्माण होईल. देशातील डीएचएफएल, पंजाब अँड महाराष्ट्र बँक, येस बँक, कराड बँक, रुपी बँक व सी.के.पी. बँक या अपयशी ठरलेल्या बँकांबद्दल कोणीही विश्लेषण करते का? सरकारतर याबाबत भाष्य करण्याचे कायमच टाळत आहे.

कु. निकिता तोमर
कु. अंकिता तोमर

प्रश्नावली

1.सरकारचे खालीलपैकी कोणते बिगर-विकास खर्च आहेत ? (राज्यसेवा मुख्य, 2020)

अ. संरक्षणावरील खर्च

ब. व्याज देयके

क. आरोग्यावरील खर्च

ड. कर संकलनावरील खर्च

A) अ, ब आणि ड

B) अ, क आणि ड

C) वरीलपैकी सर्व

D) अ, ब आणि क

2. 2009-10 मध्ये महसूली तूट एकूण स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या (GDP) सुमारे किती टक्के होती ? (STI Main, 2014)

A) 4.20%

B) 3.20%

C) 6.20%

D) 5.20%

3. 1991 नंतर पुढीलपैकी कोणत्या वर्षी परकीय चलन साठ्यात घट झाली? (STI Mains - 2012)

A) 2008-09

B) 1993–94

C) 2007–08

D) 2000-01

4.खर्चात स्वायत्त वाढ झाल्यास देशाच्या वास्तविक GNP मध्ये वाढ होईल जर ?

A] देशाचा व्यापार संतुलन ऋण आहे

B] देशाची अर्थव्यवस्था पूर्ण रोजगारापेक्षा कमी परिस्थितीत काम करत आहे

C] हा सरकारी खर्च आहे

D] गुणक किमान 1.5 आहे

5.राष्ट्रीय उत्पन्नाच्या बाबतीत क्रियाकलापांच्या पातळीचे मुख्य निर्धारक खालीलपैकी कोणते मानले जाते?

A] कर आकारणीची पातळी

 ISBN NO. 978-81-990957-8-6

B] प्रत्यक्षात आलेली गुंतवणूक

C] नियोजित बचत

D] घटक गतिशीलता

6. खालीलपैकी कोणत्या वस्तूंमध्ये मागणीची सर्वाधिक उत्पन्न लवचिकता असते?

A]गाडी

B]दूध

C]भात

D] तंबाखू

7.भारतातील GDP मोजण्यासाठी खालीलपैकी कोणते मंत्रालय जबाबदार आहे?

A]अर्थ मंत्रालय

B] वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय

C] केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय

D] ग्राहक व्यवहार मंत्रालय

8. 'लोरेन्झ कर्व्ह' खालीलपैकी कोणता दर्शवितो?

A] महागा

B] उत्पन्न वितरण

C] रोजगार

D] चलनवाढ

9.भारतात पावसाव्यतिरिक्त खालीलपैकी कोणता सिंचनाचा सर्वात मोठा स्रोत आहे?

A] नलिका विहिरी

B] कालवे

C] नद्या

D] टाक्या

10.खालीलपैकी कोणती संस्था "जागतिक आर्थिक दृष्टिकोन अहवाल" प्रकाशित करते?

[A] जागतिक बँक

B] फेडरल रिझर्व्ह बँक

C] आंतरराष्ट्रीय नाणेनिधी

D] आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळ

1- A	2 - D	3 - A	4 - B	5- B
6 - A	7 - C	8 - B	9 - A	10 - C

19/07/2025

सेन्सेक्स:- 82,523

निफ्टी :- 24,836

सोने :- 9,110/9,938

चांदी :- 114

पेट्रोल:-104

डिझेल:- 90

Agriculture in India : भारत कसा विकसित होईल?

देशातील शेतकऱ्यांची परिस्थिती वाईट, उत्पन्न ८ पैसे आणि खर्च एक रुपया.. केंद्र सरकारकडून शेतकऱ्यांच्या उत्पन्नासाठी अनेक घोषणा केल्या जातात. तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे ही आश्वासन दिले जाते. पण प्रत्यक्षात वास्तव वेगळेच आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर झाले मात्र नफा कमी होत आहे.

कृषी खर्च आणि किंमत आयोगाच्या (CACP) आकडेवारीवरून हे उघड झाले आहे. गेल्या दहा वर्षांत शेतकऱ्यांच्या उत्पन्नात झालेली वाढ ग्रामीण भागातील महागाईपेक्षा कमी आहे. म्हणजेच महागाई वाढली आहे पण त्या तुलनेत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढलेले नाही.

आकडेवारीवरून असे दिसून येते की, बहुतेक पिकांवर शेतकऱ्यांचा नफा कमी झाला आहे. दहा मुख्य पिकांचे (खरीप आणि रब्बी हंगामातील) विश्लेषण करण्यात आले. असे आढळून आले की मका, भुईमूग आणि मोहरी वगळता इतर सर्व पिकांमधील शेतकऱ्यांचे उत्पन्न या काळात ग्रामीण

 ISBN NO. 978-81-990957-8-6

महागाईपेक्षा कमी वाढले आहे. २०१३-१४ मध्ये भात लागवडीचा खर्च प्रति हेक्टर २५,१७९ रुपये होता. कुटुंबाच्या श्रमाचे मूल्य प्रति हेक्टर ८,४५२ रुपये अंदाजे होते. पिकाचे मूल्य प्रति हेक्टर ५३,२४२ रुपये होते. याचा अर्थ प्रति हेक्टर १९,६११ रुपये नफा झाला

कु. प्रतीक्षा घरणे
कु. सावित्रा पावडे

20/07/2025

सेन्सेक्स:- 82,223

निफ्टी :- 24,726

सोने :- 9,110/9,935

चांदी :- 114

पेट्रोल:-104

डिझेल:- 90

अर्थकारण : बँकांच्या खासगीकरणावर प्रश्न

1 एप्रिल 1935 रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना झाली. स्वातंत्र्योत्तर काळात बँकांना सामाजिक उद्दिष्टांसाठी कार्य करणेही गरज होते. त्यामुळे 1 जानेवारी 1949 रोजी भारतीय रिझर्व्ह बँकचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. 1 जुलै 1955 मध्ये इम्पीरियल बँक ऑफ इंडियाचे राष्ट्रीयीकरण करण्यात येऊन स्टेट बँक ऑफ इंडिया या सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठ्या बँकेची निर्मिती झाली.

त्यानंतर तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली 19 जुलै 1969 रोजी अलाहाबाद बँक, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ महाराष्ट्र, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, कॅनरा बँक, देना बँक, इंडियन ओव्हरसीज बँक, इंडियन बँक, पंजाब नॅशनल बँक, सिंडिकेट बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, युनायटेड बँक ऑफ इंडिया, यूको बँक या 14 प्रमुख खासगी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. यानंतर 15 एप्रिल 1980 रोजी तत्कालीन सरकारच्या आदेशांनुसार आंध्र बँक, कॉर्पोरेशन बँक, न्यू बँक ऑफ इंडिया, ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स, पंजाब अँड सिंध बँक, विजया बँक या बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

त्यानंतर तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली 19 जुलै 1969 रोजी अलाहाबाद बँक, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ महाराष्ट्र, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, कॅनरा बँक, देना बँक, इंडियन ओव्हरसीज बँक, इंडियन बँक, पंजाब नॅशनल बँक, सिंडिकेट बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, युनायटेड बँक ऑफ इंडिया, यूको बँक या 14 प्रमुख खासगी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. यानंतर 15 एप्रिल 1980 रोजी तत्कालीन सरकारच्या आदेशांनुसार आंध्र बँक, कॉर्पोरेशन बँक, न्यू बँक ऑफ इंडिया, ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स, पंजाब अँड सिंध बँक, विजया बँक या बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

कु. प्रतीक्षा घरणे
कु. सावित्रा पावडे

बँकांमध्ये ३६ हजार कोटींची एक लाख ७९ फसवणुकीची प्रकरणे

अभय कोलारकर यांनी माहिती अधिकार (आरटीआय) अंतर्गत दाखल केलेल्या प्रश्नाच्या उत्तरात ही धक्कादायक माहिती रिझर्व्ह बँकेने उघड केली. त्यांना प्राप्त माहितीत फसवणुकीची संख्या आणि त्यात समाविष्ट असलेल्या रकमेचा बँकनिहाय आढावा देण्यात आला. ही आकडेवारी

 ISBN NO. 978-81-990957-8-6

भारताच्या बँकिंग व्यवस्थेतील असुरक्षितता दर्शविते. आर्थिक फसवणूक थांबविण्यासाठी कठोर नियामक देखरेख आणि बँकांचे रिअल-टाइम ऑडिट करण्याची आवश्यक असल्याचे कोलारकर म्हणाले.

गत आर्थिक वर्षात देशातील आघाडीच्या बँकांमध्ये ॲक्सिस बँकेत ७९,६२९ प्रकरणांमध्ये ९८६.४६ कोटींची फसवणूक झाली. एचडीएफसी बैंक लिमिटेडमध्ये ३९,८२२ प्रकरणांमध्ये ७१५.९६ कोटी, एअरटेल पेमेंट्स बँक लिमिटेड १९,८३८ प्रकरणांमध्ये ७५.२६ कोटी, आयसीआयसीआय बँक लिमिटेड १३,५३२ प्रकरणे ६०८.९४ कोटी आणि आरबीएल बैंक लिमिटेड ८,६१० प्रकरणांमध्ये ६८.२७ कोटींची फसवणूक झाल्याची नोंद आहे.

कमत न्यूज नेटवर्कनागपूर : आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये देशातील विविध बँकांमध्ये ३६,३६१ कोटी रुपयांची १.७९ लाख फसवणुकीच्या प्रकरणांची नोंद झाल्याची माहिती भारतीय रिझर्व्ह बँकेने दिली आहे.

त्यानंतर तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली 19 जुलै 1969 रोजी अलाहाबाद बँक, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ महाराष्ट्र, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, कॅनरा बँक, देना बँक, इंडियन ओव्हरसीज बँक, इंडियन बँक, पंजाब नॅशनल बँक, सिंडिकेट बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, युनायटेड बँक ऑफ इंडिया, यूको बँक या 14 प्रमुख खासगी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. अभय कोलारकर यांनी माहिती अधिकार (आरटीआय) अंतर्गत दाखल केलेल्या प्रश्नाच्या उत्तरात ही धक्कादायक माहिती रिझर्व्ह बँकेने उघड केली. त्यांना प्राप्त माहितीत फसवणुकीची संख्या आणि त्यात समाविष्ट असलेल्या रकमेचा बँकनिहाय आढावा देण्यात आला. ही आकडेवारी भारताच्या बँकिंग व्यवस्थेतील असुरक्षितता दर्शविते. आर्थिक फसवणूक थांबविण्यासाठी कठोर नियामक देखरेख आणि बँकांचे रिअल-टाइम ऑडिट करण्याची आवश्यक असल्याचे कोलारकर म्हणाले.

❖ प्रश्नावली

१.मागणीच्या नियमाचा आधार खालीलपैकी कोणता आहे?

[A] कमी होत जाणारी सीमांत उपयुक्तता

[B] मागणी आणि पुरवठा संबंध

[C] वस्तूची एकूण उपयुक्तता

[D] वरीलपैकी काहीही नाही

२.बाजारात एखाद्या व्यक्तीच्या खर्चावर काय निर्बंध आहेत?

[A] सीमांत उपयुक्तता

[B] खरेदी शक्ती

[C] मागणी वक्र

[D] वरीलपैकी काहीही नाही

३.खालीलपैकी कोणता पर्यायी खर्च म्हणून सर्वोत्तम वर्णन केला जाऊ शकतो?

[A] निवडलेल्या पर्यायावरील परतावा आणि सर्वोत्तम विसरलेल्या पर्यायावरील परतावा यातील फरक

[B] निवडलेल्या दोन पर्यायांमधील फरक

[C] या वर्षीच्या आणि मागील वर्षीच्या परतावातील फरक

[D] वरीलपैकी काहीही नाही

४.बाजारात विशिष्ट व्यावसायिक घटकाची मक्तेदारी कधी येते?

[A] जेव्हा अनेक खरेदीदार आणि विक्रेते असतात

[B] जेव्हा एकसमान उत्पादने बाजारात भरतात

 ISBN NO. 978-81-990957-8-6

[C] जेव्हा एक विशिष्ट उत्पादन केवळ एकाच विक्रेत्याद्वारे विकले जाते

[D] जेव्हा कंपन्या केवळ किंमत घेणाऱ्या असतात

५.अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्र म्हणजे काय?

[A] जे समुदायाच्या मालकीचे आहे

[B] जे जनतेच्या मालकीचे आहे

[C] जे सरकारच्या मालकीचे आहे

[D] अ आणि ब दोन्ही

६.खालीलपैकी कोणते आर्थिक नफा योग्यरित्या परिभाषित करते?

[A] एकूण महसूल - एकूण खर्च

[B] एकूण खर्च - एकूण विक्री

[C] एकूण खर्च - एकूण महसूल

[D] वरीलपैकी काहीही नाही

७.खालीलपैकी कोणता मॅक्रोइकॉनॉमिक्सचा भाग आहे?

[A] कुटुंबांची गुंतवणूक

[B] व्यक्तीचे वेतन

[C] चांगले उत्पादन कसे करावे

[D] एकूण आर्थिक क्रियाकलाप

८.वास्तविक GDP साठी खालीलपैकी कोणते बरोबर आहेत?

[A] चालू वर्षाचे उत्पादन चालू किमतींवर मूल्यांकित केले आहे

[B] चालू वर्षाचे उत्पादन आधार वर्षावर मूल्यांकित केले आहे

[C] चालू वर्षाचे उत्पादन गेल्या वर्षाच्या किमतींवर मूल्यांकित केले आहे

[D] चालू वर्षाचे उत्पादन अंदाजित किमतींवर मूल्यांकन केले गेले.

९.सर्व निवासी संस्थात्मक युनिट्सच्या प्राथमिक उत्पन्नाच्या एकूण शिल्लक रकमेचा एकूण संच किती आहे?

[A] सकल देशांतर्गत उत्पादन

[B] सकल राष्ट्रीय उत्पादन

[C] सकल राष्ट्रीय उत्पन्न

[D] निव्वळ राष्ट्रीय उत्पादन

१०.वस्तूचे अवमूल्यन कशामुळे होते?

[A] वस्तूच्या बाजारभावात घट

[B] भौतिक झीज आणि अश्रू

[C] वस्तूच्या किंमतीत घट

[D] वरीलपैकी काहीही नाही

1-A	2-B	3-A	4-C	5-C
6-A	7-D	8-B	9-C	10-B

21/07/2025

सेन्सेक्स:- 82,200

निफ्टी :- 25,090

सोने :- 9,181/10,016

चांदी :- 116

पेट्रोल:-104

डिझेल:- 90

यशोगाथा

दोन भावांनी मोठं स्वप्न पाहिलं, 25000 उधार घेत सुरू केला व्यवसाय, उभारली 300 कोटींची कंपनी

उत्तर प्रदेशातील संजीव कुमार गुप्ता आणि राजीव कुमार गुप्ता यांचे बालपण बुलंदशहर जिल्ह्यातील गुलाटी या लहान गावात गेले. त्यांचे वडील गावात किराणा दुकान चालवत होते. वडिलांचे कष्ट पाहून या भावांनी मोठे स्वप्न पाहिले. गाझियाबादला आल्यावर दोघांनी प्रथम विक्रेत्यांकडून क्रेडिटवर एअर कूलर खरेदी केले

 ISBN NO. 978-81-990957-8-6

आणि ते कमी नफ्यात विकून हळूहळू भांडवल जमा केले. सुरुवातीच्या दिवसांमध्ये ते फरीदाबादमध्ये घरोघरी जाऊन डीलर्सना भेटण्यासाठी स्कूटरचा वापर करत असत. व्यवसाय वाढू लागल्यावर त्यांनी एक स्कूटर घेतली. १९९२ मध्ये त्यांनी मित्रांकडून २५,००० रुपये उधार घेऊन स्वतः कूलर बनवण्यास सुरुवात केली आणि 'समरकूल' ब्रँड लॉन्च केला.त्याची किंमत त्यावेळी सुमारे १,६०० रुपये होती.

ग्राहकांना कसे आकर्षिक केले

नवीन ब्रँड स्थापित करणे कधीही सोपे नसते. संजीव-राजीव यांनाही अनेक अडचणींचा सामना करावा लागला. सर्वात मोठी अडचण होती ग्राहक आणि मोठ्या मल्टी-ब्रँडेड दुकान मालकांचा विश्वास संपादन करणे. दुकानदार त्यांच्या शोरूममध्ये समरकूलची उत्पादने प्रदर्शित करण्यास फारसे उत्साही नव्हते. पण त्यांच्या उत्पादनांची स्वस्त किंमत, चांगली गुणवत्ता आणि 'वर्ड ऑफ माउथ' यामुळे त्यांना फायदा झाला.लोक हळूहळू त्यांच्या उत्पादनांवर विश्वास ठेवू लागले आणि व्यवसाय वाढू लागला. पहिल्या १० वर्षांत त्यांच्या कंपनीने दरवर्षी ५० पट विकास दर गाठला, जो त्यांच्या गुणवत्ता आणि ग्राहक सेवेचा पुरावा आहे.

व्यवसायावर आले संकट

२००५ मध्ये कंपनीला मोठा धक्का बसला जेव्हा त्यांच्या एका युनिटला आग लागल्याने मोठे नुकसान झाले. पण, या कठीण काळात त्यांच्या बाजारात असलेल्या गुडविलमुळे त्यांना मदत झाली. डीलर्स आणि सप्लायर्स मदतीसाठी पुढे आले. वितरकांनी त्यांना आगाऊ पैसे दिले आणि कच्चा माल पुरवठादारांनी त्यांना उधार माल दिला. याच विश्वासाच्या जोरावर ते पुन्हा उभे राहिले आणि आज दरमहा एक लाखांहून अधिक उत्पादने बनवत आहेत. त्यांच्या व्यवसायाचे मॉडेल सोपे आहे: ८०% उत्पादने इन-हाउस बनलेली असतात (एलईडी टीव्ही आणि वॉशिंग मशीन वगळता) आणि ९०% व्यवसाय ऑफलाइन स्टोअरमधून येतो.

१५० वेगवेगळ्या प्रकारची उत्पादन

या वर्षांमध्ये संजीव आणि राजीव यांनी त्यांची कंपनी केवळ एअर कूलरपर्यंत मर्यादित ठेवली नाही. ते आता सुमारे १५० वेगवेगळ्या प्रकारचे उत्पादन निर्मिती करतात. यामध्ये सीलिंग फॅन, एग्जॉस्ट फॅन, रूम हीटर, एलईडी टीव्ही, किचन उपकरणे आणि इतर जलद विक्री होणाऱ्या ग्राहक वस्तूंचा समावेश आहे. गाझियाबादमध्ये असलेल्या त्यांच्या कंपनीत चार आधुनिक कारखाने आणि सुमारे २०० कर्मचारी आहेत. समरकूलचे १७ राज्यांमध्ये २५० वितरक आहेत. त्यांची उत्पादने देशभरातील सुमारे ४००० दुकानांमध्ये उपलब्ध आहेत.

ऑनलाइन मार्केटप्लेस (जसे ॲमेझॉन आणि फ्लिपकार्ट) देखील आता त्यांच्या व्यवसायाचा १०% भाग आहेत. दोन्ही भावांची ही कहाणी दृढता, विश्वास आणि भारतीय उद्यमशीलतेचे उत्तम उदाहरण आहे.

कु. निकिता गाजलवाड
कु. राधिका नरहिरे

गृहकर्जा वरील उपाय

आजच्या काळात, स्वतःचं घर खरेदी करणं हे प्रत्येकाचं स्वप्न महागलं आहे. बहुतेक लोक घर खरेदी करण्यासाठी बँकेकडून गृहकर्जाची मदत घेतात. कोणत्याही प्रकारचे कर्ज जितक्या लवकर तुम्ही त्यातून मुक्त व्हाल तितके चांगले.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

गृहकर्जाबद्दल लोक तणावात असतात कारण त्यांना परतफेड करण्यासाठी सहसा बराच वेळ लागतो आणि व्याजाची रक्कम कर्जाच्या रकमेपेक्षा खूप जास्त असते. अशा परिस्थितीत, ते अनेकदा कर्ज लवकर परतफेड करण्याचा किंवा ईएमआयचा भार कमी करण्याचा विचार करतात. म्हणून असे अनेक मार्ग आहेत ज्याद्वारे तुम्ही हा भार कमी करू शकता आणि सुटकेचा नि:श्वास टाकू शकता. यासाठी, प्री-पेमेंट किंवा कर्ज पुनर्वित्त यासह अनेक पर्याय फायदेशीर ठरू शकतात.

1. कर्जाची पूर्व-भरणा

गृहकर्जाच्या त्रासातून मुक्त होण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे कर्जाची पूर्व-भरणा. जर तुम्हाला २० ते २५ वर्षांसाठी गृहकर्जाचा ईएमआय भरायचा नसेल, तर तुम्ही हा पर्याय निवडू शकता. यामागील कल्पना अशी आहे की तुम्ही वेळोवेळी गृहकर्ज खात्यात काही पैसे जमा करावेत. तथापि, ईएमआय व्यतिरिक्त तुम्ही किती रक्कम जमा करू शकता हे थेट तुमच्या उत्पन्नावर अवलंबून असते. यामुळे तुमच्या कर्जाची रक्कम हळूहळू कमी होईल आणि वेळेपूर्वी तुमची सुटका होईल.

2. जास्त ईएमआय भरणे

हा पर्याय विशेषतः नोकरदार लोकांसाठी खूप उपयुक्त ठरू शकतो. खरं तर नोकरदार वर्ग त्यांचा पगार वाढत असताना गृहकर्ज घेतात. त्यानुसार, ते गृहकर्ज ईएमआय व्यतिरिक्त त्यांच्या वाढीचा काही भाग जमा करू शकतात, म्हणजेच ते ते वाढवू शकतात. जर तुम्ही दरवर्षी कर्ज ईएमआयचा एक अतिरिक्त हप्ता जमा केला तर यामुळे कर्जाचा कालावधी कमी होतो आणि तुम्हाला कमी व्याज द्यावे लागते. अशा प्रकारे, तुम्ही कर्ज २-५ वर्षे आधी पूर्ण करू शकता.

3. कर्ज पुनर्वित्त

पुढील पर्याय म्हणजे गृहकर्ज पुनर्वित्त, त्याचा मोठा फायदा म्हणजे तुम्ही कमी व्याजदराने नवीन कर्ज घेऊन विद्यमान गृहकर्ज परतफेड करू शकता. खरं तर, जर बाजारात गृहकर्जाचे व्याजदर कमी झाले असतील, तर तुम्ही तुमचे विद्यमान गृहकर्ज कमी व्याजदराने पुनर्वित्त करून मासिक ईएमआय कमी करू शकता. कमी व्याजदरासह, कर्जाचा कालावधी कमी करून तुम्ही व्याजावर बरेच पैसे वाचवू शकाल. याशिवाय, पुनर्वित्तीकरणाद्वारे, तुम्ही निश्चित व्याजदरावरून फ्लोटिंग व्याजदरावर स्विच करू शकता.

4. कर्ज हस्तांतरण

जर तुम्ही ज्या बँकेकडून गृहकर्ज घेतले आहे त्या बँकेचा व्याजदर सध्या इतर बँकांपेक्षा जास्त असेल, म्हणजेच इतर बँका कमी व्याजदर देत असतील. तर तुम्ही बचतीचे मूल्यांकन करू शकता आणि तुमचे कर्ज कमी व्याजदर असलेल्या बँकेत हस्तांतरित करू शकता. यामुळे तुमच्या ईएमआयचा भार कमी होऊ शकतो. तथापि, या प्रक्रियेतील बचतीचे मूल्यांकन करणे महत्त्वाचे आहे कारण कर्ज हस्तांतरणावर अतिरिक्त शुल्क आकारले जाते. येथे लक्षात ठेवा की तुम्ही गृहकर्ज फक्त दोनदा हस्तांतरित करू शकता.

5. गृहकर्जाचा भार कमी करण्यासाठी EMI कमी करून गुंतवणूक करणे हा तुमच्यासाठी आणखी एक चांगला पर्याय ठरू शकतो, जो तुमच्यासाठी संपत्ती निर्माण करणारा देखील ठरेल. खरं तर, जर तुमचा मासिक EMI जास्त असेल, तर तो थोडा कमी करून, तुम्ही उर्वरित पैसे म्युच्युअल फंडमध्ये SIP मध्ये गुंतवू शकता आणि तुम्हाला सरासरी १२-१५% परतावा मिळू शकतो. अशा परिस्थितीत, तुमचे कर्ज संपेपर्यंत, या

 ISBN NO. 978-81-990957-8-6

गुंतवणुकीद्वारे मोठी रक्कम देखील गोळा केली जाऊ शकते.

कु. निकिता गाजलवाड
कु. राधिका नरहिरे

बारावी नंतर स्टॉक ब्रोकर कोर्स

बारावी कॉमर्सनंतर स्टॉक ब्रोकर बनणे हा एक उत्तम करिअर पर्याय आहे. ज्यामध्ये गुंतवणूकदारांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी आहे. यासाठी बँकिंग आणि फायनान्समध्ये डिप्लोमा सारखा व्यावसायिक कोर्स करणे आवश्यक आहे.

जर तुम्ही 12 वी कॉमर्समधून केली असेल आणि आता शेअर बाजाराच्या जगात करिअर करण्याचा विचार करत असाल, तर ही बातमी तुमच्यासाठी खूप उपयुक्त आहे. आजच्या काळात, स्टॉक ब्रोकर हा एक उत्तम आणि वेगाने उदयास येणारा करिअर पर्याय बनत आहे. डिजिटल युगात जिथे सर्व काही ऑनलाइन होत आहे, वित्त आणि शेअर बाजार क्षेत्रात तरुणांसाठी अनेक संधी खुल्या होत आहेत.

स्टॉक ब्रोकर काय करतो?

स्टॉक ब्रोकर हा असा असतो जो शेअर बाजार आणि गुंतवणूकदार यांच्यातील दुवा म्हणून काम करतो. स्टॉक ब्रोकरशिवाय गुंतवणूकदार थेट शेअर बाजारात व्यवहार करू शकत नाही. ब्रोकर गुंतवणूकदाराचे दैनंदिन व्यवहार डीमॅट खाते आणि ट्रेडिंग खाते उघडण्यापासून ते हाताळतो. याशिवाय, स्टॉक ब्रोकरचे मुख्य काम म्हणजे त्याच्या क्लायंटला शेअर बाजारात कधी, का आणि किती गुंतवणूक करावी हे सांगणे. ब्रोकर बाजारातील चढउतार, कंपन्यांची कामगिरी आणि बाजारातील परिस्थिती याबद्दल देखील माहिती देतो, जेणेकरून गुंतवणूकदाराचे नुकसान होऊ नये.

स्टॉक ब्रोकरमध्ये काय शिकवलं जातं?

स्टॉक ब्रोकर बनण्यासाठी, सर्वप्रथम तुम्हाला वाणिज्य शाखेतून 12 वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. त्यानंतर तुम्ही बँकिंग आणि फायनान्समध्ये एक वर्षाचा पदव्युत्तर डिप्लोमा करू शकता. या कोर्समध्ये बँकिंग ऑपरेशन्स, ट्रेड फायनान्स, शेअर मार्केट प्रक्रिया आणि आर्थिक नियोजन यासारख्या गोष्टी शिकवल्या जातात. यासोबतच, बिझनेस कम्युनिकेशन आणि संगणकाचे मूलभूत ज्ञान देखील आवश्यक आहे, जेणेकरून तुम्हाला शेअर बाजाराशी संबंधित साधने आणि प्लॅटफॉर्म सहजपणे समजतील. या कोर्समध्ये, तुम्हाला कंपनीसाठी स्टॉक कसे खरेदी करायचे किंवा विकायचे आणि ग्राहकांच्या हितासाठी कोणता निर्णय कधी घ्यावा हे देखील शिकवले जाते.

स्टॉक ब्रोकरची मागणी का आहे?

आजच्या काळात, तरुणांमध्ये गुंतवणुकीबद्दल जागरूकता वाढली आहे. लोक आता बचतीपेक्षा गुंतवणुकीला प्राधान्य देत आहेत. अशा परिस्थितीत, त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी स्टॉक ब्रोकरची आवश्यकता आहे. यामुळेच दरवर्षी ब्रोकरची मागणी वेगाने वाढत आहे.

कोर्स कुठे करायचा?

देशभरातील अनेक खासगी आणि सरकारी संस्थांमध्ये बँकिंग आणि फायनान्स किंवा शेअर बाजाराशी संबंधित डिप्लोमा अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. तुम्ही हे अभ्यासक्रम NSE Academy, BSE Institute, Coursera आणि Udemy सारख्या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरून देखील करू शकता.

कु. निकिता गाजलवाड
कु. राधिका नरहिरे

 ISBN NO. 978-81-990957-8-6

सीमेन्स लिमिटेड आणि टाटा स्ट्राइव्ह यांनी व्यावसायिक प्रशिक्षणात गाठला महत्त्वाचा टप्पा, १.२ लाखांहून अधिक तरुणांना केले सक्षम

सीमेन्स लिमिटेड आणि टाटा स्ट्राईव्ह यांच्या संयुक्त Dual VET (व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण) प्रकल्पाने महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. गेल्या आठ वर्षांत या उपक्रमामुळे देशभरातील 279 शासकीय आयटीआय मधून 120,000 हून अधिक विद्यार्थ्यांना लाभ झाला आहे.

उद्योगांच्या गरजा आणि आयटीआय मध्ये दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणातील महत्त्वाची तफावत भरून काढणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

Pratiksha Gharane

Savitra Pawade

पाम तेल उत्पादनात भारताची स्वयंपूर्णतेकडे वाटचाल

भारत पाम तेलाचे उत्पादन वाढवण्यासाठी अनेक पावले उचलत आहे. आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि देशांतर्गत पाम तेलाचे उत्पादन वाढवण्यासाठी मलेशियन पाम तेलाच्या बियाण्याची मागणी वाढली आहे.२०२४ मध्ये भारताने मलेशियातून ३.०३ दशलक्ष टन पाम तेल आयात केले. त्यानंतर मलेशियाचे सर्वोच्च पाम तेल गंतव्यस्थान म्हणून देश आपले स्थान आणखी मजबूत करत आहे.

मलेशियाच्या एकूण पाम तेल निर्यातीत भारताचा आकडा १७.९ टक्के आहे.

भारत २०२५-२६ पर्यंत तेल पामची लागवड १० लाख हेक्टरपर्यंत वाढवू इच्छित आहे. यासाठी सरकारकडून अनेक पावले उचलली जात आहेत. याशिवाय, राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेल पाम योजनेअंतर्गत भारताने २०२९-३० पर्यंत २.८ दशलक्ष टन कच्चे पाम तेल उत्पादन करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

२०२५ मध्ये, भारतात सुमारे ३,७०,००० हेक्टर क्षेत्रात पाम तेलाची लागवड होण्याची अपेक्षा आहे. मुख्यतः बेट आणि ईशान्य राज्यांवर लक्ष केंद्रित केले आहे.

B2B प्रणाली अंतर्गत, मलेशियन निर्यातदार या लागवडीसाठी आवश्यक असलेली सामग्री आणि तांत्रिक कौशल्य देखील प्रदान करत आहेत. याबद्दल, कादिर म्हणाले की, मलेशिया पाम तेलाच्या क्षेत्रात या वाढीचे स्वागत करतो. हे आमच्या बियाण्यांची गुणवत्ता आणि भारतासोबतची दीर्घकालीन भागीदारी आणखी मजबूत असल्याचे दर्शवते.

मलेशियन पाम ऑइल बोर्डाने प्रजनन कार्यक्रमांद्वारे नवीन उच्च-उत्पादन देणारे वाण विकसित केले आहेत जे दरवर्षी प्रति हेक्टर 30 टनांपेक्षा जास्त ताज्या फळांचे घड तयार करू शकतात, जे मलेशियाच्या 2020-2023 दरम्यान नोंदवलेल्या 15.47-16.73 टनांच्या राष्ट्रीय सरासरीपेक्षा जवळजवळ दुप्पट आहे.

टॅरिफचा परिणाम

कच्च्या पाम तेलावरील शुल्क कमी केल्यानंतर मलेशियातून पाम तेलाच्या निर्यातीत काही प्रमाणात घट झाली आहे. असे असूनही, मलेशिया भारतासाठी एक प्रमुख आणि विश्वासार्ह पुरवठादार आहे. योग्य कृषी पद्धती आणि पुरेसे सिंचन असलेल्या भारतातील उष्णकटिबंधीय परिस्थितीत मलेशियन व्यावसायिक बियाणे लागवडीसाठी योग्य आहेत. भारतात या सुधारित जातीच्या बियाण्यांची मागणी वाढत आहे.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

भारतात जिथे पुरेसा पाऊस पडतो तिथे या बियाण्यांपासून चांगले उत्पादन मिळत आहे.

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) हे भारतीय अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहेत. जे देशाच्या जीडीपीमध्ये 30 टक्क्यांपेक्षा जास्त योगदान देतात. लाखो लोकांना रोजगार देतात.

प्रश्नावली

१.भारतीय अर्थव्यवस्था कोणत्या प्रकारची अर्थव्यवस्था आहे?

[A] मिश्र

[B] बाजार

[C] भांडवलशाही

[D] समाजवादी

२.खालीलपैकी कोणते हस्तांतरण पेमेंट मानले जाते?

[A] महाविद्यालयीन शुल्क

[B] बँक कर्ज

[C] कर्मचाऱ्यांचा बोनस

[D] सरकारकडून बेरोजगार भत्ता

३.वास्तविक GDP साठी खालीलपैकी कोणते बरोबर आहेत?

[A] चालू वर्षाचे उत्पादन चालू किमतींवर मूल्यांकित केले आहे

[B] चालू वर्षाचे उत्पादन आधार वर्षावर मूल्यांकित केले आहे

[C] चालू वर्षाचे उत्पादन गेल्या वर्षीच्या किमतींवर मूल्यांकित केले आहे

[D] चालू वर्षाचे उत्पादन अंदाजित किमतींवर मूल्यांकित केले आहे

४.सर्व निवासी संस्थात्मक युनिट्सच्या प्राथमिक उत्पन्नाच्या एकूण शिल्लक रकमेचा एकूण संच किती आहे?

[A] सकल देशांतर्गत उत्पादन

[B] सकल राष्ट्रीय उत्पादन

[C] सकल राष्ट्रीय उत्पन्न

[D] निव्वळ राष्ट्रीय उत्पादन

५.जीडीपी डिफ्लेटरचे सूत्र काय आहे?

[A] नाममात्र GDP + वास्तविक GDP

[B] नाममात्र GDP – (वजा) वास्तविक GDP

[C] वास्तविक GDP/ नाममात्र GDP

[D] नाममात्र GDP/ वास्तविक GDP

६.दरवर्षी आर्थिक सर्वेक्षण कोण सादर करते?

[A] आर्थिक व्यवहार मंत्रालय

[B] आर्थिक व्यवहार विभाग

[C] वित्त विभाग

[D] महसूल विभाग

७.शेतीचे जीडीपीमध्ये कमी होणारे योगदान म्हणजे काय?

[A] देश गरीब होत चालला आहे

[B] देश कमी विकसित होत आहे

[C] देश अधिक विकसित होत आहे

[D] वरीलपैकी काहीही नाही

८.सकारात्मक बाह्यतेसह चांगल्याला काय म्हणतात?

[A] गिफेन वस्तू

[B] सार्वजनिक वस्तू

[C] गुणवत्तेच्या वस्तू

[D] स्नॉब चांगला

९.वैयक्तिक खर्च करण्यायोग्य उत्पन्न मिळविण्यासाठी वैयक्तिक उत्पन्नातून काय वजा केले जाते?

 ISBN NO. 978-81-990957-8-6

[A] अप्रत्यक्ष कर

[B] प्रत्यक्ष कर

[C] अनुदाने

[D] वरीलपैकी काहीही नाही

१०.सकल भांडवल निर्मिती (GCF) बाबत खालीलपैकी कोणते बरोबर आहे?

१. उच्च GCF अर्थव्यवस्थेत उच्च बचत

२. त्यात सार्वजनिक क्षेत्रातील भांडवल निर्मितीचा देखील समावेश आहे

३. ते एकूण GDP पैकी गुंतवणुकीचे टक्केवारी आहे.

खाली दिलेल्या कोडमधून योग्य पर्याय निवडा:

[A] फक्त १

[B] फक्त १ आणि २

[C] फक्त २

[D] १,२ आणि ३

1-A	2-D	3-B	4-C	5-D
6-B	7-C	8-C	9-B	10-D

22/07/2025

सेन्सेक्स:- 82,200

निफ्टी :- 25,090

सोने :- 9,181/10,016

चांदी :- 116

पेट्रोल:-104

डिझेल:- 90

घागर भरुनी, दही दूध लोणी विकून...! ही कंपनी २०३५ कोटी रुपयांचा IPO आणणार, सेबीच्या हातात कागदपत्र सोपविले...

कु. पाणेरी खिल्लारे

कु. कृष्णा वर्ताळे

23/07/2025

सेन्सेक्स:- 82523.89

निफ्टी :- 25157.75

सोने :- 9,380/10,040

चांदी :- 119

पेट्रोल:-104

डिझेल:- 90

Stock Market Opening

शेअर बाजाराची तेजीसह सुरुवात; सेन्सेक्स 265 अंकांनी वाढला, निफ्टी 25,100 च्या वर

बाजाराची सकारात्मक सुरुवात: बुधवारी सेन्सेक्स 265 अंकांनी आणि निफ्टी 79 अंकांनी वाढीसह उघडले. आयटी, ऑटो आणि फार्मा क्षेत्रात खरेदी झाली, तर रिअल्टी निर्देशांकात 1.5% घसरण झाली.

टॉप गेनर्स आणि लूजर्स: टाटा मोटर्स, मारुती, जिओ फायनान्शियल्स, अदानी एंटरप्रायझेस, इटरनल आणि बजाज ऑटो निफ्टीवर टॉप गेनर्स ठरले. टायटन, टाटा कंझ्युमर, एसबीआय, एचयूएल आणि बीईएल मध्ये घसरण झाली.

जागतिक बाजारातून सकारात्मक संकेत: GIFT निफ्टी 70 अंकांनी वाढला, निक्केई ट्रेड डीलनंतर 950 अंकांनी वाढला.

Stock Market Opening Today:-

बुधवारी देशांतर्गत शेअर बाजाराची सकारात्मक सुरुवात झाली. बीएसई सेन्सेक्स 265 अंकांनी वाढत 82,451 वर उघडला, तर एनएसई निफ्टी 79 अंकांनी वधारून 25,139 वर सुरु झाला. बँक निफ्टी देखील 162 अंकांच्या वाढीसह 56,918 वर पोहोचला. मात्र, चलन बाजारात रुपया 4 पैशांनी घसरला आणि 86.41 वर सुरु झाला. रियल्टी इंडेक्समध्ये सुमारे दीड टक्क्यांची घसरण झाली, तर ऑटो, आयटी, मीडिया आणि फार्मा क्षेत्रांमध्ये जोरदार खरेदी दिसून आली.

निफ्टीतील वाढलेल्या शेअर्समध्ये टाटा मोटर्स, मारुती सुझुकी, जिओ फायनान्शियल्स,

 ISBN NO. 978-81-990957-8-6

अदाणी एंटरप्रायझेस, इटरनल आणि बजाज ऑटो यांचा समावेश होता. तर दुसरीकडे, टायटन, टाटा कंझ्युमर, एसबीआय, हिंदुस्तान युनिलिव्हर (HUL) आणि बीईएल मध्ये घसरण झाली.

सकाळी आंतरराष्ट्रीय बाजारातूनही तेजीचे संकेत मिळाले. GIFT निफ्टी 70 अंकांनी वाढत 25,150 च्या वर पोहोचला होता. डाओ फ्यूचर्स देखील 75 अंकांच्या वाढीसह हिरव्या रंगात होता. ट्रेड डीलच्या घोषणेच्या पार्श्वभूमीवर निक्केई निर्देशांक तब्बल 950 अंकांनी वाढला. डाओ जोन्स 180 अंकांच्या वाढीसह दिवसभरातील उच्चांकाजवळ बंद झाला. मात्र, नॅस्डॅक सलग सहा दिवस उच्चांक गाठल्यानंतर 80 अंकांनी घसरला.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जपानसोबत आतापर्यंतचा सर्वात मोठा व्यापार करार केला आहे. या कराराअंतर्गत जपान अमेरिकेमध्ये तब्बल 550 अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करणार आहे. या कराराचा जागतिक व्यापारावर मोठा परिणाम होऊ शकतो.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ब्रिटन दौऱ्याच्या आधी भारत-UK मुक्त व्यापार कराराला (FTA) केंद्र सरकारच्या कॅबिनेटची मंजुरी मिळाली आहे. पंतप्रधान उद्या लंडनमध्ये या करारावर स्वाक्षरी करतील.

कु. साधना मुंडे
कु. भूमीका नागडा

आम्ही तुमची अर्थव्यवस्था चिरडून टाकू; रशियन तेल खरेदीमुळे अमेरिकेचा भारताला इशारा

_नवी दिल्ली :_ रशियाकडून स्वस्त तेल खरेदी करून भारत, चीन आणि ब्राझिल हे देश 'रक्ताच्या पैशा'तून नफेखोरी करीत आहेत. होय, तुम्ही जगाच्या विरोधात जाऊन रशियाकडून स्वस्त तेल खरेदी करीत आहात.

राष्ट्राध्यक्ष ट्रम्प हे तुमच्या या खेळाला कंटाळले आहेत. तुम्ही हे तेल खरेदी करून युद्धाला हातभार लावणे सुरूच ठेवले तर आम्ही तुमची अर्थव्यवस्था चिरडून टाकू, असा इशारा ट्रम्प यांचे सहकारी सिनेटर लिंडसे ग्रॅहम यांनी दिला आहे. त्यांनी पुतीन यांनाही अशीच धमकी दिली आहे.

भारत-अमेरिका व्यापार कराराचे भवितव्य धूसर

भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार करार १ ऑगस्टच्या मुदतीपूर्वी होण्याची शक्यता धूसर बनली असल्याचे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने म्हटले आहे. कृषी, डेअरी उत्पादनांच्या मुद्द्यावर व्यापार कराराच्या वाटाघाटी अडल्या असल्याचे या अधिकाऱ्याने सांगितले. ज्ञात असावे की, ट्रम्प यांनी भारतावर २६ टक्के टॅरिफ लादले असून, त्यास १ ऑगस्टपर्यंत स्थगिती दिली आहे. त्याआधी व्यापार करार न झाल्यास हे टॅरिफ लागू होतील. भारताने अमेरिकेची कृषी उत्पादनांवरील टॅरिफ कमी करण्यास नकार दिला आहे.

भारत, चीन, ब्राझिलवर १००% टॅरिफ लावण्याची तयारी

ग्रॅहम यांनी सांगितले की, रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या भारत, चीन व ब्राझिलविरुद्ध १०० टक्के टॅरिफ लावण्याची तयारी ट्रम्प प्रशासन करीत आहे. मॉस्कोसोबत व्यापार करून हे देश युक्रेन युद्धात तेल ओतण्याचे काम करीत आहेत.

कु. साधना मुंडे
कु. भूमीका नागडा

 ISBN NO. 978-81-990957-8-6

२००० रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या UPI व्यवहारांवर किती GST आकारणार?

सरकारने संसदेत दिले उत्तर

UPI Transactions : भारतासह जगभरात 'युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस' अर्थात यूपीआयचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. भाजीवाल्यापासून ते ऑनलाइन खरेदीपर्यंत, बहुतेक लोक आता UPI द्वारे पेमेंट करत आहेत.

मात्र, गेल्या काही दिवसांपासून एक बातमी जोरदार व्हायरल होत होती की, 2000 रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या UPI व्यवहारांवर कर लागणार आहे. यामुळे डिजिटल व्यवहार करणाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. कर्नाटकमध्ये तर दुकानदारांनी स्कॅनर काढून टाकत असल्याचेही व्हिडीओ समोर आले आहेत.

यावर आता सरकारने स्वतःच स्पष्टीकरण दिले आहे! अर्थ मंत्रालयाने ही बातमी पूर्णपणे 'खोटी' आणि 'निराधार' असल्याचे म्हटले आहे. सरकारने सांगितले आहे की, UPI द्वारे डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे आणि कर लावण्याची कोणतीही योजना नाही.

संसदेत सरकारने दिले स्पष्टीकरण

फायनान्शियल एक्सप्रेसमध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, राज्यसभा खासदार अनिल कुमार यादव यांनी सभागृहात सरकारला प्रश्न विचारला होता की, 2000 रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या UPI व्यवहारांवर GST लादण्याचा विचार आहे का?' तसेच, अशा कोणत्याही योजनेला विरोध करणारे जनतेचे कोणतेही प्रतिनिधित्व सरकारला मिळाले आहे का, असेही त्यांनी विचारले होते.

या प्रश्नाचे उत्तर देताना अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी स्पष्ट केले की, जीएसटीशी संबंधित निर्णय केवळ जीएसटी परिषदेच्या शिफारशींच्या आधारे घेतले जातात. आणि आतापर्यंत परिषदेकडून अशी कोणतीही शिफारस आलेली नाही. महसूल विभागानेही म्हटले आहे की, जीएसटी परिषद ही एक संवैधानिक संस्था आहे. या परिषदेच्या शिफारशींवरच कर दर आणि सवलती निश्चित केल्या जातात. त्यामुळे, परिषद कोणतीही शिफारस करत नाही तोपर्यंत कोणताही नवीन कर लागू करता येणार नाही.

कु. साधना मुंडे
कु. भूमीका नागडा

यशोगाथा

कॉर्पोरेटची नोकरी सोडली अन् शेतीची कास धरली, तरुणीनं टोमॅटो विकत उभारलं 1.5 कोटींचं साम्राज्य-

काही जण वेगळी वाट निवडतातच आणि जिद्दीच्या जोरावर इतिहास घडवतात.

त्याचेच एक उदाहरण आहे. स्मृती चंद्राकर यांचं. त्यांन कॉर्पोरेट नोकरी सोडून कौटुंबिक शेती सुरू केली आणि आज त्यांची उलाढाल दीड कोटी रुपये आहे. त्या आपल्या शेतात 125 लोकांना रोजगारही देत आहेत. स्मृती चंद्राकर यांनी कॉर्पोरेट नोकरी सोडली आणि त्या शेतीत उतरल्या. त्यांनी केवळ स्वतःसाठीच नव्हे, तर इतरांसाठीही रोजगाराच्या संधी निर्माण केल्या. स्मृती चंद्राकर यांचे उदाहरण अनेकांसाठी प्रेरणादायी आहे.

त्यांचे बालपण त्यांचे वडील आणि आजोबा यांच्यासोबत हिरव्यागार भाताच्या शेतात गेले, जिथे त्यांनी शेतीबद्दल पहिले धडे घेतले. स्मृतीने रायपूरमध्ये कॉम्प्युटर सायन्समध्ये इंजिनीअरिंगची पदवी घेतली. त्यानंतर त्या पुणे

 ISBN NO. 978-81-990957-8-6

येथे गेल्या आणि तेथून त्यांनी एमबीए केले. एमबीए केल्यानंतर त्यांनी पुणे येथे पाच वर्षे एका कंपनीत नोकरी केली.

अन् शेतकरी बनल्या

रायपूरला आल्यानंतर स्मृती दर आठवड्याला आपल्या गावी जात असत. हळूहळू त्यांनी भातशेतीबद्दल शिकायला सुरुवात केली. त्या आणि त्यांचे कुटुंबीय जेवताना शेती कशी सुधारावी आणि जास्त पैसे कसे कमवावे याबद्दल चर्चा करत असत. स्मृतीला असे वाटले की भातशेतीपेक्षा भाजीपाला पिकवण्यात जास्त फायदा आहे. त्यामुळे त्यांनी आपल्या जमिनीवर भाजीपाला पिकवण्यास सुरुवात केली. त्यातून त्यांना खूप फायदा झाला. मग त्यांनी 20 एकर जमिनीवर भाजीपाला शेती सुरू केली आणि 2021 मध्ये नोकरी सोडून पूर्णपणे शेतकरी बनल्या.

1.5 कोटींची उलाढाल

गेल्या काही वर्षांपासून स्मृतीने शेतीतून चांगले उत्पन्न मिळवले आहे. 2024 मध्ये स्मृतीने सांगितले की, प्रति एकर सुमारे 50 टन टोमॅटोचे उत्पादन होते. त्यातून त्यांची वार्षिक उलाढाल 1.5 कोटी रुपये आहे. स्मृती सांगतात की, "तांदूळ आणि गहू यांसारखी पारंपरिक पिके तयार व्हायला जास्त वेळ लागतो. त्याच वेळेत भाजीपाल्याची शेती अनेक पिके देते. त्यामुळे कमाईही जास्त होते."अनेक पिके

स्मृती सांगतात की, त्यांनी थेट शेती सुरू केली नाही. सर्वात आधी जमीन व्यवस्थित तयार केली. त्यासाठी त्यांनी एका कृषी सल्लागाराची मदत घेतली. स्मृतीने गायीचे शेण आणि वर्मीकंपोस्ट वापरून मातीला सुपीक बनवले. टोमॅटो व्यतिरिक्त त्या भोपळा, काकडी आणि वांगी देखील पिकवतात. स्मृती चंद्राकर यांच्या कथेवरून हे स्पष्ट होते की, योग्य नियोजन आणि मेहनतीच्या जोरावर शेतीमध्येही चांगले उत्पन्न मिळू शकते.

कु. साधना मुंडे
कु. भूमीका नागडा

अर्थव्यवस्थेशी संबधित अहवाल

डिया रेटिंग्ज अँड रिसर्च आणि एशियन डेव्हलपमेंट बँकेने भारताच्या आर्थिक दृष्टिकोन अंतर्गत चालू आर्थिक वर्षासाठी जीडीपी वाढ कमी केली आहे.

चालू आर्थिक वर्षात भारताचा विकास अनुक्रमे 6.3 टक्के आणि 6.5 टक्के असू शकतो. डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ आणि भू-राजकीय तणावामुळे हे दिसून येते. त्याच वेळी, दोघांनीही असेही म्हटले आहे की या कपातीनंतरही भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था राहील.

हे दोन्ही अहवाल भारताच्या लक्ष्यासाठी एक मोठा धक्का मानला जाऊ शकतो, ज्या अंतर्गत भारताला 2047 पर्यंत विकसित करgन 30 ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवायची आहे. दुसरीकडे, भारत आणि अमेरिका व्यापार करार करू शकलेले नाहीत. अशी अपेक्षा आहे की जर 1 ऑगस्टपूर्वी भारत आणि अमेरिकेत व्यापाराबाबत कोणताही करार झाला नाही, तर अमेरिकन अध्यक्ष भारताविरुद्ध टॅरिफ पत्र देखील जारी करु शकतात. ज्यामुळं देशाच्या अर्थव्यवस्थेला आणखी नुकसान होऊ शकते. युरोपियन युनियनने आधीच भारतातून येणाऱ्या रशियन तेलावर बंदी घातली आहे. इंडिया रेटिंग्ज आणि एडीबीने कोणत्या प्रकारचा अहवाल सादर केला आहे ते आम्ही तुम्हाला सांगतो.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

इंडिया रेटिंग्जने दिला धक्का

इंडिया रेटिंग्ज अँड रिसर्चने बुधवारी चालू आर्थिक वर्ष 2025-26 साठी भारताचा विकासदर 6.3 टक्के इतका कमी केला आहे. एजन्सीने अमेरिकेतील शुल्कांवरील अनिश्चितता आणि कमकुवत गुंतवणूक वातावरणाचा हवाला दिला आहे. इंडिया रेटिंग्ज अँड रिसर्चने त्यांच्या मध्य-वर्षाच्या आर्थिक परिस्थितीत 2025-26 या आर्थिक वर्षासाठी भारताचा सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) विकासदर 6.3 टक्के राहण्याचा अंदाज वर्तवला आहे, जो डिसेंबरमध्ये त्यांच्या 6.6 टक्क्यांच्या अंदाजापेक्षा कमी आहे.

मुख्य अर्थतज्ज्ञ आणि सार्वजनिक वित्त प्रमुख देवेंद्र कुमार पंत म्हणाले की, अमेरिकेतील सर्व देशांवर एकतर्फी शुल्कवाढीमुळं अनिश्चित जागतिक दृष्टिकोन आणि अपेक्षेपेक्षा कमकुवत गुंतवणूक वातावरण हे प्रमुख प्रतिकूल परिस्थिती आहेत. त्याचवेळी, अनुकूल परिस्थितीमध्ये आर्थिक सुलभता, महागाईत अपेक्षेपेक्षा जास्त घट आणि 2025 मध्ये सामान्यपेक्षा जास्त पावसाचा अंदाज यांचा समावेश आहे. 2024-25 मध्ये (एप्रिल 2024 ते मार्च 2025) भारतीय अर्थव्यवस्थेचा विकासदर 6.5 टक्के दराने झाला.

आशियाई विकास बँकेने (ADB) बुधवारी 2025-26 या आर्थिक वर्षासाठी भारताचा विकास दर 6.7 टक्क्यांवरून 6.5 टक्क्यांपर्यंत कमी केला आहे.

आर्थिक सर्वेक्षणात 2025-26 या आर्थिक वर्षासाठी सकल देशांतर्गत उत्पादन (GDP) वाढीचा दर 6.3 टक्के ते 6.8 टक्के दरम्यान राहण्याचा अंदाज आहे. तर रिझर्व्ह बँकेने (RBI) चालू आर्थिक वर्षासाठी वाढीचा अंदाज 6.7 टक्क्यांवरून 6.5 टक्के केला आहे.

कु. दुर्गा संतोष साखरे
कु. संभाजी तोटरे

जागतिक बँकेचा इशारा

पाऊस आणि बदलत्या हवामानाचा दरवर्षी भारताच्या शहरांना मोठ्या प्रमाणात धक्का बसत आहे तर येत्या काही वर्षात हा धोका आणखी वाढण्याची शक्यता आहे. जागतिक बँकेने भारतासाठी धोक्याचा ईशा जारी केला आहे.

हवामान बदलाचा मोठा फटका भारताला बसणार आहे त्यामुळे, होणाऱ्या अतिरेकी हवामान घटनांना तोंड देण्यासाठी भारताला 2050 पर्यंत वेगाने वाढणाऱ्या शहरांमध्ये $2.4 ट्रिलियन (सुमारे 200 लाख कोटी रुपये) पेक्षा जास्त गुंतवणूक करावी लागेल.

जागतिक बँकेने मंगळवारी बदलत्या हवामानावर अहवाल प्रसिद्ध केला ज्यामध्ये म्हटले की 2050 पर्यंत भारतातील शहरी लोकसंख्या जवळजवळ दुप्पट होऊन 951 दशलक्ष होईल. यामुळे अनियमित पाऊस, उष्णतेच्या लाटा आणि समुद्राच्या वाढत्या पातळीला शहरे अधिक असुरक्षित होतील.

त्याचवेळी गृहनिर्माण, वाहतूक, पाणी आणि कचरा व्यवस्थापन प्रणालींमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली गेली नाही तर हवामानाशी संबंधित नुकसानीमुळे भारताला होणारा खर्च वेगाने वाढेल असाही अहवालात इशारा दिला आहे.

तर सध्या शहरी पुरामुळे भारताला दरवर्षी अंदाजे 4 अब्ज डॉलर्सचे नुकसान होत असून कोणत्याही सुधारणात्मक कारवाईशिवाय 2070 पर्यंत हे नुकसान 30 अब्ज डॉलर्सपर्यंत वाढू शकते.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

असून भारताला शहरी पायाभूत सुविधांवर जीडीपीच्या 0.7% पेक्षा जास्त खर्च करण्याची आवश्यकता असलयाचे सुचवले आहे. यासाठी सार्वजनिक आणि खाजगी वित्तपुरवठ्यात लक्षणीय वाढ करावी लागेल.

जागतिक बँकेच्या अहवालानुसार, 2020 मध्ये भारतातील शहरांमध्ये राहणाऱ्या लोकांची संख्या 48 कोटी होती जी 2050 पर्यंत 95.1 कोटी होईल. म्हणजे शहरांवर लोकसंख्येचा दबाव वाढेल. अनियमित पाऊस, उष्णता आणि समुद्राच्या पातळीत वाढ यामुळे शहरांना वाढत्या धोक्याचा सामना करावा लागत आहे.

शहरी पायाभूत सुविधांवर इतर देशांपेक्षा कमी खर्च

भारत सध्या शहरी पायाभूत सुविधांवर त्याच्या GDP च्या सुमारे 0.7% खर्च करतो, जे जगाच्या इतर भागांच्या तुलनेत खूपच कमी आहे. जागतिक बँकेच्या अहवालानुसार, भारताला सरकारी आणि खाजगी क्षेत्राकडून गुंतवणूक वाढवावी लागेल. अशा स्थितीत, प्रकल्पांना निधी देण्यासाठी केंद्र, राज्ये आणि नगरपालिका यांना एकत्र काम करावे लागेल. भारताला ऊर्जा-कार्यक्षम पाणीपुरवठा, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि हरित इमारती यासारख्या क्षेत्रात खाजगी क्षेत्रासोबत काम करावे लागेल.

म्हणजे की भारताला हवामान बदलासाठी आपल्या शहरांना सज्ज करायचे असेल तर बरेच काही करायची गरज आहे. अधिक गुंतवणूक, चांगले नियोजन आणि सरकार आणि खाजगी क्षेत्र यांच्यातील सहकार्याने, भारत आपली शहरे सुरक्षित आणि राहण्यायोग्य बनवू शकतो. त्यामुळे आपण आत्ताच कृती केली तर आपण भविष्यात मोठे नुकसान टाळू शकतो.

कु. दुर्गा संतोष साखरे
कु. संभाजी तोटरे

प्रश्नावली

१.सूक्ष्म-अर्थशास्त्राच्या दृष्टीने, तुलनात्मक फायदा खालीलपैकी कोणत्यावर आधारित आहे?

[A] डॉलर किंमत

[B] कामगार खर्च

[C] संधी खर्च

[D] भांडवली खर्च

२.खालीलपैकी कोणते सूक्ष्म-आर्थिक परिवर्तनशील नाही?

[A] वस्तूची मागणी

[B] वस्तूचा पुरवठा

[C] वस्तूच्या किमतीत वाढ

[D] देशात एका वर्षात निर्माण झालेला रोजगार

३.जर खालील विषय सूक्ष्म अर्थशास्त्र अभ्यासाचा असेल तर कोणता?

[A] कापूस वस्त्रोद्योगाचा अभ्यास

[B] वस्तूंची सामान्य किंमत पातळी

[C] बेरोजगारीची समस्या

[D] वस्तूंची एकूण मागणी

४.एखाद्या वस्तू किंवा सेवेच्या इच्छा पूर्ण करण्याच्या शक्तीचे वर्णन करण्यासाठी कोणता शब्द वापरला जातो?

[A] मागणी

[B] गरज

[C] उपयुक्तता

[D] वापर

५.खालीलपैकी कोणते घटक वस्तूच्या मागणीवर परिणाम करत नाहीत?

[A] वस्तूची किंमत

[B] वैयक्तिक ग्राहकाचे उत्पन्न

ISBN NO. 978-81-990957-8-6

[C] ग्राहकाची गरज

[D] संबंधित वस्तूची किंमत

६.जेव्हा X च्या पर्यायी वस्तूची किंमत कमी होते, तेव्हा X ची मागणी किती वाढेल?

[अ] वाढवा

[ब] कमी करा

[क] वाढवा, नंतर कमी करा

[ड] कमी करा, नंतर वाढवा

७.सर्व इनपुटमध्ये समान प्रमाणात बदल झाल्यामुळे एकूण उत्पादनात होणाऱ्या बदलांना काय म्हणतात?

[A] सीमांत परतावा कमी करण्याचा नियम

[B] उत्पादन वाढवण्याचा नियम

[C] प्रमाणाच्या परताव्याच्या नियम

[D] स्थिर परताव्याच्या नियम

८.खालीलपैकी कोणता उत्पादनाचा घटक आहे?

[अ] जमीन

[ब] भाडे

[क] नफा

[ड] व्याज

९.खालीलपैकी कोणता अल्पावधीत उत्पादन कंपनीसाठी निश्चित खर्च असतो?

[A] इमारतींचा विमा

[B] कामगारांना ओव्हरटाइम पेमेंट

[C] ऊर्जेचा खर्च

[D] कच्च्या मालाचा खर्च

१०.ग्राहकांच्या उत्पन्नात वाढ झाल्याने कोणत्या प्रकारच्या वस्तूंची मागणी कमी होते?

[A] सामान्य चांगले

[B] पूरक चांगले

[C] कनिष्ठ चांगले

[D] पर्यायी चांगले

1-C	2-D	3-A	4-C	5-C
6-B	7-C	8-A	9-A	10-C

24/072025

सेन्सेक्स:- 82523.89

निफ्टी :- 25157.75

सोने :- 9,380/10,040

चांदी :- 119

पेट्रोल:-104

डिझेल:- 90

पोस्ट ऑफिसच्या 'या' योजनेत तुम्हाला दरमहा ९२५० रुपये मिळतील, कसा लाभ मिळवता येईल?

जर तुम्हाला शेअर बाजाराच्या अनिश्चिततेबद्दल काळजी वाटत असेल आणि तुम्हाला कोणत्याही जोखीमशिवाय हमी परतावा हवा असेल, तर पोस्ट ऑफिसच्या काही योजना तुमच्यासाठी सर्वोत्तम पर्याय असू शकतात.

पोस्ट ऑफिसच्या अनेक हमी परतावा योजना देशभरातील लोकांमध्ये खूप लोकप्रिय आहेत. अशीच एक योजना म्हणजे पोस्ट ऑफिस मासिक उत्पन्न योजना (POMIS), जी तुम्ही लग्नानंतर तुमच्या कुटुंबासह घेऊ शकता.

या योजनेत एकदा पैसे गुंतवून, तुम्ही दरमहा बराच काळ चांगली रक्कम कमवू शकता. तुम्ही तुमच्या १० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुलाच्या नावानेही ही योजना उघडू शकता. दरमहा मिळणारे व्याज मुलाच्या शाळेची फी किंवा इतर खर्चासाठी वापरले जाऊ शकते. लग्नानंतर मजबूत आर्थिक योजना बनवू इच्छिणाऱ्या जोडप्यांसाठी देखील ही योजना चांगली आहे.

इंडिया पोस्टच्या वेबसाइटनुसार, तुम्ही फक्त १,००० रुपयांमध्ये POMIS मध्ये खाते उघडू

 ISBN NO. 978-81-990957-8-6

शकता. यात एकल आणि संयुक्त दोन्ही खात्यांची सुविधा आहे. तुम्ही एकाच खात्यात जास्तीत जास्त ९ लाख रुपये जमा करू शकता, तर संयुक्त खात्यात ही मर्यादा १५ लाख रुपयांपर्यंत आहे. यामध्ये दरमहा व्याज दिले जाते. सध्या या योजनेवर ७.४% वार्षिक व्याज दिले जात आहे. या योजनेची परिपक्वता ५ वर्षे आहे. जी तुम्हाला हवी असल्यास तुम्ही आणखी ५ वर्षे वाढवू शकता.

या योजनेत, वार्षिक व्याज १२ भागांमध्ये विभागले जाते आणि ते दरमहा तुमच्या खात्यात हस्तांतरित केले जाते. जर तुम्ही मासिक व्याज काढले नाही तर ते तुमच्या पोस्ट ऑफिस बचत खात्यात जमा होत राहील. मुदतपूर्तीनंतर, तुम्हाला तुमचे संपूर्ण मुद्दल देखील परत मिळते.

जर तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत संयुक्त खाते उघडून १५ लाख रुपये गुंतवले तर तुम्हाला सुमारे १ लाख ११ हजार रुपये वार्षिक व्याज मिळेल. म्हणजेच दरमहा सुमारे ९,२५० रुपये निश्चित उत्पन्न मिळेल. जर तुम्ही एकाच खात्यात ९ लाख रुपये गुंतवले तर तुम्हाला सुमारे ६६,६०० रुपये वार्षिक व्याज आणि दरमहा सुमारे ५,५५० रुपये उत्पन्न मिळेल. विशेष म्हणजे यामध्ये कोणताही धोका नाही आणि तुमचे पैसे पूर्णपणे सुरक्षित आहेत.

कु. दुर्गा संतोष साखरे
कु. संभाजी तोटरे

8 सरकारी कंपन्या विकण्याची तयारी! डिसेंबरपर्यंत 'ही' बँक विकणार; सरकारला किती कोटी मिळणार?

1) केंद्र सरकारने आठ सरकारी कंपन्यांच्या विक्रीची योजना आखली असून IDBI बँकेचं खासगीकरण डिसेंबर 2025 पर्यंत पूर्ण होणार आहे.

2)IDBI बँकेतील 60.72% हिस्सा विकून सरकार आणि LIC ला तब्बल 50,000 कोटी रुपये मिळण्याची शक्यता आहे.

3)फेअरफॅक्स इंडिया, एमिरेट्स एनबीडी आणि कोटक महिंद्रा बँक या कंपन्या IDBI बँक खरेदी करण्याच्या शर्यतीत आहेत.

IDBI Bank Divestment on Track: देशात सरकारी कंपन्याच्या विक्रीच्या योजनेला वेग येण्याची शक्यता आहे. मिंटच्या अहवालानुसार, केंद्र सरकारने आठ सरकारी कंपन्या विकण्याची तयारी केली आहे. यामध्ये बीईएमएल लिमिटेड, शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, एचएलएल लाइफकेअर लिमिटेड, प्रोजेक्ट्स अँड डेव्हलपमेंट इंडिया, इंडियन मेडिसिन्स फार्मास्युटिकल कॉर्पोरेशन यांचा समावेश आहे. याशिवाय, IDBI बँकेचं खासगीकरण डिसेंबर 2025 पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. उर्वरित कंपन्यांची विक्रीही याच आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत (Q4) केली जाऊ शकते.

कु. दुर्गा संतोष साखरे
कु. संभाजी तोटरे

IDBI बँकेच्या विक्रीतून किती पैसा मिळणार?

माहितीनुसार, IDBI बँकेच्या खासगीकरणातून सरकार आणि LIC ला तब्बल 50,000 कोटी रुपये मिळू शकतात. या बँकेत सरकार आणि LIC चा एकूण 94% हिस्सा आहे. यातील 60.72% हिस्सा विकण्याची योजना आहे.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

जून तिमाहीत सरकारने कोणत्याही सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीतील हिस्सा विकला नाही, आणि सप्टेंबर तिमाहीतही अशी अपेक्षा नाही. मात्र, डिसेंबर तिमाहीत इतर लिस्टेड कंपन्यांमधून 10-15,000 कोटींची कमाई होऊ शकते.

कोण स्पर्धेत?

IDBI बँकेच्या खासगीकरणासाठी फेअरफॅक्स इंडिया होल्डिंग्स, एमिरेट्स एनबीडी आणि कोटक महिंद्रा बँक यांची नावं पुढे येत आहेत. आर्थिक वर्ष 2022 च्या बजेटमध्ये IDBI बँकेच्या डिसइन्व्हेस्टमेंटची घोषणा झाली होती. मात्र, ही प्रक्रिया अनेक वेळा पुढे ढकलण्यात आली.

कु. दुर्गा संतोष साखरे
कु. संभाजी तोटरे

₹1600 वर पोहोचू शकतो इलेक्ट्रिक बस बनवणाऱ्या कंपनीचा शेअर, खरेदीसाठी उडालीय लोकांची झुंबड; करतोय मालामाल !

शेअर बाजारात गुरुवारच्या व्यवहारादरम्यान इलेक्ट्रिक बस निर्माता कंपनी ओलेक्ट्रा ग्रीनटेक लिमिटेडचा शेअर फोकसमध्ये होते. आज कंपनीचा शेअर २०% ने वधारून १५९० रुपयांच्या इंट्राडे उच्चांकावर पोहोचला.

या शेअरचा बुधवारचा बंद भाव १३२७.५५ रुपये एवढा होता. बीएसईवर जवळपास १८.८२ लाख शेअर्सची खरेदी-विक्री झाली.

हा आकडा दोन आठवड्यांच्या सरासरी उलाढालीपेक्षा (४७,००० शेअर्स) खूपच अधिक आहे. या शेअरची एकूण उलाढाल २७८.९७ कोटी रुपये एवढी होती. याच बरोबर याचे बाजार भांडवल (एम-कॅप) १२,७२२.५१ कोटी रुपयांवर पोहोचले आहे.

तांत्रिक आघाडीवर, एका विश्लेषकाने म्हटले आहे की, नजीकच्या काळात हा शेअर १६०० रुपयांपर्यंत पोहोचू शकतो. मात्र, काही विश्लेषकांनी १५५० रुपयांच्या पातळीच्यावर जोरदार प्रतिकाराचे संकेत दिले आहेत. तसेच, त्यांपैकी एकाने गुंतवणूकदारांना सध्याच्या पातळीवर नफा वसुलीचा सल्लाही दिला आहे.

बोनान्झाचे तांत्रिक संशोधन विश्लेषक ड्रुमिल विथलानी म्हणाले, "ऑलेक्ट्रा ग्रीनटेकने दैनिक चार्टवर चढत्या त्रिकोणी पॅटर्नमधून मजबूत ब्रेकआउट दर्शविला आहे, ज्याला व्हॉल्यूममध्ये जोरदार वाढीसाठी समर्थन आहे, जे अलिकडच्या काही महिन्यांतील सर्वाधिक आहे. मोठ्या वॉल्यूमद्वारे पुष्टी करण्यात आलेला ब्रेकआउट, या निकालाची ताकद आणि विश्वसनीयता मजबूत करतो. अपेक्षित लक्ष्य 1550-1,600 रुपये दरम्यान आहे आणि स्टॉप लॉस 1410 रुपयांवर निर्धारित करण्यात आली आहे."

आनंद राठीचे वरिष्ठ व्यवस्थापक तथा तांत्रिक संशोधन विश्लेषक जिगर एस पटेल म्हणाले, १३५० रुपयांवर समर्थन आणि १,५५५ रुपयांवर तात्काळ प्रतिकार दिसून येऊ शकतो. नजिकच्या काळातील ट्रेडिंग रेंज १,३५० ते १,५५५ रुपयांच्या दरम्यान असेल.

कु. दुर्गा संतोष साखरे
कु. संभाजी तोटरे

25/072025

सेन्सेक्स : 81,523

निफ्टी : 24836

सोने : 9,210/10,048

चांदी : 118

 ISBN NO. 978-81-990957-8-6

पेट्रोल : 103

डिझेल : 90

बँकांकडून १२ लाख कोटींचे कर्ज बुडीत

आर्थिक वर्ष २०१५-१६ पासून २०२४-२५ पर्यंत गेल्या १० वर्षांत तब्बल १२.०८ लाख कोटीचे कर्ज राइट-ऑफ केले आहे. आता बँकांना ही रक्कम परत मिळण्याची शक्यता अतिशय कमी आहे. याचदरम्यान १२ पैकी १० सरकारी बँकांच्या 'राइट-ऑफ'मध्ये घट झाली.

राइट-ऑफ' म्हणजे नेमके काय?

बुडीत कर्जांपैकी काही कर्जे बँका किंवा आरबीआयच्या धोरणे व मार्गदर्शक तत्त्वांनुसार चार वर्षांनंतर लेखा प्रक्रियेचा भाग म्हणून 'राइट-ऑफ' होतो. मात्र, 'राइट-ऑफ म्हणजे कर्जमाफी नाही,' असंही त्यांनी सांगितले. बँका अशा खात्यांमधून वसुलीसाठी पुढील कारवाई सुरूच ठेवतात.

बँकांमध्ये हजारोंना नोकरीची संधी तयार

२०२० ते २०२५ या कालावधीतील १.४८ लाख भरतीसह ३१ मार्च २०२५ पर्यंत सार्वजनिक बँकांमध्ये ९६% कर्मचारी भरती झाली आहे. सेवानिवृत्ती व अन्य कारणांमुळे उर्वरित रिक्त पदे निर्माण झाली असून २०२५-२६ साठी ४८,५७० नव्या भरतीची प्रक्रिया सुरू आहे.

१६२९ जणांनी बुडवले १.६२ लाख कोटींचे कर्ज. ३१ मार्च २०२५ पर्यंत १६२९ जणांनी १.६२ लाख कोटींचे कर्ज थकवले असून नऊ आरोपी विदेशात पळाले आहेत. या प्रकरणांत आतापर्यंत १५,००० कोटींहून अधिक मालमत्ता पीएमएलएअंतर्गत जप्त करण्यात आली आहे, तर सुमारे ७५० कोटींची मालमत्ता पळपुटे आर्थिक गुन्हेगार कायदा, २०१८ अंतर्गत जप्त करण्यात आली आहे. नऊ आरोपी दोषी ठरले असून बँकांना २५,००० कोटींपेक्षा अधिक परत मिळाले आहेत.

कु. गुरप्रीतकौर मोगलीवाले
कु. संध्या पदमगिरवार

नफा वाढला, तरी बजाज फायनान्सचा शेअर आपटला

आज, शुक्रवार २५ जुलै रोजी बजाज फायनान्सच्या शेअर्समध्ये विक्रीचा सपाटा दिसून आला. जून तिमाहीतील निकालानं गुंतवणूकदारांच्या अपेक्षा पूर्ण न केल्यामुळे या एनबीएफसी स्टॉकमध्ये ही मोठी घसरण झाली.

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत कंपनीचा एकत्रित निव्वळ नफा २२% वाढून ४,७६५ कोटी रुपये झाला. गेल्या वर्षी याच तिमाहीत तो ₹३,९१२ कोटी होता. जून तिमाहीत कंपनीचं एकत्रित उत्पन्न २१% वाढून ₹१९,५२४ कोटी झाले, जे आर्थिक वर्ष २५ च्या पहिल्या तिमाहीत ₹१६,१०० कोटी होतं. आर्थिक वर्ष २६ च्या पहिल्या तिमाहीत १.३४ कोटी नवीन कर्जे बुक करण्यात आली, तर गेल्या वर्षी याच तिमाहीत ही संख्या १.०९ कोटी होती. म्हणजेच त्यात २३% वाढ नोंदवण्यात आली.

कु. संध्या पदमगिरवार
कु. गुरप्रीतकौर मोगलीवाले

अवघड कामं करा, इथं स्पर्धा नसते!

अवघड कामं करा, इथं स्पर्धा नसते!'असं एकदा लॅरी फिन यांनी सुंदर पिचाई यांना सांगितले होते. एका दशकभराहून अधिक काळ जागतिक पातळीवरील दिग्गज आयटी कंपनीचे नेतृत्व करणाऱ्या गुगलची मूळ कंपनी, Alphabet, चे

 ISBN NO. 978-81-990957-8-6

भारतीय वंशाचे CEO सुंदर पिचाई अब्जाधीश झाले आहेत.त्यांच्या कठोर परिश्रमाच्या जोरावर या पदापर्यंत पोहोचण्यात यशस्वी झाले आहेत.

ब्लूमबर्ग बिलेनियर इंडेक्सनुसार, सुंदर यांची एकूण संपत्ती आता $1.1 अब्ज (सुमारे 9,200 कोटी रुपये) वर पोहोचली आहे. अल्फाबेटच्या शेअर्सनी विक्रमी उच्चांक गाठला आणि सुंदर पिचाई यांनी ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली असून अल्फाबेटची उत्कृष्ट कामगिरी सुंदर पिचाई यांच्या पथ्यावर पडली.

त्यांनी वयाच्या अवघ्या 17 व्या वर्षी IIT खरगपूरची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण केली.त्यानंतर, शिष्यवृत्ती घेऊन पुढील अभ्यासासाठी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठात ऍडमिशन घेतले.सुंदर पिचाई यांनी मटेरियल इंजिनिअर म्हणून सुरुवात केली आणि 2004 मध्ये गुगलमध्ये मॅनेजमेंट एक्झिक्युटिव्ह म्हणून सामील झाले.

कु. गुरप्रीतकौर मोगलीवाले
कु. संध्या पदमगिरवार

ब्रिटिश कंपन्यांना भारतात उत्पादन करण्याची मोठी संधी

भारत आणि युनायटेड किंग्डम (यूके) यांच्यातील मुक्त व्यापार करार (एफटीए) आता ब्रिटिश कंपन्यांसाठी एक मोठी संधी बनला आहे. या करारानंतर, त्यांना भारताच्या 'मेक इन इंडिया' धोरणाअंतर्गत फायदे देखील मिळतील जे आतापर्यंत फक्त भारतीय उत्पादक कंपन्यांना दिले जात होते.

भारत आणि ब्रिटनमधील मुक्त व्यापार करार लागू होताच, ब्रिटीश कंपन्यांनाही काही विशेष फायदे मिळू लागतील. जर एखाद्या ब्रिटीश कंपनीने बनवलेल्या किमान २०% वस्तू किंवा सेवा ब्रिटनमध्ये उत्पादित केल्या गेल्या तर भारत त्यांना 'क्लास-२ पुरवठादार' मानेल.

पहिल्यांदाच भारताने सरकारी खरेदीमध्ये ब्रिटिश कंपन्यांना मोठी सूट दिली आहे. ही भारताने आतापर्यंत दिलेली सर्वात मोठी सूट आहे वस्तू आणि सेवांसाठी, यूकेमध्ये ही मर्यादा सुमारे १.६ कोटी रुपये आहे, तर भारतात ती सुमारे ५.५ कोटी रुपये आहे. बांधकाम कामासाठी, दोन्ही देशांची मर्यादा अंदाजे ६० कोटी रुपयांच्या बरोबरीची आहे.

कु. तनुजा सूर्यवंशी
कु. स्नेहा जोंधले

26/07/2025

सेन्सेक्स : 81,523
निफ्टी : 24,836
सोने : 9,210/10,048
चांदी : 118
पेट्रोल : 103
डिझेल : 90

भारत-ब्रिटन मुक्त व्यापार करारामुळे 'मेक इन इंडिया'च्या नवयुगाची सुरुवात

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दोन दिवसांच्या ब्रिटन दौऱ्यात भारत-ब्रिटन मुक्त व्यापार करार (FTA) वर स्वाक्षरी झाल्याचे टीव्हीएस मोटर कंपनीने आज स्वागत केले. हा ऐतिहासिक करार २०३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार ६० अब्ज डॉलर्सवरून १२० अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याची अपेक्षा आहे आणि 'विकसित भारत' या पंतप्रधानांच्या दृष्टिकोनाच्या पूर्ततेकडे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

हा करार भारत सरकारच्या प्रमुख 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत भारतीय उत्पादन आणि

 ISBN NO. 978-81-990957-8-6

डिझाइन क्षेत्रासाठी जागतिक बाजारपेठा खुल्या करण्याची संधी निर्माण करतो. टीव्हीएस मोटर कंपनीसाठी हा करार अत्यंत योग्य वेळी आला आहे, कारण कंपनीने नुकतेच खरेदी केलेल्या प्रतिष्ठित ब्रिटिश ब्रँड नॉर्टन मोटरसायकल्सची नवीन श्रेणी यूकेमध्ये सादर करण्याची तयारी सुरू केली आहे.

कु. संध्या पदमगिरवार

27/07/2025

सेन्सेक्स : 81,523

निफ्टी : 24836

सोने : 9,210/10,048

चांदी : 118

पेट्रोल : 103

डिझेल : 90

बजाज ऑटोला ऑगस्ट २०२५ पासून त्यांच्या इलेक्ट्रिक वाहनांचे उत्पादन थांबवावे लागू शकते.

कारण, चीनी सरकारने दुर्मिळ अर्थ मॅग्नेटच्या निर्यातीवर बंदी घातली आहे. हे मॅग्नेट इलेक्ट्रिक वाहन बनवण्यासाठी खूप महत्वाचा कच्चा माल आहे.

बजाजप्रमाणेच, टीव्हीएस आणि एथर एनर्जी सारख्या इतर इलेक्ट्रिक वाहन उत्पादकांनाही याच समस्येचा सामना करावा लागत आहे.

रेअर अर्थ मॅग्नेटचे महत्त्व काय आहे?

रेअर अर्थ मॅग्नेट हे इलेक्ट्रिक वाहनांसाठी (ईव्ही) खूप महत्वाचे भाग आहेत. ते विशेषतः मोटर चालविण्यासाठी वापरले जातात. हे मॅग्नेट फार कमी देशांमध्ये तयार केले जातात. सध्या, चीन हा या मॅग्नेटचा सर्वात मोठा उत्पादक आणि निर्यातदार आहे. जेव्हा चीन त्यांच्या निर्यातीवर बंदी घालतो तेव्हा त्याचा थेट परिणाम जगभरातील इलेक्ट्रिक वाहन उत्पादक कंपन्यांवर होतो.

कु. तनुजा सूर्यवंशी

कु. स्नेहा जोंधले

NSDL IPO: गुंतवणूकदारांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर शेवटी एनएसडीएलचा IPO

(National Securities Depository Limited)

बहुचर्चित आयपीओची तारीख आणि प्राइस बँड जाहीर झाला आहे. देशातील सर्वात मोठ्या डिपॉझिटरीपैकी एक असलेल्या एनएसडीएलचा आयपीओ बुधवारी, 30 जुलै 2025 रोजी खुला होणार आहे. 6 ऑगस्टला बीएसईवर लिस्टिंग होईल. या घोषणेनंतर ग्रे मार्केटमध्ये जोरदार हालचाल दिसून आली आहे.

हा संपूर्ण आयपीओ 5,01,45,001 इक्विटी शेअर्सच्या OFSवर आधारित आहे. यामधून कंपनीचे प्रमोटर्स 4011 कोटी रुपये उभारतील. या इश्यूअंतर्गत आयडीबीआय बँक 2,22,20,000 शेअर्स तर नॅशनल स्टॉक एक्सचेंज (NSE) 1,80,00,001 शेअर्स विकणार आहेत.

या दोन्ही संस्थांची एनएसडीएलमधील हिस्सेदारी अनुक्रमे 26.01 टक्के आणि 24 टक्के आहे. याशिवाय भारतीय स्टेट बँक, एचडीएफसी बँक आणि युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया देखील आपल्या हिस्स्याचा काही भाग विकतील. प्रत्येक शेअरची फेस व्हॅल्यू 2 रुपये आहे.

प्राइस बँड आणि गुंतवणुकीचे तपशील

एनएसडीएलने आपल्या शेअर्सची किंमत 760 ते 800 रुपयांच्या दरम्यान निश्चित केली आहे. एका लॉटमध्ये 18 शेअर्स असतील, म्हणजे किमान 14,400 रुपयांची गुंतवणूक आवश्यक आहे. किरकोळ गुंतवणूकदारांना जास्तीत जास्त 13 लॉट्ससाठी अर्ज करता येईल. सध्या

 ISBN NO. 978-81-990957-8-6

एनएसडीएलच्या शेअर्सवर ग्रे मार्केट प्रीमियम (GMP) प्रति शेअर 165-170 रुपयांच्या दरम्यान आहे.

अनलिस्टेड शेअर्सवर निर्बंध

आयपीओपूर्वीच्या हालचाली रोखण्यासाठी मागील आठवड्यात एनएसडीएलच्या नॉन-लिस्टेड शेअर्सचे आयएसआयएन (ISIN) फ्रीझ करण्यात आले. त्यामुळे लिस्टिंगपूर्वी या शेअर्सची खरेदी-विक्री होऊ शकणार नाही. प्री-आयपीओ बाजारात या शेअर्सची किंमत 850-900 रुपयांच्या दरम्यान दिसत होती.

धारावत सिक्युरिटीजचे सीईओ हितेश धारावत यांच्या मते, गुंतवणूकदारांचा कल पाहता या इश्यूची मागणी चांगली राहील. "प्री-आयपीओ किमती आणि ग्रे मार्केट हालचाली पाहता लिस्टिंगवर जोरदार प्रतिसाद मिळण्याची शक्यता आहे," असे ते म्हणाले. एनएसडीएलचा आयपीओ 30 जुलै ते 1 ऑगस्ट दरम्यान गुंतवणुकीसाठी खुला असेल आणि 4 ऑगस्टला शेअर्सचे अलॉटमेंट होईल.

कु. तनुजा सूर्यवंशी
कु. स्नेहा जोंधले

UPI व्यवहारामध्ये मोठ्या बदलाची शक्यता, मध्यमवर्गाच्या खिशावर होणार थेट परिणाम; RBI कडून महत्वाचे संकेत

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) चे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी UPI द्वारे मोफत व्यवहारांची प्रक्रिया संपवण्याबाबत एक मोठा संकेत दिला आहे.

RBI गव्हर्नर म्हणाले की डिजिटल पेमेंट पूर्णपणे मोफत ठेवणे दीर्घकाळात शक्य नाही. सध्या, सरकार बँका आणि पेमेंट सेवा प्रदात्यांना सबसिडी देत आहे, जेणेकरून UPI वापरकर्त्यांना मोफत सेवा मिळत राहतील. मात्र भविष्यात या प्रणालीत बदल होण्याची दाट शक्यता आहे आणि लोकांना व्यवहारांसाठी शुल्क आकारले जाऊ शकते.

UPI व्यवहारांवर शुल्क आकारले जाणार आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी एका कार्यक्रमादरम्यान सांगितले की, पेमेंट सिस्टमला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणे खूप महत्वाचे आहे. त्यांनी म्हटले की "कोणतीही सिस्टम जोपर्यंत तिचा खर्च वसूल होत नाही तोपर्यंत टिकू शकत नाही. सध्या सरकार सबसिडीद्वारे खर्च उचलत आहे, पण ही परिस्थिती जास्त काळ टिकू शकत नाही."

ही व्यवस्था मोफत राहावी म्हणून सरकार बँका आणि इतर कंपन्यांना सबसिडी देत आहे पण असं जास्त काळ चालू राहू शकत नाही. त्यामुळे UPI वर शुल्क आकारले जाण्याची शक्यता आहे. UPI चा वाढता वापर पाहता RBI गव्हर्नर यांचे हे विधान खूप महत्वाचे असून गेल्या दोन वर्षांत UPI द्वारे होणारे व्यवहार दुप्पट झाले आहेत. त्याचवेळी,आता दररोज 60 कोटींहून अधिक व्यवहार होत आहेत.

फायनान्शियल एक्सप्रेसच्या एका कार्यक्रमात संजय मल्होत्रा यांनी सांगितले की, 'पेमेंट आणि पैसा ही जीवनरेखा आहेत. आपल्याला अशी प्रणाली हवी आहे जी प्रत्येक बाबतीत चांगली असेल. सध्या कोणतेही शुल्क आकारले जात नाही. सरकार UPI पेमेंट सिस्टममध्ये बँका आणि इतर भागधारकांना सबसिडी देत आहे. म्हणजे काही खर्च करावा लागेल.' एकूणच UPI चालवण्याचा खर्च कोणीतरी उचलावा लागेल.

RBI गव्हर्नरांच्या विधानाचा अर्थ तरी काय

RBI आता पूर्णपणे सरकारी अनुदानांवर अवलंबून राहण्याऐवजी UPI ला आर्थिकदृष्ट्या

 ISBN NO. 978-81-990957-8-6

स्वयंपूर्ण बनवू इच्छिते. म्हणजे की भविष्यात UPI व्यवहारांवर वापरकर्त्यांकडून शुल्क आकारले जाऊ शकते. 'कोणाला तरी आर्थिक भार उचलावा लागेल' असं आरबीआय गव्हर्नरांच्या विधानाचा अर्थ लावला जाऊ शकतो. हे शुल्क खूपच कमी असू शकते पण, दीर्घकाळात, 'पूर्णपणे मोफत' व्यवहारांच्या युगाचा अंत ठरेल.

कु. तनुजा सूर्यवंशी
कु. स्नेहा जोंधले

28/07/2025

सेन्सेक्स : 81,003
निफ्टी : 24,736
सोने : 9,190/10,000
चांदी : 117
पेट्रोल : 103
डिझेल : 90

१ ऑगस्ट 2025 पासून मोठे बदल

क्रेडिट कार्ड नियमांमध्ये बदल

जर तुम्ही एसबीआय कार्डधारक असाल तर तुम्हाला मोठा धक्का बसू शकतो, कारण ११ ऑगस्टपासून एसबीआय अनेक को-ब्रँडेड क्रेडिट कार्डवर उपलब्ध असलेले मोफत हवाई अपघात विमा कव्हर बंद करणार आहे. आतापर्यंत, एसबीआय, यूको बँक, सेंट्रल बँक, पीएसबी, करूर वैश्य बँक, अलाहाबाद बँक यांच्या सहकार्याने, काही एलीट आणि प्राइम कार्डवर १ कोटी किंवा ५० लाख रुपयांचे कव्हर देत असे.

एलपीजीच्या किमतीत बदल

व्यावसायिक सिलिंडरच्या किमतीत 60 ते 80रुकपात अपेक्षित आहे.

UPI नियमांमध्ये बदल (UPI Rule Change)

१ ऑगस्टपासून यूपीआयच्या नियमांत बदल केले जाणार आहे.

आता तुम्ही दिवसाला फक्त ५० वेळा बॅलेंस चेक करु शकतात.

मोबाईल नंबरवरुन लिंक असलेल्या बँक अकाउंटमध्ये दिवसाला फक्त २५ वेळा बॅलेंस चेक करु शकतात.

Autopay ट्रान्झॅक्शन आता फक्त ३ वेळेच्या स्लॉटमध्ये प्रोसेस होणार आहे. सकाळी १० वाजताच्या आधी, दुपारी १ ते ५ वाजेपर्यंत आणि रात्री ९.३० नंतर तुमचे Autopay ट्रान्झॅक्शन होणार आहे. तसेच फेल झालेल्या ट्रान्झॅक्शनचा स्टेट दिवसातून फक्त ३ वेळा चेक करु शकतात.

RBI गव्हर्नर :- संजय मल्होत्रा

कु. पायलकौर जाधव
कु. साक्षी ठाकूर

29/07/2025

सेन्सेक्स : 80,796
निफ्टी : 24,669
सोने : 9,150/9,948
चांदी : 116
पेट्रोल : 103
डिझेल : 90

या' कारणांनी कोसळतोय शेअर बाजार

देशांतर्गत शेअर बाजाराचे चित्र वाईट असल्याचे दिसून येत आहे. सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये घसरण सुरूच आहे.

शेअर बाजार घसरण्याचे कारण

अमेरिका-भारत व्यापार करार

भारत आणि अमेरिका अद्याप कोणताही व्यापार करार अंतिम करू शकलेले नाहीत. यासंदर्भात दोन्ही देशांकडून कोणतीही अधिकृत

 ISBN NO. 978-81-990957-8-6

माहिती आलेली नाही. तसेच, १ ऑगस्टच्या अंतिम मुदतीपर्यंत तो पूर्ण होण्याची आशा फारशी नाही. दोन्ही देशांमधील करारात अडथळा निर्माण होण्याचे कारण म्हणजे अमेरिकेने शेती, दुग्धजन्य पदार्थ आणि अनुवांशिकरित्या सुधारित उत्पादनांमध्ये प्रवेश मिळावा अशी मागणी. दोन्ही देशांमधील व्यापार अंतिम न झाल्यामुळे गुंतवणूकदारांच्या भावनांवर परिणाम झाला आहे यावर तज्ज्ञही सहमत आहेत.

परदेशी गुंतवणूकदारांकडून मोठ्या प्रमाणात विक्री

एफपीआय सातत्याने शेअर्सची विक्री करत आहेत. २५ जुलैपर्यंतच्या आकडेवारीनुसार, एफपीआयंनी ३०,५०९ कोटी रुपयांचे शेअर्स विकले आहेत. रोख रकमेच्या बाबतीत, गेल्या ५ व्यावसायिक दिवसांत एफपीआयंनी १३५५० कोटी रुपयांचे शेअर्स विकले आहेत.

कमकुवत तिमाही निकाल

कंपन्यांचे तिमाही निकाल अपेक्षेपेक्षा कमकुवत आले आहेत. कमकुवत तिमाही निकालांमुळे भारतीय शेअर बाजाराच्या मूल्यांकनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. येणाऱ्या काळात शेअर बाजारात मोठी घसरण दिसून येऊ शकते.

कोणत्याही वाढीचे कोणतेही कारण नाही

जागतिक तणाव आणि अमेरिका-भारत व्यापार करार अंतिम न झाल्याने, भारतीय बाजारपेठेला सध्या कोणतीही सकारात्मक बातमी मिळत नाही. त्यामुळे शेअर बाजारावर परिणाम झाला आहे. या सर्वांमध्ये, आशियाई विकास बँकेने आर्थिक वर्षासाठी भारताचा जीडीपी अंदाज ६.५ टक्के कमी केला आहे.

एप्रिलमध्ये बँकेने ६.७ टक्के विकास दराचा अंदाज वर्तवला होता. इंडियन रेटिंग्ज अँड रिसर्चनेही आर्थिक वर्ष २६ साठीचा विकास दर ६.६ टक्क्यांवरून ६.३ टक्क्यांपर्यंत कमी केला आहे.

कु. पायलकौर जाधव
कु. साक्षी ठाकूर

शेअर बाजाराची कमकुवत सुरुवात ; सेन्सेक्स, निफ्टी पुन्हा घसरले

भारतीय शेअर बाजाराची आज पुन्हा कमकुवत सुरुवात झाली. आज सकाळी व्यापार सत्रादरम्यान सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्ही बेंचमार्क निर्देशांक घसरले. बीएसईचा ३० शेअर्सचा सेन्सेक्स १०० अंकांनी घसरून ८०,७८० वर उघडला, तर एनएसईचा निफ्टी ५० निर्देशांकही ३५ अंकांनी घसरून २४,७०० च्या पातळीच्या खाली आला.

अमेरिकेसोबतच्या व्यापार करारात विलंब, परदेशी गुंतवणूकदारांची विक्री सुरूच, आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीतील कमकुवत निकाल आणि आशियाई बाजारातील मिश्र कल यामुळे शेअर बाजारावर दबाव निर्माण झाला. व्यापारादरम्यान, भारत इलेक्ट्रॉनिक्स, झोमॅटो (इटरनल), इन्फोसिस, अल्ट्राटेक सिमेंट, आयसीआयसीआय बँक, टीसीएस, टायटन, एचडीएफसी बँक आणि एशियन पेंट्सचे शेअर्स २ टक्क्यांपर्यंत घसरले, ज्यामुळे बेंचमार्कवरील दबाव वाढला.

सन फार्मा, रिलायन्स इंडस्ट्रीज, कोटक महिंद्रा बँक, टाटा मोटर्स, ट्रेंट, एचसीएल टेक, पॉवर ग्रिड आणि एचयूएलचे शेअर्स ०.५ टक्क्यांपर्यंत किरकोळ घसरले. निफ्टी मिडकॅप निर्देशांक ०.११% वाढला, तर स्मॉलकॅप निर्देशांक ०.३०% घसरला, जो व्यापक बाजारपेठेत संमिश्र कामगिरी दर्शवितो.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

क्षेत्रीय निर्देशांकाची कामगिरी Share Market Updates।

निफ्टी डिफेन्स १.६% घसरला. त्याच वेळी, आयटी ०.५७% घसरला आणि फायनान्शियल सर्व्हिसेस ०.१८% घसरला. त्याच वेळी, निफ्टी रिॲलिटी ०.६% आणि मेटल इंडेक्स ०.५% वाढला, ज्यामुळे बाजाराला आधार मिळाला.

कु. पायलकौर जाधव, कु. साक्षी ठाकूर

30 July 2025

Nifty- Price- 24855.5
Change- 33.95 % chg- 0.14
Sensex- Price - 81481.86
Change- 149.91 % chg- 0.18
Nifty Bank- Price- 56150.70
Change- -71.30 %chg - -0.13
Nifty IT- Price- 35481.40
Change- 108.45 % chg- 0.31
BSE SMALLCAP-
Price- 53881.48
Change- 91.36 % chg- 0. 17

सोन्याच्या किंमतीत मोठी उलथापालथ! 4 दिवसांच्या घसरणीनंतर दराबाबत सर्वात मोठी अपडेट, नवीन भाव काय?

बुधवार, 30 जुलै 2025 रोजी सोने आणि चांदीच्या किंमतीत मोठी वाढ नोंदवण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडी, अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या व्यापारी धोरणांवरील अपडेट्स आणि भारतीय रुपयाच्या अवमूल्यनामुळे सोन्याची चमक वाढली आहे.

आज सकाळच्या व्यवहारात सोन्याच्या किंमतीत 600 रुपयांची वाढ झाली, तर चांदी 1,15,900 रुपये प्रति किलोवर पोहोचली आहे. गुंतवणूकदारांचे लक्ष आता ट्रम्प यांनी ठरवलेल्या 1 ऑगस्टच्या टॅरिफ मुदतीकडे लागले आहे.

प्रमुख शहरांमधील सोने-चांदीचे दर

राष्ट्रीय राजधानी दिल्ली, जयपूर, अहमदाबाद आणि पाटण्यात 24 कॅरेट सोने 1,00,630 रुपये प्रति 10 ग्रॅम दराने उपलब्ध आहे. तर मुंबई, हैदराबाद, चेन्नई, बेंगलोर आणि कोलकाता येथे 24 कॅरेट सोने 1,00,480 रुपये प्रति 10 ग्रॅमवर व्यवहार करत आहे.

22 कॅरेट सोन्याचा विचार केला तर दिल्ली, जयपूर, अहमदाबाद आणि पाटण्यात 92,250 रुपये प्रति 10 ग्रॅम दर आहे, तर मुंबई, हैदराबाद, चेन्नई, बेंगलोर आणि कोलकाता येथे 92,100 रुपये प्रति 10 ग्रॅम दराने सोने उपलब्ध आहे. चांदीच्या किंमतीतही स्थिरता दिसून येत असून, ती 1,15,900 रुपये प्रति किलोवर कायम आहे.

सेन्सेक्स 257 अंकांच्या वाढीसह उघडला; आयटी आणि फार्मामध्ये तेजी, कोणत्या क्षेत्रात विक्री?

1.भारतीय बाजारात तेजी: IMF ने भारताच्या GDP ग्रोथचा अंदाज वाढवल्याने आणि कंपन्यांचे चांगले निकाल आल्याने बाजारात सकारात्मक वातावरण आहे.

2.देशांतर्गतगुंतवणूकदारांची खरेदी: परदेशी गुंतवणूकदारांनी विक्री केली असली तरी देशांतर्गत संस्थांनी मोठ्या प्रमाणावर खरेदी करत बाजाराला आधार दिला.

3.IPO आणि धोरणात्मक घडामोडी: NSDLसह अनेक कंपन्यांचे IPO खुले झाले असून RBI व SEBIकडून नियमांमध्ये महत्त्वाचे बदल अपेक्षित आहेत.

क्षेत्रीय निर्देशांकांबद्दल बोलायचे झाले तर, आज निफ्टीच्या आयटी, मीडिया, मेटल, फार्मा आणि

 ISBN NO. 978-81-990957-8-6

पीएसयू बँकांमध्ये खरेदी दिसून येत आहे. तर ऑटो, एफएमसीजी आणि खाजगी बँकांमध्ये विक्री झाली आहे.

कु. पायलकौर जाधव
कु. साक्षी ठाकूर

३१ जुलै २०२५

अमेरिकेनं भारतावर 25 टक्के टॅरिफ लावला

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावरील टॅरिफबाबत मोठे विधान केले आहे. त्यांनी म्हटले आहे की भारतावर २० ते २५ टक्के टॅरिफ लादला जाऊ शकतो.

अशा परिस्थितीत, जर हे टॅरिफ लागू केले तर भारतातील अनेक क्षेत्रांवर परिणाम होऊ शकतो. या टॅरिफमुळे कोणत्या गोष्टींवर किती कर लावला जाऊ शकतो ते आपण समजून घेऊया.

अमेरिकेनं भारतावर 25 टक्के टॅरिफ लावला आहे. येत्या एक ऑगस्टपासून या नव्या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे,

ट्रम्प का वाढवत आहेत टॅरिफ?

राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या अर्थशास्त्रीय धोरणाच्या केंद्रस्थानी टॅरिफ आहे. अमेरिकेतल्या आयात आणि निर्यातीतली त्रुटी कमी करून देशात व्यापार संतुलन आणणं हे त्यांचं उद्दिष्ट आहे.

2024 मध्ये अमेरिकेत सुमारे 900 अब्ज अमेरिकी डॉलर्स व्यापार तूट (म्हणजे निर्यातीपेक्षा आयात जास्त असणं) दिसून आली.

ट्रम्प का वाढवत आहेत टॅरिफ?

राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या अर्थशास्त्रीय धोरणाच्या केंद्रस्थानी टॅरिफ आहे. अमेरिकेतल्या आयात आणि निर्यातीतली त्रुटी कमी करून देशात व्यापार संतुलन आणणं हे त्यांचं उद्दिष्ट आहे.

2024 मध्ये अमेरिकेत सुमारे 900 अब्ज अमेरिकी डॉलर्स व्यापार तूट (म्हणजे निर्यातीपेक्षा आयात जास्त असणं) दिसून आली.

कापड उद्योगावर परिणाम

कापड उद्योग हा भारताच्या प्रमुख निर्यातींपैकी एक आहे. अमेरिका हा भारतातून कापड आणि पादत्राणे आयात करणारा सर्वात मोठा देश आहे. २० ते २५ टक्के शुल्क लादल्यामुळे, ही उत्पादने अमेरिकन बाजारपेठेत महाग होऊ शकतात, ज्यामुळे भारताच्या शिपमेंट आणि व्यवसायावर परिणाम होऊ शकतो.

दागिने आणि हिऱ्यांच्या किमती वाढू शकतात

भारत हा जगातील सर्वात मोठ्या हिऱ्यांच्या निर्यातदारांपैकी एक आहे आणि अमेरिका भारतातून मोठ्या प्रमाणात हिऱ्यांची आयात करते. शुल्क लादल्याने दागिने आणि हिऱ्यांच्या किमती वाढू शकतात, ज्यामुळे भारतातील मागणीवर परिणाम होऊ शकतो, कारण अमेरिकन खरेदीदार भारताव्यतिरिक्त इतर पर्याय शोधू शकतात. यावर २६ ते २७ टक्के शुल्क लागू केले जाऊ शकते.

ऑटोमोबाईल्स आणि ऑटो पार्ट्सवर परिणाम

भारत अमेरिकेत मोठ्या प्रमाणात ऑटो उत्पादने निर्यात करत आहे. स्टील आणि ॲल्युमिनियमवर आधीच २५ टक्के कर आहे आणि आता जर ऑटो क्षेत्रावर आणखी २५ टक्के कर लादला गेला तर भारतीय मागणीवर परिणाम होऊ शकतो. या उत्पादनांवर २७ टक्क्यांपर्यंत कर लागू शकतो.

मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक्ससाठी इतकी मोठी बाजारपेठ असलेला भारत दरवर्षी अमेरिकेला १४ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त किमतीचे मोबाईल, टेलिकॉम उत्पादने आणि इलेक्ट्रॉनिक्स निर्यात

ISBN NO. 978-81-990957-8-6

करतो. टॅरिफमुळे या उत्पादनांच्या किमती वाढू शकतात, ज्यामुळे अब्जावधी डॉलर्सची निर्यात कमी होऊ शकते. तसेच, अमेरिकेचा इतर देशांसोबतचा व्यापार भारतापेक्षा जास्त वाढू शकतो. याशिवाय, रासायनिक क्षेत्रावरही याचा परिणाम होऊ शकतो.

या क्षेत्रांना टॅरिफमधून सूट देण्यात आली

जर टॅरिफ लागू झाला तर भारतातील काही क्षेत्रे आहेत जी अमेरिका टॅरिफपासून दूर ठेवेल. यामध्ये औषधनिर्माण, सेमीकंडक्टर, ऊर्जा उत्पादने (तेल, वायू, कोळसा, एलएनजी) आणि तांबे इत्यादींचा समावेश आहे. कारण या गोष्टी अमेरिकेसाठी खूप महत्त्वाच्या आहेत, ज्यामुळे ते त्यांच्यावर कधीही टॅरिफ लादू इच्छित नाही.

भारताचे किती नुकसान होऊ शकते?

जर अमेरिकेने त्यांचे टॅरिफ धोरण लागू केले, तर तज्ञांच्या अंदाजानुसार, टॅरिफमुळे भारताची वार्षिक निर्यात २ ते ७ अब्ज डॉलर्सने कमी होऊ शकते. २०२३-२४ मध्ये भारताने अमेरिकेला ७७.५२ अब्ज डॉलर्सच्या वस्तू निर्यात केल्या, जे भारताच्या एकूण निर्यातीच्या १८ टक्के आहे.

भारत आणि अमेरिका यांच्यात सध्या व्यापार कराराबाबत चर्चा सुरू आहे. अमेरिकेचे पथक सहाव्या फेरीसाठी भारतात येत आहे. या चर्चेत भारत किमान शुल्क ठेवण्याबाबत चर्चा करेल. तसेच, अमेरिकेत भारतीय व्यवसायाला प्रोत्साहन देण्याबाबत चर्चा होईल. याशिवाय, अमेरिका भारताला अमेरिकेसाठी त्यांचे कृषी आणि दुग्धजन्य बाजार खुले करण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न करेल.

कु. पायलकौर जाधव
कु. साक्षी ठाकूर

Trumps Tariff Bomb: ट्रम्प 'टॅरिफ'मुळे भारताच्या टेक्सटाईल्स, फार्मासह 'या' ५ उद्योगांना बसणार फटका, पाहा संपूर्ण लिस्ट

Donald Trump: अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १ ऑगस्टपासून भारतीय वस्तूंवर २५ टक्के अतिरिक्त शुल्क (टॅरिफ) आणि दुय्यम निर्बंध लावण्याची घोषणा केली आहे. यामुळे भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स, फार्मास्युटिकल्स (औषध निर्माण) आणि वस्त्रोद्योग (टेक्सटाईल्स) यांसारख्या प्रमुख निर्यात क्षेत्रांना मोठा फटका बसणार आहे.

ट्रम्प यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, "भारत आपला मित्र असला तरी, अनेक वर्षांपासून आपण त्यांच्यासोबत फार कमी व्यापार करत आहोत, कारण त्यांचे शुल्क (टॅरिफ) खूप जास्त आहेत, जगात सर्वाधिक आहेत. तसेच त्यांच्याकडे इतर कोणत्याही देशांपेक्षा सर्वात कठोर आणि त्रासदायक व्यापारी अडथळे आहेत." त्यांनी भारताचे रशियाशी असलेले संबंधही आपल्या निर्णयाचे कारण म्हणून सांगितले. अमेरिकेने वारंवार भारत-अमेरिका व्यापार तुटीचा मुद्दा उचलला आहे.

भारताला होत असलेला नफा कमी करण्याचे प्रयत्न

आर्थिक वर्ष २०२५ मध्ये भारताचा अमेरिकेशी असलेला व्यापार वाढीव नफा ४१.१८ अब्ज डॉलर होता. त्यामुळे अमेरिकेसाठी हे शुल्क लावणे महत्त्वाचे आहे. गेल्या आर्थिक वर्षात, अमेरिकेला भारताची निर्यात ११.६ टक्क्यांनी वाढून ८६.५ अब्ज डॉलर झाली, तर आयात ७.४ टक्क्यांनी वाढून ४५.३ अब्ज डॉलर झाली. यामुळे ४१ अब्ज डॉलरचा मोठा व्यापार वाढीव नफा झाला. हा

वाढता व्यापार वाढीव नफा ट्रम्प यांना कमी करायचा आहे आणि या शुल्कामुळे तो कमी होण्याची शक्यता आहे.

एलारा कॅपिटलच्या अर्थशास्त्रज्ञ आणि कार्यकारी उपाध्यक्ष, गरिमा कपूर म्हणाल्या, "२५ टक्के शुल्क दर हा नक्कीच नकारात्मक बदल आहे, कारण व्हिएतनाम, इंडोनेशिया आणि फिलिपाइन्स यांसारख्या प्रतिस्पर्धी देशांवर कमी दर आहेत. हे देश भारताशी सेवा-आधारित उत्पादने आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये स्पर्धा करतात."

अमेरिकेत भारताच्या निर्यातीत आघाडीवर असलेल्या पाच प्रमुख वस्तू

१. स्मार्टफोन:

एका अहवालानुसार, भारताने २०२५ च्या दुसऱ्या तिमाहीपर्यंत अमेरिकेला स्मार्टफोन पुरवण्यात चीनला मागे टाकले आहे. अमेरिकेला होणाऱ्या स्मार्टफोन शिपमेंटमध्ये भारताचा वाटा ४४ टक्के आहे. 'मेड-इन-इंडिया' स्मार्टफोन त्यांच्या परवडणाऱ्या किमती आणि वैशिष्ट्यांमुळे अमेरिकेत लोकप्रिय झाले आहेत. केवळ भारतीय कंपन्याच नव्हे, तर भारतीय उत्पादन केंद्रांमधून काम करणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्याही या वाढीला हातभार लावत आहेत. भारताची मजुरी, तंत्रज्ञानाचा अवलंब आणि 'मेक-इन-इंडिया' धोरणाला मिळत असलेले आर्थिक प्रोत्साहन यामुळे हे शक्य झाले आहे. जानेवारी २०२५ मध्ये या क्षेत्रातून ३ अब्ज डॉलरपेक्षा जास्त किमतीची निर्यात झाली.

२. पेट्रोलियम उत्पादने:

आशियातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे रिफायनिंग केंद्र असल्याने, भारत मोठ्या प्रमाणात पेट्रोलियम उत्पादने - जसे की पेट्रोल, डिझेल, जेट इंधन, गॅसोलीन आणि एलपीजी - अमेरिकेला निर्यात करतो. उच्च-गुणवत्तेची प्रक्रिया आणि स्पर्धात्मक किंमतींमुळे भारतीय रिफायनर्स अमेरिकेच्या ऊर्जा पुरवठ्यासाठी महत्त्वाचे बनले आहेत. २०२४ मध्ये रिफाइंड पेट्रोलियम उत्पादनांच्या निर्यातीचे मूल्य २० अब्ज डॉलरपेक्षा जास्त होते.

३. रत्न आणि दागिने: अमेरिका भारतीय रत्न आणि दागिन्यांचा, विशेषतः

हिरे आणि सोन्याचा सर्वात मोठा आयातदार आहे. भारत कच्ची रत्ने आणि कलाकुसर केलेले दागिने दोन्ही निर्यात करतो. गेल्या वर्षी या क्षेत्राने ८.५ अब्ज डॉलरपेक्षा जास्त योगदान दिले.

४. फार्मास्युटिकल्स (औषधे):

भारतीय फार्मास्युटिकल क्षेत्र हे जगभरातील परवडणाऱ्या औषधांचा कणा आहे. अमेरिका जेनेरिक औषधे, लसी आणि सक्रिय घटकांचा सर्वात मोठा आयातदार आहे, जे तेथील लाखो नागरिकांसाठी आरोग्य सेवा खर्च कमी करण्यास मदत करतात. प्रमुख भारतीय फार्मा कंपन्या अमेरिकेला एफडीए-मान्यताप्राप्त औषधे पुरवतात. २०२५ मध्ये या क्षेत्रातील निर्यात ७.५ अब्ज डॉलरपेक्षा जास्त झाली.

५. टेक्सटाईल्स (वस्त्रोद्योग) आणि वस्त्रे:

हातमागावरील रेशमापासून ते औद्योगिकरित्या उत्पादित सुती कपड्यांपर्यंत, भारतीय वस्त्रोद्योग आणि कपडे भारताच्या अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीत मोठे योगदान देतात. २०२५ मध्ये अमेरिकेला भारतीय वस्त्रोद्योग आणि कपड्यांची निर्यात २.५ अब्ज डॉलरपेक्षा जास्त झाली.

अमेरिकेच्या या शुल्क घोषणेमुळे भारताकडून नवीन व्यापार वाटाघाटी किंवा नवीन शुल्क धोरण लागू होण्याची शक्यता आहे. १ ऑगस्टपासून हे शुल्क लागू होण्यापूर्वी, अमेरिकेकडून भारतीय

 ISBN NO. 978-81-990957-8-6

वस्तूंवर आकारले जाणारे शुल्क दर सामान्यतः खूप कमी होते आणि अनेक उत्पादनांसाठी ते बहुतेक ३ टक्क्यांपेक्षा कमी होते. गरिमा कपूर म्हणाल्या, "जर सप्टेंबर-ऑक्टोबरपर्यंत कोणताही करार झाला नाही, तर भारताच्या संपूर्ण वर्षाच्या जीडीपी वाढीच्या अंदाजात २० बेसिस पॉईंट्सची घट होऊ शकते." यापुढे, दिल्लीकडून उचलल्या जाणाऱ्या पुढील पावलांवर उद्योग जगताचं बारकाईने लक्ष असणार आहे.

कु. पायलकौर जाधव
कु. साक्षी ठाकूर

टीसीएसकडून पुढील वर्षभरात 12,000 कर्मचाऱ्यांची घट; AI मुळे मध्यम व वरिष्ठ पदावरील कर्मचाऱ्यांना फटका

TCS layoffs: देशातील आघाडीची IT सेवा कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS) येत्या काळात मोठ्या प्रमाणात कर्मचारी कपात करणार आहे. कंपनीचे CEO के. कृथिवासन यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, येत्या एका वर्षात कंपनीमध्ये मिड आणि सीनियर लेव्हलवर कार्यरत सुमारे 12,000 कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या कमी केल्या जाणार आहेत.

ही कपात TCSच्या एकूण कर्मचारी संख्येच्या सुमारे 2 टक्के इतकी असणार आहे.

AI मुळे नोकऱ्यांमध्ये घट का होत आहे?

TCS कडून घेतलेली ही मोठी निर्णयप्रक्रिया तंत्रज्ञानातील झपाट्याने होणारे बदल आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) वाढत्या प्रभावामुळे आहे. कंपनी भविष्यातील गरजांसाठी अधिक सुसज्ज आणि लवचिक बनण्याचा प्रयत्न करत आहे. CEO के. कृथिवासन यांनी यावर भाष्य करताना सांगितले की, "नव्या तंत्रज्ञानाचा अवलंब आणि कार्यपद्धतींमध्ये होत असलेले बदल" यामुळे कंपनी AI चा अधिक व्यापक वापर करत आहे.

तथापि, CEO कृथिवासन यांनी AI ला थेट जबाबदार ठरवलेले नाही. त्यांनी याला "भविष्यातील आवश्यक कौशल्यांची कंपनीला असलेली गरज" असे म्हटले आहे. मात्र, तज्ज्ञांचे मत आहे की AI आणि ऑटोमेशनमुळे पुनरावृत्तीची कामं कमी होत चालली आहेत, तसेच अनेक वरिष्ठ कर्मचारी नव्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्यात अयशस्वी ठरत असल्यामुळेच नोकऱ्यांमध्ये कपात होत आहे.

कोणत्या पदांवर होणार परिणाम?

पैकी 2 टक्के कपात म्हणजे सुमारे 12,200 TCS चे CEO यांनी स्पष्ट केलं आहे की यंदा होणारी कर्मचारी कपात मुख्यतः मध्यम स्तरावरील आणि वरिष्ठ व्यवस्थापनाच्या पदांवर होणार आहे. जून 2025 पर्यंत TCS मध्ये एकूण 6,13,000 कर्मचारी कार्यरत होते. या कर्मचाऱ्यांवर परिणाम होणार असून, हा कंपनीसाठी लक्षणीय बदल मानला जात आहे.

कर्मचारी व्यवस्थापन आणि कंपनीचे नवे धोरण

TCS कंपनीने प्रभावित कर्मचाऱ्यांसाठी काही महत्वाच्या सुविधा देण्याची हमी दिली आहे. यामध्ये नोटीस कालावधीतील वेतन, विस्तारित आरोग्य विमा योजना आणि नवीन नोकरी शोधण्यासाठी मदतीचा (आउटप्लेसमेंट) पाठिंबा यांचा समावेश आहे.

कंपनीने "बेंच मॅनेजमेंट" प्रक्रियेतही सुधारणा केल्या आहेत. सध्या प्रोजेक्टशिवाय असलेल्या कर्मचाऱ्यांना सकारात्मक दृष्टिकोनातून मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देऊन त्यांना नवीन प्रोजेक्ट्स मिळवून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. CEO

 ISBN NO. 978-81-990957-8-6

कृथिवासन यांचे मत आहे की या उपाययोजनांमुळे कर्मचारी अधिक सक्रिय, कार्यक्षम आणि गुंतवणूक झाल्यासारखे वाटतील.

कंपनीच्या एकूण वाढीचा आढावा

एप्रिल ते जून 2025 या ताज्या तिमाहीत TCS ने 6,071 नवीन कर्मचाऱ्यांची भरती केली असून, एकूण कर्मचारी संख्येत 5,090 ने वाढ झाली आहे. अशा स्थितीत प्रस्तावित नोकरकपात ही कंपनीच्या विस्तार धोरणातील एक महत्त्वपूर्ण वळण मानली जात आहे.

TCS सारख्या आघाडीच्या IT कंपनीत AI आणि तांत्रिक प्रगतीमुळे मिड व सीनियर स्तरावरील कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्यांवर मोठा परिणाम होणार आहे.

कंपनीच्या भविष्यातील तांत्रिक गरजा आणि आवश्यक कौशल्यांनुसार ही निर्णयप्रक्रिया झाल्याचे CEO यांनी स्पष्ट केले आहे. मात्र, या घडामोडींमुळे संपूर्ण उद्योग क्षेत्रात घडत असलेले बदल आणि त्याचा कर्मचाऱ्यांवर होणारा परिणाम अधिक स्पष्टपणे समोर ये

कु. कार्तिका पगडाला
कु. गजानन राजरवाड

---

10 ते 15% टॅरिफची चर्चा झालेली, देशहितासाठी...; US टॅरिफवर सरकारनं संसदेत काय सांगितलं?

नवी दिल्ली: लोकसभेत बोलताना केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लावलेल्या 25% आयात शुल्क (टॅरिफ) संदर्भात सविस्तर माहिती दिली.

भारत सरकार या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे आणि देशांतर्गत उद्योगांचे हित जपण्यासाठी सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असे त्यांनी सांगितले. दोन्ही देशांमध्ये द्विपक्षीय चर्चा चालू असून, भारताच्या हिताचे रक्षण करण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे.

पीयूष गोयल म्हणाले की, दोन्ही देशांत 4 बैठका झाल्या. कराराला अंतिम रूप देण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण बैठका झाल्या. आयातीवर 10 ते 15 टक्के शुल्क लावण्याची चर्चा होती. द्विपक्षीय व्यापार करारावर बोलणी झाली. अनेक व्हर्चुअल मीटिंगही झाल्या. "आम्ही आमच्या देशांतर्गत उद्योगांचे संरक्षण करू. देशहितासाठी आवश्यक ती प्रत्येक गोष्ट करू," असे गोयल यांनी स्पष्ट केले.ते पुढे म्हणाले की, जागतिक विकासात भारताचे योगदान 16 टक्के आहे आणि भारत जगातील पाच मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. अमेरिकेच्या या निर्णयामुळे होणाऱ्या परिणामांचे मूल्यांकन केले जात आहे.

2047 पर्यंत विकसित देश

आज भारत जगातील 5वी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे आणि 2047 पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याचे ध्येय ठेवले आहे, असे त्यांनी सांगितले. "सरकार उद्योजकांशी बोलत आहे. आम्ही देशाला सुरक्षित ठेवण्यासाठी सर्व पाऊले उचलणार आहोत. काही वर्षांतच आम्ही जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनू. आमच्या निर्यातीत वाढ झाली आहे. आम्ही शेतकऱ्यांसाठी काम करत आहोत. सरकारला विश्वास आहे की आम्ही 2047 पर्यंत विकसित देश बनू," असेही गोयल यांनी नमूद केले.

त्यांनी संसदेत सांगितले की, भारत आजही जागतिक अर्थव्यवस्थेचा 'ब्राइट स्पॉट' आहे. सरकार

 ISBN NO. 978-81-990957-8-6

शेतकरी, एमएसएमई आणि उद्योजकांच्या हितांचे पूर्णपणे रक्षण करेल. "आम्ही प्रत्येक आवश्यक पाऊल उचलू जेणेकरून देशाच्या व्यापारी हितांना कोणतेही नुकसान होणार नाही. भारताने यूएई आणि ऑस्ट्रेलियासोबत मुक्त व्यापार करार केले आहेत, ज्यामुळे निर्यातीला नवी गती मिळाली आहे. भारत जागतिक व्यापारात मजबूतपणे उभा राहील आणि सरकार देशहितासाठी प्रत्येक आव्हानाचा सामना करेल," असेही त्यांनी आश्वस्त केले.

सरकार प्रतिसाद देणार नाही

सरकारी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भारत अमेरिकेच्या या 25% टॅरिफला सध्या तरी कोणताही प्रतिसाद देणार नाही. सरकार या निर्णयाने विचलित झालेले नाही. यावर जी काही प्रतिक्रिया असेल ती शांतपणे, रणनीतीनुसार आणि केवळ चर्चेतूनच दिली जाईल, असेही सूत्रांनी सांगितले.

कु. कार्तिका पगडाला
कु. गजानन राजरवाड

करदात्यांसाठी आनंदाची बातमी! आता आयटीआरचा परतावा काही तासांत येणार

- आर्थिक वर्ष 2024-25 साठी आयटीआर भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.
- आयटीआर-२ आणि आयटीआर-३ फॉर्म आता पोर्टलवर उपलब्ध आहेत.
- १५ सप्टेंबर २०२५ ही अंतिम तारीख असून उशिरा भरल्यास दंड आकारला जाऊ शकतो.

या आर्थिक वर्षासाठी इनकम टॅक्स रिटर्न भरण्याची प्रक्रिया सुरू झालीय. ता वेबसाइटवर आयटीआर-२ आणि आयटीआर-३ फॉर्म देखील सक्रिय झाले आहेत. यामुळेच आता मोठ्या संख्येने लोक त्यांचे आयटीआर दाखल करत आहेत. जर तुम्ही आयटीआर भरला नसले तर १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत आयटीआर दाखल करा, नाहीतर आयटीआर उशिरा दाखल केल्यास दंड होऊ शकतो आणि परतावा देखील उशिराने मिळेल.

यावेळी विशेष म्हणजे आयकर विभाग खूप वेगाने परतावा पाठवत आहे. आधी परतावा येण्यासाठी २० दिवस ते ३-४ महिने लागायचे, आता अनेक प्रकरणांमध्ये परतावा फक्त २४ तासांत किंवा ५ ते १० दिवसांत येत आहे. जर तुम्ही अजून रिटर्न दाखल केले नसेल तर १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत आयटीआर दाखल करू शकतात. पण जर उशिरा आयटीआर दाखल कराल दंड होऊ शकतो. याशिवाय परतावा मिळण्यासही उशिर होऊ शकतो.

आयटीआर कसा दाखल करायचा?

incometax.gov.in](https://incometax.gov.in) या वेबसाइटला भेट द्या.

पॅन टाकून लॉगिन करा

"ई-फाइल" टॅबवर जा आणि "इन्कम टॅक्स रिटर्न" फॉर्म निवडा

करार वर्ष (२०२४-२५) निवडा.

तुमची श्रेणी निवडा (व्यक्ती/HUF/इतर)

ITR-1, ITR-2, ITR-3 किंवा ITR-4 फॉर्म निवडा.

सर्व तपशील भरा आणि शेवटी ई-व्हेरिफाय करा.

आयटीआर दाखल केल्यानंतर ३० दिवसांच्या आत ई-व्हेरिफाय करा, अन्यथा तुम्हाला परतावा मिळणार नाही.

कोणते कागदपत्र लागतात?

 ISBN NO. 978-81-990957-8-6

पॅन आणि आधार कार्ड

बँक स्टेटमेंट

फॉर्म १६ (जर पगारदार असेल तर)

देणगी पावत्या (जर कर सवलत मिळवायची असेल तर)

स्टॉक ट्रेडिंग स्टेटमेंट (जर गुंतवणूक केली असेल तर)

पॅन लिंक्ड बँक खाते.

कु. कार्तिका पगडाला
कु. गजानन राजरवाड

सोने खरेदी करणाऱ्यांना गुड न्यूज सोने-चांदीच्या दरात मोठी घसरण, सोन्याचे दर 603 तर चांदीचे दर 1655 रुपयांनी घसरले...

Gold Silver Price 31 July: सोने आणि चांदीच्या दरात आज घसरण झाली आहे. सर्राफा बाजारात सोन्याचे दर 603 रुपयांनी घसरले तर चांदीच्या दरात 1655 रुपयांची घसरण झाली. सोन्याचे एका तोळ्याचे दर 98414 रुपयांवर पोहोचले तर चांदीचे दर 1655 रुपयांनी घसरुन 111745 रुपयांवर पोहोचले आहेत.

जीएसटीसह सर्राफा बाजारात 24 कॅरेट एक तोळे सोन्याचा दर 101366 रुपये झाला आहे. तर चांदीचा दर 115097 रुपये किलो इतका आहे. बुधवारी सोन्याचे दर 99017 रुपये होते तर चांदीचा एक किलोचा दर 113400 रुपये इतका होता.

सोन्याचे दर 100533 रुपयांवरुन उच्चांकावरुन घसरुण 98414 रुपयांवर पोहोचले आहेत. सोन्याचे दर या कालावधीत 2119 रुपयांनी कमी झाले आहेत. चांदीचे दर 4105 रुपयांनी कमी झाले आहेत. 23 जुलै रोजी चांदीचे दर 115850 रुपयांच्या उच्चांकावर होते.

आज 23 कॅरेट सोनं देखील 600 रुपये सस्त होत 98020 रुपयांवर आलं आहे. जीएसटीसह एक तोळा सोन्याची किंमत 100960 रुपये झाली आहे. हे दर मेकिंग चार्जेस शिवाय आहेत. 22 कॅरेट सोन्याच्या दरात 553 रुपयांची घसरण झाली असून ते 90147 एक तोळा झाले आहेत. जीएसटीसह दर 92851 रुपये आहे. आज 18 कॅरेट सोन्याची किंमत 452 रुपयांनी कमी होत 73811 रुपयांवर आली आहे. जीएसटीसह हा दर 76025 रुपये आहे. 14 कॅरेट सोने जीएसटीसह 59319 रुपयांवर पोहोचलं आहे.

सोन्याचे दर जुलै महिन्यात 2528 रुपये प्रति तोळा वाढले आहेत. तर, चांदीच्यादरात 7890 रुपयांची वाढ झाली आहे. आयबीजेएच्या रेटनुसार 30 जूनला सोन्याचे एका तोळ्याचे दर 95886 रुपये होते. तर, चांदीचे एक किलोचे दर 105510 रुपये होते. इंडिया बुलियन ज्वेलर्स असोसिएशनकडून सोने आणि चांदीचे दर जाहीर केले जातात. एका दिवसात सोने आणि चांदीचे दर दोन वेळा जाहीर केले जातात.

डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून विविध देशांवर टॅरिफ लादलं जात आहे. ट्रम्प यांच्या आर्थिक धोरणांमुळं जागतिक बाजारात अस्थिरतचे वातावरण निर्माण झालं होतं. त्यामुळं गुंतवणूकदारांनी सुरक्षित पर्याय म्हणून सोन्यातील गुंतवणुकीवर भर दिला. सर्राफा बाजारात सोन्याचे दर 22674 रुपयांनी वाढले आहेत. तर, चांदीचे दर 25728 रुपयांची वाढ झाली आहे. 31 डिसेंबर 2024 ला सोन्याचे दर 75740 रुपये एक तोळा होता. तर, चांदीचे दर 86017 रुपये एक किलो होते. जागतिक अस्थिरतेच्या वातावरणामुळं

 ISBN NO. 978-81-990957-8-6

गुंतवणूकदार सुरक्षित पर्याय म्हणून सोन्यात गुंतवणूक करत आहेत.

कु. कार्तिका पगडाला
कु. गजानन राजरवाड

अमेरिका ने सहा भारतीय तेल खरेदीदार कंपन्यांवर निर्बंध लादले आहेत

भारतीय कंपन्यांवर जाणूनबुजून इराणी पेट्रोलियम उत्पादनांची खरेदी आणि व्यापारासाठी व्यवहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. अमेरिकेने इराणवर निर्बंध लादले होते, त्याचे या कंपन्यांनी उल्लंघन केल्याचा आरोप करण्यात आला आहे. अल्केमिकल सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड, ग्लोबल इंडस्ट्रियल केमिकल्स लिमिटेड, ज्युपिटर डाई केम प्रायव्हेट लिमिटेड, रमणिकलाल एस गोसालिया अँड कंपनी, पर्सिस्टंट पेट्रोकेम प्रायव्हेट लिमिटेड आणि कांचन पॉलिमर्स या कंपन्यांवर निर्बंध लादण्यात आले आहेत.

या कारवाईमध्ये या कंपन्यांची अमेरिकेतील किंवा अमेरिकन व्यक्तींच्या नियंत्रणाखाली असलेली सर्व मालमत्ता गोठवण्यात आली आहे. तसेच अमेरिकन व्यक्ती आणि कंपन्यांना मंजूर कंपन्यांसोबत व्यवसाय करण्यास मनाई करण्यात आली आहे. भारताचे इराणसोबत मजबूत व्यापारी संबंध आहेत. तरीदेखील भारताने अमेरिकेला घाबरून २०१९ नंतर इराणकडून तेल खरेदी करणे कमी केले आहे. या निर्बंध लादलेल्या कंपन्यांनी २०२४ मध्ये मोठ्या प्रमाणावर पेट्रोलिअम उत्पादने, मिथेनॉल खरेदी केली होती. यात अल्केमिकल ही कंपनी आघाडीवर होती.

अमेरिका तब्बल 350 टक्के टॅरिफ आकारतो

रशियाकडून तेल खरेदी आणि डिफेन्स एक्सपोर्टमुळे (India Russia Trade) दंड आकारण्यात येणार आहे. भारत जगात सर्वाधिक टॅरिफ आकारतो असे वक्तव्य डोनाल्ड ट्रम्प यांनी (Tariff War) या निर्णयाची माहिती देताना केले होते. परंतु, त्यांचं वक्तव्य काही खरं नाही. बहुदा त्यांच्याकडे माहिती कमी असावी. जागतिक व्यापार संघटनेच्या (WTO) एका रिपोर्टमध्ये वेगळीच माहिती आहे.

बिजनेस टुडेमध्ये व्यापार संघटनेचा (World Trade Organization) एक रिपोर्ट प्रसिद्ध करण्यात आला आहे. या रिपोर्टनुसार अमेरिका काही खास वस्तूंच्या आयातीवर सर्वाधिक टॅरिफ वसूल करतो. अमेरिकेच्या या टॅक्सच्या तुलनेत जगातील दुसरा कोणताही देश (India US Trade) पुढे नाही. यामध्ये डेअरी प्रॉडक्ट्स, तंबाखू आणि खाद्यपदार्थांचा समावेश आहे. देशांतर्गत व्यापाराचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने अमेरिका सरकार हा कर अन्य देशांकडून वसूल करतो. दुसरीकडे भारत सरासरी 17 टक्के टॅरिफ आकारतो. ट्रम्प यांनी केलेल्या आरोपाच्या तुलनेत हा टॅक्स खूप कमी आहे.

अमेरिका तब्बल 350 टक्के टॅरिफ आकारतो

जागतिक व्यापार संघटनेच्या रिपोर्टनुसार अमेरिका तंबाखूवर 350 टक्के, डेअरी प्रॉडक्टसवर 200 टक्के आणि फळे, भाजीपाला, धान्य या वस्तूंवर 130 टक्क्यांपेक्षा जास्त टॅरिफ आकारतो. तर भारत सरकार व्हिस्की आणि वाईनवर 150 टक्के तसेच काही ऑटोमोबाइल पार्ट्सवर 125 टक्के टॅरिफ आकारते. जपानचा विचार केला तर जपान सरकार तांदळावर तब्बल 400 टक्के टॅरिफ आकारते तर कोरिया काही वस्तूंवर 887 टक्के टॅरिफ आकारतो. भारतावर आरोप करताना ही

 ISBN NO. 978-81-990957-8-6

आकडेवारी ट्रम्प यांच्या लक्षात आली नसावी किंवा त्यांनी याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले असावे.

आकडेवारीत मोठी तफावत

व्यापाराच्या आकडेवारीत काही तफावत दिसून येते. सन 2024 मध्ये अमेरिकेने भारताकडून 87.4 अब्ज डॉलर्सची आयात केली अशी माहिती दिली होती. पण भारताने मात्र 80.7 अब्ज डॉलर्सच्या वस्तूंचीच आयात केली होती. म्हणजेच दोन्ही देशांच्या आकडेवारीत 6.7 अब्ज डॉलर्सची तफावत दिसून येते. याआधी 2023 मध्ये 8 अब्ज डॉलर्सची तफावत दिसून आली होती.

भारताचे वाणिज्य आणि महसूल विभाग या विसंगती दूर करण्यासाठी काम करत आहेत. इकॉनॉमिक टाइम्सच्या एका रिपोर्टमध्ये एका अधिकाऱ्याने सांगितले की जागतिक डेटाबेस भारताने दिलेल्या टॅरिफच्या आकडेवारीवर अवलंबून असतात. तर अमेरिकेचे आकडेवारी साधारणपणे जागतिक व्यापार संघटनेकडून घेतली जाते. त्यामुळे दोन्ही देशांतील व्यापारबाबत वेगवेगळी माहिती समोर आली आहे.

महत्त्वाचे म्हणजे, पाकिस्तान लवकरच भारताला पेट्रोल-डिझेल, इंधनाचा पुरवठा करू शकतो, असा दावाचं त्यांनी यावेळी केला.(Donald Trump)

(Tariff च्या मुद्द्यावरून सत्ताधारी-विरोधकांमध्ये जुंपली; सरकारने काय दिले उत्तर?)

दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प(Donald Trump) यांनी पुन्हा एकदा भारताला डिवचले असून त्यांना आता पाकिस्तानचा पुळका आल्याचे पाहायला मिळत आहे. महत्त्वाचे म्हणजे, भारताने मागील तीन वर्षांपासून रशियाकडून तेल खरेदी केल्याने आता डोनाल्ड ट्रम्प पाकिस्तानला जवळ करून खोडसाळपणा करत असल्याचे दिसून येत आहे.(Donald Trump)

(CPEC : ऑपरेशन सिंदूरमध्ये चीनी मिसाईल्सने दगा दिला तरी पाकिस्तानने घेतली मोठी जोखीम)

आम्ही आताच पाकिस्तानसोबतचा व्यापारी करार पूर्ण केला. त्यानुसार, पाकिस्तान व संयुक्त अमेरिका हे दोन्ही देश मोठ्या प्रमाणात तेलसाठ्यांचा शोध आणि त्याचे उत्पादन करु, असे ट्रम्प(Donald Trump) यांनी म्हटले. दोन्ही देशांनी एक कंपनी या सर्व प्रक्रियेसाठी निश्चित केली आहे. कुणाला माहिती काही दिवसांनी ही कंपनी भारताला सुद्धा इंधन विक्री करेल, असा दावा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला.

कु. कार्तिका पगडाला
कु. गजानन राजरवाड

1/08/2025

सेन्सेक्स=80,599
निफ्टी =24,565
सोने = 9,150/9,982
चांदी =113

महिन्याच्या पहिल्याच दिवशी सरकारच्या तिजोरीत विक्रमी वाढ

१ ऑगस्ट रोजी जुलैमधील जीएसटी संकलनाचे आकडे समोर आले आहेत. गेल्या महिन्यात सरकारला १.९६ लाख कोटी रुपये मिळाले. जे गेल्या वर्षीच्या याच महिन्यापेक्षा ७.५% जास्त आहे. जून २०२५ मध्ये जीएसटी संकलन १,८४,५९७ कोटी रुपये होते.

जर आपण गेल्या आर्थिक वर्ष २०२४-२५ बद्दल बोललो तर एकूण जीएसटी संकलन २२.०८

 ISBN NO. 978-81-990957-8-6

लाख कोटी रुपये इतके विक्रमी होते. एप्रिल २०२५ मध्ये, जीएसटी संकलन २.३७ लाख कोटी रुपये होते, जे वार्षिक आधारावर १२.६ टक्के जास्त होते. हा सलग सातवा महिना आहे जेव्हा जीएसटी संकलन १.८ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाले आहे. एप्रिल ते जुलै या कालावधीत एकूण जीएसटी संकलन ८.१८ लाख कोटी रुपये झाले आहे.

25 टक्के टॅरिफ भारतासाठी संधी की संकट ?

- AIमुळे काही नोकऱ्या जातील पण नव्या स्किल्सवर भर दिल्यास नव्या संधीही तयार होतील.
- PLI स्कीम पारदर्शक नाही. हे गुंतवणुकीचं मूळ कारण आहे की सबसिडीचं आकर्षण, हे स्पष्ट नाही.
- अमेरिका सध्या विशेष लक्ष ऑटो उद्योगाकडे देत आहे.

भारतातून अमेरिकेत जाणाऱ्या वस्तूंवर 25% टॅरिफ लागणार असल्याची घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली. मात्र, रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर आणि आंतरराष्ट्रीय अर्थतज्ज्ञ रघुराम राजन यांनी या मुद्द्यावर अत्यंत संतुलित पण स्पष्ट भूमिका मांडली आहे.

राजन यांच्या मते, अमेरिका भारतावर दबाव आणण्यासाठी आणि आपल्या अटी मान्य करायला भाग पाडण्यासाठी हे टॅरिफ लावत आहे. भारताने यावर संयमाने उत्तर देणं गरजेचं आहे.

कु. राणी बुलबुले, कु. शैलेजा कोपलवाड

जुलैमध्ये पीएमआय ५९.१ वर

जुलैमध्ये भारताच्या उत्पादन क्षेत्राची वेगाने वाढ झाली. एचएसबीसी इंडिया मॅन्युफॅक्चरिंग परचेसिंग मॅनेजर्स इंडेक्स (पीएमआय) जूनमध्ये ५८.४ वरून जुलैमध्ये ५९.१ वर पोहोचला . गेल्या १६ महिन्यांतील हा आकडा सर्वाधिक आहे.

एस अँड पी ग्लोबलने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, नवीन ऑर्डर आणि उत्पादनात जोरदार वाढ झाल्यामुळे ही सुधारणा दिसून आली. पाच वर्षांतील सर्वात जलद वाढ, कारखान्यांच्या ऑर्डरमध्ये वाढ

अहवालानुसार, जुलैमध्ये कारखान्यांच्या ऑर्डरमध्ये जवळपास पाच वर्षांतील सर्वात जलद गतीने वाढ झाली. देशांतर्गत मागणी आणि चांगल्या मार्केटिंग धोरणांचा कंपन्यांना फायदा झाला. उत्पादन देखील १५ महिन्यांच्या उच्चांकावर पोहोचले, विशेषतः इंटरमीडिएट गुड्स श्रेणीमध्ये.

कु. राणी बुलबुले
कु. शैलेजा कोपलवाड

बाजारात 'ब्लॅक फ्रायडे'! ट्रम्प टॅरिफमुळे गुंतवणूकदारांचे ५.२७ लाख कोटी पाण्यात

आठवड्याच्या शेवटच्या दिवशी भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण दिसून आली. शुक्रवारी सेन्सेक्स ६५० अंकांनी आणि निफ्टी २०० हून अधिक अंकांनी घसरला. या घसरणीमुळे गुंतवणूकदारांचे तब्बल ५.२७ लाख कोटींचे मार्केट कॅप एका दिवसात कमी झाले.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नवीन टॅरिफ ऑर्डरमुळे हा सर्वात मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.

बाजाराची आजची स्थिती

सेन्सेक्स : ५८६ अंकांनी घसरून ८०,५९९ वर बंद झाला.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

निफ्टी : २०३ अंकांनी घसरून २४,५६५ वर बंद झाला.

आज सुमारे २,३५० शेअर्समध्ये घसरण झाली, तर फक्त १,१६८ शेअर्समध्ये वाढ झाली.

घसरणीची प्रमुख ५ कारणे

1. ट्रम्पचा टॅरिफ शॉक: अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी 'रेसिप्रोकल टॅरिफ, ॲडजस्टेड' हा नवीन आदेश जारी केला आहे. यानुसार, भारतातून निर्यात होणाऱ्या अनेक वस्तूंवर २५% टॅरिफ (आयात शुल्क) लावला जाईल. यामुळे भारतीय कंपन्यांच्या नफ्यावर परिणाम होण्याची भीती आहे.
2. परदेशी गुंतवणूकदारांची विक्री (FII): गुरुवारी परदेशी गुंतवणूकदारांनी तब्बल ५,५८८ कोटींचे शेअर्स विकले. त्यांची ही सततची विक्री बाजारावर दबाव टाकत आहे.
3. जागतिक बाजारात मंदी: चीन, जपान आणि कोरियासारख्या आशियाई बाजारांमध्येही घसरण दिसून आली. अमेरिकेतही बाजार घसरल्यामुळे जागतिक गुंतवणूकदारांमध्ये नकारात्मक भावना वाढली.
4. VIX वाढला, भीती वाढली: बाजारातील अस्थिरता दर्शवणारा इंडिया VIX (Volatility Index) २% नी वाढून ११.७७ वर पोहोचला. VIX वाढला की, बाजारात भीती आणि अनिश्चितता वाढत असल्याचे मानले जाते.
5. औषध क्षेत्राला दुहेरी धक्का: निफ्टी फार्मा निर्देशांक ३% नी घसरला. ट्रम्प यांनी जगातील १७ मोठ्या औषध कंपन्यांना अमेरिकेतील औषधांच्या किमती कमी करण्यास सांगितले आहे. यामुळे सन फार्मा, सिप्ला, ल्युपिन यांसारख्या शेअर्समध्ये मोठी घसरण झाली

कु. राणी बुलबुले
कु. शैलेजा कोपलवाड

पोद्दार प्लंबिंगची कर्नाटकात 758 कोटींची गुंतवणूक, 12,000 रोजगार निर्मिती

सीपीव्हीसी आणि पीव्हीसी पाईप्सचे निर्माते पोद्दार प्लंबिंग सिस्टम प्रायव्हेट लिमिटेडने कर्नाटकमध्ये रोजगाराच्या 12,000 संधी निर्माण करण्याचे ठरवले आहे. यासाठी त्यांनी तेथील गुंतवणुकीतही वाढ केली असून आतापर्यंत 492 कोटींवर असलेली गुंतवणूक आता थेट 758 कोटींवर गेली आहे.

33 एकरांवर पसरलेल्या वेमगल औद्योगिक क्षेत्र (फेज 2), कोलार येथे एक प्रमुख सुविधा उभारण्याची कंपनीची योजना आहे. येथे ऑगस्ट 2026 पासून उत्पादन सुरू होण्याची अपेक्षा आहे. तर कंपनीने विजयपुरा येथे दुसरे युनिट प्रस्तावित केले आहे.

पोद्दार प्लंबिंगचे व्यवस्थापकीय संचालक दीपक पोद्दार आणि संचालक वरुण पोद्दार यांनी याची घोषणा केली. खनिजा भवन येथे मोठे तसेच मध्यम उद्योग मंत्री एम.बी. पाटील यांची भेट घेतल्यानंतर ही घोषणा करण्यात आली.

कु. राणी बुलबुले
कु. शैलेजा कोपलवाड

 ISBN NO. 978-81-990957-8-6

2 August 2025

GST: भारताला 'डेड इकोनॉमी' म्हणणाऱ्या ट्रम्प यांच्या तोंडावर चपराक! महिन्याच्या पहिल्याच दिवशी सरकारच्या तिजोरीत विक्रमी वाढ

गेल्या महिन्यात सरकारला १.९६ लाख कोटी रुपये मिळाले. जे गेल्या वर्षीच्या याच महिन्यापेक्षा ७.५% जास्त आहे. जून २०२५ मध्ये जीएसटी संकलन १,८४,५९७ कोटी रुपये होते.

जर आपण गेल्या आर्थिक वर्ष २०२४-२५ बद्दल बोललो तर एकूण जीएसटी संकलन २२.०८ लाख कोटी रुपये इतके विक्रमी होते. एप्रिल २०२५ मध्ये, जीएसटी संकलन २.३७ लाख कोटी रुपये होते, जे वार्षिक आधारावर १२.६ टक्के जास्त होते. हा सलग सातवा महिना आहे जेव्हा जीएसटी संकलन १.८ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाले आहे. एप्रिल ते जुलै या कालावधीत एकूण जीएसटी संकलन ८.१८ लाख कोटी रुपये झाले आहे.

याचा अर्थ असा की, दरमहा सरासरी जीएसटी संकलन २ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. जे गेल्या वर्षी १.८ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त होते. अर्थसंकल्पात सरकारने वर्षासाठी जीएसटी महसुलात ११ टक्के वाढ होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. ज्यामध्ये केंद्रीय जीएसटी आणि भरपाई उपकरासह ११.७८ लाख कोटी रुपये जमा होतील. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी लोकसभेत असेही म्हटले की भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. काही वर्षांत भारत तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या मार्गावर आहे. जीएसटी संकलनाचे आकडे सरकारच्या विधानाला समर्थन देतात.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना फटकारणारे आकडे समोर आले आहेत. ट्रम्प यांनी भारताच्या अर्थव्यवस्थेला 'डेड इकोनॉमी' असे संबोधून त्याची खिल्ली उडवली असेल. परंतु जुलै महिन्यातील जीएसटी (वस्तू आणि सेवा कर) संकलनाचे आकडे त्यांच्या दाव्याचे पूर्णपणे खंडन करतात. जीएसटी संकलनाचे आकडे केवळ एक संख्या नाही.

गोयल म्हणाले होते की हा प्रवास शेतकरी, एमएसएमई आणि उद्योगपतींच्या कठोर परिश्रमाचे फळ आहे. गोयल यांच्या मते, आज जागतिक संस्था आणि अर्थशास्त्रज्ञ भारताला जागतिक अर्थव्यवस्थेत 'उज्ज्वल स्थान' म्हणून पाहतात. हे भारताच्या आर्थिक प्रगतीचे प्रतिबिंब आहे. त्याच वेळी, ट्रम्पच्या नकारात्मक दृष्टिकोनाच्या उलट ते एक सकारात्मक चित्र सादर करते.

कु. वैष्णवी औंढेकर
कु. शिवानी यादव

शेअर मार्केट कोसळण्याची कारणं

ट्रम्प यांनी भारतासोबतच 70 देशांवर रेसिप्रोकल टॅरिफ लावण्यासंबंधी एक आदेश जारी केला आहे, ज्यात भारतावर 25 टक्के टॅरिफ लावला 7 ऑगस्टपासून याची अंमलबजावणी केली जाऊ शकते. ही बातमी येताच गुंतवणूकदारांचे मत बदलले आणि बाजारात विक्रीचा दबाव वाढला.दुसरे कारण म्हणजे विदेशी संस्थागत गुंतवणूकदार (FII) सतत शेअर्सची विक्री करत आहेत. गुरुवारी त्यांनी 5,588.91 कोटी रुपयांचे शेअर्स विकले. सततच्या विक्रीमुळे शेअर बाजारात घसरण झाली आहे. India VIX, जे भारतीय

 ISBN NO. 978-81-990957-8-6

बाजारातील भीतीचे संकेत आहे, ते आज 2 टक्क्यांनी वाढून 11.77 वर पोहोचले. निफ्टी फार्मा इंडेक्समध्ये आज 3 टक्क्यांची घट झाली, ज्यात सन फार्माचे मोठे योगदान होते, जो 4.49 टक्क्यांनी घसरला. आशियाई बाजारातही घसरण दिसून आली. South Korea, जपान, चीन आणि हाँगकाँगच्या बाजारात घसरण झाल्यामुळे भारतीय बाजारावर दबाव वाढला.

कोणत्या शेअर्समध्ये मोठी घट

पीएनबी हाउसिंग फायनान्सच्या शेअरमध्ये 18 टक्क्यांची मोठी घट झाली आणि तो 805 रुपयांवर बंद झाला. याव्यतिरिक्त, IIFL फायनान्सच्या शेअरमध्ये 10%, आरआर केबलच्या शेअरमध्ये 7.14%, सीएसके फार्माच्या शेअरमध्ये 7.15%, अरबिंदो फार्मा 6%, इंडस टॉवर 5%, पेज इंडस्ट्रीज 4%, अदानी पॉवरमध्ये 3.5%, डॉ. रेड्डी लॅब्सच्या शेअरमध्ये 4% झाली.

कु. वैष्णवी औंढेकर
कु. शिवानी यादव

आर्थिक व व्यापारी घडामोडी

1. भारत-अमेरिका व्यापार तणाव:

अमेरिकेने भारतीय वस्तूंवर २५% आयात कर (टॅरिफ) लावले आहेत, ज्याचा परिणाम भारतीय निर्यातदारांवर झाला आहे.

Apple सारख्या कंपन्यांच्या भारतातील उत्पादन धोरणावर परिणाम होऊ शकतो.

भारतातील सरकारने अद्याप प्रतिउत्तर म्हणून कोणताही कर लावलेला नाही, पण त्यांनी काही क्षेत्रांमध्ये कठोर भूमिका घेतली आहे.

2. भारताचा GDP घटला:

Fitch Ratings या संस्थेने भारताचा आर्थिक विकास दर (GDP) २०२५-२६ साठी ६.४% वरून ६.३% पर्यंत खाली आणला आहे.

तरीही देशांतर्गत मागणी आणि पायाभूत सुविधांवरील खर्चामुळे विकासात आधार मिळत आहे.

3. बँक कर्जात घट:

RBI ने व्याजदर कमी केले असतानाही, वैयक्तिक कर्ज घेणाऱ्यांमध्ये घट झाली आहे.

क्रेडिट कार्ड, वैयक्तिक कर्ज, वाहन कर्ज यासाठी बँकांनी कडक धोरण अवलंबले आहे.

मे २०२५ मध्ये कर्जवाढ सिंगल डिजिटमध्ये आली आणि थकबाकीत वाढ झाली आहे.

4. UPI व्यवहारात विक्रमी वाढ:

जुलै २०२५ मध्ये UPI व्यवहार १९.४७ अब्ज झाले आणि त्यांची रक्कम ₹२५.०८ लाख कोटी रुपये झाली.

ही डिजिटल व्यवहाराकडे झुकणारी मोठी पावले आहेत.

5. PNB हाउसिंग फायनान्स CEO चा राजीनामा:

गिरीश कौसगी यांनी अचानक राजीनामा दिल्यामुळे कंपनीचे शेअर १७% ने घसरले – ही घसरण ऑक्टोबर २०१८ नंतरची सर्वात मोठी आहे.

6. नवीन म्युच्युअल फंड:

Choice Mutual Fund ला SEBI ने अखेर परवाना दिला असून, ते आता नव्या AMC (Asset Management Company) म्हणून काम सुरु करणार आहेत.

7. McDonald's भारतात AI मध्ये गुंतवणूक करणार:

 ISBN NO. 978-81-990957-8-6

McDonald's ने २०२७ पर्यंत AI आणि टेक्नॉलॉजी मध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे.

हैदराबाद येथे $१०० दशलक्ष गुंतवून नवीन टेक सेंटर स्थापन होणार आहे.

8. Volvo India ची नवी योजना:

इलेक्ट्रिक वाहनांची मागणी कमी असल्यामुळे, Volvo India आता फक्त EV वर लक्ष केंद्रित न करता पारंपरिक इंधनावर चालणारी वाहनेही बाजारात आणणार आहे

थोडक्यात सारांश:

विषय परिणाम

अमेरिकन टॅरिफ भारतीय निर्यातदारांवर दबाव, व्यापारात अडचण

GDP घट आंतरराष्ट्रीय तणावाचा परिणाम, पण देशांतर्गत मागणी स्थिर

कर्जपुरवठा वैयक्तिक कर्जात घट, ग्राहक खर्च कमी

UPI व्यवहार डिजिटल अर्थव्यवस्थेचा जोरदार

काही योजनांमध्ये लाभार्थ्यांना दर महिन्याला पैसे दिले जातात. दरम्यान,आता या योजनांबाबत शासनाने मोठा निर्णय घेतला आहे.आता जर शासनाच्या कोणत्याही योजनेचे ३ महिन्याचे पैसे काढले नाही किंवा लाभार्थी घेऊन गेले नाही तर ती रक्कम शासनजमा केली जाणार आहे.

Post Office Scheme: पोस्ट ऑफिसची जबरदस्त योजना! इतक्या रुपयांची फक्त एकदाच गुंतवणूक करा अन् दर महिन्याला मिळवा २०,००० रुपये शासनाने सध्या महसूल सप्ताह राबवला आहे. त्यात संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांना घरी जाऊन मंजुरीचे प्रमाणपत्र दिले आहेत. यावेळी शासनाच्या अनेक योजनांची माहितीदेखील दिली जात आहे.

सोलापूरमध्ये संजय गांधी निराधार आणि श्रावणबाळ योजनेचे १,५७,००० लाभार्थी आहेत. या लाभार्थ्यांची नावे दर महिन्याला वाढतच आहे. दरम्यान, या योजनेत थेट डिबीटीद्वारे लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे जमा केले जातात. त्यासाठी सर्व लाभार्थ्यांना त्यांची कागदपत्रे संजय गांधी निराधार योजनेच्या कार्यालयात जमा करावी लागणार आहेत.यामध्ये १५ हजार लाभार्थ्यांनी अजून कागदपत्रे अपलोड केलेली नाही.

त्यामुळे हे लाभार्थी जोपर्यंत कागदपत्रे अपलोड करत नाही तोपर्यंत त्यांना योजनेचा लाभ मिळणार नाही, याबाबत शिल्पा पाटील तहसीलदार, संजय गांधी निराधार योजना, सोलापूर यांनी माहिती दिली आहे.

३ महिने रक्कम काढली नाही तर सरकारजमा होणार

शासनाच्या काही योजनांमध्ये लाभार्थ्यांना दर महिन्याला पैसे दिले जातात. दरम्यान, या योजनेत काही अडचणी येऊ नये, यासाठी कागदपत्रे जमा करण्यास सांगतात. तीन महिन्यापेक्षा जास्त काळ जर बँकेतील योजनेचे पैसे काढले नसतील तर ती रक्कम सरकारजमा केली जात आहे, असे शासनाचे आदेश आहेत.

Central Govt Scheme: पहिल्या बाळाच्या जन्मावर ५०००, दुसऱ्यावेळी मुलगी झाली तर मिळतील ६ हजार रुपये; काय आहे सरकारची योजना?

कु. निकिता तोमर
कु. अंकिता तोमर

 ISBN NO. 978-81-990957-8-6

लाडक्या बहिणींसाठी महत्त्वाची बातमी

लाडकी बहीण योजनादेखील सरकारी योजना आहे. या योजनेतील पैसेदेखील ३ महिने काढले नाही तर ते पैसे सरकारजमा होणार का असा प्रश्न आता अनेक महिलांना पडलेला असेल. मात्र, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. फक्त संजय गांधी निराधार योजना आणि श्रावण बाळ योजनेबाबत माहिती समोर आलेली आहे.

Ladki Bahin Yojana: 50 लाख लाडक्या बहिणी अपात्र ठरणार? 27 लाख 'लाडकींची पडताळणी सुरु

विस्तार

शेअर बाजार CEO बदलामुळे शेअरमध्ये मोठी घसरण

नव्या कंपन्या म्युच्युअल फंड व्यवसायात नवीन स्पर्धक

जागतिक गुंतवणूक McDonald's सारख्या कंपन्यांनी भारतावर लक्ष केंद्रित केले.

कु. निकिता तोमर
कु. अंकिता तोमर

03/08/2025

Nifty : 24,565.35-203-0.82%
Updated on Aug 01, 3:30 pm
Open : 24,734.90
High : 24,784.15
Low : 24,535.05
Prev. Day
Close : 24,768.35.
Sensex : 80,599.91-585.67-0.72%
Updated on Aug 01, 4:00 pm*
Open . : 81,074.41
High : 81,317.51
Low : 80,495.57
Prev. Day Close : 81,185.58

Post Office Scheme

काही योजनांमध्ये लाभार्थ्यांना दर महिन्याला पैसे दिले जातात. दरम्यान,आता या योजनांबाबत शासनाने मोठा निर्णय घेतला आहे.आता जर शासनाच्या कोणत्याही योजनेचे ३ महिन्याचे पैसे काढले नाही किंवा लाभार्थी घेऊन गेले नाही तर ती रक्कम शासनजमा केली जाणार आहे.

Post Office Scheme: पोस्ट ऑफिसची जबरदस्त योजना! इतक्या रुपयांची फक्त एकदाच गुंतवणूक करा अन् दर महिन्याला मिळवा २०,००० रुपये

शासनाने सध्या महसूल सप्ताह राबवला आहे. त्यात संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांना घरी जाऊन मंजुरीचे प्रमाणपत्र दिले आहेत. यावेळी शासनाच्या अनेक योजनांची माहितीदेखील दिली जात आहे.

सोलापूरमध्ये संजय गांधी निराधार आणि श्रावणबाळ योजनेचे १,५७,००० लाभार्थी आहेत. या लाभार्थ्यांची नावे दर महिन्याला वाढतच आहे. दरम्यान, या योजनेत थेट डिबीटीद्वारे लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे जमा केले जातात. त्यासाठी सर्व लाभार्थ्यांना त्यांची कागदपत्रे संजय गांधी निराधार योजनेच्या कार्यालयात जमा करावी लागणार आहेत.यामध्ये १५ हजार लाभार्थ्यांनी अजून कागदपत्रे अपलोड केलेली नाही.

त्यामुळे हे लाभार्थी जोपर्यंत कागदपत्रे अपलोड करत नाही तोपर्यंत त्यांना योजनेचा लाभ मिळणार नाही, याबाबत शिल्पा पाटील

 ISBN NO. 978-81-990957-8-6

तहसीलदार, संजय गांधी निराधार योजना, सोलापूर यांनी माहिती दिली आहे.

३ महिने रक्कम काढली नाही तर सरकारजमा होणार

शासनाच्या काही योजनांमध्ये लाभार्थ्यांना दर महिन्याला पैसे दिले जातात. दरम्यान, या योजनेत काही अडचणी येऊ नये, यासाठी कागदपत्रे जमा करण्यास सांगतात. तीन महिन्यापेक्षा जास्त काळ जर बँकेतील योजनेचे पैसे काढले नसतील तर ती रक्कम सरकारजमा केली जात आहे, असे शासनाचे आदेश आहेत.

Central Govt Scheme: पहिल्या बाळाच्या जन्मावर ५०००, दुसऱ्यावेळी मुलगी झाली तर मिळतील ६ हजार रुपये; काय आहे सरकारची योजना?

कु. प्रतीक्षा घरणे
कु. सावित्रा पावडे

08/08/2025

सेन्सेक्स =79,857
निफ्टी = 24,363
सोने =9470/10,331
चांदी =117
Today: 8 august 2025*
Stock Market Opening
Today:
Sensex =80,124.62
Nifty=24,428.50

शेअर बाजार

आठवड्याच्या शेवटच्या दिवशी, शुक्रवारी (8 ऑगस्ट) शेअर बाजाराची सुरुवात घसरणीसह झाली आहे. सेन्सेक्स 150 अंकांच्या घसरणीसह व्यवहार करत होता. त्याच वेळी, निफ्टी देखील सुमारे 40 अंकांनी घसरला. ऑटो आणि एमसीजी शेअर्समध्ये खरेदी होत होती. त्याच वेळी, फार्मा निर्देशांकात सर्वात जास्त घसरण दिसून आली.

हिरो मोटोकॉर्प, टायटन, बजाज फायनान्स, एनटीपीसी, टाटा मोटर्स, बजाज फिनसर्व्ह हे निफ्टीवर सर्वात जास्त वाढले. त्याच वेळी, भारती एअरटेल, इन्फोसिस, बीईएल, इटरनल, ॲक्सिस बँक यांच्यात घसरण दिसून आली.

सकाळी गिफ्ट निफ्टी 32 अंकांनी घसरलेला दिसत होता. मात्र, कालच्या बाजारात क्लोजिंगच्या वेळी झालेल्या जोरदार रिकव्हरीमुळे गुंतवणूकदारांची उत्सुकता वाढली होती. काल अमेरिकन बाजारातही मोठ्या चढ-उतारांचे सत्र पाहायला मिळाले. डाऊ जोन्स 530 अंकांनी वर गेल्यानंतर पुन्हा घसरला आणि 224 अंकांनी बंद झाला, तर नॅस्डॅक सुमारे 73 अंकांनी वाढला. गिफ्ट निफ्टी 24,650 च्या आसपास स्थिर राहिला, डाऊ फ्युचर्स 100 अंकांनी वर होता आणि जपानचा निक्केई तब्बल 800 अंकांनी वाढला होता.

Gold & Silver Price Updates
₹ 9,470 / Gram increase by ₹ 70 ,
Silver Rate ₹ 117 / Gram

Gold-Silver Price:- मागच्या आठवड्यात थोडीफार घसरण झाल्यानंतर सोन्याने परत वाढीच्या दिशेने वेग पकडल्याचे दिसून येत आहे. तसेच चांदीच्या दरात देखील भरमसाठ वाढ झाली असून सोने आणि चांदीने आता 1 लाख रुपयांचा टप्पा पार केला असल्यामुळे ग्राहकांना सोने खरेदी कठीण झाल्याचे चित्र आहे.

राज्यातील प्रमुख शहरातील आजचे सोन्याचे दर

5 ऑगस्ट 2025 वार मंगळवारचे राज्यातील प्रमुख चार शहरातील सोन्याचे दर पाहिले तर ते खालीलप्रमाणे आहेत...

 ISBN NO. 978-81-990957-8-6

1- मुंबई- मुंबई शहरात आज 22 कॅरेट सोन्याचे दर प्रती 10 ग्रॅम 92 हजार 565 रुपये असून 24 कॅरेट सोन्याचे दर 1 लाख 980 रुपये प्रति दहा ग्रॅम इतके आहेत.

2- पुणे- पुणे शहरात आज 22 कॅरेट सोन्याचा दर 92 हजार 565 रुपये प्रति तोळा म्हणजेच दहा ग्रॅम असून 24 कॅरेट सोने खरेदी करण्यासाठी पुणेकरांना आज 1 लाख 980 रुपये मोजावे लागणार आहेत.

3- नागपूर- नागपूर शहरात आज दहा ग्रॅम 22 कॅरेट सोन्याचा दर 92 हजार 565 रुपये असून 24 कॅरेट सोन्याचा दर 1 लाख 980 रुपये इतका आहे.

4- नासिक- नाशिककरांना जर आज 10 ग्रॅम 22 कॅरेट सोने खरेदी करायचे असेल तर 92 हजार 565 रुपये मोजावे लागणार आहेत तर 24 कॅरेटच्या 1 तोळा सोने खरेदीसाठी 1 लाख 980 रुपये मोजावे लागणार आहेत

आजचे पेट्रोल डिझेलचे दर (Today Petrol Diesel Rate) आज मुंबईत पेट्रोलची किंमत १०३.५० रुपये आहेत. डिझेलचे दर प्रति ९०.०३ लिटर

पुण्यात पेट्रोलचे दर १०४.१० रुपये प्रति लिटर आहे तर डिझेलचे दर ९०.७१ रुपये आहेत.

ठाण्यात पेट्रोलचे दर १०३.६४ रुपये आहे तर डिझेल ९०.१६ रुपये प्रति लिटरवर विकले जात आहे.

साताऱ्यात १ लिटर पेट्रोलची किंमत १०४.७० रुपये आहे तर डिझेलची किंमत ९१.२१ रुपये आहे.

Petrol Price: पेट्रोल डिझेलवर टॅक्स नसेल तर १ लिटरची किंमत किती? वाचा सविस्तर

कु. निकिता गाजलवाड
कु. राधिका नरहिरे

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासोबत व्यापार करार (Trade Deal) करण्यास स्पष्ट नकार दिला आहे

त्यांचे म्हणणे आहे की, रशियाकडून तेल खरेदीचा मुद्दा सुटल्याशिवाय ट्रेड डीलवर कोणतीही चर्चा होणार नाही. असे त्यांनी व्हाईट हाऊसमधील ओव्हल ऑफिसमध्ये पत्रकारांना सांगितले.

ट्रम्प प्रशासनाने आधीच भारताकडून होणाऱ्या रशियन तेल खरेदीवर 25 टक्के टॅरिफ लावले होते. आता ते वाढवून थेट 50 टक्क्यांपर्यंत नेण्यात आले आहे. बुधवारी व्हाईट हाऊसने जाहीर केलेल्या कार्यकारी आदेशानुसार, भारतातून येणाऱ्या वस्तूंवर अतिरिक्त 25 टक्के टॅरिफ लावण्यात आले. राष्ट्रीय सुरक्षेच्या आणि परराष्ट्र धोरणाच्या कारणांचा हवाला देत, भारताकडून रशियन तेलाच्या सतत होणाऱ्या आयातीकडे विशेष लक्ष वेधण्यात आले.

ट्रम्प यांनी भारताने रशियन तेल खरेदी थांबवावी, अशी मागणी केली आहे. मात्र, भारत सरकारने आपल्या ऊर्जा गरजा आणि गुंतवणूक हितांचा उल्लेख करत ही आयात बंद करण्यास नकार दिला आहे.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावर ठाम आणि स्पष्ट भूमिका मांडली. नवी दिल्लीतील एम. एस. स्वामीनाथन शताब्दी आंतरराष्ट्रीय परिषदेत बोलताना त्यांनी सांगितले - "भारत कोणत्याही बाह्य दबावासमोर झुकणार नाही. शेतकऱ्यांचे हित हे आमच्यासाठी सर्वोच्च आहे. मच्छीमार, पशुपालक यांच्याही हक्कांशी आम्ही कधीच तडजोड करणार नाही. यासाठी मोठी किंमत मोजावी लागली तरी आम्ही तयार आहोत."

 ISBN NO. 978-81-990957-8-6

कु. निकिता गाजलवाड
कु. राधिका नरहिरे

स्टेट बँकेला पहिल्या तिमाहीत १९,१६० कोटी रुपये निव्वळ नफा

देशातील सर्वात मोठी सार्वजनिक क्षेत्रातील बँक स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) ने २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीचे निकाल जाहीर केले आहेत. ३० जून रोजी संपलेल्या एप्रिल-जून तिमाहीत बँकेचा नफा १२ टक्क्यांनी वाढून १९,१६० कोटी रुपये झाला आहे.

स्टेट बँकेने शुक्रवारी शेअर बाजाराला माहिती दिली की एप्रिल-जून तिमाहीत तिचे एकूण उत्पन्नही १,३५,३४२ कोटी रुपये झाले आहे, जे मागील आर्थिक वर्षाच्या याच कालावधीत १,२२,६८८ कोटी रुपये होते. बँकेने मिळवलेले व्याज उत्पन्न वाढून १,१७,९९६ कोटी रुपये झाले आहे, जे मागील आर्थिक वर्षाच्या याच तिमाहीत १,११,५२६ कोटी रुपये होते.

कु. निकिता गाजलवाड
कु. राधिका नरहिरे

सरकारने आयकर विधेयक २०२५ मागे घेतले

केंद्र सरकारने फेब्रुवारी २०२५ मध्ये नवीन आयकर विधेयक आणले होते. मात्र, आता आज हे विधेयक मागे घेण्यात आले आहे.

केंद्र सरकारने १३ फेब्रुवारी २०२५ रोजी लोकसभेत हे नवीन विधेयक सादर केले आणि त्याच दिवशी ते निवड समितीकडे छाननीसाठी पाठवले होते. समितीने २२ जुलै २०२५ रोजी संसदेत आपला अहवाल सादर केला. या नवीन अपडेटेड विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळात मान्यता देण्यात आली. त्यानुसार, हे नवीन विधेयक सोमवारी (११ ऑगस्ट २०२५) लोकसभेत सादर केले जाईल.

कु. निकिता गाजलवाड
कु. राधिका नरहिरे

9 August 2025

भारतासाठी धावून आला हा देश, डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबतच्या भेटीचे ठिकाण आणि तारीख ठरली.

डोनाल्ड ट्रम्प यांनी काल एका प्रश्नाला उत्तर देताना भारतासोबतच्या व्यापार संबंध तोपर्यंत पुढे जाणार नाहीत, जोपर्यंत हा विषय निकाली लागणार नाही, असे म्हटले होते. भारत रशियाकडून कच्चे तेल विकत घेत असल्याची पोटदुखी डोनाल्ड ट्रम्पला आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांची रशियाच्या राष्ट्राध्यक्षांसोबत होणार भेट

डोनाल्ड ट्रम्पने जाहीरपणे बोलून दाखवले की, भारताकडून आम्ही वस्तू खरेदी करतो पण भारत आमच्याकडून नाही. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या निर्णयाच्या विरोधात भारताच्या बाजूने काही देशही उभे असल्याचे बघायला मिळतंय. आता त्यामध्येच मोठा घडामोडींना वेग आल्याचे बघायला मिळतंय. यादरम्यानच अमेरिकेच राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे ष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची भेट होणार आहे.

ट्रम्प आणि पुतिन यांच्या भेटीकडे जगाचे लक्ष

हेच नाही तर अमेरिकेने ज्याप्रकारे भारतावर कर लादला आहे, त्यानंतर पुतिन भारतात येणार असल्याचेही सांगितले जातंय. डोनाल्ड ट्रम्प यांनी

 ISBN NO. 978-81-990957-8-6

शुक्रवारी घोषणा केली की, ते 15 ऑगस्ट रोजी अलास्का येथे रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची भेट घेतील. या भेटीबद्दलची पोस्ट त्यांनी थेट सोशल मीडियावर शेअर केली आहे. या भेटीकडे आता संपूर्ण जगाच्या नजरा लागल्याचे बघायला मिळतंय.

भेटीमध्ये विविध विषयांवर होणार चर्चा

युक्रेन आणि रशियामध्ये जे युद्ध मागील काही दिवसांपासून सुरू आहे, ते बंद करण्याबाबत चर्चा होण्याची शक्यता आहे. मागील काही दिवसांपासून युक्रेन आणि रशिया यांच्यातील युद्ध थांबवण्याचे प्रयत्न अमेरिकेकडून केली जात आहेत. मात्र, दुसरीकडे त्यांच्याकडून युक्रेनला पाठिंबा देखील दिला जातोय. भारताच्या प्रत्येक मदतीला कायमच रशिया धावून आलाय. आता यावेळी रशियाकडून भारताला कशाप्रकारे मदत होते हे पाहण्यासारखे ठरणार आहे. या भेटीमध्ये भारतावर लावण्यात आलेल्या कराबद्दल देखील चर्चा होण्याची शक्यता आहे.

कु. निकिता गाजलवाड
कु. राधिका नरहिरे

शेअर मार्केट धडाम! ट्रम्प टॅरिफच नव्हे तर 'या' कारणांनीही बाजारात घसरण, अनेक शेअर्समध्ये लक्षणीय घट

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी टॅरिफ लावण्याची घोषणा केल्यामुळे, विदेशी गुंतवणूकदारांनी (FII) केलेली सततची विक्री, आणि आशियाई बाजारांमधील नकारात्मक संकेत यांसारख्या कारणांमुळे भारतीय बाजारात ही घसरण झाली.

बीएसईच्या टॉप 30 शेअर्सपैकी 24 शेअर्समध्ये घसरण दिसून आली. सर्वात जास्त सन फार्माच्या शेअरमध्ये 4.49 टक्क्यांची घट झाली.

त्यापाठोपाठ टाटा स्टील, टाटा मोटर्स, इन्फोसिस आणि मारुती यांच्या शेअर्समध्ये 3 टक्क्यांपर्यंत घट झाली. टाटा ट्रेंट, एशियन पेंट्स आणि रिलायन्सच्या शेअर्समध्ये मात्र वाढ झाली. शेअर बाजारातील घसरणीच्या कारणांबद्दल बोलताना, ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणाचा उल्लेख करणे महत्त्वाचे आहे.

शेअर मार्केट कोसळण्याची कारणं

ट्रम्प यांनी भारतासोबतच 70 देशांवर रेसिप्रोकल टॅरिफ लावण्यासंबंधी एक आदेश जारी केला आहे, ज्यात भारतावर 25 टक्के टॅरिफ लावला 7 ऑगस्टपासून याची अंमलबजावणी केली जाऊ शकते. ही बातमी येताच गुंतवणूकदारांचे मत बदलले आणि बाजारात विक्रीचा दबाव वाढला.दुसरे कारण म्हणजे विदेशी संस्थागत गुंतवणूकदार (FII) सतत शेअर्सची विक्री करत आहेत. गुरुवारी त्यांनी 5,588.91 कोटी रुपयांचे शेअर्स विकले. सततच्या विक्रीमुळे शेअर बाजारात घसरण झाली आहे.

India VIX, जे भारतीय बाजारातील भीतीचे संकेत आहे, ते आज 2 टक्क्यांनी वाढून 11.77 वर पोहोचले. निफ्टी फार्मा इंडेक्समध्ये आज 3 टक्क्यांची घट झाली, ज्यात सन फार्माचे मोठे योगदान होते, जो 4.49 टक्क्यांनी घसरला. आशियाई बाजारातही घसरण दिसून आली. South Korea, जपान, चीन आणि हाँगकाँगच्या बाजारात घसरण झाल्यामुळे भारतीय बाजारावर दबाव वाढला.

कु. पाणेरी खिल्लारे
कु. कृष्णा वर्ताळे

 ISBN NO. 978-81-990957-8-6

Stock Market Closing Today Update

शेअर बाजारावर टॅरिफचं नवीन संकट समोर आलं आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर अतिरिक्त टॅरिफ लावला आहे. रशियाकडून स्वस्त दरात खरेदी होणाऱ्या तेलामुळे चिडलेल्या ट्रम्प प्रशासनाने भारतावर लावण्यात आलेले टॅरिफ 25 टक्क्यांवरून थेट 50 टक्क्यांवर नेले आहे.

या वाढीव दरांची अंमलबजावणी 27 ऑगस्टपासून होणार असली, तरी जुन्या टॅरिफ दरांची अंमलबजावणी आजपासूनच सुरू झाली आहे. परिणामी, शेअर बाजाराच्या विकली दिवसभरात बाजार घसरत गेला, मात्र शेवटच्या तासात खालच्या पातळीवरून जोरदार सावरला. निफ्टी जवळपास 21 अंकांनी वाढत 24,596.15च्या आसपास बंद झाला. सेंसेक्सदेखील 79.27 अंक सावरून 80,623.26च्या पातळीवर बंद झाला.

फक्त मोठ्या शेअर्स नव्हे, तर मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्समध्येही खालच्या पातळीवरून जबरदस्त रिकव्हरी पाहायला मिळाली. ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणाचा भारताच्या निर्यातीवर आणि कंपन्यांच्या नफ्यावर काय परिणाम होतो, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.एक्सपायरीच्या दिवशी निफ्टीमध्ये मोठी अस्थिरता पाहायला मिळाली.

कु. पाणेरी खिल्लारे
कु. कृष्णा वर्ताळे

Sensex : 79,857.79
-765.47
-0.95%
Open80,478.01
High80,550.40
Low79,775.84
Prev. Day Close80,623.26
Nifty : 24,363.30
-232.85
-0.95%
Open 24,544.25
High 24,585.50
Low 24,337.50
Prev. Day Close 24,596.15

9 महिन्यात 24 हजार 541 रुपयांनी वाढले सोन्याचे भाव? सोन्या चांदीचे भाव किती वाढणार वाचा

Gold prices increased by Rs 24,541 in 9 months : सोन्याचे दर गेल्या पाच वर्षात दोनशे टक्क्यांनी वाढले म्हणजेच गुंतवणूकदारांसाठी ही आनंदाची बातमी असली तरीही सोन्याच्या दराने सामान्यांचे मात्र, कंबरडे मोडले आहेत.

सामान्यांच्या आवाक्याबाहेर सोन्याचे भाव गेले आहेत. या वर्षातील जानेवारी ते ८ ऑगस्टपर्यंत सोन्याचे भाव जवळपास २४ हजर ५४१ रुपयांनी वाढले आहेत.

सोने हे सदा-सर्वदा गुंतवणुकीचे उत्तम साधन मानले जाते. यंदा सोन्याच्या दरात चांगलीच वाढ झाली. सोन्याने यंदा सर्व रेकॉर्ड मोडले आहेत. सोन्याचे सर्वोच्च भाव यंदा झाले असून लाखांच्या पार हे दर पोहचले आहेत.

भास्करच्या रिपोर्टनुसार, सोन्याचे भाव सध्या लाखांच्या घरात खेळत आहेत पण या वर्षात

 ISBN NO. 978-81-990957-8-6

सोन्याचा दर एक लाख चार हजार रुपये प्रतितोळा होण्याची शक्यता आहे. केडिया ॲडव्हायझरीचे संचालक अजय केडीयांच्या माहितीनुसार भास्करने हे वृत्त दिले आहे.

का वाढणार सोन्याचे भाव?

केडिया यांच्या मते डोनाल्ड ट्रम्प यांचे टॅरीफ, सध्या जगात सुरु असलेला भु-राजकीय संघर्ष आणि त्यामुळे निर्माण झालेला तणाव यामुळे सोन्याचे दर वाढत आहे. सोन्याचे दर १ लाख ४ हजार रुपये प्रति दहा ग्रॅमपर्यंत जाऊ शकतात.

चांदीचे भाव या वर्षात किती होणार?

सोन्यासारखीच चांदीही चकाकत असून यंदा चांदीचे रेकॉर्डतोड भाव या वर्षात असतील. केडिया यांच्या मतानुसार ,चांदी १ लाख ३० हजारांपर्यंत जाऊ शकते असे भास्करने म्हटले आहे.

सोन्याच्या भाववाढीचा या वर्षातील प्रवास कसा आहे?

या वर्षी आतापर्यंत सोने २४,५४१ रुपयांनी महाग झाले आहे.

डिसेंबर २०२४ मध्ये सोन्याचे दर ७६,१६२ रुपये प्रतितोळा होते.

या वर्षी म्हणजेच १ जानेवारीपासून आतापर्यंत, २४ कॅरेट सोन्याच्या १० ग्रॅमची किंमत ७६,१६२ रुपयांवरून १ लाख ७०३ रुपयांवर पोहोचले आहे. म्हणजेच २४,५४१ रुपयांची वाढ या नऊ महिन्यात झाली आहे. डिसेंबर २०२४ मध्ये चांदीची किंमत ८६,०१७ रुपये प्रति किलो होते. हे भाव कालपर्यंत २९ हजार २३३ रुपयांनी वाढून ते आता १ लाख १५ हजार २५० रुपयांवर पोहोचले आहेत.

कु. पाणेरी खिल्लारे
कु. कृष्णा वर्ताळे

12/08/2025

सेन्सेक्स ९६ अंकांनी घसरला, सुरुवातीच्या व्यवहारात धातू आणि बँकिंग शेअर्समध्ये विक्री

बँक निफ्टी 69 अंकांनी खाली येऊन 55,441 वर उघडला. चलन बाजारातही रुपया 87.66 च्या तुलनेत 87.64 प्रति डॉलरवर उघडला. सेक्टोरल इंडेक्समध्ये रियल्टी क्षेत्रात विक्री झाली दिसून आली, तर इतर सेक्टोरल इंडेक्स हिरव्या निशाणीत व्यवहार करताना दिसले.

टॉप लूजर्स आणि बाजाराची गतिशीलता

आजच्या सुरुवातीच्या कारोबारात मेटल आणि बँकिंग क्षेत्रातील शेअर्सवर विक्रीचा दबाव दिसला. यामुळे बाजारात काहीशी अस्थिरता निर्माण झाली. आजचे टॉप लूजर्स खालीलप्रमाणे आहेत:

- TRENT
- BEL
- ICICIBANK
- BAJFINANCE
- ETERNAL

या शेअर्समधील घसरणीमुळे बाजारातील गुंतवणूकदारांमध्ये सावधगिरीचे वातावरण दिसून आले. मात्र, इतर क्षेत्रांमधील हिरव्या निशाणीमुळे बाजाराला काहीसा आधार मिळाला.

आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडी

आंतरराष्ट्रीय बाजारातही आज अनेक महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे राष्ट्रपती पुतिन यांच्या भेटीपूर्वी युक्रेनचे राष्ट्रपती झेलेंस्की यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी फोनवर चर्चा केली. पुढील महिन्यात संयुक्त राष्ट्र महासभेत मोदी आणि झेलेंस्की यांची भेट होण्याची शक्यता आहे.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

ट्रम्प यांचा चीनबाबत बदललेला दृष्टिकोन

ट्रंप यांनी चीनवर लागू होणाऱ्या वाढीव टॅरिफची मुदत 90 दिवसांनी पुढे ढकलली आहे. हा निर्णय आजपासून लागू होणार होता, परंतु यामुळे दोन्ही देशांमधील व्यापारी तणावाला थोडा वेळ मिळाला आहे. याशिवाय, ट्रंप यांनी सोन्यावर टॅरिफ न लावण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचा भाव 50 डॉलरने घसरून 3400 डॉलरच्या जवळ आला. चांदीच्या किमतीतही 1.5% ची घट झाली.

घरेलू बाजारातही सोन्याचा भाव 1100 रुपयांनी घसरून 1 लाख 400 रुपयांच्या खाली आला, तर चांदी 1400 रुपयांनी खाली घसरली. कच्च्या तेलाचा भाव 67 डॉलर प्रति बॅरलच्या खाली स्थिर आहे.

अमेरिकी आणि आशियाई बाजारातील चढ-उतार

अमेरिकी शेअर बाजारातही हालचाल दिसून आली. CPI डेटा जाहीर होण्यापूर्वी डाओ जोन्स 200 अंकांनी घसरून बंद झाला, तर नॅस्डॅक इंट्राडे उच्चांक गाठल्यानंतर 60 अंकांनी खाली आला. GIFT निफ्टी 30 अंकांनी घसरून 24,600 च्या जवळ आला, तर डाओ फ्यूचर्स 25 अंकांनी वर व्यवहार करत होते. जपानचा निक्केई एका दिवसाच्या सुट्टीनंतर सुमारे 950 अंकांनी वधारला.

कॉर्पोरेट नफा आणि आगामी निकाल

कॉर्पोरेट क्षेत्रातही काही महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. Astral आणि Titagarh यांचे निकाल कमकुवत राहिले. आज निफ्टीमध्ये Apollo Hospitals, Hindalco आणि ONGC यांचे निकाल जाहीर होणार आहेत. F&O मध्ये Oil India, BDL, HAL आणि NMDC यासह 13 कंपन्यांचे निकाल येणार आहेत. या निकालांवर गुंतवणूकदारांचे लक्ष असेल.

आजच्या बाजारातील घसरणीमुळे

गुंतवणूकदारांमध्ये सावधगिरी दिसून येत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील अस्थिरता, तेल आणि सोन्या-चांदीच्या किमतीतील चढ-उतार आणि कॉर्पोरेट निकाल यांचा बाजारावर परिणाम होत आहे. तज्ज्ञांच्या मते, गुंतवणूकदारांनी बाजारातील तात्कालिक चढ-उतारांवर लक्ष ठेवून दीर्घकालीन रणनीती आखावी.

आजच्या बाजारातील घसरणीमुळे गुंतवणूकदारांना सावध राहण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय आणि घरेलू बाजारातील घडामोडींवर लक्ष ठेवून योग्य निर्णय घेणे महत्त्वाचे आहे. पुढील काही दिवसांत कॉर्पोरेट निकाल आणि जागतिक घडामोडी बाजाराची दिशा ठरविण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील.

कु. पाणेरी खिल्लारे
कु. कृष्णा वर्ताळे

13/08/2025

सेबीच्या रिपोर्टनुसार आर्थिक वर्ष 2024-25 विदेशी गुंतवणूकदारांनी भारताच्या इक्विटी सेगमेंटमधील 1.27 लाख कोटी रुपयांचे शेअर विकले.

आंतरराष्ट्रीय बाजारातील वाढत्या अस्थिरतेचा विदेशी गुंतवणूकदारांच्या मानसिकतेवर परिणाम झाला आहे. रेसिप्रोकल टॅरिफमुळं तणाव वाढल्यानं अमेरिकेच्या बाँडमध्ये तेजी आली आहे, त्यामुळं शेअर बाजारावरील गुंतवणूकदारांचा विश्वास कमी झाला आहे. भारतीय शेअर बाजारातून इक्विटीमधून पैसे काढले तरी विदेशी गुंतवणूकदार

 ISBN NO. 978-81-990957-8-6

डेब्ट सेगमेंटमध्ये सक्रिय आहेत. या सेगमेंटमध्ये 1.4 लाख कोटींची गुंतवणूक झाली आहे.

मनीकंट्रोलच्या रिपोर्टनुसार तज्ज्ञांच्या मते सध्या पोर्टफोलिओ मॅनेजर शेअर खरेदी केल्यानंतर होल्ड करण्याऐवजी असेट अलोकेशनवर लक्ष देत आहेत. आता त्यांच्या प्राथमिकतेमध्ये भारत नाही, असं सांगण्यात आलं आहे.

फायनान्शिअल एक्स्प्रेसच्या रिपोर्टनुसार जेएम फायनान्शिअलच्या एका अभ्यासानुसार जुलैमध्ये विदेशी गुंतवणूकादरांनी आयटी, बीएसएफआय, रिअल्टी आणि ऑईल अँड गॅस या क्षेत्रातील शेअरची विक्री केली. टेक उद्योगात 2285 दशलक्ष डॉलर्सचे शेअर विकले गेले. बँकिंग, फायनान्शिअल सर्व्हिसेस, विमा क्षेत्रातील स्टॉकमध्ये 671 दशलक्ष डॉलरची विक्री झाली. रिअल्टी सेक्टरमध्ये 450 दशलक्ष डॉलरच्या शेअरची विक्री झाली. ऑटो क्षेत्रातील 412 दशलक्ष डॉलरची विक्री झाली आहे. ऑइल अँड गॅस क्षेत्रातील 372 दशलक्ष डॉलरच्या शेअरची विक्री झाली.

दरम्यान काही स्टॉकमध्ये खरेदी देखील झाली आहे. मेटल सेक्टरमध्ये विदेशी गुंतवणूकदारांनी 388 दशलक्ष डॉलरची खरेदी केली आहे. सर्व्हिसेसमध्ये 347 दशलक्ष डॉलर्सची गुंतवणूक झाली. तर, एफएमसीजीच्या 175 दशलक्ष डॉलर, टेलीकॉम क्षेत्रात 169 दशलक्ष डॉलर्स आणि केमिकल क्षेत्रात 130 दशलक्ष डॉलरची गुंतवणूक झाली.

(टीप- शेअर बाजार, म्यूच्यूअल फंड हे जोखमीच्या अधीन असतात. या लेखात दिलेली माहिती ही प्राथमिक स्वरुपाची असून आम्ही कोणताही दावा करत नाही. या लेखामागचा गुंतवणुकीसाठी शिफारस, सल्ला देण्याचा उद्देश नाही. तुम्हाला गुंतवणूक करायची असेल तर या क्षेत्रातील तज्ज्ञांचा सल्ला घ्या.)

कु. साधना मुंडे
कु. भूमीका नागडा

एसअँडपीच्या मते पुढील 2 ते 3 वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेची वाढ वेगानं होण्याची आशा आहे.

आरबीआयच्या पतधोरणामुळं महागाई नियंत्रणात आहे. यापुढील काळात देखील महागाई नियंत्रणात राहील अशी अपेक्षा आहे. अमेरिकेनं भारतावर 50 टक्के टॅरिफ लादलं आहे. टॅरिफचा होणाऱ्या परिणामाचा सामना करण्यास भारतसक्षम आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेचा विकास देशांतर्गत कंझम्पशनवर अवलंबून आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेच्या विकासात डोमेस्टिक कंझम्पशनचा वाटा 60 टक्के आहे.

जून महिन्यात एस अँड पीनं भारतीय अर्थव्यवस्थेसाठी वाढीचा अंदाज जारी केला होता. त्यानुसार चालू आर्थिक वर्षात जीडीपी विकासदर 6.5 टक्के राहील असा अंदाज आहे. मान्सून, क्रूडच्या किमतीमध्ये झालेली घसरण, इन्कमटॅक्समध्ये देण्यात आलेली सूट, महागाई नियंत्रणात असणं आणि आरबीआयच्या पतधोरण विषयक धोरणाचा आधार असल्यानं आणि देशांतर्गत मागणी असल्यानं याशिवाय निर्यातीवरील अवलंबित्व कमी असल्यानं आणि आर्थिक मंदी नियंत्रणात ठेवण्यास मदत होईल. याशिवाय देशांतर्गत मागणी जास्त असल्यानं आर्थिक विकासाला चालना मिळेल.

भारतात जुलैमध्ये किरकोळ महागाई आठवर्षांच्या निचांकी पातळीवर आहे. ही घसरण प्रामुख्यानं खाद्यपदार्थ, भाज्या आणि डाळींच्या

 ISBN NO. 978-81-990957-8-6

किमती कमी झाल्यानं महागाई कमी झाली आहे. CRISIL च्या रिपोर्ट मधील अंदाजा नुसार आर्थिक वर्ष 2025- 2026 महागाई 3.5 टक्के दर राहील, गेल्या वर्षीच्या 4.6 टक्क्यांपेक्षा कमी आहे.

टॅरिफचा थोडासा प्रभाव जाणवणार

अमेरिकेकडून लादलंजाणारं टॅरिफ सध्या अनेक देशां समोरील आव्हान आहे. PHDCCI च्या अंदाजानुसार अमेरिकेच्या टॅरिफचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर 0.19 टक्के परिणाम होऊ शकतो, त्यावर सहजपणे मार्ग काढला जाऊ शकतो. टॅरिफमुळं भारताच्या 8.1 अब्ज डॉलर्सच्या निर्यातीवर परिणाम होईल. अमेरिकेच्या टॅरिफमुळं भारताचा जागतिक व्यापार निर्यात 1.87 टक्के प्रभावित होईल.

कु. साधना मुंडे
कु. भूमीका नागडा

स्वातंत्र्य दिनानिमित्त SBI चा मोठा निर्णय! अग्निवीरांसाठी सुरु केली खास योजना, जाणून घ्या सविस्तर माहिती

SBI Scheme Agniveer News : 79 व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त भारत सरकारच्या अल्पकालीन अग्निपथ भरती कार्यक्रमांतर्गत भरती झालेल्या अग्निवीरांसाठी(Agniveer) स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) ने एक विशेष वैयक्तिक कर्ज योजना सुरू केली आहे.

एसबीआयने आज या योजनेची घोषणा केली आहे. या कर्ज योजनेअंतर्गत, एसबीआयमध्ये पगार खाते असलेल्या अग्निवीरांना कोणत्याही हमीशिवाय 4 लाख रुपयांपर्यंत कर्ज मिळू शकेल. यासोबतच, त्यावर कोणताही प्रक्रिया शुल्क आकारला जाणार नाही.

अग्निवीर जवानांसाठी विशेष कर्ज योजना.

परतफेडीचा कालावधी अग्निपथ योजनेच्या सेवा कालावधीनुसार असेल. याशिवाय, बँक 30 सप्टेंबर 2025 पर्यंत सर्व संरक्षण कर्मचाऱ्यांना किमान 10.50 टक्के व्याजदर देत आहे. एसबीआयचे अध्यक्ष सी. एस. शेट्टी यांनी दिलेल्या माहितीनुसार, एसबीआयमध्ये, आम्हाला असे वाटते की जे आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करत आहेत त्यांना त्यांचे भविष्य घडविण्यासाठी आमच्या अटळ पाठिंब्याची आवश्यकता आहे. ही शून्य-प्रक्रिया शुल्क ही फक्त सुरुवात आहे. आम्ही येणाऱ्या काळात भारताच्या नायकांना सक्षम बनवणारे उपाय तयार करत राहू. हा उपक्रम अग्निवीरांसाठी दीर्घकाळ उपलब्ध असलेल्या संरक्षण वेतन पॅकेजद्वारे भारताच्या सशस्त्र दलांच्या कल्याणासाठी बँकेच्या दीर्घकालीन वचनबद्धतेचा एक भाग आहे.

अग्निवीरांची पहिली तुकडी 2026 मध्ये निवृत्त होणार

14 जून 2022 रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने भारतीय तरुणांसाठी सशस्त्र दलात सेवा करण्यासाठी एक आकर्षक भरती योजना मंजूर केली. या योजनेला अग्निपथ योजना असे नाव देण्यात आले होते. त्याअंतर्गत भरती होणाऱ्या तरुणांना अग्निवीर म्हटले जाते. या योजनेत, तरुणांना चार वर्षांसाठी सैन्यात सेवा करण्याची संधी मिळते, त्यानंतर ते निवृत्त होतील. अशा प्रकारे, 2026 च्या अखेरीस, अग्निपथ योजनेअंतर्गत भरती झालेली पहिली तुकडी निवृत्त होईल. दरम्यान, या कर्ज योजनेअंतर्गत, एसबीआयमध्ये पगार खाते असलेल्या अग्निवीरांना कोणत्याही हमीशिवाय 4 लाख रुपयांपर्यंत कर्ज मिळू शकेल. यासोबतच, त्यावर कोणताही प्रक्रिया शुल्क

 ISBN NO. 978-81-990957-8-6

आकारला जाणार नाही. या कर्जाचा मोठा फायदा अग्निवीरांना होणार आहे.

अग्नीवीर ही भारतीय सशस्तर दलात भरती होण्याची मोठी संधी आहे. या योजनेअंतर्गत, तरुण चार वर्षांसाठी सशस्त्र दलात सेवा करू शकतात. या योजनेत निवडलेल्या तरुणांना अग्निवीर म्हणून ओळखले जाते. या योजनेद्वारे निवडलेल्या तरुणांना 4 वर्षांसाठी सशस्त्र दलात काम करण्याची संधी मिळते. या योजनेचा उद्देश हा तरुण आणि तंदुरुस्त तरुणांना देशाच्या संरक्षणासाठी तयार करणे हा आहे.

शिवानी यादव

निकिता तोमर

14/08/2025

15 ऑगस्टनंतर SBI ग्राहकांच्या खात्यातून होणार अशी कपात, जी अनेकांना करेल आश्चर्यचकित.

State Bank Of india - स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) ने आपल्या ग्राहकांसाठी तात्काळ पैसे हस्तांतरण सेवेत (IMPS) बदल जाहीर केला आहे. १५ ऑगस्ट २०२५ पासून ऑनलाइन मोठ्या रकमेच्या IMPS व्यवहारांवर नाममात्र शुल्क आकारले जाईल.

सध्या सर्व ऑनलाइन IMPS व्यवहार मोफत आहेत, परंतु आता फक्त २५,००० रुपयांपर्यंतचे व्यवहारच मोफत राहतील.

IMPS म्हणजे काय ?

IMPS ही राष्ट्रीय पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI) द्वारे चालवली जाणारी तात्काळ पैसे हस्तांतरण सेवा आहे. ही सेवा २४ तास उपलब्ध असून, रविवार आणि सुट्ट्यांवरही पैसे त्वरित पाठवता येतात. इंटरनेट बँकिंग, मोबाइल बँकिंग, एटीएम किंवा बँक शाखेद्वारे ही सेवा वापरता येते. खाते क्रमांक आणि IFSC कोड किंवा मोबाइल नंबर आणि MMID वापरून पैसे पाठवले जाऊ शकतात. NEFT च्या तुलनेत IMPS मध्ये पैसे तात्काळ जमा होतात आणि एकदा व्यवहार झाला की तो थांबवता येत नाही.

SBI चे नवे शुल्क

SBI ने ऑनलाइन IMPS व्यवहारांसाठी नवे शुल्क निश्चित केले आहे:

२५,००० रुपयांपर्यंत: मोफत

२५,००१ ते १ लाख: २ रुपये + जीएसटी

१ लाख ते २ लाख: ६ रुपये + जीएसटी

२ लाख ते ५ लाख: १० रुपये + जीएसटी

केंद्र व राज्य सरकार कर्मचारी, रेल्वे आणि संरक्षण क्षेत्रातील सॅलरी पॅकेज खातेदारांना या शुल्कातून सूट मिळेल. बँक शाखेद्वारे होणाऱ्या IMPS व्यवहारांवर कोणताही बदल झालेला नाही. येथे २ रुपये + जीएसटीपासून २० रुपये + जीएसटीपर्यंतचे शुल्क लागू राहील.

इतर बँकांशी तुलना

इतर बँकांमध्ये IMPS वर आधीपासूनच शुल्क आकारले जाते:

कॅनरा बँक: १,००० रुपयांपर्यंत मोफत, ५ लाखांपर्यंत २० रुपये + जीएसटी.

पंजाब नॅशनल बँक: १,००१ ते १ लाखापर्यंत ५ रुपये + जीएसटी, त्यापुढे १० रुपये + जीएसटी.

ICICI बँक: १,००० पर्यंत २.५ रुपये + जीएसटी, १ लाखापर्यंत ५ रुपये + जीएसटी.

कोटक महिंद्रा बँक: नेट/मोबाइल बँकिंगद्वारे IMPS मोफत.

इंडियन बँक: १,००० पर्यंत मोफत, मोठ्या रकमेवर १५ रुपये + जीएसटी.

ग्राहकांसाठी का महत्त्वाचे?

 ISBN NO. 978-81-990957-8-6

IMPS हे भारतातील सर्वात जलद आणि सोयीस्कर पैसे हस्तांतरणाचे साधन आहे. SBI च्या नव्या शुल्कामुळे छोट्या व्यवहारांवर परिणाम होणार नाही, परंतु मोठ्या रकमेच्या व्यवहारांसाठी खर्च वाढू शकतो. त्यामुळे ग्राहक NEFT, RTGS किंवा UPI सारख्या पर्यायांचा विचार करू शकतात.

शिवानी यादव
निकिता तोमर

बस बनवणाऱ्या कंपनीला ₹५९४ कोटींचा नफा; शेअर खरेदीसाठी उड्या, ₹१२१ वर आला भाव

Ashok Leyland Q1 Results: हिंदुजा समुहाची भारतीय प्रमुख कंपनी असलेल्या बस निर्माता अशोक लेलँडनं गुरुवारी, १४ ऑगस्ट रोजी जून तिमाहीचे निकाल जाहीर केले. जून तिमाहीत कंपनीचा निव्वळ नफा वार्षिक आधारावर १३.४% वाढून ५९४ कोटी रुपये झाला, जो गेल्या वर्षीच्या याच तिमाहीत ५२५ कोटी रुपये होता.

हा आकडा विश्लेषकांच्या अंदाजापेक्षाही जास्त आहे. कंपनीनं पहिल्या तिमाहीत ८,७२५ कोटी रुपयांचा सर्वाधिक महसूल नोंदवला, जो आर्थिक वर्ष २०२५ च्या पहिल्या तिमाहीत ८,५९८ कोटी रुपयांपेक्षा १.५% जास्त आहे. तसंच, पहिल्या तिमाहीत व्यावसायिक वाहनांची विक्रीही विक्रमी ४४,२३८ युनिट्स इतकी नोंदवली गेली. आज कंपनीचे शेअर्स २ टक्क्यांनी वाढून १२१.४५ रुपये झालेत.

रॉकेट बनले Muthoot Finance कंपनीचे शेअर्स, १० टक्क्यांपेक्षा अधिक तेजी; टार्गेट प्राईजही वाढवली

काय आहे अधिक माहिती?

ऑपरेटिंग पातळीवर, EBITDA ₹९७० कोटी होता, जो आर्थिक वर्ष २५ च्या पहिल्या तिमाहीतील ₹९११ कोटींवरून ६.५% जास्त आहे. खर्च नियंत्रणाच्या उपायांमुळे मार्जिन ५० बेसिस पॉइंट्सनं वाढून १०.६% वरून ११% झालं आहे. "देशांतर्गत MHCV उद्योग विक्री गेल्या वर्षीच्या पहिल्या तिमाहीतील उच्च आधारावर जवळजवळ स्थिर राहिली. अशोक लेलँडच्या MHCV ट्रक विक्रीत (संरक्षण वगळता) २% वाढ झाली, ज्यामुळे त्याचा बाजार हिस्सा २८.९% वरून ३०.७% झाला. MHCV बस TIV (इलेक्ट्रिक वाहने वगळता) ५% वाढ झाली. अशोक लेलँडनं MHCV बसेसमध्ये देशांतर्गत बाजारपेठेत आपलं आघाडीचं स्थान कायम ठेवलं आहे," असं कंपनीनं त्यांच्या अहवालात म्हटलंय.

कंपनीनं काय म्हटलं?

कंपनीनं पहिल्या तिमाहीतील सर्वाधिक १५,५६६ वाहनांची देशांतर्गत विक्री नोंदविली आहे. पहिल्या तिमाहीत निर्यातीचं प्रमाण २९ टक्क्यांनी वाढून ३,०११ युनिट झालंय. पॉवर सोल्युशन्स, आफ्टरमार्केट आणि डिफेन्स व्यवसायांनीही आर्थिक कामगिरीत महत्त्वपूर्ण योगदान दिलं. "अशोक लेलँडनं प्रभावी बाजार अंमलबजावणी आणि कठोर व्यवस्थापनाद्वारे अपेक्षेपेक्षा अधिक मजबूत तिमाही कामगिरी केली आहे," अशी प्रतिक्रिया अशोक लेलँडचे अध्यक्ष धीरज हिंदुजा यांनी दिली.

(टीप - यामध्ये केवळ शेअरच्या कामगिरीविषयी माहिती देण्यात आलेली आहे. हा गुंतवणुकीचा सल्ला नाही. यातील तज्ज्ञांची मतं त्यांची वैयक्तिक मतं आहेत. कोणत्याही प्रकारची

 ISBN NO. 978-81-990957-8-6

गुंतवणूक करण्यापूर्वी या क्षेत्रातील जाणकार किंवा तज्ज्ञांचा सल्ला घेणं आवश्यक आहे.)

15/08/2025

Sensex=80,597.66

Nifty=24,631.30

Gold Price=₹ 9,280

Silver Price=₹ 116.10

Patanjali Foods Share Price Marathi News:

एफएमसीजी कंपनी पतंजली फूड्स लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीचे आर्थिक निकाल जाहीर केले. यासोबतच कंपनीने लाभां शाची रेकॉर्ड डेटही जाहीर केली.

पतंजली फूड्स लिमिटेड कंपनीने गुरुवारी सांगितले की जून तिमाहीत त्यांचा एकत्रित निव्वळ नफा ३१ टक्क्यांनी घसरून १८०.३५ कोटी रुपये झाला आहे.

गेल्या वर्षी याच तिमाहीत कंपनीचा निव्वळ नफा २६२.७२ कोटी रुपये होता. कंपनीने २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी अंतिम लाभांशाची रेकॉर्ड डेटही जाहीर केली. गुरुवारी पतंजली फूड्स लिमिटेडच्या शेअरची किंमत २.१५% घसरून १,७५८.९० रुपयांवर बंद झाली. कंपनीचे मार्केट कॅप ६४.०७ हजार कोटी रुपये आहे.

कु. साधना मुंडे
कु. भूमीका नागडा

दिवाळीत मोदी देशाला देणार मोठे गिफ्ट, GST बद्दल केली मोठी घोषणा, करात मिळणार दिलासा

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने लाल किल्ल्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना यंदाच्या दिवाळीला मोठं गिफ्ट देण्याची घोषणा केली. यावेळी त्यांनी जीएसटी (GST) सुधारणा आणि कर कपातीच्या माध्यमातून रोजच्या वापरातील वस्तू स्वस्त करण्याचं आश्वासन दिलं."सामान्य माणसासाठी कर कमी करणं ही काळाची गरज आहे," असं मोदी म्हणाले. या घोषणेने सामान्य नागरिकांमध्ये आनंदाचं वातावरण पसरलं आहे.

GST सुधारणा: सामान्य माणसाला दिलासा

पंतप्रधानांनी सांगितलं की, जीएसटी सुधारणांमुळे दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या किमती कमी होतील. यामुळे मध्यमवर्गीय आणि सर्वसामान्य कुटुंबांना मोठा दिलासा मिळेल. "दिवाळी हा प्रकाशाचा सण आहे, आणि यंदा करसवलतीच्या माध्यमातून आम्ही सामान्य माणसाच्या जीवनातही प्रकाश आणू," असं मोदींनी ठामपणे सांगितलं. या सुधारणांमुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळेल आणि बाजारपेठेत मागणी वाढेल, असा विश्वास तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

सेमीकंडक्टर आणि संरक्षण क्षेत्रात प्रगती

पंतप्रधानांनी आत्मनिर्भर भारताच्या दृष्टिकोनावर जोर देताना सेमीकंडक्टर आणि संरक्षण क्षेत्रातील प्रगतीचा उल्लेख केला. "50-60 वर्षांपूर्वी सेमीकंडक्टर कारखान्याची कल्पना मूळातच नष्ट करण्यात आली होती. पण आता आम्ही मिशन मोडवर काम करत आहोत. यावर्षाच्या अखेरीस 'मेड इन इंडिया' सेमीकंडक्टर चिप्स बाजारात येणार आहेत," असं त्यांनी सांगितलं. यामुळे तंत्रज्ञान क्षेत्रात भारताची स्वावलंबनाची वाटचाल अधिक बळकट होणार आहे.

संरक्षण क्षेत्रातही भारताने मोठी झेप घेतली आहे. "#OperationSindoor मध्ये मेड इन इंडियाच्या शस्त्रास्त्रांनी शत्रूंना धक्का दिला. गेल्या

 ISBN NO. 978-81-990957-8-6

10 वर्षांत आम्ही संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर होण्याचं लक्ष्य ठेवलं आणि आज त्याचे परिणाम दिसत आहेत," असं मोदी म्हणाले. तसेच, स्वदेशी लढाऊ विमानांसाठी जेट इंजिन्स बनवण्याचं आवाहन त्यांनी तरुण शास्त्रज्ञ आणि अभियंत्यांना केलं

कु. दुर्गा संतोष साखरे, कु. संभाजी तोटरे

'ज्ञान भारतम' योजना'

बऱ्याच काळापासून दुर्लक्षित असलेल्या जुन्या हस्तलिखिते आणि कागदपत्रांचे डिजिटलायझेशन केले जात आहे व जतन करणे गरजेचे आहे त्यासाठी ही योजना महत्वाची आहे.

भारताची भाषिक विविधता अफाट आणि अमूल्य आहे. आपण मराठी, आसामी, बंगाली, पाली आणि प्राकृत यांना अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. आपल्या भाषा जितक्या समृद्ध असतील तितक्या ज्ञान प्रणाली मजबूत असतील. या डेटा युगात ती एक जागतिक शक्ती आहे. आपल्याला त्याचा अभिमान असला पाहिजे आणि तिच्या विकासासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आपण जुन्या हस्तलिखिते आणि कागदपत्रे दुर्लक्षित केली आहेत. परंतु ज्ञान भारतम योजनेअंतर्गत, आपण त्यांचे डिजिटलायझेशन करत आहोत आणि भावी पिढ्यांसाठी त्यांचे जतन करत आहोत.

कु. दुर्गा संतोष साखरे
कु. संभाजी तोटरे

स्वातंत्र्यदिनी सोन्याचे दर ११०० रुपयांनी घसरले

सोन्याच्या दरात घसरण होत असल्याने सोने खरेदी करण्याची सुवर्णसंधी आहे. सोन्याचे भाव प्रति तोळ्यामागे ११० रुपयांची घसरण झाली आहे.

स्वातंत्र्यदिनी सोन्याचे दर घसरल्याने सर्वसामान्यांना दिलासा मिळाला आहे. सोन्याचे दर १० तोळ्यामागे ११०० रुपयांची घसरण झाली आहे.

मोदी सरकार दिवाळीपूर्वी GST सुधारणा आणणार काय होणार स्वस्त

जीएसटीत सुधारणा केल्यानंतर सामान्य माणसांवरील खर्चाचा बोझा कमी होईल. दैनंदिन वापराच्या वस्तू स्वस्त होतील, ज्यामुळे आपली अर्थव्यवस्था मजबूत होईल.

केंद्र सरकार सध्याचे १२% आणि २८% जीएसटी स्लॅब रद्द करू शकते आणि फक्त ५% आणि १८% जीएसटी स्लॅब ठेवू शकते. २८% कर स्लॅबमध्ये येणाऱ्या ९०% वस्तूंवरील कर १८% पर्यंत कमी करेल. तसेच १२% स्लॅबमध्ये समाविष्ट असलेल्या वस्तू ५% स्लॅबमध्ये आणण्याचा विचार सरकारचा आहे. सरकार ४०% चा नवीन स्लॅब देखील आणू शकते, ज्यामध्ये तंबाखू, पान मसाला आणि इतर लक्झरी वस्तूंचा समावेश असू शकतो.

कोणत्या वस्तू स्वस्त होऊ शकतात?

जर सरकारने १८% स्लॅबमध्ये समाविष्ट असलेल्या वस्तू ५% स्लॅबमध्ये आणल्या तर सामान्य माणसाला याचा जास्त फायदा होईल. सध्या दैनंदिन वापराच्या अनेक वस्तूंवर १८% जीएसटी आकारला जातोय. बहुतेक वस्तूंचाही १२% स्लॅबमध्ये समावेश आहे. जर १२% कर स्लॅब रद्द करून त्यात समाविष्ट असलेल्या वस्तूंवरील जीएसटी ५% केला तर त्याचा फायदा सामान्य माणसांना होईल.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

दरम्यान १२% जीएसटी स्लॅबमध्ये नमकीन, भुजिया आणि इतर स्नॅक्स, ज्यूस, बदाम, अक्रोड, काजू, लोणी, तूप आणि चीज तसंच ५०० रुपयांपेक्षा कमी किमतीचे शूज, चप्पल आणि सँडल, १००० रुपयांपेक्षा कमी किमतीच्या साड्या, सूट आणि कुर्ता या सारखे कपडे, मोबाईल फोन, चार्जर, कम्प्युटर आणि लॅपटॉप, पॅकेज्ड आयुर्वेदिक, युनानी आणि होमिओपॅथिक औषधं, कॉन्टॅक्ट लेन्स आणि चष्मा, केसांचं तेल, साबण, टूथपेस्ट आणि शेतीमध्ये वापरल्या जाणाऱ्या उत्पादनांचा समावेश आहे.यावरील जीएसटी १२ वरून ५% पर्यंत कमी केला तर त्याचे दर कमी होतील.

१८% जीएसटी दर हा मध्यम-उच्च स्लॅब आहे. या स्लॅबमध्ये अशी उत्पादनं आणि सेवांचा समावेश आहे ज्या अत्यंत आवश्यक नाहीत. बिस्किटे, केक, पेस्ट्री आणि इतर बेकरी उत्पादनं (पॅकेज्ड आणि ब्रँडेड), ब्रँडेड कॉर्नफ्लेक्स,पास्ता, मॅकरोनी, नूडल्स, ३२ इंचांपर्यंतचे एलसीडी/एलईडी टीव्ही, कॅमेरा, स्पीकर, हेडफोन, रेफ्रिजरेटर,वॉशिंग मशीन, हीटर, कॉफी मेकर,

सौंदर्यप्रसाधनं, शॅम्पू, केसांचे रंग, १००० रुपयांपेक्षा जास्त किमतीचे तयार कपडे, ५०० रुपयांपेक्षा जास्त किमतीची पादत्राणं, ॲल्युमिनियमचे दरवाजे, खिडक्या, तारा आणि केबल्स आणि काचेच्या वस्तू, तसेच प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांवर १८% जीएसटी लावण्यात येतो. जर जीएसटी १८ टक्क्यांवरून ५ टक्के करण्यात येईल असा अंदाज आहे.

प्रधानमंत्री विकसित भारत योजना आजपासून लागू तरुणांना मिळणार 15 हजार

भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी लाल किल्ल्यावरुन देशबांधवांना संबोधन केले.

प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेची घोषणा

प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेच्या माध्यमातून खासगी क्षेत्रात पहिली नोकरी मिळवणाऱ्या तरुणांना १५ हजार रुपये प्रोत्साहनपर आर्थिक मदत दिली जाईल. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, मी देशातील तरुणांना खुशखबर घेऊन आलो आहे, याद्वारे तरुणांना एक लाख कोटी रुपयांची योजना सुरु करत आहे.

तरुणांना मिळणार १५ हजार रुपये

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घोषणा केली की, "आज १५ ऑगस्ट रोजी देशाच्या स्वातंत्र्य दिनाच्या औचित्यावर देशाच्या युवकांसाठी एक लाख कोटी रुपयांची योजना आपण सुरु करत आहोत. आजपासून प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना लागू होत आहे. पहिली नोकरी करणाऱ्या तरुण-तरुणींना पंधरा हजार रुपये मिळणार आहे. कंपन्यांनाही प्रोत्साहनपर आर्थिक लाभ दिला जाईल."

कु. दुर्गा संतोष साखरे
कु. संभाजी तोटरे

३००० रुपयांचा फास्टॅग पास, वर्षभर करता येणार मोफत प्रवास

आता फास्टॅग पास सुरु झाला आहे.आता तुम्हाला वर्षाला फक्त ३००० रुपयांचा फास्टॅग

 ISBN NO. 978-81-990957-8-6

पास काढायचा आहे. यामुळे तुम्हाला वर्षभर मोफत प्रवास करता येणार आहे.

टोल प्लाझावर जास्त वेळ थांबावे लागणार नाही. आजपासून हा फास्टॅग पास सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, आता या पासमुळे सातारा, सांगली आणि कोल्हापूरकरांना फायदा होणार आहे.

हा फास्टॅग पास तुम्ही सरसकट सर्व टोल प्लाझावर वापरु शकत नाही. तुम्हाला फक्त राष्ट्रीय महामार्ग आणि एक्सप्रेसवेवर पास वापरता येणार आहे. दरम्यान, या निर्णयाचा फायदा कोल्हापूर, सांगली आणि साताऱ्यातील लोकांना होणार आहे. या मार्गातील टोल प्लाझावर तुम्हाला टोल भरावा लागणार नाहीये. असं जरी असले तरीही या पासचा फायदा पर्यटनासाठी किंवा कामासाठी बाहेर जाणाऱ्यांना विशेष फायदा होणार आहे.असे जरी असले तरीही वर्षभरात २०० फेऱ्या होणार नाही, अशा प्रतिक्रिया नागरिकांनी दिल्या आहेत.

कु. दुर्गा संतोष साखरे
कु. संभाजी तोटरे

16/08/2025

देशातील सर्वात मोठ्या सरकारी बँकेने होम लोन केले महाग

स्टेट बँक ऑफ इंडियाने (SBI) होम लोनवरचा व्याजदर वाढवून ग्राहकांना धक्का दिला आहे.

बँकेने व्याजदरात 25 बेसिस पॉइंटची वाढ केली असून आता दर 7.50% ते 8.70% दरम्यान असतील.

या निर्णयाचा थेट परिणाम नवीन होम लोन घेणाऱ्यांच्या ईएमआयवर होणार आहे.

आरबीआयकडून रेपो रेटमध्ये कपात करून लोकांना दिलासा देण्याचे प्रयत्न सुरू असतानाच एसबीआयचा हा निर्णय घर घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी धक्कादायक ठरत आहे. सध्या हे बदल केवळ नव्या ग्राहकांवर लागू होणार असल्याचे बँकेने स्पष्ट केले आहे

कु. संध्या पदमगिरवार

शेअर बाजारात नुकसान होतंय? सुरक्षित परताव्यासाठी 'या' 6 योजनांमध्ये करा गुंतवणूक

Stock Market: शेअर बाजारात रोजचे चढ-उतार पाहून अनेक गुंतवणूकदार अस्वस्थ झाले आहेत. कधी मोठा नफा तर कधी अचानक तोटा, या रोलर-कोस्टरमुळे मनात भीती निर्माण झाली आहे. गुंतवणूकदारांना फक्त इतकंच हवं असतं की त्यांची गुंतवणूक सुरक्षित राहावी आणि निश्चित परतावा मिळावा.

अशा गुंतवणूकदारांसाठी 6 सुरक्षित गुंतवणुकीचे पर्याय उपलब्ध आहेत. या योजनांमध्ये ठराविक लॉक-इन कालावधी असला, तरी त्याचा फायदा म्हणजे सुरक्षित गुंतवणूक आणि ठरलेला रिटर्न.

1. फिक्स्ड डिपॉझिट (FD)

बँका आणि काही वित्तीय संस्था गुंतवणूकदारांना हमीशीर परतावा देतात. बहुतेक बँका 1 वर्षाच्या एफडीवर 5-6% वार्षिक व्याज देतात. एनबीएफसी किंवा स्मॉल फायनान्स बँका थोडे अधिक व्याज देतात.

2. नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेट (NSC)

लहान बचतीसाठी हा पर्याय लोकप्रिय आहे. एनएससीवर 7.7% व्याज मिळते. 1,000

 ISBN NO. 978-81-990957-8-6

रुपयांपासून खाते उघडता येतं आणि 5 वर्षांचा लॉक-इन कालावधी असतो. गुंतवणुकीसाठी कमाल मर्यादा नाही.

3. पब्लिक प्रॉव्हिडंट फंड (PPF)

दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी पीपीएफ उत्तम आहे. यात 7.1% वार्षिक व्याज मिळतं. किमान 500 रुपये आणि कमाल 1.5 लाख रुपये वार्षिक गुंतवणूक करता येते. मात्र यात 15 वर्षांचा लॉक-इन असतो.

4. डेट म्युच्युअल फंड

हाही सुरक्षित पर्याय मानला जातो. मनी मार्केट, शॉर्ट ड्युरेशन, लॉन्ग ड्युरेशन किंवा लिक्विड फंड अशा प्रकारांवरून परतावा ठरतो. जरी परताव्यात थोडा फरक असला तरी जोखीम कमी असते.

5. नॅशनल सेव्हिंग रिकरिंग डिपॉझिट

या योजनेवर 6.7% व्याज मिळतं. 100 रुपयांपासून खाते उघडता येतं आणि गुंतवणुकीवर कोणतीही मर्यादा नाही.

6. रिकरिंग डिपॉझिट (RD)

दर महिन्याला थोडी-थोडी बचत करून चांगलं व्याज मिळवता येतं. बँक किंवा पोस्ट ऑफिसमधून हे खाते उघडता येतं. राष्ट्रीय आरडी योजनेत 6.7% वार्षिक व्याज मिळतं.

शेअर बाजारातील चढ-उतार टाळून आपले पैसे सुरक्षित ठेऊ इच्छिणाऱ्यांसाठी या योजना आहेत. गुंतवणूक करताना आपला उद्देश, कालावधी आणि जोखीम क्षमता लक्षात घेणं महत्त्वाचं आहे.

कु. गजानन राजरवाड

17/08/2025

2050 मध्ये आजच्या 1 कोटी रुपयांचे मूल्य किती असेल?

आज जर तुमच्याकडे 1 कोटी रुपये असतील, तर तुम्ही करोडपती आहात. तुम्ही म्हणाल की या पैशात मुलीचं लग्न थाटामाटात करता येईल, मुलांना परदेशात शिकवता येईल किंवा एखादं मोठं घर घेता येईल. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की 25 वर्षांनंतर म्हणजेच 2050 मध्ये या 1 कोटी रुपयांची किंमत किती असेल?

आजचे 1 कोटी रुपये 25 वर्षांनी केवळ 29.53 लाख असतील.

महागाई म्हणजे वस्तू आणि सेवांच्या किमती वाढत जाणं आणि पैशाची खरेदीशक्ती कमी होत जाणं. गेल्या 20-25 वर्षांत भारतात किरकोळ महागाई सरासरी 6% पेक्षा जास्त राहिली आहे. अलीकडच्या वर्षांत ती थोडी कमी झाली असली तरी, येत्या 25 वर्षांत सरासरी 5% महागाई राहील म्हणून

महागाईमुळे भविष्यात त्याच खर्चासाठी तब्बल 3.4 कोटी रुपयांची गरज भासेल.

म्युच्युअल फंड्स आणि शेअर बाजार हे दीर्घकालीन दृष्टीने महागाईपेक्षा जास्त परतावा देऊ शकतात. मात्र त्यात जोखीम आहे. यात कधी परतावा भरघोस, तर कधी तोटा होतो. स्थिरतेसाठी सरकारी योजना आणि बँक ठेवी चांगल्या; पण जोखीम घेण्याची क्षमता असेल, तर इक्विटी म्युच्युअल फंड किंवा SIP दीर्घकालीन दृष्टीने जास्त फायदेशीर आहेत.

योग्य गुंतवणूक आणि फायनान्शियल प्लॅनिंगशिवाय पैशाची किंमत टिकवणे अशक्य आहे.

महागाईवर मात करणाऱ्या 5 सुरक्षित योजना

(ऑगस्ट 2025 चे दर)

 ISBN NO. 978-81-990957-8-6

1.पब्लिक प्रॉविडंट फंड (PPF) - व्याजदर 7.10% p.a. (करमुक्त, 15 वर्षांचा लॉक-इन)
2.नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेट (NSC) - व्याजदर 7.7% p.a. (5 वर्षांचा लॉक-इन, 80C करसवलत)
3.किसान विकास पत्र (KVP) - व्याजदर 7.5% p.a. (सुमारे 9.5 वर्षांत पैसा दुप्पट)
4.सिनियर सिटिझन सेव्हिंग स्कीम (SCSS) - व्याजदर 8.2% p.a. (करसवलत, निवृत्ती धारकांसाठी उत्तम)
5.फिक्स्ड डिपॉझिट (FDs) - 6.6%-7% (मोठ्या बँका), 8%-8.25% (काही लहान बँका)

कु. गजानन राजरवाड

मिनिमम बॅलेन्सच्या नावाखाली बँकांची 'इतक्या' कोटींची कमाई; आकडे हादरवणारे

Banks ₹9,000 Crore Minimum Balance : भारतातील बँकिंग ग्राहकांसाठी 'किमान शिल्लक रक्कम' (Minimum Balance) हा शब्द अपरिचित नाही. आपल्यापैकी अनेकांनी हा अनुभव घेतलाच असेल थोडेसे पैसे कमी पडले, आणि महिन्याच्या शेवटी खात्यातून दंड कापला गेला.पाच वर्षांचा आकडा चकित करणारा

अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी संसदेत दिलेल्या माहितीनुसार, गेल्या पाच वर्षांत भारतातील सरकारी बँकांनी किमान शिल्लक न ठेवल्याबद्दल तब्बल ८,९३२.९८ कोटी रुपये दंडाच्या स्वरूपात ग्राहकांकडून वसूल केले. याचा अर्थ असा की, लाखो ग्राहक आपल्या खात्यात 'Minimum Balance' राखू शकले नाहीत, आणि त्या प्रत्येक वेळेला बँकेच्या खात्यात दंडाच्या रुपाने कोट्यवधी रुपये जमा होत गेले.

कोणत्या बँकेने किती वसूल केले?

या कालावधीत इंडियन बँक दंड वसुलीच्या यादीत अव्वल ठरली. तिने तब्बल १,८२८ कोटी रुपये ग्राहकांकडून घेतले. त्यानंतर पंजाब नॅशनल बँक (PNB) ने १,६६२ कोटी रुपये आणि बँक ऑफ बडोदाने १,५३१ कोटी रुपये जमा केले. कॅनरा बँकने १,२१२ कोटी रुपये, तर बँक ऑफ इंडियाने ८०९ कोटी रुपये वसूल केले. याउलट, देशातील सर्वात मोठी सरकारी बँक स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) ने २०२० मध्येच हा दंड रद्द करण्याचा निर्णय घेतला होता.

किमान शिल्लक म्हणजे काय?

किमान शिल्लक किंवा 'सरासरी मासिक शिल्लक' (Average Monthly Balance - AMB) ही ती रक्कम आहे जी प्रत्येक ग्राहकाने आपल्या खात्यात दरमहा राखणे बंधनकारक असते. ही रक्कम बँकेनुसार, तसेच शहरी-ग्रामीण भागानुसार बदलते. उदाहरणार्थ, पंजाब नॅशनल बँकेत शहरी भागातील किमान शिल्लक ₹२,०००, लहान शहरांत ₹१,०००, तर ग्रामीण भागात केवळ ₹५०० आहे. जर ही रक्कम कमी पडली, तर दंड आकारला जातो, जो ₹१०० ते ₹२५० पर्यंत असू शकतो.

ग्राहकांसाठी दिलासा देणारे बदल

एसबीआयनंतर, कॅनरा बँक, बँक ऑफ बडोदा, पंजाब नॅशनल बँक, इंडियन बँक, बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया आणि युनियन बँक ऑफ इंडिया यांनी किमान शिल्लक रकमेवरील दंड पूर्णपणे रद्द केला आहे. यामागील उद्देश स्पष्ट आहे अधिकाधिक लोकांना बँकिंग सेवांशी जोडणे, विशेषतः ग्रामीण आणि लहान शहरांमध्ये. अर्थ

 ISBN NO. 978-81-990957-8-6

मंत्रालयानेही बँकांना अशा दंडात कपात किंवा रद्द करण्याचा सल्ला दिला आहे.

ग्राहकांसाठी संदेश

किमान शिल्लक राखणे म्हणजे केवळ बँकेचा नियम पूर्ण करणे नाही, तर आपल्या आर्थिक शिस्तीचा भाग आहे. मात्र, बँका या नावाखाली मोठी कमाई करत होत्या, हे समजल्यावर अनेकांना धक्का बसू शकतो. आता मोठ्या प्रमाणात बँका हा नियम रद्द करत असल्याने, सामान्य ग्राहकांना काहीसा दिलासा मिळणार आहे.

कु. संध्या पदमगिरवार

18/08/2025

सेन्सेक्स 46 अंकांच्या वाढीसह उघडला; बँकिंग शेअर्समध्ये विक्री, कोणते शेअर्स तेजीत?

कोणते सेक्टर वाढले?

ऑटो, फार्मा आणि रिअल्टी सेक्टरमध्ये विक्री दिसली

आयटी, मीडिया आणि मेटल सेक्टर मात्र चांगल्या तेजीसह व्यवहार करत आहेत

टॉप गेनर्स

Reliance

Bharti Airtel

Adani Ports

NTPC

Titan

टॉप लूजर्स

Power Grid

HCL Tech

Bajaj Finance

BEL

M&M

जागतिक बाजारातील घडामोडी

डाऊ 34 अंकांनी घसरला तर नॅस्डॅक 6 अंकांनी वर बंद झाला. GIFT निफ्टी 30 अंकांच्या वाढीसह 25 हजारांच्या जवळ राहिला. निक्केईत मात्र 200 अंकांची मोठी घसरण दिसली.

कमोडिटी मार्केटमध्ये क्रूड ऑइल 1.5% वाढून 66 डॉलरच्या वर पोहोचले. सोने 3,375 डॉलरवर आणि चांदी 38 डॉलरच्या आसपास स्थिर राहिली. मात्र, भारतीय बाजारात सोने 400 रुपयांनी घसरून 99,400 वर आणि चांदी 350 रुपयांनी घसरून 1,13,600 च्या आसपास बंद झाली.

राजकीय आणि आर्थिक घडामोडी

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाइट हाऊसमध्ये युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की आणि युरोपीय नेत्यांची बैठक घेतली. रशिया-युक्रेन युद्ध थांबवण्यासाठी ठोस पावले उचलण्याचा संदेश दिला.

बैठकीदरम्यान ट्रम्प यांनी थेट रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांना फोन करून झेलेन्स्की-पुतिन यांची भेट घडवून आणण्याचा प्रयत्न होईल असे सांगितले.

सेबीचे नियम बदलणार?

भांडवली बाजार नियंत्रक SEBI Non-Benchmark Indices साठी कडक नियम आणण्याच्या तयारीत आहे. नव्या नियमांनुसार प्रत्येक इंडेक्समध्ये किमान 14 शेअर्स असणे आवश्यक आहे. याचा थेट परिणाम Nifty Bank आणि Financial Services Index वर होऊ शकतो. तसेच, मार्जिन ऑब्लिगेशनची डेडलाइन 1 सप्टेंबरवरून 10 ऑक्टोबरपर्यंत वाढवण्यात आली आहे.

प्रायमरी मार्केटमध्ये हालचाल

 ISBN NO. 978-81-990957-8-6

आजपासून Shreeji Shipping, Gem Aromatics, Vikram Solar आणि Patel Retail चे आयपीओ उघडणार आहेत. तसेच, Bluestone Jewellery चा शेअर आज लिस्ट होणार असून त्याचा इश्यू प्राईस ₹517 आहे.

कु. तनुजा सूर्यवंशी
कु. स्नेहा जोंधले

19/08/2025

सेन्सेक्स 27 अंकांच्या वाढीसह उघडला; बँकिंग शेअर्समध्ये विक्री, कोणते शेअर्स वाढले?

शेअर बाजारात आज दबाव दिसून आला असून सेन्सेक्स 27 पेक्षा जास्त अंकांनी घसरला आहे.

निफ्टी 25,000 च्या खाली सरकला तर कोटक बँक आणि अल्ट्राटेक हे सर्वात मोठे लूझर्स ठरले.

जवळपास सर्वच सेक्टरमध्ये विक्रीचा दबाव जाणवतोय.

बँक निफ्टी 114 अंक घसरून 55,751वर उघडला.

सर्वाधिक दबाव कोणत्या सेक्टरवर?

सर्वच सेक्टरमध्ये विक्रीचा दबाव दिसला असून मीडिया आणि फार्मा शेअर्स सर्वाधिक घसरले. निफ्टीवरील हे दोन्ही निर्देशांक लाल रंगात आहेत.

जागतिक बाजाराचा परिणाम

अमेरिकन बाजार काल दिवसाच्या उच्चांकावरून घसरले. डाऊ इंट्राडेमध्ये नवा उच्चांक गाठल्यानंतर 300 mअंकांनी खाली आला व अखेरीस फक्त 10 अंकांनी घसरणीसह बंद झाला. एनव्हिडियामध्ये मोठी घसरण झाल्याने नॅस्डॅक 300 अंकांनी वाढला. GIFT निफ्टी 70 अंकांनी घसरून 24,970 च्या आसपास पोहोचला. डाऊ फ्युचर्स 50 अंकांनी घसरला, तर निक्केई 675 अंकांनी कोसळला.

कच्चे तेल 1% घसरून 66 डॉलरच्या आसपास, सोने 20 डॉलर कमी होऊन 3,350 च्या आसपास आणि चांदी तब्बल 2% घसरून 37 डॉलरच्या जवळ पोहोचली. देशांतर्गत बाजारात सोनं 700 रुपयांनी घसरून ₹98,700 वर आणि चांदी 2,200 रुपयांनी घसरून ₹1,11,400 च्या खाली बंद झाली.

ट्रम्पचा मोठा निर्णय

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्टील व ॲल्युमिनियमवरचे 50% टॅरिफ इतर उत्पादनांवरही लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यात कार पार्ट्स व स्पेशालिटी केमिकल्ससह 400 हून अधिक उत्पादनांचा समावेश आहे.

देशांतर्गत पातळीवर फंड हाऊसेसने सलग 31 व्या दिवशी खरेदी केली असून सुमारे ₹2,300 कोटींचे शेअर्स विकत घेतले. एफआयआयने कॅश मार्केटमध्ये ₹600 कोटींची विक्री केली, मात्र डेरिव्हेटिव्ह विभागात ₹1,725 कोटींची खरेदी केली.

मोठ्या कंपन्यांच्या घडामोडी

HAL डील : सरकारने HAL कडून तब्बल ₹ 62,000 कोटींच्या 97 फायटर जेट खरेदीला मंजुरी दिली आहे.

टेलिकॉम अपडेट Jio नंतर आता Bharti Airtel नेही आपला ₹249 चा सर्वात स्वस्त प्लॅन बंद केला आहे. ग्राहकांना आता किमान ₹299 रिचार्ज करावा लागेल.

नवीन कायदा : आज लोकसभेत ऑनलाइन गेमिंग बिल सादर होणार असून ऑनलाइन मनी गेम्सवर संपूर्ण बंदीची तरतूद आहे

Mangal Electrical IPO:

 ISBN NO. 978-81-990957-8-6

आजपासून खुला, प्राइस बँड ₹533-₹561.

Regaal Resources :160 पट सबस्क्राइब इश्यूची लिस्टिंग, प्राइस ₹102.

Shreeji Shipping IPO : पहिल्याच दिवशी 2 पट सबस्क्राइब, प्राइस ₹240-₹252.

Vikram Solar IPO : पहिल्या दिवशी 1.5 पट सबस्क्राइब.

Patel Retail IPO : पहिल्याच दिवशी 6 पट जास्त सबस्क्रिप्शन.

Gem Aromatics IPO : पूर्णपणे सबस्क्राइब.

कु. शैलेजा कोपलवाड
कु. वैष्णवी औंढेकर

दि. 20 Aug 2025

HDFC Bank

HDFC ग्राहकांसाठी महत्त्वाची बातमी; बँकेच्या अत्यावश्यक सेवा दोन दिवस बंद राहणार

1. एचडीएफसी बँक 22 ऑगस्ट रात्री 11 ते 23 ऑगस्ट सकाळी 6 या वेळेत 7 तास काही सेवा बंद ठेवणार आहे.

2. या दरम्यान फोन बँकिंग IVR, व्हॉट्सॲप चॅट बँकिंग आणि SMS बँकिंग उपलब्ध राहणार नाहीत.

3. नेट बँकिंग, मोबाइल बँकिंग ॲप, पेयझॅप आणि मायकार्ड्स सेवा मात्र सुरू राहतील.

HDFC Bank Alert: जर तुम्ही एचडीएफसी बँकेचे ग्राहक असाल, तर ही माहिती तुमच्यासाठी खूप महत्त्वाची आहे. बँकेने जाहीर केले आहे की 22 ऑगस्टच्या रात्री 11 वाजल्यापासून 23 ऑगस्टच्या सकाळी 6 वाजेपर्यंत म्हणजेच तब्बल 7 तास काही सेवा बंद राहतील. हा निर्णय बँकेने सिस्टमच्या देखभालीसाठी (मेंटेनन्स) घेतला आहे, जेणेकरून आगामी काळात सेवा अधिक जलद आणि सुरळीत दिल्या जाऊ शकतील.

कोणकोणत्या सेवा बंद राहणार?

या काळात ग्राहकांना काही महत्त्वाच्या सेवांचा वापर करता येणार नाही. त्यात प्रमुख सेवा अशा असतील:

फोन बँकिंगचा ऑटोमॅटिक IVR सिस्टम

ई-मेल किंवा सोशल मीडियाद्वारे ग्राहक सहाय्य सेवा

व्हॉट्सॲप चॅट बँकिंग

SMS बँकिंग

कोणत्या सेवा सुरू राहतील?

ग्राहकांनी काळजी करण्याची गरज नाही, कारण काही सेवा मात्र या काळातही सुरूच राहतील.

फोन बँकिंग एजंटशी थेट संपर्क

नेट बँकिंग आणि मोबाइल बँकिंग ॲप

पेयझॅप (PayZapp) आणि मायकार्ड्स (MyCards) सेवा

एचडीएफसी बँक नेहमीच आपली तांत्रिक व्यवस्था अधिक सक्षम, सुरक्षित आणि ग्राहकाभिमुख ठेवण्यासाठी काम करते. त्यासाठी नियमितपणे सिस्टम अपग्रेड आणि देखभाल केली जाते. हाच त्याचा एक भाग असून, यामुळे भविष्यात ग्राहकांना अधिक चांगल्या सुविधा आणि सुरळीत सेवा मिळतील.

ग्राहकांना सूचना

जर आपली एखादी महत्त्वाची बँकिंग सेवा वरील बंद होणाऱ्या सेवांशी संबंधित असेल, तर ती कामे 22 ऑगस्ट रात्री 11 वाजण्यापूर्वी पूर्ण करून घ्यावीत. अन्यथा, पुढील 7 तासांकरिता आपल्याला अडचण येऊ शकते. मेंटेनन्स पूर्ण

 ISBN NO. 978-81-990957-8-6

होताच सर्व सेवा पूर्ववत सुरू होतील, असे बँकेने स्पष्ट केले आहे.

कु. शैलेजा कोपलवाड
कु. वैष्णवी औंढेकर

तुमचा CIBIL आताच सुधारा, जर तुमचा सिबिल खराब असेल तर नोकरीही मिळणार नाही

1. संसदेत स्पष्ट झाले की कमी सिबिल स्कोर बँकिंग क्षेत्रातील नोकरीसाठी अडथळा ठरू शकतो.

2. 2023-24 मध्ये 650 स्कोर बंधनकारक होता, पण 2024-25 भरतीत ही अट हटवली आहे.

3. आता अर्ज करताना स्कोर आवश्यक नाही, पण जॉइनिंगपूर्वी क्रेडिट हिस्ट्री दाखवावी लागणार.

CIBIL Score: जर तुम्हाला वाटत असेल की सिबिल स्कोर फक्त लोन किंवा क्रेडिट कार्डसाठी महत्त्वाचा आहे, तर ही बातमी खास तुमच्यासाठी आहे. संसदेत नुकत्याच झालेल्या चर्चेतून स्पष्ट झाले आहे की कमी सिबिल स्कोर नोकरीच्या संधींनाही अडथळा निर्माण करू शकतो, विशेषत: बँकिंग क्षेत्रातील नोकऱ्यांसाठी.

काय आहे सिबिल स्कोर?

सिबिल स्कोर ही तीन अंकी संख्या असते, जी 300 ते 900 च्या दरम्यान असते. हा स्कोर तुमच्या क्रेडिट हिस्ट्रीवर आधारित असतो - म्हणजे घेतलेले कर्ज, क्रेडिट कार्ड बिल्स वेळेवर भरले का, डिफॉल्ट झाले का यावरून तुमची आर्थिक शिस्त मोजली जाते.

आधीचा नियम काय होता?

2023-24 मध्ये बँकिंग क्षेत्रातील नोकरीसाठी अर्ज करताना उमेदवारांकडे किमान 650 सिबिल स्कोर असणे बंधनकारक होते. हा नियम इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सनल सिलेक्शन (IBPS) ने केला होता. यामुळे मध्यमवर्गीय आणि गरीब विद्यार्थ्यांना मोठी अडचण झाली, कारण अनेकांचे शैक्षणिक कर्ज (Education Loan) फेडणे सुरू होते.

आता काय बदलले?

वित्त राज्य मंत्री पंकज चौधरी यांनी संसदेत सांगितले की 2024-25 (CRP-14) भरती प्रक्रियेत हा नियम हटवण्यात आला आहे. आता अर्ज करताना 650 सिबिल स्कोर आवश्यक नाही.

पण... नोकरी जॉइन करण्यापूर्वी उमेदवाराला अपडेटेड क्रेडिट हिस्ट्री दाखवावी लागेल.

क्रेडिट हिस्ट्री बिघडली तर काय होईल?

जर कर्ज किंवा क्रेडिट कार्डची थकबाकी असेल तर उमेदवाराने बँकेतून NOC (नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट) आणणे बंधनकारक आहे.

जर हे शक्य झाले नाही, तर बँक ऑफर लेटर रद्द करू शकते. अंतिम निर्णय बँकेचाच असेल.

बँकांना सिबिल स्कोर का महत्त्वाचा वाटतो?

सरकारचे म्हणणे आहे की राष्ट्रीयीकृत बँका लोकांच्या पैशांचे व्यवस्थापन करतात. त्यामुळे बँक कर्मचाऱ्यांनी आर्थिकदृष्ट्या शिस्तबद्ध असणे गरजेचे आहे. जर कर्मचाऱ्यांचीच वित्तीय स्थिती बिघडलेली असेल, तर त्यांच्यावर विश्वास ठेवणे कठीण होते. त्यामुळेच सिबिल स्कोर हा विश्वासार्हतेचा मापदंड मानला जातो.

म्हणजेच, सिबिल स्कोर केवळ लोनसाठीच नाही तर करिअरसाठीही महत्त्वाचा आहे.

वेळेवर EMI भरणे, क्रेडिट कार्डचा जबाबदारीने वापर करणे आणि डिफॉल्ट टाळणे महत्त्वाचे आहे.

कु. शैलेजा कोपलवाड
कु. वैष्णवी औंढेकर

ISBN NO. 978-81-990957-8-6

फक्त 'या' कारणांमुळे सोन्याचे भाव कोसळले; आज काय आहे 24 कॅरेचा भाव?

1. डॉलर मजबूत झाल्यामुळे आज सोने-चांदीच्या दरात घट झाली.
2. MCX वर सोनं ₹98,650 प्रति 10 ग्रॅमवर आणि चांदी ₹1,10,900 प्रति किलोवर आहे.
3. देशभरातील बुलियन मार्केट आणि प्रमुख शहरांमध्ये सोने-चांदीचे दर कमी झाले आहेत.

Gold Silver Price Today: आज देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारात सोने-चांदीच्या किंमतींमध्ये थोडीशी घसरण झाली आहे. डॉलर इंडेक्समध्ये झालेल्या वाढीमुळे तसेच अमेरिकन फेडरल रिझर्व्हच्या बैठकीच्या निकालाच्या प्रतीक्षेत गुंतवणूकदारांनी सोने-चांदीपासून थोडा हात आखडता घेतला आहे. त्यामुळे बाजारात किंमती खाली आल्या आहेत.

MCX वरील दर

बुधवारी मल्टी कमोडिटी एक्सचेंज (MCX) वर ऑक्टोबर डिलिव्हरी गोल्ड फ्युचर्स 0.05% घसरून ₹98,650 प्रति 10 ग्रॅमवर आले. त्याचबरोबर सप्टेंबर डिलिव्हरी सिल्व्हर कॉन्ट्रॅक्टमध्ये 0.40% ची घसरण झाली असून किंमत ₹1,10,900 प्रति किलो झाली आहे.

बुलियन मार्केटमधील ताजे दर

24 कॅरेट सोने: ₹99,170 प्रति 10 ग्रॅम
22 कॅरेट सोने: ₹96,790 प्रति 10 ग्रॅम
चांदी: ₹1,13,625 प्रति किलो

मुख्य शहरांतील दर

दिल्ली: 24 कॅरेट ₹98,490, 22 कॅरेट ₹90,283, चांदी ₹1,11,060
मुंबई: 24 कॅरेट ₹98,620, 22 कॅरेट ₹90,402, चांदी ₹1,11,180
चेन्नई: 24 कॅरेट ₹98,900, 22 कॅरेट ₹90,658, चांदी ₹1,11,510

दर का घसरले?

डॉलर इंडेक्समध्ये 0.20% ची वाढ झाली आहे, ज्याचा परिणाम थेट सोने-चांदीच्या मागणीवर झाला. गुंतवणूकदार अमेरिकन फेडरल रिझर्व्हच्या बैठकीकडे लक्ष ठेवून आहेत. सप्टेंबरमध्ये व्याजदरांमध्ये कपात होण्याची शक्यता असल्याने गुंतवणूकदारांनी सध्या सोने-चांदीतील खरेदी कमी केली आहे.

कु. शैलेजा कोपलवाड
कु. वैष्णवी औंढेकर

अमेरिकेच्या टॅरिफविरोधात लढण्यासाठी रशिया भारतासोबत! म्हणाले, भारतीय वस्तूंचे स्वागत, तेलही देणार

अमेरिकेने भारताविरोधात मोठ्या प्रमाणात कर लादला आहे. रशियाकडून तेल खरेदी केल्यामुळे हा कर लादल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, आता रशियाभारतासोबत अमेरिकेच्या कर विरोधात आहे.

जर कोणत्याही देशात भारतीय उत्पादनांवर बंदी घातली जात असेल तर त्यांचे रशियन बाजारपेठेत स्वागत आहे, असे रशियाचे म्हणणे आहे.

भारतातील रशियन मिशनचे उपप्रमुख रोमन बाबुश्किन यांनी हे म्हटले आहे. अमेरिकेने अर्थव्यवस्थेचा वापर शस्त्र म्हणून केला आहे, पण मित्र कधीही निर्बंध लादत नाहीत हे त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. रशिया कधीही असे निर्बंध लादणार

ISBN NO. 978-81-990957-8-6

नाही, असंही ते म्हणाले. भारत आणि रशियाने कठीण काळात नेहमीच सहकार्य कायम ठेवले आहे. आम्ही भारताला कच्च्या तेलाचा पुरवठा करत राहू आणि त्यासाठी एक यंत्रणा तयार केली आहे, असंही त्यांनी स्पष्ट केले.

"खडा हूं आज भी वहीं..."; मतचोरीच्या आरोपांवरून जेपी नड्डांनी घेतली राहुल गांधींची 'फिरकी', VIDEO शेअर करत सगळंच उघडं पाडलं!

पुतिन आणि मोदींची भेट होणार

रोमन बाबुश्किन म्हणाले की, शांघाय सहकार्य संघटनेच्या बैठकीच्या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची भेट होईल. या बैठकीत अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा होऊ शकते. व्लादिमीर पुतिन यांच्या भारत भेटीबद्दल त्यांनी सांगितले की, त्यांच्या तारखा निश्चित नाहीत. ते म्हणाले की, भारत आणि रशियामधील व्यापार वेगाने वाढत आहे आणि २०३० पर्यंत तो १०० अब्ज डॉलर्सच्या पुढे जाईल. याशिवाय, भारताला खते आणि तेल, वायू इत्यादी पुरवठा करण्यात रशिया पहिल्या क्रमांकावर आहे.

रशियन राजदूत म्हणाले की, अमेरिकेची रणनीती चुकीची आहे. ते उलटसुलट टीका करत आहेत. टॅरिफ वॉरमुळे डॉलरवरील विश्वास कमकुवत झाला आहे.

"रशिया भारतासोबतचा व्यापार असमतोल दूर करण्यासाठी पावले उचलेल. रशियाला भारतीय निर्यात वाढणे महत्त्वाचे आहे. आम्हाला भारतातून यंत्रसामग्री, औषध, चहा आणि तांदूळ यासारख्या वस्तूंची आयात वाढवायची आहे, असंही रशियन राजदूत म्हणाले. एवढेच नाही तर अमेरिकेने घेतलेला टॅरिफचा निर्णय चुकीचा आणि एकतर्फी असल्याचे त्यांनी सांगितले.

भारत रशियाकडून तेल खरेदी करणे थांबवू शकतो का. यावर त्यांनी सांगितले की, मला असे वाटत नाही. त्यांनी सांगितले की, आम्ही भारताशी चर्चा करू आणि सर्व समस्या सोडवू.

कु. शैलेजा कोपलवाड
कु. वैष्णवी औंढेकर

21/08/2025

इक्विटी डेरिव्हेटिव्ह्जचा कालावधी वाढवण्यासाठी एक सल्लामसलत पत्र जारी केले जाईल असे सेबीचे अध्यक्ष म्हणाले.

तसेच नियामक इक्विटी डेरिव्हेटिव्ह्ज करारांचा कालावधी आणि परिपक्वता सुधारण्याच्या मार्गांवर विचार करत असल्याचे समजले असून यासोबतच रोख बाजारात व्हॉल्यूम वाढवण्याचे मार्ग देखील विचारात घेतले जात आहेत.

शेअर बाजारात उडाली खळबळ

सेबी अध्यक्षांच्या या विधानासोबतच बाजारात एक बातमी आली आहे ज्यामुळे तणाव वाढला आहे. विकली कॉन्ट्रॅक्ट एक्सपायरी संपण्याची शक्यता असल्याचे वृत्त बाजार जंगलातील आगीसारखे पसरले. सेबीच्या अध्यक्षांनी अलीकडेच या वृत्ताचे जोरदार खंडन केले होते पण, आजच्या विधानानंतर बीएसईसह ब्रोकरेज हाऊस कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठी विक्री झाली आहे. गुरुवारी शेअर बाजारात बॉम्बे स्टॉक एक्सचेंज, BSE, शेअर्समध्ये मोठी घसरण झाली.

देशांतर्गत बाजारात एकीकडे तेजीची हवा पसरली असताना BSE शेअर्स सुमारे 6% घसरले आणि एंजल वनचे शेअर्समध्येही 6% पेक्षा जास्त विक्री झाली. SEBI चे अध्यक्ष तुहिन कांता पांडे यांच्या विधानानंतर ही घसरण झाल्याचे समजले

 ISBN NO. 978-81-990957-8-6

जात असून सेबी प्रमुखांच्या विधानानंतर शेअर बाजारात गोंधळ उडाला आणि ब्रोकरेज शेअर्सवर सेबीची नजर असल्याने गुंतवणूकदारांमध्ये भीती पसरली.

सेबी अध्यक्षांचे महत्त्वाचे विधानFICCI च्या Annual Capital Markets Conference मध्ये बोलताना SEBI अध्यक्ष तुहिन कांता पांडे यांनी इक्विटी डेरिव्हेटिव्ह्जचा कार्यकाळ वाढवण्यावर भर पाडला. यावर त्यांनी एक सल्लामसलत पत्र जारी केला असून रोख बाजारपेठेत प्रशिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा उद्देश असल्याचे त्यांनी म्हटले.

या विधानानंतर गुंतवणूकदार चिंतेत पडले कारण BSE आणि एंजल वन सारख्या कंपन्यांचे उत्पन्न डेरिव्हेटिव्ह्ज ट्रेडिंगवर अवलंबून असते. एंजल वनचे अध्यक्ष दिनेश ठक्कर यांनी आधीच सांगितले होते की कंपनीच्या 45% उत्पन्न एफ अँड ओ ब्रोकरेज सेगमेंटमधून येते. डेरिव्हेटिव्ह्ज कॉन्ट्रॅक्ट्सचा कालावधी वाढवला गेला तर त्याचा परिणाम एक्सचेंजेस आणि ब्रोकरेज फर्म्सच्या ट्रेडिंग व्हॉल्यूम आणि नफ्यावर होईल असा विश्लेषकांचा अंदाज आहे.

(Disclaimer: तज्ञांच्या शिफारशी, सूचना, मते ही त्यांची स्वतःची आहे आणि महाराष्ट्र टाइम्सची नाही. येथे फक्त स्टॉक कामगिरीची माहिती दिली आहे, गुंतवणुकीचा सल्ला नाही. शेअर बाजारात गुंतवणूक करणे जोखमीच्या अधीन असते आणि गुंतवणूक करण्यापूर्वी तुमच्या सल्लागाराचा सल्ला घ्या.)

कु. शिवानी यादव
कु. निकिता तोमर

Share Market मध्ये मोठा गोंधळ, गुंतवणूकदारांसाठी महत्त्वाची माहिती; SEBI अध्यक्षांच्या विधानाने टेन्शन वाढलं

मुंबई : भारतीय सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड, सेबी, चे अध्यक्ष तुहिन कांता पांडे यांनी बाजारातील अस्थिरता नियंत्रित करण्यासाठी डेरिव्हेटिव्ह्जचा कालावधी वाढवण्याचा प्रस्ताव मांडला आहे.

इक्विटी डेरिव्हेटिव्ह्जचा कालावधी वाढवण्यासाठी एक सल्लामसलत पत्र जारी केले जाईल असे सेबीचे अध्यक्ष म्हणाले.

तसेच नियामक इक्विटी डेरिव्हेटिव्ह्ज करारांचा कालावधी आणि परिपक्वता सुधारण्याच्या मार्गांवर विचार करत असल्याचे समजले असून यासोबतच रोख बाजारात व्हॉल्यूम वाढवण्याचे मार्ग देखील विचारात घेतले जात आहेत.

शेअर बाजारात उडाली खळबळ

सेबी अध्यक्षांच्या या विधानासोबतच बाजारात एक बातमी आली आहे ज्यामुळे तणाव वाढला आहे. विकली कॉन्ट्रॅक्ट एक्सपायरी संपण्याची शक्यता असल्याचे वृत्त बाजार जंगलातील आगीसारखे पसरले. सेबीच्या अध्यक्षांनी अलीकडेच या वृत्ताचे जोरदार खंडन केले होते पण, आजच्या विधानानंतर बीएसईसह ब्रोकरेज हाऊस कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठी विक्री झाली आहे. गुरुवारी शेअर बाजारात बॉम्बे स्टॉक एक्सचेंज, BSE, शेअर्समध्ये मोठी घसरण झाली.

देशांतर्गत बाजारात एकीकडे तेजीची हवा पसरली असताना BSE शेअर्स सुमारे 6% घसरले आणि एंजल वनचे शेअर्समध्येही 6% पेक्षा जास्त विक्री झाली. SEBI चे अध्यक्ष तुहिन कांता पांडे यांच्या विधानानंतर ही घसरण झाल्याचे समजले

 ISBN NO. 978-81-990957-8-6

जात असून सेबी प्रमुखांच्या विधानानंतर शेअर बाजारात गोंधळ उडाला आणि ब्रोकरेज शेअर्सवर सेबीची नजर असल्याने गुंतवणूकदारांमध्ये भीती पसरली.

सेबी अध्यक्षांचे महत्त्वाचे विधानFICCI च्या Annual Capital Markets Conference मध्ये बोलताना SEBI अध्यक्ष तुहिन कांता पांडे यांनी इक्विटी डेरिव्हेटिव्ह्जचा कार्यकाळ वाढवण्यावर भर पाडला. यावर त्यांनी एक सल्लामसलत पत्र जारी केला असून रोख बाजारपेठेत प्रशिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा उद्देश असल्याचे त्यांनी म्हटले.

या विधानानंतर गुंतवणूकदार चिंतेत पडले कारण BSE आणि एंजल वन सारख्या कंपन्यांचे उत्पन्न डेरिव्हेटिव्ह्ज ट्रेडिंगवर अवलंबून असते. एंजल वनचे अध्यक्ष दिनेश ठक्कर यांनी आधीच सांगितले होते की कंपनीच्या 45% उत्पन्न एफ अँड ओ ब्रोकरेज सेगमेंटमधून येते. डेरिव्हेटिव्ह्ज कॉन्ट्रॅक्ट्सचा कालावधी वाढवला गेला तर त्याचा परिणाम एक्सचेंजेस आणि ब्रोकरेज फर्म्सच्या ट्रेडिंग व्हॉल्यूम आणि नफ्यावर होईल असा विश्लेषकांचा अंदाज आहे.

(Disclaimer: तज्ञांच्या शिफारशी, सूचना, मते ही त्यांची स्वतःची आहे आणि महाराष्ट्र टाइम्सची नाही. येथे फक्त स्टॉक कामगिरीची माहिती दिली आहे, गुंतवणुकीचा सल्ला नाही. शेअर बाजारात गुंतवणूक करणे जोखमीच्या अधीन असते आणि गुंतवणूक करण्यापूर्वी तुमच्या सल्लागाराचा सल्ला घ्या.)

कु. शिवानी यादव
कु. निकिता तोमर

Poker Baazi कंपनीचा शेअर कोसळला, 2 दिवसांत 20 टक्के घसरण

गुंतवणूकदारांचे 2,000 कोटी रुपये बुडाले

१) लोकसभेत ऑनलाइन गेमिंग बिल पास होऊन रिअल मनी गेमिंगवर बंदी घालण्यात आली.

२) या निर्णयाचा फटका थेट नझारा टेक्नॉलॉजीजच्या शेअर्सना बसला, दोन दिवसांत मार्केट कॅपमध्ये 2,000 कोटींची घट झाली.

३) तज्ज्ञांचे मत आहे की हा कायदा डिजिटल गेमिंग इंडस्ट्रीसाठी महत्त्वाचा आहे, पण लोक बेकायदेशीर गेमिंगकडे वळण्याचा धोका वाढेल.

Online Gaming Bill 2025: ऑनलाइन गेमिंगवर मोठा निर्णय घेत लोकसभेत बुधवारी (20 ऑगस्ट 2025) ऑनलाइन गेमिंग बिल पास करण्यात आले. या कायद्यानुसार रिअल मनी गेमिंग (RMG) वर पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. रेल्वे, माहिती व प्रसारण तसेच आयटी मंत्री अश्विनी वैष्णव यांनी हा निर्णय समाजाच्या हितासाठी असल्याचे स्पष्ट केले.

या निर्णयाचा पहिला परिणाम शेअर बाजारावर दिसून आला. डिजिटल स्पोर्ट्स कंपनी नझारा टेक्नॉलॉजीजचे शेअर्स बुधवारी तब्बल 12.88 % कोसळून बंद झाले. गुरुवारीही घसरण सुरूच राहिली आणि सकाळी 10.36 वाजेपर्यंत शेअर 7.82% घसरून 1,223 रुपयांवर ट्रेड करत होता. दोन दिवसांत कंपनीच्या मार्केट कॅपमधून तब्बल 2,000 कोटी रुपये कमी झाले.

बिलमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की अशा गेम्ससाठी कोणतीही जाहिरात केली जाणार नाही तसेच बँक वा वित्तीय संस्था पैसे ट्रान्सफर करण्यास मदत करणार नाहीत. नियम मोडल्यास कठोर कारवाई केली जाईल.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

नझारा टेकचा दावा आहे की त्यांचा थेट रिअल मनी गेमिंगशी संबंध नाही, त्यामुळे महसूल व EBITDA वर मोठा परिणाम होणार नाही. मात्र कंपनीची 46% हिस्सेदारी मूनशाईन टेक्नॉलॉजीज (PokerBaazi) मध्ये आहे.

ब्रोकरेज फर्मचे मत

प्रभुदास लीलाधर ब्रोकरेज फर्मचे मत आहे की नझाराने पोकरबाझीत मोठी गुंतवणूक केली आहे, जी कंपनीच्या व्हॅल्यूच्या सुमारे 35% आहे. PokerBaazi वर पूर्णपणे बंदी आली तर नझाराची गुंतवणूक धोक्यात येऊ शकते. नझाराने आतापर्यंत 805 कोटींची गुंतवणूक केली असून आणखी 255 कोटी गुंतवण्याचे वचन दिले आहे.

सध्या नझारा टेकसाठी टार्गेट प्राईस ₹1,345 ठेवले असले तरी PokerBaazi समजा बंद झाले, तर किंमत थेट ₹917 पर्यंत घसरू शकते, असे ब्रोकरेजचे म्हणणे आहे.

इंडस्ट्रीवर परिणाम

BDO इंडियाचे कुनाल गाला म्हणाले की हा कायदा भारताच्या डिजिटल गेमिंग इंडस्ट्रीसाठी महत्त्वाचा आहे. भारतात सध्या 50 कोटींपेक्षा जास्त लोक ऑनलाइन गेमिंगशी जोडलेले आहेत आणि इंडस्ट्री दरवर्षी 20% दराने वाढत आहे. परंतु गेम्स बंद झाल्यास लोक बेकायदेशीर प्लॅटफॉर्मकडे वळतील आणि त्यामुळे सरकार व कायदेशीर कंपन्यांना तोटा सहन करावा लागू शकतो.

कु. शिवानी यादव
कु. निकिता तोमर

कररचनेत ऐतिहासिक बदल! आता जीएसटीत फक्त दोनच दर, केंद्राचा प्रस्ताव मंजूर

जीएसटी दर सुलभ करण्यासाठी एक मोठा बदल करण्यात आला आहे. बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्या अध्यक्षतेखालील जीएसटी दरांवरील मंत्र्यांच्या गटाने केंद्राच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे.

या प्रस्तावाअंतर्गत, विद्यमान चार स्लॅब (५%, १२%, १८% आणि २८%) रद्द करण्यात आले आहेत. ते फक्त ५% आणि १८% च्या दोन स्लॅबमध्ये बदलण्यास मान्यता देण्यात आली आहे.

आज, गुरुवारी, वस्तू आणि सेवा कर (GST) दर सुसूत्रीकरणाबाबत मंत्र्यांच्या गटाच्या (GoM) महत्त्वाच्या बैठकीत एक मोठा निर्णय घेण्यात आला. यामध्ये, राज्यांनी केंद्राच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे, ज्या अंतर्गत GST स्लॅबची संख्या फक्त 2 पर्यंत कमी केली जाईल.

यानुसार आवश्यक वस्तू आणि सेवांवर ५% कर आकारला जाईल. सामान्य श्रेणीतील वस्तू आणि सेवांवर १८% कर आकारला जाईल. याशिवाय, निवडक लक्झरी आणि हानिकारक उत्पादनांवर (पापाच्या वस्तू) ४०% कर सुरू राहील. या बदलानंतर, बहुतेक वस्तू स्वस्त होऊ शकतात. सध्या १२% जीएसटी अंतर्गत असलेल्या सुमारे ९९% वस्तू ५% जीएसटी स्लॅबमध्ये हलवल्या जातील.

त्याच वेळी, २८% जीएसटी असलेल्या ९०% वस्तू कमी करून १८% स्लॅबमध्ये हलवल्या जातील. याचा थेट परिणाम सामान्य लोकांच्या खिशावर होईल कारण अनेक जीवनावश्यक वस्तू पूर्वीपेक्षा अधिक परवडणाऱ्या होऊ शकतात. बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. याशिवाय उत्तर प्रदेशचे अर्थमंत्री सुरेश कुमार खन्ना, राजस्थानचे आरोग्यमंत्री गजेंद्र सिंह, पश्चिम बंगालचे अर्थमंत्री

 ISBN NO. 978-81-990957-8-6

चंद्रिमा भट्टाचार्य, कर्नाटकचे महसूलमंत्री कृष्णा बायरे गौडा आणि केरळचे अर्थमंत्री केएन बालगोपाल उपस्थित होते.

कु. गजानन राजरवाड

ट्रम्प टॅरिफचा फटका अमेरिकेलाच बसला! 446 कंपन्या दिवाळखोर; बेरोजगारीही वाढली

अमेरिकेत ट्रम्पयांच्या टॅरिफ धोरणामुळे मोठ्या कंपन्या दिवाळखोर होत आहेत.

2025 मध्ये आतापर्यंत 446 कंपन्या दिवाळखोर झाल्या असून हा आकडा कोरोना काळापेक्षा 12% जास्त आहे.

बेरोजगारी आणि महागाई वाढल्याने अर्थव्यवस्था गंभीर संकटात आहे

फक्त जुलै महिन्यातच 71 कंपन्या दिवाळखोर झाल्या असून, हे प्रमाण गेल्या पाच वर्षांतील सर्वात जास्त आहे.

ट्रम्प यांनी एप्रिल 2025 मध्ये परदेशी मालावर 10% टॅरिफ लावला होता. योगायोग असा की, याच महिन्यापासून कंपन्यांच्या दिवाळखोरीत झपाट्याने वाढ झाली. वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत 371 कंपन्या बुडाल्या, तर केवळ जूनमध्येच 63 कंपन्यांनी दिवाळखोरीसाठी अर्ज केला. यामध्ये Forever 21, Joann's, Rite Aid, Party City आणि Claire's सारख्या लोकप्रिय ब्रँड्सचा समावेश आहे.

2024 अखेरीस स्मॉलकॅप कंपन्यांची स्थिती अधिकच बिकट झाली. रसेल 2000 निर्देशांकातील 43% कंपन्या तोट्यात होत्या.

यंदा इंडस्ट्रियल क्षेत्रातील 70, कंझ्युमर डिस्क्रेशनरी क्षेत्रातील 61, हेल्थकेअरमधील 32, आयटीमधील 21 अशा शेकडो कंपन्या बंद पडल्या. टॅरिफचा फटका प्रत्येक सेक्टरला बसत असल्याचे स्पष्ट दिसते.

बेरोजगारी आणि महागाई वाढतेय

अमेरिकेतील छोट्या कंपन्या 6.23 कोटी लोकांना रोजगार देतात. पण जुलैमध्ये 11% छोट्या कंपन्यांची विक्री अत्यंत खराब असल्याचे सांगितले. त्यामुळे बेरोजगारी वाढली असून, विशेषत: 20-24 वयोगटातील तरुणांमध्ये ती 8.1% पर्यंत गेली आहे.

कंपन्या खर्च कमी करण्यासाठी एआयवर अवलंबून राहून एंट्री-लेव्हल नोकऱ्या कमी करत आहेत. त्यातच महागाईचा झटका बसला आहे. PPI महागाई 0.9% वर पोहोचली असून, कोर CPI 3% च्या वर गेली आहे. त्यामुळे फेडरल रिझर्व्हसमोर व्याजदर कमी करण्याचे आव्हान उभे राहिले आहे. ट्रम्प सतत व्याजदर कपातीची मागणी करत असून, सप्टेंबरमध्ये 25 बेसिस पॉइंट्सने दरकपात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

कु. राधिका नरहिरे

22/08/2025

Sensex=81,306.85

Nifty=24,870.10

Gold=₹9215.0 per gram for 22 karat

silver=1 Gram ₹ 128

टॅरिफची चिंता शेअर बाजारात दिसून आली.

अमेरिकेच्या २७ ऑगस्टपासून लागू होणाऱ्या अतिरिक्त २५ टक्के टॅरिफची चिंता शुक्रवारी (दि.२२) शेअर बाजारात दिसून आली. परिणामी, चौफेर घसरण झाली. यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टीच्या सलग सहा दिवसांच्या तेजीला ब्रेक लागला.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

सेन्सेक्स ६९३ अंकांनी घसरून ८१,३०६ वर बंद झाला. तर निफ्टी ५० निर्देशांक २१३ अंकांच्या घसरणीसह २४,८७० पर्यंत खाली आला.

सेन्सेक्स आणि निफ्टीने सलग सहा दिवस वाढ नोंदवली होती. यामुळे गुंतवणूकदारांनी प्रॉफिट बुकिंग केले. सेक्टरमधील फार्मा आणि consumer durables वगळता सर्व प्रमुख निर्देशांक लाल रंगात बंद झाले. फायनान्सियल आणि बँकिंग निर्देशांक १ टक्केपर्यंत घसरले. गेल्या तीन सत्रांत ३ टक्के वाढलेला आयटी निर्देशांक आज ०.८ टक्के घसरला. अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष जेरोम पॉवेल यांच्या भाषणापूर्वी गुंतवणूकदारांनी सावधगिरी बाळगली. यामुळे आयटी शेअर्स घसरले.

कोणत्या शेअर्सवर दबाव?

सेन्सेक्सवर एशियन पेंट्स, अल्ट्राटेक सिमेंट, आयटीसी, टाटा स्टील, एचसीएल टेक, कोटक बँक, अदानी पोर्ट्स, टीसीएस एचडीएफसी बँक, टेक महिंद्रा, एसबीआय, रिलायन्स हे शेअर्स १ ते २.५ टक्क्यांपर्यंत घसरले. आयसीआयसीआय बँकेचा शेअर्स ०.६ टक्के घसरला. तर दुसरीकडे एम अँड एम, मारुती, सन फार्मा हे शेअर्स तेजीत राहिले.

कु. तनुजा सूर्यवंशी
कु. स्नेहा जोंधले

भारताच्या करप्रणालीत ऐतिहासिक बदल घडवण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले गेले आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेले 'आयकर विधेयक 2025' सोमवारी लोकसभेत आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले.

हे नवीन विधेयक तब्बल 60 वर्षांहून अधिक जुन्या आणि गुंतागुंतीच्या आयकर कायदा, 1961 ची जागा घेणार आहे. या विधेयकामुळे देशातील करप्रणाली अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानस्नेही होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

पार्श्वभूमी :

आयकर विधेयकाचे पहिले रूप 13 फेब्रुवारी 2025 रोजी लोकसभेत मांडण्यात आले, ज्यामध्ये विद्यमान आयकर कायदा 1961 बदलून आणखी साधे बनविण्याचा प्रयत्न होता.

निवड समितीचा अहवाल, ज्याचे अध्यक्ष खासदार बैजयंत पांडा होते, त्या समितीने विधेयकात 285 सुधारणा सुचवल्या आणि सरकारने जवळजवळ सर्व स्वीकारल्या.

जुना मसुदा 8 ऑगस्ट 2025 रोजी मागे घेतला गेला आणि सुधारित नवीन रूपात 11 ऑगस्ट 2025 रोजी पुन्हा लोकसभेत सादर करण्यात आले.

हे सुधारित विधेयक - IncomeTax (No.2) Bill, 2025 - 12 ऑगस्ट 2025 रोजी संसदेचा संयुक्त अधिवेशनातून पारित झाले आणि ते 1 एप्रिल 2026 पासून लागू होण्याची शक्यता आहे.

1. 'Assessment Year' आणि 'Previous Year' याऐवजी 'Tax Year' संकल्पना IncomeTax Act, 1961 मध्ये Previous Year आणि Assessment Year यांची गुंतागुंतीची व्याख्याही होती. Income Tax Bill 2025 मध्ये याऐवजी एकच 'Tax Year' म्हणून आर्थिक वर्ष (1 एप्रिल ते 31 मार्च) मानले जाईल, ज्यामुळे प्रक्रिया साधी होईल.

2. विभागांची संख्यात्मक आणि रचनेचा सरलीकरण कायद्यातील विभागांची (Sections) संख्या 800+ वरून 536 पर्यंत आणली गेली आहे; अध्यायांची (Chapters) संख्या 47 ते 23 पर्यंत

 ISBN NO. 978-81-990957-8-6

कमी झाली आहे. रचनेत व शब्दसंख्येत मोठी घट झाली आहे: युनिट डोक्युमेंटमधील शब्दसंख्या सुमारे 5.12 लाखांवरून 2.6 लाखांवर आणली गेली आहे.

3. डिजिटल फर्स्ट प्रक्रिया आणि Faceless Assessment नवीन बिलामध्ये Faceless Assessment (माणसांशी थेट संवाद न करता कर निर्धारण), डिजिटल प्रक्रियात्मक पावले आणि पूर्वसूचना (Pre-notice) हे अनिवार्य केले गेले आहे, जे भ्रष्टाचार कमी करण्यास आणि पारदर्शकता वाढवण्यास मदत करतील.

4. Section 87A - Rebate चे विस्तार IncomeTax Act, 1961 मध्ये Section/87A अंतर्गत रु. 5 लाख उत्पन्नापर्यंत 12,500 पर्यंतची rebate उपलब्ध होती. Income Tax Bill 2025 मध्ये ही Rebate रु. 12 लाख उत्पन्नापर्यंत रु. 60,000 पर्यंत वाढवण्यात आली आहे.

5. Capital Loss Set-Off मध्ये सौहार्द - एकवेळचा Set-Off Income Tax Act, 1961 अंतर्गत Long-Term Capital loss (LTCL) फक्त Long-Term Capital Gains (LTCG) विरुद्धच Set-Off होऊ शकत होता.

Income Tax Bill 2025 मध्ये, Tax Year 2026-27 पासून, LTCL एकदाच Short-Term Capital Gains (STCG) विरुद्धही Offset करता येणार आहे.

6. Digital Assets (Cryptos) आणि Undisclosed Income नवीन बिलात, 'Undisclosed Income' या व्याख्येत आता Virtual Digital Assets (Crypto Currencies इत्यादी) देखील समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

7. Anonymous Donations वर मर्यादा Act, 1961 मध्ये अज्ञात धर्मार्थ निधीवर स्पष्ट मर्यादा नव्हत्या. Bill 2025 मध्ये, Anonymous Donations (विशेषतः जे सामाजिक सेवा करत नाहीत अशा धार्मिक संस्थांना होणारे) वर मर्यादा घातल्या गेल्या आहेत.

8. Commuted Pension d ITR Refund सुविधा Bill 2025 मध्ये, commuted lump-sum pension (LIC इत्यादी) साठी पूर्ण सूट समाविष्ट केली गेली आहे. ITR सादर करण्याची अंतिम मुदत ओलांडली तरीही TDS रिफंड मिळण्याची सुविधा देण्यात आली आहे.

9. Procedural सुधारणा - TDS/TCS, Tax Audit, Authority Delegation

Bill 2025 मध्ये : TDS/TCS चे नियम अधिक विशिष्ट Clause (उदा. Clause/393, 394) मध्ये स्थानांतरित केले गेले आहेत. Tax Audit (Section/44AB) चे नियमन Clause/63 अंतर्गत स्पष्ट आहे-कर लेखापरीक्षक म्हणून फक्त Chartered Accountants यांना परवानगी. CBDT (Central Board of Direct Taxes) ला नियम बनवण्याची आणि डिजिटल मॉनिटरिंग करण्याची अधिक शक्ती देण्यात आली आहे.

10. इतर नवकल्पना (New Provisions) Unrealised Profits on Securities या संकल्पनेवर कर लागू करणे Income Tax Search आणि Raids संदर्भातील स्पष्ट नियम जोडले आहेत.

11. टॅक्स पेयर्सच्या वैयक्तिक डेटावर अनधिकृत प्रवेश नवीन विधेयकात कर अधिकारींना करदात्यांच्या ईमेल, सोशल मीडिया खात्या आणि ऑनलाईन ट्रेडिंग खाते यांसारख्या डिजिटल स्रोतांमध्ये अनधिकृत प्रवेश देण्याची तरतूद आहे. हे गोपनीयतेच्या हक्कांचे उल्लंघन ठरू शकते आणि

 ISBN NO. 978-81-990957-8-6

करदात्यांवर अनावश्यक छळ किंवा त्रास निर्माण होऊ शकतो.

12. दंड आणि जबाबदाऱ्या चुकीचे विवरण किंवा नकली कटौती (Bogus Deduction) दाखवल्यास 220% पर्यंत दंड तसेच कमाल 7 वर्षांची कैद होऊ शकते.

निष्कर्ष : Bill 2025 मुख्यत्वे कर प्रणाली सोप्या, डिजिटल, पारदर्शक आणि आधुनिक आर्थिक व्यवहारांसाठी अनुकूल बनवण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आला आहे. अनेक नवीन सुविधा (जसे UPS, Refund Flexibility इ.), अतिरिक्त सवलती (Section/87A, Capital Loss Offset), आणि धोरणात्मक स्पष्टता (Digital -Assets, Commuted Pensions, Anonymous Donations इ.) यांसह, विद्यमान कायद्याच्या तुलनेत महत्त्वाच्या सुधारणा दृष्टिगोचर होतात.

कु. तनुजा सूर्यवंशी
कु. स्नेहा जोंधले

शिवाजी महाराजांच्या काळात पुण्याचा महसूल किती होता?

शिवाजी महाराज यांनी मराठ्यांच्या स्वराज्याची स्थापना करताना केवळ लष्करी सामर्थ्यावरच नव्हे, तर सुव्यवस्थित प्रशासन आणि आर्थिक नियोजनावर भर दिला. स्वराज्याच्या आर्थिक यशाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे पुण्यासारख्या प्रमुख महालांचा महसूल. सभासद बखरीनुसार, शिवाजी महाराजांनी आपल्या शेवटच्या काळात विश्वासू अधिकाऱ्यांना बोलावून स्वराज्याच्या कारभाराची दिशा स्पष्ट केली होती. यामध्ये त्यांनी पुण्याच्या महालांचे विशेष महत्त्व अधोरेखित केले. महाराज म्हणाले, "माझ्या राज्यात पुण्याचे महाल आणि चाळीस हजार होणाची महत्त्वाची भूमिका होती." यावरून पुण्याचा आर्थिकदृष्ट्या असलेला प्रभाव स्पष्ट होतो.

पुण्याचा महसूल आणि आर्थिक योगदान

स्वराज्यातील १४ सुभ्यांपैकी पुणे हे एक प्रमुख केंद्र होते. सभासद बखरीनुसार, स्वराज्याच्या एकूण उत्पन्नाची रक्कम १,३२,६६,६३५ रुपये इतकी होती. यामध्ये पुण्याच्या महालांचा वाटा लक्षणीय होता. पुणे हे केवळ प्रशासकीय केंद्र नव्हते, तर आर्थिकदृष्ट्याही स्वराज्याचा कणा होते. या महसूलाद्वारे स्वराज्याच्या लष्करी, प्रशासकीय आणि सामाजिक गरजा भागवल्या जात होत्या. शिवरायांनी प्रत्येक सुभ्याच्या उत्पन्नाचे काटेकोर नियोजन केले होते, ज्यामुळे स्वराज्याची आर्थिक स्थिरता टिकून राहिली.

कु. गजानन राजरवाड

देशाच्या तिजोरीत मोठी भर, परकीय चलनसाठ्यात 1.48 अब्ज डॉलर्सची वाढ, RBI ने जाहीर केली आकडेवारी

15 ऑगस्ट रोजी संपलेल्या आठवड्यात भारताचा परकीय चलन साठा 1.48 अब्ज डॉलर्सने वाढून 695.10 अब्ज डॉलर्सवर पोहोचला आहे.

सप्टेंबर 2024 च्या अखेरीस, भारताचा परकीय चलन साठा 704.885अब्ज डॉलर्सवर पोहोचला, जो आतापर्यंतचा सर्वोच्च स्तर आहे. एकूण साठ्यातील हा सर्वात मोठा वाटा आहे. डॉलर व्यतिरिक्त, या मालमत्तांमध्ये युरो, पौंड आणि येन सारख्या परकीय चलनांच्या किमतीतील चढउतारांचा परिणाम देखील समाविष्ट आहे.

भारताच्या राखीव निधीत 15 दशलक्ष डॉलर्सची वाढ

 ISBN NO. 978-81-990957-8-6

या आठवड्यात सोन्याचा साठा 2.16 अब्ज डॉलर्सने घसरून 86.16 अब्ज डॉलर्सवर पोहोचला. आयएमएफमधील भारताच्या राखीव निधीत 15 दशलक्ष डॉलर्सने वाढून 4.75 अब्ज डॉलर्सवर पोहोचला. साधारणपणे, आरबीआय वेळोवेळी बाजारात डॉलर्स खरेदी आणि विक्रीसारखी पावले उचलून रुपयातील तीव्र घसरण रोखण्याचा आणि तरलता संतुलन राखण्याचा प्रयत्न करते. आरबीआय परकीय चलन बाजारावर बारीक लक्ष ठेवते आणि गरज पडल्यासच हस्तक्षेप करते, जेणेकरून रुपयाच्या विनिमय दरात जास्त चढ-उतार होणार नाहीत.

कु. गजानन राजरवाड

रिझर्व्ह बँकने ATM च्या नियमांत केले बदल

मर्यादेपेक्षा जास्त ट्रान्झॅक्शनवर भरावा लागणार शुल्क कमाल २३ रुपये शुल्क भरावे लागेल.

एटीएममधून पैसे काढण्याच्या नियमांत बदल केला आहे.यामध्ये ट्रान्झॅक्शन लिमिट, कॅश डिपॉझिट आणि विदड्रॉवलच्या नियमांत बदल केले आहे. यासाठी आता तुम्हाला अधिक शुल्क भरावे लागणार आहे. यामुळे मात्र, सर्वसामान्यांच्या खिशाला चांगलाच फटका बसणार आहे.

आता ग्राहकांना फक्त ३ एटीएम ट्रान्झॅक्शनपर्यंत मोफत सुविधा मिळणार आहे. यामध्ये कॅश विड्रॉवल आणि बॅलेंस चेक करण्याचा समावेश आहे.

मेट्रो शहरांव्यतिरिक्त इतर ठिकाणी तुम्हाला ५ ट्रान्झॅक्शनपर्यंत मोफत सुविधा मिळणार आहे.

जर तुम्ही मर्यादेनंतर ट्रान्झॅक्शन केले तर बँक तुमच्याकडून चार्जेस घेईल. यामध्ये तुम्हाला कमाल २३ रुपये चार्ज भरावा लागेल. नॉन फायनान्शियल गोष्टींवर ११ रुपये भरावे लागणार आहे.

पंजाब नॅशनल बँकेत २३ रुपये चार्ज लागणार आहे. एचडीएफसी बँकेत २३ रुपये चार्ज लागणार आहे. तर स्टेट बँकेने त्यांच्या चार्जेसमध्ये कोणताही बदल केलेला नाही.

कॅश डिपॉझिटवर कोणताही चार्ज लागणार आहे. तसेच मर्यादेपेक्षा जास्त कॅश विड्रॉवलवर चार्जेस लागणार आहे.

जर तुम्ही २० लाख किंवा त्यापेक्षा जास्त कॅश जमा करत असाल तर पॅन कार्ड आणि आधार कार्ड देणे अनिवार्य आहे.

कृषी निर्यातीने यावर्षी इतिहासातील सर्वोत्कृष्ट कामगिरी केली आहे

भारताच्या कृषी निर्यातीने 2024 - 25 मध्ये 48.8 अब्ज डॉलरवरून 51.9 अब्ज डॉलर पर्यंत वाढ केली आहे. मागच्या तीन महिन्यात भारताची एकूण निर्यात ज्या वेगाने वाढत चालली आहे ते पाहता ही निर्यात आत्तापर्यंतचा विक्रम मॉडेल असे वाटते. आतापर्यंत यात 6.4 टक्क्यांनी वाढ झाली आहे. कृषी निर्यात एवढी मजबूत असताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी टॅरिफ चे धोरण भारतावर लादले आहे. याचा परिणाम कृषी निर्यातीवर होऊ शकतो.

कु. गजानन राजरवाड

 ISBN NO. 978-81-990957-8-6

23/08/2025

1 शेअरवर 1 शेअर फ्री, HDFC बँक देणार बोनस शेअर; कधी आहे रेकॉर्ड डेट?

HDFC Bank: देशातील खासगी क्षेत्रातील दिग्गज बँक एचडीएफसी बँकेने आपल्या शेअरहोल्डर्ससाठी 1:1 या गुणोत्तरात बोनस शेअर्स देण्याची घोषणा केली आहे. या बोनस इश्यूची रेकॉर्ड डेट 26 ऑगस्ट निश्चित करण्यात आली असून, त्यामुळे गुंतवणूकदारांचे लक्ष आता या शेअर्सकडे लागले आहे.

शेअरच्या किंमतीतील हालचाल

22 ऑगस्ट रोजी सुरुवातीच्या व्यवहारात बीएसई आणि एनएसईवर बँकेच्या शेअरमध्ये चढ-उतार दिसून आले. याच दरम्यान, ब्रोकरेज फर्म जेफरीजने एचडीएफसी बँकेच्या शेअर्सला 2,400 रुपयांचे टार्गेट प्राईस देत खरेदीची शिफारस केली आहे. मात्र, शुक्रवारी या शेअरमध्ये जवळपास 1 टक्क्यांची घसरण झाली.

शेअर बाजारातील स्थिती

हफ्त्याच्या शेवटच्या दिवशी एनएसईवर एचडीएफसी बँकेचा शेअर 0.87% नी घसरून 1,973.90 रुपयांवर बंद झाला. बँकेचे मार्केट कॅप 15,14,987.03 कोटी रुपये इतके आहे. इंट्राडे लो 1,972 रुपयांच्या आसपास दिसून आला.

गेल्या पाच सत्रांत या शेअरमध्ये सुमारे 2.4 % घसरण झाली असली तरी, वार्षिक पातळीवर या शेअरमध्ये 11% वाढ कायम आहे. मागील एका वर्षात एचडीएफसी बँकेच्या शेअर्समध्ये तब्बल 21% ची वाढ झाली आहे.

कु. अंकिता तोमर
कु. प्रतीक्षा घरणे

केवळ शेअर्सच नाही तर एफआयआयनेही बाँड मार्केटमधून पैसे काढण्यास सुरुवात केली आहे.

जिओजित इन्व्हेस्टमेंट्सचे व्हीके विजयकुमार म्हणाले की, भारतीय शेअर बाजार सध्या महाग दिसत आहे, विशेषतः इतर देशांच्या तुलनेत. म्हणूनच एफआयआय नफा मिळवल्यानंतर बाहेर पडत आहेत. तथापि, ते अजूनही आयपीओ आणि क्यूआयपी सारख्या मार्गांनी गुंतवणूक करत आहेत.

Indian Post: भारतीय पोस्टाने अमेरिकेतील पार्सल सेवा केली बंद, ग्राहकांना मिळेल परतफेड

बँकिंग आणि वित्त क्षेत्रात सर्वाधिक विक्री झाली, कारण एफआयआयने त्यात सर्वाधिक पैसे गुंतवले आहेत. त्यांनी आयटी कंपन्यांचे शेअर्स देखील विकले, कारण तेथे वाढीची चिंता आहे. परंतु ते अजूनही टेलिकॉम आणि कॅपिटल गुड्स कंपन्यांमध्ये गुंतवणूक करत आहेत.

येत्या काळात एफआयआयची विक्री काहीशी कमी होऊ शकते

व्हीके विजयकुमार पुढे म्हणाले की, नजीकच्या भविष्यात, एफआयआयकडून होणारी विक्री काहीशी कमी होऊ शकते, कारण डॉलर आता कमकुवत होत आहे. हे घडत आहे कारण अमेरिकन मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्ह सप्टेंबरमध्ये व्याजदर कमी करण्याची अपेक्षा आहे.

फेडचे प्रमुख जेरोम पॉवेल यांनीही त्यांच्या जॅक्सन होल भाषणात असे संकेत दिले आहेत, ज्यामुळे असे मानले जाते की सप्टेंबरमध्ये दर कमी केले जाऊ शकतात. जेव्हा असे होते तेव्हा डॉलर सहसा कमकुवत होतो आणि गुंतवणूकदारांचा उदयोन्मुख बाजारपेठांकडे कल वाढतो.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

नवीन आणि उदयोन्मुख व्यवसायांमध्ये परदेशी गुंतवणूकदारांचा विश्वास

वॉटरफील्ड ॲडव्हायझर्सचे वरिष्ठ संचालक आणि इक्विटी प्रमुख विपुल भोर म्हणतात की, २०२५ मध्ये, एफआयआय बहुतेक वेळा शेअर बाजारात विक्री करत आहेत आणि ऑगस्टमध्येही हाच ट्रेंड कायम आहे. त्यांनी सांगितले की काही दिवसांत काही खरेदी झाली असली तरी, एकूणच परदेशी गुंतवणूकदार अजूनही बाजारातून पैसे काढत आहेत. विपुल भोर यांनी असेही स्पष्ट केले की परदेशी गुंतवणूकदार पूर्णपणे बाजारातून बाहेर पडलेले नाहीत. ते अजूनही विचारपूर्वक आणि निवडक क्षेत्रांमध्ये, विशेषतः प्राथमिक बाजारात गुंतवणूक करत आहेत.

त्यांनी सांगितले की जेव्हा आपण दुय्यम (म्हणजे दैनंदिन व्यापार) आणि प्राथमिक बाजाराचा डेटा (जसे की आयपीओ किंवा क्यूआयपी) पाहतो तेव्हा हे स्पष्ट होते की एफआयआय अजूनही नवीन कंपन्या आणि नवीन क्षेत्रांमध्ये पैसे गुंतवत आहेत. याचा अर्थ असा की एफआयआय अशा क्षेत्रांपासून अंतर ठेवत आहेत जिथे वाढीचा वेग मंद आहे, परंतु नवीन आणि उदयोन्मुख व्यवसायांवर त्यांचा विश्वास अबाधित आहे.

Anondita Medicare IPO चा 'जीएमपी' ठरला रॉकेट, सबस्क्रिप्शनच्या पहिल्याच दिवशी किरकोळ गुंतवणूकदारांकडून उत्कृष्ट प्रतिसा.

कु. अंकिता तोमर
कु. प्रतीक्षा घरणे

24/08/2025

यशोगाथा

एक आहे मारिया आंद्रेत्जिक. २५ वर्षांची पोलॅन्डची खेळाडू. भालाफेकमधे २०१६च्या रिओ ऑलम्पिकला तिचं पदक अवघ्या २ सेंटीमीटरने हुकलं. २०१८ उजाडला आणि कळलं की तिला हाडांचं कॅन्सर आहे. टोकियो ऑलम्पिकमधे सहभागी होण्याचं स्वप्न जवळपास संपुष्टात आलेलं.

सुदैवाने ऑपरेशन यशस्वी झालेत आणि मारिया परत फील्डवर आली. २०२०च्या समर ऑलम्पिकला सिल्वर मेडल पटकावलं आणि टोकियोचे दारही उघडलेत. टोकियोत तिने स्वतःचा रेकॉर्ड आणि पोलॅन्डचा राष्ट्रीय रेकॉर्ड तर मोडलाच; पण त्याच सोबत विश्वविक्रमाच्या यादीत आजतागायतची तिसरी सर्वोत्तम कामगिरी करत तिने सिल्वर मेडलही पटकावलं.

मारिया आंद्रेत्जिक जेव्हां टोकियोत ही कामगिरी करत होती, तेव्हां मायदेशी पोलॅन्डमधे एक लहान मुलाचे आईबाप हैराण होत होते. त्यांच्या ८ महिन्याच्या मिलोस्ज़ेक मलिसाला हृदयाच्या एक खूप दुर्मिळ विकार आहे. ह्या मुलाच्या आजारावर उपचार एकच - हृदयावर शल्यक्रिया. पण हे विकार असं आहे की इतक्या लहान पोरावर ह्या विकाराची शल्यक्रिया करायला अक्ख्या पोलॅन्डमधे एकही शल्यचिकित्सक किंवा हॉस्पिटल तयार नव्हतं.

अनेक ठिकाणी नकार पचवल्यावर अमेरिकेत स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी मेडिकल सेंटरला ह्या शल्यक्रियेची व्यवस्था असल्याचं कळलं. मात्र तिकडे संपर्क केल्यावर त्यात ३,८५,००० डॉलर म्हणजे भारतीय चलनात जवळपास ३ कोटी रुपयांचा खर्च ऐकून मिलोस्ज़ेकच्या आई बाबांच्या तोंडाचं पाणी पळालं.

मिलोस्ज़ेकच्या आई-वडिलांनी crowd funding साठी प्रयत्न केलेत पण त्यात निम्मे पैसेच एकत्र झालेत. crowd fundingच्या नियमांनुसार

 ISBN NO. 978-81-990957-8-6

दिलेल्या कालावधीत पूर्ण रक्कम एकत्र होऊ शकली नाही, तर crowd funding फोरम दानदात्यांना त्यांचे पैसे परत करते. मिलोस्ज़ेकच्या आईवडिलांवरही ही वेळ येऊन ठेपली. कॅम्पेन संपायला अगदी मोजके दिवस उरले होते. त्यांनी आवश्यक अशी अर्धी रक्कम अजून एकत्र करण्यासाठी fund raiserच्या पोस्टवर हाक मारली - "आमच्या मिलोस्ज़ेकला वाचवा." मारियाने ही हाक ऐकली.

मारियाकडे एवढे पैसे तर नव्हते, पण तिच्याकडे दोन दुर्लभ गोष्टी होत्या. एक - मदत करण्याची अदम्य इच्छाशक्ती, आणि दुसरं - तिचं दहा बारा दिवसांपूर्वी जिंकलेलं ऑलम्पिकचं सिल्वर मेडल. तिने तडक ते मेडल मिलोस्ज़ेकच्या उपचारासाठी लिलावात काढलं.

हे मेडल नाही, तिचं स्वप्न होतं. जे स्वप्न २०१६ला हुकलं होतं, २०१८ला पूर्णपणे भंगच झालेलं, आणि २०२१मधे हे स्वप्न पाच वर्षांची मेहनत, साधना, तपश्चर्या, ध्यास लावून मेडलच्या रुपात तिने साकारलं होतं. अटीतटीच्या परिस्थितीत अनोळखी माणसांसाठी तेच तिने विकायला काढलं.

पोलॅन्डच्या एका सुपरमार्केट चेन झाबका पोल्स्काने हे मेडल विकत घेतलं सव्वा लाख डॉलर्समधे म्हणजे साधारण ९३ लाख रुपयांत, हे पैसे थेट फंड रेजर संस्थेकडे जमाही केलेत. पण झाबका पोल्स्काचे मालक इकडेच थांबले नाहीत. त्यांने मारियाच्या मदतीच्या भावनेला तोडीसतोड काम केलं. त्यांनी मारियाचा सिल्वर मेडल तिला परत दिला, आणि सांगितलं - परत कधी, कुणाचं जीव वाचवावेसे वाटल्यास अश्या गोष्टी तुझ्याच हाताशी असाव्यात.

टोकियो ऑलम्पिकमधे ३५० इव्हेंट्स म्हणजे साधारण हजारभर पदक विजेता होते. आपल्या देशाला ७ पदक आलेत, म्हणून त्यांची नावं आपल्याला माहिती आहेत जेव्हां ७० पदक येतील तेव्हां नावं लक्षात राहणे कठीण होईल. पण मारिया आंद्रेज़िकसारखे खेळाडू खेळावर, रिकॉर्डबुक्समधे आपलं नाव लिहितातच, पण इतिहासावरही आपलं नाव कोरून ठेवतात. ते नाव विसरत नाहीत.

पूर्वीच्या काळात भाले हृदयात खुपसून प्राण घेतले जात असे. मारियाने भाला फेकून प्राण वाचवले, आणि मारियाच नाही तर झाबका पोल्स्कानेही हृदय जिंकले. ह्या घटना अश्या असतात, ज्या आपल्याला बदलायला भाग पाडतात, जगाकडे बघण्याचा नवीन दृष्टिकोन देतात, ज्या खेळांवर प्रेम करायला भाग पाडतात.

ही मुलगी माझी लेक, किंवा लहान बहीण असती, तर खांद्यावर घेऊन नाचलो असतो. नाहीए, तरी हरकत नाही, माणूस म्हणून तिचा अभिमान आहेच... तिची माहिती लक्षात ठेवा,

नाव - मारिया आंद्रेज़िक

देश - पोलॅन्ड

खेळ - जेवलीन थ्रो

पदक – सिल्वर

कु. अंकिता तोमर

कु. प्रतीक्षा घरणे

25/08/2025

अमेरिकेला भारताकडूनच खरेदी कराव्या लागतील 'या' वस्तू, ट्रम्प यांच्याकडे दुसरा पर्याय नाही

डोनाल्ड ट्रम्प यांच्या शुल्क धोरणामुळे भारताला तब्बल 36 अब्ज डॉलर्सपर्यंत शक्यता

 ISBN NO. 978-81-990957-8-6

नुकसान होण्याची शक्यता आहे. मात्र, तरीही अमेरिका भारताकडून काही वस्तूंची मोठ्या प्रमाणात खरेदी करणार आहे, कारण अमेरिकेकडे दुसरा पर्याय नाही.

अमेरिकेने इतर देशांकडून या वस्तू खरेदी केल्यास आयात शुल्क जास्त भरावे लागेल आणि अमेरिकेच्या गरजेनुसार स्वस्त दरात दुसरा कोणताही देश या वस्तूंचा पुरवठा करू शकत नाही. त्यामुळे अमेरिकेने काही वस्तूंवर शुल्क माफ केले आहे किंवा केवळ 25 टक्के शुल्क ठेवले आहे. या वस्तूं आजही अमेरिकेत पूर्वीप्रमाणे निर्यात होत आहेत.

अमेरिकेने भारतातील औषधनिर्माण क्षेत्र (औषधे आणि उपकरणे), इलेक्ट्रॉनिक्स (स्मार्टफोन आणि इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने), अतिरिक्त ऊर्जा आणि नवीकरणीय उत्पादने (पेट्रोलियम) यांसारख्या वस्तूंना शुल्क माफी दिली आहे. लोखंड, शिसे, ॲल्युमिनियम, तांबे आणि त्यांच्या उत्पादनांवर केवळ 25 टक्के शुल्क आकारले आहे.

भारतातील काही विशिष्ट वस्तूंवर अमेरिका शुल्क का लावत नाही, याची काही कारणे आहेत.

औषधनिर्माण क्षेत्रात भारत जेनेरिक औषधांचा सर्वात मोठा पुरवठादार आहे आणि अमेरिकेची आरोग्य सेवा प्रणाली स्वस्त भारतीय औषधांवर अवलंबून आहे.जर या क्षेत्रावर 50 टक्के शुल्क आकारले, तर औषधे महाग होतील आणि अमेरिकेत राजकीय दबाव वाढेल, तसेच जनतेची नाराजी ओढवेल.

स्मार्टफोन आणि इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांच्या बाबतीत, ॲपल, सॅमसंग आणि इतर कंपन्यांची मोठी पुरवठा साखळी भारतात आहे. चीनमधून बाहेर पडल्यानंतर या कंपन्या भारतात उत्पादन वाढवत आहेत.

अमेरिकेला भारतीय पेट्रोलियम आणि नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील उत्पादनांची गरज आहे. ऊर्जेवर शुल्क लावल्यास अमेरिकन उद्योग आणि ऊर्जा सुरक्षा धोक्यात येईल.

अमेरिका भारताला केवळ व्यापारी भागीदार नाही, तर एक धोरणात्मक भागीदार म्हणूनही पाहतो. आशियामध्ये चीनचा वाढता प्रभाव रोखण्यासाठी भारताची गरज आहे. त्यामुळे अमेरिका भारताच्या सर्व क्षेत्रांवर शुल्क लावून दबाव आणू शकत नाही.

सर्व पिकांचे नवीन हमीभाव जाहीर; 2025 चे नवीन हमीभाव दर पहा

केंद्र सरकारने २०२५-२६ च्या खरीप हंगामासाठी १४ प्रमुख पिकांसाठी किमान आधारभूत किंमत (MSP) जाहीर केली आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या पिकासाठी योग्य मोबदला मिळण्याची खात्री मिळाली आहे, ज्यामुळे त्यांच्या उत्पन्नात स्थिरता येईल.

सोयाबीन: प्रतिक्विंटल ₹४३६ ची वाढ होऊन नवा दर ₹५,३२८ झाला आहे.

मध्यम कापूस: ₹५८९ ची वाढ होऊन दर ₹७,७१० झाला आहे.

लांब धाग्याचा कापूस: याचा दर ₹८,११० इतका असेल.

तूर: हमीभावात ₹४५० ची वाढ होऊन तो आता ₹८,००० आहे.

मका: दरात ₹१७५ ची वाढ होऊन तो ₹२,४०० झाला आहे.

भुईमूग: ₹४८० ची वाढ होऊन दर ₹७,२६३ झाला आहे.

ज्वारी (हायब्रीड) ₹३,६९९ +₹३२८

ज्वारी (मालदांडी) ₹३,७४९ +₹३२८
भात (सामान्य) ₹२,३६९ +₹६९
भात (ए-ग्रेड) ₹२,३८९ +₹६७
बाजरी ₹२,७७५ +₹१५०
रागी ₹४,८८६ +₹५९६
मूग ₹८,७६८ +₹८६
उडीद ₹७,८०० +₹४००
सूर्यफूल ₹७,७२१ +₹५७९
कारळे ₹९,५३७ +₹८२०

अखेर नवीन आयकर संसदेत मंजूर झाल्यानंतर याच आठवड्यात 21 ऑगस्टला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्याच्यावर स्वाक्षरी केली .

त्यामुळे विधेयकाचं कायदयात रूपांतर झालं आहे. आणि लागलीच कांद्रेसरकारने कायदयची प्रत लोकांसाठी जारी केली आहे. (New Income Tax Bill 2025) आयकर कायदा 2025 ची अमलाबजावणी एप्रिल 2026 पासुन होणार आहे या कायद्याच्या माध्यमातून जुन्या कायद्याची कालिष्ट भाषा सोपी केल्याच आणि आर्थिक विवरणपत्र भरण्याची प्रकिर्या सोपी केल्याचा दावा अर्थमंत्री निर्मला सीताराम यांनी केला आहे. (New Income tax Bill 2025) आतापर्यन्त ज्या आर्थिक ज्या आर्थिक वर्षासाठी आपण विवरणपत्र भरतो, त्या वर्षाला असेसमेंट वर्ष म्हणण्याची पद्धत होती. नवीन विधेयकात त्यासाठी कर वर्ष असा शब्द वापरण्यात आला आहे. आधीच्या १६,००० पानांच्या तुलनेत नवीन विधेयक हे ६२२ पानांचं आहे. आणि यात डिजिटल कर भरणा आणि विवरणपत्र भरण्यावर भर देण्यात आला आहे. यात कुठलेही नवीन कर नाहीएत. पण, आधीच्या कायद्याची भाषा सोपी करण्यात आली आहे.(New Income Tax Bill 2025)१० मुद्यांमध्ये नवीन आयकर कायदा समजून घेऊया,

करदाते आणि कर संकलन करणारी यंत्रणा या दोन्हींसाठी हा कायदा सुटसुटीत आहे. यात करांवरील दावे लवकर निकालात काढायला मदत होईल. ६२२ पानी विधेयकांत ५३६ विभाग आहेत. २३ शीर्षक आहेत. आणि १६ पुरवण्या आहेत.

पगारदार करदाते, व्यावसायिक उत्पन्न असलेले करदाते तसंच उद्योगपती सेवभावी संस्था या सगळ्यांसाठी विवरणपत्र भरण्याची भाषा आणि प्रक्रिया काहीशी बदलणार असली तरी ती जास्त सोपी झाली आहे.

आधीच्या विधेयकात २९८ विभाग होते. ते आता ५२३ करण्यात आले आहेत. म्हणजेच आधीच्या क्लिष्ट कलमांचं सुसुत्रीकरण करण्यात आलं असून कलमं अधिक सोपी करण्यात आली आहे. तसंच त्यांचं सुयोग्य पृथ:करण झालं आहे

नवीन कर प्रणालीत १२ लाख रुपयांपर्यंतचं वार्षिक उत्पन्न करमुक्त आहे. त्यात ७५,००० रुपयांची प्रमाणित वजावटीचा लाभही तुम्हाला मिळू शकतो. त्यामुळे एकूण १२ लाख ७५ हजार रुपयांपर्यंतचं उत्पन्न हे करमुक्त असेल. याशिवाय कर मर्यादाही बदलण्यात आल्या आहेत.

करविषयक नियमावली सोपी झाल्यामुळे करदात्यांना नवीन नियम समजणं सोपं झालं आहे. आणि एखाद्या व्यवहाराशी संबंधित करविषयक नियम हे एका कलमा अंतर्गत सुटसुटीतपणे आपल्यासमोर येतात. कर वजावटी आणि करमुक्तीची कलमंही अधिक सोपी करण्यात आली आहेत.

ISBN NO. 978-81-990957-8-6

अपडेटेड विवरणपत्र भरण्याची मुदत आता २ वर्षांवरून ४ वर्षांवर आणण्यात आली आहे. त्यामुळे आधीच्या विवरणपत्रातील चुका आणि त्रुटी दूर करण्यासाठी अतिरिक्त कालावधी करदात्यांना मिळणार आहे.

नवीन आयकर कायद्यात आर्थिक वर्ष आणि असेसमेंट वर्ष या शब्दांसाठी कर वर्ष हा शब्द निर्धारित करण्यात आला आहे. काही करविषयक तत्त्वंही सोपी करण्यात आली आहेत. भारतीय नागरिकांना त्यांनी देशात व परदेशात मिळवलेल्या उत्पन्नावर भारतात कर द्यायचा आहे. तर अनिवासी भारतीयांना त्यांनी भारतात मिळवलेल्या उत्पन्नावरच कर लागू होईल हे या विधेयकात स्पष्ट करण्यात आलं आहे.

व्हर्च्युअल डिजिटल असेट आणि इलेक्ट्रॉनिक मोड हे दोन शब्द या विधेयकात येतात. आणि या अंतर्गत क्रिप्टोकरन्सी म्हणजेच आभासी चलन येतं. अशा कुठल्याही आभासी चलन किंवा टोकनमधील गुंतवणुकीतून होणारं उत्पन्न हे वेगळ्या कलमाअंतर्गत स्पष्ट करण्यात आलं आहे. त्यावर लागणारा कर असंदिग्धपणे देण्यात आला आहे.

सेवाभावी संस्थांसाठीही ३३२ ते ३५५ कलमांअंतर्गत कर आकारणीची सविस्तर नियमावली नमूद करण्यात आली आहे.

स्टार्टअप, डिजिटल गुंतवणूक, असेट तसंच अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील उद्योग यांचाही वेगळा विचार कर आकारणीत करण्यात आला आहे.

हा कायदा लागू झाल्यानंतर ६० वर्षं जुना आयकर कायदा १९६१ हद्दपार होईल. म्हणजेच स्वातंत्र्यानंतरची आयकर कायद्यातील ही सगळ्यात मोठी सुधारणा आहे.

कु. पाणेरी खिल्लारे
कु. पायलकौर जाधव

AI गुंतवणूक अयशस्वी? ९५ टक्के कंपन्यांना कोणताही ठोस फायदा मिळाला नाही, जाणून घ्या

Marathi News: गेल्या तीन वर्षांत, जगभरातील कंपन्यांनी जनरेटिव्ह आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) प्रकल्पांमध्ये ३० ते ४० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. परंतु मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एमआयटी) च्या एका नवीन अभ्यासानुसार, यापैकी ९५% कंपन्यांना एआय टूल्सचा अवलंब केल्याने कोणताही ठोस फायदा झाला नाही

जगभरातील कंपन्या चॅटजीपीटी, कोपायलट एआय आणि इतर मोठ्या भाषा मॉडेल्सचा वापर करण्यास तत्पर आहेत. सर्वेक्षणातून असे दिसून आले आहे की ८०% पेक्षा जास्त मोठ्या कंपन्यांनी या साधनांची चाचणी घेतली आहे किंवा त्यांचा वापर लहान प्रमाणात सुरू केला आहे. सुमारे ४०% कंपन्यांनी ते कोणत्या ना कोणत्या स्वरूपात लागू केले आहेत. परंतु अभ्यासातून असे दिसून आले आहे की बहुतेक प्रकरणांमध्ये ही साधने कर्मचाऱ्यांचे काम वेगवान करण्यास मदत करत आहेत, कंपनीचा नफा वाढवत नाहीत.

Market Outlook: या आठवड्यात शेअर बाजार वाढेल की घसरेल? 'हे' फॅक्टर्स ठरवतील शेअर बाजाराची हालचाल

एआय टूल्स परिणाम का देत नाहीत?

एमआयटीच्या अभ्यासात असे म्हटले आहे की जनरेटिव्ह एआय टूल्सची सर्वात मोठी समस्या म्हणजे ते वास्तविक कामकाजाच्या प्रक्रियेत व्यवस्थित बसू शकत नाहीत. या टूल्समध्ये "कमकुवत कामाची रचना आहे, ते संदर्भानुसार शिकू शकत नाहीत आणि दैनंदिन कामांशी जुळवून

 ISBN NO. 978-81-990957-8-6

घेऊ शकत नाहीत." म्हणजेच, ही टूल्स मानवांप्रमाणे जुने अभिप्राय लक्षात ठेवू शकत नाहीत किंवा कालांतराने त्यांची समज सुधारू शकत नाहीत.

उदाहरणार्थ, जर एखाद्या कर्मचाऱ्याला नवीन माहिती किंवा चुकांमधून शिकण्याची संधी मिळाली तर तो त्याचे काम सुधारू शकतो. परंतु जनरेटिव्ह एआय मॉडेल्स हे करू शकत नाहीत. त्यांना प्रत्येक वेळी नवीन प्रशिक्षणाची आवश्यकता असते. जर त्यांनी नवीन काम किंवा परिस्थितीशी जुळवून घेण्याचा प्रयत्न केला तर त्यांची कामगिरी कमकुवत होते.

अभ्यासानुसार, "बहुतेक जनरेटिव्ह एआय सिस्टीम अभिप्राय साठवण्यात, संदर्भाशी जुळवून घेण्यात किंवा कालांतराने सुधारणा करण्यात अयशस्वी होतात." यामुळे त्यांची दीर्घकालीन अंमलबजावणी महाग आणि कुचकामी बनते.

एआय नोकऱ्या हिरावून घेणार नाही, तर आउटसोर्सिंगला आळा घालेल

एआय बद्दल एक मोठी भीती अशी होती की ते लोकांच्या नोकऱ्या काढून घेईल. पण एमआयटीच्या अभ्यासामुळे ही भीती थोडी कमी होते. अभ्यासात असे म्हटले आहे की सध्या एआयमुळे मोठ्या प्रमाणात नोकऱ्या जाण्याची शक्यता नाही. त्याऐवजी, ही साधने कंपन्यांचे बाह्य खर्च, जसे की आउटसोर्सिंग, कमी करण्यासाठी अधिक प्रभावी ठरू शकतात. अभ्यासात म्हटले आहे की, "जोपर्यंत आपण एआय सिस्टीमशी जुळवून घेण्यास आणि स्वतःहून काम करण्यास शिकत नाही तोपर्यंत कंपन्यांच्या अंतर्गत रचनेत बदल करण्याऐवजी बाह्य खर्च कमी करण्यात त्यांचा परिणाम अधिक दिसून येईल."

अनेक कंपन्या ग्राहक सेवा, मार्केटिंग किंवा कागदपत्रे तयार करणे यासारख्या कामांसाठी एआयचा वापर करत आहेत. ही साधने कर्मचाऱ्यांचा वेळ वाचवत आहेत, परंतु त्यांचा कंपनीच्या कमाईवर थेट परिणाम होत नाही. तज्ञांचे म्हणणे आहे की अनेक कंपन्या एआयच्या क्षमतांबद्दल गैरसमज करत आहेत. त्यांना एआयने माणसांसारखे विचार करावे आणि शिकावे अशी अपेक्षा आहे, परंतु असे नाही.

एआय कुठे काम करू शकते?

एमआयटीच्या अभ्यासात शिफारस करण्यात आली आहे की कंपन्यांनी मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी करण्याऐवजी लहान आणि विशिष्ट कामांसाठी जनरेटिव्ह एआयचा वापर करावा. उदाहरणार्थ, ग्राहक समर्थनासाठी स्क्रिप्ट तयार करणे, कोडिंगमध्ये मदत करणे किंवा कागदपत्रे तयार करणे. एआय या कामांमध्ये तात्काळ फायदे देऊ शकते. परंतु मोठ्या प्रमाणावर एआय लागू करणे खूप लवकर आहे आणि त्यामुळे अपयश येण्याची शक्यता आहे.

अहवालात असेही म्हटले आहे की गुंतवणूकदार आणि कंपनी मालक एआयबद्दल खूप उत्साहित आहेत, परंतु त्याची प्रगती अपेक्षेपेक्षा कमी आहे. कंपन्यांनी एआयकडे मर्यादित साधन म्हणून पाहिले पाहिजे, नफ्याची हमी देणारी जादूची पेटी म्हणून नाही.

कु. पाणेरी खिल्लारे
कु. पायलकौर जाधव

 ISBN NO. 978-81-990957-8-6

26/08/2025

आता म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक करणे झाले सोपे, पोस्ट ऑफिस आणि MFI चा महत्वाचा करारा

Mutual Fund Marathi News: आर्थिक समावेशन अधिक सखोल करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल म्हणून, दळणवळण मंत्रालयाच्या अंतर्गत येणारा टपाल विभाग (DoP) आणि असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया (AMFI) यांनी एक करार केला आहे.

AMFI च्या 30 व्या स्थापना दिनानिमित्त मुंबईत हा सामंजस्य करार करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत, इंडिया पोस्ट आता म्युच्युअल फंड गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी वितरकाची भूमिका बजावेल. ग्रामीण आणि निम-शहरी भागात राहणाऱ्या लोकांना याचा थेट फायदा होईल. पोस्ट ऑफिसच्या विस्तृत नेटवर्क आणि विश्वासामुळे, या पावलामुळे म्युच्युअल फंड उत्पादने कोट्यवधी नागरिकांपर्यंत पोहोचती.

या करारावर पोस्ट विभागाच्या महाव्यवस्थापक (व्यवसाय विकास) मनीषा बन्सल बादल आणि एएमएफआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी व्ही.एन. चालासानी यांनी स्वाक्षरी केली. सेबीचे अध्यक्ष तुहिन कांत पांडे हे देखील यावेळी उपस्थित होते.

या करारांतर्गत, टपाल विभागाचे कर्मचारी लहान शहरे आणि खेड्यांमध्ये गुंतवणूक जागरूकता वाढवण्यासाठी म्युच्युअल फंड वितरक म्हणून काम करतील. ग्रामीण आणि निम-शहरी भागात इंडिया पोस्टची मजबूत उपस्थिती म्युच्युअल फंडांची पोहोच वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल.

म्युच्युअल फंड: गुंतवणूक करण्याचा सोपा मार्ग

यामध्ये अनेक लोकांकडून पैसे गोळा केले जातात आणि एक व्यावसायिक फंड मॅनेजर ते शेअर्स, बाँड्स, सोने आणि सरकारी सिक्युरिटीज अशा वेगवेगळ्या ठिकाणी गुंतवतो.

गुंतवणुकीतून होणारा नफा किंवा तोटा गुंतवणूकदारांच्या वाट्यानुसार वितरित केला जातो. उदाहरणार्थ, जर १०० लोकांनी प्रत्येकी १,००० रुपये गुंतवले तर एकूण १ लाख रुपये जमा होतील. फंड मॅनेजर ही रक्कम शेअर्स किंवा बाँडसारख्या ठिकाणी गुंतवेल. जर गुंतवणुकीने १० टक्के परतावा दिला तर प्रत्येक गुंतवणूकदाराला त्याच प्रमाणात नफा मिळेल.

कु. संध्या पदमगिरवार

27/08/2025

भारतावर 50% टॅरिफ लावून ट्रम्प यांनी स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारली

अमेरिका राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला आधी 25 टक्के बेस टॅरिफ लावला. यानंतर, रशियाकडून तेल खरेदी केल्याने दंडाच्या स्वरुपात 25 टक्के, म्हणजेच एकूण 50 टक्के टॅरिफ लावला आहे.

हा टॅरिफ अथवा कर आज (27 ऑगस्ट 2025) सकाळी सव्वा नऊ वाजल्यापासून लागू झाला आहे. मात्र असे करून ट्रम्प यांनी स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारून घेतली आहे.

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अहवालानुसार, भारतावर अधिक शुल्क लावण्याचा उलटा परिणाम अमेरिकेवरच होऊ शकतो. यामुळे त्यांची अर्थव्यवस्था रसातळाला जाऊ शकते. तसेच, यामुळे तेथील महागाई वाढेल, तर दुसरीकडे, विकासालाही मोठा धक्का बसू शकतो.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

नवे टॅरिफ अमेरिकेसाठी आत्मघाती -

एएनआय या वृत्तसंस्थेने एसबीआयच्या अहवालाच्या हवाल्याने म्हटले आहे की, नव्या टॅरिफमुळे अमेरिकेचा जीडीपी ग्रोथ घसरून 40-50 बेसिस प्वाइंट वर येऊ शकतो. याशिवाय, कमकुवत अमेरिकन डॉलर आणि खर्चात वाढ, यामुळे महागाईही जबरदस्त वाढेल.

अमेरिकेत, इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल्स आणि ग्राहकोपयोगी वस्तू यासारख्या पूर्णपणे आयातीवर अवलंबून असलेल्या क्षेत्रांवर याचा परिणाम स्पष्टपणे दिसून येत आहे. सबीआयच्या अहवालात पुढे म्हणण्यात आले आहे की, २०२६ मध्ये यूएस फेडरल रिझर्व्हचे अंदाजे महागाई लक्ष्य २ टक्के एवढे आहे. मात्र, हा दर त्यापेक्षाही खूप अधिक असणार आहे. याचे मुख्य कारण टॅरिफचा परिणाम सांगण्यात आले आहे.

भारत अमेरिकेला औषधं, स्मार्टफोनचे उपकरण आणि कपडे यांची प्रामुख्यानं निर्यात करतो. गेल्या दहा वर्षांमध्ये भारताचा अमेरिकेसोबत व्यापार दुपटीने वाढला आहे. 2023 मध्ये भारतानं अमेरिकेकडून 87 डॉलर अब्ज रुपयांचं सामान आयात केलं होतं, तर अमेरिकेला 47 अब्ज डॉलर रुपयांचं सामान निर्यात केलं होतं. ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणाचा परिणाम हा आता अशा अमेरिकन कंपन्यांवर देखील पडणार आहे, ज्यांनी चीनमधील आपले प्रोजेक्ट बंद करून भारतात सुरू केले होते.

भारताची अमेरिकेत होणारी निर्यात त्याच जीडीपीच्या सुमारे २% आहे. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये, भारताने अमेरिकेला ८६.५ अब्ज डॉलर्सच्या वस्तू निर्यात केल्या तर ४५.७ अब्ज डॉलर्सच्या वस्तू आयात केल्या. सिन्हा म्हणाले की, जर उच्च शुल्कामुळे विकास दर ६% पेक्षा कमी झाला तर आरबीआय व्याजदरात आणखी ५० बीपीएस कपात करेल. तसेच, सरकार प्रभावित झालेल्या क्षेत्रांना आर्थिक मदत करेल. भारतीय जनतेने स्वदेशी वस्तूचा वापर वाढवला तर अमेरिकेला नक्कीच धक्का बसेल अमेरिकन वस्तू टाळणे व आपली व निर्यात करण्यासाठी नवीन बाजार पेठ शोधणे गरजेचे आहे.

कु. संध्या पदमगिरवार

28/08/2025

२०३८ पर्यंत भारत जगातील दुसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल

जागतिक व्यावसायिक सेवा फर्म EY (अर्न्स्ट अँड यंग) च्या ताज्या अहवालानुसार, भारताची अर्थव्यवस्था २०३० पर्यंत क्रयशक्ती समता (PPP) आधारावर २०.७ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचू शकते आणि २०३८ पर्यंत भारत अमेरिकेला मागे टाकून जगातील दुसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनू शकतो.

आयएमएफच्या मते, आर्थिक वर्ष २५ मध्ये भारताचा जीडीपी (पीपीपी आधारावर) १४.२ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्स इतका अंदाज आहे, जो बाजार विनिमय दराच्या (यूएसडी) सुमारे ३.६ पट आहे.

भारत आधीच चीन आणि अमेरिकेनंतर (पीपीपी आधारावर) तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे.

जर भारताने सरासरी वार्षिक वाढ ६.५% आणि अमेरिकेने २.१% (२०२८-२०३० पर्यंत) कायम ठेवली, तर भारत २०३८ पर्यंत (पीपीपी आधारावर) अमेरिकेलाही मागे टाकू शकेल.

२०२८ पर्यंत, भारत बाजार विनिमय दरांच्या आधारावर जर्मनीला मागे टाकून तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनू शकेल.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

"भारताची तुलनात्मक ताकद – जसे की तरुण आणि कुशल कर्मचारी वर्ग, उच्च बचत आणि गुंतवणूक दर आणि स्थिर क्रेडिट प्रोफाइल – यामुळे जागतिक चढउतार असूनही उच्च वाढ टिकवून ठेवता येते," असे EY इंडियाचे मुख्य धोरण सल्लागार डी.के. श्रीवास्तव म्हणाले.

अमेरिकेच्या शुल्काचा परिणाम मर्यादित असेल

२७ ऑगस्ट २०२५ पासून लागू होणाऱ्या ५०% आयात शुल्कामुळे भारताच्या ४८ अब्ज डॉलर्सच्या निर्यातीवर परिणाम होऊ शकतो.

प्रभावित क्षेत्रे: कापड, दागिने, कोळंबी, चामडे-पादत्राणे, प्राण्यांची उत्पादने, रसायने, यंत्रसामग्री इ.

औषध, ऊर्जा उत्पादने आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंना शुल्कातून सूट देण्यात आली आहे.

भारताच्या एकूण निर्यातीपैकी अमेरिकेचा वाटा जवळपास २०% आहे.

२०२४-२५ मध्ये, भारताने अमेरिकेला ८६.५ अब्ज डॉलर्सची निर्यात केली आणि ४५.३ अब्ज डॉलर्सची आयात केली.

द्विपक्षीय व्यापार १३१.८ अब्ज डॉलर्सवर पोहोचला.

अहवालानुसार, अमेरिकेच्या शुल्काचा भारताच्या जीडीपीवर थेट परिणाम सुमारे ०.९% असू शकतो. जर यापैकी एक तृतीयांश वास्तविक मागणीत घट झाली तर एकूण परिणाम ०.३% पर्यंत मर्यादित असू शकतो. योग्य धोरणे आणि प्रतिकारात्मक उपाययोजना (जसे की आयात कमी करणे आणि देशांतर्गत मागणी वाढवणे) सह, हा परिणाम फक्त ०.१% (१० बेसिस पॉइंट्स) पर्यंत मर्यादित असू शकतो.

याचा अर्थ असा की आर्थिक वर्ष २६ मध्ये भारताचा ६.५% चा संभाव्य विकास दर कमाल ६.४% पर्यंत कमी होऊ शकतो. अहवालानुसार, भारत तांत्रिक क्षमता, स्वावलंबन आणि देशांतर्गत मागणीवर आधारित विकासाकडे वाटचाल करत आहे आणि २०४७ पर्यंत 'विकसित भारत' या ध्येयाकडे वेगाने वाटचाल करत आहे. EY अहवालात स्पष्ट केले आहे की भारत जागतिक आर्थिक मंचावर वेगाने उदयास येत आहे.

मजबूत देशांतर्गत मागणी, तरुण लोकसंख्या आणि तांत्रिक क्षमता यामुळे भारत येत्या काळात अर्थव्यवस्थेच्या नवीन उंचीवर पोहोचू शकेल, जरी त्याला अमेरिकेसारख्या देशांकडून धोरणात्मक आव्हानांना तोंड द्यावे लाग.

जीएसटी सुधारणांमुळे अमेरिकेच्या टॅरिफचा प्रभाव कमी होईल, अर्थव्यवस्थेला आधार मिळेल.

टॅरिफचा भारतावर फारसा परिणाम होणार नाही. हा दावा फिच सोल्युशन्सची कंपनी बीएमआयने त्यांच्या ताज्या अहवालात केला आहे. अहवालात म्हटले आहे की वस्तू आणि सेवा करातील (जीएसटी) सुधारणांमुळे कर दर कमी होतील ज्यामुळे वापर वाढेल.

यामुळे अमेरिकेतील टॅरिफचा दबाव कमी होईल. जीएसटी सुधारणा आणि अलीकडील आयकर कपातीमुळे वापरात ₹५.३१ लाख कोटींची वाढ होऊ शकते, जी जीडीपीच्या सुमारे १.६ टक्के आहे.

२०२५-२६ या आर्थिक वर्षात ५.८ टक्के आणि २०२६-२७ या आर्थिक वर्षात ५.४ टक्के वाढ अपेक्षित आहे

अहवालात म्हटले आहे की अमेरिकेच्या टॅरिफमुळे आर्थिक वर्ष २०२५-२६ आणि २०२६-

 ISBN NO. 978-81-990957-8-6

२७ मध्ये भारताचा जीडीपी विकासदर ०.२ टक्के कमी होऊ शकतो. म्हणूनच, बीएमआयने आपला अंदाज सुधारित केला आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ५.८ टक्के आणि २०२६-२७ मध्ये ५.४ टक्के वाढ होण्याचा अंदाज आहे.

या अहवालात असेही म्हटले आहे की या दशकात (२०१९-२०२९) भारत आशियातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या उदयोन्मुख अर्थव्यवस्थांपैकी एक राहील. या काळात, जीडीपी वाढीचा दर ६ टक्के पेक्षा थोडा जास्त असेल.

एस अँड पी ने भारताचे रेटिंग वाढवले होते

यापूर्वी, जागतिक रेटिंग एजन्सी एस अँड पी ग्लोबलने भारताचे दीर्घकालीन क्रेडिट रेटिंग बीबीबी- वरून बीबीबी केले होते. अल्पकालीन रेटिंग देखील ए-३ वरून ए-२ केले होते. भारतीय अर्थव्यवस्थेचा दृष्टिकोन स्थिर ठेवण्यात आला आहे.

एस अँड पी म्हणते की भारताची अर्थव्यवस्था मजबूत होत आहे. सरकार सतत खर्च नियंत्रित करण्याचा प्रयत्न करत आहे, ज्याला राजकोषीय एकत्रीकरण म्हणतात. याशिवाय, भारताची आर्थिक वाढ देखील वेगाने होत आहे,

कु. वैष्णवी औंढेकर
कु. शिवानी यादव

भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा तेल आयात आणि निर्यात करणारा देश आहे.

आकडेवारी दर्शवते की, भारत त्याच्या गरजेच्या 85 टक्के पर्यंत इतर देशांकडून आयात करतो. भारत जगातील 40 देशांमधून तेल आयात करतो आणि त्यांतून विविध प्रकारचे पेट्रोलियम पदार्थ तयार करुन इतर देशांना विकतो.

रशियाकडून सर्वाधिक तेल आयात

भारत ज्या 40 देशांकडून तेल खरेदी करतो त्यामध्ये रशिया अव्वल स्थानावर आहे. २०२४ पासून भारताने रशियासोबत तेल व्यापार वाढवला आहे. वाणिज्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये रशिया हा भारताला तेल पुरवठा करणारा सर्वात मोठा निर्यातदार देश आहे. देशात आयात होणाऱ्या कच्च्या तेलाच्या सुमारे एक तृतीयांश तेल रशियाकडून आले आहे.

रशियाकडून कच्च्या तेलाचा पुरवठा वर्षानुवर्षे २५% वाढून ३.९२ अब्ज डॉलर्सवर पोहोचला आहे. आकडेवारीनुसार, रशियाकडून कच्च्या तेलाची आयात गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये ३.६१ अब्ज डॉलर्सवरून ८% वाढून १०.५ अब्ज डॉलर्सवर पोहोचली. रशियाशिवाय, भारत सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, अमेरिका, कुवेत, नायजेरिया, मेक्सिको आणि ओमान येथून तेल आयात करतो. ब्राझील, कॅनडा, गयाना आणि सुरीनाम हेदेखील भारताला तेल पुरवठा करणारे देश आहेत.

भारत किती देशांना तेल विकतो?

४० देशांकडून तेल आयात केल्यानंतर भारत तेलाचे काय करतो? भारत तेल आयात करतो पण ते पेट्रोलियम उत्पादन म्हणून इतर देशांना विकतो. म्हणजेच, कच्च्या तेलाचे शुद्धीकरण आणि प्रक्रिया केल्यानंतर ते इतर देशांना निर्यात केले जाते.

भारत जगातील अनेक देशांना पेट्रोलियम उत्पादने पुरवतो. यामध्ये अमेरिका, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया, नेदरलँड्स, ऑस्ट्रेलिया, युएई, युरोपीय देश तसेच दक्षिण आफ्रिका यांचा समावेश आहे. भारताकडून रिफाइंड तेल खरेदी करण्यात युरोप अव्वल आहे.

भारत कोणते पेट्रोलियम उत्पादने तयार करतो?

 ISBN NO. 978-81-990957-8-6

भारत कच्चे तेल शुद्ध करतो आणि विविध क्षेत्रात वापरल्या जाणारे उत्पादने तयार करतो. यामध्ये हाय स्पीड डिझेल, पेट्रोल (मोटर स्पिरिट), इंधन तेल, विमानचालन टर्बाइन इंधन (इंधन) आणि रॉकेल यांचा समावेश आहे. या पेट्रोलियम उत्पादनांचा वापर दैनंदिन जीवनात तसेच वाहतुकीत केला जातो. याशिवाय, त्यांचा वापर वीज निर्मिती, विमाने, लष्करी वाहने आणि पाणबुड्या चालविण्यासाठी केला जातो.

कु. प्रतीक्षा घरणे
कु. सावित्रा पावडे

29/08/2025

Sensex 79,809.65

Nifty 24,426.85

Gold ₹ 9,470/ Gram

Silver ₹ 119.90/ Gram

सोन्याचे दर

सोन्याच्या दरात गेल्या अनेक दिवसांपासून वाढ होत होती. सोन्याच्या दरात मागच्या काही दिवसांत १० तोळ्यामागे ३००० ते ८००० रुपयांची वाढ झाली होती.दरम्यान, आज सोन्याच्या दरात किचिंत वाढ झाली आहे.

प्रति तोळ्यामागे फक्त १० रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे ग्राहकांना थोडासा दिलासा मिळाला आहे.

EPF Calculator: महिन्याला ₹५००० गुंतवा अन् ३.५ कोटींचा फंड मिळवा; वाचा नेमकं कॅल्क्युलेशन

आज सोन्याच्या दरात एकदम किचिंत वाढ झाली आहे. ऐन सणासुदीच्या दिवसात सोन्याच्या दरात सतत वाढ होत असल्याने ग्राहकांच्या मनात चिंता निर्माण झाली आहे. आज सोन्याचे दर १ तोळ्यामागे फक्त १० रुपयांनी वाढले आहेत.

२४ कॅरेट सोन्याचे दर (24k Gold Rate)

आज २४ कॅरेट सोन्याचे दर १,०२,६१० रुपये आहे. या दरात कालच्या तुलनेत आज फक्त १० रुपयांची वाढ झाली आहे. १० तोळा सोन्याचे दर १०० रुपयांनी वाढले आहेत. हे दर १०,२६,१०० रुपये झाले आहेत.

२२ कॅरेट सोन्याचे दर (22k Gold Rate)

आज २२ कॅरेट सोन्याचे दरदेखील १० रुपयांनी वाढले आहेत.हे दर ९४,०६० रुपये झाले आहेत. ८ ग्रॅम सोन्याचे दर ७५,२४८ रुपये आहेत. या दरात फक्त ८ रुपयांची वाढ झाली आहे. १० तोळ्यामागे १०० रुपयांची वाढ झाली असून हे भाव ९,४०,६०० रुपये झाले आहेत.

Today Gold Rate: सोन्याचे दर १०,००० रुपयांनी वाढले; ग्राहकांच्या खिशाला फटका; १० तोळ्याचे भाव किती?

१८ कॅरेट सोन्याचे दर (18k Gold Rate)

आज १८ कॅरेट सोन्याच्या दरातदेखील १० रुपयांची वाढ झाली आहे. १ तोळ्यामागे ग्राहकांना ७६,९६० रुपये मोजावे लागणार आहेत. १० तोळ्यामागे ७,६९,००० रुपये मोजावे लागणार आहे. ८ ग्रॅमसाठी तुम्हाला ६१,५६८ रुपये मोजावे लागणार आहेत.

कु. निकिता गाजलवाड
कु. राधिका नरहिरे

 ISBN NO. 978-81-990957-8-6

30/08/2025

भारतीय शेअर बाजारांमध्ये आज सप्टेंबर महिन्याची सुरुवात घसरणीसह झाली.

दिवसभर घसरणीसह व्यवहार केल्यानंतर, शेअर बाजारातील घसरण आणखी वाढली. सलग तिसऱ्या दिवशी बाजार घसरणीसह बंद झाला. निफ्टी 74 अंकांनी घसरून 24,426 वर बंद झाला. सेन्सेक्स 271अंकांनी घसरून 79,809 वर आणि बँक निफ्टी 164 अंकांनी घसरून 53,655 वर बंद झाला.

रिलायन्स इंडस्ट्रीजच्या शेअर्समध्ये घसरण

आज सेन्सेक्समधील 30 शेअर्सपैकी बहुतांशात शेअर्समध्ये घसरण पाहायला मिळाली. महिंद्रा अँड महिंद्रा (M&M), रिलायन्स इंडस्ट्रीज, इन्फोसिस, टेक महिंद्रा आणि टाटा मोटर्स यांसारख्या दिग्गज शेअर्समध्ये मोठी घसरण झाली. त्याउलट ITC, BEL, Trent, Asian Paints आणि L&T या कंपन्यांच्या शेअर्समध्ये वाढ झाली.

विशेष म्हणजे, रिलायन्स इंडस्ट्रीजच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या (AGM) दिवशीच कंपनीच्या शेअर्समध्ये मोठ्या प्रमाणावर विक्री झाली. त्यामुळे RIL चे शेअर्स 2.21% नी कोसळून 1,357.05 रुपयांवर बंद झाले आणि कंपनीचे मार्केट कॅप घसरुन 18.36 लाख कोटी रुपयांवर आले.

स्मॉलकॅप-मिडकॅपमध्येही विक्री

मोठ्या कंपन्यांबरोबरच स्मॉलकॅप आणि मिडकॅप शेअर्समध्येही आज मोठी पडझड दिसून आली. निफ्टी मिडकॅप 100 निर्देशांक 0.52% घसरला, तर निफ्टी स्मॉलकॅप 100 मध्ये 0.40% घसरण झाली.

ऑटो, आयटी आणि मेटल सेक्टर घसरले

सेक्टर-आधारित परफॉर्मन्स पाहता, आज बहुतांश निर्देशांक लाल रंगात बंद झाले. विशेषतः ऑटो, आयटी आणि मेटल क्षेत्रातील शेअर्समध्ये घसरण झाली.

तीन दिवसांत 11.16 लाख कोटींचे नुकसान

सलग तीन दिवसांच्या या पडझडीमुळे गुंतवणूकदारांचे तब्बल 11.16 लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले.

29 ऑगस्ट रोजी BSE वर लिस्टेड कंपन्यांचे एकूण मार्केट कॅप 4,43,86,043.20 कोटी रुपयांवर घसरले.

28 ऑगस्ट रोजी मार्केट कॅप 4,45,17,222.66 कोटी रुपये होते. म्हणजे एका दिवसातच गुंतवणूकदारांना 1.31 लाख कोटींचा तोटा सहन करावा लागला.

25 ऑगस्टला मार्केट कॅप 4,55,02,643.25 कोटी रुपये होते, तर 26 ऑगस्टला ते 4,49,45,420.62 कोटी रुपये होते.

यामुळे गेल्या तीन सत्रांतच तब्बल 11.16 लाख कोटी रुपये गमावल्याने गुंतवणूकदार चिंतेत आहेत.

कु. राणी बुलबुले
कु. शैलेजा कोपलवाड

SMBC ने मे महिन्यात येस बँकेतील २० टक्के हिस्सा खरेदी करण्याची घोषणा

आता त्यांना २४.९९ टक्के हिस्सा खरेदी करण्याची मान्यता मिळाली आहे. SMBC ही जपानच्या दुसऱ्या सर्वात मोठ्या बँकिंग गट सुमितोमो मित्सुई फायनान्शियल ग्रुप, इंक. (SMFG) ची पूर्ण मालकीची उपकंपनी आहे.

१ लाखाचे ६ लाख करणारा 'हा' स्टॉक २४ टक्क्याने घसरला, तरीही ब्रोकरेजने दिले 'BUY' रेटिंग; गुंतवणूकदारांनी काय करावे?

 ISBN NO. 978-81-990957-8-6

ही खरेदी सप्टेंबर २०२५ पर्यंत पूर्ण होऊ शकते. या कराराला मंजुरी मिळावी म्हणून एसएमबीसीने भारतीय स्पर्धा आयोगाकडे (सीसीआय) अर्जही केला आहे. या वर्षी मे महिन्यात स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) आणि इतर ७ कर्जदात्यांनी येस बँकेतील त्यांच्या एकत्रित हिस्स्यातील २० टक्के हिस्सा एसएमबीसीला विकण्याची घोषणा केली. हा करार १३,४८३ कोटी रुपयांचा असणार आहे. या किमतीनुसार, ही भारतातील बँकिंग क्षेत्रातील सर्वात मोठी क्रॉस बॉर्डर गुंतवणूक आहे. व्यवहार पूर्ण झाल्यानंतर, एसएमबीसी येस बँकेतील सर्वात मोठा भागधारक बनेल.

२० टक्के शेअर्समध्ये कोण किती हिस्सा विकेल?

आधी असे म्हटले होते की विकल्या जाणाऱ्या २० टक्के हिस्स्यांपैकी १३.१९ टक्के हिस्सा एसबीआय कमी करेल. त्या बदल्यात एसएमबीसी ८,८८९ कोटी रुपये देईल. याशिवाय, ६.८१ टक्के हिस्सा ॲक्सिस बँक, बंधन बँक, फेडरल बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, आयडीएफसी फर्स्ट बँक आणि कोटक महिंद्रा बँक सुमारे ४,५९४ कोटी रुपयांना विकतील. एसबीआयकडे सध्या येस बँकेत २४ टक्के हिस्सा आहे.

एसबीआयने कधी गुंतवणूक केली?

येस बँकेच्या पुनर्बांधणी योजनेचा भाग म्हणून एसबीआय आणि या ७ इतर बँकांनी मार्च २०२० मध्ये बँकेत गुंतवणूक केली होती. येस बँक उंचावरून जमिनीवर पडल्यानंतर, आरबीआयने मार्च २०२० मध्ये एक मोठा निर्णय घेतला. बँक व्यवस्थापनाला निर्धारित वेळेत पुनरुज्जीवन योजना शोधण्यात अपयशी ठरल्यामुळे, आरबीआयने बँकेचे संचालक मंडळ बरखास्त केले आणि एसबीआयचे माजी सीएफओ प्रशांत कुमार यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली. ग्राहकांसाठी पैसे काढण्याची मर्यादा ३ एप्रिल २०२० पर्यंत ५०,००० रुपये करण्यात आली.

तसेच, एसबीआयला येस बँकेत गुंतवणूक करण्यासाठी बँकांचे एक संघ तयार करण्यास सांगितले गेले. येस बँकेचे विद्यमान भागधारक पुढील ३ वर्षांसाठी त्यांच्या ७५ टक्के शेअरहोल्डिंगची विक्री करू शकत नाहीत, असेही निर्देश देण्यात आले. त्यानंतर, एसबीआयने एलआयसी आणि इतर बँकांसह येस बँकेत ११,००० कोटी रुपयांची गुंतवणूक केली. ऑक्टोबर २०२२ मध्ये, प्रशांत कुमार यांना बँकेचे सीईओ आणि एमडी बनवण्यात आले.

कु. कार्तिका पगडाला
कु. गजानन राजरवाड

31/08/2025

एक वर्षाच्या एफडीवर विविध बँका आकर्षक व्याजदर देत आहेत. खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील प्रमुख बँकांचे व्याजदर आणि तुमच्या गुंतवणुकीवर मिळणारा संभाव्य परतावा खालीलप्रमाणे आहे.

खासगी बँकांमधील आकर्षक दर

१. इंडसइंड बँक

खासगी बँकांमध्ये इंडसइंड बँक एक वर्षाच्या एफडीवर सर्वाधिक ७% व्याजदर देत आहे. याचा अर्थ, जर तुम्ही या बँकेत १ लाख रुपये गुंतवले तर एका वर्षानंतर तुम्हाला ७,००० रुपयांचा फायदा होईल आणि एकूण रक्कम १,०७,००० रुपये मिळेल.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

२. ॲक्सिस बँक, एचडीएफसी बँक आणि कोटक महिंद्रा बँक

या तिन्ही प्रमुख बँका एक वर्षाच्या एफडीवर ६.६०% व्याजदर देत आहेत. जर तुम्ही १ लाख रुपये गुंतवले तर मुदतपूर्तीवर तुम्हाला १,०६,६०० रुपये मिळतील.

३. आयसीआयसीआय बँक

आयसीआयसीआय बँक एक वर्षाच्या एफडीवर ६.४०% व्याजदर देत आहे. १ लाख रुपयांच्या गुंतवणुकीवर तुम्हाला १,०६,४०० रुपये परत मिळतील.

सार्वजनिक बँकांमधील स्पर्धा

१. बँक ऑफ बडोदा, पंजाब नॅशनल बँक आणि युनियन बँक ऑफ इंडिया

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये या तिन्ही बँका सर्वाधिक ६.६०% व्याजदर देत आहेत. म्हणजेच, १ लाख रुपयांच्या गुंतवणुकीवर तुम्हाला १,०६,६०० रुपये परत मिळतील.

२. कॅनरा बँक

कॅनरा बँक एक वर्षाच्या एफडीवर ६.५०% व्याजदर देत आहे, ज्यामुळे १ लाख रुपयांच्या गुंतवणुकीवर तुम्हाला १,०६,५०० रुपये मिळतील.

३. स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय):

देशातील सर्वात मोठी बँक असलेल्या एसबीआयमध्ये एक वर्षाच्या एफडीवर ६.४५% व्याजदर मिळत आहे. १ लाख रुपयांच्या गुंतवणुकीवर तुम्हाला १,०६,४५० रुपये परत मिळतील.

सोन्याच्या किमतीत मोठी घसरण, खरेदी करण्याची सुवर्णसंधी! २४ कॅरेट सोन्याच्या १० ग्रॅमचा नवीन दर काय?

पैशांची सुरक्षितता किती?

भारतीय रिझर्व्ह बँकेची उपकंपनी असलेली डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन ५ लाख रुपय.

कु. कार्तिका पगडाला

DMart मध्ये कोणत्या दिवशी सामान जास्त महाग असतं? खरेदीला जाण्यापूर्वी हे एकदा बघाच

डीमार्ट स्वस्तात मस्त शॉपिंगसाठी खूप फेमस आहे पण तुम्हाला माहितीये इथे सामान कधी स्वस्त आणि कधी महाग मिळते?

चला तर मग जाणून घेऊया डीमार्टचे सीक्रेट काय आहे

DMart Best Days to Shop : डीमार्ट हे नाव म्हणजे स्वस्त आणि दर्जेदार खरेदीसाठी सगळ्यात जास्त लोकप्रिय आहे.

पण तुम्हाला माहिती आहे का की डीमार्टमध्ये सामान खरेदी करण्यासाठी काही दिवस विशेष ऑफर्स देतात तर काही दिवशी किंमती थोड्या जास्त असू शकतात? चला जाणून घेऊया कधी खरेदी करणे फायदेशीर आणि कधी टाळावे.

डीमार्ट त्यांच्या कमी किमतींसाठी प्रसिद्ध आहे कारण ते वर्षभर एमआरपीपेक्षा कमी दरात सामान विकतात. पण काही विशिष्ट दिवशी विशेषतः सणासुदीच्या काळात किंवा ऑफर नसलेल्या कालावधीत काही उत्पादनांच्या किमती थोड्या जास्त असू शकतात. उदाहरणार्थ सणांच्या आधी किंवा लगेचच जेव्हा मागणी वाढते तेव्हा काही वस्तूंवर सूट कमी होऊ शकते. विशेषतः तेल, साखर, मसाले यांसारख्या किराणा वस्तूंवर सणांच्या काळात किंमती स्थिर राहतात किंवा

 ISBN NO. 978-81-990957-8-6

क्वचितच वाढतात कारण मागणीमुळे स्टॉक लवकर संपतो.

उलट डीमार्टमध्ये शुक्रवार ते रविवार या वीकेंड सेल्स दरम्यान आणि सोमवारी क्लीनअप सेल्सच्या वेळी जास्त ऑफर्स मिळतात. या कालावधीत FMCG, कपडे आणि ब्यूटी प्रॉडक्ट्सवर ५० टक्क्यांपर्यंत सूट किंवा बायवन गेटवन ऑफर्स उपलब्ध असतात. त्यामुळे या दिवशी खरेदी करणे जास्त फायदेशीर ठरते. ऑनलाइन खरेदी करणाऱ्यांसाठी सोमवार आणि बुधवारी डीमार्ट रेडी ॲपवर विशेष डील्स मिळतात. मात्र सणांच्या आधी किंवा गर्दीच्या कालावधीत जसे की दिवाळी, होळी किंवा नवीन वर्ष, स्टोअरमध्ये गर्दी वाढते आणि काही वस्तूंवर ऑफर्स कमी होऊ शकतात.

त्यामुळे खरेदीची घाई टाळण्यासाठी आठवड्याच्या मध्यात म्हणजे मंगळवार किंवा गुरुवारी खरेदी करणे फायदेशीर ठरू शकते कारण गर्दी कमी आणि ऑफर्स स्थिर असतात. थोडक्यात डीमार्टमध्ये खरेदी करताना वीकेंड सेल्स किंवा सणांच्या ऑफर्सचा फायदा घ्या पण सणांच्या आधी किंवा मागणी जास्त असलेल्या कालावधीत किंमती थोड्या जास्त असू शकतात. तुमच्या बजेटनुसार खरेदीचे नियोजन करा आणि डीमार्टच्या स्वस्त खरेदीचा आनंद घ्या

कु. संध्या पदमगिरवार

डोनाल्ड ट्रम्पच्या टॅरिफमुळे अमेरिकन लोकांवर महागाईचा डोंगर कोसळला

अमेरिकेतील महागाई कमी करण्यासारख्या अनेक आश्वासनांच्या आधारे डोनाल्ड ट्रम्प यांनी निवडणूक जिंकली आणि दुसऱ्यांदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले. परंतु, निवडणूक जिंकल्यानंतर सामान्य अमेरिकन लोकांना महागाईपासून कोणताही दिलासा मिळताना दिसत नाही, उलट त्यांच्यावर महागाईचा भार सतत वाढत आहे.

ट्रम्प यांनी वेगवेगळ्या देशांवर लादलेल्या मोठ्या शुल्कामुळे, आता अमेरिकन लोकांना कोणतीही आयात केलेली वस्तू खरेदी करण्यासाठी जास्त पैसे मोजावे लागत आहेत, ज्यामुळे त्यांच्यावर आर्थिक भार वाढत आहे.

१९३३ नंतर अमेरिकन लोक सर्वाधिक कर भरत आहेत

वॉशिंग्टनच्या सिनेटर पॅटी मरे यांनी त्यांच्या एक्स वर म्हटले आहे की, "आज, ट्रम्पमुळे, अमेरिकन लोक १९३३ नंतर सर्वाधिक कर भरत आहेत आणि ट्रम्पच्या करांमुळे सरासरी कुटुंबाला $२,४०० चे नुकसान होईल. ट्रम्पमुळे, तुम्ही जवळजवळ प्रत्येक गोष्टीसाठी जास्त पैसे देत आहात."

कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना याचा सर्वाधिक फटका बसेल

यूएसडीए इकॉनॉमिक रिसर्च सर्व्हिसच्या ताज्या अन्न किंमत अंदाजानुसार, या वर्षी जून ते जुलै या कालावधीत एकूण अन्न ग्राहक किंमत निर्देशांक (सीपीआय) ०.२ टक्के वाढला आहे, जो एकूण चलनवाढीच्या अनुरूप आहे परंतु किरकोळ किमतींवर सतत वाढणारा दबाव दर्शवितो. या वर्षाच्या अखेरीस, अन्नाच्या किमती ३.४ टक्क्या ने वाढण्याचा अंदाज आहे, जो २० वर्षांच्या ऐतिहासिक सरासरी २.९ टक्क्या पेक्षा जास्त आहे. या वाढीचा सर्वात जास्त फटका कमी उत्पन्न असलेल्या अमेरिकन आणि कुटुंबांना बसेल.

कृषी उत्पादनांच्या किमतीत मोठी वाढ होण्याची शक्यता

 ISBN NO. 978-81-990957-8-6

भारताव्यतिरिक्त, डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅनडा आणि मेक्सिकोवरही मोठ्या प्रमाणात कर लादले आहेत. कॅनडा आणि मेक्सिको अमेरिकेला मोठ्या प्रमाणात कृषी उत्पादने निर्यात करतात. त्यामुळे अमेरिकेतील कृषी उत्पादनांच्या किमती थेट वाढतील. अमेरिकेने २०२३ मध्ये १९५.९ अब्ज डॉलर्स किमतीची कृषी उत्पादने आयात केली, ज्यामध्ये मेक्सिको आणि कॅनडाचा वाटा ४४ टक्के होता.

वाढीव दराचा भार ग्राहकांवर पडणार

येल बजेट लॅबच्या मते, अमेरिकेत अन्नधान्याच्या किमती एकूण २.८ टक्के वाढण्याची अपेक्षा आहे, ज्यामध्ये ताज्या उत्पादनात ४% वाढ होईल. घाऊक विक्रेते आणि किरकोळ विक्रेते यासारखे आयातदार जास्त खर्च ग्राहकांना देतात. अमेरिका त्याच्या ९४ टक्के कोळंबीसाठी (बहुतेक इक्वेडोर, भारत, इंडोनेशिया आणि व्हिएतनाममधून, ज्यावर १०-५० टक्के शुल्क आकारले जाते), ५५ टक्के ताजी फळे आणि ३२ टक्के ताज्या भाज्या आयातीवर अवलंबून असतात.

कु. गजानन राजरवाड

GST सवलतीमुळे दुचाकी वाहनांपासून SUV पर्यंत. ऑटो क्षेत्र पुन्हा उभारी घेतेय

भारतातील ऑटोमोबाईल क्षेत्र वेगाने प्रगती करत आहे. ब्रोकरेज हाऊसचा असा विश्वास आहे की सरकारी धोरणात्मक सवलती, ग्रामीण भागात सुधारणा आणि नवीन वाहनांचे लाँचिंग एकत्रितपणे ऑटो मागणी वाढवेल.

रेपो आणि सीआरआर दर कपात आणि जीएसटी दरात कपात ही या तेजीचे प्रमुख कारक मानले जातात. यामध्ये दुचाकी वाहन विभागाला सर्वाधिक फायदा होण्याची अपेक्षा आहे.

अलिकडच्या अर्थसंकल्पात कर सवलत, ग्रामीण भागात चांगली भावना आणि प्रीमियम इलेक्ट्रिक दुचाकी वाहनांच्या लाँचची पाइपलाइन या विभागातील विक्रीला चालना देईल. रॉयल एनफील्ड आणि टीव्हीएस मोटरने आर्थिक वर्ष २६ च्या पहिल्या तिमाहीत आधीच चांगली वाढ दर्शविली आहे, तर हिरो मोटोकॉर्पला उत्सवी हंगाम आणि जीएसटी कपातीमुळे मागणीत सुधारणा अपेक्षित आहे.

कु. गजानन राजरवाड

भारत, चीन, रशिया हे ट्रम्प टॅरिफला टक्कर देणार, अमेरिकेच्या तुलनेत किती मजबूत ठरणार त्रिकुट

चीनमधील तियानजिन शहरात आजपासून SCO (शांघाय सहकार्य संघटना) शिखर सम्मेलन सुरू झाले आहे. हे दोन दिवस चालणार आहे. चीन, भारत आणि रशियासहित 20 देशांचे नेते यात सहभागी झाले आहेत

अमेरिकेच्या टॅरिफला कसे तोंड देऊ शकतात?

चीनमध्ये SCO शिखर सम्मेलन अशा वेळी होत आहे, जेव्हा ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवर 50% टॅरिफ लावला आहे. बाजारातील जाणकारांच्या मते, ट्रम्प यांच्या टॅरिफच्या वादामुळे हे शिखर सम्मेलन गुंतवणूकदारांसाठी चांगली बातमी आहे. भारतासाठी हे सम्मेलन कसे फायदेशीर आहे तर, या सम्मेलनात भारत, चीन, रशिया आणि इतर देश एकत्र आले आहेत. अमेरिकेच्या टॅरिफच्या विरोधात ही एकजूट आहे. अमेरिकेचा हा निर्णय आशिया खंडात अन्यायकारक मानला जातो.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

या तीन देशांची GDP (सकल राष्ट्रीय उत्पादन) किती आहे?

टाइम्स ऑफ इंडियाच्या माहितीनुसार, भारत, चीन आणि रशिया मिळून GDP मध्ये 53.9 ट्रिलियन डॉलरचे योगदान देतात. हे जगाच्या एकूण उत्पादनाच्या जवळपास एक तृतीयांश आहे. त्यांची निर्यात 5 ट्रिलियन डॉलरपेक्षा जास्त आहे. त्यांच्याकडे 4.7 ट्रिलियन डॉलरचा परकीय चलन साठा आहे, जो जागतिक एकूण साठ्याच्या 38% आहे. त्यांची एकत्रित लोकसंख्या 3.1 अब्ज आहे, जी जगाच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास 38% आहे.या तीन देशांचा एकत्रित लष्करी खर्च 549 अब्ज डॉलरपर्यंत पोहोचला आहे, जो जगाच्या संरक्षण बजेटच्या पाचव्या हिश्श्याएवढा आहे. ते जागतिक ऊर्जेचा 35% वापर करतात. प्रत्येक देशाची स्वतःची वेगळी ताकद आहे. चीनची ताकद उत्पादन क्षेत्रात आहे, रशियाची ऊर्जा क्षेत्रात आणि भारताची सेवा क्षेत्रात.

एकत्र आल्यास फायदा काय?

जर हे तीन देश एकत्र आले, तर पश्चिम जगाचे वर्चस्व असलेल्या एकध्रुवीय जगाऐवजी बहुध्रुवीय व्यवस्था निर्माण होईल. या व्यवस्थेत युरेशियाई व्यापार मार्ग आणि स्थानिक चलनांमुळे अमेरिकन डॉलरच्या वर्चस्वाला आव्हान मिळेल.

भारतासाठी अमेरिका किती महत्त्वाचा?

पण अमेरिका अजूनही खूप महत्त्वाचा आहे. आर्थिकदृष्ट्या, अमेरिका भारताचा सर्वात मोठा निर्यात बाजार आहे. बँक ऑफ बडोदाच्या माहितीनुसार, अमेरिकन ग्राहकांनी 2024 मध्ये 77.5 अब्ज डॉलरच्या भारतीय वस्तू खरेदी केल्या. संयुक्त राज्य व्यापार प्रतिनिधी (USTR) च्या आकडेवारीनुसार, 2024 मध्ये वस्तू आणि सेवांमधील एकूण अमेरिकन-भारतीय व्यापार 212.3 अब्ज डॉलरपर्यंत पोहोचला, जो 2023 पेक्षा 8.3 टक्क्यांनी (16.3बिलियन डॉलर) जास्त आहे.

भारत, रशिया आणि चीन यांचे एकत्र येणे फायद्याचे आणि तोट्याचे दोन्ही आहे. हे अमेरिकेच्या दबावाविरुद्ध एक व्यासपीठ देते, पण यात धोकेही आहेत. चीनसोबत विश्वासाची कमी आणि पाकिस्तानशी संबंधित सुरक्षा चिंता यामुळे हे अवघड आहे. अमेरिकेवर भारताची असलेली निर्भरता हे देखील एक मोठे कारण आहे.

कु. गजानन राजरवाड

ट्रम्प टॅरिफमुळे तामिळनाडूला 34000 कोटींचे नुकसान, नोकऱ्यांवर मोठे संकट

या करवाढीमुळे तामिळनाडूला अंदाजे ३.९३ अब्ज डॉलर्स (३४६०० कोटी रुपयांपेक्षा जास्त) नुकसान सहन करावे लागू शकते. हा आकडा राज्याचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांनी स्वतः दिला आहे आणि ट्रम्प यांच्या दुहेरी करवाढीला तामिळनाडूच्या अर्थव्यवस्थेला मोठा धक्का म्हटले आहे.

अमेरिकेतील टॅरिफमुळे तामिळनाडूतील निर्यातदारांमध्ये चिंता निर्माण झाली आहे, ज्यांच्यासाठी अमेरिका दीर्घकाळापासून एक प्रमुख निर्यात बाजारपेठ आहे. गेल्या आर्थिक वर्षात, राज्याच्या एकूण निर्यातीपैकी ३१ टक्के निर्यात अमेरिकेला झाली होती, जी राष्ट्रीय सरासरी २० टक्क्यांपेक्षा खूपच जास्त आहे. ट्रम्प यांनी भारतावर लादलेल्या टॅरिफमध्ये दुप्पट वाढ केल्याने आधीच ऑर्डर रद्द झाल्या आहेत आणि तामिळनाडूची निर्यात स्पर्धात्मक झाली नाही,

विशेषतः कापड, यंत्रसामग्री, रत्ने आणि दागिने तसेच ऑटो पार्ट्स या क्षेत्रात.

जवळजवळ सर्व क्षेत्रांमधून १३% ते ३६% नोकऱ्या जाऊ शकतात.

कापड क्षेत्राला १.६२ अब्ज डॉलर्स (१४, २७९ कोटी रुपयांपेक्षा जास्त) नुकसान होऊ शकते

कापड निर्यातीत तामिळनाडू अव्वल

भारताच्या एकूण कापड निर्यातीत तामिळनाडूचा वाटा २८ टक्के आहे, जो सर्व राज्यांमध्ये सर्वाधिक आहे आणि हे क्षेत्र राज्यातील लाखो कुटुंबांना आधार देणारा एक महत्त्वाचा आर्थिक आधार देखील आहे. जर आपण आकडेवारी पाहिली तर, तिरुप्पुर जिल्ह्यात, जिथे कापड उद्योगात ६५ टक्के महिला कार्यरत आहेत, या उद्योगाने गेल्या वर्षी ४०,००० कोटी रुपयांचे परकीय चलन कमावले. हे क्षेत्र रंगाई, लॉजिस्टिक्स, पॅकेजिंग आणि यंत्रसामग्री उद्योगांच्या व्यापक परिसंस्थेला देखील समर्थन देते तसेच

टॅरिफमुळे भारतीय शेअर बाजारावरही परिणाम दिसून आला आणि घाबरलेल्या बाजारात मोठी घसरण झाली. यामुळे सेन्सेक्सच्या टॉप-१० मौल्यवान कंपन्यांपैकी आठ कंपन्यांना मोठे नुकसान सहन करावे लागले आणि त्यांचे एकत्रित बाजार मूल्य अवघ्या पाच दिवसांत २ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त घसरले.

अमेरिकेच्या करवाढीच्या परिणामामुळे गेल्या आठवड्यात मुंबई शेअर बाजाराचा ३० शेअर्सचा सेन्सेक्स निर्देशांक १,४९७.२ अंकांनी किंवा १.८४% ने घसरला. बाजारातील उलथापालथीत, रिलायन्स इंडस्ट्रीज, एचडीएफसी बँक, भारती एअरटेल, आयसीआयसीआय बँक, एसबीआय, इन्फोसिस, बजाज फायनान्स आणि एलआयसी यासह सेन्सेक्सच्या टॉप १० कंपन्यांना मोठे नुकसान सहन करावे लागले; त्यांचे एकत्रित बाजार भांडवल २,२४,६३० कोटी रुपयांनी कमी झाले. या आठ कंपन्यांव्यतिरिक्त, टीसीएस आणि एचयूएलने घसरत्या बाजारातही त्यांच्या गुंतवणूकदारांना मोठा नफा मिळवून दिला.

रिलायन्स-एचडीएफसी तोट्यात अव्वल

मुकेश अंबानी यांच्या रिलायन्स इंडस्ट्रीजने टॅरिफ-हिट मार्केटमध्ये सर्वात जास्त तोटा सहन करणाऱ्या कंपन्यांच्या यादीत अव्वल स्थान पटकावले आणि त्यांचे बाजारमूल्य १८,३६,४२४ कोटी रुपयांपर्यंत घसरले. यानुसार, रिलायन्सच्या शेअर्समध्ये गुंतवणूक करणाऱ्यांना फक्त पाच दिवसांत ७०,७०७ कोटी रुपयांचे नुकसान झाले. या प्रकरणात एचडीएफसी बँक दुसऱ्या क्रमांकावर होती, ज्यांच्या गुंतवणूकदारांना ४७,४८२ कोटी रुपये नुकसान झाले आणि त्यांचे बाजारमूल्य १४,६०,८६४ कोटी रुपयांपर्यंत घसरले.

या कंपन्यांचे गुंतवणूकदार अडचणीत

रिलायन्स-एचडीएफसी बँकेसोबतच आयसीआयसीआय बँकेला २७, १३५ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला आणि तिचे मार्केट कॅप ९,९८,२९१ कोटी रुपयांवर पोहोचले, भारती एअरटेलचे मार्केट कॅप २४,९४७ कोटी रुपयांनी घसरून १०,७७,२१३ कोटी रुपयांवर पोहोचले, तर एलआयसीचे मार्केट कॅप २३,६५५ कोटी रुपयांनी घसरून ५,३९,०४८ कोटी रुपयांवर आले.

स्टेट बँक ऑफ इंडियाचे बाजारमूल्यही १२,६९२ कोटी रुपयांनी घसरून ७,४०,६१९ कोटी रुपयांवर आले. याशिवाय, बजाज फायनान्सचे बाजारमूल्य १०,४७१ कोटी रुपयांनी घसरून ५,४५,४९० कोटी रुपयांवर आले आणि

ISBN NO. 978-81-990957-8-6

टेक दिग्गज इन्फोसिसचे मूल्य ७,५४० कोटी रुपयांनी घसरून ६,१०,४६४ कोटी रुपयांवर आले.

सेन्सेक्सच्या टॉप-१० कंपन्यांमध्ये, फक्त टाटा ग्रुपच्या टीसीएस आणि हिंदुस्तान युनिलिव्हर या दोन कंपन्या होत्या ज्यांनी घसरत्या बाजारातही गुंतवणूकदारांसाठी पैसे कमवले. एकीकडे, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसचे बाजार भांडवल ११,१२६ कोटी रुपयांनी वाढून ११,१५,९६३ कोटी रुपयांवर पोहोचले, तर दुसरीकडे, एचयूएलचे बाजार भांडवल ७,३१९ कोटी रुपयांनी वाढून ६,२४,९९१ कोटी रुपयांवर पोहोचले.

कु. गजानन राजरवाड

भारत जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था होणार; RBI गव्हर्नर मल्होत्रांचा मोठा दावा

भारत लवकरच जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल, असा दावा भारतीय रिझर्व्ह बँकेचे (RBI) गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी शनिवारी केला. देशाच्या विकासाचे श्रेय त्यांनी पंतप्रधान जन धन योजनेला दिले.

अमेरिकेने देशावर लादलेल्या टॅरिफच्या परिस्थितीतही देशाचा जीडीपी चालू आर्थिक वर्षाच्या एप्रिल-जून तिमाहीत ७.८ टक्क्यांनी वाढला आहे. अपेक्षा होती 6.7 टक्के पण अपेक्षेपेक्षा 1.1 टक्के जास्त आहे. या पार्श्वभूमीवर मल्होत्रा बोलत होते.

कु. गजानन राजरवाड

1/9/25

अमेरिकेला टॅरिफ पडणार महागात

भारताने आता अमेरिकेच्या टॅरिफचा मारा कमी करण्यासाठी वेगवेगळी पावले उचलणे सुरु केले असून भारतीय रिझर्व्ह बँकेने परकीय चलन साठा वाढवण्यासाठी एक नवीन पद्धत अवलंबली आहे.

म्हणजे आता रिझर्व्ह बँक अमेरिकेच्या ट्रेझरी बिलांऐवजी सोन्यात जास्त गुंतवणूक करत आहे. भारत सरकार आपली बचत फक्त डॉलरमध्ये ठेवण्याऐवजी वेगवेगळ्या गोष्टींमध्ये विभागत असून हा बदल जगभरात घडत आहे, कारण अनेक देश आता डॉलरवर पूर्णपणे अवलंबून राहायचे नाही.

भारतीय रिझर्व्ह बँकेचा अमेरिकेला दणका अमेरिकन ट्रेझरी डिपार्टमेंट आणि रिझर्व्ह बँकेच्या अलीकडच्या आकडेवारीनुसार गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी जूनमध्ये भारताने अमेरिकन ट्रेझरी बिलांमध्ये गुंतवणूक कमी केली पण, सोन्याचा साठा वाढवल्याचे आढळले आहे. मात्र तरीही, अमेरिकेच्या ट्रेझरी बिलांमध्ये गुंतवणूक करणाऱ्या टॉप-20 देशांपैकी सौदी अरेबिया आणि जर्मनीपेक्षा भारत आघाडीवर आहे. ET च्या अहवालानुसार जून 2025 मध्ये भारताचे $227 अब्जचे अमेरिकन ट्रेझरी बिल होते, जे गेल्या वर्षी जूनमध्ये $242 अब्ज होते.

डॉलरचं महत्त्व का कमी होतंय जगभरातील देश आपल्या परकीय चलन साठ्याचे वेगवेगळ्या गोष्टींमध्ये विभाजन असल्यामुळे डॉलरचे महत्त्व कमी होत आहे. यामागे भू-राजकीय तणाव आणि Trade War कारणीभूत ठरले आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये रिझर्व्ह बँकेने सोन्याच्या साठ्यात लक्षणीय वाढ केली आहे तर, परकीय चलन मालमत्तेतही विविधता पाहायला मिळाली आहे. भारत, चीन आणि ब्राझीलसह अनेक देश त्यात बदल करत आहेत.

कु. कार्तिका पगडाला

 ISBN NO. 978-81-990957-8-6

2/9/25

भारताकडे किती सोन्याचा साठा

रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार, या काळात भारताने सुमारे 39.22 मेट्रिक टन सोने खरेदी केले असून 27 जूनपर्यंत परकीय चलन साठ्यात सोन्याचा वाटा 879.98 मेट्रिक टन होता, जो गेल्या वर्षी 28 जून रोजी 840.76 मेट्रिक टन होता. डोनाल्ड ट्रम्प अध्यक्ष होण्यापूर्वी डिसेंबरमध्ये भारताचा अमेरिकन ट्रेझरी बिलांचा साठा सर्वात कमी होता तर, जपान आणि ब्रिटननंतर अमेरिकेच्या ट्रेझरी बिलांचा तिसरा सर्वात मोठा धारक असलेल्या चीननेही आपले होल्डिंग कमी केले आहे.

चीन आणि भारत यांचे चलन

चीन आणि भारत या दोन्ही देशांच्या प्रमुखांमध्ये झालेल्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर आपण चीनचे चलन 'युआन' आणि भारतीय रुपया यांच्यातील नवीन विनिमय दराबद्दल तपशीलवार चर्चा करू.

चीनचे अधिकृत चलन Renminbi असे म्हणतात, ज्याला सामान्यतः चिनी युआन म्हणून ओळखले जाते. ज्याप्रमाणे भारतीय रुपयासाठी INR आणि ₹ वापरले जातात, त्याचप्रमाणे चीनमध्ये युआनची ओळख CNY आणि ¥ द्वारे केली जाते.

जगातील पाचवे सर्वात मोठे व्यापारी चलन पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना द्वारे चिनी युआन नियंत्रित केले जाते. म्हणजे युआन जारी करायचे आणि त्याच्याशी संबंधित नियम निश्चित करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे, विशेष म्हणजे युआन जगातील पाचवे सर्वात मोठे व्यापारी चलन मानले जाते.

चीनमध्ये 500 भारतीय रुपयाचे मूल्य किती?

भारत आणि चिनी चलनात खूप मोठा फरक आहे. सध्याच्या विनिमय दरानुसार, 500 रुपये चीनमध्ये सुमारे 41.77 चिनी युआन इतके आहेत. म्हणून फक्त डॉलर समोरच नव्हे तर चिनी युआनपुढेही रुपयाची काहीच औकात नाही. मात्र, या फरकामागील कारणे समजून घेणे महत्त्वाचे आहे. 500 भारतीय रुपयांमध्ये तुम्ही चीनमध्ये पाणी, पॅक केलेले सँडविच इत्यादींपेक्षा जास्त काहीही खरेदी करू शकत नाही.

चलन मजबूत की कमकुवत कसं ठरतं?

एखाद्या देशाच्या चलनाची ताकद किंवा कमजोरी अनेक घटकांवर अवलंबून असते, जसे की विनिमय दर - कोणत्याही चलनाचा विनिमय दर जितका जास्त असेल तितकं चलन कमकुवत मानले जाते. चीनचा विनिमय दर भारतापेक्षा खूपच चांगला आहे, म्हणून चीनचे युआन अधिक मजबूत आहे.

4/9/25

रशियाकडून तेल खरेदी करणार, ट्रम्प टॅरिफदरम्यान निर्मला सीतारमण यांचे मोठे विधान

डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लादलेल्या शुल्कादरम्यान, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी रशियाकडून तेल खरेदी करण्याबाबत मोठे विधान केले आहे. त्यांनी सांगितले की, भारत चीनकडून कच्चे तेल खरेदी करत राहील.

अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या, "आम्ही आमच्या गरजा, किंमती आणि रसद पाहून निर्णय घेतो. परकीय चलन आणि ऊर्जा सुरक्षा आमच्यासाठी महत्त्वाची आहे. भारताच्या एकूण आयात खर्चात कच्च्या तेलाचा वाटा सर्वाधिक आहे." त्या म्हणाल्या की, भारताच्या परकीय चलन खर्चात कच्चे तेल आणि शुद्ध इंधनाचा मोठा वाटा आहे. भारताला स्वस्त आणि स्थिर तेल मिळेल तिथून खरेदी करेल असे त्या म्हणाल्या.

कु. पायलकौर जाधव

कु. साक्षी ठाकूर

 ISBN NO. 978-81-990957-8-6

CIBIL स्कोअरशिवाय मिळणार लोन

कर्ज देण्यासाठी CIBIL स्कोअर हा एक प्रमुख पॅरामीटर आहे. कोणत्याही व्यक्तीचा CIBIL स्कोअर 300 ते 900 पर्यंत असतो. सिव्हिल स्कोअर ९०० च्या जवळ येतो, तितकेच लोकांना कर्ज घेण्यास आणि कर्जाची रक्कम वाढविण्यास मदत मिळते. अशा प्रकारे हे देखील समजले जाऊ शकते की जर एखाद्याचा स्कोअर ३०० च्या जवळ किंवा ६०० च्या खाली असेल तर कोणतीही बँक कर्ज देण्यात निष्काळजीपणा करू शकते.

आरबीआयने त्यांच्या नियमांमध्ये कुठेही सिव्हिल स्कोअरसाठी किमान क्रमांकाचा उल्लेख केलेला नाही. त्यांच्या विधानाचा अर्थ असा आहे की कर्ज मिळविण्यासाठी असा सिव्हिल स्कोअर असणे अनिवार्य आहे, असे आरबीआय कुठेही म्हणत नाही.

कु. पायलकौर जाधव
कु. साक्षी ठाकूर

5/9/25

नमो शेतकरीचे 2000 रुपये लवकरच खात्यात येणार, राज्य सरकारकडून 1932 कोटी रुपये मंजूर

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना तीन समान हप्त्यांमध्ये प्रत्येकी 2000 रुपयांप्रमाणं रक्कम दिली जाते. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या सहा हप्त्यांची रक्कम शेतकऱ्यांना देण्यात आली आहे. राज्य सरकारनं सातव्या हप्त्याची रक्कम देण्यासाठी करण्यासाठी 1932.72 कोटी रुपये निधी वितरीत करण्यास मंजुरी दिली आहे.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना नमो शेतकरी महासन्मान निधीच्या 7 व्या हप्त्याची रक्कम वितरीत करण्यासाठी शासन निर्णयाद्वारे 1932.72 कोटी रुपयांचा निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. एप्रिल 2025 ते जुलै 2025 या कालावधीसाठी पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना नमो शेतकरी महासन्मान निधीची रक्कम दिली जाणार आहे.

कु. पायलकौर जाधव
कु. राणी बुलबुले

युपीएल सस्टेनेबल टेक्नॉलॉजी विद्यापीठ आणि ऑक्सफर्ड विद्यापीठात सामंजस्य करार

युपीएल ग्रुपच्या पुढाकारातून स्थापन झालेल्या युपीएल सस्टेनेबल टेक्नॉलॉजी विद्यापीठाने ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या सोमरव्हिले येथील ऑक्सफर्ड इंडिया सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट (ओआयसीएसडी) सोबत शाश्वत अन्न प्रणाली आणि हवामान बदल या क्षेत्रातील ज्ञानविनिमयाला चालना देण्यासाठी सामंजस्य करार (एमओयू) केला आहे.

या भागीदारीमुळे विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना प्रशिक्षण, अभ्यासक्रम विकास आणि जागतिक दर्जाच्या संशोधनाशी थेट जोडले जाण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

या करारानुसार, युपीएल विद्यापीठातील प्राध्यापक दरवर्षी ऑक्सफर्डमध्ये विशेष प्रशिक्षण घेतील, तर ओआयसीएसडीचे तज्ज्ञ युपीएलच्या शैक्षणिक कार्यक्रमात सहभागी होऊन विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, शाश्वत विकास, हवामान कृती आणि तांत्रिक नवोन्मेष यांसारख्या विषयांवरील व्याख्यान मालिका घेतील. आगामी शैक्षणिक वर्षात दोन प्रत्यक्ष आणि दोन ऑनलाइन व्याख्याने आयोजित करण्यात येणार आहेत.

कु. पायलकौर जाधव
कु. राणी बुलबुले

6/9/25

आठवड्याच्या शेवटच्या दिवशी सोन्याचे दर वाढले; १० तोळ्यामागे ८,७०० रुपयांनी वाढ, वाचा आजचे भाव

सोनं खरेदी करावं की नाही असा प्रश्न ग्राहकांना पडत आहे. आजदेखील सोन्याचे दर

ISBN NO. 978-81-990957-8-6

वाढले आहे. प्रति तोळ्यामागे सोन्याचे दर ८७० रुपयांनी वाढले आहेत.

Gold Price Today: सोन्याने भाव खाल्ला! १० तोळा सोन्याच्या दरात ७६०० रुपयांची वाढ, आजचे २२ आणि २४ कॅरेटचे दर किती?

गणेशोत्सवाच्या १० दिवसात सोन्याने उच्चांकी गाठली आहे. सोन्याचे दर जवळपास १ लाख ८ हजार रुपये झाले आहे.सणासुदीच्या दिवसात सोन्याचे दर वाढत असल्याने ग्राहकांना मात्र मोठा फटका बसला आहे. तसेच सोने खरेदी करण्याकडे ग्राहकांनी पाठ फिरवली आहे.

गेल्या १० दिवस सोन्याचे दर सतत वाढत आहे. आज २४ कॅरेट सोन्याचे दर ८७० रुपयांनी वाढले आहेत. हे दर १,०८,४९० रुपये झाले आहेत. ८ ग्रॅम सोन्याच्या दरात ६९६ रुपयांनी वाढ झाली आहे. हे दर ८६,७९२ रुपये आहेत. तर १० तोळा सोन्याच्या दरात ८,७०० रुपयांची वाढ झाली आहे. हे दर १०,८४,९०० रुपये झाले आहेत.

२२ कॅरेट सोन्याचे दर

२२ कॅरेट सोन्याचे दर ८०० रुपयांनी वाढले आहेत. हे दर ९९,४५० रुपये झाले आहेत. ८ ग्रॅम सोन्याचे दर ६४० रुपयांनी वाढवून ७९,५६० रुपये झाले आहेत. १० तोळ्यामागे सोन्याचे दर ८००० रुपयांनी वाढ झाली आहे. हे दर ९,९४,५०० रुपये आहेत.

१८ कॅरेट सोन्याचे दर

आज १ तोळा सोन्याचे दर ८१,३७० रुपये झाले आहेत. या दरात ६५० रुपयांनी वाढ झाली आहे. १० तोळ्यामागे ६५०० रुपयांची वाढ झाली असून हे दर ८,१३,७०० रुपये झाले आहेत. ८ ग्रॅम सोन्याचे दर ५२० रुपयांनी वाढले आहेत. हे दर ६५,०९६ रुपये आहेत.

कु. पायलकौर जाधव
कु. राणी बुलबुले

7/9/25

एचएसबीसीच्या मते, या बदलामुळे आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीपासून वाढीला गती मिळण्याची अपेक्षा आहे. एचएसबीसी एशिया पॅसिफिकचे हॅराल्ड व्हॅन डेर लिंडे यांनी लिहिले की, "२०२६ मध्ये ईपीएस वाढ १४% राहण्याची अपेक्षा आहे. ही धोरणे वाढीला पाठिंबा देतील आणि परदेशी गुंतवणूकदारांच्या परतीचा मार्ग मोकळा करतील."

परदेशी गुंतवणूकदार नकारात्मक का आहेत?

विश्लेषकांच्या मते, गेल्या एका वर्षापासून भारतीय शेअर बाजाराच्या कमकुवत कामगिरीचे सर्वात मोठे कारण म्हणजे देशांतर्गत अर्थव्यवस्थेचा मंदावलेला वेग. सलग पाच तिमाहीत कंपन्यांच्या उत्पन्नात केवळ एक अंकी वाढ झाली आहे. २०२५ मध्ये आतापर्यंत परदेशी गुंतवणूकदारांनी १.४२ लाख कोटी रुपयांची विक्री केली आहे. केवळ सप्टेंबरच्या पहिल्या ४ दिवसांत १२,२५७ कोटी रुपयांची विक्री झाली. तथापि, नवीन जीएसटी दर लागू झाल्यानंतर आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या तिसऱ्या तिमाहीत (क्यू३-एफवाय२६) वाढीचा वेग वाढू शकतो असे एचएसबीसीचे मत आहे.

इकॉनॉमिक्स रिसर्चचे जी. चोकलिंगम म्हणतात, "जीएसटी कपात, २०२५ च्या अर्थसंकल्पात कर कपात, चांगला पाऊस आणि महागाईवर नियंत्रण यामुळे भारत पुन्हा एकदा परदेशी भांडवलासाठी आकर्षक बाजारपेठ बनू शकतो. तथापि, अमेरिकेचा व्याजदर कपात (फेड रेट कट) मोठी भूमिका बजावेल."

आव्हाने काय आहेत?

सलग पाच तिमाहींमध्ये कॉर्पोरेट उत्पन्न एक अंकी वाढीवर अडकले आहे.

भारताचे मूल्यांकन जास्त आहे – निफ्टी पीई २१ पट आहे, तर चीनसारखे बाजार स्वस्त आहेत.

जीएसटी कपातीचा वापरावर होणारा परिणाम

मार्सेलस इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्सचे प्रमोद गुब्बी यांचे मत आहे की, "जीएसटी कपातीचा वापरावर होणारा परिणाम अद्याप स्पष्टपणे दिसून येत नाही. परंतु पुढील २-३ तिमाहीत, बेस इफेक्ट आणि

 ISBN NO. 978-81-990957-8-6

मागणी पुनर्प्राप्तीमुळे उत्पन्नात सुधारणा होऊ शकते. हो, खाजगी क्षेत्राच्या अनिश्चितता कमी झाल्यावरच दीर्घकालीन वाढ होईल."

कु. निकिता तोमर
कु. अंकिता तोमर

10/9/25

जीएसटी दर कपातीमुळे महागाई कमी होणार, अर्थव्यवस्थेला मिळेल नवी गती - निर्मला सीतारमण

स्लॅबमध्ये करण्यात आलेल्या कपातीमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेला नवी गती मिळेल आणि महागाई देखील कमी होईल असा दावा केंद्रीय अर्थमंत्री निर्माला सीतारमण यांनी केला आहे.

किराणा, कपडे, साबण आणि तेल यांसारख्या रोजच्या वापरातील वस्तूंवरील कर कमी होईल, तेव्हा महागाई देखील कमी होईल. यामुळे लोकांच्या खिशावरील भार कमी होईल आणि त्यांची बचत वाढेल."

कपातीमुळे "लोक जास्त खरेदी करतील, तेव्हा उत्पादन वाढेल आणि रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील. म्हणूनच आम्ही सांगत आहोत की ही सुधारणा महागाई कमी करेल आणि अर्थव्यवस्थेला गती देईल."

"आता फक्त दोन मुख्य स्लॅब (5% आणि 18%) राहतील. यामुळे करप्रणाली अधिक पारदर्शक होईल. व्यावसायिकांसाठी अनुपालन सोपे होईल आणि ग्राहक व उत्पादन क्षेत्रालाही फायदा होईल."

11/9/25

अनुपम मित्तल यांची यशोगाथा!

यांची यशोगाथा ही चिकाटी, दूरदृष्टी आणि नव्या संधींची कथा आहे. भारतातील संघर्षमय सुरुवातीपासून ते अमेरिकेत मल्टिमिलियनर होण्यापर्यंत, डॉट-कॉम संकटामुळे सर्व गमावून बसल्यानंतर 2003 मध्ये त्यांनी उभारलेले Shaadi.com हे यशस्वी प्लॅटफॉर्म त्यांना जागतिक ओळख मिळवून देत गेले.

अनुपम मित्तल यांचा जन्म मुंबईत मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. मेहनत आणि शिक्षणाच्या मूल्यांवर त्यांनी बालपणापासून भर दिला. उच्च शिक्षणासाठी ते अमेरिकेला गेले आणि बोस्टन विद्यापीठातून MBA पदवी संपादन केली. करिअरच्या सुरुवातीला अमेरिकेतील एका तंत्रज्ञान कंपनीत काम करताना ते वीसाव्या वर्षातच मल्टिमिलियनर झाले.

2000 च्या सुरुवातीस आलेल्या डॉट-कॉम संकटामुळे मित्तल यांनी कमावलेले सर्व गमावले. ही आर्थिक पडझड त्यांच्यासाठी मोठा धक्का होता. पण त्यांनी नंतर त्याला "आशीर्वादाचे रूप" असे संबोधले. 2003 मध्ये मर्यादित निधीसह ते भारतात परतले आणि नव्या सुरुवातीचा निर्धार केला.

अनुपम मित्तल यांनी ऑनलाइन मॅचमेकिंगची गरज ओळखली आणि 1997 मध्ये Shaadi.com या वेबसाइटची स्थापना केली. सुरुवातीला भारतात इंटरनेटचा प्रसार कमी असल्यामुळे या व्यवसायाला अडचणी आल्या. पण कालांतराने आणि विशेषतः पँडेमिकनंतर या प्लॅटफॉर्मला प्रचंड लोकप्रियता मिळाली. आज Shaadi.com ही जगातील सर्वात मोठ्या मॅट्रिमोनियल वेबसाइट्सपैकी एक असून लाखो कुटुंबांना जोडण्यात आणि हजारो विवाह यशस्वी करण्यात तिचा मोठा वाटा आहे.

कु. निकिता तोमर
कु. अंकिता तोमर

गौतम अदानी यांचा भूतानसोबत मोठा करार, 6000 कोटींची गुंतवणूक करणार

गौतम अदानी यांनी भूतानसोबत मोठा करार केला आहे. गौतम अदानी यांची कंपनी अदानी पॉवर आणि भूतानची सरकारी कंपनी ड्रुक ग्रीन पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी एकत्र येत मोठे पाऊल उचलले आहे.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

दोन्ही कंपन्यांनी भूतानमधील 570 मेगावॅट क्षमतेच्या वांगचू जलविद्युत प्रकल्पासाठी शेअरहोल्डर करारावर स्वाक्षरी केली आहे. यासाठी गौतम अदानी 6000 कोटी रुपये खर्च करणार आहेत.

वांगचू जलविद्युत प्रकल्पाबाबत भूतानच्या सरकारसोबत सवलतीसाठीही एक करार करण्यात आला आहे. हे दोन्ही करार भूतानचे पंतप्रधान दाशो त्शेरिंग तोबगे आणि अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांच्या उपस्थितीत झाले. या दोन्ही करारामुळे अदानी पॉवर आणि डीजीपीसी या कंपन्या बीओओटी मॉडेलवर वांगचू जलविद्युत प्रकल्पाचे काम लवकरात लवकर सुरु करणार आहेत. याचा फायदा भूतानला होणार आहे.

भूतान 2040 पर्यंत 15000 मेगावॅट जलविद्युत आणि 5000 मेगावॅट सौरऊर्जेची अतिरिक्त क्षमता विकसित करू इच्छित आहे.

कु. राणी बुलबुले
कु. शैलेजा कोपलवाड

12/9/25

सेन्सेक्स=81,565

निफ्टी =25,014

सोने =10,200/11,128

चांदी =132

पेट्रोल =103

डिझेल =90

सरकारच्या तिजोरीत सोने आणि परकीय चलनाचा पाऊस

भारतातील अर्थव्यवस्थेसाठी (Indian Economy) दिलासादायक बातमी समोर आली आहे. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ (Tariff) धोरणामुळे निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताचा परकीय मुद्रा भंडार (Forex Reserve of India) आणि सोने साठा (Gold Reserve) दोन्ही मोठ्या प्रमाणात वाढले आहेत.

भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) ने दिलेल्या माहितीनुसार, 29 ऑगस्ट 2025 ला संपलेल्या आठवड्यात भारताचा परकीय मुद्रा भंडार तब्बल 3.51 अब्ज डॉलर्सने वाढून 694.23 अब्ज डॉलर्सवर पोहोचला आहे. त्याआधीच्या आठवड्यात तो 690.72 अब्ज डॉलर्सवर घसरला होता.

आरबीआयच्या आकडेवारीनुसार, फॉरेन करंसी ॲसेट्स (FCA) म्हणजेच परकीय चलन आस्त्यांमध्येही वाढ झाली आहे. हा साठा 1.686 अब्ज डॉलर्सने वाढून 583.937 अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचला. डॉलर व्यतिरिक्त युरो (Euro), पौंड (Pound) आणि येन (Yen) यांच्या चढउताराचाही त्यावर परिणाम झाला आहे.

कु. राणी बुलबुले
कु. शैलेजा कोपलवाड

देशाचा गोल्ड रिजर्व (Gold Reserve) वाढला

नुकत्याच समोर आलेल्या आकडेवारीनुसार, भारताचा सोने साठाही वाढला आहे. तो 1.766 अब्ज डॉलर्सने वाढून 86.769 अब्ज डॉलर्सवर पोहोचला. तसेच स्पेशल ड्रॉइंग राइट्स (Special Drawing Rights) 40 दशलक्ष डॉलर्सने वाढून 18.775 अब्ज डॉलर्स झाले. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) मधील भारताची रिझर्व्ह पोझिशनदेखील वाढून 4.749 अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे.

आरबीआयचा सोने खरेदीकडे कल

गेल्या काही महिन्यांपासून आरबीआय अमेरिकन ट्रेझरी बिल्सऐवजी सोन्याकडे (Gold Investment) जास्त भर देत आहे. 27 जून 2024 ला भारताकडे 840.76 मेट्रिक टन सोने होते, तर 27 जून 2025 पर्यंत ते 879.98 मेट्रिक टनांवर पोहोचले.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

पीककर्ज वाटपात बँकांचा हात आखडता

लातूर जिल्ह्यात डेव्हलपमेंट क्रेडिट बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, इंडियन ओव्हरसिंज बँक, इंदुसिंद व कोटक महिंद्रा बँकेने अद्याप खाते उघडले नाही. युनियन बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक व आयडीबीआय बँकेने केवळ एक टक्का तर बँक ऑफ इंडियाने दोन, ॲक्सिस बँकेने पाच, कॅनरा बँकेने नऊ तर युको बँकेने केवळ ११ टक्के पीककर्ज वाटप केले आहे. बँक ऑफ महाराष्ट्रने १५९ कोटी १९ लाखांचे उद्दिष्ट घेऊन २२ टक्के, इंडियन बँकेने २२ कोटी ५० लाखांपैकी २७ टक्के, एचडीएफसीने २५ तर आयडीबीआय बँकेने २१ टक्के कर्जाचे वाटप केले आहे.

बँक ऑफ बडोदाने २४ कोटी २७ लाखांचे वाटप करून ३१ टक्क्यांचे उद्दिष्ट साध्य केले आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेने ८१३ कोटी तर महाराष्ट्र ग्रामीण बँकेने २३१ कोटींचे वाटप करून ८७ टक्के उद्दिष्ट साध्य केले आहे. धाराशिव जिल्ह्यात बंधन आणि डीसीबी बँकेने अजून एक रुपयाही वाटप केले नाही. यात बंधन बँकेला एक कोटी ६३ लाख तर ॲक्सिस बँकेला ११ कोटी ४५ लाख वाटपाचे उद्दिष्ट आहे. धडा घेऊन इंदुसिंद बँकेने एक कोटी ६१ लाखांचे वाटप करून १४३ टक्के वाटपाचे उद्दिष्ट साध्य केले आहे.

कु. राणी बुलबुले
कु. शैलेजा कोपलवाड

नांदेडला पीककर्ज वाटपात राष्ट्रीय बँका अद्याप उदासीन

बँक ऑफ बडोदा, कॅनरा बँक, इंडियन बँक, युको बँक, आयसीआयसीआय बँक व रत्नाकर बँकांचे वाटप दहा ते वीस टक्क्यांच्या आतच आहे. पंजाब नॅशनल बँकेचे २५ टक्के तर बँक ऑफ महाराष्ट्र, युनियन बँक ऑफ इंडिया, आयडीबीआय बँक, आयडीएफसी बँकांचे वाटप ३५ टक्क्यापर्यंत झाले आहे. कोटक महिंद्रा बँकेने यंदा खाते उघडले असून आतापर्यंत उद्दिष्टाच्या ४४ टक्के वाटप केले आहे. बँक ऑफ इंडिया व सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे वाटप ६५ टक्क्यापर्यंत असून एचडीएफसी बँकेने ७६ टक्क्यापर्यंतचा पल्ला गाठला आहे.

लातूर जिल्ह्यातील पीककर्ज वाटप

- खरीप हंगामातील उद्दिष्ट - दोन हजार ४५८ कोटी १४ लाख रुपये
- आतापर्यंतचे वाटप - एक हजार ३६५ कोटी ४८ लाख (५६ टक्के)
- राष्ट्रीय बँकांचे वाटप - २८५ कोटी ५२ लाख (२९ टक्के)
- भारतीय स्टेट बँकेचे वाटप - २१३ कोटी ३० लाख (४६ टक्के)
- खासगी क्षेत्रातील बँकांचे वाटप - ३४ कोटी ६५ लाख (१४ टक्के)
- महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे वाटप - २३१ कोटी ६५ लाख (८७ टक्के)
- जिल्हा मध्यवर्ती बँकेचे वाटप - ८१३ कोटी ६६ लाख (८७ टक्के)
- कर्ज मिळालेले शेतकरी - एक लाख ४९ हजार ६३१

धाराशिव जिल्ह्यातील पीककर्ज वाटप

- खरीप हंगामातील उद्दिष्ट - एक हजार ६५८ कोटी ५७ लाख रुपये
- आतापर्यंतचे वाटप - ८७० कोटी ८६ लाख (५२.५१ टक्के)
- राष्ट्रीय बँकांचे वाटप - १५६ कोटी ३७ लाख (३५.६१ टक्के)
- भारतीय स्टेट बँकेचे वाटप - २१० कोटी ५६ लाख (४७.६७ टक्के)
- खासगी क्षेत्रातील बँकांचे वाटप - ४६ कोटी २३ लाख (३०.७० टक्के)
- महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे वाटप - २९२ कोटी ९८ लाख (९१.५६ टक्के)
- जिल्हा मध्यवर्ती बँकेचे वाटप - १६४ कोटी ७२ लाख (५३.६४ टक्के)
- कर्ज मिळालेले शेतकरी - ८४ हजार ९६२.

कु. पाणेरी खिल्लारे
कु. कृष्णा वर्तळे

 ISBN NO. 978-81-990957-8-6

13/9/25

आता २० हजारांपेक्षा जास्त रोख रकमेचा व्यवहार महागात पडणार, आयकर विभागाचा नवीन नियम तुम्ही वाचलात का?

जर तुम्ही अजूनही कर्ज देण्यासाठी किंवा घेण्यासाठी रोख रकमेचा वापर करत असाल, तर आता तुम्हाला थोडे सावध राहण्याची गरज आहे. आयकर विभागाने स्पष्ट केले आहे की, जर कोणी २० हजार रुपयांपेक्षा जास्त रोख रक्कम घेतली किंवा दिली तर तो कायदा मोडल्याचा गुन्हा ठरू शकतो.

जर पकडले गेले तर तुम्ही रोख रक्कम दिली किंवा घेतली त्या रकमेइतकाच दंड आकारला जाईल.

जर तुम्ही तुमच्या मित्राला, नातेवाईकाला किंवा ओळखीच्या व्यक्तीला २०,००० रुपयांपेक्षा जास्त रोख रक्कम उधार घेतली असेल किंवा दिली असेल तर ते कायद्याविरुद्ध आहे. आयकर नियमांनुसार, २०,००० रुपयांपेक्षा जास्त रक्कम रोखीने व्यवहार करता येत नाही, मग ती कर्ज असो किंवा इतर कोणत्याही कारणास्तव.

जर तुम्ही असे केले तर आयकर विभाग ते गांभीर्याने घेऊ शकेल. यासाठी, आयकर कायद्याचे कलम २६९एसएस लागू होते आणि या अंतर्गत, कलम २७१डी अंतर्गत रोखीने घेतलेल्या किंवा दिलेल्या रकमेइतका दंड तुमच्यावर आकारला जाऊ शकतो. म्हणजेच जर तुम्ही २५,००० रुपये रोखीने घेतले तर तुम्हाला २५,००० रुपये दंड भरावा लागू शकतो.

सर्वोच्च न्यायालयानेही याबाबत कडक निर्णय दिला आहे. एप्रिल २०२५ मध्ये न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की, जर कोणी दोन लाखांपेक्षा जास्त रोख व्यवहार केले तर आयकर विभाग त्याची चौकशी करेल. न्यायालयाने असेही म्हटले आहे की, ज्या व्यक्तीने रोख स्वरूपात पैसे दिले आहेत त्याला हे पैसे कुठून आले हे देखील सांगावे लागेल. सरकारचा असा विश्वास आहे की, मोठ्या प्रमाणात रोख व्यवहारांमुळे काळा पैसा आणि करचुकवेगिरीची प्रकरणे वाढतात. त्यामुळे आता हे थांबवणे आवश्यक आहे.

आता तुम्हाला प्रश्न पडेल की हे नियम सर्वांना लागू होतात का? उत्तर नाही आहे. जर व्यवहार बँक, सरकारी संस्था किंवा सरकारच्या कोणत्याही विभागासोबत होत असेल तर हे नियम लागू होत नाहीत. याशिवाय, जर दोघेही शेतीशी संबंधित असतील आणि दोघांचेही उत्पन्न कर कक्षेत येत नसेल तर हे नियम देखील लागू होत नाहीत.

जर तुम्ही एखाद्याला पैसे उधार घेत असाल किंवा कर्ज देत असाल आणि रक्कम २० हजार रुपयांपेक्षा जास्त असेल तर सर्वकाही बँकेतून करण्याचा प्रयत्न करा. आजच्या काळात ऑनलाइन व्यवहार करणे खूप सोपे झाले आहे. अशा परिस्थितीत, चुकूनही मोठ्या प्रमाणात रोखीने व्यवहार करणे टाळा. अन्यथा नंतर तुम्हाला आयकर विभागाकडून नोटीस मिळू शकते आणि रकमेइतका दंड देखील आकारला जाऊ शकतो.

शिवानी यादव
निकिता तोमर

आता हॉस्पिटलच्या खर्चासाठी काढावे लागणार नाही कर्ज, टपाल विभागाची 'ही' योजना आहे खास; ५ लाखांपर्यंत होणार उपचार

१. फक्त ₹399 वार्षिक प्रीमियम भरून पोस्ट ऑफिसकडून आरोग्य विमा योजना उपलब्ध.
२. ₹50,000 ते ₹2 लाखांपर्यंतचे आरोग्य कव्हर - आजार, अपघात, औषधे व रुग्णालय खर्चासाठी.
३. सोपी प्रक्रिया, कमी कागदपत्रे, आणि देशभरातील सर्व टपाल कार्यालयांमधून उपलब्ध.

"पोस्ट ऑफिस विमा योजना ३९९"

भारतीय टपाल विभागाने गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना परवडणाऱ्या आरोग्य सुविधा देण्यासाठी एक मोठा उपक्रम हाती घेतला

 ISBN NO. 978-81-990957-8-6

आहे. "पोस्ट ऑफिस विमा योजना ३९९" अंतर्गत, आता लोकांना फक्त ३९९ रुपयांच्या वार्षिक प्रीमियमवर मूलभूत वैद्यकीय विमा मिळू शकेल. ही योजना विशेषतः अशा कुटुंबांसाठी तयार करण्यात आली आहे ज्यांना अचानक आजार किंवा अपघात झाल्यास उपचारांचा खर्च उचलणे कठीण जाते.

योजनेचे फायदे

या विमा योजनेत सामील होणाऱ्या लोकांना आजार किंवा अपघात झाल्यास ₹५०,००० ते ₹२ लाखांपर्यंतचे आरोग्य कव्हर मिळेल. उपचार, औषधे आणि रुग्णालयाच्या खर्चासाठी हे कव्हर दिले जाईल. यासोबतच, अपघाती मृत्यू किंवा कायमचे अपंगत्व आल्यास कुटुंबाला आर्थिक मदत मिळेल. पॉलिसीधारकाव्यतिरिक्त, कुटुंबातील सदस्यांना देखील त्यात समाविष्ट केले जाऊ शकते.

या योजनेची सर्वात खास गोष्ट म्हणजे ती देशभरातील सर्व टपाल कार्यालयांमधून खरेदी करता येते. लहान दुकानदार, शेतकरी, मजूर, रिक्षाचालक आणि रोजंदारीवर काम करणारे देखील दरवर्षी ३९९ रुपये एवढी नाममात्र रक्कम देऊन या योजनेचा सहज लाभ घेऊ शकतात.

पोस्ट ऑफिस विमा योजना ३९९ द्वारे देशातील प्रत्येक गरीब कुटुंबापर्यंत पोहोचण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या योजनेमुळे गरीब आणि मध्यमवर्गीय लोकांनाही आरोग्य सुरक्षा मिळू शकेल. त्याची प्रक्रिया खूप सोपी आहे आणि दोन लाखांपर्यंतचे विमा संरक्षण केवळ ३९९ रुपयांमध्ये वार्षिक उपलब्ध होईल. लोक याबद्दल उत्साही आहेत आणि पोस्ट ऑफिसमध्ये माहिती मागणाऱ्यांची संख्या सतत वाढत आहे.

सोपी प्रक्रिया

पोस्ट ऑफिस विमा योजना ३९९ चे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याची सोपी प्रक्रिया. कोणालाही जास्त कागदपत्रांची आवश्यकता नाही. फक्त एक साधा फॉर्म आणि ओळखपत्र सादर करून ते घेता येते. यानंतर, आजार किंवा अपघात झाल्यास पॉलिसीधारकाला त्वरित मदत मिळेल.

देशातील अनेक राज्यांमध्ये, मोठ्या संख्येने लोक अजूनही कोणत्याही विमा संरक्षणाशिवाय जीवन जगत आहेत. सरकारी योजना आहेत, परंतु त्यांची माहिती आणि पोहोच मर्यादित आहे. पोस्ट ऑफिसचे जाळे प्रत्येक गावापर्यंत पसरलेले आहे. म्हणूनच तज्ञ या विमा योजनेला अनेक मागास राज्यांसाठी वरदान मानत आहेत.

FAQs

१. पोस्ट ऑफिस विमा योजना ३९९ म्हणजे काय?

ही योजना फक्त ३९९ रुपयांच्या वार्षिक प्रीमियममध्ये गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना आरोग्य विमा उपलब्ध करून देते.

२. या योजनेत किती कव्हर मिळते?

या योजनेत ५०,००० ते २ लाख रुपयांपर्यंतचे कव्हर दिले जाते.

३. योजनेचा लाभ कोण घेऊ शकतो?

शेतकरी, मजूर, रिक्षाचालक, छोटे दुकानदार, रोजंदारीवर काम करणारे तसेच सर्वसामान्य कुटुंब.

४. योजना कशी घ्यायची?

जवळच्या पोस्ट ऑफिसमध्ये जाऊन साधा फॉर्म व ओळखपत्र सादर करावे लागते.

५. या योजनेत कुटुंबीयांचा समावेश होऊ शकतो का?

होय, पॉलिसीधारकाव्यतिरिक्त कुटुंबातील सदस्यांनाही समाविष्ट करता येते.

६. ही योजना कुठे उपलब्ध आहे?

ही योजना देशभरातील सर्व टपाल कार्यालयांमध्ये उपलब्ध आहे.

शिवानी यादव
निकिता तोमर

केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी खूशखबर! लवकरच वेतन आयोग स्थापन होणार, दिवाळीत मिळणार गोड बातमी

केंद्र सरकारच्या कोट्यवधी कर्मचारी, अधिकाऱ्यांसाठी खूशखबर आली आहे. केंद्र सरकारने आठवा वेतन आयोग स्थापन

 ISBN NO. 978-81-990957-8-6

करण्यासंदर्भात मोठी घोषणा केली आहे. दिवाळीपर्यंत केंद्रीय कर्मचाऱ्यांना 8 व्या वेतन आयोगाशी संबंधित एक आनंदाची बातमी मिळू शकते. त्यामुळे आता या कर्मचाऱ्यांची दिवाळी आणखीनच गोड होणार आहे.

कधी होईल आठवा वेतन आयोग?

'अपस्टाॅक्स'च्या वृत्तानुसार, 8 व्या वेतन आयोगाच्या स्थापनेबाबत काम वेगाने सुरू आहे. अशा परिस्थितीत, बातमी समोर आली आहे की, यावर्षी दिवाळीपर्यंत म्हणजेच 22-23 ऑक्टोबरपर्यंत 8 वा वेतन आयोग स्थापन होईल, 8 वा वेतन आयोग स्थापन होण्याची आनंदाची बातमी येऊ शकते.

राज्य सरकारची केंद्र सरकारची चर्चा

यासंदर्भात गुड रिटर्न्सनेही वृत्त दिले आहे. केंद्र सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारक बऱ्याच काळापासून आठव्या वेतन आयोगाची वाट पाहत आहेत. आता लवकरच याबाबत अपडेट मिळणार आहे. सरकारने म्हटले आहे की सरकार आठव्या केंद्रीय वेतन आयोगाबाबत राज्यांशी सतत चर्चा करत आहे.

कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्या

नुकत्याच झालेल्या एका बैठकीत, केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांच्या राष्ट्रीय महासंघाच्या (GENC) प्रतिनिधी मंडळाने केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी आपल्या काही प्रमुख मागण्या सरकारसमोर ठेवल्या, ज्यात खालील गोष्टींचा समावेश आहे:

- ८वा वेतन आयोग त्वरित स्थापन करावा.
- राष्ट्रीय पेन्शन योजना (NPS) आणि युनिफाइड पेन्शन स्कीम (UPS) रद्द करून जुनी पेन्शन योजना (OPS) पुन्हा सुरू करावी.
- कोविड-१९ महामारीच्या काळात रोखलेल्या १८ महिन्यांच्या महागाई भत्ता (DA) च्या थकबाकीचे त्वरित वाटप करावे.

सरकारने काय दिले आश्वासन?

कर्मचाऱ्यांच्या या मागण्यांवर सकारात्मक प्रतिसाद देत, मंत्री जितेंद्र सिंह यांनी आश्वासन दिले की ८वा वेतन आयोग लवकरच स्थापन केला जाईल. त्यांनी सांगितले की कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर, विशेषतः पेन्शन संबंधित मुद्द्यांवर, सरकार गांभीर्याने विचार करत आहे आणि लवकरच यावर चर्चा केली जाईल.

आठव्या वेतन आयोगामुळे महागाई भत्ता, घरभाडे भत्ता (HRA) आणि प्रवास भत्ता (TA) यामध्ये महागाईनुसार सुधारणा केली जाईल. मात्र, काही भत्ते, जसे की विशेष कर्तव्य भत्ता आणि प्रादेशिक भत्ता, रद्द होण्याची शक्यता आहे.

आठवा वेतन आयोग 1 जानेवारी 2026 पासून लागू होण्याची अपेक्षा आहे. या तारखेपासून सध्याचा 55 टक्के महागाई भत्ता शून्य होईल आणि मूळ वेतनात विलीन केला जाईल. त्यामुळे जरी तात्काळ वाढ कमी दिसत असली तरी, पेन्शन मूळ वेतनाशी जोडलेली असल्याने भविष्यात याचा मोठा फायदा होईल असे म्हटले जात आहे.

निकिता तोमर
शिवानी यादव

14/9/25

देशातील १२ सरकारी बँकांचे विलिनीकरण होणार

देशात फक्त ४-५ सरकारी बँका आजपासून सरकार आणि सार्वजनिक बँकांमध्ये महत्त्वाची बैठक देशातील १२ बँकांच्या विलिनकरणासाठी महत्त्वाची बैठक घेण्यात येणार आहे.

मोदी सरकारने बँकांच्या विलिनिकरणासाठी मोठा निर्णय घेतला आहे. या विलिकरणाला बँकेच्या कर्मचारी संघटनांचा विरोध आहे. मात्र, याविषयी सरकार आणि सार्वजनिक श्रेत्रातील बँकांमध्ये बैठक होणार आहे. दोन-तीन दिवस ही बैठक होणार आहे.

देशात फक्त ४-५ सरकारी बँका सरकार आणि सार्वजनिक श्रेत्रातील बँकांमधील बैठक आज आणि उद्या होणार आहे. या बैठकीत बँकिंग सुधारणेवर चर्चा होणार आहे. जवळपास दोन वर्षांनी ही अशी बैठक होणार आहे. यामध्ये बँकिंग क्षेत्रातील

 ISBN NO. 978-81-990957-8-6

रोडमॅप, आकार, जागतिक स्पर्धेतील रणनीती, एआय, ग्राहकांसाठीची सेवा याविषयीची चर्चा होणार आहे. या बैठकीला आरबीआयचे डेप्युटी गव्हर्नर उपस्थित असणार आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सरकारी बँकांच्या विलिनीकरणाची चर्चा या बैठकीत होणार आहे. देशातील १२ सरकारी बँकांचे विलिनीकरण करण्यात येणार आहे. फक्त ४ ते ५ सरकारी बँका सुरु ठेवण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहे. जागतिक दर्जावर बँकिंग क्षेत्रालाही या स्पर्धेत उतरवण्यासाठी सरकारी मोठी तयारी करत आहेत.

सरकारी बँकांची संख्या २७ वरुन १२

२०२० मध्येच मोदी सरकारने बँकांच्या विलिनीकरणाची प्रक्रिया सुरु केली होती. त्यामुळे सरकारी बँकांची संख्या २७ वरुन १२ आली आहे. आता या बँकांचेबी विलिनीकरण करण्यात येत असल्याचे बोलले जात आहे. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दृष्टीने सरकार महत्त्वाचे पाऊल टाकत असल्याचे सांगितले जात आहे.

नेपाळमधील हिंसाचारामुळे भारतीय कंपन्यांना फटका

नेपाळमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय व सामाजिक अस्थिरतेमुळे अर्थकारणाला फटका बसत आहे. राजधानी काठमांडूसह अनेक भागांत उसळलेल्या हिंसाचारामुळे भारतीय एफएमसीजी कंपन्यांचे कामकाज विस्कळीत झाले आहे. च्यवनप्राश, बिस्किटसारख्या दैनंदिन वापरातील वस्तूंच्या उत्पादनावर थेट परिणाम होत असून ग्राहकांपर्यंत त्याचा पुरवठा कमी होण्याची शक्यता आहे.

याआधी बांगलादेशमध्येही अशाच राजकीय अस्थिरतेमुळे भारतीय एफएमसीजी कंपन्यांना तोटा सहन करावा लागला होता. शेख हसीना सरकारविरोधातील आंदोलनामुळे इमामीसारख्या कंपन्यांचा व्यवसाय प्रभावित झाला होता. सध्या डाबर, ब्रिटानिया, मॅरिको, पतंजली, आयटीसी, रिलायन्स कन्झ्युमर यांसारख्या अनेक भारतीय कंपन्या नेपाळमध्ये स्थानिक वितरकांच्या माध्यमातून कार्यरत आहेत. त्यामुळे हिंसाचार चालू राहिला तर या सर्व कंपन्यांना तोटा होण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली आहे.

कु. प्रतीक्षा घरणे

18 Carat Gold Jewellery:

लग्नसमारंभ असो वा सण, सोन्याशिवाय कोणताही कार्यक्रम पार पडत नाही. पण आज 24 कॅरेट सोन्याचा भाव 1 लाख 10 हजारांच्या पुढे गेला आहे. अशा महागाईच्या काळात लोकांचा कल 18 कॅरेट सोन्याकडे वाढतं आहे. कारण, हे सोनं सौंदर्य आणि बजेटचं संतुलन साधत आहे.

18 कॅरेट सोन्यात काय असतं?

18 कॅरेट सोनं साधारण 75 टक्के शुद्ध सोन्याचं बनलेलं असतं. उरलेल्या 25 टक्क्यांमध्ये तांबे, चांदी, झिंकसारख्या धातूंचा समावेश केला जातो. या धातूंच्या मिश्रणामुळे सोनं अधिक टिकाऊ होतं आणि त्याला विविध छटा मिळतात. उदाहरणार्थ, तांबे घातल्याने सोन्याला लालसर चमक येते, ज्याला रोझ गोल्ड म्हटलं जातं. तर चांदी मिसळल्यावर सोनं अधिक पांढर आणि चमकदार दिसतं.

24 कॅरेट का नाही?

24 कॅरेट सोने हे 100 टक्के शुद्ध असलं तरी खूप मऊ असल्यामुळे त्याचे दागिने बनवता येत नाहीत. त्यामुळे 24 कॅरेट सोनं प्रामुख्याने नाणी, बार किंवा गुंतवणुकीसाठी वापरलं जातं. उलट 18 कॅरेट सोनं टिकाऊ असतं.

कु. प्रतीक्षा घरणे

EMI नाही भरला तर Smartphone होईल लॉक

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (RBI) एका नियमामुळे अनेक कर्जदारांचे धाबे दणाणार आहे. मुदतीत कर्जाचा हप्ता जर भरला नाही तर अशा कर्जदारांचा स्मार्टफोन आपोआप लॉक होईल.

बँका आणि वित्तीय संस्थांचे थकलेल्या कर्जाची झंझट समाप्त करण्यासाठी, कर्ज

 ISBN NO. 978-81-990957-8-6

वसुलीसाठी हा नियम आणल्या जाऊ शकतो. काही लोकांच्या मते, सरसकट सगळयांसाठी हा नियम लागू झाल्याने जे खरंच अडचणीत आहेत. त्यांना मोठा त्रास होऊ शकतो.

कु. प्रतीक्षा घरणे

Donald Trump चा G-7 देशांवर दबाव

अमेरिका जी-७ देशांवर भारत आणि चीनवरील कर वाढवण्यासाठी दबाव आणत आहे. रशियाकडून कच्चे तेल खरेदी केल्याबद्दल भारत आणि चीनवर कर वाढवावा अशी ट्रम्प प्रशासनाची इच्छा आहे (डोनाल्ड ट्रम्प टॅरिफ्स).

अमेरिकेने २७ ऑगस्टपासून भारतावर ५० टक्के कर लादला आहे. दोन दिवसांपूर्वीच त्यांनी युरोपियन युनियनला भारतावर १०० टक्के कर लादण्यास सांगितले होते. फायनान्शियल टाईम्सच्या वृत्तानुसार, जी-७ देशांचे अर्थमंत्री शुक्रवारी व्हिडिओ कॉलमध्ये अमेरिकेच्या प्रस्तावावर चर्चा करतील.

कु. प्रतीक्षा घरणे

एकेकाळी ५००० रुपये होता पगार, आता त्यांची कंपनी आणतेय ३८२० कोटींचा IPO

एक-दोन दिवस, एक-दोन महिन्यांत कोणतंही यश मिळत नाही. यशस्वी व्यक्तीच्या मागे त्याचं समर्पण, परिश्रम आणि संयम असतो.अशीच एक व्यक्ती म्हणजे एज्युटेक कंपनी फिजिक्सवालाचे संस्थापक अलख पांडे. एकेकाळी दरमहा ५,००० रुपये काम करणारे अलख आता हजारो कोटींच्या कंपनीचे मालक आहेत. अलख सध्या चर्चेत आहेत कारण त्यांची कंपनी फिजिक्सवाला ३,८२० कोटी रुपयांचा आयपीओ घेऊन येत आहे.

२०२० मध्ये फिजिक्सवालाची कंपनी कायद्यांतर्गत अलख पांडे यांनी नोंदणी केली होती. त्यांचं चॅनेल आता एक कंपनी बनली.

आयपीओमध्ये दोन प्रकारचे शेअर्स असतील. ३,१०० कोटी रुपयांचे नवीन शेअर्स जारी केले जातील. त्याच वेळी, कंपनीच्या मालकांकडून ७२० कोटी रुपयांचे शेअर्स विकले जातील. कंपनीचे मालक अलख पांडे आणि प्रतीक माहेश्वरी (अधिकृत कागदपत्रांमध्ये प्रतीक बूब) प्रत्येकी ३६० कोटी रुपयांचे शेअर्स विकतील.

कु. वैष्णवी औंढेकर

देशातील १२ सरकारी बँकांचे विलिनीकरण होणार

देशातील १२ बँकांच्या विलिनकरणासाठी महत्त्वाची बैठक घेण्यात येणार आहे.मोदी सरकारने बँकांच्या विलिनिकरणासाठी मोठा निर्णय घेतला आहे. या विलिकरणाला बँकेच्या कर्मचारी संघटनांचा विरोध आहे. मात्र, याविषयी सरकार आणि सार्वजनिक श्रेत्रातील बँकांमध्ये बैठक होणार आहे. दोन-तीन दिवस ही बैठक होणार आहे.

२०२० मध्येच मोदी सरकारने बँकांच्या विलिनीकरणाची प्रक्रिया सुरु केली होती. त्यामुळे सरकारी बँकांची संख्या २७ वरुन १२ आली आहे. आता फक्त ४ ते ५ सरकारी बँका सुरु ठेवण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहे. जागतिक दर्जावर बँकिंग क्षेत्रालाही या स्पर्धेत उतरवण्यासाठी सरकारी मोठी तयारी करत आहेत.विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दृष्टीने सरकार महत्त्वाचे पाऊल टाकत असल्याचे सांगितले जात आहे.

-Pratiksha Gharne

२०२५ मधील जीएसटी दर सध्याची जीएसटी दर श्रेणी

(२२ सप्टेंबर २०२५ पूर्वी)

जीएसटी दर लागू होणाऱ्या वस्तू व सेवा

- ०% (सूट) ताजे फळे, भाज्या, दूध, भाकरी, इतर दैनंदिन अत्यावश्यक वस्तू
- ५% पॅकबंद अन्नपदार्थ, सामान्य घरगुती वस्तू
- १२% प्रक्रिया केलेले अन्न, फळांचे रस, गोठवलेले मांस, लोणी, साजूक तूप, सुकामेवे

 ISBN NO. 978-81-990957-8-6

- १८% उपाहारगृह सेवा, टेलिकॉम, बँकिंग, सौंदर्यप्रसाधने, केसांचे तेल, टूथपेस्ट, भांडवल माल
- २८% टीव्ही, फ्रिज, लहान कार, दुचाकी, सिमेंट, रंग, लक्झरी वस्तू, सिगारेट, तंबाखू

नवीन जीएसटी दर श्रेणी (२२ सप्टेंबर २०२५ पासून लागू)

जीएसटी दरलागू होणाऱ्या वस्तू व सेवा

- ०% (सूट) दैनंदिन अत्यावश्यक वस्तू नवीन वैयक्तिक आरोग्य व जीवन विमा, वही,नकाशे,चार्ट
- ५% पॅकबंद अन्नपदार्थ, चप्पल/बूट, औषधे, लहान घरगुती वस्तू, इतर वापरातील सामान्यवस्तू
- १८% उपाहारगृह सेवा, टेलिकॉम सेवा, आर्थिक सेवा, टीव्ही, वॉशिंग मशीन, लॅपटॉप, वापरातील इलेक्ट्रॉनिक्स, ३५०सीसी खालील दुचाकी, १२००सीसी खालील कार
- ४०% (नवीन) लक्झरी व पापवस्तू: महागड्या गाड्या, तंबाखू उत्पादने, प्रीमियमदुचाकी

मुख्य बदलांचा सारांश:

- १२% आणि २८% दर हटवले गेले आहेत.
- १८% हा मुख्य दर बनवण्यात आला आहे.
- ४०% दर नवीन प्रकारच्या लक्झरी व तंबाखू वस्तूंवर लागू.
- ०% सूट आता विमा आणि शैक्षणिक साहित्यांवरही लागू आहे.

कु. कार्तिका पगडाला

15/09/2025

जीएसटी

नवीन जीएसटी दराअंतर्गत, लक्झरी आणि हानिकारक वस्तूंवर ४०% चा उच्च कर स्लॅब लागू करण्यात आला आहे. अनेक गोष्टी स्वस्त होत आहेत. परंतु काही वस्तू महाग देखील होत आहेत. आज आम्ही तुम्हाला २२ सप्टेंबरपासून महाग होणाऱ्या महागड्या वस्तूंबद्दल सांगू.

भारताची जीएसटी प्रणाली एका ऐतिहासिक बदलातून जात आहे. नवीन जीएसटी सुधारणांसह, आता सर्व वस्तू फक्त ५%, १८% आणि ४०% च्या स्लॅबमध्ये येतील. २२ सप्टेंबरपासून नवीन जीएसटी दर लागू होत आहेत. यामध्ये, बहुतेक दैनंदिन वस्तू स्वस्त होतील. लोक नियमितपणे वापरत असलेल्या काही उत्पादनांच्या किमती वाढतील.

22 सप्टेंबरनंतरदेखील कमी होणार नाही पॅकेट दुधाचे दर? अमूलनेही केली घोषणा, सांगितले 'शेतकऱ्यांना फायदा...'

२२ सप्टेंबरपासून काय महाग होत आहे?

४०% चा वरचा दर अशा उत्पादनांना लागू होईल ज्यांना सरकार निरुत्साहित करू इच्छिते किंवा लक्झरी मानले जाते. कोला आणि इतर कार्बोनेटेड पेयेवरील कर २८% वरून ४०% पर्यंत वाढतील.

कु. कार्तिका पगडाला
कु. गजानन राजरवाड

वर्षभरात सोन्याच्या दरात 32 टक्क्यांची वाढ, दर वाढण्याची नेमकी काय आहेत कारणं? जाणून घ्या सविस्तर माहिती

अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प हे पुन्हा सत्तेत आल्यानंतर जागतिक तणाव वाढला आहे. विशेषतः त्यांच्या टॅरिफ घोषणेनंतर, जागतिक अर्थव्यवस्थेचा मूड बदलला आहे. यामुळे, सोन्याचे दर वाढत आहेत. या वर्षी डॉलरमध्ये सोन्याच्या किमतीत 32 टक्क्यांची वाढ झाली आहे. सोने इतके का वाढत आहे? याबाबतची माहिती जाणून घेऊयात.

सोन्याचे दर वाढण्याची काय आहेत कारणं?

अमेरिकेने जागतिक टॅरिफ प्रणालीची घोषणा केली तेव्हा, गेल्या एका महिन्यात सोन्याचे दर वाढले आहेत. कारण भू-राजकीय अनिश्चितता

 ISBN NO. 978-81-990957-8-6

वाढली आहे आणि यूएस फेडरल रिझर्व्ह व्याजदरात कपात करण्याची अपेक्षा आहे. सोन्याच्या किमतीत वाढ होण्याचे एक कारण म्हणजे केंद्रीय बँकांनी अमेरिकन डॉलरच्या साठ्यापासून स्वतःला दूर ठेवले आहे. या वर्षाच्या सुरुवातीपासून, विशेषतः पहिल्या काही महिन्यांत डॉलर 11 टक्क्यांनी घसरला आहे. केवळ मध्यवर्ती बँका डॉलरच्या साठ्याची विक्री करत नाहीत तर युरोप आणि जपानमध्ये बाँडच्या उत्पन्नातही वाढ झाली आहे, जी सरकारी बाँडच्या मागणीत घट दर्शवते. सोने हळूहळू इतर चलनांची जागा घेत आहे.

सोने ही मुख्य राखीव मालमत्ता बनण्याची शक्यता आहे, परंतु सध्या ते शक्य दिसत नाही. सर्वत्र महागाई वाढवावी लागेल, व्यापार आणि जीडीपी कमी करावा लागेल. हे अद्याप झालेले नाही. परंतु सोन्यातील अलिकडच्या वाढीवरून स्पष्टपणे दिसून येते की काही गुंतवणूकदार आणि मध्यवर्ती बँका चिंतेत आहेत.

कु. कार्तिका पगडाला
कु. गजानन राजरवाड

शेअर बाजारातील हालचाल

शेअर बाजार सतत सकारात्मक संकेत देत आहे. या वर्षी निफ्टी निर्देशांक 5 टक्क्यांवर आहे आणि एस अँड पी 500 निर्देशांक 9 टक्क्यांवर आहे. अमेरिकन शेअर बाजार विक्रमी उच्चांकावर आहे आणि भारतीय शेअर बाजार देखील जूनच्या अखेरीस केलेल्या त्याच्या विक्रमी उच्चांकाच्या जवळ आहे. अमेरिकन शेअर बाजाराची अस्थिरता मोजणारा VIX निर्देशांक 14.5 वर आहे. भारतीय शेअर बाजाराची अस्थिरता मोजणारा इंडिया VIX निर्देशांक 10.1 वर आहे. दोन्ही त्यांच्या दीर्घकालीन सरासरीच्या आसपास किंवा त्याहून कमी आहेत. शेअर बाजारातून कोणत्याही वाईट बातमीचे संकेत नाहीत. सोने आणि शेअर बाजाराच्या कथेत स्पष्ट विसंगती आहे. सोने, चलन आणि बाँड बाजार वाईट बातमीचे संकेत देत आहेत, तर शेअर बाजार सर्व काही ठीक असल्याचे सांगत आहे.

किरकोळ गुंतवणूकदार हे संस्थात्मक गुंतवणूकदारांपेक्षा जास्त वेळा चुकीचे सिद्ध होतात. किरकोळ गुंतवणूकदारांची सोने आणि शेअर बाजार दोन्हीमध्ये मोठी उपस्थिती आहे. परंतु चलन आणि बाँड बाजारात त्यांचा वाटा कमी आहे. हे दोन्ही बाजार बहुतेक संस्थात्मक गुंतवणूकदारांद्वारे चालवले जातात. बाँड आणि चलन बाजारांच्या हालचाली पाहता असे दिसते की सध्या संस्थात्मक गुंतवणूकदार निराशावादी आहेत. सोने आणि शेअर बाजार दोन्ही एकत्र फिरत असल्याने, हे दिसून येते की किरकोळ गुंतवणूकदार अधिक आशावादी आहेत, परंतु ते त्यांचे पैज सुरक्षित ठेवत आहेत. कोणता गट बरोबर आहे हे काळच सांगेल. जर आपण इतिहासाकडे पाहिले तर, संस्थात्मक गुंतवणूकदारांनी किरकोळ गुंतवणूकदारांपेक्षा चांगली कामगिरी केली आहे.

कु. कार्तिका पगडाला
कु. गजानन राजरवाड

16/9/25

जिओचा मोठा धमाका! AI स्मार्ट ग्लासेस लाँच, फोटो-व्हिडिओपासून कॉलिंगपर्यंत मिळतील भन्नाट फिचर्स

जिओ फ्रेम्स स्मार्ट ग्लासेसमध्ये एआय सपोर्ट, फोटो, व्हिडिओ व कॉलिंग फिचर्स मिळणार मेटा रेबॅनपेक्षा स्वस्त दरात भारतीय बाजारात लाँच होण्याची शक्यता जिओ व्हॉइस एआय वापरकर्त्यांना प्रश्नांची उत्तरे आणि रेसिपीसारख्या मार्गदर्शनाची सुविधा देईलरिलायन्सने त्यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत जिओ फ्रेम्स या एआय पॉवर्ड स्मार्ट ग्लासेसची घोषणा केली आहे. हे स्मार्ट ग्लासेस थेट मेटा रेबॅनशी स्पर्धा करणार असून स्मार्ट वेअरेबल्सच्या बाजारात मोठी चुरस निर्माण करणार आहेत. अलीकडे लेन्सकार्टनेही स्मार्ट ग्लासेस सादर केले होते, मात्र त्यामध्ये कॅमेऱ्याची सुविधा नव्हती. दरम्यान, अमेरिकन टेक कंपनी

 ISBN NO. 978-81-990957-8-6

मेटाने काही दिवसांपूर्वीच भारतात आपले रेबॅन स्मार्ट ग्लासेस लाँच केले असून, हे उत्पादन इतर देशांमध्ये काही वर्षांपूर्वीच उपलब्ध झाले होते.

जिओ फ्रेम्समध्ये इनबिल्ट ओपन इअर स्पीकर्स देण्यात आले आहेत, ज्याद्वारे यूजर्स थेट चष्म्यातून कॉल करू शकतात, कॉल स्वीकारू शकतात किंवा संगीताचा आनंद घेऊ शकतात. यामध्ये एचडी फोटो काढण्याची आणि व्हिडिओ रेकॉर्ड करून थेट सोशल मीडियावर शेअर करण्याची सुविधाही उपलब्ध आहे. रिलायन्सचे चेअरमन मुकेश अंबानी यांनी सांगितले की, जिओ फ्रेम्स स्मार्ट ग्लासेस मोबाईल ॲपशी जोडता येतात आणि त्यामध्ये साठवलेले फोटो व व्हिडिओ वापरकर्ते सहज पाहू शकतात.

Realme Smartphone: चार्जिंगची चिंता संपणार! एकदा चार्ज करुन ४ दिवस चालणारा नवीन स्मार्टफोन लवकरच येणार बाजारात

जिओ फ्रेम्समध्ये जिओ व्हॉइस एआय नावाचा बिल्ट-इन व्हॉइस असिस्टंट आहे, जो वापरकर्त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देतो. उदाहरणार्थ, तुम्ही स्वयंपाकघरात एखादी रेसिपी विचारली तर तो तुम्हाला पायरीपायरीने मार्गदर्शन करेल. त्याशिवाय या ग्लासेसमध्ये लाईव्ह ट्रान्सलेशनचीही सुविधा आहे. त्यामुळे विविध भारतीय भाषांचा सपोर्ट मिळेल आणि कोणतेही उत्पादन, मेनू किंवा चिन्ह पाहून त्याचे भाषांतर करता येईल.

Pixel 10 Series Sale: गुगल पिक्सेल १० सिरीजची विक्री सुरू; मिळणार १० हजार रुपयांची सूट, जाणून घ्या फीचर्स आणि किंमत

कंपनीने जिओ फ्रेम्सच्या किमतीबाबत कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. सध्या भारतात मेटा रेबॅन स्मार्ट ग्लासेसची किंमत सुमारे ३५ हजार रुपयांपासून सुरू होते. त्यामुळे अशी अपेक्षा आहे की जिओ आपले ग्लासेस अधिक किफायतशीर दरात बाजारात आणेल. कॉलिंग, संगीत, फोटो-व्हिडिओसोबत एआय सपोर्ट आणि भाषांतर यांसारख्या आधुनिक फीचर्समुळे जिओ फ्रेम्स स्मार्ट ग्लासेस भारतीय बाजारात तंत्रज्ञानाच्या नव्या क्रांतीची सुरुवात करू शकतात.

जिओ फ्रेम्स म्हणजे काय?

हे एआय-पॉवर्ड स्मार्ट ग्लासेस आहेत ज्यामध्ये कॅमेरा, कॉलिंग, म्युझिक आणि ट्रान्सलेशनसारख्या सुविधा आहेत.

जिओ फ्रेम्सची किंमत किती आहे?

कंपनीने अद्याप किंमत जाहीर केलेली नाही. मात्र, मेटा रेबॅनपेक्षा कमी दरात हे लाँच होण्याची अपेक्षा आहे.

यात कोणकोणते फिचर्स आहेत?

कॉलिंग, एचडी फोटो, व्हिडिओ रेकॉर्डिंग, लाईव्ह ट्रान्सलेशन, जिओ व्हॉइस एआय असिस्टंट, म्युझिक ऐकणे इत्यादी सुविधा आहेत.

मेटा रेबॅनपेक्षा यात काय वेगळं आहे?

जिओ फ्रेम्स भारतीय बाजाराला लक्षात घेऊन आणले जात आहेत आणि यात मल्टीलँग्वेज सपोर्ट आणि एआय बेस्ड असिस्टंट आहे.

Samsung चा 'हा' नवीन फोन लवकरच होणार लाँच, 5000mAh बॅटरी आणि बजेट किंमतीसह मिळणार भन्नाट फीचर्स

कु. भूमीका नागडा

शेअर बाजार

आज शेअर बाजाराची सुरुवात सपाट झाली होती, त्यानंतर दिवसभर बाजार किंचित वाढीसह व्यवहार करत राहिला. परंतु काल निफ्टी 25,000 च्या खाली बंद झाला त्या तुलनेत, आज तो या पातळीच्या वर बंद झाला. सलग सातव्या दिवशी बाजार वाढीसह बंद झाला.

निफ्टी 32 अंकांनी वाढून 25,005 वर बंद झाला. सेन्सेक्स 123 अंकांनी वाढून 81,548 वर आणि बँक निफ्टी 133 अंकांनी वाढून 54,669वर बंद झाला.

एनटीपीसी, पॉवरग्रिडचे शेअर्स चमकले

 ISBN NO. 978-81-990957-8-6

आजच्या व्यापारात सेन्सेक्समधील 30 पैकी बहुतेक शेअर्समध्ये चढ-उतार दिसून आले. एनटीपीसी, पॉवर ग्रिड, ॲक्सिस बँक, एटर्नल आणि भारती एअरटेल हे टॉप गेनर्स ठरले. दुसरीकडे इन्फोसिस, टायटन कंपनी, हिंदुस्तान युनिलिव्हर, बीईएल आणि अल्ट्राटेक सिमेंट या शेअर्समध्ये घसरण दिसून आली. मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्स सुस्त होते. निफ्टी मिडकॅप 100 इंडेक्स केवळ 0.08 टक्के वाढीसह बंद झाला, तर निफ्टी स्मॉलकॅप 100 जवळपास सपाट होता.

मिडिया, मेटल, फार्मामध्ये तेजी सेक्टरनिहाय पाहता आज बाजार संमिश्र होता. आयटी आणि ऑटो शेअर्समध्ये विक्री झाली. पण निफ्टी मीडिया, मेटल, फार्मा आणि बँकिंग इंडेक्सने तेजी कायम ठेवली.

तेजीमागची तीन मोठी कारणे

1. अमेरिकन फेड रेट कटची अपेक्षा:

16-17 सप्टेंबरला होणाऱ्या FOMC बैठकीत व्याजदर कमी होण्याची गुंतवणूकदारांना अपेक्षा आहे. त्यातच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी "वॉशिंग्टन-नवी दिल्ली चर्चा पुन्हा होईल" असा दिलेला इशारा मार्केटसाठी सकारात्मक ठरला.

2. जागतिक संकेत मजबूत:

आशियाई बाजारांमध्ये कोस्पी, निक्केई 225 आणि शांघाय SSE कंपोजिटमध्ये तेजी दिसली, तर हाँगकाँगचा हँगसेंग लाल रंगात होता. अमेरिकन बाजार मात्र मिश्र संकेतांसह बंद झाले.

3. FII ची मर्यादित विक्री:

एफआयआयने 9 सप्टेंबरला 2,050.46 कोटींची खरेदी केली होती, तर 10 सप्टेंबरला त्यांनी केवळ 115.69 कोटींची विक्री केली. याउलट, डीआयआयने 5,004.29 कोटींची मोठी खरेदी केली. यामुळे बाजारात तेजी दिसून येत आहे.

कु. भूमीका नागडा

भारताच्या बँकिंग क्षेत्राला मोठा धक्का! 12 प्रमुख सरकारी बँकांचे 'महा'विलीनीकरण; ग्राहकांच्या खात्यांवर काय परिणाम?

भारताच्या बँकिंग क्षेत्रात महत्त्वाची घडामोड घडणार आहे. देशातील 12 प्रमुख सरकारी बँकांचे विलिनीकरण करण्यात येणार आहे. जागतिक पातळीवर बँकिंग क्षेत्रातील स्पर्धेत टिकून राहण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे.या बदलाचा परिणाम बँकिंग कर्मचाऱ्यांपासून ते लाखो खातेधारकांपर्यंत जाणार आहे. लवकरच या विलिनीकरणासंबंधी अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे.

देशात आधी 27 पेक्षा जास्त सरकारी बँका होत्या, जे आता १२ वर आले आहेत. आता या 12 सरकारी बँकांचे विलिनीकरण केले जाणार असून, त्यानंतर भारतात फक्त 3 ते 4 मोठ्या महाबलाढ्य बँका उरतील.

या १२ बँकांमध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, बँक ऑफ बडोदा, कॅनरा बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, इंडियन बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, इंडियन ओव्हरसीज बँक, युसीआय बँक, बँक ऑफ महाराष्ट्र आणि पंजाब अँड सिंध बँक यांचा समावेश आहे.

घरांच्या कमतरतेमुळे म्हाडाची दिवाळी लॉटरी जाहीर होण्यास विलंब होणार, जाणून घ्या सविस्तर

खातेधारकांसाठी काय बदल?

बँकांचे विलिनीकरण झाल्यानंतर खातेधारकांच्या ठेवींवर, मुदत ठेव, आवर्ती ठेवी आणि इतर गुंतवणुकीवर कुठलाही थेट परिणाम होणार नाही. मात्र, कागदपत्रं अद्ययावत करावी लागतील. बँकेचे नाव, IFSC कोड, ग्राहक क्रमांक आणि खाते क्रमांक बदलले जाऊ शकतात.

पूर्वीची विलिनीकरण उदाहरणे

न्यू बँक ऑफ इंडिया पंजाब नॅशनल बँकेत विलीन झाली.

स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र युसीआयमध्ये विलीन झाली.

स्टेट बँक ऑफ इंदौर स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये विलीन झाली.

स्टेट बँक ऑफ बिकानेर & जयपूर, स्टेट बँक ऑफ हैदराबाद, स्टेट बँक ऑफ म्हैसूर, स्टेट बँक ऑफ पतियाला, स्टेट बँक ऑफ त्रावणकोर आणि भारतीय महिला बँक एसबीआयमध्ये विलीन झाल्या.

विजया बँक आणि देना बँक बँक ऑफ बडोदा मध्ये विलीन झाल्या.

अलाहाबाद बँक इंडियन बँकेत विलीन झाली.

ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स आणि युनायटेड बँक पंजाब नॅशनल बँकेत विलीन झाल्या.

सांघ्रा बँक अँड कॉर्पोरेशन बँक युनियन बँक ऑफ इंडियात विलीन झाली.

सिंडिकेट बँक कॅनरा बँकेत विलीन झाली. यामुळे भारतीय बँकिंग क्षेत्र अधिक मजबूत आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनेल.

कु. भूमीका नागडा

17/9/25

टाटा टेक्नॉलॉजीज ने जर्मनीतील ईएस-टेक ग्रुपचे धोरण केले अधिग्रहणपुढील पिढीतील मोबिलिटी सोल्युशन्स बनवण्याच्या त्यांच्या जागतिक क्षमतांना बळकटी देण्याचा उद्देश

अभियांत्रिकी संशोधन आणि विकास (ईआरअँडडी) वाढीलागती:

हे अधिग्रहण टाटा टेक्नॉलॉजीजच्या (टीटीएल) उच्च-वाढीच्या क्षेत्रांमध्ये - एडीएएस, कनेक्टेड ड्रायव्हिंग आणि डिजिटल अभियांत्रिकी - क्षमतांना वाढवते, हे त्यांच्या ओईएम संशोधन आणि विकास प्राधान्यांना अनुरूप आहे.

युरोपातीलस्थान अधिकमजबूत होणार: जर्मनीतील ईएस-टेकचे नेतृत्व जगातील सर्वात प्रगत ऑटोमोटिव्ह बाजारपेठांमध्ये टीटीएलची उपस्थिती मजबूत करते.

प्रतिभा आणि कौशल्यांमध्ये वाढ:

सिस्टम अभियांत्रिकीमध्ये तज्ञ असलेल्या ३०० हून अधिक अभियंत्यांचे एक मजबूत टॅलेंट पूल सामील झाले आहे.

व्यावसायिक सहकार्यामध्ये वाढ:

क्रॉस-सेल संधी सक्षम करण्यासाठी पूरक ऑफरिंग आणि भिन्न ग्राहक आधार आणि ओईएम खात्यांमध्ये व्यापक प्रवेश.

ईपीएसमध्ये वाढ:

या व्यवहारांमुळे ऑपरेशनच्या पहिल्या पूर्ण वर्षापासून ईपीएसमध्ये वाढ होईल अशी अपेक्षा आहे.

पुणे, भारत / वुल्फ्सबर्ग, जर्मनी – १४ सप्टेंबर २०२५ - जागतिक स्तरावरील उत्पादन अभियांत्रिकी आणि डिजिटल सेवा कंपनी असलेल्या टाटा टेक्नॉलॉजीज

बीएसई: ५४४०२८, एनएसई:

TATATECH ने आज घोषणा केली की त्यांनी ईएस-टेक जीएमबीएच आणि त्यांच्या उपकंपन्यांचे (एकत्रितपणे, ईएस-टेक ग्रुप) १००% इक्विटी शेअर्स खरेदी करण्यासाठी एक निश्चित समझोता करार केला आहे ज्याचे एकूण रोख मूल्य €७५ दशलक्ष आहे. ही रक्कम पुढील दोन वर्षांत दिली जाईल आणि त्यात कामगिरीवर आधारित फायदे समाविष्ट आहेत. ऑपरेशनच्या पहिल्या पूर्ण वर्षापासून हा व्यवहार ईपीएससाठी फायदेशीर ठरेल अशी अपेक्षा आहे.

ईएस-टेक ग्रुपची स्थापना २००६ मध्ये करण्यात आली आणि याचे मुख्यालय जर्मनीतील वुल्फ्सबर्ग येथे आहे. हा एक प्रीमियम ऑटोमोटिव्ह अभियांत्रिकी सेवा प्रदाता आहे जो ड्रायव्हर असिस्टन्स सिस्टम (एडीएएस), कनेक्टेड ड्रायव्हिंग आणि डिजिटल अभियांत्रिकीमध्ये अतिशय कुशल आहे. ३०० हून अधिक कुशल व्यावसायिकांच्या प्रतिभा समूहासह, ईएस-टेकने आपल्या ग्राहकांना जटिल सिस्टम अभियांत्रिकी उपाय प्रदान करून प्रतिष्ठा मिळवली आहे.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

या अधिग्रहणासह, टीटीएलने त्यांच्या जागतिक वृद्धी धोरणात एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे, ज्यामुळे ऑटोमोटिव्ह उद्योगाला भविष्यासाठी तयार अभियांत्रिकी उपाय प्रदान करण्याची त्यांची वचनबद्धता आणखी दृढ झाली आहे. जगातील सर्वात प्रगत ऑटोमोटिव्ह इनोव्हेशन सेंटरपैकी एक असलेले ईएस-टेकने जर्मनीमध्ये एक स्थान निर्माण केले आहे, ज्यामुळे टाटा टेक्नॉलॉजीजना त्यांच्या ER&D ऑपरेशन्सचा विस्तार करण्यासाठी, उच्च-स्तरीय अभियांत्रिकी प्रतिभा उपलब्ध करून देण्यासाठी आणि प्रमुख ओईएमसोबत संबंध दृढ करण्यासाठी एक धोरणात्मक व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

ऑटोमोटिव्ह उद्योगात मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे, युरोपियन OEMs ADAS/AD, विद्युतीकरण आणि सॉफ्टवेअर-परिभाषित वाहन प्लॅटफॉर्ममध्ये संशोधन आणि विकास गुंतवणूक वाढवत आहेत. परिणामी, युरोपमधील अभियांत्रिकी सेवा प्रदात्यांसाठी (ESPs) बाजारपेठ २०२० मध्ये €४.५ अब्ज वरून २०३० पर्यंत €११.७ अब्ज पर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. हा ट्रेंड ES-Tech ला त्यांच्या क्षमतांचा विस्तार करण्यासाठी, त्यांच्या ग्राहक भागीदारी मजबूत करण्यासाठी आणि उच्च-मूल्याच्या विकास कार्यक्रमांचा मोठा वाटा मिळविण्यासाठी महत्त्वपूर्ण संधी प्रदान करतो.

टाटा टेक्नॉलॉजीजचे एमडी आणि सीईओ वॉरेन हॅरिस म्हणाले, 'ईएस-टेक ग्रुपचे अधिग्रहण ही एक मोठी धोरणात्मक भरारी आहे, जी ऑटोमोटिव्ह मूल्य साखळीमध्ये एंड-टू-एंड उत्पादन अभियांत्रिकी उपाय प्रदान करण्याची आमची क्षमता वाढवते आणि नाविन्यपूर्ण अभियांत्रिकी क्षमतांमध्ये प्रवेश करण्यासाठी आमची जागतिक उपस्थिती वाढविण्याची आमची वचनबद्धता प्रतिबिंबित करते. ईएस-टेकची तांत्रिक खोली, ग्राहक-केंद्रितता आणि प्रादेशिक क्षमता बुद्धिमान, कनेक्टेड आणि शाश्वत गतिशीलतेकडे संक्रमण घडवून आणणाऱ्या जागतिक ओईएमसाठी भागीदारीसाठी पहिली पसंती बनण्यासाठी आमच्या धोरणात्मक दृष्टिकोनाशी पूर्णपणे जुळतात.

टीटीएल कुटुंबात ईएस-टेक टीमचे स्वागत करताना आम्हाला आनंद होत आहे. ईएस-टेक ग्रुपचे एकत्रीकरण टाटा टेक्नॉलॉजीजच्या ईआर अँड डी क्षमतांमध्ये लक्षणीय वाढ करेल, विशेषतः एम्बेडेड सिस्टम्स, इलेक्ट्रॉनिक्स आणि सिस्टम इंजिनिअरिंगच्या क्षेत्रात. आम्ही क्रॉस-सेलिंग सिनर्जी वाढवण्यासाठी, पुढील पिढीतील गतिशीलता कार्यक्रमांचा विस्तार करण्यासाठी आणि संयुक्तपणे नवीन तंत्रज्ञानाचा पाठपुरावा करण्यासाठी चांगल्या स्थितीत असू.'

ईएस-टेकचे एमडी आणि सीईओ मार्क विली म्हणाले, 'टाटा

टेक्नॉलॉजीजसोबत सामील होणे हे ईएस-टेक ग्रुपसाठी क्षमतांची व्याप्ती आणि खोली वाढवण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांची उपस्थिती वाढवण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. एकत्रितपणे, आम्ही ऑटोमोटिव्ह उद्योगाच्या भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी चांगल्या स्थितीत आहोत, जसे की स्पर्धात्मक किंमत, उत्कृष्ट गुणवत्ता आणि जलद विकास चक्रांद्वारे आमच्या ग्राहकांना वास्तविक मूल्य प्रदान करणे. आमचे ध्येय स्पष्ट आहे: जागतिक ऑटोमोटिव्ह उद्योगाला पुढे नेणे आणि टाटा टेक्नॉलॉजीजसह गतिशीलता क्षेत्रासाठी पसंतीचा भागीदार बनणे.'

कु. पायलकौर जाधव

18/9/25

भारतातील सर्वात मोठी सोन्याची बाजारपेठ कोणती

दिवसेंदिवस सोन्याच्या दरात वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.भारतासह जगातील सर्व देशांमध्ये सोने हा सर्वात मौल्यवान धातूंपैकी एक आहे.

सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याला नेहमीच मागणी राहिली आहे. भारत दरवर्षी इतर देशांमधून मोठ्या प्रमाणात सोने आयात करतो.

ISBN NO. 978-81-990957-8-6

सोन्याचा वापर अनेक महत्त्वाच्या कामांमध्ये केला जातो.

देशातील सर्वात मोठी सराफा बाजारपेठ मुंबईतील झवेरी येथे आहे. याशिवाय, केरळमधील त्रिशूर शहर 'भारताची सोन्याची राजधानी' म्हणून ओळखले जाते. भारताची आर्थिक राजधानी मुंबई स्थित झवेरी बाजार हा भारतातील सर्वात मोठा सोन्याचा बाजार मानला जातो. याला संपूर्ण आशियातील सर्वात मोठा सोन्याचा बाजार देखील म्हटले जाते.

मुंबईचा झवेरी बाजार 160 वर्षांहून अधिक जुना आहे. 1864 मध्ये प्रसिद्ध सराफा व्यापारी त्रिभुवनदास झवेरी यांनी याची सुरुवात केली होती. म्हणूनच त्याला झवेरी बाजार म्हणून ओळखले जाते.

झवेरी बाजार देशाच्या जवळजवळ प्रत्येक कानाकोपऱ्यात सोन्याचे दागिने पुरवतो. येथे बनवलेले दागिने चांगल्या दर्जाचे आणि उत्तम डिझाइनचे असतात. येथे हिऱ्यांचाही व्यापार केला जातो.

सहसा झवेरी बाजारात मोठ्या प्रमाणात वस्तू खरेदी केल्या जातात. अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणात खरेदीमुळे किंमत देखील कमी होते, परंतु किरकोळ खरेदीसाठी अशी कोणतीही सवलत नसते. ती बाजारभावांवर आधारित असते.

केरळच्या त्रिशूरला देशाची 'सोन्याची राजधानी' का म्हटले जाते कारण हे शहर सोन्याच्या व्यापार आणि दागिन्यांच्या निर्मितीसाठी एक महत्त्वाचे केंद्र आहे.त्रिशूरमध्ये अनेक कारखाने आणि कारागीर आहेत, जे मोठ्या प्रमाणात सोन्याचे दागिने बनवतात. दक्षिण भारतातील सोन्याच्या व्यापाराचे हे एक प्रमुख केंद्र आहे.याशिवाय, भारतातील इतर महत्त्वाच्या सोन्याच्या बाजारपेठांमध्ये महाराष्ट्रातील जळगाव, मध्य प्रदेशातील रतलाम आणि दिल्लीतील सराफा बाजार यांचा समावेश आहे.

GST कपाती नंतर मध्यमवर्गींना आणखी एक भेट मिळणार? ऑक्टोबरमध्ये RBI घेणार मोठा निर्णय

भारतीय रिझर्व्ह बँक पुढील महिन्यात आणखी एक गुड न्यूज देण्याची शक्यता आहे. भारतीय रिझर्व्ह बँक पुढील महिन्यात, ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या पतधोरण समितीच्या बैठकीत रेपो दरात कपात करू शकते. जर असे झाले तर तुमच्या गृहकर्जाचा हप्ता कमी होऊन तुमची मोठी बचत होईल.

प्रसिद्ध वित्तीय संस्था मॉर्गन स्टॅनलीच्या एका अहवालानुसार, आरबीआय ऑक्टोबरमध्ये रेपो दरात ०.२५ टक्के कपात करण्याची शक्यता आहे. या वर्षात आरबीआयने आतापर्यंतच्या प्रत्येक बैठकीत रेपो दरात कपात केली आहे. रेपो दरातील कपातीचा थेट फायदा फ्लोटिंग रेटवर कर्ज घेतलेल्या कर्जदारांना होतो.

उदा. गृहकर्जाचा कालावधी २० वर्षे आणि सध्याचा सर्वात कमी व्याजदर ७.३५ टक्के मानला आहे. जर यात ०.२५ टक्क्यांची कपात झाली, तर व्याजदर ७.१० टक्के होईल.

३० लाख कर्ज: मासिक बचत ४५४ रुपये
५० लाख कर्ज: मासिक बचत ७५६ रुपये
७५ लाख कर्ज: मासिक बचत १,१३५ रुपये

जर आरबीआयने रेपो दरात कपात केली, तर फ्लोटिंग रेटवर गृहकर्ज घेतलेल्या लोकांच्या मासिक हप्त्यांमध्ये तात्काळ घट होईल. याचा फायदा थेट त्यांच्या खिशातून होणाऱ्या खर्चावर होईल, ज्यामुळे एक मोठा दिलासा मिळेल.

कु. पायलकौर जाधव

जगावर येणार महायुद्धापेक्षाही भयंकर संकट

भारतावर लावलेल्या टॅरिफनंतर भारत आणि अमेरिकेच्या संबंधांमध्ये कटुता निर्माण झाली आहे, तर दुसरीकडे चीन आणि रशियासोबत भारताची जवळीक वाढत आहे, मात्र आता चीनने

 ISBN NO. 978-81-990957-8-6

केलेल्या नव्या दाव्यामुळे जगभरात खळबळ उडाली आहे.

चीनकडून एआयबद्दल मोठा दावा करण्यात आला आहे. जगभरातील सैन्यदल आपल्या कारवाया अधिक गतीनं आणि अचूक व्हाव्यात यासाठी आपल्या शस्त्रांमध्ये आणि ऑपरेशन्समध्ये एआयचा वापर करत आहेत. याचं ताजं उदाहारण म्हणजे जूनमध्ये इराण आणि इस्त्रायलमध्ये भीषण युद्ध झालं, या युद्धामध्ये इस्त्रायलकडून इराणवर हल्ला करण्यासाठी एआयचा वापर करण्यात आला होता. मात्र आया एआयबद्दल चीनने जो इशारा दिला आहे, त्यामुळे संपूर्ण जगाचा थरकाप उडाला आहे.

एआय दहशतवाद्यांना अशी शस्त्र बनवण्यासाठी मदत करू शकते, ज्यामुळे संपूर्ण जगाचा विनाश होऊ शकतो असं चीनने म्हटलं आहे. दहशतवादी भविष्यात एआयच्या (AI) मदतीनं न्यूक्लिअर मिसाईल देखील तयार करू शकतात, असंही चीनने म्हटलं आहे. त्यामुळे एआय भविष्यात मानवासाठी धोक्याची घंटा ठरू शकते असा दावा सोमवारी चीनच्या एआय सेफ्टी आणि सायबर सिक्योरिटी अधिकाऱ्यांनी केला आहे, मिसाईल आणि इतर शस्त्रा-आस्त्रांमध्ये होणारा एआयचा वापर, या संदर्भातील ज्ञान सुरक्षित न राहाता जर दहशतवाद्यांच्या हाती लागलं तर मोठा अनर्थ होऊ शकतो. त्यामुळे न्यूक्लिअर, बायोलॉजिकल, केमिकल आणि मिसाईल यांच्यावरील कंट्रोल आपण हरवून बसू, संपूर्ण जगाला याचा मोठा धोका होऊ शकतो असं चीनने म्हटलं आहे.

संपूर्ण जग दहशतीच्या सावटाखाली

चीनने केलेल्या दाव्यानुसार एआय सारखं retrieval-augmented generation तंत्रज्ञान अर्थात इंटरनेटवर प्रचंड प्रमाणात माहितीचा डेटा गोळा करून, त्यातून तुम्ही सहज तुम्हाला हवी असेली माहिती मिळू शकता किंवा कृती करू शकता. या तंत्रज्ञानामुळे घातक शस्त्रांच्या थेअरीच्या मुळाशी जाणं दहशतवाद्यांना सहज शक्य होणार आहे, यावर संपूर्ण जगाला विचार करावा लागेल, असा चीनने म्हटलं आहे. याचा मोठा धोका जगाला निर्माण झाला आहे, असा दावा चीनकडून करण्यात आला आहे.

कु. पायलकौर जाधव

19/9/25

Sensex= 82,626.23

Nifty= 25,327.05

22K Gold Rates ₹ 10,205 / Gram

Silver Rate ₹ 133 / Gram

अदानी ग्रुपचे शेअर्स कोसळले तेव्हा गुंतवणूक केली, आता NRIने एक दिवसात कमावले १८४० कोटी

शेअर बाजारात एका बाजूला घसरण सुरू असली तरी अदानी ग्रुपच्या शेअर्समध्ये तेजी दिसून येतेय. यामुळे ग्रुपच्या बाजार भांडवलात ४६ हजार कोटींची वाढ झालीय. सेबीने हिंडनबर्ग रिसर्च प्रकरणी अदानी ग्रुपला क्लीन चिट दिलीय.

त्यानंतर अदानी ग्रुपच्या सर्वच शेअर्सच्या किंमतीत वाढ झाल्याचं दिसून आलंय. याचा सर्वाधिक फायदा एनआरआय गुंतवणूकदार राजीव जैन यांना झाला. त्यांची कंपनी GQG पार्टनर्सने अदानी ग्रुपच्या विविध कंपन्यामध्ये हजारो कोटींची गुंतवणूक केलीय.

अदानी एनर्जी सोल्युशन्स, अदानी एंटरप्रायजेस, अदानी पोर्ट्स, अदानी पावर आणि अदानी ग्रीन एनर्जी यात गुंतवणूक आहे. या शेअर्समध्ये आज ९ टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याने राजीव जैन यांच्या कंपनीला १ हजार ८४० कोटींचा फायदा झाला. अदानी ग्रुपच्या शेअर्समध्ये GQG पार्टनर्सची गुंतवणूक ४९ हजार १७२ कोटींवर पोहोचलीय. एक दिवस आधी ती ४७ हजार ३३३ कोटी रुपये इतकी होती.

जानेवारी २०२३ मध्ये अमेरिकेतील शॉर्ट सेलिंग फर्म हिंडनबर्ग रिसर्चने अदानी ग्रुपविरोधात एक रिपोर्ट जारी केला होता. यानंतर अदानी ग्रुपचे शेअर्स कोसळले होते. तेव्हा GQGने अदानी ग्रुपमध्ये गुंतवणूक केली होती. अदानी पावरमध्ये

 ISBN NO. 978-81-990957-8-6

त्यांनी 945.55 कोटी, अदानी एंटरप्रायजेसमध्ये ४१५.७२ कोटी, अदानी पोर्ट्समध्ये २०५ कोटी, अदानी एनर्जी सोल्युशन्समध्ये १४७ कोटी आणि अदानी ग्रीन एनर्जीमध्ये १२४ कोटी रुपये इतका नफा कमावला.

अदानी एंटरप्रायजेसचा शेअर दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास ३.८८ टक्क्यांसह २ हजार ४९५ रुपयांवर होता. दिवसअखेर तो ३८०१ रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केलीय. आयसीआयसीआय सिक्युरिटीजच्या मते अदानी विल्मरची किंमत ३६० रुपयांपर्यंत पोहोचू शकते. मोतीलाल ओसवाल यांनी अदानी पोर्ट्सची किंमत १७०० रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता व्यक्त केलीय.

कु. पायलकौर जाधव

20/9/25

सरकारी कर्मचाऱ्यांसाठी सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय! २०२६ पासून जुनी पेन्शन पुनर्संचयित होणार

भारतामध्ये सरकारी कर्मचाऱ्यांचे एक मोठे स्वप्न असते ते म्हणजे निवृत्तीनंतरचा जीवनमान आर्थिकदृष्ट्या सुरक्षित असावा. यासाठी जुन्या पेन्शन योजनेची (OPS) मागणी गेल्या काही वर्षांत अधिक तीव्र झाली आहे.

प्रत्येक सरकारी कर्मचाऱ्यांसाठी एक मुख्य चिंता म्हणजे निवृत्तीनंतर त्यांच्या उत्पन्नाचे काय होईल. पूर्वी जुनी पेन्शन योजना (OPS) ने ही चिंता कमी केली होती, परंतु ती बंद केल्याने कर्मचाऱ्यांमध्ये असुरक्षितता वाढली होती.

याच संदर्भात सुप्रीम कोर्टाने सरकारला जुनी पेन्शन प्रणाली पुन्हा लागू करण्याचे निर्देश दिले आहेत. म्हणूनच २०२६ मध्ये जुनी पेन्शन प्रणाली पुन्हा सुरू होण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारने 2026 पासून हळूहळू जुन्या पेन्शन योजनेची अंमलबजावणी करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे केवळ केंद्रीय कर्मचाऱ्यांना तर दिलासा मिळालाच, परंतु त्यांच्या कुटुंबियांनाही मोठा फायदा होईल. पेन्शन योजना त्यांच्या भविष्यकालीन गरजा पूर्ण करण्यास मदत करेल. सरकारचा हा निर्णय सरकारी कर्मचाऱ्यांसाठी एक आश्वासनात्मक पाऊल आहे.

जुनी पेन्शन योजना विशेष का आहे?

दरम्यान, जुनी पेन्शन प्रणाली बरीच चांगली होती. निवृत्तीनंतर पेन्शनची व्यवस्था होती. कुटुंबाची आर्थिक सुरक्षा मजबूत करण्यासाठी ही रक्कम तुम्हाला देण्यात आली होती. यामुळे तुम्ही तुमच्या वृद्धापकाळात दुसऱ्यावर अवलंबून राहण्यापासून रोखू शकाल. शिवाय, जुन्या पेन्शन प्रणाली अंतर्गत, निवृत्तीवेतनधारकांना आयुष्यभर एक निश्चित उत्पन्न मिळत असे, ज्यामुळे त्यांना मानसिक शांती मिळत असे. नवीन पेन्शन योजना (एनपीएस) लागू झाल्यानंतर, कर्मचाऱ्यांचा त्यांच्या पेन्शनवरील विश्वास उडाला. यामुळे ओपीएस पुनर्संचयित करण्याची मागणी वाढत गेली.

सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

कर्मचाऱ्यांच्या याचिकेवर सुनावणी करताना, सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की पेन्शन हा केवळ एक विशेषाधिकार नाही तर कर्मचाऱ्यांचा हक्क आहे. हा त्यांच्या भविष्याच्या सुरक्षेशी संबंधित विषय आहे." कर्मचाऱ्यांच्या भविष्यातील सुरक्षेची खात्री करण्यासाठी जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिले.

प्रमुख सरकारी घोषणा – २०२६ पासून ओपीएस लागू होणार

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर, केंद्र सरकारने असेही जाहीर केले आहे की, २०२६ मध्ये देशात जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू केली जाईल. सर्व केंद्रीय कर्मचाऱ्यांना याचा फायदा होईल. आवश्यक प्रक्रिया आणि विशिष्ट मार्गदर्शक तत्त्वे लवकरच जारी केली जातील.

कर्मचाऱ्यांमध्ये आणि कुटुंबांमध्ये आनंदाची लाट

ही माहिती मिळताच कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. आता, निवृत्तीनंतर उत्पन्नाची चिंता राहणार नाही. कुटुंबांना आर्थिक सुरक्षितता मिळेल. दीर्घकाळ चाललेले आंदोलन यशस्वी झाले आहे. यासाठी

 ISBN NO. 978-81-990957-8-6

अनेक कर्मचाऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानले आहेत. त्यांनी म्हटले आहे की, देशात अजूनही कायदा जिवंत आहे आणि न्यायालयाने चांगला निर्णय दिला आहे. आम्ही त्याचे कौतुक करतो आणि न्यायालयाचे आभार मानतो. सर्वोच्च न्यायालय आणि केंद्र सरकारचा हा निर्णय एक देशभरातील लाखो कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा. २०२६ पासून ओपीएस लागू झाल्यानंतर कर्मचाऱ्यांचे भविष्य सुरक्षित होईल आणि निवृत्तीनंतरही त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात बदल होईल.

कु. कार्तिका पगडाला
कु. गजानन राजरवाड

अनिल अंबानी यांना दणका; येस बँक कर्ज घोटाळा प्रकरणात CBI कडून चार्जशीट दाखल

CBI Files Charge sheet Against Anil Ambani: सुमारे 2.8 हजार कोटी रुपयांच्या बँक फसवणूक प्रकरणात केंद्रीय तपास यंत्रणांनी कायदेशीर पकड अधिक मजबूत केली आहे. सीबीआयने गुरुवारी मुंबईतील विशेष न्यायालयात अनिल अंबानी, येस बँकेचे सह-संस्थापक राणा कपूर, त्यांची पत्नी बिंदू कपूर आणि मुली राधा आणि रोशनी यांच्यासह अनेक कंपन्यांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले.

सीबीआयचा आरोप आहे की, क्रेडिट एजन्सीने इशारे देऊनही अनिल अंबानी समूहाच्या कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यात आली, ज्यामुळे येस बँकेचे नुकसान झाले. यापूर्वी, सीबीआयने येस बँकेच्या कर्ज फसवणूक प्रकरणात डीएचएफएलचे प्रवर्तक कपिल वाधवान आणि धीरज वाधवान यांच्यासह इतरांचीही चौकशी केली आहे. हे प्रकरण आता गुन्हेगारी कट (criminal conspiracy) आणि बँकिंग फसवणुकीच्या (bank fraud) आरोपांखाली न्यायालयात सुरू आहे.

केंद्रीय एजन्सींनी पकड घट्ट केली

सीबीआयने हे प्रकरण 2022 मध्ये नोंदवले होते. मुख्य आरोप असे आहेत की, क्रेडिट रेटिंग एजन्सीजने खराब आर्थिक स्थितीबद्दल आधीच इशारा दिला होता, तरीदेखील राणा कपूर यांच्या निर्देशावरुन यस बँकेने 2017 मध्ये अनिल धीरुभाई अंबानी (ADA) समूहाच्या RCFL (Reliance Commercial Finance Ltd.) आणि RHFL (Reliance Home Finance Ltd.) या कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली होती. ही गुंतवणूक नंतर बहु-स्तरीय व्यवहारांद्वारे (multi-layered transactions) इतरत्र वळवण्यात आली, ज्यामुळे बँकेला कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले.

सीबीआय प्रवक्त्याच्या माहितीनुसार, 2017 मध्ये, राणा कपूर यांच्या मंजुरीनंतर यस बँकेने RCFL च्या गैर-परिवर्तनीय डिबेंचर (NCDs) आणि कमर्शियल लोनमध्ये सुमारे 2,045 कोटी रुपये गुंतवले. त्याचप्रमाणे RHFL च्या NCDs आणि कमर्शियल पेपर्समध्ये जवळपास 2,965 कोटी रुपये गुंतवले गेले.

क्रेडिट एजन्सीजचा इशारा

त्या काळात CARE Ratings ने अनिल धीरुभाई अंबानी समूहाच्या कंपन्यांची आर्थिक स्थिती खालावत असल्याचे आणि प्रतिकूल बाजार परिस्थितीमुळे त्यांना "निगराणीमध्ये" ठेवल्याचे स्पष्ट केले होते. तरीही मोठी गुंतवणूक केली गेल्यामुळे हे संपूर्ण प्रकरण बँक फसवणूक आणि नियमभंगाचे झाले.

चार्जशीटमध्ये काय आहे?

मुंबईतील विशेष न्यायालयाने आरोपपत्र स्वीकारले आहे. अद्याप या प्रकरणातील कोणत्याही आरोपीकडून दोषमुक्तीची याचिका ऐकली गेलेली नाही. न्यायालयीन प्रक्रिया आता सुरुवातीच्या टप्प्यात आहे, ज्यात आरोपांचे पुरावे, कागदपत्रे तपासली जातील आणि आरोपी पक्ष आपली बाजू मांडेल. पुढील सुनावणीची तारीख अजून जाहीर झालेली नाही, पण लवकरच कोर्टात यावर पुढील

 ISBN NO. 978-81-990957-8-6

सुनावणी होणार असल्याची शक्यता आहे. लोन मंजुरी प्रक्रियेत आणि गुंतवणूक निर्णयांमध्ये जाणीवपूर्वक नियम मोडल्याचा आरोप आहे.

कु. कार्तिका पगडाला
कु. गजानन राजरवाड

21/9/25

टॅरिफनंतर H-1B व्हिसाच्या निर्णय

डोनाल्ड ट्रम्प हे मागील काही दिवसांपासून भारताबद्दल धक्कादायक अशी निर्णय घेताना दिसत आहेत. हेच नाही तर त्यांनी टॅरिफनंतर आता H-1B व्हिसाबद्दल अत्यंत हैराण करणारा असा निर्णय घेतला आहे.

त्यांनी H-1B व्हिसावर मोठे शुल्क आकारले आहे. अमेरिकेत अनेक भारतीय नागरिक नोकऱ्या करण्यासाठी जातात आणि ते सर्वजण याच H-1B व्हिसावर जातात. हेच नाही तर ज्या टेक कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना अमेरिकेत बोलावतात, ते देखील याच व्हिसावर जातात. आता हा व्हिसा मिळवणे पूर्वीसारखे सोप्पे नाहीये. आता नव्या नियमाप्रमाणे जर तुम्हाला या व्हिसा पाहिजे असेल तर तब्बल 88 लाख रूपये फीस ही भरावी लागणार आहे. या निर्णयामुळे अमेरिकेतील भारतीय व्यावसायिकही अडचणीत आले.

भारताला कोंडीत पकडण्यासाठी हा नवा डाव डोनाल्ड ट्रम्प यांनी टाकलाय. मात्र, डोनाल्ड ट्रम्प यांचा H-1B व्हिसाचा हा कट जास्त दिवस टिकू शकणार नाही आणि त्याची हवा लवकरच जाईल, असे तज्ज्ञांची स्पष्ट मत आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे टेक कंपन्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. कारण टेक कंपन्या या भारत आणि इतर देशातील कर्मचाऱ्यांना H-1B व्हिसातूनच अमेरिकेत नोकऱ्या देतात. अमेरिकेतील टेक कंपन्या H-1B व्हिसाच्या नव्या नियमाच्या विरोधात कोर्टात जाण्याची शक्यता आह.

तज्ज्ञांच्या मते, डोनाल्ड ट्रम्प यांचा H-1B व्हिसाची नवीन अट ही कोर्टात टीकणार नाही. तिथे या नव्या नियमाची हवा निघेल. कायदेशीर लढाई ट्रम्प यांच्या विरोधात लढण्याची तयारी अनेक कंपन्यांनी केली आहे. कारण ट्रम्प यांच्या या नवीन नियमामुळे मोठा फटका कर्मचाऱ्यांना बसण्याची दाट शक्यता आहे. फक्त हेच नाही तर त्यांना इतर देशातून चांगले कामगार अमेरिकेत आणण्यासाठी मोठा पैसा देखील मोजावा लागेल.

मुळात म्हणजे H-1B व्हिसा धारक अमेरिकेत सर्वाधिक भारतीय लोक आहेत. अमेरिकेतील आयटी कंपन्यांमध्ये भारतीय लोक मोठ्या संख्येने नोकऱ्या करतात. त्यांना सध्यातरी या नियमाचा सर्वाधिक फटका बसण्याची दाट शक्यता आहे. H-1B व्हिसाच्या माध्यमातून भारताविरोधात मोठा कट डोनाल्ड ट्रम्प यांनी रचला. त्यांना काहीही करून भारताला अडचणीत आणायचे असल्याचे स्पष्ट आहे.

टॅरिफ लावला तरी भारताने मारली मोठी मजल

ट्रम्प यांनी भारतासंदर्भात अडेलतट्टूची भूमिका घेतली असली तरी भारतासाठी मात्र एक मोठी खुशखबर आलेली आहे. ट्रम्प यांनी टॅरिफ लागू केलाला असला तरी भारताच्या गंगाजळीत परकीय चलनसाठा वाढला आहे. गेल्या काही दिवसांत भारताच्या जीडीपीत वाढ झाल आहे. तसेच भारताने जीएसटी या करप्रणालीत काही महत्त्वाचे बदल केल्यामुळे त्याचा अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होताना दिसत आहे. मिळालेल्या ताज्या माहितीनुसार आता भारताच्या तिजोरीत परकीय चलनसाठा वाढला आहे.

सलग तिसऱ्या आठवड्यात भारताच्या तिजोरीतील परकीय चलनसाठ्यात वाढ झाली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेल्या ताज्या आकडेवारीवरून हे स्पष्ट झाले आहे. आरबीआयच्या ताज्या आकडेवारीनुसार 12 सप्टेंबर रोजी तिसरा आठवडा संपला आहे. या आठवड्यात परकीय चलनसाठा 4.698 अब्ज डॉलर्सची लक्षणीय वाढ झाली आहे.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

आता भारताच्या तिजोरीत परकीय चलनसाठी तब्बल 702.996 अब्ज डॉलर्स झाला आहे. हा चलनसाठा 705 अब्ज डॉलर्स या सार्वकालिक उच्चांकाच्या अगदी जवळ आहे. त्यामुळे ट्रम्प यांनी लावलेल्या टॅरिफमुळे भारताला काही प्रमाणात फटका बसलेला असला तरी भारताची परकीय गंगाजळी वाढल्याचे पाहायला मिळत आहे.

भारताच्या गंगाजळीत परकीय चलनसाठ्यात इनेक घटकांचा समावेश होतो. या चलनसाठ्यातील फॉरेन करेन्सी असेट्समध्ये (FCA) सर्वाधिक वाढ झाली असून हा साठा 587.014 अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचला आहे.

भारताच्या गोल्ड रिझर्व्हमध्येही (सोन्याचा साठा) वाढ झाली आहे. ही वाढ 2.12 अब्ज डॉलर्स एवढी आहे. आता गोल्ड रिझर्व्ह 92.419 अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचले आहे.

कु. कार्तिका पगडाला

22/9/25

12 मोठ्या सरकारी बँकांचे 'महा'विलीनीकरण

भारतातील 12 मोठ्या सरकारी बँकांचे विलिनीकरण होणार आहे. जागतिक पातळीवर बँकिग क्षेत्रात स्पर्धा करण्यासाठी सरकाने हा निर्णय घेतला आहे.

देशात 27 पेक्षा जास्त सरकारी बँका होत्या. सरकारी बँकांची संख्या 12 इतकी झाली आहे. आता या 12 सरकारी बँकांचे विलीनीकरण केले जाणार आहे. या विलीनीकरणानंतर देशात फक्त 3 ते 4 बँका असतील. भारतातील या महाबलाढ्य बँका असतील.

स्टेट बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, बँक ऑफ बडोदा, कॅनरा बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, इंडियन बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, इंडियन ओव्हरसीज बँक, युसीआय बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, पंजाब अँड सिंध बँक या बारा बँकांचा यात समावेश आहे.

बँकांचे विलिनीकरण झाल्यानंतर खातेधारकांच्या ठेवींवर, मुदत ठेव, आवर्ती ठेवी आणि इतर गुंतवणुकीवर कुठलाही थेट परिणाम होणार नाही. मात्र, कागदपत्रं अद्ययावत करावी लागतील. बँकेचे नाव, IFSC कोड, ग्राहक क्रमांक आणि खाते क्रमांक बदलले जाऊ शकतात.

पूर्वीची विलिनीकरण उदाहरणे

1. न्यू बँक ऑफ इंडिया पंजाब नॅशनल बँकेत विलीन झाली.
2. स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र युसीआयमध्ये विलीन झाली.
3. स्टेट बँक ऑफ इंदौर स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये विलीन झाली.
4. स्टेट बँक ऑफ बिकानेर & जयपूर, स्टेट बँक ऑफ हैदराबाद, स्टेट बँक ऑफ म्हैसूर, स्टेट बँक ऑफ पतियाला, स्टेट बँक ऑफ त्रावणकोर आणि भारतीय महिला बँक एसबीआयमध्ये विलीन झाल्या.
5. विजया बँक आणि देना बँक बँक ऑफ बडोदा मध्ये विलीन झाल्या.
6. अलाहाबाद बँक इंडियन बँकेत विलीन झाली.
7. ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स आणि युनायटेड बँक पंजाब नॅशनल बँकेत विलीन झाल्या.
8. सांघ्रा बँक अँड कॉर्पोरेशन बँक युनियन बँक ऑफ इंडियात विलीन झाली.
9. सिंडिकेट बँक कॅनरा बँकेत विलीन झाली.

यामुळे भारतीय बँकिंग क्षेत्र अधिक मजबूत आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनेल.

कर्जाचे व्यवस्थापन

कर्जाचे व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे. ते कसे करावे हे जाणून घेऊया.

1. कर्जाची मर्यादा ठरवा:

आपण जे कर्ज घेतो, त्याचे हफ्ते म्हणजे EMI आपल्या महिन्याच्या कमाईच्या 50% पेक्षा जास्त नसावे. म्हणजे जर तुम्ही 10,000 रुपये कमवत

 ISBN NO. 978-81-990957-8-6

असाल, तर तुमच्या कर्जाचे हफ्ते 5,000 रुपयांपेक्षा जास्त नसावेत.

2. पुनर्वित्तपुरवठा (Refinancing) पर्याय:

जर तुम्हाला कर्जाचे हफ्ते भरायला जड जात असेल, तर पुनर्वित्तपुरवठा पर्याय वापरा. म्हणजे तर कर्जाचा हप्ता कमी करण्यासाठी मुदत वाढवून घेणे.

3. कमी व्याजदर निवडा:

कमी व्याजदरात कर्ज मिळत असेल, तर तुमचे कर्ज तिकडे ट्रांसफर करा. म्हणजे तुमचे हफ्ते कमी होतील.

4. बँकेंशी संपर्क साधा

कर्ज फेडायला त्रास होत असेल, तर तुमच्या बँकेला सांगा. बँक तुम्हाला मदत करू शकते. ते तुमचे हफ्ते काही दिवसांसाठी पुढे ढकलतील किंवा दुसरा काहीतरी उपाय देतील.

5. योग्य कर्ज आणि बँक निवडा:

वेगवेगळ्या कर्जाचे आणि बँकेचे व्याजदर वेगवेगळे असतात. उदाहरणार्थ, पर्सनल लोनचे व्याजदर बिजनेस लोन पेक्षा जास्त असतात. NBFC (Non-Banking Financial Company) पेक्षा बँक कमी व्याज घेतात. त्यामुळे विचारपूर्वक कर्ज घ्या आणि बँक निवडा.

6. अतिरिक्त खर्च टाळा:

कर्ज घेतल्यानंतर ते फेडण्यास प्राधान्य नक्की द्या. त्यासाठी अतिरिक्त खर्च टाळणे खूप गरजेचे आहे. जर ते केल्यास तुम्ही नियमित हफ्ते भरू शकता. शक्य असल्यास काही जास्त हफ्तेही भरू शकतात. ज्यामुळे तुमचे कर्ज लवकर फेडू शकाल.

कु. कार्तिका पगडाला

22/9/25

भारताच्या 28 राज्यांवर 'कर्जाचा बॉम्ब', 59.6 लाख कोटीचा धडकी भरवणारा आकडा, 10 वर्षात 'कुठे नेऊन ठेवलाय.'

कॅगचा नवा अहवाल प्रसिद्ध

राज्याच्या आर्थिक परिस्थितीचा लेखाजोखा

अंगावर काटा आणणारा आकडा

भारताच्या नियंत्रक आणि महालेखा परीक्षक (CAG) चा एक नवीन अहवाल प्रसिद्ध झाला आहे. हा अहवाल चिंताजनक आहे.

CAG च्या आकडेवारीवरून असे दिसून येते की गेल्या १० वर्षात सर्व २८ राज्यांचे एकूण कर्ज लक्षणीयरीत्या वाढले आहे. २०१३-१४ मध्ये हे कर्ज ₹१७.५७ लाख कोटी होते. २०२२-२३ मध्ये ते ₹५९.६० लाख कोटी झाले. CAG के. संजय मूर्ती यांनी राज्य वित्त सचिवांच्या परिषदेत हा अहवाल प्रसिद्ध केला.

या अहवालात राज्यांच्या आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण केले आहे. अहवालानुसार, २०२२-२३ च्या अखेरीस, २८ राज्यांवर एकूण ₹५९,६०,४२८ कोटी कर्ज होते. हे कर्ज त्यांच्या एकूण सकल राज्य देशांतर्गत उत्पादनाच्या (GSDP) २२.९६ टक्के आहे. पंजाबवर सर्वाधिक कर्ज आहे, तर ओडिशावर सर्वात कमी कर्ज आहे. अकरा राज्यांनी त्यांचे खर्च भागवण्यासाठी कर्ज घेतलेल्या निधीचा वापर केला.

CAG अहवालात काय आहे?

द इंडियन एक्सप्रेसने या CAG अहवालाचे विश्लेषण केले. कॅगच्या अहवालानुसार, २०२२-२३ च्या अखेरीस, सर्व २८ राज्यांवर एकूण ₹५९,६०,४२८ कोटी कर्ज होते. हे कर्ज त्यांच्या एकूण जीएसडीपीच्या २२.९६ टक्के आहे. जीएसडीपी म्हणजे दिलेल्या वर्षात राज्यात उत्पादित झालेल्या सर्व वस्तू आणि सेवांचे एकूण मूल्य. २०१३-१४ मध्ये, राज्यांचे एकूण कर्ज ₹१७,५७,६४२ कोटी होते, जे जीएसडीपीच्या १६.६६ टक्के आहे. अहवालात असे दिसून आले आहे की २०२२-२३ मध्ये हे कर्ज ३.३९ पट वाढले आणि जीएसडीपीच्या २२.९६ टक्के झाले.

सर्वाधिक कर्ज कोणत्या राज्यावर

अहवालानुसार, २०२२-२३ च्या अखेरीस पंजाबवर सर्वाधिक कर्ज होते, जे त्याच्या जीएसडीपीच्या ४०.३५ टक्के होते. त्यानंतर नागालँड (३७.१५ टक्के) आणि पश्चिम बंगाल

ISBN NO. 978-81-990957-8-6

(३३.७० टक्के) यांचा क्रमांक लागतो. ओडिशा (८.४५ टक्के), महाराष्ट्र (१४.६४ टक्के) आणि गुजरात (१६.३७ टक्के) या राज्यांवर सर्वात कमी कर्ज होते.

पंजाब 40.35%

नागालँड 37.15%

पश्चिम बंगाल 33.70%

अहवालात म्हटले आहे की ३१ मार्च २०२३ पर्यंत, आठ राज्यांवर त्यांच्या जीएसडीपीच्या ३० टक्क्यांपेक्षा जास्त कर्ज होते. सहा राज्यांवर त्यांच्या जीएसडीपीच्या २० टक्क्यांपेक्षा कमी कर्ज होते. उर्वरित १४ राज्यांवर त्यांच्या जीएसडीपीच्या २० ते ३० टक्क्यांदरम्यान कर्ज होते. २०२२-२३ मध्ये राज्यांचे एकूण कर्ज देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (GDP) २२.१७ टक्के होते. त्यावेळी देशाचा जीडीपी २,६८,९०,४७३ कोटी रुपये होता.

सर्वात कमी कर्ज असणारी राज्ये

ओडिशा 8.45%

महाराष्ट्र 14.64%

गुजरात 16.37%

राज्य कर्जामध्ये बाजार कर्जे, ट्रेझरी बिल, बाँड्स आणि स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) आणि इतर बँकांकडून घेतलेले कर्ज यासह विविध घटकांचा समावेश आहे. त्यात रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) आणि LIC आणि NABARD सारख्या वित्तीय संस्थांकडून घेतलेले कर्ज देखील समाविष्ट आहे. राज्यांचे एकूण कर्ज त्यांच्या महसुलाच्या १२८% (२०१४-१५) ते १९१% (२०२०-२१) पर्यंत होते. त्याच काळात, हे कर्ज त्यांच्या कर्जेतर उत्पन्नाच्या १२७% ते १९०% पर्यंत होते.

सणासुदीला नागरिकांना दिलासा! जीएसटी कपात जाहीर, २२ सप्टेंबरपासून 'इतका' कर आकारला जाणार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट रोजी आपल्या देशवासियांना दिवाळी भेट देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत दर कपातीची घोषणा केली.

दर कपातीमुळे सणासुदीच्या काळात अनेक जीवनावश्यक वस्तू स्वस्त होतील. हे दर २२ सप्टेंबरपासून लागू होणार असल्याने त्याचा परिणाम त्यानंतरच दिसून येईल.

सध्या अनेक कंपन्यांनी २२ तारखेपूर्वीच त्यांच्या किमती कमी केल्या आहेत. दिवाळी आणि धनतेरस पुढील महिन्यात आहेत. कुटुंबे सामान्यतः धनतेरसला झाडू आणि दिवाळीत सोनपापडी मिठाई खरेदी करतात. या बातमीत, येत्या काळात झाडू आणि सोनपापडीच्या किमती किती कमी होतील आणि त्यावर किती कर आकारला जाईल ते सांगूया.

झाडूंवर जीएसटी वेगवेगळ्या प्रकारे आकारला जातो, तो झाडूचा प्रकार आणि ब्रँडिंग यावर अवलंबून असतो. झाडूंवरील जीएसटी दर ते बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या साहित्यावर देखील अवलंबून असतो. **सामान्यतः**, नारळ किंवा बांबूसारख्या वनस्पतींपासून बनवलेल्या झाडूंना वेगळा जीएसटी दर मिळतो. प्लास्टिकपासून बनवलेल्या झाडूंचे वर्गीकरण वेगळ्या स्लॅबमध्ये केले जाते. वर नमूद केल्याप्रमाणे, झाडूंवरील कर त्यांच्या साहित्यावर अवलंबून असतो. झाडूंसाठी मुख्य HSN कोड 9603 आहे. पूर्वी, या कोडवर 12% GST दर होता, परंतु आता हा स्लॅब रद्द करण्यात आला आहे, त्यामुळे 22 सप्टेंबरपासून त्यावर 5% GST लागेल. याचा अर्थ असा की या सणासुदीच्या काळात, या श्रेणीतील झाडू गेल्या वर्षीपेक्षा स्वस्त असतील, कारण त्यांच्यावरचा कर कमी केला जाईल.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

शिवाय विशिष्ट साहित्यांच्या मिश्रणाने बनवलेल्या झाडूंवर पूर्वी दोन स्लॅबमध्ये कर आकारला जात होता, 12% आणि 18%. नवीन स्लॅबमध्ये, सरकारने या झाडूंना 5% स्लॅबमध्ये ठेवले आहे. 22 सप्टेंबरनंतर त्यांच्या किमती देखील कमी होतील. ५६ व्या जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत सरकारने १२% आणि २८% कर स्लॅब रद्द केले. परिणामी, ९९% जीवनावश्यक वस्तू आता ५% कर स्लॅब अंतर्गत कर आकारल्या जातात. अर्थमंत्र्यांनी मिठाईंना विशेष सूट देखील दिली.

भारतीय मिठाई, साखर मिठाई, जाम, जेली इत्यादींवर आता ५% जीएसटी दर लागू होईल. पूर्वी, यावर १८% कर आकारला जात होता. इतर लोकप्रिय भारतीय मिठाईंना देखील ५% कर स्लॅब अंतर्गत ठेवण्यात आले आहे. सोनपापडीबद्दल, त्याबाबत कोणतेही स्पष्ट निर्देश नाहीत. असे मानले जाते की २२ तारखेपासून त्यावरही ५% कर आकारला जाईल.

कु. निकिता गाजलवाड
कु. राधिका कोकुलवार

23/9/25

डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयानं आता अमेरिकेत नोकरी करणे महाग; भारतीयांना बसणार फटका

अमेरिकेत काम करणाऱ्या भारतीयांना अत्यंत अडचणीचा ठरणारा निर्णय अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतला आहे. भारतीयांकडून मोठी मागणी असलेल्या एच-१बी व्हिसासाठी दरवर्षी १ लाख डॉलर म्हणजे अंदाजे ८८ लाख रुपये इतके वार्षिक शुल्क आकारण्याचा निर्णय ट्रम्प यांनी घेतला आहे.

या जबरदस्त शुल्कवाढीचा तडाखा तब्बल ३ लाख भारतीयांना विशेषत: आयटी कंपन्यांतील कर्मचाऱ्यांना बसणार आहे. हा निर्णय अतिशय बेजबाबदार, दुर्दैवी असल्याची टीका अमेरिकी सिनेटच्या काही सदस्यांनी केली आहे.

एच-१बी व्हिसासाठी १ लाख ७६ हजार ते ५ लाख रुपयांपर्यंत शुल्क आजवर आकारले जात असे. हे व्हिसा तीन वर्षांसाठी वैध असून, पुढील तीन वर्षांसाठी त्यांचे नूतनीकरण करता येत असे. या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी 'काही विशिष्ट परप्रांतीय कामगारांच्या प्रवेशावर निर्बंध' या शीर्षकाच्या अधिसूचनेवर शुक्रवारी स्वाक्षरी केली. एच-१बी व्हिसाचा गैरवापर हा राष्ट्रीय सुरक्षेला धोका असल्याचे त्यांनी म्हटले. अनेक एच-१बी व्हिसाधारक सध्या काम किंवा सुट्टीमुळे अमेरिकेबाहेर गेले आहेत. त्यांनी २४ तासांच्या आत परतावे, असा सल्ला वकील मंडळींनी दिला आहे. अन्यथा, रविवारी २१ सप्टेंबर रोजी मध्यरात्री १२:०१ पासून लागू होणाऱ्या या आदेशामुळे त्यांना अमेरिकेत परत येण्यास मज्जाव केला जाऊ शकतो.

भारतीय आयटी कर्मचाऱ्यांना बसणार मोठा फटका

अमेरिकेच्या सिटिझनशिप अँड इमिग्रेशन सर्व्हिसेसनुसार (यूएससीआयएस) २०२५मध्ये टाटा कन्सल्टन्सी कंपनीच्या (टीसीएस) कर्मचाऱ्यांसाठी ५,५०५ एच-१बी व्हिसा मंजूर करण्यात आले. असे व्हिसा मंजूर केलेल्या कंपन्यांमध्ये टीसीएसचा दुसरा क्रमांक लागतो. या यादीत ॲमेझॉन ही कंपनी प्रथम क्रमांकावर असून, तिच्या कर्मचाऱ्यांसाठी १०,०४४, तसेच विप्रोला १,५२३, टेक महिंद्र अमेरिकाज या कंपनीला ९५१ एच-१बी व्हिसा मंजूर करण्यात आले आहेत.

काय सांगतो नवा नियम?

अमेरिकेबाहेर असलेल्या एच-१बी धारकासाठी जर अर्ज करण्यात आला, तर त्या अर्जावर निर्णय घेण्याआधी नियोक्त्याने १ लाख डॉलर शुल्क जमा करणे आवश्यक. हे शुल्क प्रामुख्याने अमेरिकेबाहेर असलेल्या आणि पुन्हा प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या व्यावसायिकांवर लागू होईल. हा नियम १२ महिन्यांसाठी लागू राहणार असून, पुढे वाढवायचा की नाही याचा निर्णय प्रशासन घेईल.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

पुढचा मार्ग काय?

टेक कंपन्या आता कॅनडा, युरोप, युएई यांसारख्या पर्यायांकडे लक्ष देत आहेत, जिथे स्थलांतर व कामाची प्रक्रिया तुलनेने सोपी आहे. नॅसकॉमने या विरोधात अमेरिकन प्रशासनाकडे निवेदन सादर करण्याची तयारी सुरू केली आहे. या निर्णयाला आव्हान दिले जाऊ शकते, कारण एवढा मोठा शुल्कभार काँग्रेसच्या मान्यतेशिवाय लादणे घटनात्मक दृष्ट्या अवैध ठरू शकते.

ट्रम्प यांच्या या निर्णयाच थेट फटका भारताल बसला आहे. कारण या व्हिसाच्या आधारे अमेरिकेत जाणारे सर्वाधिक लोक हे भारतीय आहेत. दरम्यान, भारताला या निर्णयाचा फटका बसणार असला तरी आता या निर्णयामुळे भारताचा एका प्रकारे फायदाच होणार आहे, असा दावा केला जातोय.

भारताचा फायदा नेमका कसा होणार?

मिळालेल्या माहितीनुसार अलिकडे अमेरिकेने जारी केलेल्या H-1B व्हिसांपैकी 71 टक्के व्हिसाधारक हे भारतीय आहेत. त्यामुळे या निर्णयाचा सर्वाधिक फटका हा भारतीयांना बसला आहे. अशा स्थितीत भारतावर या निर्णयाचे काही चांगले परिणामदेखील होण्याची शक्यता आहे. याबाबत निती आयोगाच माजी सीईओ अमिताभ कांत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. 'डोनाल्ड ट्रम्प यांनी H-1B व्हिसासाठी वाढवलेल्या या शुल्कामुळे अमेरिकेतील नवीन उपक्रमांना खीळ बसेल. तर भारतात या नवोन्मेषाला गती येईल. जगातील प्रतिभेसाठी अमेरिकेने दार बंद केले आहे. आता अमेरिकेतील पेटेन्ट, स्टार्टअप्स, प्रयोगशाळांची लाट बंगळुरू, पुणे, हैदराबाद या शहरात दिसायला लागेल,' असे अमिताभ कांत यांनी म्हटले आहे.

आता भारताकडे चांगली संधी

आता भारतातील डॉक्टर्स, इंजिनिअर, वैज्ञानिकांच्या प्रतिभेचा उपयोग करून घेण्याची चांगली संधी आहे, असेही त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे आता कदाचित अमेरिकेने घेतलेला हा निर्णय त्यांच्याच अंगलट येण्याची शक्यता आहे, असे मत व्यक्त केले जातेय. त्यामुळे आता भविष्यात नेमके काय होणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

GST रिफॉर्मची पंतप्रधान मोदींकडून घोषणा, म्हणाले, 'नागरिक देवो भव'

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने अनेक वस्तूंवरील जीएसटी दर कमी करण्याचा निर्णय घेतल्याने देशातील लोकांना मोठा फायदा होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही देशवासियांशी संबोधित करताना या नव्या जीएसटी दर प्रणालीची माहिती दिली आहे.

हा बचत उत्सव असून याचा सर्वांना मोठा फायदा होणार असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले. आता प्रत्येक राज्याला विकासाच्या शर्यतीत बरोबरीत स्थान मिळणार असल्याचेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

"नवरात्रीच्या पहिल्या दिवशी सूर्योदयासोबतच नेक्स्ट जनरेशन जीएसटी रिफॉर्म लागू होणार आहे. एक प्रकारे देशात जीएसटी बचत उत्सव सुरू होणार आहे. या उत्सवात तुमची बचत वाढणार आहे आणि तुम्ही तुमच्या आवडीच्या वस्तूंना आणखी सोप्या पद्धतीने खरेदी करू शकाल. आपल्या देशातील गरीब, मध्यमवर्गीय लोक, तरुणाई, शेतकरी, महिला, व्यापारी सर्वांना या बचत उत्सवाचा मोठा फायदा होणार आहे. सणांच्या काळात सगळयांचे तोंड गोड होणार आहे. देशातल्या प्रत्येक कुटुंबाचा आनंद वाढणार आहे. मी देशातल्या सर्व कुटुंबांना नेक्स्ट जनरेशन जीएसटी रिफॉर्मच्या खूप खूप शुभेच्छा देतो. हे रिफॉर्म भारताच्या विकासाला गती देणार आहेत. व्यापार आणखी सोपे होतील. प्रत्येक राज्याला विकासाच्या शर्यतीत बरोबरीत स्थान मिळणार आहे, असं पंतप्रधान मोदी म्हणाले.

देश आता डझनभर करांपासून मुक्त

"२०१४ मध्ये जेव्हा तुम्ही आम्हाला सेवा देण्याची संधी दिली, तेव्हा आम्ही सार्वजनिक हितासाठी आणि राष्ट्रीय हितासाठी जीएसटीला

 ISBN NO. 978-81-990957-8-6

आमचे प्राधान्य दिले. आम्ही प्रत्येक भागधारकाशी चर्चा केली, प्रत्येक राज्याच्या चिंता दूर केल्या आणि प्रत्येक प्रश्नाचे निराकरण केले. स्वतंत्र भारतातील प्रमुख कर सुधारणा सर्व राज्यांना सहभागी करून घेणे शक्य झाले. केंद्र आणि राज्य सरकारांच्या प्रयत्नांचेच हे फळ होते की देश आता डझनभर करांपासून मुक्त झाला आहे. एक राष्ट्र, एक करचे स्वप्न साकार झाले आहे," असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

९९ टक्के वस्तूंवर आता फक्त ५ टक्के कर

"जीएसटी कपातीमुळे, आता नागरिकांना त्यांची स्वप्ने पूर्ण करणे सोपे होईल. बहुतेक दैनंदिन वस्तू अधिक परवडणाऱ्या झाल्या आहेत. ९९ टक्के वस्तूंवर आता फक्त ५ टक्के कर आकारला जाईल. यामुळे मध्यमवर्गीयांचे जीवन बदलले आहे. गरिबांना आता दुहेरी फायदा होत आहे. देशभरात एकसमान करप्रणाली असेल. जीएसटी दर कमी केल्याने त्यांची स्वप्ने पूर्ण करणे सोपे होईल. सुधारणा ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. काळ आणि गरजा बदलतात. म्हणूनच, देशाच्या सध्याच्या आणि भविष्यातील गरजा पूर्ण करण्यासाठी नेक्स्ट जनरेशन जीएसटी सुधारणा लागू केल्या जात आहेत. हे बदल सर्वांना दिलासा आणि संधी देतील," असं आश्वासन पंतप्रधान मोदींनी दिलं.

गेल्या ११ वर्षांत २५ कोटी लोकांची गरिबीवर मात

"या निर्णयामुळे गरीब, नव-मध्यमवर्गीय आणि मध्यमवर्गीयांना दुहेरी फायदा होत आहे. जीएसटीमध्ये कपात केल्याने नागरिकांना त्यांची स्वप्ने पूर्ण करणे सोपे होईल. घरांपासून ते स्वप्नातील खरेदीपर्यंत सर्व गोष्टींवर खर्च कमी होईल. प्रवास आणि खरेदी स्वस्त होई, कारण बहुतेक हॉटेल खोल्यांवरही जीएसटी कमी करण्यात आला आहे. गेल्या ११ वर्षांत, जवळजवळ २५ कोटी लोकांनी गरिबीवर मात केली आहे आणि नवीन मध्यमवर्गाने देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठी भूमिका बजावली आहे. या वर्षी, सरकारने १२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावरील कर कमी केले, ज्यामुळे मध्यमवर्गाला मोठा दिलासा मिळाला. आता, जीएसटीमध्ये कपात केल्याने घरे, वाहने आणि प्रवासावरील खर्च कमी होईल, ज्यामुळे नागरिकांना त्यांची स्वप्ने पूर्ण करणे सोपे होईल," असंही पंतप्रधान मोदींनी म्हटलं.

नागरिक देवो भव

"जीएसटी सुधारणांबद्दल दुकानदार उत्साही आहेत याचा मला आनंद आहे. ते त्याचे फायदे ग्राहकांना देण्यासाठी काम करत आहेत. "नागरिक देवो भव" या मंत्राने आम्ही पुढे जात आहोत. पंतप्रधानांनी देशवासीयांना नेक्स्ट जनरेशन जीएसटी सुधारणांच्या अंमलबजावणीबद्दल माहिती दिली आणि सांगितले की हे पाऊल नागरिकांच्या जीवनात साधेपणा आणि बचत आणेल, असं पंतप्रधान म्हणाले.

अभिमानाने सांगा की मी स्वदेशी वस्तू खरेदी करतो

"ज्याप्रमाणे स्वदेशीच्या मंत्राने देशाच्या स्वातंत्र्याला बळकटी दिली, त्याचप्रमाणे स्वदेशी आज देशाच्या समृद्धीलाही बळकटी देईल. आज अनेक परदेशी वस्तू आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनल्या आहेत. आपल्या खिशातील कंगवा परदेशी आहे की भारतीय हे आपल्याला माहित नाही. आपण यापासून मुक्त होऊन फक्त अशाच वस्तू खरेदी केल्या पाहिजेत ज्या मेड इन इंडिया आहेत. प्रत्येक घर आणि प्रत्येक दुकान स्वदेशीचे प्रतीक बनले पाहिजे. अभिमानाने म्हणा - मी स्वदेशी खरेदी करतो. मी स्वदेशी वस्तू विकतो. जेव्हा हे होईल तेव्हा भारताचा वेगाने विकास होईल," असं पंतप्रधान मोदींनी म्हटलं.

कु. निकिता गाजलवाड

24/9/25

सिमेंट शेअर्समध्ये गुंतवणुकीची मोठी संधी! ब्रोकरेजने रेटिंग अपग्रेड केले; लक्ष्य किंमत 45 टक्क्यांनी वाढली

Cement Stocks to Buy Marathi News: जीएसटी दर कपात लागू होण्याच्या एक

 ISBN NO. 978-81-990957-8-6

आठवडा आधी सिमेंट स्टॉक्समध्ये हालचाल दिसून येत आहे. मंगळवारी (१६ सप्टेंबर) सुरुवातीच्या व्यवहारात जेके सिमेंट सारख्या कंपन्यांचे शेअर्स ३ टक्क्यांपर्यंत वाढले.

शेअर्समधील चढउताराच्या दरम्यान, ब्रोकरेज फर्म एचएसबीसीने सिमेंट क्षेत्राबद्दल सकारात्मक दृष्टिकोन दिला आहे. यासोबतच, ब्रोकरेजने त्यांच्या कव्हरेजमध्ये समाविष्ट असलेल्या पाच सिमेंट स्टॉक्सवरील लक्ष्य किंमत ४५ टक्क्यांपर्यंत वाढवली आहे. ब्रोकरेजने अंबुजा सिमेंट्स आणि श्री सिमेंट या दोन सिमेंट स्टॉक्सवरील रेटिंग देखील अपग्रेड केले आहे.

खरेदी करण्यासाठी टॉप ५ सिमेंट स्टॉक

अंबुजा सिमेंट्सची लक्ष्य किंमत ₹७०० ब्रोकरेज हाऊस एचएसबीसीने अंबुजा सिमेंट्सवरील त्यांचे रेटिंग 'होल्ड' वरून 'बाय' केले आहे. यासोबतच, स्टॉकवरील लक्ष्य किंमत देखील ४३ टक्क्यांनी वाढवून ७०० रुपये करण्यात आली आहे. पूर्वी ती ४९० रुपये होती. सोमवारी, अंबुजा सिमेंट्सचे शेअर्स ५६९ रुपयांवर बंद झाले. अशाप्रकारे, स्टॉक २३ टक्के वाढीव परतावा देऊ शकतो.

जागतिक अनिश्चितता असूनही ऑगस्टमध्ये निर्यात 6.7 टक्क्यांनी वाढली, व्यापार तूट घटली

श्री सिमेंटची लक्ष्य किंमत ₹३२,२००

ब्रोकरेजने श्री सिमेंटवरील त्यांचे रेटिंग 'रिड्यूस' वर अपग्रेड केले आहे. पूर्वी हे रेटिंग 'होल्ड' होते. ब्रोकरेजने स्टॉकवरील लक्ष्य किंमत 32,200 रुपये केली आहे, जी पूर्वी 22 हजार रुपये होती. अशा प्रकारे, स्टॉक सध्याच्या 29,272 रुपयांच्या किमतीवरून 10 टक्के परतावा देऊ शकतो.

दालमिया भारतची लक्ष्य किंमत ₹२,९००

याशिवाय, ब्रोकरेजने दालमिया भारतवर 'खरेदी' रेटिंग कायम ठेवले आहे. परंतु लक्ष्य किंमत ४५ टक्क्यांनी वाढवून २,९०० रुपये करण्यात आली आहे. पूर्वी ती २००० रुपये होती. सोमवारी कंपनीचे शेअर्स २४१३ रुपयांवर बंद झाले. अशाप्रकारे, शेअरमध्ये २० टक्क्यांहून अधिक वाढ दिसून येऊ शकते.

ACC लिमिटेड वरील लक्ष्य किंमत ₹२,०४०

ब्रोकरेजने ACC लिमिटेडवरील 'होल्ड' रेटिंग कायम ठेवले आहे. तथापि, त्यांनी स्टॉकची लक्ष्य किंमत पूर्वीच्या २,१०० रुपयांवरून २,०४० रुपयांपर्यंत कमी केली आहे. अशा प्रकारे, हा स्टॉक सध्याच्या १८६० रुपयांच्या किमतीपेक्षा सुमारे १० टक्के परतावा देऊ शकतो.

अल्ट्राटेक सिमेंटची लक्ष्य किंमत ₹१५,४१०

ब्रोकरेजने अल्ट्रा टेक सिमेंट स्टॉकवरील खरेदीची शिफारस कायम ठेवली आहे. देशातील सर्वात मोठ्या सिमेंटवरील लक्ष्य किंमत देखील वाढवून १५,४१० रुपये प्रति शेअर केली आहे. पूर्वी ती १२,१०० रुपये होती. अशाप्रकारे, हा स्टॉक सध्याच्या १२,४२९ रुपयांच्या किमतीवरून सुमारे २५ टक्के परतावा देऊ शकतो.

सिमेंट स्टॉकवर ब्रोकरेजचे मत

एचएसबीसीने आपल्या अहवालात लिहिले आहे की सिमेंट उद्योगात एकत्रीकरण वाढत आहे. आता टॉप चार कंपन्यांकडे एकूण बाजारपेठेचा ५७ टक्के वाटा आहे. या परिस्थितीमुळे या क्षेत्रातील लहान कंपन्यांवर दबाव येतो. त्यांच्यावर कर्जाचे प्रमाण जास्त आहे. ब्रोकरेजच्या मते, हे सर्व किंमतीसाठी सकारात्मक संकेत आहे. आता फक्त ५० रुपयांत होणार जेवणाची डिलिव्हरी! Swiggy ने लाँच केले नवीन ॲप Toing; काय आहेत वैशिष्ट्ये?

कु. निकिता गाजलवाड
कु. राधिका कोकुलवार

25/9/25

वेदांतच्या स्टॉकमध्ये येऊ शकते मोठी तेजी! ब्रोकरेजने दिले 'BUY' रेटिंग, जाणून घ्या

शुक्रवारी (१ ऑगस्ट) भारतीय शेअर बाजारात कमकुवतपणा दिसून आला. अमेरिकेचे

 ISBN NO. 978-81-990957-8-6

अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी टॅरिफ घोषणेनंतर, निवडक क्षेत्रांमध्ये विक्री झाली.

बाजारातील दबाव असूनही, खाण क्षेत्रातील दिग्गज वेदांताचे शेअर्स एक टक्क्यांहून अधिक वाढले.

वेदांताच्या शेअर्समध्ये ही कारवाई जून तिमाहीच्या निकालांनंतर झाली. जून तिमाहीत कंपनीचा नफा १२% (वर्ष-दर-वर्ष) घसरून ३,१८५ कोटी रुपयांवर आला. ब्रोकरेज हाऊसेसनी तिमाही निकालांनंतर चांगल्या दृष्टिकोनाच्या आधारे वेदांताला धातूचा स्टॉक खरेदी करण्याचा सल्ला दिला आहे.

PMI Data: मागणीत वाढ आणि उत्पादन क्षेत्रातील ताकदीमुळे जुलैमध्ये पीएमआय ५९.१ वर, जाणून घ्या

वेदांतावर मोतीलालची लक्ष्य किंमत ₹ ४८०

मोतीलाल ओसवाल यांनी वेदांत लिमिटेडवरील 'न्यूट्रल' रेटिंग कायम ठेवले आहे. ब्रोकरेजने या शेअरची लक्ष्य किंमत ४८० रुपये ठेवली आहे. त्यामुळे, या शेअरमध्ये १३% वाढ होऊ शकते. गुरुवारी बीएसईवर वेदांताचे शेअर्स ४२५ रुपयांवर बंद झाले.

ब्रोकरेजचे म्हणणे आहे की वेदांताची पहिल्या तिमाहीत (Q1FY26) कामगिरी जवळजवळ सर्व विभागांमध्ये अंदाजांनुसार होती. कंपनीच्या भांडवली खर्चाच्या योजना चांगल्या प्रकारे प्रगती करत आहेत. यामुळे भविष्यात खर्चात आणखी बचत होण्याची शक्यता आहे. आगामी उत्पादन क्षमतेद्वारे उच्च मूल्यवर्धित पॅकेजिंग (VAP) उत्पादने तयार करून मजबूत महसूल वाढ राखण्याचे व्यवस्थापनाचे उद्दिष्ट आहे.

ब्रोकरेजच्या मते, वेदांत त्याच्या डिलीव्हरेजिंग योजनांवर ठाम आहे. भविष्यात चांगला रोख प्रवाह कंपनीच्या विस्तार आणि कर्जमुक्ती योजनांना पाठिंबा देईल.

वेदांतावर नुवामा लक्ष्य किंमत ₹ ६०१

नुवामा इन्स्टिट्यूशनल इक्विटीजने वेदांताचे रेटिंग 'BUY' असे कायम ठेवले आहे.

ब्रोकरेजने मेटल स्टॉकवर 601 रुपयांची लक्ष्य किंमत दिली आहे. अशा प्रकारे, हा स्टॉक गुंतवणूकदारांना 14 टक्के पेक्षा जास्त परतावा देऊ शकतो.

नुवामाच्या मते, चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत वेदांताचा EBITDA तिमाही-दर-तिमाही मध्ये १०% पेक्षा जास्त वाढण्याची अपेक्षा आहे. हे ॲल्युमिनियमच्या उच्च किमती आणि खर्चात घट यामुळे आहे. त्याच वेळी, दुसऱ्या तिमाहीत मोठे ॲल्युमिनियम प्रकल्प देखील सुरू होण्याची अपेक्षा आहे. व्यवसायाचे विलय Q4FY26 पर्यंत पूर्ण होऊ शकते.

वेदांत स्टॉक इतिहास वेदांतचे शेअर्स ५२ आठवड्यांच्या उच्चांकावरून

जवळपास २०% खाली व्यवहार करत आहेत. या शेअरचा ५२ आठवड्यांचा उच्चांक ५२७ रुपये आहे आणि ५२ आठवड्यांचा नीचांक ३६२ रुपये आहे. एका महिन्यात या शेअरमध्ये ९% घट झाली आहे. तीन आणि सहा महिन्यांत या शेअरची कामगिरी जवळजवळ स्थिर राहिली आहे. एका वर्षात या शेअरमध्ये जवळपास ५% घट झाली आहे. तर दोन वर्षांत या शेअरने ५४% आणि तीन वर्षांत ६७% परतावा दिला आहे. कंपनीचे बीएसईवरील मार्केट कॅप १,६६,९९३ कोटी रुपये आहे.

पहिल्या तिमाहीचे निकाल कसे होते?

धातू आणि खाण व्यवसायात गुंतलेली कंपनी वेदांत लिमिटेडचा नफा चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत १३ टक्क्यांनी वाढून ५,००० कोटी रुपये झाला आहे. या तिमाहीत महसुलात वाढ झाल्यामुळे नफा वाढला आहे. मागील आर्थिक वर्षाच्या याच तिमाहीत कंपनीने ४,४३३ कोटी रुपयांचा निव्वळ नफा कमावला होता.

या तिमाहीत कंपनीचा महसूल गेल्या वर्षीच्या याच तिमाहीत ३५,२३९ कोटी रुपयांच्या तुलनेत वाढून ३७,४३४ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. पुनरावलोकनाधीन कालावधीत वेदांताचा खर्च गेल्या वर्षीच्या याच कालावधीत ३०,७७२

ISBN NO. 978-81-990957-8-6

कोटी रुपयांवरून वाढून ३२,७५६ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. वेदांताचे अध्यक्ष अनिल अग्रवाल म्हणाले की, पहिल्या तिमाहीतील ही कामगिरी येणाऱ्या काळासाठी एक मजबूत पाया रचते.

निफ्टी २४,६०० च्या खाली, सेन्सेक्स ५८६ अंकांनी घसरला; औषधनिर्माण क्षेत्राला सर्वाधिक फटका

कु. शिवानी यादव
कु. साक्षी ठाकूर

26/9/25

रशिया, चीननं जगाला अंधारात ठेवून आखला सर्वात खतरनाक प्लॅन, रिपोर्ट लिक

रशिया आणि चीनमध्ये चांगली मैत्री आहे, मात्र ही मैत्री आता केवळ शस्त्रांची आयात-निर्यात आणि कच्चा तेलाची खरेदी एवढ्यापुरतीच मर्यादीत राहिलेली नाहीये, लंडनच्या रॉयल यूनायटेड सर्व्हिसेस इंस्टीट्यूटचा एक 800 पानांचा रिपोर्ट लिक झाला आहे,

या रिपोर्टमध्ये खळबळजनक दावा करण्यात आला आहे. रशिया चीनला असं सैन्य,सामान आणि ट्रेनिंग देत आहे, ज्यामुळे वेळ येताच चीन तैवानवर हल्ला करू शकेल, असं या रिपोर्टमध्ये म्हटलं आहे.

या रिपोर्टनुसार रशियाने चीनला उच्च-उंचीवरील पॅराशूट प्रणाली, पाणी तसेच जमिनीवर देखील चालणारे रणगाडे, आर्मर्ड कार्मिक वाहणं आणि अँटी-टँक गन पुरवण्याची तयारी दाखवली आहे, ज्याची किंमत 210 मिलियन डॉलर्स पेक्षाही जास्त आहे. एवढंच नाही तर चीनने रशियाला असं देखील सांगितलं आहे की, रशिया चीनला जी वाहनं पुरवणार आहे, त्या सर्व वाहनांमध्ये दारूगोळा देखील असणं आवश्यक आहे. ही केवळ शस्त्रांची खरेदी नसून, तैवानवर हल्ल्याचा सुनियोजित कट असल्याचा आरोप या रिपोर्टमध्ये करण्यात आला आहे.

असा दावा देखील केला जात आहे की, रशिया आणि युक्रेनमध्ये युद्ध सुरू आहे. त्यामुळे रशियाला सध्या पैशांची खूप गरज आहे, रशिया आपली शस्त्रं चीनला विकून त्यातून फंड उभारत आहे, मात्र रशियाचा खरा उद्देश तो नसून, जर चीन आणि तैवानचं युद्ध सुरू झालं तर अमेरिकेचं लक्ष हे आशियाकडे लागेल आणि रशियाला युक्रेनच्या आघाडीवर मोकळीक मिळेल हा उद्देश त्या मागे आहे.

कु. शिवानी यादव
कु. साक्षी ठाकूर

27/9/25

10 दिवस, 3520000000 रुपये, 36 मशीन्स., ट्रकमध्ये भरावे लागल्या नोटा; भारतातील सर्वात मोठा आयकर विभागाचा छापा

देशातील सर्वात मोठा आयकर छापा ओडिशामध्ये टाकण्यात आला. बौद्ध डिस्टिलरिज प्रायव्हेट लिमिटेड या दारू उत्पादक कंपनीच्या अनेक विभागांवर छापे टाकण्यात आले. या छाप्याची तीव्रता यावरून अंदाज लावता येते की आयकर विभागाने जमिनीखाली गाडलेल्या मौल्यवान वस्तू शोधण्यासाठी छाप्यादरम्यान स्कॅनिंग व्हील मशीन बसवली. छापे टाकल्यानंतर, जप्त केलेले पैसे ट्रकमध्ये भरण्यात आले आणि कडक सुरक्षेत विभागाच्या कार्यालयात जमा करण्यात आले. १० दिवसांच्या प्रयत्नांनंतर, या छाप्यात ३५२ कोटी रुपये जप्त करण्यात आले.

या पूर्वी

१६ जुलै १९८१ रोजी ९० हून अधिक आयकर अधिकाऱ्यांनी एकाच वेळी कानपूरमधील प्रसिद्ध उद्योगपती, माजी पंजाब विधानसभेचे सदस्य आणि राज्यसभा खासदार सरदार इंदर सिंग यांच्या घरावर छापे टाकले. या अधिकाऱ्यांसोबत सुमारे २०० पोलीस अधिकारी होते. हा छापा तीन रात्री आणि दोन दिवस चालला. इंदर सिंग यांनी कानपूरचे महापौर म्हणूनही दोनदा काम केले होते.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

या छाप्यादरम्यान, मोठ्या प्रमाणात लपवून ठेवलेली मालमत्ता आणि रोख रक्कम सापडली, ज्यामुळे लोकांचे लक्ष वेधले गेले. कानपूरमधील तिलक नगर, लाजपत नगर आणि आर्य नगर येथील सरदार इंदर सिंग यांच्या जवळच्या सहकाऱ्यांच्या जागेवर आणि पंकी आणि फजलगंजमधील सिंग इंजिनिअरिंग वर्क्स प्रायव्हेट लिमिटेडच्या कारखान्यांवरही छापे टाकण्यात आले. या सर्व ठिकाणी सीलबंद करण्यात आले. कानपूर, मसूरी आणि दिल्लीतील लॉकर उघडण्यात आले. छाप्याच्या पहिल्या दिवशी कानपूरमध्ये ९.२ दशलक्ष रुपये रोख जप्त करण्यात आले. सोने, दागिने आणि मुदत ठेवी देखील सापडल्या. जेव्हा छापा दिल्लीत पोहोचला तेव्हा ७२,००० रुपये रोख आणि १.१ लाख रुपये मुदत ठेव पावत्या जप्त करण्यात आल्या, एकूण १.३ कोटी रुपये. पुढील दोन दिवसांत ३० लाख रुपयांच्या सोन्याच्या बार जप्त करण्यात आल्या. त्या सर्व मोजण्यासाठी स्थानिक रिझर्व्ह बँकेच्या शाखेत १८ तास लागले. हा छापा २०१८ च्या अजय देवगणच्या 'रेड' या चित्रपटात चित्रित करण्यात आला होता. या छाप्यातून जप्त केलेली रक्कम आज जरी लहान वाटत असली तरी, त्या काळात ती एक मोठी रक्कम होती, ज्यामुळे केवळ राजकीय वर्तुळातच नव्हे तर देशभरात खळबळ उडाली.

देशाचे फार्मा सेक्टर ट्रम्प टॅरिफने आजारी पडणार?

औषधांवर अमेरिकी राष्ट्रध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १०० टक्के आयात शुल्क लादण्याच्या निर्णय घेतला असला तरी त्याचे भारताच्या दृष्टीने परिणाम मर्यादित राहतील, असा विश्वास या क्षेत्रातील तज्ज्ञांनी शुक्रवारी व्यक्त केला.

ट्रम्प यांच्या निर्णयाचा भारतीय निर्यातीवर तात्काळ परिणाम होण्याची शक्यता नाही. कारण त्यांचा ताजा आदेश हा केवळ स्वामित्व हक्क (पेटंट) आणि नाममुद्रीत (ब्रँडेड) औषध उत्पादनांना लागू होईल. भारतीय कंपन्यांकडून निर्यात होत असलेल्या जेनेरिक औषधांवर आयात शुल्काचा कोणताही परिणाम होणार नाही, असे औषध उद्योगातील तज्ज्ञांनी शुक्रवारी सांगितले.

डॉ. रेड्डीज लॅबोरेटरीज, सन फार्मा, ल्युपिन आणि झायडस लाईफसायन्सेससह २३ आघाडीच्या भारतीय औषध कंपन्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या इंडियन फार्मास्युटिकल अलायन्सचे (आयपीए) सरचिटणीस सुदर्शन जैन यांनी नमूद केले की, ट्रम्प यांच्या नवीनतम कर आकारणीचा जेनेरिक औषध उत्पादकांवर कोणताही परिणाम होणार नाही. ट्रम्प यांनी अमेरिकेत औषधांची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांवर शुल्क लादणार नसल्याचे जाहीर केले आहे. भारतीय औषध निर्माण कंपन्या मोठ्या प्रमाणात अमेरिकी बाजारपेठेत जेनेरिक औषधांची निर्यात करतात.

भारत दीर्घकाळापासून परवडणाऱ्या, उच्च-गुणवत्तेच्या औषधांच्या जागतिक पुरवठा साखळीचा आधारस्तंभ आहे. अमेरिकेच्या औषधांच्या गरजांपैकी जवळजवळ ४७ टक्के पुरवठा भारतातून होतो, असे फार्मेक्सिलचे अध्यक्ष नमित जोशी म्हणाले. त्यांच्या मते, प्रस्तावित १०० टक्के शुल्काचा भारतीय निर्यातीवर तात्काळ परिणाम होण्याची शक्यता नाही, कारण मोठे योगदान सध्या जेनेरिकमध्ये आहे आणि बहुतेक मोठ्या भारतीय कंपन्या आधीच अमेरिकेत कार्यरत आहेत. उत्पादन किंवा पुन:पॅकेजिंग प्रकल्प आणि पुढील अधिग्रहणांसाठी कार्यरत आहेत, असेही ते म्हणाले.

भारताला मोठ्या प्रमाणात औषधे आणि एपीआयमध्ये आपला खर्च-कार्यक्षमतेचा पाया मजबूत करावा लागेल. अमेरिका इतर पुरवठादारांपेक्षा भारताला पसंती देण्याची शक्यता आहे आणि त्याचवेळी जटिल जेनेरिक, पेप्टाइड्स, बायोसिमिलर आणि सीएआर-टी थेरपीजसारख्या पुढील पिढीच्या संधींमध्ये गुंतवणूक करावी लागेल, असे जोशी म्हणाले.

दहापैकी चार औषधे भारतीय

भारतीय औषध कंपन्या अमेरिकी नागरिकांना मोठ्या प्रमाणात औषधांचा पुरवठा करतात. वर्ष २०२२ मध्ये अमेरिकेतील प्रिस्क्रिप्शनपैकी दहा पैकी चार औषधे ही भारतीय कंपन्यांकडून निर्मित होती. एकूणच, या औषधांमुळे २०२२ मध्ये अमेरिकी आरोग्यव्यवस्थेची २१९ अब्ज अमेरिकी डॉलरची बचत झाली आणि २०१३

 ISBN NO. 978-81-990957-8-6

ते २०२२ दरम्यान एकूण १.३० लाख कोटी अमेरिकी डॉलरची बचत झाली आहे. भारतीय कंपन्यांच्या जेनेरिक ओषधांमुळे पुढील पाच वर्षांत आणखी १.३० लाख कोटी अमेरिकी डॉलरची बचत अपेक्षित आहे.

कोण अडचणीत?

अमेरिकेत नसलेल्या ब्रँडेड फॉर्म्युलेशन / इनोव्हेटर औषध कंपन्यांशी संपर्क असलेल्या काही भारतीय औषध कंपन्या, ज्या एपीआय किंवा इंटरमीडिएट्सची विक्री करून किंवा कंत्राटी उत्पादन करून अमेरिकेत निर्यात करतात, त्यांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. भारतातील औषध उद्योगाच्या भविष्यातील विकासासाठी देखील हे त्रासदायक ठरेल. आपल्या उद्योगांना मोठ्या बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळावा यासाठी अमेरिका आणि युरोपीय महासंघाशी व्यापार करार करण्यासाठी आपण प्रयत्न दुप्पट केले पाहिजेत, असे फाउंडेशन फॉर इकॉनॉमिक डेव्हलपमेंटचे संस्थापक आणि संचालक राहुल अहलुवालिया म्हणाले.

कु. शिवानी यादव
कु. साक्षी ठाकूर

28/9/25

DMart मध्ये कोणत्या वस्तूंवर किती GST लागतो?

आता दैनंदिन जीवनातील अनेक वस्तू स्वस्त झाल्या आहेत. पण तुम्ही डीमार्ट, बिग बाजार किंवा इतर कुठे खरेदीसाठी गेला, तर बिल तपासले का? तुम्हाला किती कर लागला, ते नक्की पाहिले का? डीमार्टमध्ये जाण्यापूर्वी ही बातमी वाचा आणि खरेदी झाल्यावर बिल नक्की तपासा.

आधी १२ टक्के जीएसटी असलेल्या वस्तूंवर आता फक्त ५ टक्के कर लागणार आहे. याची अधिकृत यादी डीमार्ट स्टोअरमध्ये लावण्यात आली आहे.

यामध्ये दूध (condensed milk), लोणी, तूप, चीज, पॅकेज्ड नमकीन, भुजिया, मिश्रण, ड्रायफ्रूट्स, सॉस, लोणचं, पॅकेज्ड फळांचे ज्यूस, पास्ता, स्पॅगेटी, इंस्टंट नूडल्स, फळांच्या जेली, जॅम्स आणि मार्मलेड्स यांचा समावेश आहे.

याशिवाय छत्र्या, इलेक्ट्रॉनिक नसलेली खेळणी, रबर बँड्स, टेक्सटाईल डोअरमॅट्स, स्टील भांडी, ॲल्युमिनियम व स्टील वस्तू, नॉन-स्टिक फ्रायपॅन, कुकर, कपड्यांचे स्टँड, गालिचे, रनर, आसने आणि टेक्सटाईल कॅप्स-हॅट्स यांनाही याचा फायदा होईल

एवढंच नाही, तर पादत्राणं, बेडशीट्स, रजई, सोफा कव्हर्स आणि कम्फर्टर्स ज्यांची किंमत २५०० रुपयांखाली आहे, त्यांच्यावरही हा कमी झालेला जीएसटी लागू होणार आहे. यामुळे या वस्तूंच्या किमती साधारणपणे ६ टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकतात.

याचबरोबर आधी १८ टक्के जीएसटी लागणाऱ्या अनेक वस्तूंवर आता थेट ५ टक्के जीएसटी लागू झाला आहे. यात चॉकलेट्स, आईस्क्रीम, इंस्टंट कॉफी, बिस्किट्स, कुकीज, साखरेपासून तयार होणाऱ्या कँडीज, बुर्गर व्हीट, प्लँट-बेस्ड मिल्क ड्रिंक्स, कोको पावडर, कोको बटर, कॉर्न फ्लेक्स, पॅकेज्ड सूप्स, हेल्थ ड्रिंक्स आणि पाणी बॉटल यांचा समावेश आहे.

याशिवाय केसांचे तेल, शॅम्पू, साबण, शेव्हिंग क्रीम, शेव्हिंग लोशन, आफ्टरशेव्ह लोशन, फेस पावडर, टॅलकम पावडर, टूथपेस्ट, टूथब्रश आणि डेंटल फ्लॉस यांच्याही किंमतीत घट होणार आहे. या वस्तूंवर ग्राहकांना जवळजवळ ११ टक्क्यांपर्यंत बचत मिळू शकते.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

पत्नीच्या नावे Post Office मध्ये ₹१,००,००० ची FD केली तर २४ महिन्यांनंतर किती रुपये मिळतील?

भारतीय रिझर्व्ह बँकेनं (RBI) यावर्षी रेपो रेटमध्ये १ टक्क्यांची कपात केली आहे. त्यामुळे देशभरातील बँकांनी त्यांच्या एफडीच्या (FD) व्याजदरात कपात केली आहे. पोस्ट ऑफिस अजूनही आपल्या ग्राहकांना एफडीवर (FD) पूर्वीप्रमाणेच भरघोस व्याज देत आहे. रेपो रेटमध्ये कपात केल्याचा परिणाम पोस्ट ऑफिसच्या एफडी (FD) योजनेच्या व्याजदरांवर अद्याप झालेला नाही.

पोस्ट ऑफिसमधील मुदत ठेवी (FD) टीडी (टाइम डिपॉझिट) म्हणून ओळखल्या जातात. पोस्ट ऑफिसची टीडी योजना बँक एफडी सारखीच असते. बँक एफडी प्रमाणे, टीडी विशिष्ट कालावधीत हमी निश्चित परतावा देतात.

पोस्ट ऑफिस १ वर्षाच्या टीडीवर ६.९ टक्के, २ वर्षांच्या टीडीवर ७.० टक्के, ३ वर्षांच्या टीडीवर ७.१ टक्के आणि ५ वर्षांच्या टीडीवर ७.५ टक्के असा बंपर व्याजदर देते. पोस्ट ऑफिस टीडी खात्यात किमान डिपॉझिट रक्कम ₹१,००० आहे, ज्याची कमाल मर्यादा नाही.

पोस्ट ऑफिस सर्व ग्राहकांना सारखाच रिटर्न देते. महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक अशा सर्व प्रकारच्या ग्राहकांना पोस्ट ऑफिसच्या टीडी (TD) स्कीमवर समान व्याज मिळतं. जर तुम्ही पोस्ट ऑफिसमध्ये २४ महिने म्हणजेच २ वर्षांच्या टीडीमध्ये तुमच्या पत्नीच्या नावाने १,००,००० रुपये जमा केले, तर मॅच्युरिटीवर (मुदतपूर्तीवर) तुमच्या पत्नीच्या खात्यात एकूण १,१४,८८८ रुपये जमा होतील. म्हणजे यात १४,८८८ रुपये व्याज समाविष्ट आहे. पोस्ट ऑफिसच्या टीडी स्कीमवर देखील ग्राहकांना गॅरंटीसह एक निश्चित व्याज मिळतं, ज्यात कोणत्याही प्रकारचा चढ-उतार होत नाही आणि तुमच्या गुंतवणूकीला कोणताही धोका नसतो.

कु. शिवानी यादव
कु. साक्षी ठाकूर

29/9/25

कॅन्सरच्या प्रमाणात जगभरात घट, मात्र भारतात वाढ

जगभरात कर्करोगाच्या रुग्णांची आणि मृत्यूची संख्या कमी होत असली तरी भारतात मात्र ही संख्या वाढत आहे, असे 'द लॅन्सेट'ने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अभ्यासात म्हटले आहे.

भारतातील ७० टक्के कर्करोगाच्या प्रकरणांसाठी आपल्या दैनंदिन जीवनातील काही घटक कारणीभूत असल्याचेही या अभ्यासात सांगण्यात आले आहे.

नवीन अभ्यासातील आकडेवारीनुसार, भारतातील कॅन्सरचा प्रसार १९९० मध्ये प्रति एक लाख लोकसंख्येमागे ८४.८ इतका होता. तो २०२३ मध्ये १०७.२ वर पोहोचला आहे. त्याचप्रमाणे, कर्करोगाचा मृत्युदर १९९० मध्ये प्रति एक लाख लोकसंख्येमागे ७१.७ होता, जो २०२३ मध्ये प्रति एक लाख लोकसंख्येमागे ८६.९ झाला आहे, म्हणजेच सुमारे १२.१ लाख लोकांचा मृत्यू झाला आहे. तज्ज्ञांचे असे म्हणणे आहे की, भारतासह निम्न-मध्यम उत्पन्न असलेल्या देशांना (Lower-middle income countries) कर्करोगाच्या वाढत्या समस्येला तोंड देण्यासाठी आपल्या आरोग्य प्रणाली अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. जागतिक बँक आणि इतर संस्थांच्या वर्गीकरणानुसार देशांची ही श्रेणी ठरते.

ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज' (Global Burden of Disease) च्या अंदाजानुसार, केवळ संख्येच्या दृष्टीने विचार केल्यास कर्करोगाचे प्रमाण वाढतच जाईल आणि २०५० पर्यंत ३०.५ दशलक्ष लोकांना याचा फटका बसेल आणि १८.६ दशलक्ष लोकांचा मृत्यू होईल. या तुलनेत, आकडेवारीनुसार २०२३ मध्ये कर्करोगाचे अंदाजे १८.५ दशलक्ष

 ISBN NO. 978-81-990957-8-6

रुग्ण होते आणि १.०४ कोटी मृत्यूंची नोंद करण्यात आली होती.

जागतिक स्तरावारी आकडेवारी बघितल्यास १९९० मध्ये २२०.६ इतका असलेला कर्करोगाचा प्रसार २०२३ मध्ये २०५.१ वर आला. मृत्युदर तर १५०.७ वरून ११४.६ पर्यंत घसरला. २०२५ पर्यंत हे प्रमाण १९२.९ पर्यंत आणखी कमी होण्याची शक्यता आहे, तसेच मृत्युदरही १०७.९ पर्यंत कमी होण्याची शक्यता आहे, असे आकडेवारी दर्शवते. यावरून असे सूचित होते की, कर्करोगाच्या रुग्णांच्या आणि मृत्यूच्या संख्येत झालेली वाढ ही वृद्ध होत असलेल्या लोकसंख्येमुळे झाली आहे.

अभ्यासानुसार, यातील बहुतेक कर्करोगाचे रुग्ण आणि मृत्यू कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये होतील. अभ्यासात म्हटले आहे की, नवीन कर्करोगाच्या अर्ध्याहून अधिक रुग्णांची नोंद आणि कर्करोगामुळे दोन-तृतीयांश मृत्यू या देशांमध्ये होतील, त्यात भारताचाही समावेश आहे.

अंदाजानुसार, भारतात २०२४ मध्ये १५.६ लाख कर्करोगाचे रुग्ण आणि ८.७४ लाख मृत्यू नोंदवले गेले. जागतिक आरोग्य संघटनेच्या ग्लोबल कॅन्सर ऑब्झर्व्हेटरीच्या अंदाजानुसार, २०२२ मध्ये अंदाजित १४.१ लाख रुग्ण आणि ९.१६ लाख मृत्यूंची नोंद करण्यात आली होती. हे दोन्ही अभ्यास, तसेच सध्याचे 'ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज' चे अंदाज आयसीएमआर समन्वयित कर्करोग नोंदीच्या आकडेवारीवर अवलंबून आहेत.

कर्करोगास कारणीभूत ठरणारे घटक

या अभ्यासानुसार, कर्करोगामुळे होणारे सुमारे ४२ टक्के मृत्यू सुधारणा करण्यायोग्य धोक्याच्या घटकांमुळे झाल्याचे नोंदवण्यात आले आहे. यात तंबाखू, दारूचे सेवन, अयोग्य आहार, उच्च रक्तदाब आणि मधुमेहावर नियंत्रण नसणे या कारणांचा समावेश आहे. याचा अर्थ, वर्तनाच्या बदलातून कर्करोगाचे प्रमाण कमी केले जाऊ शकते आणि मृत्युदरही कमी होऊ शकतो. भारतासाठी ही संधी अधिक मोठी आहे. डॉ. शंकर म्हणतात की, भारतातील कर्करोगाच्या ७० टक्के प्रकरणांसाठी याच गोष्टी कारणीभूत असू शकतात.

तसेच उच्च प्रदूषण पातळी हा भारतीयांसाठी आणखी एक अतिरिक्त धोक्याचा घटक आहे," असे त्यांनी सांगितले. हवेची गुणवत्ता सुधारणे, संसर्ग टाळण्यासाठी स्वच्छता राखणे, एचपीव्ही आणि हिपॅटायटीस बीसाठी लसीकरण मोहीम राबवणे, या सर्वांमुळे देशातील कर्करोगाचा भार कमी करण्यास मदत होऊ शकते.

सेन्सेक्स'ची ८३ हजारांना गवसणी

अमेरिकेची मध्यवर्ती बँक असलेल्या 'फेडरल रिझर्व्ह'ने व्याजदरात २५ आधारबिंदूच्या (पाव टक्का) अपेक्षित कपातीनंतर, या वर्षी आणखी दोन व्याजदर कपातीची शक्यता दर्शविल्याचे जगभरात उमटलेल्या तेजीमय प्रतिबिंबाने भारताच्या बाजारालाही गुरुवारी मोहिनी घातली.

शेअर बाजारात सलग तिसऱ्या दिवशी तेजीची मालिका सुरू राहून, प्रमुख निर्देशांक 'सेन्सेक्स' ३२० अंशांनी वाढून ८३,००० च्या वर जाऊन स्थिरावला.

भारतीय प्रमाण वेळेनुसार बुधवारी मध्यरात्री, अमेरिकी 'फेड'ने २०२५ सालातील पहिल्या व्याजदर कपातीचा निर्णय जाहीर केला. या पाव टक्का कपातीतून तेथील व्याजदर ४ ते ४.२५ टक्क्यांच्या श्रेणीत खालावले आहेत. वाढत्या महागाई दर आणि थंडावलेली नवीन रोजगार निर्मिती पाहता, हे कपात चालू वर्षात आणखी दोनदा शक्य असल्याचे संकेत अध्यक्ष जेरॉम पॉवेल यांनी दिले. गेल्या वर्षी देखील सप्टेंबर ते डिसेंबर दरम्यान सलग कपातीनंतर फेडने जानेवारी २०२५ पासून कपात चक्र थांबविले होते.

गुरुवारी सकाळी याचे अपेक्षित स्वागत भारतीय बाजाराने केले. सकाळीच मोठ्या वाढीसह खुल्या झालेला बीएसई सेन्सेक्स, दिवसअखेर ३२०.२५ अंशांनी अर्थात ०.३९

ISBN NO. 978-81-990957-8-6

टक्क्यांची वाढ साधून ८३,०१३.९६ वर स्थिरावला. दिवसभरात त्याने ४४७.५ अंशांची कमाई करत ८३,१४१.२१ असा अडीच महिन्यांपूर्वी मागे सोडलेला उच्चांक दाखविला होता. दुसरीकडे एनएसई निफ्टी निर्देशांक ९३.३५ अंशांनी अर्थात ०.३७ टक्क्यांनी वाढून २५,४२३.६० वर बंद झाला.

त्याचप्रमाणे देशांतर्गत गुंतवणुकीचा दमदार प्रवाह, चलन स्थिरता आणि अनुकूल भू-राजकीय स्थिती ही बाजारासाठी नजीकच्या काळात सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करतील, असे मत जिओजित इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेडचे संशोधन प्रमुख विनोद नायर म्हणाले. बुधवारी या निर्णयाच्या अपेक्षेमुळे, सेन्सेक्स ३१३.०२ अंशांनी वाढून ८२,६९३.७१ वर स्थिरावला होता, तर निफ्टी ९१.१५ अंशांनी वाढून २५,३३०.२५ वर बंद झाला होता.

गेल्या काही सत्रांपासून सलग वाढीची मालिका इटर्नलच्या शेअरने कायम ठेवली. सेन्सेक्समधील, सन फार्मा, इन्फोसिस, एचडीएफसी बँक, एचसीएल टेक, हिंदुस्तान युनिलिव्हर, पॉवर ग्रिड, आयटीसी आणि अदानी पोर्ट्स हे अन्य प्रमुख शेअर वाढले. तर टाटा मोटर्स, ट्रेंट, बजाज फायनान्स आणि एशियन पेंट्स हे शेअर घसरणीच्या यादीत होते.

आशियाई बाजारपेठेत चीन वगळता, दक्षिण कोरियाचा कोस्पी आणि जपानचा निक्केई २२५ निर्देशांक १ टक्क्यांहून अधिक वधारला. मात्र शांघायचा एसएसई कम्पोझिट निर्देशांक आणि हाँगकाँगचा हँग सेंग १ टक्क्यांहून अधिक घसरणीसह बंद झाला. युरोपमधील बाजारपेठाही लक्षणीय वाढीसह खुल्या झाल्या, तर बुधवारी अमेरिकन बाजारपेठांमध्ये संमिश्र हालचाल दिसून आली.

कु. शिवानी यादव
कु. साक्षी ठाकूर

30/9/25

वर्षातील सर्वात मोठा IPO येणार; दिवाळीपूर्वी टाटा कॅपिटलचे शेअर्स खरेदी करण्याची सुवर्णसंधी

टाटा ग्रुपकडून गुंतवणूकदारांना या दिवाळीत मोठे गिफ्ट मिळणार आहे. समूहाची नॉन-बँकिंग फायनान्स कंपनी (NBFC) टाटा कॅपिटलचा आयपीओ (IPO) अखेर जाहीर झाला असून तो 6 ऑक्टोबर 2025 रोजी खुला होणार आहे.

कंपनीने 26 सप्टेंबर रोजी सेबी आणि शेअर बाजारांकडे आपला रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस दाखल केला आहे. एक्सचेंजच्या माहितीनुसार, या आयपीओच्या प्रत्येक शेअरची फेस व्हॅल्यू ₹10 ठेवण्यात आली असून यात 21 कोटी नवीन शेअर्सचा इश्यू आणि 26.58 कोटी शेअर्सचा OFS (Offer for Sale) समाविष्ट आहे.

दिवाळीपूर्वी गुंतवणुकीची संधी

कंपनीचा आयपीओ सोमवार, 6 ऑक्टोबरला ओपन होईल आणि बुधवार, 8 ऑक्टोबर 2025 ला बंद होईल. तर अँकर गुंतवणूकदारांसाठी गुंतवणुकीची तारीख 3 ऑक्टोबर 2025 निश्चित करण्यात आली आहे. हा आयपीओ टाटा ग्रुपच्या इतिहासातील सर्वात मोठा इश्यू ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे रिटेल आणि संस्थात्मक गुंतवणूकदारांसाठीही ही एक मोठी संधी मानली जात आहे.

किती मोठा असेल टाटा कॅपिटलचा IPO?

रिपोर्टनुसार, कंपनीच्या आयपीओचा एकूण आकार 1.85 अब्ज डॉलर्स (सुमारे ₹16,400 कोटी) इतका असेल. यामुळे कंपनीचे एकूण व्हॅल्यूएशन अंदाजे 16.5 अब्ज डॉलर्स इतके होईल. विमा क्षेत्रातील दिग्गज कंपनी एलआयसी (LIC) यात मोठी गुंतवणूक करू शकते, असेही संकेत

ISBN NO. 978-81-990957-8-6

आहेत. सध्या टाटा संन्सकडे टाटा कॅपिटलचा सर्वात जास्त हिस्सा आहे.

उर्वरित हिस्सेदारी आयएफसीसारख्या बाह्य गुंतवणूकदारांकडे आणि टाटा समूहातील इतर कंपन्यांकडे - जसे की TMF होल्डिंग्स, टाटा इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन, टाटा मोटर्स, टाटा केमिकल्स, टाटा पॉवर इत्यादी कंपन्यांकडे आहे. रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार, टाटा कॅपिटलसारख्या NBFC ला 30 सप्टेंबरपूर्वी शेअर बाजारात लिस्ट करणे बंधनकारक होते. मात्र, कंपनीला अलीकडेच सेबीकडून थोडी मुदतवाढ मिळाली.

अनेक महिन्यांपासून तयारी सुरू

टाटा कॅपिटलच्या आयपीओची तयारी अनेक महिन्यांपासून सुरू होती. मनीकंट्रोलच्या अहवालानुसार, 5 एप्रिलला कंपनीने ₹15,000 कोटींपेक्षा जास्त आयपीओसाठी सेबीकडे गोपनीय प्री-फायलिंग रूटद्वारे ड्राफ्ट दाखल केला होता. त्यापूर्वी 21 मार्चला आलेल्या अहवालात म्हटले होते की, या मेगा लिस्टिंगसाठी कंपनीने 10 गुंतवणूक बँका सल्लागार म्हणून नियुक्त केल्या आहेत.

त्यात कोटक महिंद्रा कॅपिटल, सिटी, ॲक्सिस कॅपिटल, जेपी मॉर्गन, एचएसबीसी सिक्युरिटीज, आयसीआयसीआय सिक्युरिटीज, आयआयएफएल कॅपिटल, बीएनपी पारिबा, एसबीआय कॅपिटल आणि एचडीएफसी बँक यांचा समावेश आहे. हेच सल्लागार या मोठ्या आयपीओच्या यशासाठी कंपनीसोबत काम करणार आहेत.

२६ सप्टेंबर २०२५ रोजी अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपयामध्ये सहा पैशांची वाढ नोंदवण्यात आली आणि याचबरोबर भारतीय रुपया अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ८८.७० च्या पातळीवर पोहोचला.

अंदमान समुद्रात असलेल्या श्री विजयपुरम २ मध्ये नैसर्गिक वायूचे साठे सापडले

पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी स्वतः अंदमान बेटांच्या पूर्व किनाऱ्यापासून सुमारे १७ किलोमीटर अंतरावर ३०० मीटर खोलवर असलेल्या या विहिरीत वायूचे साठे सापडल्याची घोषणा केली.

ऑइल इंडिया लिमिटेड (ओआयएल) ने ओपन एकरेज लायसन्सिंग पॉलिसी अंतर्गत खोदकाम करून नैसर्गिक वायूचे साठे शोधले. इंडियन ऑइल अंदमान समुद्रात १०,००० किलोमीटरपेक्षा जास्त क्षेत्रात तेल आणि वायूचा शोध घेत आहे. हे लक्षात घ्यावे की भारत त्याच्या नैसर्गिक वायूच्या गरजेपैकी अंदाजे ४७-५०% आयात करतो. २०२३ मध्ये, भारताने अंदाजे ३६.७ अब्ज घनमीटर एलएनजी आयात केले. म्हणूनच, शोधलेला हा नैसर्गिक वायूचा साठा भारतासाठी एक मोठे यश ठरू शकतो.

वायूच्या चाचणीत मिथेनची उपस्थिती दिसून आली. तपासणीत असे दिसून आले की या वायूमध्ये ८७% मिथेन आहे. अंदमान समुद्रात सापडलेल्या या नैसर्गिक वायू साठ्यामुळे भारताची ऊर्जा सुरक्षा वाढेल.

भारताचे आयात बिल कमी होईल. देश ऊर्जा स्रोतांमध्ये स्वयंपूर्ण होत आहे. यामुळे स्थानिक स्रोतांकडून ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यास आणि आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यास मदत होईल. या शोधामुळे केवळ देशांतर्गत ऊर्जा उत्पादन वाढेलच असे नाही तर ऊर्जा बाजारपेठेत भारताचे स्थान देखील मजबूत होईल. हा शोध केवळ आपल्या गरजा पूर्ण करू शकत नाही तर येणाऱ्या काळात एलएनजी निर्यातीचा मार्गही मोकळा करू शकतो.

यशोगाथा

मुंबईतील मराठी जोडप्याने 2011 मध्ये आपली मोठ्या पगाराची नोकरी सोडून इगतपुरी जवळील अवटा गावात स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. शहराच्या प्रदूषित वातावरणातून मुलांना दूर ठेवून शांत आणि नैसर्गिक जीवन जगण्याच्या

 ISBN NO. 978-81-990957-8-6

इच्छेने त्यांनी हे पाऊल उचलले.पंकज घाटगे आणि अमृता शिंदे या या जोडप्याने गावातील पारंपरिक शेतीत बदल घडवून आणले, काळ्या तांदळाची लागवड शिकवली आणि स्थानिक लोकांना पशुपालन, चीज, साबण व मध उत्पादनासारख्या व्यवसायांसाठी प्रोत्साहित करून त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवले.

मुंबईतील एका जाहिरात कंपनीत उत्तम नोकरी, निश्चित पगार आणि मालाडमधील पॉश परिसरात फ्लॅट असे त्यांचे जीवन होते. असे जीवन सोडून इगतपुरी जवळील डोंगरांमध्ये वसलेल्या एका छोट्या गावात जाण्याची कल्पना अनेकांना कठीण वाटू शकते. पण, डोंगरांमध्ये फार्म स्टे, मोठे घर, मोकळे आकाश, स्वच्छ हवा, सेंद्रिय भाज्या आणि शांततापूर्ण जीवन असे ऐकल्यावर ते आकर्षक वाटू शकते. 2009 मध्ये पंकज यांनी आपली नोकरी सोडून मुंबईपासून 160 किलोमीटर दूर कसारा घाटाजवळच्या अवटा गावात स्थलांतर केले. त्यांच्या पाठोपाठ दोन वर्षांनी त्यांची पत्नी अमृताही तिथे आल्या. आता हे पती-पत्नी या परिसराचे चित्र आणि नशीब बदलण्यात गुंतले आहेत.

पंकज त्यांच्या जाहिरात क्षेत्रातील कारकिर्दीत या परिसरात येत-जात असत. ते येथे वैद्यकीय शिबिरे आयोजित करत, तर कधी इतर उपक्रम करत. यामुळे जेव्हा ते येथे राहण्यासाठी आले, तेव्हा गावकऱ्यांचा विश्वास जिंकणे त्यांना कठीण गेले नाही. लोक सहजपणे त्यांच्यासोबत आले आणि त्यांनी आपले भविष्य त्यांच्या हाती सोपवले. हा डोंगराळ भाग आहे. येथे खूप पाऊस पडतो. पावसाळ्यात घराबाहेर पडणेही कठीण होते, पण पावसाळा संपल्यावर पाण्याची टंचाई सुरू होते. गावापासून फक्त दीड किलोमीटर अंतरावर वैतरणा नदी आहे. या नदीचे पाणी मुंबईकरांची तहान भागवते, पण नदीच्या काठी वसलेल्या गावात पिण्याच्या पाण्याची समस्या आहे.पंकज या समस्येवर काम करत आहेत.

पंकज सांगतात की, जेव्हा ते येथे आले, तेव्हापर्यंत लोक पारंपरिक शेतीच करत होते. त्यांनी येथील लोकांना काळ्या तांदळाची शेती शिकवली, त्यानंतर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. यापूर्वी बहुतेक शेतकरी एकतर जमीन विकून घर चालवत होते किंवा बाहेरगावी कामाला जात होते. गावातील तरुण शहरांमध्ये केटरिंगचे काम करतात, पण ते हंगामी असते आणि वर्षातून फक्त 2-3 महिनेच कमाई होते. अनेकदा माणसाला आपल्या क्षमतेचा अंदाज नसतो. अनेकदा लोकांना अशा व्यक्तीची गरज असते, जो त्यांचे नेतृत्व करू शकेल.

अवटा गावातील लोकांना पंकज यांच्या रूपात तोच सेनापती मिळाला आहे, ज्याच्या बळावर ते कोणताही किल्ला जिंकू शकतात. आज पंकज यांच्यासोबत फक्त अवटाच नाही, तर आसपासच्या गावातील डझनभर लोक जोडले गेले आहेत. हे लोक पशुपालन करतात, चीज बनवतात, साबण बनवतात, मध तयार करतात आणि त्यातून कमाई करतात. पंकज फक्त त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्याचे काम करतात.

मुंबईत राहत असताना पंकज-अमृता यांनी ठरवले होते की, जेव्हा ते आई-वडील होतील, तेव्हा मुलांना शहरात जन्म देणार नाहीत. याचे कारण होते दूषित हवा-पाणी. म्हणूनच, दोघांनी गाव निवडले आणि जवळपास पडीक जमीन खरेदी केली. आज येथे हिरवळ आहे. दोघांनी यूट्यूबवरून शेती शिकली आणि भाज्या पिकवल्या. आता हे एक चांगले फार्म स्टे बनले आहे. येथे दारू पूर्णपणे प्रतिबंधित आहे. पंकज यांचे म्हणणे आहे की, "जर लोक शहराच्या धावपळीच्या जीवनातून कंटाळून शांततेच्या शोधात येत असतील, तर आम्ही त्यांना तेच देण्याचा प्रयत्न करतो."

टॅरिफ वॉर'ला तोंड देण्यासाठी भारतासोबत इटली

टॅरिफ वॉर'ला तोंड देण्यासाठी भारताला आता आणखी एका मोठ्या देशाचा पाठिंबा मिळाला आहे. तो देश म्हणजे इटली होय.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

इटलीचे उपपंतप्रधान अँटोनियो तायानी यांनी नुकतीच भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांची भेट घेतली. या महत्त्वाच्या भेटीनंतर त्यांनी भारत आणि युरोपीय संघ यांच्यातील मुक्त व्यापार कराराला लवकरच अंतिम स्वरूप देण्यासाठी इटली पूर्णपणे कटिबद्ध असल्याचे सांगितले.

भारताला साथ

तायानी यांनी स्पष्टपणे म्हटले की, "इटली भारतासोबत 'टॅरिफ'मुक्त व्यापार करण्यास पूर्णपणे तयार आहे." त्यांनी पुढे असेही नमूद केले की, जर युरोपीय संघ या करारावर पुढे गेला, तर इटली नक्कीच यात भारताला सक्रियपणे साथ देईल. हा भारतासाठी एक सकारात्मक संकेत आहे. त्यानी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' वर या बैठकीला खूप महत्त्वाचे म्हटले. त्यांनी सांगितले की, ते स्वतः येत्या काही महिन्यांत भारताला भेट देणार आहेत. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, "न्यूयॉर्कमध्ये मी भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांच्यासोबत महत्त्वाच्या बैठका घेतल्या." इटली आणि भारत यांच्यात सध्या एक मजबूत धोरणात्मक, राजकीय आणि आर्थिक भागीदारी आहे. तायानी यांनी पुढे सांगितले की, "आम्ही येत्या काही महिन्यांत माझ्या भारत भेटीने ही भागीदारी आणखी मजबूत करू इच्छितो."

युरोपियन युनियन सर्वात मोठा भागीदार

तायानींनी सांगितले की, "मी मुक्त व्यापार कराराला लवकर अंतिम स्वरूप देण्यासाठी इटलीच्या पाठिंब्याला दुजोरा दिला आहे." युरोपीय संघ हा भारताचा दुसरा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. 2024 मध्ये, 120 अब्ज युरोच्या वस्तूंच्या व्यापारासह, भारताच्या एकूण निर्यातीत युरोपीय युनियनचा वाटा 11.5 टक्के होता. दुसरीकडे, भारत हा EU चा 9 वा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. 2024 मध्ये, युरोपीय संघाच्या एकूण वस्तूंच्या निर्यातीत भारताचे योगदान 2.4 टक्के होते.

देशाला मोठा फायद

युरोपसोबतच्या मुक्त व्यापार करारामुळे भारताला अधिक फायदा होईल, असे तज्ज्ञांचे मत आहे. वर दिलेल्या आकडेवारीनुसार, युरोपच्या एकूण व्यापारात भारताचा वाटा फक्त 2.4 टक्के आहे. याउलट, भारताच्या एकूण निर्यातीत युरोपीय संघाचा वाटा 11.5 टक्के राहिला आहे. या आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की, या करारामुळे भारताला खूप जास्त आर्थिक फायदा होणार आहे. विशेष म्हणजे, भारताची युरोपीय संघाला होणारी निर्यात अमेरिकेच्या तुलनेतही खूप जास्त आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेसाठीही हे महत्त्वाचे पाऊल ठरेल.

डिजिटल पेमेंटचा नियम बदलणार

डिजिटल पेमेंट्समध्ये मोठा बदल होणार आहे. ऑनलाइन व्यवहार झपाट्याने वाढत असताना फसवणुकीचाही धोका वाढत आहे. ग्राहकांची सुरक्षा वाढवण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (RBI) आता एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

नव्या नियमांमधील महत्त्वाच्या गोष्टी

1. नवीन ऑथेंटिकेशन फॅक्टरचा वापर वाढणार

आता डिजिटल व्यवहारात अधिक सुरक्षितता आणण्यासाठी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नवीन घटक (Authentication Factors) वापरता येतील. मात्र सध्या वापरले जाणारे SMS आधारित OTP (वन-टाइम पासवर्ड) बंद होणार नाही, ते पुढेही वापरले जाईल.

2. किमान दोन सुरक्षा स्तर

बँका आणि कार्ड जारी करणाऱ्या कंपन्यांना 2-फॅक्टर ऑथेंटिकेशन (2FA) अनिवार्यपणे लागू करावे लागेल. तसेच, ज्या व्यवहारात फसवणुकीचा धोका जास्त असेल, त्यावर अतिरिक्त रिस्क-बेस्ड चेक्स करता येतील.

3. जबाबदारी ठरवली जाणार

 ISBN NO. 978-81-990957-8-6

फसवणूक किंवा वादाच्या प्रसंगी ग्राहकांना नुकसान होऊ नये म्हणून कार्ड जारी करणाऱ्या आणि पेमेंट सेवा पुरवठादारांच्या जबाबदाऱ्या स्पष्ट करण्यात आल्या आहेत.

4. क्रॉस-बॉर्डर व्यवहारांवर अधिक कडक नजर

परदेशातून होणाऱ्या नॉन-रिकरिंग ऑनलाइन व्यवहारांसाठी (Cross-Border CNP Transactions) AFA अनिवार्य करण्यात आले आहे. जर परदेशी व्यापारी किंवा सेवा पुरवठादाराने अतिरिक्त सुरक्षा मागितली, तर ती द्यावी लागेल.

देशांतर्गत व्यवहारांमध्ये सध्या जसे OTP + PIN किंवा बायोमेट्रिक वापरले जातात, तसेच सुरू राहतील. मात्र परदेशातून पेमेंट करताना आता अतिरिक्त सुरक्षा आवश्यक असू शकते. बँका आणि कार्ड कंपन्या धोका लक्षात घेऊन अतिरिक्त सिक्युरिटी चेक्स लागू करू शकतील. यामुळे फसवणुकीचे आणि बनावट व्यवहारांचे प्रकार कमी होतील,

RBI च्या नव्या गाईडलाइन्सनुसार हे नियम 1 एप्रिल 2026 पासून लागू होतील. म्हणजेच बँका आणि पेमेंट कंपन्यांकडे पुढील एक वर्षाचा कालावधी आहे, ज्यामध्ये त्यांना आपली प्रणाली अद्ययावत करावी लागेल आणि नवीन तंत्रज्ञान लागू करावे लागेल.

डिजिटल पेमेंट अधिक सुरक्षित करण्याच्या दिशेने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. यामुळे ऑनलाइन व्यवहारांवरील ग्राहकांचा विश्वास वाढण्याची शक्यता आहे.

कु. कार्तिका पगडाला
कु. गजानन राजरवाड

1/10/2025

सोलापूरच्या समर्थ बँकेवर RBI ची मोठी कारवाई

सोलापूरच्या समर्थ बँकेवर RBI ची मोठी कारवाई, लोकांनी बँकेला घेरलं, पैसे काढण्या या निर्णयाचे मुख्य कारण म्हणजे बँकेकडे आवश्यक तेवढी भांडवली रक्कम नसणे आणि बँकेची कमाईची स्थिती समाधानकारक नसणे असे सांगण्यात आले आहे. या निर्णयामुळे जिजामाता बँकेच्या ठेवीदारांमध्ये खळबळ उडाली आहे. (Satara News) बँकेच्या आवारात ठेवींच्या परतफेडीसाठी ठेवीदार गर्दी करत आहेत.

Satara Jijamata Bank: 2019 मधेही परवाना झाला होता रद्द

आरबीआयने यापूर्वी 30 जून 2016 रोजी या बँकेचा परवाना रद्द केला होता. परंतु, बँकेने केलेल्या अपीलनंतर 23 ऑक्टोबर 2019 रोजी परवाना पुन्हा बहाल करण्यात आला होता. अपिल प्राधिकरणाने तेव्हा निर्देश दिले होते की वित्तीय वर्ष 2013- 14साठी बँकेचा फॉरेन्सिक ऑडिट अहवाल तयार करण्यात यावा, ज्यामुळे तिची खरी आर्थिक स्थिती समजेल.या ऑडिटसाठी आरबीआयने लेखापरीक्षक नेमले होते, मात्र बँकेने सहकार्य न केल्याने ऑडिट प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. दरम्यान, बँकेची आर्थिक परिस्थिती आणखी कमजोर होत गेल्याचे आरबीआयच्या मूल्यांकनातून स्पष्ट झाले.त्या पार्श्वभूमीवर आरबीआयने बँकेचा परवाना रद्द करत 7 ऑक्टोबर 2025 पासून जिजामाता महिला सहकारी बँकेला बँकिंग व्यवसाय बंद करण्याचे निर्देश दिले आहेत.

परवाना रद्द, ठेवीदार अडचणीत:

आता ही बँक ठेवी स्वीकारू शकत नाही किंवा परतफेड करू शकत नाही. आरबीआयने महाराष्ट्रातील राज्य सहकार आयुक्तांना विनंती केली आहे की, या बँकेच्या लिक्विडेशनची प्रक्रिया सुरू करून त्यासाठी लिक्विडेटर नेमावा. ठेवीदारांचे संरक्षण आरबीआयच्या निवेदनानुसार, परवाना रद्द झाल्यानंतर प्रत्येक ठेवीदाराला त्याच्या ठेवींपैकी जास्तीत जास्त 5 लाख रुपये पर्यंतची रक्कम ठेव विमा आणि पत हमी महामंडळ मार्फत मिळणार आहे. सप्टेंबर 2024 अखेरपर्यंत, एकूण ठेवींपैकी 94.41 टक्के ठेवी DICGC विमा संरक्षणाखाली होत्या, अशी माहिती आरबीआयने

 ISBN NO. 978-81-990957-8-6

दिली आहे.साताऱ्यात 110 कोटीहून अधिकची नावाजलेली ही जिजामाता महिला सहकारी बँक होती. मात्र आजही यामधील थकीत असणारे ठेवीदार या बँकेच्या आवारात गर्दी करत आहेत. येणाऱ्या दिवाळीमध्ये बँक प्रशासनाने काहीतरी रक्कम थकीत ठेवीदारांना परत करावी अशी मागणी बँकेचे ठेवीदार करत आहेत.

निकिता तोमर
शिवानी यादव

02/10/2025

बचत खाते आणि चालू खाते, यात काय फरक? जाणून घ्या

चालू खाते म्हणजे काय?

चालू खाते हे एक बँक खाते आहे जे विशेषतः व्यवसाय आणि मोठ्या कंपन्यांसाठी तयार केले जाते. हे खाते वारंवार आणि मोठे व्यवहार करण्यास मदत करते. यामध्ये तुम्ही सहजपणे पैसे जमा करू शकता, काढू शकता आणि पैसे हस्तांतरित करू शकता आणि त्यावर कोणतेही विशेष निर्बंध नाहीत.

चालू खात्यावर सामान्यत: व्याज मिळत नाही, परंतु ते ओव्हरड्राफ्ट सुविधा, चेक बुक आणि सुलभ ऑनलाइन बँकिंग यासारखे फायदे देते. ही खाती दैनंदिन व्यवसाय खर्च, पुरवठादारांना देयके आणि ग्राहकांकडून मिळालेल्या पैशाच्या व्यवहारांसाठी खूप उपयुक्त आहेत. उच्च व्यवहाराची मर्यादा आणि लवचिकतेसह, चालू खाते बँकिंग व्यवहार सुलभ आणि प्रभावी करते.

बचत खाते म्हणजे काय?

बचत खाते हे एक असे खाते आहे जे सामान्य व्यक्तींसाठी तयार केले जाते जेणेकरून ते त्यांचे पैसे सुरक्षित ठेवू शकतील आणि त्यावर व्याज देखील मिळवू शकतील. हे खाते लोकांना बचतीची सवय लावते आणि कालांतराने हळूहळू त्यांची रक्कम वाढवते.

हे पैसे जमा करणे, ATM पैसे काढणे, डेबिट कार्ड आणि ऑनलाइन बँकिंग यासारखी वैशिष्ट्ये प्रदान करते, ज्यामुळे खाते सोयीस्कर आणि प्रवेशयोग्य होते. ज्यांना आपत्कालीन निधी तयार करायचा आहे, भविष्यातील उद्दिष्टांसाठी बचत करायची आहे किंवा फक्त त्यांचा अतिरिक्त निधी सुरक्षित ठेवायचा आहे त्यांच्यासाठी हे खाते आदर्श आहे.

चालू खाते आणि बचत खात्यातील फरक

1. **व्याजदर**

बचत खात्यात बँक ठेवीवर व्याज देते, ज्यामुळे तुमची बचत वाढते. त्याचबरोबर चालू खात्यावर व्याज मिळत नाही कारण हे खाते प्रामुख्याने आवर्ती व्यावसायिक व्यवहारांसाठी असते.

2. ओव्हरड्राफ्ट सुविधा

चालू खात्यात ओव्हरड्राफ्टची सुविधा आहे, म्हणजे आपण आपल्या खात्यात असलेल्या पैशापेक्षा एका विशिष्ट मर्यादेपर्यंत अधिक पैसे काढू शकता. हे वैशिष्ट्य व्यवसायासाठी अचानक खर्च हाताळण्यास मदत करते. बचत खात्यात ही सुविधा नाही.

3. ठेव आणि पैसे काढण्याची मर्यादा

बचत खात्यातील व्यवहाराची मर्यादा मर्यादित आहे, तर चालू खात्यात ठेव आणि पैसे काढण्याची मर्यादा जास्त आहे, जेणेकरून व्यवसाय मोठ्या प्रमाणात रोख व्यवहार सहजपणे करू शकतात.

4. मिनिमम बॅलन्स

बचत खात्यात कमी किमान शिल्लक आवश्यक आहे, ज्यामुळे ते सामान्य लोकांसाठी सुलभ आहे. चालू खात्यात किमान शिल्लक आवश्यक आहे कारण हे खाते मोठ्या प्रमाणात व्यवहारांसाठी बनविले गेले आहे.

चालू खाते आणि बचत खाते यापैकी एक कसे निवडावे?

आपल्या व्यवहार पद्धती आणि गरजांवर अवलंबून, आपण कोणते खाते निवडले पाहिजे. बचत खाते अशा व्यक्तींसाठी योग्य आहे ज्यांना पैसे वाचवायचे आहेत आणि त्यावर व्याज मिळवायचे आहे. हे खाते पगारदार लोकांसाठी किंवा नियमित उत्पन्न असलेल्या व्यक्तींसाठी योग्य आहे. त्यात

 ISBN NO. 978-81-990957-8-6

मासिक व्यवहारांची मर्यादा असते आणि किमान शिल्लक ठेवावी लागते.

त्याच वेळी, चालू खाते व्यापारी, व्यावसायिक आणि ज्यांना वारंवार व्यवहार करण्याची आवश्यकता आहे त्यांच्यासाठी योग्य आहे. यात व्याज जमा होत नाही, परंतु ही खाती उच्च व्यवहार मर्यादा, चेक सुविधा आणि ओव्हरड्राफ्ट यासारखी वैशिष्ट्ये देतात जी अल्प-मुदतीच्या रोख गरजा पूर्ण करण्यास मदत करतात.

फरक हा आहे की वापर. जर तुम्हाला बचत आणि व्याज मिळवण्यासाठी खाते उघडायचे असेल तर बचत खाते ठीक होईल. पण रोजच्या व्यवसायाचे व्यवहार करायचे असतील तर चालू खाते अधिक उपयुक्त ठरते. दोन्ही खात्यांमध्ये किमान शिल्लक असू शकते, परंतु चालू खात्यात अधिक व्यवहारांना परवानगी मिळते.

3/10/2025

आयुर्वेदाला नवी ओळख मिळवून देणं

2025 पर्यंत भारताला आत्मनिर्भर बनवणं आणि जगभरात भारतीय आयुर्वेदाला नवी ओळख मिळवून देणं कंपनीचं ध्येय असल्याचं कंपनीने सांगितलं.

पतंजलीने म्हटलंय की, 'आमचं उद्दिष्ट केवळ उत्पादने विकणे नाही, तर सर्वांगीण आरोग्य, शाश्वत शेती आणि डिजिटल इनोव्हेशन यावर भर देणं आहे.' या दिशेने पुढचं पाऊल म्हणून कंपनी देश-विदेशात १० हजार वेलनेस सेंटर्स सुरू करणार आहे. या केंद्रांमध्ये योग सत्रं, आयुर्वेदिक सल्ला आणि नैसर्गिक उपचार उपलब्ध असतील. स्वामी रामदेव म्हणाले, 'या उपक्रमामुळे योगाला जागतिक पातळीवर लोकप्रियता मिळेल आणि भारतीय संस्कृतीचा संदेश जगभर पोहोचेल.'

Patanjali: 2027 पर्यंत चार कंपन्या बाजारात

पतंजलीने सांगितलं की, 'हे वेलनेस सेंटर्स डिजिटल ॲप्स आणि स्मार्ट वेअरेबल्सच्या मदतीने लोकांना घरी बसून स्वतःच्या आरोग्याचं निरीक्षण करता येईल.' कंपनीने 2027 पर्यंत आपल्या चार कंपन्यांची यादी करण्याची योजना आखली आहे, ज्यामुळे पतंजलीचा एकूण मार्केट कॅप ₹5 लाख कोटीपर्यंत पोहोचवण्याचं उद्दिष्ट आहे. आरोग्य उत्पादनांचा बाजार सध्या 10-15 टक्क्यांनी वाढतो आहे, त्यामुळे ही पावले उद्योगाला नवा वेग देणार आहेत.

मार्केटिंगच्या दृष्टीने पतंजली 2025 मध्ये डिजिटल मोहीमांवर भर देणार आहे. युवकांना लक्ष्य करण्यासाठी YouTube Shorts, Instagram Reels आणि इन्फ्लुएंसर कोलॅबोरेशनद्वारे मोहिमा राबवल्या जातील. SEO आणि कंटेंट मार्केटिंगच्या मदतीने 'Ayurvedic Health Products' सारख्या कीवर्ड्ससाठी शोध वाढवले जातील.

तसेच, पतंजली स्वतःच्या शेतांमध्ये कच्चा माल तयार करून उत्पादनांचा खर्च कमी ठेवण्याचा प्रयत्न करणार आहे. ऑर्गेनिक फूड्स, हेल्थ सप्लिमेंट्स आणि पर्सनल केअर उत्पादनांच्या श्रेणीचा विस्तार केला जाणार आहे. या माध्यमातून आत्मनिर्भर भारत मिशनला चालना मिळेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही बळकटी मिळेल.

जागतिक भागीदारी आणि संशोधन

पतंजलीने स्पष्ट केलं आहे की, संशोधन आणि विकासात गुंतवणूक करून नवे हर्बल फॉर्म्युले विकसित केले जातील, जे वैयक्तिक आरोग्य उपाय देतील. आंतरराष्ट्रीय विस्तारासाठी UAE, अमेरिका, आणि कॅनडा या देशांमध्ये भागीदारी केली जाईल.

पर्यावरणपूरक पॅकेजिंग आणि शाश्वत उत्पादन पद्धतींमुळे पतंजलीला ग्रीन ब्रँड बनवण्याचं स्वप्न आहे. कायद्याच्या अडचणी आणि महागाईसारख्या आव्हानांना सामोरं जावं लागेल, पण कंपनीला विश्वास आहे की स्वामी रामदेव यांच्या प्रामाणिकतेमुळे आणि पारदर्शक मार्केटिंगमुळे हे सर्व पार करता येईल.

निकिता तोमर

शिवानी यादव

 ISBN NO. 978-81-990957-8-6

6/10/2025

सणासुदीच्या काळात कार खरेदी करणे झाले स्वस्त! जीएसटीमध्ये मोठी कपात, कर्जही झाले स्वस्त

आजपासून शारदीय नवरात्र उत्सवाला सुरुवात झाली आहे. या सणासुदीच्या काळात तुम्ही तुमच्या स्वप्नातील कार घरी आणण्याचा विचार करत असाल तर तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे.

यावर्षी केवळ कार कंपन्याच नव्हे, तर बँकांनीही आकर्षक कर्ज योजना सादर केल्या आहेत. अनेक बँका ७.८५ टक्के व्याजदराने कार कर्ज देत आहेत, शिवाय प्रोसेसिंग शुल्कावर ५० टक्क्यांपर्यंत सूटही देत आहेत. याव्यतिरिक्त, १२०० सीसी पर्यंतच्या छोट्या इंजिन असलेल्या गाड्यांवर जीएसटी २८ टक्क्यांवरून १८ टक्के करण्यात आला आहे. जीएसटीचे नवे दर २२ सप्टेंबरपासून लागू होणार आहेत.

कार कर्ज झाले अधिक परवडणारे

तुमची नवी कार घेण्यासाठी बँक आणि कर्ज देणाऱ्या वेबसाइट्सवर नक्की तुलना करा, कारण यामुळे तुम्हाला सर्वात कमी व्याजदर आणि चांगल्या अटी मिळू शकतात. BankBazaar.com च्या आकडेवारीनुसार, १० लाख रुपयांच्या ५ वर्षांच्या कार कर्जावरील व्याजदर ७.८५ टक्क्यांपासून ९.९९ टक्क्यांपर्यंत आहेत. तुमच्या क्रेडिट स्कोअर आणि उत्पन्नानुसार व्याजदरात बदल होऊ शकतो.

बँकांनुसार ईएमआयचे गणित

१० लाख रुपयांच्या ५ वर्षांच्या कार कर्जावर विविध बँकांचे व्याजदर आणि ईएमआय खालीलप्रमाणे आहेत.

1. पंजाब नॅशनल बँक: ७.८५% व्याज, ईएमआय रु. २०,२०५
2. युनियन बँक ऑफ इंडिया: ७.९०% व्याज, ईएमआय रु. २०,२२९
3. बँक ऑफ बडोदा आणि कॅनरा बँक: ८.१५% व्याज, ईएमआय रु. २०,३४८
4. आयडीबीआय बँक: ८.३०% व्याज, ईएमआय रु. २०,४२०
5. ॲक्सिस बँक: ८.८०% व्याज, ईएमआय रु. २०,६६१
6. स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI): ८.८५% व्याज, ईएमआय रु. २०,६८६
7. आयसीआयसीआय बँक: ९.१५% व्याज, ईएमआय रु. २०,८३१
8. एचडीएफसी बँक: ९.४०% व्याज, ईएमआय रु. २०,९५३
9. आयडीएफसी फर्स्ट बँक: ९.९९% व्याज, ईएमआय रु. २१,२४२

'या' ग्राहकांना हेल्थ इन्शुरन्सवर GST माफीचा फायदा नाही; आरोग्य विम्या कंपन्यांनी केलं स्पष्ट

जीएसटी कपातीमुळे कारच्या किमती घटल्या जीएसटीच्या नव्या दरानुसार, छोट्या गाड्या खरेदी करणे आता अधिक सोपे झाले आहे. उदाहरणासाठी, १० लाख रुपयांच्या कारवर आधी २८% जीएसटी (२.८० लाख रु.) लागत होता, तो आता १८% (१.८० लाख रु.) होईल. यामुळे ग्राहकांची तब्बल १ लाख रुपयांची बचत होणार आहे. त्यामुळे, कमी झालेला जीएसटी आणि स्वस्त कर्जाचा दुहेरी फायदा ग्राहकांना मिळणार आहे.

संध्या पदमगिरवार

6/10/2025

मागील दहा महिन्यात चांदीचे दर दुप्पट

चांदीचे दर मागच्या वर्षीच्या तुलनेत जवळपास दुप्पट झाले आहेत. चांदीच्या दरात मागील १० महिन्यात ९०,००० ते १ लाख रुपयांची वाढ झाली आहे. चांदीच्या दरातील गुंतवणूक आता फायदेशीर ठरत असल्याचे दिसत आहे.

चांदीचे दर लाखो रुपयांनी वाढले

चांदीच्या दर मागील १० महिन्यात दुप्पट झाले आहे. मागच्या वर्षी चांदी जवळपास प्रति

ISBN NO. 978-81-990957-8-6

किलो १ लाखांच्या घरात होती. यावर्षी चांदीचे दर प्रति किलो १,९०,००० रुपये झाले आहे. तर चेन्नईत हे दर २ लाख ७ हजार रुपये झाले आहेत. चांदीच्या दरात होत असलेल्या वाढीमुळे तुम्हाला सर्वाधिक रिटर्न मिळत आहेत. दरम्यान, चांदीचे दर एवढे का वाढले यामागे काही कारणे आहेत.

चांदीचे दर वाढण्याची कारणे (Silver Rate Hike Reasons)

चांदीचे दर वाढण्याची तीन मुख्य कारणे आहेत. सणासुदीच्या काळात मागणी वाढते. वाढती औद्योगिक मागणी आणि त्या तुलनेने कमी पुरवठा. या कारणांमुळे चांदीचे दर वाढत आहेत.

वाढती मागणी

भारतात सर्वाधिक चांदी खरेदी केली जाते. सणासुदीच्या काळात सोने-चांदी खरेदी केलेले शुभ मानले जाते. त्यामुळे चांदीची मागणी वाढते. अनेकजण चांदीच्या अंगठ्या, ब्रेसलेट बनवतात. यामुळे चांदीचे दर वाढत आहेत.

औद्योगिक क्षेत्रातील वाढती मागणी

सौरऊर्जा प्रकल्पांमध्ये चांदीचा वापर केला जातो. एआय उद्योग, इलेक्ट्रिक वाहने, इलेक्ट्रिक वस्तू, वायर यामध्ये चांदीचा वापर केला जातो. त्यामुळे अनेक उद्योगात चांदी खरेदी केली जाते. त्यामुळे चांदीच्या दरात वाढ होत आहे.

कमी पुरवठा

चांदीची मागणी वाढत आहे आणि त्या तुलनेने पुरवठा कमी आहे. काही देशांमध्ये पर्यावरणातील बदलांमुळे अनेक खाणी बंद झाल्या आहेत आणि खाणकाम कमी करण्यात आले आहे. त्यामुळेदेखील चांदीची मागणी वाढत आहे आणि पुरवठा कमी होत आहे.

तज्ज्ञांच्या म्हणण्यांनुसार, चांदीचे दर सध्या विक्रमी उंचीवर आहे. त्यामुळे जास्तीत जास्त खरेदी टाळली पाहिजे. येत्या काळात चांदीचे दर अजून वाढू शकतात. त्यामुळे नवीन खरेदी थांबवली पाहिजे. येत्या काळात सोन्यापेक्षा चांदीच्या दरात जास्त वाढ होऊ शकते, असंही त्यांनी सांगितले आहे.

7/10/2025

सोनाली सेन गुप्ता आरबीआय कार्यकारी संचालकपदी

भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) सोनाली सेन गुप्ता यांची कार्यकारी संचालकपदी नियुक्ती केली आहे.

या पदावर नियुक्त होण्यापूर्वी, सोनाली सेन गुप्ता या बंगळुरू येथील प्रादेशिक कार्यालयात कर्नाटक राज्यासाठी प्रादेशिक संचालक म्हणून कार्यरत होत्या.

तीन दशकांहून अधिक काळ रिझर्व्ह बँकेत काम केलेल्या सोनाली यांनी मानव संसाधन व्यवस्थापन, बँकिंग नियमन आणि देखरेख आदी क्षेत्रांमध्ये काम केले आहे.

त्यांनी जी२०च्या ग्लोबल पार्टनरशिप फॉर फायनान्शिअल इन्क्लूजन व ओइसीडीच्या इंटरनॅशनल नेटवर्क ऑन फायनान्शिअल एज्युकेशन या आंतरराष्ट्रीय मंचांवर आरबीआयचे प्रतिनिधित्व केले आहे. तसेच, राष्ट्रीय आर्थिक साक्षरता केंद्राच्या संचालक मंडळावरही त्या संचालक म्हणून कार्यरत राहिल्या आहेत.

8/10/2025

सणासुदीच्या काळात कार खरेदी करणे झाले स्वस्त! जीएसटीमध्ये मोठी कपात, कर्जही झाले स्वस्त

आजपासून शारदीय नवरात्र उत्सवाला सुरुवात झाली आहे. या सणासुदीच्या काळात तुम्ही तुमच्या स्वप्नातील कार घरी आणण्याचा विचार करत असाल तर तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे.

यावर्षी केवळ कार कंपन्याच नव्हे, तर बँकांनीही आकर्षक कर्ज योजना सादर केल्या आहेत. अनेक बँका ७.८५ टक्के व्याजदराने कार कर्ज देत आहेत, शिवाय प्रोसेसिंग शुल्कावर ५० टक्क्यांपर्यंत सूटही देत आहेत. याव्यतिरिक्त, १२०० सीसी पर्यंतच्या छोट्या इंजिन असलेल्या गाड्यांवर जीएसटी २८ टक्क्यांवरून १८ टक्के

 ISBN NO. 978-81-990957-8-6

करण्यात आला आहे. जीएसटीचे नवे दर २२ सप्टेंबरपासून लागू होणार आहेत.

कार कर्ज झाले अधिक परवडणारे

तुमची नवी कार घेण्यासाठी बँक आणि कर्ज देणाऱ्या वेबसाइट्सवर नक्की तुलना करा, कारण यामुळे तुम्हाला सर्वात कमी व्याजदर आणि चांगल्या अटी मिळू शकतात. BankBazaar.com च्या आकडेवारीनुसार, १० लाख रुपयांच्या ५ वर्षांच्या कार कर्जावरील व्याजदर ७.८५ टक्क्यांपासून ९.९९ टक्क्यांपर्यंत आहेत. तुमच्या क्रेडिट स्कोअर आणि उत्पन्नानुसार व्याजदरात बदल होऊ शकतो.

बँकांनुसार ईएमआयचे गणित

१० लाख रुपयांच्या ५ वर्षांच्या कार कर्जावर विविध बँकांचे व्याजदर आणि ईएमआय खालीलप्रमाणे आहेत.

1. पंजाब नॅशनल बँक: ७.८५% व्याज, ईएमआय रु. २०,२०५
2. युनियन बँक ऑफ इंडिया: ७.९०% व्याज, ईएमआय रु. २०,२२९
3. बँक ऑफ बडोदा आणि कॅनरा बँक: ८.१५% व्याज, ईएमआय रु. २०,३४८
4. आयडीबीआय बँक: ८.३०% व्याज, ईएमआय रु. २०,४२०
5. ॲक्सिस बँक: ८.८०% व्याज, ईएमआय रु. २०,६६१
6. स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI): ८.८५% व्याज, ईएमआय रु. २०,६८६
7. आयसीआयसीआय बँक: ९.१५% व्याज, ईएमआय रु. २०,८३१
8. एचडीएफसी बँक: ९.४०% व्याज, ईएमआय रु. २०,९५३
9. आयडीएफसी फर्स्ट बँक: ९.९९% व्याज, ईएमआय रु. २१,२४२

'या' ग्राहकांना हेल्थ इन्शुरन्सवर GST माफीचा फायदा नाही; आरोग्य विम्या कंपन्यांनी केलं स्पष्ट

जीएसटी कपातीमुळे कारच्या किमती घटल्या जीएसटीच्या नव्या दरानुसार, छोट्या गाड्या खरेदी करणे आता अधिक सोपे झाले आहे. उदाहरणासाठी, १० लाख रुपयांच्या कारवर आधी २८% जीएसटी (२.८० लाख रु.) लागत होता, तो आता १८% (१.८० लाख रु.) होईल. यामुळे ग्राहकांची तब्बल १ लाख रुपयांची बचत होणार आहे. त्यामुळे, कमी झालेला जीएसटी आणि स्वस्त कर्जाचा दुहेरी फायदा ग्राहकांना मिळणार आहे.

संध्या पदमगिरवार

9/10/2025

वर्षभरात चांदीच्या दरात 68 हजारांची वाढ; तर सोने 1.30 लाखांच्या पार

परदेशी बाजारपेठेत सुरक्षित गुंतवणूक आणि भारतीय रुपयात होत असलेली घसरण यामुळे सोन्या-चांदीच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. ऑल इंडिया सराफा असोसिएशनच्या मते, 24 कॅरेट सोन्याचा भाव (Gold Rate Today) सोमवारी 9,700 रुपयांनी वाढला आणि 1,30,300 रुपये प्रति 10 ग्रॅमचा उच्चांक गाठला.

त्याचप्रमाणे, चांदीचे दर (Silver Rate Today) देखील ₹7,400 ने वाढून ₹1,57,400 प्रति किलोग्रॅम (सर्व करांसह) या नवीन उच्चांकावर पोहोचले. अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपयाच्या घसरणीमुळे सोने आणि चांदीच्या किमती वाढल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

2025 मध्ये आतापर्यंत सोन्याच्या दरात प्रति 10 ग्रॅम 51,350 रुपये म्हणजेच 65.04 टक्के वाढ झाली आहे. 31 डिसेंबर 2024 रोजी सोन्याची किंमत प्रति 10 ग्रॅम 78,950 रुपये होती. त्याचप्रमाणे या वर्षी चांदीच्या दरात 67,700 रुपये म्हणजेच 75.47 टक्के वाढ झाली आहे. 31 डिसेंबर 2024 रोजी चांदीची किंमत प्रति किलोग्रॅम 89,700 रुपये होती. दिवसेंदिवस

 ISBN NO. 978-81-990957-8-6

चांदीचे भाव वाढतच असून दिवाळीपर्यंत चांदीचे भाव एक लाख 70 हजार रुपये प्रती किलोपर्यंत जाण्याची शक्यता सरफा व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

मागणी आणखी वाढेल

एचडीएफसी सिक्युरिटीजचे कमोडिटीजचे वरिष्ठ विश्लेषक सौमिल गांधी म्हणाले:

सोन्याने सोमवारी नवीन विक्रमी उच्चांक गाठला. कारण विक्रमी उच्चांकी किंमत असूनही, गुंतवणूकदार सोन्याला प्राधान्य देत आहेत. येत्या काळात त्याची किंमत आणखी वाढू शकते. अमेरिकेत दीर्घकाळापर्यंत शटडाऊनची चिंता देखील सुरक्षित- गुंतवणुकीला प्रोत्साहन देत आहे.

जागतिक बाजारात सोन्यानेही गाठला नवा उच्चांक-

जागतिक बाजारातही सोने आणि चांदीच्या किमती वाढतच राहिल्या. जागतिक बाजारात स्पॉट गोल्ड जवळजवळ दोन टक्क्यांनी वाढून $3,949.58 प्रति औंस या नवीन उच्चांकावर पोहोचले, तर चांदी एक टक्क्यांहून अधिक वाढून $48.75 प्रति औंस या नवीन उच्चांकावर पोहोचली. सोमवारी फ्युचर्स मार्केटमध्येही सोन्याने नवीन उच्चांक गाठला. मल्टी कमोडिटी एक्सचेंज (MCX) वर डिसेंबर डिलिव्हरीसाठी सोन्याचा भाव 1,962 रुपयांनी वाढून 1,20,075 रुपये प्रति 10 ग्रॅम झाला.

डिसेंबरपर्यंत भारतीय 14 लाख कोटी रुपये खर्च करतील

बँक ऑफ बडोदाने त्यांच्या ताज्या अहवालात म्हटले आहे की, ऑक्टोबरमध्ये सुरू झालेल्या सणासुदीच्या हंगामात आणि नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या लग्नसराईच्या हंगामात, डिसेंबर अखेरपर्यंत ग्राहक अंदाजे ₹12-14 लाख कोटी खर्च करतील. जीएसटी दरांमध्ये कपात झाल्यामुळे ग्राहकांच्या भावनांना लक्षणीय चालना मिळाल्याने खर्चात ही वाढ झाल्याचा अंदाज अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. या खर्चाचा मोठा भाग ज्या प्रमुख क्षेत्रांमध्ये असेल त्यात कपडे, लग्न, इलेक्ट्रॉनिक्स आणि ऑटोमोबाईल्स यांचा समावेश आहे.

तो आता १८% (१.८० लाख रु.) होईल. यामुळे ग्राहकांची तब्बल १ लाख रुपयांची बचत होणार आहे. त्यामुळे, कमी झालेला जीएसटी आणि स्वस्त कर्जाचा दुहेरी फायदा ग्राहकांना मिळणार आहे.

संध्या पदमगिरवार

10/10/2025

जगभरातील केंद्रीय बँकांची सोन्याला पसंती, ऑगस्ट महिन्यात 15 टन सोने खरेदी

वर्ल्ड गोल्ड काऊन्सिलच्या आकडेवारीनुसार, ऑगस्ट महिन्यात जगभरातील केंद्रीय बँकांनी एकूण 15 टन सोन्याची खरेदी केली आहे.

ऑगस्ट महिन्यात सर्वात जास्त सोने कझाकिस्तानच्या नॅशनल बँकेने खरेदी केले आहे. कझाकिस्तानने अवघ्या एका महिन्यात 8 टन सोने खरेदी केले आहे.

हिंदुस्थानने ऑगस्ट महिन्यात सोने खरेदी केले नाही. भारतीय रिझर्व्ह बँकेने 2025 च्या आठ महिन्यांत केवळ तीन वेळा सोने खरेदी केले आहे, तर 2024 मध्ये जवळपास प्रत्येक महिन्यात सोने खरेदी केले आहे. डब्ल्यूजीसीच्या माहितीनुसार, आरबीआयने जानेवारी ते ऑगस्ट 2025 या दरम्यान केवळ 3.8 टन सोने खरेदी केले आहे, तर गेल्या वर्षी हिंदुस्थानने 45.5 टन सोन्याची खरेदी केली होती.

11/10/2025

सोने-चांदीच्या दरात ऐतिहासीक वाढ; चांदी 19 हजारांनी महागली, ही 3 कारणे आहेत

या वर्षी सोने आणि चांदीने गुंतवणुकीचे सर्व आकडेमोड बदलून टाकली आहे. गेल्या काही

 ISBN NO. 978-81-990957-8-6

महिन्यांपासून सुरू असलेली दरवाढ आता विक्रमी स्तरावर पोहोचली आहे.

केवळ एका आठवड्याच्या आत चांदीच्या दरात तब्बल 19 हजारांची (13%) वाढ झाली आहे, तर सोन्याचे दरही 4% ने वाढले आहेत.

मौल्यवान धातूंच्या बाजारात आलेल्या या अनपेक्षित तेजीमागे जागतिक भू-राजकीय तणाव, मध्यवर्ती बँकांची धोरणे आणि देशातील सणासुदीची मागणी या प्रमुख बाबी कारणीभूत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

या वर्षी आतापर्यंत सोन्याने ₹45,363 आणि चांदीने ₹78,483 ची भरारी घेतली आहे, ज्यामुळे गुंतवणूकदार आणि ग्राहक दोघांसाठीही हे मोठे आव्हान ठरले आहे.

एका आठवड्यात ऐतिहासिक दरवाढ

इंडियन बुलियन ज्वेलर्स असोसिएशन (IBJA) च्या आकडेवारीनुसार, गेल्या आठवड्यात सोने आणि चांदीच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे:

1. सोने : (२४ कॅरेट/१० ग्रॅम)

1. ३ ऑक्टोबर किंमत - ₹१,१६,९५४

1. १० ऑक्टोबर किंमत: ₹१,२१,५२५

वाढ (₹) - ₹४,५७१

वाढ (%) - ४%

चांदी : (१ किलोग्रॅम)

1. ३ ऑक्टोबर किंमत - ₹१,४५,६१०

2. १० ऑक्टोबर किंमत - ₹१,६४,५००

वाढ (₹) - ₹१८,८९०

वाढ (%) - १२.९०%

चांदीच्या दरात झालेली जवळपास १९,००० रुपयांची ही वाढ गेल्या अनेक वर्षांतील सर्वात मोठी साप्ताहिक वाढ ठरली आहे.

या वर्षातील एकूण दरवाढ (जानेवारी ते ऑक्टोबर) संपूर्ण वर्षाचा विचार केल्यास मौल्यवान धातूंनी गुंतवणूकदारांना मोठा परतावा दिला आहे.

सोने: ३१ डिसेंबर २०२४ रोजी ₹७६,१६२ असलेले २४ कॅरेट सोन्याचे दर आज ₹१,२१,५२५ वर पोहोचले आहेत. म्हणजेच, या वर्षात सोन्यामध्ये ₹४५,३६३ ची वाढ झाली आहे.

चांदी: ३१ डिसेंबर २०२४ रोजी ₹८६,०१७ प्रति किलो असलेली चांदीची किंमत आता ₹१,६४,५०० प्रति किलो झाली आहे. या वर्षात चांदी ₹७८,४८३ ने महाग झाली आहे.

सोन्याच्या किमती वाढण्याची ही आहेत प्रमुख कारणं !

१. उत्सवामुळे वाढलेली मागणी

दिवाळी आणि धनत्रयोदशीच्या काळात सोने खरेदी करणे शुभ मानले जाते. उच्च किमती असल्या तरी, सणांच्या मुहूर्तावर खरेदीचा कल कायम आहे.

२. भू-राजकीय तणाव

मध्य पूर्वेतील अशांतता (Middle East Crisis) आणि व्यापार युद्धाच्या (Trade War) भीतीमुळे जागतिक गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याकडे वळले आहेत. अमेरिकेच्या धोरणांबद्दलची अनिश्चितता देखील याला कारणीभूत आहे.

३. मध्यवर्ती बँकांची खरेदी

जगभरातील प्रमुख मध्यवर्ती बँका (Central Banks) डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्याच्या उद्देशाने त्यांच्या तिजोरीतील सोन्याचा साठा सातत्याने वाढवत आहेत.

चांदीच्या किमती वाढण्याची चार कारणे

चांदीच्या किमती सोन्यापेक्षा जास्त वेगाने वाढल्या आहेत, यामागे चार प्रमुख कारणे आहेत:

१. सणासुदीची मागणी

दिवाळी आणि करवा चौथसारख्या सणांमुळे घरगुती मागणी वाढली आहे.

२. रुपयाची कमजोरी

रुपया कमकुवत झाल्यामुळे चांदीचा आयात खर्च (Import Cost) वाढला आहे, ज्यामुळे देशांतर्गत किमती वाढल्या.

३. औद्योगिक मागणी

इलेक्ट्रॉनिक्स, वैद्यकीय उपकरणे आणि विशेषतः सौर पॅनेल (Solar Panels) उद्योगांमध्ये चांदीचा

 ISBN NO. 978-81-990957-8-6

वापर वाढला आहे, ज्यामुळे औद्योगिक मागणीत मोठी वाढ झाली आहे.

४. पुरवठ्यातील कमतरता

जागतिक स्तरावर चांदीच्या पुरवठ्यात कमतरता (Supply Shortage) असल्याने किमतींवर दबाव वाढत आहे.

सोने ₹१.५५ लाखांवर पोहोचण्याची शक्यता?

गोल्डमन सॅक्स (Goldman Sachs) च्या अहवालानुसार, पुढील वर्षीपर्यंत सोन्याचे दर प्रति औंस $५,००० (सुमारे ₹१,५५,००० प्रति १० ग्रॅम) पर्यंत पोहोचू शकतात. तर ब्रोकरेज फर्म पीएल कॅपिटलने सोने प्रति १० ग्रॅम ₹१,४४,००० पर्यंत जाण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

12/10/2025

५ दिवस... ४५,००० कोटी रुपयांची कमाई, 'या' कंपनीने दिवाळीपूर्वी गुंतवणूकदारांना दिला सर्वाधिक फायदा

मागील आठवडा शेअर बाजारासाठी अत्यंत यशस्वी ठरला. बॉम्बे स्टॉक एक्सचेंजच्या ३० शेअर्सच्या सेंसेक्समधील टॉप-१० पैकी आठ मूल्यवान कंपन्यांच्या बाजार भांडवलात मोठी वाढ झाली.

यामध्ये मुकेश अंबानी यांच्या रिलायन्स या कंपन्यांच्या एकत्रित बाजार भांडवलात १.९४ लाख कोटी रुपयांची वाढ झाली. यामध्ये टीसीएसच्या गुंतवणूकदारांना सर्वाधिक फायदा झाला, ज्यांनी अवघ्या पाच व्यावसायिक दिवसांत ४५,००० कोटी रुपयांहून अधिक नफा कमावला.

टीसीएस गुंतवणूकदारांचा जल्लोष

टाटा समूहात सध्या काही उलथापालथ सुरू असली, तरी टीसीएसच्या उत्कृष्ट तिमाही निकालांचा परिणाम त्यांच्या शेअर्सवर दिसून आला. टीसीएसच्या शेअर्समध्ये झालेल्या वाढीमुळे गुंतवणूकदारांना मोठा फायदा झाला. पीटीआयच्या मते, पाच व्यावसायिक दिवसांत टीसीएसच्या गुंतवणूकदारांच्या संपत्तीत ४५,६७८ कोटी रुपयांची भर पडली. यामुळे कंपनीचे बाजार भांडवल १०,९५,७०१.६२ कोटी रुपये झाले. दुसरीकडे, देशातील दुसऱ्या क्रमांकाची आयटी कंपनी इन्फोसिसचे बाजार भांडवल २८,१२५.२९ कोटींनी वाढून ६,२९,०८०.२२ कोटी रुपये झाले.

एचडीएफसी बँकेपासून रिलायन्सपर्यंत नफा

गेल्या आठवड्यात गुंतवणूकदारांना मोठा नफा मिळवून देणाऱ्या कंपन्यांमध्ये एचडीएफसी बँकेचे नाव आघाडीवर आहे. याच्या गुंतवणूकदारांनी २५,१३५.६२ कोटी रुपये कमावले, आणि बँकेचे बाजार भांडवल १५,०७,०२५.१९ कोटी रुपये झाले. टेलिकॉम क्षेत्रातील दिग्गज भारती एअरटेलच्या बाजार भांडवलात २५,०८९.२७ कोटींची वाढ होऊन ते ११,०५,९८०.३५ कोटी रुपये झाले. मुकेश अंबानी यांच्या रिलायन्स इंडस्ट्रीजने २५,०३५.०८ कोटींची भर घालत बाजार भांडवल १८,७०,१२०.०६ कोटी रुपये केले. याशिवाय, बजाज फायनान्सचे बाजार भांडवल २१,१८७.५६ कोटींनी वाढून ६,३६,९९५.७४ कोटी, तर एसबीआयचे १२,६४५.९४ कोटींनी वाढून ८,१२,९८६.६४ कोटी रुपये झाले. आयसीआयसीआय बँकेच्या मूल्यात ११,२५१.६२ कोटींची वाढ होऊन ते ९,८६,३६७.४७ कोटी रुपये झाले.

एलआयसी आणि एचयूएलचा धक्का

आठ सेंसेक्स कंपन्यांनी नफा कमावला असताना, एलआयसीच्या गुंतवणूकदारांना ४,६४८.८८ कोटींचे नुकसान झाले, आणि त्यांचे बाजार भांडवल ५,६७,८५८.२९ कोटी रुपये राहिले. तसेच, हिंदुस्तान युनिलिव्हरच्या बाजार भांडवलात ३,५७१.३७ कोटींची घट होऊन ते ५,९४,२३५.१३ कोटी रुपये झाले.

रिलायन्स अव्वल स्थानावर

बाजार भांडवलाच्या दृष्टिकोनातून देशातील सर्वात मोठी कंपनी म्हणून रिलायन्स इंडस्ट्रीजने

 ISBN NO. 978-81-990957-8-6

आपले अव्वल स्थान कायम राखले. त्यानंतर एचडीएफसी बँक, भारती एअरटेल, टीसीएस, आयसीआयसीआय बँक, एसबीआय, बजाज फायनान्स, इन्फोसिस, हिंदुस्तान युनिलिव्हर आणि एलआयसी यांचा क्रमांक लागतो.इंडस्ट्रीजपासून सुनील मित्तल यांच्या भारती एअरटेलपर्यंत आणि टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS) ते इन्फोसिस (Infosys) यांचा समावेश आहे.

संध्या पदमगिरवार

13/10/2025

या' स्टॉकवर तज्ज्ञांचा विश्वास, लक्ष्य किंमत १९,०००; 'खरेदी' ची दिली शिफारस

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने दिवाळीच्या अगदी आधी देशवासियांना जीएसटी २.० अंतर्गत कर स्लॅब आणि दरांमध्ये बदल लागू करून एक महत्त्वाची भेट दिली आहे. दररोजच्या घरगुती वस्तू तसेच कार आणि बाईकवरील जीएसटी कमी करण्यात आला आहे.

त्यानंतर, ग्राहक खरेदीसाठी गर्दी करत आहेत, तर वाढत्या मागणी आणि विक्रीमुळे कंपनीचे शेअर्स गगनाला भिडत आहेत. मारुती सुझुकी इंडियाचा शेअर सातत्याने वाढत आहे आणि तज्ञ त्याच्या गतीबद्दल उत्साही आहेत. गोल्डमन सॅक्सनेही आपले लक्ष्य वाढवले आहे, मारुतीच्या शेअरवर खरेदी करण्याची शिफारस केली आहे.

४८ पैकी ४१ तज्ञांनी सांगितले खरेदी करा

केवळ गोल्डमनच नाही तर इतर अनेक ब्रोकरेज देखील ऑटो क्षेत्रातील दिग्गज आणि भारतातील सर्वात मोठी प्रवासी कार निर्माता कंपनी मारुती सुझुकी इंडियाच्या शेअर्सवर सकारात्मक भूमिका राखत आहेत. अहवालानुसार, ४८ पैकी ४१ विश्लेषकांनी या शेअरला खरेदी रेटिंग दिले आहे, खरेदीचा सल्ला दिला आहे, तर पाच जणांनी शेअर्स धारण करण्याचा सल्ला दिला आहे आणि दोघांनी विक्री करण्याचा सल्ला दिला आहे.

Explainer: रुपया कमजोर, खर्च जास्त! जाणून घ्या तुमच्या बजेटवर कसा होईल परिणाम

गोल्डमन सॅक्सने मारुती सुझुकीच्या विक्रीच्या अंदाजात सुधारणा केली आहे, ज्यामुळे त्यांची लक्ष्य किंमत ३७% ने वाढून १८,९०० रुपये झाली आहे. लक्ष्य वाढीबरोबरच, ब्रोकरेजने त्यांचे रेटिंग न्यूट्रलवरून खरेदी करण्यासाठी देखील कमी केले आहे.

जीएसटी कपातीनंतर भारतात एंट्री-लेव्हल कारच्या मागणीत आणखी वाढ होण्याची अपेक्षा गोल्डमन सॅक्सने मारुतीचे रेटिंग आणि लक्ष्य वाढवण्यामागील कारण म्हणून नमूद केले. ब्रोकरेजने त्यांच्या आउटलुक अहवालात म्हटले आहे की मारुतीने तीन दशकांहून अधिक काळातील नवरात्रीची सर्वात मजबूत सुरुवात केली आहे. कंपनीने पहिल्याच दिवशी ३०,००० कार डिलिव्हर केल्या असताना, बुकिंगमध्येही लक्षणीय वाढ झाली आहे. २२ सप्टेंबर रोजी जीएसटी लागू झाल्यानंतर, कंपनीला ७५,००० बुकिंग मिळाले आहेत, म्हणजेच दररोज सुमारे १५,००० बुकिंग मिळाले आहेत.

आता, मारुती सुझुकीच्या इंडियाबद्दल बोलायचे झाले तर, आठवड्याच्या तिसऱ्या ट्रेडिंग दिवशी, मारुतीचे शेअर्स ₹१६, १८८ वर उघडले आणि १% पेक्षा जास्त वाढून ₹१६,३७५ वर पोहोचले. मागील ट्रेडिंग दिवशी, हा ऑटो स्टॉक बीएसई लार्ज कॅप श्रेणीतील सर्वात वेगाने वाढणाऱ्या शेअर्सपैकी एक होता, ज्यामध्ये सुमारे ३% वाढ झाली. स्टॉकमध्ये सतत वाढ झाल्यामुळे, मारुती सुझुकीचे मार्केट कॅप देखील ₹५.१० लाख कोटींवर पोहोचले आहे.

गेल्या सहा महिन्यांत मारुती सुझुकीच्या शेअर्समध्ये प्रचंड वाढ झाली आहे, या काळात ३६.२७% वाढ झाली आहे. या सहा महिन्यांत शेअर्सच्या किमतीत ४,३२२.७५ ची वाढ झाली आहे. एका महिन्यातील शेअर्सच्या कामगिरीच्या बाबतीत, ते १२.४०% ने वाढले आहे. महत्त्वाचे म्हणजे, या काळात मारुती सुझुकीच्या शेअर्सनी १७ वेळा नवीन उच्चांक गाठला आहे.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

13/10/2025

वेदांतच्या स्टॉकमध्ये येऊ शकते मोठी तेजी! ब्रोकरेजने दिले 'BUY' रेटिंग, जाणून घ्या

शुक्रवारी (१ ऑगस्ट) भारतीय शेअर बाजारात कमकुवतपणा दिसून आला. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी टॅरिफ घोषणेनंतर, निवडक क्षेत्रांमध्ये विक्री झाली.

बाजारातील दबाव असूनही, खाण क्षेत्रातील दिग्गज वेदांताचे शेअर्स एक टक्क्यांहून अधिक वाढले.

वेदांताच्या शेअर्समध्ये ही कारवाई जून तिमाहीच्या निकालांनंतर झाली. जून तिमाहीत कंपनीचा नफा १२% (वर्ष-दर-वर्ष) घसरून ३,१८५ कोटी रुपयांवर आला. ब्रोकरेज हाऊसेसनी तिमाही निकालांनंतर चांगल्या दृष्टिकोनाच्या आधारे वेदांताला धातूचा स्टॉक खरेदी करण्याचा सल्ला दिला आहे.

PMI Data: मागणीत वाढ आणि उत्पादन क्षेत्रातील ताकदीमुळे जुलैमध्ये पीएमआय ५९.१ वर, जाणून घ्या

वेदांतावर मोतीलालची लक्ष्य किंमत ₹ ४८० मोतीलाल ओसवाल यांनी वेदांत लिमिटेडवरील 'न्यूट्रल' रेटिंग कायम ठेवले आहे. ब्रोकरेजने या शेअरची लक्ष्य किंमत ४८० रुपये ठेवली आहे. त्यामुळे, या शेअरमध्ये १३% वाढ होऊ शकते. गुरुवारी बीएसईवर वेदांताचे शेअर्स ४२५ रुपयांवर बंद झाले.

ब्रोकरेजचे म्हणणे आहे की वेदांताची पहिल्या तिमाहीत (Q1FY26) कामगिरी जवळजवळ सर्व विभागांमध्ये अंदाजांनुसार होती. कंपनीच्या भांडवली खर्चाच्या योजना चांगल्या प्रकारे प्रगती करत आहेत. यामुळे भविष्यात खर्चात आणखी बचत होण्याची शक्यता आहे. आगामी उत्पादन क्षमतेद्वारे उच्च मूल्यवर्धित पॅकेजिंग (VAP) उत्पादने तयार करून मजबूत महसूल वाढ राखण्याचे व्यवस्थापनाचे उद्दिष्ट आहे.

ब्रोकरेजच्या मते, वेदांत त्याच्या डिलीव्हरेजिंग योजनांवर ठाम आहे. भविष्यात चांगला रोख प्रवाह कंपनीच्या विस्तार आणि कर्जमुक्ती योजनांना पाठिंबा देईल.

वेदांतावर नुवामा लक्ष्य किंमत ₹ ६०१

नुवामा इन्स्टिट्यूशनल इक्विटीजने वेदांताचे रेटिंग 'BUY' असे कायम ठेवले आहे. ब्रोकरेजने मेटल स्टॉकवर 601 रुपयांची लक्ष्य किंमत दिली आहे. अशा प्रकारे, हा स्टॉक गुंतवणूकदारांना 14 टक्के पेक्षा जास्त परतावा देऊ शकतो .

नुवामाच्या मते, चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत वेदांताचा EBITDA तिमाही-दर-तिमाही मध्ये १०% पेक्षा जास्त वाढण्याची अपेक्षा आहे. हे ॲल्युमिनियमच्या उच्च किमती आणि खर्चात घट यामुळे आहे. त्याच वेळी, दुसऱ्या तिमाहीत मोठे ॲल्युमिनियम प्रकल्प देखील सुरू होण्याची अपेक्षा आहे. व्यवसायाचे विलय Q4FY26 पर्यंत पूर्ण होऊ शकते.

वेदांत स्टॉक इतिहास

वेदांतचे शेअर्स ५२ आठवड्यांच्या उच्चांकावरून जवळपास २०% खाली व्यवहार करत आहेत. या शेअरचा ५२ आठवड्यांचा उच्चांक ५२७ रुपये आहे आणि ५२ आठवड्यांचा नीचांक ३६२ रुपये आहे. एका महिन्यात या शेअरमध्ये ९% घट झाली आहे. तीन आणि सहा महिन्यांत या शेअरची कामगिरी जवळजवळ स्थिर राहिली आहे. एका वर्षात या शेअरमध्ये जवळपास ५% घट झाली आहे. तर दोन वर्षांत या शेअरने ५४% आणि तीन वर्षांत ६७% परतावा दिला आहे. कंपनीचे बीएसईवरील मार्केट कॅप १,६६,९९३ कोटी रुपये आहे.

पहिल्या तिमाहीचे निकाल कसे होते?

धातू आणि खाण व्यवसायात गुंतलेली कंपनी वेदांत लिमिटेडचा नफा चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत १३ टक्क्यांनी वाढून ५,००० कोटी रुपये झाला आहे. या तिमाहीत महसुलात वाढ झाल्यामुळे नफा वाढला आहे. मागील आर्थिक वर्षाच्या याच तिमाहीत कंपनीने ४,४३३ कोटी रुपयांचा निव्वळ नफा कमावला होता.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

या तिमाहीत कंपनीचा महसूल गेल्या वर्षीच्या याच तिमाहीत ३५,२३९ कोटी रुपयांच्या तुलनेत वाढून ३७,४३४ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. पुनरावलोकनाधीन कालावधीत वेदांताचा खर्च गेल्या वर्षीच्या याच कालावधीत ३०,७७२ कोटी रुपयांवरून वाढून ३२,७५६ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. वेदांताचे अध्यक्ष अनिल अग्रवाल म्हणाले की, पहिल्या तिमाहीतील ही कामगिरी येणाऱ्या काळासाठी एक मजबूत पाया रचते.

निफ्टी २४,६०० च्या खाली, सेन्सेक्स ५८६ अंकांनी घसरला; औषधनिर्माण क्षेत्राला सर्वाधिक फटका

पायलकौर विशालसिंघ जाधव

साक्षी ठाकुर

15/10/2025

डोनाल्ड ट्रम्प यांचं भारताला सर्वात मोठं सरप्राईज

चीनने अमेरिकेच्या नाड्या आवळल्या आहेत, रेअर अर्थ मिनिरल्सची निर्यात बंद करून चायनाने अमेरिकेची मोठी कोंडी केली आहे. रेअर अर्थ मिनिरल्ससाठी अमेरिका ही पूर्णपणे चीनवर अवलंबून आहे, याचा सर्वात मोठा फटका हा अमेरिकेला बसला असून, यामुळे अमेरिकेची उद्योग इंडस्ट्री संकटात सापडली आहे.

त्यामुळे चिडलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर शंभर टक्के टॅरिफ लावला आहे, या टॅरिफमुळे जगात नव्या व्यापार युद्धाला सुरुवात झाली आहे. या व्यापार युद्धामध्ये आता भारताचा मोठा फायदा होण्याची शक्यता आहे.

चीनने रेअर अर्थ मिनिरल्सचा पुरवठा थांबवल्यानंतर आता अमेरिकेकडून पर्यायी पुरवठा साखळीचा शोध घेतला जात आहे. त्यामुळे अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेसेंट यांनी नुकतीच रेअर अर्थ मिनिरल्स पुरवठ्या संदर्भात जी जग विरोधात चीन अशी यादी बनवली आहे, त्यामध्ये भारताचा समावेश हा मित्र राष्ट्रांमध्ये सुचीबद्ध केला आहे. याचा फायदा हा भारताला आता अमेरिकेसोबत जी व्यापार कराराची बोलणी सुरू आहेत, त्यामध्ये होणार असल्याचं मत दिल्लीतील एका प्रमुख व्यापार-धोरण थिंक टँकने व्यक्त केलं आहे.

गेल्या काही दिवसांपासून अमेरिका आणि भारतामध्ये एका मोठ्या व्यापार करारासंदर्भात बोलणी सुरू आहे, मात्र अमेरिकेनं भारतावर लावलेल्या टॅरिफमुळे या चर्चेला ब्रेक लागला होता, त्यानंतर अमेरिकेचं शिष्टमंडळ काही दिवसांपूर्वी भारत दौऱ्यावर आल्यानं पुन्हा या करारासंदर्भात चर्चा सुरू झाली, भारत आणि अमेरिकेमधील व्यापार 2030 पर्यंत दुप्पट करणे हा या कराराचा मुख्य उद्देश आहे. चीनने अमेरिकेची कोंडी केल्यामुळे आता भारत आणि अमेरिका यांच्यामधील व्यापार कराराला अधिक गती येईल असं मत तज्ज्ञांकडून व्यक्त केलं जात आहे.

तसेच डोनाल्ड ट्रम्प येत्या काळात टॅरिफबाबत देखील मोठा निर्णय घेऊ शकतात, त्यांनी सध्या भारतावर 50 टक्के टॅरिफ लावला आहे, मात्र लवकरच या धोरणात बदल होऊन भारतावर लावलेला टॅरिफ हा 18 ते 16 टक्क्यांवर देखील आणला जाऊ शकतो, असाही अंदाज आहे. चीनसोबत अमेरिकेचे संबंध आता अधिक ताणले गेले आहेत, ज्याचा फायदा येत्या काळात भारताला होणार आहे.

16/10/2025

भारताचा रशियाला सर्वात मोठा झटका, तेल खरेदीचा खळबळजक निर्णय

ट्रम्प यांनी इस्त्रायल-हमास युद्धाबाबत मोठी घोषणा केली. त्यानंतर आता त्यांनी पुन्हा एकदा धक्कादायक दावा करून जगात खळबळ उडून दिली. व्हाईट हाऊसमध्ये पत्रकारांसोबत बोलताना डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले की, रशियाकडून भारतात आयात होणाऱ्या कच्च्या तेलाबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देखील चिंतेत आहेत.

याबद्दल आमचे स्पष्ट म्हणणे आहे की, यामुळे रशियाला पैशांची फडिंग होत आहे. यामुळेच मला निराशा भारतावर होती ते रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने पुढे अत्यंत मोठा दावा करत

 ISBN NO. 978-81-990957-8-6

डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले की, मला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अत्यंत खात्रीपणे सांगितले आहे की, ते आता रशियाकडून तेल खरेदी करणार नाहीत. खरोखरच हा मोठा निर्णय आहे.

पुढे बोलताना डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले की, आता आम्ही पुढे चीनला देखील हे करण्यासाठी म्हणावे लागेल. ऊर्जा धोरणांवर मतभेद असूनही पंतप्रधान मोदी हे माझे जवळचे मित्र आहेत. चीनसोबत असलेल्या तणावात आमचा भारतासोबत चांगला आणि महत्वपूर्ण व्यापार होईल. नरेंद्र मोदी माझे मित्र असून आमच्यामध्ये सर्वकाही व्यवस्थित आहे. रशियाच्या हल्ल्यात लाखो युक्रेनचे लोक मरत असल्याचा दावा डोनाल्ड ट्रम्प यांनी केलाय.

डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या दाव्यावर भारताकडून अजूनही कोणतेही उत्तर देण्यात आले नाही. खरोखरच भारत रशियाकडून तेल खरेदी बंद करणारा का? हा प्रश्न सातत्याने उपस्थित केला जात आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले की, रशिया-युक्रेन युद्ध थांबल्यानंतर भारत पुन्हा रशियाकडून तेल खरेदी करू शकतो, त्यामध्ये आमचा काहीही हस्तक्षेप नसेल पण आता नाही. आमचे स्पष्ट म्हणणे आहे की, भारताने रशियाकडून तेल खरेदी बंद केली तर काही गोष्टी हे युद्ध रोखण्यासाठी सोप्या जातील.

नक्कीच ही प्रक्रिया इतकी सोपी नाहीये, त्याला वेळ लागेल, असेही डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने भारतावर अमेरिकेने थेट 50 टक्के टॅरिफ लावला. अमेरिकेच्या टॅरिफनंतरही भारत हा रशियाकडून तेल खरेदी करतोय. मात्र, आता डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या दाव्यानंतर एकच खळबळ उडाली. यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारताचे अधिकारी नेमके काय बोलतात हे पाहण्यासारखे ठरणार आहे.

16/10/2025

सोने 35 टक्क्यांनी घसरणार, चांदीची किंमतही कमी होणार ! लक्ष्मीपूजनापर्यंत सोने स्वस्त होणार का ? तज्ञांचा मोठा अंदाज

सोन्यात गुंतवणूक करू इच्छिणाऱ्यांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. खरे तर दीपोत्सवाच्या काळात दरवर्षी मोठ्या प्रमाणात सोन्याची खरेदी होत असते. यंदाही दीपोत्सवात सोन्याची आणि चांदीची प्रचंड खरेदी होईल.

पण सध्या स्थितीला सोन्याचे भाव रेकॉर्ड हायवर आहेत. अशातच आता हा पिवळा धातू येत्या काळात घसरू शकतो असा अंदाज समोर आलाय.

किंमती गगनाला भिडल्या असतानाच याच्या किमतीमध्ये येत्या काळात 35 टक्क्यांपर्यंत घसरण होण्याचा अंदाज समोर येतोय. गेल्या एका वर्षात सोन्याच्या दरात तब्बल 61 टक्क्यांची वाढ झाली आहे. यामुळे शेअर, बाँड आणि इतर गुंतवणुकीच्या साधनांच्या तुलनेत सोनं सर्वाधिक परतावा देणारा पर्याय ठरला आहे.

मात्र, तज्ज्ञांच्या मते ही तेजी जास्त काळ टिकणार नाही आणि लवकरच सोन्याच्या किमतींमध्ये मोठी घसरण होऊ शकते. सध्या आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचा स्पॉट दर 4,225 डॉलर प्रति औंसच्या आसपास असून, हा दर इतिहासातील सर्वोच्च स्तराजवळ आहे.

डॉलरची घसरण, जागतिक आर्थिक अनिश्चितता आणि वाढते भू-राजकीय तणाव या कारणांमुळे गुंतवणूकदार सुरक्षित संपत्ती म्हणून सोन्याकडे वळत आहेत. तथापि, तज्ज्ञांचा अंदाज आहे की ही तेजी तात्पुरती ठरू शकते. ANZ बँकेच्या अहवालानुसार, 2026 च्या जूनपर्यंत सोन्याचे दर 4,600 डॉलर प्रति औंसपर्यंत पोहोचू शकतात.

मात्र त्यानंतर बाजारात मोठी सुधारणा होण्याची शक्यता आहे. अहवालात इशारा देण्यात आला आहे की, जर यूएस फेडरल रिझर्व्हने व्याजदर वाढवले किंवा अमेरिकन अर्थव्यवस्था अपेक्षेपेक्षा

 ISBN NO. 978-81-990957-8-6

चांगली कामगिरी करत राहिली, तर सोन्याच्या किंमतींवर दबाव येऊ शकतो.

भारतीय बाजारातही सोन्याच्या किंमतीत 30 ते 35 टक्क्यांपर्यंत घसरण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. म्हणजेच, सध्या लाखाच्या वर गेलेले दर सुमारे 77,000 रुपयांपर्यंत खाली येऊ शकतात. चांदीच्या दरातही जवळपास 50 टक्के घसरण होऊन भाव 77,450 रुपयांपर्यंत येऊ शकतात.

गुंतवणूकदारांसाठी सध्या प्रश्न असा आहे की, या उच्चांकावर सोनं विकावं की ठेवावं. तज्ज्ञांचे मत आहे की, पुढील काही महिने बाजारातील अस्थिरतेवर बारकाईने लक्ष ठेवणे आणि टप्प्याटप्प्याने गुंतवणुकीचा विचार करणे अधिक शहाणपणाचे ठरेल. यामुळे सोन्यात गुंतवणूक करताना विशेष काळजी घ्यावी लागणार आहे.

16/10/2025

शेअर बाजारात मोठी वाढ!

भारतीय शेअर बाजारात आज पुन्हा एकदा उत्साहाचं वातावरण पाहायला मिळालं. चांगले तिमाही निकाल, परदेशी गुंतवणूकदारांची खरेदी आणि अमेरिकन फेडरल रिझर्व्हकडून व्याजदर कपातीच्या अपेक्षांमुळे बाजारात प्रचंड वाढ झाली.

सेन्सेक्स 862 अंकांनी वाढला

आजच्या व्यवहारात BSE Sensex तब्बल 862.23 अंकांनी वाढून 83,467.66 वर बंद झाला. तर Nifty 50 नेही 261.75 अंकांची वाढ घेत 25,585.30 चा टप्पा गाठला. परदेशी गुंतवणूकदारांनी पुन्हा खरेदीचा मोर्चा सुरू केल्याने गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढला आहे.

फक्त दोन दिवसांत ₹7 लाख कोटींची वाढ

गेल्या दोन दिवसांत बाजारात सलग तेजी पाहायला मिळाली आहे. या काळात Sensex सुमारे 1,430 अंकांनी म्हणजेच 1.75% ने वाढला. BSE वर लिस्टेड कंपन्यांचे एकत्रित मार्केट कॅप ₹4,59,67,652 कोटींनी वाढून ₹4,66,70,952 कोटींवर पोहचले. म्हणजेच गुंतवणूकदारांची संपत्ती तब्बल ₹7.03 लाख कोटींनी वाढली आहे.

कोणते शेअर्स चमकले?

आजच्या व्यापारात सेन्सेक्समधील बहुतेक शेअर्स हिरव्या रंगात बंद झाले. सर्वाधिक खरेदी Titan Company, Kotak Mahindra Bank, Axis Bank, Adani Ports आणि Mahindra & Mahindra मध्ये झाली. तर Eternal, Bharti Airtel आणि Infosys चे शेअर्स घसरणीसह लाल रंगात बंद झाले.

मिडकॅप आणि स्मॉलकॅपमध्येही तेजी

आज NSE Midcap 100 निर्देशांक 0.46% ने वाढला, तर Smallcap 100 मध्ये 0.24% ची वाढ झाली. लहान आणि मध्यम आकाराच्या कंपन्यांमध्ये गुंतवणूकदारांचा उत्साह वाढताना दिसला. सेक्टरनिहाय पाहिल्यास जवळपास सर्वच निर्देशांक आज हिरव्या रंगात बंद झाले. सर्वाधिक वाढ Nifty FMCG Index मध्ये झाली. त्याचबरोबर Auto आणि Realty क्षेत्रांतील शेअर्समध्येही जोरदार खरेदी झाली.

शेअर बाजारातील तेजीचे कारणं काय?

गुंतवणूकदारांना आशा आहे की अमेरिकन फेडरल रिझर्व्ह या महिन्याच्या अखेरीस होणाऱ्या बैठकीत व्याजदरात कपात करेल.

अनेक भारतीय कंपन्यांचे तिमाही निकाल अपेक्षेपेक्षा चांगले आले आहेत. परदेशी गुंतवणूकदार (FII) आणि देशांतर्गत गुंतवणूकदार (DII) या दोघांनीही मोठ्या प्रमाणावर खरेदी केली आहे. भारत-अमेरिका व्यापार चर्चेची शक्यता आहे.

या सर्व घटकांमुळेच शेअर बाजारात आज तेजी पाहायला मिळाली

16/10/2025

सोन्या-चांदीचे दर

जागतिक भू-राजकीय तणाव आणि सणासुदीच्या मागणीमुळे सोन्याच्या किमतीत सातत्याने वाढ सुरू आहे, तर 20 दिवसांच्या

 ISBN NO. 978-81-990957-8-6

तेजीनंतर चांदीच्या दरात मोठी घसरण पाहायला मिळत आहे.

याचा फायदा सणासुदीच्या काळात म्हणजेच दिवाळीच्या काळात होणार आहे, ग्राहकांना चांदीसह सोने खरेदीचा आनंद घेता येणार आहे. चला तर जाणून घेऊया याविषयी सर्व काही.

सोन्याचे दर आणि सर्वकालीन उच्चांक

सोन्याच्या किमतीत सलग १५ व्या दिवशीही वाढ नोंदवली गेली आहे. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन (IBJA) च्या आकडेवारीनुसार:

सद्यस्थिती (१६ ऑक्टोबर) : २४ कॅरेट सोन्याच्या १० ग्रॅमची किंमत आज ₹१,२७,२४७ झाली, जी काल ₹१,२६,७१४ होती. एका दिवसात यात ₹५३३ ची वाढ झाली आहे.

विक्रमी वाढ : सोन्याने ₹१,२७,२४७ रुपयांचा सर्वकालीन उच्चांक गाठला आहे.

वार्षिक वाढ : ३१ डिसेंबर २०२४ रोजी सोन्याची किंमत ₹७६,१६२ होती, जी आता ₹१,२७,२४७ वर पोहोचली आहे. म्हणजेच, या वर्षात सोन्याच्या किमतीत ₹५१,०८५ रुपयांची प्रचंड वाढ झाली आहे.

चांदीच्या दरात मोठी घसरण

सोन्याच्या तुलनेत चांदीच्या दरात मोठी अस्थिरता पाहायला मिळाली आहे.

२० दिवसांची तेजी खंडित : सलग २० दिवसांच्या तेजीनंतर चांदीच्या किमतीत आज दुसऱ्या दिवशी घसरण झाली आहे.

सद्यस्थिती काय : चांदीच्या किमती ₹३,१५० ने घसरून ₹१,७०,८५० प्रति किलो झाल्या, कालचा दर ₹१,७४,००० होता.

दोन दिवसांत चांदीचा दर एकूण ₹७,२५० ने घसरला. यापूर्वी, मंगळवार, १४ ऑक्टोबर रोजी चांदीने ₹१,७८,१०० चा सर्वकालीन उच्चांक गाठला होता. ३१ डिसेंबर २०२४ रोजी एक किलो चांदीची किंमत ₹८६,०१७ होती, जी आता ₹१,७०,८५० झाली आहे. या वर्षात चांदी ₹८४,८३३ ने महागली आहे.

सणासुदीच्या काळात मागणी

दिवाळी आणि धनत्रयोदशीच्या काळात सोने खरेदी करण्याची तीव्र इच्छा आणि शुभ मानले जात असल्याने किमती जास्त असूनही मागणी वाढली आहे. मध्य पूर्वेतील वाढती अशांतता, विविध देशांतील व्यापार युद्धाची चिंता आणि अमेरिकेच्या धोरणांबद्दलची अनिश्चितता यामुळे गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याकडे वळले आहेत. जगभरातील अनेक प्रमुख मध्यवर्ती बँका डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी त्यांच्या तिजोरीतील सोन्याचा साठा सातत्याने वाढवत आहेत.

17/10/2025

मध्यमवर्गीयांना हक्काचं घर मिळणार, मोदी सरकारची सर्वसामान्यांना दिवाळीची भेट

मोदी सरकारने दिवाळीपूर्वी मध्यमवर्गीयांना मोठी भेट दिली आहे. केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाने 'प्रधानमंत्री आवास योजना (पीएमएवाय)-शहरी २.०' या अंतर्गत १.४१ लाख अतिरिक्त घरे बांधण्यास मान्यता दिली आहे.

योजनेच्या अंतर्गत सरकार शहरी गरीब आणि मध्यमवर्गीयांना त्यांचे हक्काचे घर मिळवण्यास मदत होईल.

पीएम आवास योजनेअंतर्गत १.४१ लाख अतिरिक्त घरांच्या बांधकामाला मंजुरी देण्यात आली आहे. याशिवाय मंजूर झालेल्या निवासी युनिट्सची एकूण संख्या १० लाखांपेक्षा जास्त झाली आहे. अतिरिक्त घरांच्या बांधकामासाठी १४ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यात आसाम, आंध्र प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, जम्मू-काश्मीर, पुद्दुचेरी, राजस्थान, तामिळनाडू, मध्य प्रदेश, मेघालय, हरियाणा, ओडिशा, उत्तराखंड आणि उत्तर प्रदेश यांचा समावेश आहे.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

ही योजना शहरी लाभार्थ्यांना घरे प्रदान करण्यास हातभार लावते. याशिवाय गरीब आणि असुरक्षित घटकांना परवडणारी पक्की घरे प्रदान करून जीवनमान सुधारण्यास मदत करते. याव्यतिरिक्त महिला सक्षमीकरणावर देखील लक्ष केंद्रित करते, असे मंत्रालयाने म्हटले आहे. १ सप्टेंबर २०२४ रोजी लागू झालेल्या या योजनेचे उद्दिष्ट पुढील पाच वर्षांत १ कोटी कुटुंबांना पक्की घरे प्रदान करण्याचे आहे. जे EWS, LIG किंवा MIG श्रेणींमध्ये येतात आणि ज्यांच्याकडे देशात कुठेही पक्के घर नाही, अशा लोकांना याचा फायदा होणार आहे. सरकारने या योजनेअंतर्गत एकूण २.५ लाख कोटी रुपयांची केंद्रीय मदत वाटप केली आहे.

पीएस आवास योजनेमध्ये अनुक्रमे ₹३ लाख, ₹६ लाख आणि ₹९ लाखांपर्यंत वार्षिक उत्पन्न असलेले EWS, LIG आणि MIG श्रेणीतील कुटुंबे पात्र असतील. यातील अनुदानाची रक्कम थेट डीबीटीद्वारे पाच हप्त्यांमध्ये लाभार्थ्यांच्या कर्ज खात्यात जमा केली जाईल. ही सुविधा फक्त ५० टक्क्यांपेक्षा जास्त मूळ शिल्लक असलेल्या सक्रीय कर्ज खात्यांना लागू होईल. यामुळे हफ्ता कमी होणार नसला तरीही घरमालकीचे स्वप्न सोपे होईल.

17/10/2025

अफगाणी रुपया झाला बलशाली

दशकांपासून युद्ध, राजकीय अस्थिरता आणि आर्थिक संकटाचा सामना करणारा अफगाणिस्तान सध्या पाकिस्तानसोबत युद्धासारख्या परिस्थिती झुंजत आहे, ज्यामुळे दोन्ही देश हादरले आहेत. आरोप-प्रत्यारोपांचे सतत चक्र सुरू आहे, ज्यामध्ये कोणी किती चौक्या ताब्यात घेतल्या आणि कोणी किती सैनिक मारले याबद्दल आरोप केले जात आहेत. पण अलीकडेच अफगाणिस्तान कोणत्याही नवीन युद्ध किंवा दहशतवादामुळे नाही, तर मजबूत रुपयामुळे चर्चेत आला आहे.

हो, तोच अफगाणिस्तान, ज्याला आपण अनेकदा गरिबी आणि संकटाशी झुंज देण्यासाठी ओळखतो, तो आता जगातील सर्वात स्थिर चलनांपैकी एक बनला आहे. तालिबानच्या कठोर धोरण आणि स्थानिक व्यवहार प्रणालीमुळे हे शक्य झालं आहे.

अफगाणीची ताकद, भारतीय रुपयावर भारी

अफगाणी चलनाची ताकद आता भारतीय रुपयापेक्षा जास्त झाली आहे. चलन विनिमय वेबसाइट XE.com नुसार, 1 अफगाणी चलनाची किंमत = 1.33 भारतीय रुपये झाली आहे म्हणजेच अफगाणिस्तानातील कोणी 100,000 अफगाणी कमावते तर त्याचे भारतीय रुपयांमध्ये मूल्य अंदाजे 1.33 लाख रुपये आहे. हा आकडा, विशेषतः ज्या देशाची अर्थव्यवस्था गेल्या अनेक दशकांपासून अडचणीत अशा देशासाठी खरोखरच आश्चर्यकारक आहे.

अफगाणी चालनाने केली कमाल

अफगाणिस्तानला जगातील सर्वात गरीब देशांपैकी मानले जाते पण अलीकडेच्या घडामोडीने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे. अफगाणिस्तानमधील परिस्थिती लपून राहिलेली नाही तिथे बेरोजगारी, निरक्षरता आणि गरिबी मोठ्या प्रमाणात आहे तरीही, अफगाणिस्तानचे चलन भारतीय रुपयापेक्षा मजबूत आहे.

अफगाणकडून अमेरिकन डॉलरवर बंदी

तालिबान सरकारच्या आर्थिक धोरणामुळे अफगाणी चलन मजबूत झाले आहे. 2021 मध्ये सत्तेत आल्यानंतर तालिबानने अमेरिकन डॉलर आणि पाकिस्तानी रुपयाच्या वापरावर बंदी घातली आणि बहुतेक व्यवहार अफगाणीमध्येच करावेत असे आदेश दिले. या निर्णयामुळे परकीय चलनाची मागणी जवळजवळ संपुष्टात आली आणि स्थानिक चलनाचे महत्त्व वाढले.

अफगाणिस्तानची अर्थव्यवस्था लहान असूनही देशाचे चलन स्थिर आहे. मर्यादित आयात, फार कमी परकीय गुंतवणूक, आंतरराष्ट्रीय व्यापार जवळजवळ थांबलेला आणि स्थानिक चलनात होणारे देशांतर्गत व्यवहार या घटकांमुळे अफगाणीचे मूल्य घसरण्याऐवजी स्थिर राहिले आहे. म्हणूनच आज अफगाणी अफगाणी जगाचे लक्ष वेधून घेत आहे.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

गेल्या अनेक दशकांपासून आर्थिक आणि राजकीय संकटांशी झुंजत असलेला अफगाणिस्तान आता मजबूत आणि स्थिर रुपया, अफगाण अफगाणी (AFN) मुळे जगाचे लक्ष वेधून घेत आहे. तालिबान धोरणे आणि स्थानिक व्यवहारांमुळे भारतीय अफगाणी चलन रुपयापेक्षा कसे मजबूत झाले आहे याबाबत जाणून घेण्यात लोकांमध्ये उत्सुकता आहे.

देशातील या 7 राज्यांकडे सोन्याचा खजिना

बिहार तसे गरीब राज्य म्हणून ओळखले जाते. पण या राज्यात सोन्याचा मोठा साठा आहे. जमूई जिल्ह्यातील सोने खाणीत देशातील एकूण सोन्याचा 44 टक्के वाटा आहे. 222.8 दशलक्ष टन सोने येथून येते.

राजस्थान राज्यात 125.9 दशलक्ष टन सोन्याचा साठा आहे. भुकिया-जगपुरा या खाणी बनस्वारा जिल्ह्यात आहेत. सर्वाधिक सोन्याचा साठा असलेले राजस्थान हे दुसरे राज्य आहे.

कर्नाटकमधील खाणीतून 103 दशलक्ष सोने उत्पादन होते. कोलर, धारवाड, हसन आणि रायचूर जिल्ह्यात सोन्याच्या खाणी आहेत.
हुत्ती आणि कोलार या देशातील सर्वात गाजलेल्या सोने खाणी आहेत.

आंध्र प्रदेशाकडे 15 दशलक्ष टन सोन्याचा साठा आहे. रामगिरी ही सोन्याची खाण आहे. रायलसीमा भागात अजूनही सोन्याचा शोध सुरू आहे.

उत्तर प्रदेशात 13 दशलक्ष टन सोन्याचा साठा आहे. सोनभद्र जिल्ह्यातील खाणीत हा सोन्याचा साठा आहे.

पश्चिम बंगालकडे सोन्याचा 12 दशलक्ष टन साठा आहे. सोनापटा भागात हा सोन्याचा साठा आहे. येथे दुसरीकडेही सोन्याचा शोध सुरू आहे.

झारखंडकडे 10.08 दशलक्ष टन सोन्याचा साठा आहे. कुंदरकोचा या भागात सोने सापडते. अजूनही शोध मोहीम थांबलेली नाही.

18/10/2025

चीनने दुखती नस दाबताच अमेरिका नरमला! भारताकडे मागितली मदत

गेल्या काही काळापासून अमेरिकाभारतावर विविध कारणांवरून (उदा. आयात शुल्क, रशियाकडून तेल खरेदी) दबाव आणत होता. मात्र, आता चीनने अमेरिकेची 'दुखती नस' दाबल्यामुळे, अमेरिकेने नरमाईची भूमिका घेतली आहे.

भारतावर दबाव टाकणाऱ्या राष्ट्राध्यक्ष ट्रम्प भारताकडून मदतीची अपेक्षा करत आहे. चीनने 'रेअर अर्थ एलिमेंट्स'च्या निर्यातीवरील निर्बंध आणखी कठोर करण्याची घोषणा केली आहे, ज्यामुळे अमेरिका प्रचंड अस्वस्थ झाला आहे.

चीनने 'रेअर अर्थ' निर्बंधांची यादी वाढवली

'रेअर अर्थ' हे असे दुर्मिळ धातू आहेत, जे स्मार्टफोनपासून इलेक्ट्रिक वाहने, विंड टर्बाइन आणि संरक्षण उपकरणांपर्यंत अनेक अत्याधुनिक तंत्रज्ञानामध्ये वापरले जातात. चीनने यापूर्वी एप्रिलमध्ये सात 'रेअर अर्थ'च्या निर्यातीवर बंदी घातली होती, ज्यात सॅमेरियम, गॅडोलीनियम, टेरबियम, डिस्प्रोसियम, ल्यूटेटियम, स्कँडियम आणि यट्रियम यांचा समावेश होता. आता चीनने या यादीत आणखी पाच दुर्मिळ धातूंचा समावेश केला आहे, ज्यात होल्मियम, अर्बियम, थुलियम, युरोपियम आणि यटरबियम यांचा समावेश आहे.

अमेरिकेचे चीनवर प्रचंड अवलंबित्व

चीनच्या या निर्णयामुळे अमेरिका आणि जगातील इतर अनेक देशांवर मोठा परिणाम होणार आहे. अमेरिका आपल्या ७० टक्क्यांहून अधिक 'रेअर अर्थ'ची आयात चीनमधून करतो. चीनच्या या भूमिकेने अमेरिकेला प्रचंड चिंता वाटू लागली आहे. चीनच्या या निर्बंधांवर सुरुवातीला अमेरिकेने चिनी उत्पादनांवर १०० टक्के आयात शुल्क लावून प्रत्युत्तर दिले. मात्र, आता अमेरिकेचे

 ISBN NO. 978-81-990957-8-6

अर्थमंत्री स्कॉट बेसेंट यांनी या प्रकरणी भारताकडे मदतीची मागणी केली आहे.

अमेरिकेने भारताकडे का मागितली मदत?

सीएनबीसीला दिलेल्या एका मुलाखतीत अर्थमंत्री बेसेंट म्हणाले, "आम्ही युरोपियन मित्रदेश, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, भारत आणि आशियाई देशांसोबत चर्चा करू. चीनच्या या पावलाविरोधात आम्ही सर्वजण मिळून आमची प्रतिक्रिया देऊ." बेसेंट यांच्या मते, चीनचा हा निर्णय केवळ अमेरिकेसाठीच नव्हे, तर जगभरातील अनेक देशांसाठी चिंतेचा विषय आहे. 'रेअर अर्थ'चा पुरवठा जगभरात कायम राहावा, यासाठी सर्वांनी मिळून काम करणे आवश्यक आहे.

भारत आधीच अमेरिकेसोबत 'रेअर अर्थ' सहकार्यात सहभागी

भारत आधीच 'रेअर अर्थ'च्या पुरवठा साखळीत विविधता आणण्याच्या अमेरिकेच्या प्रयत्नांमध्ये सामील झाला आहे. २०१३ मध्ये, भारत औपचारिकपणे 'मिनरल्स सिक्युरिटी फायनान्स नेटवर्क' या संघटनेचा भाग बनला आहे. ही अमेरिकेच्या नेतृत्वाखालील एक संघटना आहे, जिचा उद्देश 'रेअर अर्थ'च्या पुरवठा साखळीला सुरक्षित करण्यासाठी सदस्य देशांमध्ये सहकार्य वाढवणे हा आहे.

चीनच्या या रणनीतिक खेळीमुळे 'रेअर अर्थ' जागतिक भू-राजकारणातील एक महत्त्वाचा घटक बनला आहे आणि यात भारताची भूमिका निर्णायक ठरू शकते.

18/10/2025

रशियन तेल खरेदी थांबवण्याच्या धमक्या देत भारताला दबावात ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना भारत जुमानत नसल्याचे पुन्हा सिद्ध झालं आहे.

भारताची ऑक्टोबरमधील रशियन तेल आयात पुन्हा वाढली असून, इतर देशांच्या तुलनेत रशियातून होणारी तेल खरेदी आजही सर्वाधिक असल्याचं आकडेवारीतून दिसून येत आहे. भारतीय रिफायनऱ्यांनीही सांगितलं की सरकारनं अद्याप रशियन तेल आयात थांबवण्याचे निर्देश दिलेले नाहीत.

ऑक्टोबरच्या सुरुवातीच्या केप्लर या जागतिक व्यापार विश्लेषण कंपनीच्या आकडेवारीनुसार, आयात पुन्हा वाढून १८ लाख बॅरल प्रतिदिन इतकी झाली असून ही सप्टेंबरच्या तुलनेत २.५ लाख बॅरल प्रतिदिन जास्त आहे.

पर्याय काय असू शकतो?

रशियन तेलाला पर्याय म्हणून मध्यपूर्व, अमेरिका येथून अधिक पुरवठा मिळू शकतो, पण खर्च वाढणे, वाहतुकीचा वेळ व खर्च वाढणे यामुळे हा पर्याय सध्या शक्य नाही.

रशिया भारताचा तेल'मित्र'

फेब्रुवारी २०२२ मध्ये रशियाने युक्रेनवर आक्रमण केल्यानंतर पाश्चात्य देशांनी रशियावर निर्बंध लावले. युरोपने रशियन तेलाकडे पाठ फिरवल्यामुळे रशियन तेल मोठ्या सवलतीत उपलब्ध झाले आणि भारताने या खरेदीत झपाट्याने वाढ केली. परिणामी, २०१९-२० मध्ये एकूण तेल आयातीत रशियाचा वाटा जेमतेम १.७% होता, तो २०२३-२४ मध्ये ४०% पर्यंत वाढला. रशिया भारताचा सर्वात मोठा तेल पुरवठादार ठरला.

रशियन तेल आयात अचानक थांबवणे भारतासाठी खर्चिक आणि जोखमीचे ठरेल. त्यामुळे सरकारनं थेट आदेश न दिल्यास रिफायनऱ्या रशियन तेलापासून दूर जाणार नाहीत.

19/10/2025

रिझर्व बँकांनी खरेदी केले 600 टन सोने ; किंमती आणखी वाढणार!

जागतिक अनिश्चित आर्थिक परिस्थितीमुळे विविध देशातील विशेषतः आशिया खंडातील देशाच्या रिझर्व बँकांकडून सोने खरेदी वाढली आहे. विविध देशांदरम्यान संघर्षाचे वातावरण कायम आहे. अमेरिकेत मंदीसदृश्य परिस्थितीमुळे व्याजदर कपात होणार आहे.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

अशा परिस्थितीत जागतिक बाजारात सोन्याचा दर नजीकच्या काळात 5,500 डॉलर व चांदीचा दर 75 डॉलर प्रति औंस या पातळीवर जाऊ शकतो.

ही माहिती मोतीलाल ओसवाल फायनान्शियल सर्व्हिसेस या कंपनीच्या अभ्यास अहवालात नमूद करण्यात आली आहे. विविध देशांच्या स्थूल अर्थव्यवस्था कमकुवत असतानाच अमेरिकेची आर्थिक परिस्थिती खराब असल्यामुळे अमेरिकेत व्याजदर कपात होणार आहे. त्यामुळे अगोदरच इतर चलनाच्या तुलनेत कमकुवत असलेला डॉलर आणखी कमकुवत होईल. त्याचबरोबर अमेरिकेच्या कर्जरोख्यावरील परतावा कमी होईल. अशा परिस्थितीत महागाईचा परिणाम होऊ नये यासाठी गुंतवणूकदार सोने आणि चांदीची खरेदी करीत आहेत.

या कंपनीचे विश्लेषक मानव मोदी यांनी सांगितले की, भारतात सध्या सोन्याचे दर 1.30 लाख रुपये या पातळीवर आहेत. रुपयाचे अवमूल्यन होत आहे. अशा परिस्थितीत नजीकच्या काळात सोन्याचा दर 1.35 लाख रुपये प्रति दहा ग्रॅम या पातळीवर जाऊ शकतो. या कालावधीत चांदीचा दर 2.3 लाख रुपयापर्यंत जाण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

रिझर्व बँकांकडून 600 टन सोने खरेदी – सर्वसामान्य गुंतवणूकदारांबरोबरच रिझर्व बँका सोने खरेदी करीत आहेत. या वर्षात रिझर्व बँकांनी 600 टन सोने खरेदी केले आहे.

त्याचबरोबर गुंतवणुकीसाठी सोयीच्या असलेल्या गोल्ड एक्सचेंज ट्रेडेड फंडात 450 टन सोन्याची खरेदी झाली आहे. यामुळे सोन्याचे दर इतक्या मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. रिझर्व बँकांचे अनुकरण किरकोळ गुंतवणूकदार आणि इतर संस्थागत गुंतवणूकदार करीत आहेत. अशा परिस्थितीत सोन्याच्या आणि चांदीच्या दरात बेसुमार वाढ होत आहे. यामुळे इतर गुंतवणूक साधनाच्या विश्वासार्हतेवर नकारात्मक परिणाम होऊ लागला आहे.

19/10/2025

एका घोटाळ्यामुळे ११७ वर्षांचा इतिहास संपुष्टात! 'हा' शेअर बाजार कायमचा बंद होणार; सेबीची विक्रीला मंजुरी

देशातील सर्वात जुन्या स्टॉक एक्स्चेंजपैकी एक असलेल्या कलकत्ता स्टॉक एक्सचेंजचा इतिहास आता संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे.

सुमारे दशकभर चाललेल्या कायदेशीर लढाईनंतर, CSE यावर्षी २० ऑक्टोबर रोजी आपली शेवटची 'काली पूजा' आणि 'दिवाळी' साजरी करण्याची शक्यता आहे. नियमांचे पालन न केल्यामुळे एप्रिल २०१३ मध्ये बाजार नियामक सेबीने कलकत्ता शेअर बाजारामधील कामकाज स्थगित केले होते.

पुन्हा कामकाज सुरू करण्याच्या अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतर आणि न्यायालयातील लढाईनंतर, आता एक्सचेंजने स्वेच्छेने आपले कामकाज बंद करण्याचा आणि स्टॉक एक्स्चेंजचा परवाना सेबीकडे परत करण्याचा निर्णय घेतला आहे.

स्वेच्छेने माघारीची प्रक्रिया पूर्ण

एक्सचेंजने २५ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत भागधारकांकडून बाजारातून माघार घेण्यासंदर्भात मंजुरी घेतली आहे. यानंतर सीएसईने सेबीकडे माघार घेण्यासाठी अर्ज केला आहे. सेबीने सध्या स्टॉक एक्स्चेंजचे मूल्यांकन करण्यासाठी एका मूल्यांकक एजन्सीची नियुक्ती केली आहे, हे काम अंतिम टप्प्यात आहे. सेबीकडून परवानगी मिळाल्यानंतर CSE एक 'होल्डिंग कंपनी' म्हणून काम करेल. तर, त्याची १००% मालकी असलेली उपकंपनी CCMPL, ही एनएसई आणि बीएसईचे सदस्य म्हणून आपले ब्रोकिंगचे काम सुरू ठेवेल, अशी माहिती सीएसईचे चेअरमन दीपांकर बोस यांनी दिली.

सीएसईचा गौरवशाली आणि वादग्रस्त इतिहास

१९०८ मध्ये स्थापित झालेले हे ११७ वर्षांचे ऐतिहासिक संस्थान एकेकाळी व्यावसायिक उलाढालीच्या बाबतीत बीएसईला टक्कर देत होते

 ISBN NO. 978-81-990957-8-6

आणि कोलकाताच्या आर्थिक वारसाचे ते प्रतीक मानले जात होते. केतन पारेख संबंधित १२० कोटींच्या घोटाळ्यानंतर कलकत्ता स्टॉक एक्स्चेंजमध्ये मोठी आर्थिक समस्या निर्माण झाली. अनेक ब्रोकर्स पेमेंटची जबाबदारी पूर्ण करू शकले नाहीत. यामुळे गुंतवणूकदार आणि नियामकांचा विश्वास तुटला, परिणामी ट्रेडिंग ॲक्टिव्हिटीमध्ये मोठी घट झाली.

आर्थिक मालमत्तेची विक्री

सेबीने ईएम बायपासवरील सीएसईच्या तीन एकर मालमत्तेला सृजन समूहाला २५३ कोटींमध्ये विकण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. तसेच, एक्स्चेंजने सर्व कर्मचाऱ्यांसाठी स्वेच्छानिवृत्ती योजना सुरू केली आहे, ज्यात २०.९५ कोटींचे एकरकमी पेमेंट समाविष्ट आहे. यामुळे कंपनीची वार्षिक सुमारे १० कोटींची बचत होणार आहे.

अनुभवी शेअर ब्रोकर सिद्धार्थ थिरानी यांनी याबद्दल बोलताना सांगितले की, "एप्रिल २०१३ मध्ये कामकाज स्थगित होईपर्यंत आम्ही दररोज ट्रेडिंगपूर्वी देवी लक्ष्मीची प्रार्थना करायचो. ही दिवाळी त्या संपूर्ण वारशाला निरोप देण्यासारखी आहे." सीएसईचा शेवट भारतीय भांडवली बाजाराच्या इतिहासातील एका युगाचा अंत म्हणून पाहिला जात आहे.

19/10/2025

ऑक्टोबरमध्ये एफपीआय गुंतवणूक ६ हजार कोटीच्या पुढे

शेअर बाजारातील सुरू असलेल्या तेजीमुळे ऑक्टोबर महिन्यात परदेशी गुंतवणूकदार (Foreign Portfolio Investors - FPI) मोठ्या प्रमाणात आकर्षित झाले आहेत. या महिन्यात एफपीआयने इक्विटी बाजारात ६,००० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक केली आहे.

नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (NSDL) यांनी जारी केलेल्या आकडेवारीनुसार, १७ ऑक्टोबरपर्यंत एफपीआयने ६,४८० कोटी रुपयांची निव्वळ गुंतवणूक भारतीय इक्विटी बाजारात केली. यापूर्वी सलग तीन महिने परदेशी गुंतवणूकदार शुद्ध विक्रेते (नेट सेलर्स) होते.

एफपीआयने सप्टेंबरमध्ये २३,८८५ कोटी, ऑगस्टमध्ये ३४,९९३ कोटी आणि जुलैमध्ये १७,७४१ कोटी रुपयांची विक्री केली होती. जिओजित इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेडचे मुख्य गुंतवणूक रणनीतीकार डॉ. वी. के. विजयकुमार म्हणाले, 'एफआयआयच्या धोरणातील या बदलाचे प्रमुख कारण म्हणजे भारत आणि इतर बाजारांमधील मूल्यांकनातील अंतर कमी होणे. मागील वर्षभरात भारताचा तुलनेने कमकुवत परफॉर्मन्स भविष्यात चांगल्या कामगिरीची संधी निर्माण करतो.'

गेल्या आठवड्यात भारतीय शेअर बाजारासाठी कामगिरी अत्यंत मजबूत राहिली आणि बाजार ५२ आठवड्यांच्या उच्चांकावर बंद झाला. या कालावधीत निफ्टी ४२४ अंकांनी (१.६८%) वाढून २५,७०९.८५ वर तर सेन्सेक्स १,४५१.३७ अंकांनी (१.७६%) वाढून ८३,९५२.१९ वर बंद झाला. सेक्टरनिहाय पाहता, निफ्टी रिअल्टी निर्देशांक ४.१४ % वाढीसह टॉप गेनर ठरला. त्याशिवाय निफ्टी ऑटो १.९०%, निफ्टी फायनान्शियल सर्व्हिसेस २.५९ %, निफ्टी FMCG ३.०० %, निफ्टी इन्फ्रा १,७०% आणि निफ्टी कन्झम्प्शन २.७३% वाढीसह बंद झाले.

रेलिगेअर ब्रोकिंग लिमिटेडचे वरिष्ठ उपाध्यक्ष (संशोधन) अजीत मिश्रा म्हणाले, 'महागाईतील सौम्यता, मजबूत देशांतर्गत आर्थिक निर्देशक आणि वेगाने वाढणारे कॉर्पोरेट उत्पन्न हे मध्यम कालावधीसाठी चांगले संकेत देतात. येणारा आठवडा घटनांनी परिपूर्ण असेल, ज्यात गुंतवणूकदारांसाठी अनेक महत्त्वाचे ट्रिगर्स असतील.'

19/10/2025

सणासुदीच्या काळात मिळाली भारतीय अर्थव्यवस्थेला गती

 ISBN NO. 978-81-990957-8-6

सणासुदीच्या काळात भारतातील अर्थव्यवस्थेला जोरदार गती मिळाली असून, जीएसटी सुधारणा लागू झाल्यापासून वाहन, सोनं आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील विक्रीने विक्रमी उंची गाठली आहे.

धनतेरस या शुभदिनी सोने-चांदीच्या विक्रीत मूल्याच्या दृष्टीने सुमारे २५ टक्क्यांची वाढ झाली, तसेच ऑटोमोबाईल उद्योगातही विक्रीचा आकडा लक्षणीयरीत्या वाढला आहे.

विश्लेषकांच्या मते, यंदा सोनं खरेदी करण्यासाठी ग्राहकांमध्ये नव्या उत्साहाची लाट दिसून येत आहे. अखिल भारतीय रत्न आणि दागिने घरगुती परिषद (GJC) च्या अहवालानुसार, अलीकडील किंमतीतील घसरणीनंतर सोनं आणि चांदीच्या खरेदीत मोठी उसळी दिसून आली आहे. जीजेसीचे अध्यक्ष राजेश रोकडे म्हणाले, 'आम्हाला अपेक्षा आहे की या सणासुदीच्या काळातील विक्री ५०,००० कोटी रुपयांहून अधिक जाईल. सोनं-चांदीच्या वाढत्या किंमती असूनही लोक लग्नसोहळे आणि गुंतवणुकीच्या उद्देशाने खरेदी करत आहेत.'

सोन्याच्या नाण्यां आणि हलक्या हॉलमार्क ज्वेलरीला मोठी मागणी मिळाली आहे, तर चांदीच्या नाण्यां व पूजेसाठी लागणाऱ्या वस्तूंच्या विक्रीत ४० टक्क्यांची वाढ झाली आहे. टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेइकल्स लिमिटेडचे मुख्य वाणिज्य अधिकारी अमित कामत यांनी सांगितले की, 'यंदा धनतेरस आणि दिवाळीच्या शुभ मुहूर्तानुसार दोन ते तीन दिवसांत वाहनांच्या मोठ्या प्रमाणात डिलिव्हरी होईल. मागणी अत्यंत मजबूत आहे आणि जीएसटी २.० सुधारांनी बाजाराला नवी गती दिली आहे. आम्ही या कालावधीत २५,००० पेक्षा जास्त वाहनांची डिलिव्हरी होईल अशी अपेक्षा करत आहोत.'

हुंडई मोटर इंडिया लिमिटेड (HMIL) चे संचालक आणि सीओओ तरुण गर्ग यांनी सांगितले की, 'ग्राहकांकडून प्रतिसाद अतिशय उत्साहवर्धक असून, सुमारे १४,००० वाहनांची डिलिव्हरी अपेक्षित आहे — जो मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे २० टक्क्यांनी अधिक आहे.' कन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (CAIT) च्या आकडेवारीनुसार, धनतेरसच्या दिवशी देशभरात सुमारे १ लाख कोटी रुपयांचा व्यापार झाला. यामध्ये केवळ सोने आणि चांदीच्या विक्रीचा वाटा ६०,००० कोटी रुपयांहून अधिक होता, तर स्वदेशी उत्पादनांच्या वाढत्या मागणीमुळे दिल्लीच्या बाजारांतच १०,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त व्यवहार नोंदवले गेले. एकूणच पाहता, सणाचा उत्साह, ग्राहकांचा विश्वास आणि जीएसटी २.० सुधारांचा परिणाम यामुळे या वर्षीचा सणासुदीचा हंगाम भारतीय अर्थव्यवस्थेसाठी सर्वात तेजस्वी आणि उत्साही ठरला आहे.

20/10/2025

MEIL ला कुवेतमध्ये मिळाले एवढ्या दशलक्ष महत्त्वपूर्ण प्रकल्पाचे काम; जागतिक ऊर्जा क्षेत्रात भारतीय कंपनीची यशस्वी वाटचाल

भारतीय पायाभूत सुविधा क्षेत्रातील आघाडीची कंपनी मेघा इंजिनिअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर्स लिमिटेड (MEIL) ने आंतरराष्ट्रीय स्तरावर आणखी एक ऐतिहासिक यश संपादन केले आहे.

कुवेत ऑइल कंपनी (KOC) कडून 225.5 दशलक्ष अमेरिकन डॉलर (KWD 69.23 दशलक्ष) किमतीचा महत्त्वाचा प्रकल्प MEIL ला मिळाला आहे.

या प्रकल्पाअंतर्गत पश्चिम कुवेतमधील तेलक्षेत्रांमध्ये गॅस स्वीटनिंग आणि सल्फर रिकव्हरी फॅसिलिटी (NGSF) ची रचना, बांधकाम, संचालन आणि देखभाल MEIL करणार आहे. हा प्रकल्प बिल्ड-ओन-ऑपरेट (BOO) तत्त्वावर राबविला जाणार असून, प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर KOC ला या सुविधांची खरेदी करण्याचा पर्याय उपलब्ध असेल.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

प्रकल्प 790 दिवसांत पूर्ण केला जाणार असून, त्यानंतर MEIL पाच वर्षांसाठी या सुविधांचे संचालन आणि देखभाल करेल. या सुविधेत शुद्ध केलेला वायू निर्जलीकरण करून मीना अहमदी रिफायनरी येथील LPG प्लांटमध्ये पाठवला जाणार आहे. हा प्रकल्प कुवेतच्या स्वच्छ इंधन उत्पादनाच्या धोरणांसह पर्यावरणीय सुरक्षिततेच्या मानकांचे पालन करणार आहे.

MEIL ने या प्रकल्पाद्वारे मध्य पूर्वेतील तेल व वायू क्षेत्रातील आपली उपस्थिती अधिक बळकट केली आहे. याआधी राजस्थान आणि मंगोल रिफायनरीसाठी SRU प्रकल्प यशस्वीरित्या राबवून MEIL ने हायड्रोकार्बन क्षेत्रातील आपली तांत्रिक कौशल्य सिद्ध केली आहे.

MEIL भारताबरोबरच आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील सक्रिय आहे. मंगोलिया, टांझानिया, आणि इतर अनेक देशांमध्ये पिण्याचे पाणी, ऊर्जा, व हायड्रोकार्बन क्षेत्रातील प्रकल्प पूर्ण करून कंपनीने जागतिक पायाभूत सुविधा क्षेत्रात आपले नाव उंचावले आहे. अशा प्रकल्पांमुळे भारताच्या पायाभूत सुविधा क्षेत्राला जागतिक स्तरावर नवी ओळख प्राप्त होत आहे आणि भारतीय कंपन्यांच्या आंतरराष्ट्रीय कामगिरीला चालना मिळते आहे.

MEIL चे या यशामुळे केवळ कंपनीचा विश्वास वाढला नाही तर भारताच्या इंजिनिअरिंग आणि ऊर्जा क्षेत्रातील कौशल्यही जागतिक स्तरावर अधोरेखित झाले आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर कुवेतमधील ऊर्जा उत्पादनात सुधारणा होईल तसेच पर्यावरणीय सुरक्षिततेच्या मानकांचे पालन सुनिश्चित होईल. MEIL चे नेतृत्व, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, कार्यक्षम प्रकल्प व्यवस्थापन आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कामगिरीमुळे या प्रकल्पाचे यश निश्चित आहे.

यामुळे MEIL ने जागतिक ऊर्जा क्षेत्रात आपली प्रतिष्ठा आणि विश्वासार्हता अधिक बळकट केली आहे, आणि भारतीय पायाभूत सुविधा क्षेत्रासाठी ही आणखी एक गौरवशाली कामगिरी ठरली आहे.

RBI

भारतीय रिझर्व्ह बँकेचा (RBI) सोन्याचा साठा पहिल्यांदाच 100 अब्ज डॉलर्सच्या पुढे गेला आहे. त्याचबरोबर देशाचा एकूण परकीय चलनसाठा (Forex Reserves) 10 ऑक्टोबर 2025 रोजी संपलेल्या आठवड्यात 697.784 अब्ज डॉलर्सवर पोहोचला असल्याची माहिती RBIने दिली आहे.

RBI च्या साठ्यातील सोन्याच्या मालमत्तेची किंमत 3.595 अब्ज डॉलर्सने वाढून 102.365 अब्ज डॉलर्सवर पोहचली आहे. ही वाढ जागतिक बाजारातील सोन्याच्या भाव वाढीमुळे झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचे भाव प्रथमच 4,300 डॉलर्स प्रति औंसच्या वर गेले आहेत.

भारताच्या एकूण परकीय चलनसाठ्यात सोन्याचा हिस्सा आता 14.7 टक्क्यांवर पोहचला आहे - 1996-97 नंतरचा हा सर्वाधिक हिस्सा आहे. मागील दहा वर्षांत सोन्याचा वाटा जवळपास दुपटीने वाढला आहे. यामागे दोन मोठे घटक आहेत - RBI कडून सातत्याने सोन्याची खरेदी आणि जागतिक बाजारातील सोन्याच्या किमतींमध्ये झालेली झपाट्याने वाढ.

विशेष म्हणजे, या वर्षी RBI ने सोन्याची खरेदी पूर्वीपेक्षा कमी केली आहे. जागतिक सुवर्ण परिषदेच्या (World Gold Council) आकडेवारीनुसार, 2025 मध्ये जानेवारी ते सप्टेंबर या कालावधीत RBI ने फक्त 4 टन सोनं विकत घेतलं, तर याच कालावधीत 2024 मध्ये ही खरेदी तब्बल 50 टनांपर्यंत होती.

दरम्यान, एकूण परकीय चलनसाठ्यात या आठवड्यात 2.17 अब्ज डॉलर्सची घट झाली आहे

 ISBN NO. 978-81-990957-8-6

आणि तो 697.784 अब्ज डॉलर्सवर आला आहे. यातील सर्वात मोठा घटक असलेला परकीय चलन मालमत्ता (Foreign Currency Assets - FCA) सुमारे 5.6 अब्ज डॉलर्सनी घसरून 572.103 अब्ज डॉलर्सवर आला आहे.

गेल्या काही वर्षांत भारताच्या परकीय चलनसाठ्यात चढ-उतार झाले आहेत. 2023 मध्ये भारताने आपल्या चलनसाठ्यात 58 अब्ज डॉलर्सची भर घातली होती, तर 2022 मध्ये 71 अब्ज डॉलर्सची घट झाली होती. 2024 मध्ये या साठ्यात 20 अब्ज डॉलर्सची वाढ झाली होती, आणि आतापर्यंत 2025 मध्ये साठा एकूण 47.8 अब्ज डॉलर्सने वाढला आहे.

RBI आपल्या परकीय चलनसाठ्याचा वापर रुपयाचे मूल्य नियंत्रित ठेवण्यासाठी करते. रुपया मजबूत असताना RBI डॉलर खरेदी करते आणि रुपया घसरल्यास डॉलर विकून बाजारातील स्थिरता कायम ठेवते. या वाढीमुळे भारताने जागतिक पातळीवर सोन्याच्या साठ्याचा ऐतिहासिक टप्पा पार केला आहे, तसेच जागतिक अस्थिरतेच्या काळातही चलन स्थिर ठेवण्याची RBI ची क्षमता वाढली आहे.

21/10/2025

Success Story

दोन पिकांच्या लागवडीत केला बदल, अनुभवी शेतकऱ्याचा फॉर्म्युला ठरला हिट, करतायत वर्षाला 1 कोटीची उलाढाल

शेतकऱ्यांना उत्तम मोबदला देणारे पीक घेण्यात अडचणी येत आहे. त्यामुळेच एका शेतकऱ्याने लागवडीची पद्धत बदलली. शेतीत प्रयोग केले आणि त्याला यश मिळाले. वर्षाला ते 1 कोटींची उलाढाल करत आहेत.

ऊस आणि केळीच्या शेतीत नाविन्यपूर्ण प्रयोग करून वार्षिक 1 कोटी रुपयांहून अधिक कमाई केली आहे. पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम साधून ते टिकाऊ शेतीला प्रोत्साहन देत आहेत. इंटरक्रॉपिंग आणि यांत्रिकीकरणाचा वापर करून ते इतर शेतकऱ्यांसाठीही प्रेरणास्रोत ठरले आहेत.शेती क्षेत्रात आज अनेक आव्हाने आहेत. वाढता खर्च, हवामान बदल आणि बाजारातील अस्थिरता या समस्यांना शेतीला तोंड द्यावे लागत आहे. अशा परिस्थितीत उत्तर प्रदेशातील सीतापूर जिल्ह्यातील प्रगतीशील शेतकरी हिमांशु नाथ सिंह यांनी आपल्या विचारांनी आणि टिकाऊ शेती पद्धतींनी कृषी क्षेत्राला अत्यंत फायदेशीर व्यवसायात रूपांतरित केले आहे. आपल्या 10 हेक्टर जमिनीवर ऊस आणि केळीची लागवड करून ते वार्षिक 1 कोटी रुपयांहून अधिक उलाढाल करत आहेत. हिमांशु यांनी केवळ स्वतःलाच नव्हे, तर इतर शेतकऱ्यांनाही प्रेरित केले आहे.40 वर्षांचा शेतीचा अनुभव

हिमांशु नाथ सिंह एका शेतकरी कुटुंबातून येतात. या कुटुंबाला उसाच्या शेतीत 40 वर्षांचा अनुभव आहे. त्यांनी आपल्या वडिलांकडून पारंपरिक शेतीचे ज्ञान घेतले. मात्र, हिमांशु यांनी त्यात विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा समावेश केला. त्यांनी लवकरच हे ओळखले की शेतीला प्रासंगिक आणि फायदेशीर ठेवण्यासाठी नवनवीन कल्पनांची गरज आहे.

त्यामुळे त्यांनी सेंद्रिय आणि रासायनिक खतांच्या संतुलित मिश्रणाचा वापर सुरू केला. यात शेणखत, सेंद्रिय खत, जीवामृत आणि घन जीवामृत यांचा समावेश आहे.हा दृष्टिकोन केवळ त्यांच्या जमिनीला पोषण देत नाही, तर दीर्घकाळात स्थिरता देखील सुनिश्चित करतो.

हिमांशु यांच्या यशामागे एक प्रमुख कारण म्हणजे उसाच्या शेतीकडे पाहण्याचा त्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन. ते लागवडीची वेळ, बियाण्यांमधील अंतर आणि जमिनीतील पोषण यावर विशेष लक्ष देतात. ते सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यापासून ऑक्टोबर दरम्यान उसाची लागवड करण्यास प्राधान्य देतात. त्यांना वाटते की चांगल्या उत्पादनासाठी हा सर्वोत्तम काळ आहे.

हिमांशु 0118, 14235 यांसारख्या प्रगत जातींचा वापर करतात. या जाती रोगप्रतिकारक

 ISBN NO. 978-81-990957-8-6

आणि अधिक उत्पादन देणाऱ्या आहेत. ते प्रति हेक्टर 2,470 क्विंटल उसाचे उत्पादन घेतात. 10 हेक्टरवरील शेतीतून केवळ उसापासून त्यांची एकूण वार्षिक उलाढाल 1 कोटी रुपयांहून अधिक आहे. उसासोबतच हिमांशु केळीचीही शेती करतात, ज्यामुळे त्यांची कमाई वाढते. तसेच जमिनीतील जैवविविधता सुधारते.

आपल्या पिकांसोबत बटाटा, कोबी, फुलकोबी आणि मोहरी यांसारख्या भाज्यांची आंतरपीक पद्धतीखाली लागवड करतात. यामुळे केवळ जमिनीची सुपीकता सुधारत नाही, तर उत्पन्नाचे अतिरिक्त स्रोतही उपलब्ध होतात.ते केळीच्या शेतीतही सेंद्रिय उत्पादनांचा वापर करतात. यामुळे फळांची गुणवत्ता आणि बाजारभाव वाढतो. हिमांशु यांच्या यशाने हे सिद्ध केले आहे की योग्य ज्ञान, समर्पण आणि आधुनिक पद्धतींनी शेतीला अत्यंत यशस्वी आणि सन्मानजनक व्यवसाय बनवता येतो.

IT सेक्टरमध्ये तेजीचे संकेत, Wipro कंपनीचा नफा 3,243 कोटींवर, महसूलात 2 टक्के वाढ

देशातील आघाडीच्या आयटी कंपन्यांपैकी एक असलेल्या विप्रोने २०२६ या आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीचे (जुलै-सप्टेंबर) निकाल जाहीर केले आहेत. दुसऱ्या तिमाहीत कंपनीला ३,२४६.२ कोटी रुपयांचा नफा झाला आहे, जो गेल्या वर्षीच्या याच तिमाहीपेक्षा १% जास्त आहे.

गेल्या वर्षी याच तिमाहीत कंपनीला ३,२०८.८ कोटी रुपयांचा नफा झाला होता. दरम्यान, कंपनीचे ऑपरेटिंग उत्पन्न, म्हणजेच ऑपरेशनल महसूल, या तिमाहीत २% वाढून २२,६९७.३ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. तथापि, खर्चातही २% पेक्षा जास्त वाढ झाली आहे आणि तो १९,३७७.८ कोटी रुपयांवर पोहोचला आहे.

आयटी क्षेत्रात चांगली कामगिरी

विप्रोच्या आयटी विभागाने या तिमाहीत चांगली कामगिरी केली. आयटी व्यवसायातून मिळणारा महसूल गेल्या वर्षीच्या ₹२२,२६२ कोटींच्या तुलनेत २% पेक्षा जास्त वाढून ₹२२,७५३ कोटी झाला. आयटी सेवांमधून मिळणारा महसूलही २% पेक्षा जास्त वाढून ₹२२,६४० कोटी झाला. तथापि, क्लायंट दिवाळखोरीमुळे कंपनीला ₹११६.५ कोटी ($१३.१ दशलक्ष) तोटा सहन करावा लागला, ज्यामुळे आयटी सेवांमध्ये ऑपरेटिंग मार्जिन १६.७% झाला. हा तोटा वगळता, मार्जिन १७.२% होता, जो वर्षानुवर्षे ०.४% वाढ आणि तिमाही-दर-तिमाही ०.१% घट दर्शवितो.

कंपनीची प्रति शेअर कमाई (EPS) ₹३.१ ($०.०३) होती, जी वर्षानुवर्षे १% वाढली परंतु तिमाही-दर-तिमाहीत २.५% कमी होती. ऑपरेटिंग कॅश फ्लो ₹३,३९० कोटी ($३८१.५ दशलक्ष) होता, जो तिमाही-दर-तिमाहीत १७.६% आणि वर्षानुवर्षे २०.७% कमी होता. तरीही, तो निव्वळ नफ्याच्या १०३.८% होता, जो कंपनीच्या मजबूत आर्थिक स्थितीचे प्रतिबिंब आहे.

कंपनीने आपले लक्ष्य वाढवले

विप्रोचा अंदाज आहे की पुढील तिमाहीत आयटी सेवा महसूल $२,५९१ दशलक्ष ते $२,६४४ दशलक्ष दरम्यान असेल, जो स्थिर चलन अटींमध्ये -०.५% ते +१.५% वाढ दर्शवितो. या अंदाजात हर्मन डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन सोल्युशन्सच्या अलिकडच्या अधिग्रहणातून मिळालेल्या उत्पन्नाचा समावेश नाही.

मुख्य वित्तीय अधिकारी अपर्णा अय्यर म्हणाल्या की, विप्रो हळूहळू वाढीकडे परतत आहे. चारपैकी तीन स्ट्रॅटेजिक मार्केट युनिट्स (एसएमयू) ने तिमाहीत वाढ दर्शविली. मोठ्या डील बुकिंगने या वर्षाच्या पहिल्या सहामाहीत मागील संपूर्ण वर्षाच्या तुलनेत चांगली कामगिरी केली. सीईओ श्रीनिवास पालिया म्हणाले की, युरोप आणि एपीएमईए (आशिया पॅसिफिक, मध्य पूर्व आणि

 ISBN NO. 978-81-990957-8-6

आफ्रिका) मध्ये महसूल वाढला आहे आणि कंपनी एआयच्या क्षेत्रात प्रगती करत आहे.

22/10/2025

टॉप क्लास बिजनेस आयडिया!

लोक सहसा असे गृहीत धरतात की व्यवसाय सुरू करण्यासाठी खूप पैसे लागतात. पण असं काही नाही आहे तुम्ही फक्त 50,000 रुपयांनी यशस्वी व्यवसाय सुरू करू शकता. त्यासाठी फक्त योग्य कल्पना आणि काही नियोजन आवश्यक आहे, जे तुम्हाला चांगले उत्पन्न मिळविण्यात मदत करू शकते.

असे अनेक छोटे व्यवसाय आहेत जे दरमहा 25,000 ते 30,000 रुपये सहज कमवू शकतात. जर तुम्हाला हवे असेल तर तुम्ही कमी गुंतवणुकीत अगरबत्ती बनवण्याचा व्यवसाय सुरू करू शकता. फक्त 50,000 रुपये गुंतवा आणि यंत्रसामग्री, कच्चा माल आणि पॅकेजिंग खरेदी करा. सण आणि सुट्टीच्या काळात याची सतत मागणी असते.

तुम्ही तुमच्या स्वयंपाकघरातूनच पापड, लोणचे आणि नमकीनचा व्यवसाय सुरू करू शकता. या वस्तूंना वर्षभर मागणी असते. साहित्य, पॅकेज आणि ब्रँड सहज खरेदी करण्यासाठी 50,000 रुपये पुरेसे आहेत. सोशल मीडिया आणि स्थानिक बाजारपेठेद्वारे विक्री वाढवून, तुम्ही दरमहा 30,000 रुपयांपर्यंत कमाई करू शकता.

आजकाल प्रत्येकाकडे स्मार्टफोन आहे आणि मोबाईल ॲक्सेसरीजची दररोज गरज असते.50,000 रुपयांनी एक छोटी दुकान उघडा आणि ऑनलाइन विक्री सुरू करा. चार्जर, कव्हर आणि इअरफोन्स सारखी उत्पादने चांगली नफा देतात.

जर तुमच्याकडे लहान जमीन असेल तर सेंद्रिय भाजीपाला शेती हा एक चांगला पर्याय आहे. कमी खर्चात बियाणे, खते आणि सिंचन खरेदी करून सुरुवात करा. निरोगी अन्नाची वाढती मागणी वाढत्या बाजारपेठेला चालना देत आहे. स्थानिक बाजारपेठा आणि हॉटेल्सना पुरवठा केल्याने चांगले उत्पन्न मिळू शकते.

शहरातील नोकरदार लोकांना घरगुती जेवण हवे असते. टिफिन सेवा हा एक उत्तम व्यवसाय पर्याय आहे. जेवण बनवून आणि डिलिव्हरी करून सुरुवात करा. चविष्ट जेवण आणि वेळेवर डिलिव्हरी केल्याने तुमचा ग्राहकवर्ग लवकर वाढतो. अशा प्रकारे, तुम्ही कमी वेळात चांगले उत्पन्न मिळवू शकता.

सजावटीच्या आणि सुगंधित मेणबत्त्यांची मागणी सतत वाढत आहे. तुम्ही मेणबत्त्यांचे साचे, मेण आणि सुगंधी तेल अगदी कमी किमतीत खरेदी करून घरी त्यांचे उत्पादन सुरू करू शकता. सण आणि भेटवस्तूंच्या हंगामात विक्री तेजीत असते. योग्य मार्केटिंगसह, तुम्ही दरमहा 30,000 रुपयांपर्यंत नफा कमवू शकता.

सप्टेंबरमध्ये बेरोजगारी वाढली! भारताचा दर 5.2 टक्क्यांवर, ग्रामीण भागात संकट तीव्र

सरकारी सर्वेक्षणानुसार, सप्टेंबर २०२५ मध्ये १५ वर्षे आणि त्यावरील वयाच्या लोकांसाठी बेरोजगारीचा दर किरकोळ वाढून ५.२ टक्क्यांवर पोहोचला.

सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने (MOSPI) जाहीर केलेल्या नियतकालिक कामगार दल सर्वेक्षण (PLFS) नुसार, ऑगस्टमध्ये बेरोजगारी दर (UR) ५.१ टक्के, जुलैमध्ये ५.२ टक्के आणि मे आणि जूनमध्ये ५.६ टक्के होता.

मे २०२५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या पहिल्या पीएलएफएस बुलेटिननुसार, एप्रिलमध्ये बेरोजगारीचा दर ५.१ टक्के होता. "१५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या लोकांमध्ये बेरोजगारीचा दर ऑगस्ट २०२५ मध्ये ५.१ टक्क्यांवरून सप्टेंबर २०२५ मध्ये किंचित वाढून ५.२ टक्क्यांपर्यंत पोहोचला. त्याआधी, सलग दोन महिने त्यात घट झाली होती," असे एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

चालू साप्ताहिक स्थिती (CWS) मध्ये गोळा केलेल्या नवीनतम आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की सप्टेंबरमध्ये १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या व्यक्तींसाठी बेरोजगारीचा दर ५.२ टक्के होता. सर्वेक्षणानुसार, ग्रामीण भागात १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या व्यक्तींमध्ये बेरोजगारी ऑगस्ट २०२५ मध्ये ४.३ टक्क्यांवरून सप्टेंबर २०२५ मध्ये ४.६ टक्क्यांपर्यंत वाढली. शहरी भागातही बेरोजगारी किंचित वाढली, ऑगस्टमध्ये ६.७ टक्क्यांवरून सप्टेंबरमध्ये ६.८ टक्के झाली.

महिलांमध्ये बेरोजगारीचा दर वाढला

सर्वेक्षणानुसार, १५ वर्षे आणि त्यावरील शहरी महिलांमध्ये बेरोजगारीचा दर सप्टेंबर २०२५ मध्ये ९.३ टक्क्यांवर पोहोचला आहे, जो ऑगस्ट २०२५ मध्ये ८.९ टक्के होता. ग्रामीण महिलांमध्ये वाढत्या बेरोजगारीमुळे एकूण महिला बेरोजगारीचा दरही वाढला आहे. सर्वेक्षणानुसार, ऑगस्ट २०२५ मध्ये ५.२ टक्के असलेला हा दर सप्टेंबरमध्ये ५.५ टक्क्यांवर पोहोचला आहे.

पुरुषांमधील बेरोजगारीचा दर पुन्हा किंचित वाढला

ऑगस्टमध्ये घट झाल्यानंतर, सप्टेंबर २०२५ मध्ये पुरुषांसाठी बेरोजगारीचा दर पुन्हा किंचित वाढला, असेही सर्वेक्षणात दिसून आले. ग्रामीण भागात तो ४.५% वरून ४.७% आणि शहरी भागात ५.९% वरून ६% पर्यंत वाढला.

सप्टेंबरमध्ये एकूण कामगार लोकसंख्या प्रमाण (WPR) ५२.४% होते, जे मे २०२५ नंतरचे सर्वोच्च प्रमाण आहे. ही वाढ महिला कामगारांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे झाली, विशेषतः ग्रामीण भागात. सर्वेक्षणात म्हटले आहे की १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या महिलांमध्ये एकूण कामगारांच्या संख्येत सलग तिसऱ्या महिन्यात वाढ झाली आहे. जून २०२५ मध्ये ३०.२% वरून सप्टेंबरमध्ये ते ३२.३% पर्यंत वाढले.

23/10/2025

ना जन... ना धन... खाती धूळखात; २६ टक्के लोक करतच नाहीत वापर

बँकांमध्ये उघडलेल्या प्रधानमंत्री जनधन योजना खात्यांपैकी तब्बल २६ टक्के खाती सप्टेंबर २०२५ अखेर निष्क्रिय अवस्थेत असल्याचे समोर आले आहे. एक वर्षापूर्वी हे प्रमाण २१ टक्के होते.

सप्टेंबर २०२५ पर्यंत पीएसबींमध्ये उघडलेल्या ५४.५ कोटी जनधन खात्यांपैकी सुमारे १४.२ कोटी खाती निष्क्रिय होती.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये सरकारी बँकांनी २ कोटी नवी जनधन खाती उघडण्याचं उद्दिष्ट ठेवलं असून, सप्टेंबरपर्यंत त्यापैकी १.३२ कोटी खाती (६६ टक्के) उघडली गेली आहेत. अर्थ मंत्रालयानं ऑगस्टमध्ये दिलेल्या निवेदनानुसार, देशातील एकूण जनधन खात्यांपैकी ६७ टक्के खाती ग्रामीण व अर्ध-शहरी भागात आहेत आणि ५६ टक्के खाती महिलांच्या नावावर आहेत.

उद्देश काय होता? ऑगस्ट २०१४ मध्ये सुरू केलेली जनधन योजना ही बँकिंग सेवांपासून वंचित लोकांना बँकिंग सुविधा उपलब्ध करून देणं हा उद्देश होता.

निष्क्रिय कधी मानतात?

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार, सलग दोन वर्षे ग्राहकाकडून कोणताही व्यवहार न झाल्यास बचत खातं निष्क्रिय मानलं जातं.
यापूर्वी याच वर्षी एप्रिल महिन्यात पीएसबींनी एकदाच केलेल्या कारवाईत सुमारे १५ लाख निष्क्रिय शून्य-शिल्लक जनधन खाती बंद केली होती.

जागतिक बँकेचा अहवाल काय सांगतो?

जुलैमध्ये प्रसिद्ध झालेल्या जागतिक बँकेच्या ग्लोबल फिनडेक्स २०२५ अहवालात असं नमूद केलंय की, भारतातील ३५ टक्के बँक खातेधारकांनी २०२१ मध्ये आपली खाती वापरली नव्हती. यात जनधन खात्यांचाही मोठा वाटा होता.

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'प्रधानमंत्री जन-धन योजनेला' १० वर्षे पूर्ण झाली असताना,

 ISBN NO. 978-81-990957-8-6

या योजनेबाबत एक मोठी आणि चिंताजनक बातमी समोर आली आहे. बँकिंग सेवा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणाऱ्या या योजनेत निष्क्रिय खात्यांची संख्या झपाट्याने वाढली आहे.

सप्टेंबर २०२५ च्या अखेरपर्यंत जन-धन योजनेतील निष्क्रिय खात्यांचे प्रमाण २६ टक्क्यांवर पोहोचले आहे, जे एका वर्षापूर्वी (सप्टेंबर २०२४) केवळ २१ टक्के होते.

निष्क्रिय खात्यांचा वाढता आकडा

बिझनेस स्टँडर्डमध्ये प्रकाशित झालेल्या माहितीनुसार, एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने दिलेल्या आकडेवारीनुसार, सप्टेंबर २०२५ पर्यंत सरकारी बँकांमध्ये जन-धन खात्यांची एकूण संख्या ५४.५५ कोटी होती. यापैकी तब्बल १४.२८ कोटी खाती निष्क्रिय आढळली आहेत. रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार, दोन वर्षांपेक्षा जास्त काळ ज्या बचत खात्यांमध्ये कोणताही व्यवहार झाला नाही, अशा खात्यांना निष्क्रिय किंवा 'डोरमंट अकाउंट' मानले जाते.

'या' बँकांमध्ये सर्वाधिक निष्क्रिय खाती

बँक निष्क्रिय खात्यांचे प्रमाण (सप्टेंबर २०२५)
बँक ऑफ इंडिया ३३ टक्के
युनियन बँक ३२ टक्के
स्टेट बँक ऑफ इंडिया २५ टक्के
इंडियन ओव्हरसीज बँक ८ टक्के
पंजाब अँड सिंध बँक ९ टक्के

स्टेट बँक ऑफ इंडियामध्येही निष्क्रिय खात्यांच्या टक्केवारीत वाढ झाली आहे. सप्टेंबर २०२४ मध्ये हे प्रमाण १९ टक्के होते, जे सप्टेंबर २०२५ मध्ये वाढून २५ टक्के झाले आहे.

खाते बंद होण्याची भीती

रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार, खाते उघडल्यानंतर दरवर्षी केवायसी करणे बंधनकारक असते. नुकतीच केवायसीसाठी ३० सप्टेंबरची अंतिम मुदत ठेवण्यात आली होती. निष्क्रिय खात्यांची संख्या वाढल्यामुळे, ज्यांनी वेळेवर केवायसी पूर्ण केले नाही, त्यांची खाती बँकांकडून बंद केली जाऊ शकतात.

तुम्ही काय करावे?

तुमचे खाते निष्क्रिय होऊ नये, यासाठी खात्यातून लहान-सहान रक्कम जमा करणे किंवा काढणे, असे व्यवहार नियमितपणे करत राहणे आवश्यक आहे.

प्रधानमंत्री जन-धन योजना म्हणजे काय?

गरिबांना आणि ग्रामीण भागातील लोकांना बँकिंग सेवांशी जोडण्यासाठी केंद्र सरकारने ही योजना सुरू केली.

शून्य शिल्लक वर खाते उघडण्याची सोय.
जमा रकमेवर व्याज.
₹१ लाखाचा अपघाती विमा कव्हर.
₹३०,००० चा जीवन विमा कव्हर.

सरकारी योजनांचे पैसे थेट खात्यात जमा होतात.

६ महिन्यांपर्यंत खाते व्यवस्थित चालवल्यावर ₹५,००० पर्यंत ओव्हरड्राफ्ट सुविधा.

खाते कोठे उघडावे?

कोणतीही व्यक्ती कोणत्याही सरकारी किंवा खासगी बँकेच्या शाखेत किंवा बँक मित्राच्या मदतीने हे खाते उघडू शकते.

24/10/2025

शेअर बाजारात जोरदार वाढ; सेन्सेक्स 575 अंकांनी वधारला, कोणते शेअर्स तेजीत

अमेरिकन फेडरल रिझर्व्ह व्याजदरात कपात करू शकते, या अपेक्षेमुळे बुधवारी भारतीय शेअर बाजारात जबरदस्त तेजी पाहायला मिळाली. दिवसअखेर बीएसई सेन्सेक्स 575 अंकांनी वाढत 82,605.43 या पातळीवर बंद झाला, तर निफ्टी 178 अंकांनी वाढून 25,323.55 वर स्थिरावला. अशा स्थितीत जर तुम्हीही येत्या दिवाळीत नवीन घर खरेदी करण्याच्या तयारीत असाल तर तुमच्यासाठी आजची बातमी खास ठरणार आहे.

Home Loan: दिवाळीत अनेक जण शुभ कार्य हाती घेत असतात. नवीन वाहन तसेच घर

ISBN NO. 978-81-990957-8-6

खरेदीसाठी देखील दिवाळीचा मुहूर्त काढला जातो.

आज आपण देशातील सर्वात स्वस्त होम लोन देणाऱ्या सरकारी व खाजगी बँकांची माहिती जाणून घेणार आहोत. यावर्षी आरबीआयने रेपो रेट मध्ये कपात करण्याचा निर्णय घेतला आहे.

यावर्षी आत्तापर्यंत रेपो रेटमध्ये एक टक्क्यांची कपात करण्यात आली असून याचा परिणाम म्हणून होम लोनसहीत सर्वच प्रकारच्या कर्जांचे व्याजदर कमी झाले आहेत.

याशिवाय बँका आणि वित्तीय संस्था होम लोनवर आकर्षक ऑफर देऊ करत आहेत. देशातील टॉप सरकारी आणि खाजगी बँका आपल्या ग्राहकांना 50 लाख रुपयांचे होम लोन 7.3% ते 9% व्याजदराने उपलब्ध करून देत आहेत.

मात्र बँकांचे व्याजदर हे तुमचे मासिक उत्पन्न, तुमची नोकरी सिबिल स्कोर अशा वेगवेगळ्या घटकांवर अवलंबून असतात. साधारणता 800 च्या आसपास सिबिल स्कोर असणाऱ्या ग्राहकांना बँकांकडून कमीत कमी व्याजदरात गृह कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे.

आता आम्ही तुम्हाला देशातील सर्वात कमी व्याजदरात गृह कर्ज उपलब्ध करून देणाऱ्या काही सरकारी आणि खाजगी बँकांची माहिती सांगणार आहोत.

बँकव्याजदर 50 लाख 20 वर्षांसाठी घेतल्यास EMI स्टेट बँक ऑफ इंडिया 7.5% 40,280 पंजाब नॅशनल बँक7.5% 40,280 बँक ऑफ बडोदा 7.45%40,127 युनियन बँक ऑफ इंडिया 7.30% 39,670 कॅनरा बँक 7.30% 39,670 ॲक्सिस बँक 8.35%42 हजार 918 कोटक महिंद्रा बँक 7.99%41 हजार 791HDFC बँक 7.90% 41 हजार 511ICICI बँक 7.70% 40,893

कु. पायलकौर जाधव
कु. साक्षी ठाकूर

25/10/2025

बचत खाते आणि चालू खाते, यात काय फरक? जाणून घ्या

तुम्ही बँक खाते उघडणार असाल तर त्यापूर्वी ही माहिती वाचा. चालू खाती आणि बचत खाती हे किरकोळ आणि खाजगी बँकिंगमधील बँक खात्यांचे दोन सर्वात सामान्य प्रकार आहेत. पण यापैकी तुमच्यासाठी कोणते योग्य आहे?

चला दोन्ही खात्यांची ठळक वैशिष्ट्ये समजून घेऊया आणि त्यांच्यातील फरक जाणून घेऊया, जेणेकरून आपण आपल्या आर्थिक उद्दीष्टे आणि गरजांनुसार योग्य निवड करू शकाल.

चालू खाते म्हणजे काय?

चालू खाते हे एक बँक खाते आहे जे विशेषतः व्यवसाय आणि मोठ्या कंपन्यांसाठी तयार केले जाते. हे खाते वारंवार आणि मोठे व्यवहार करण्यास मदत करते. यामध्ये तुम्ही सहजपणे पैसे जमा करू शकता, काढू शकता आणि पैसे हस्तांतरित करू शकता आणि त्यावर कोणतेही विशेष निर्बंध नाहीत.

चालू खात्यावर सामान्यत: व्याज मिळत नाही, परंतु ते ओव्हरड्राफ्ट सुविधा, चेक बुक आणि सुलभ ऑनलाइन बँकिंग यासारखे फायदे देते. ही खाती दैनंदिन व्यवसाय खर्च, पुरवठादारांना देयके आणि ग्राहकांकडून मिळालेल्या पैशाच्या व्यवहारांसाठी खूप उपयुक्त आहेत. उच्च व्यवहाराची मर्यादा आणि लवचिकतेसह, चालू खाते बँकिंग व्यवहार सुलभ आणि प्रभावी करते.

बचत खाते म्हणजे काय?

बचत खाते हे एक असे खाते आहे जे सामान्य व्यक्तींसाठी तयार केले जाते जेणेकरून ते त्यांचे पैसे सुरक्षित ठेवू शकतील आणि त्यावर व्याज देखील मिळवू शकतील. हे खाते लोकांना बचतीची सवय लावते आणि कालांतराने हळूहळू त्यांची रक्कम वाढवते.

हे पैसे जमा करणे, ATM पैसे काढणे, डेबिट कार्ड आणि ऑनलाइन बँकिंग यासारखी वैशिष्ट्ये प्रदान करते, ज्यामुळे खाते सोयीस्कर आणि प्रवेशयोग्य होते. ज्यांना आपत्कालीन निधी तयार

 ISBN NO. 978-81-990957-8-6

करायचा आहे, भविष्यातील उद्दिष्टांसाठी बचत करायची आहे किंवा फक्त त्यांचा अतिरिक्त निधी सुरक्षित ठेवायचा आहे त्यांच्यासाठी हे खाते आदर्श आहे.

चालू खाते आणि बचत खात्यातील फरक

1. व्याजदर

बचत खात्यात बँक ठेवीवर व्याज देते, ज्यामुळे तुमची बचत वाढते. त्याचबरोबर चालू खात्यावर व्याज मिळत नाही कारण हे खाते प्रामुख्याने आवर्ती व्यावसायिक व्यवहारांसाठी असते.

2. ओव्हरड्राफ्ट सुविधा

चालू खात्यात ओव्हरड्राफ्टची सुविधा आहे, म्हणजे आपण आपल्या खात्यात असलेल्या पैशापेक्षा एका विशिष्ट मर्यादेपर्यंत अधिक पैसे काढू शकता. हे वैशिष्ट्य व्यवसायासाठी अचानक खर्च हाताळण्यास मदत करते. बचत खात्यात ही सुविधा नाही.

3. ठेव आणि पैसे काढण्याची मर्यादा

बचत खात्यातील व्यवहाराची मर्यादा मर्यादित आहे, तर चालू खात्यात ठेव आणि पैसे काढण्याची मर्यादा जास्त आहे, जेणेकरून व्यवसाय मोठ्या प्रमाणात रोख व्यवहार सहजपणे करू शकतात.

4. मिनिमम बॅलन्स

बचत खात्यात कमी किमान शिल्लक आवश्यक आहे, ज्यामुळे ते सामान्य लोकांसाठी सुलभ आहे. चालू खात्यात किमान शिल्लक आवश्यक आहे कारण हे खाते मोठ्या प्रमाणात व्यवहारांसाठी बनविले गेले आहे.

चालू खाते आणि बचत खाते यापैकी एक कसे निवडावे?

आपल्या व्यवहार पद्धती आणि गरजांवर अवलंबून, आपण कोणते खाते निवडले पाहिजे. बचत खाते अशा व्यक्तींसाठी योग्य आहे ज्यांना पैसे वाचवायचे आहेत आणि त्यावर व्याज मिळवायचे आहे. हे खाते पगारदार लोकांसाठी किंवा नियमित उत्पन्न असलेल्या व्यक्तींसाठी योग्य आहे. त्यात मासिक व्यवहारांची मर्यादा असते आणि किमान शिल्लक ठेवावी लागते.

त्याच वेळी, चालू खाते व्यापारी, व्यावसायिक आणि ज्यांना वारंवार व्यवहार करण्याची आवश्यकता आहे त्यांच्यासाठी योग्य आहे. यात व्याज जमा होत नाही, परंतु ही खाती उच्च व्यवहार मर्यादा, चेक सुविधा आणि ओव्हरड्राफ्ट यासारखी वैशिष्ट्ये देतात जी अल्प-मुदतीच्या रोख गरजा पूर्ण करण्यास मदत करतात.

फरक हा आहे की वापर. जर तुम्हाला बचत आणि व्याज मिळवण्यासाठी खाते उघडायचे असेल तर बचत खाते ठीक होईल. पण रोजच्या व्यवसायाचे व्यवहार करायचे असतील तर चालू खाते अधिक उपयुक्त ठरते. दोन्ही खात्यांमध्ये किमान शिल्लक असू शकते, परंतु चालू खात्यात अधिक व्यवहारांना परवानगी मिळते.

26/10/2025

सोनं १० हजारांनी स्वस्त, चांदीच्या भावातही ३३ हजारांची घसरण; आज काय आहेत दर?

देशांतर्गत बाजारातही सोनं स्वस्त झालंय. तर चांदीचा दरही कमी झाला आहे. लग्नाच्या हंगामाआधी सोने-चांदीचे दर कमी झाल्यानं ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सोन्याचा दर २७ ऑक्टोबरला सायंकाळी १ लाख २१ हजार ७७ रुपये प्रति १० ग्रॅम इतका झाला होता. तर सोमवारी सकाळी हाच दर १ लाख २२ हजारांच्या वर होता. काही तासातच सोन्याचा दर १३२५ रुपयांनी कमी झाला. तर चांदी सोमवारी दिवसभरात प्रतिकिलो २९९९ रुपयांनी स्वस्त झाली. एक किलो चांदीचा दर सोमवारी सायंकाळी १ लाख ४५ हजार ३१ रुपये इतका होता.

गेल्या दहा दिवसात सोन्याचा दर जवळपास १० हजार रुपयांनी कमी झाला आहे. १७ ऑक्टोबरला २४ कॅरेट सोन्याचा दर १ लाख ३० हजार ८७४ रुपये इतका होता. तर सोमवारी सायंकाळपर्यंत ९ हजार ७९७ रुपयांच्या घसरणीसह तो १ लाख २१ हजारांवर पोहोचला.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

चांदीसुद्धा ३३ हजार रुपयांनी गेल्या दोन आठवड्यात स्वस्त झालीय. १४ ऑक्टोबरला चांदीचा दर १ लाख ७८ हजार १०० रुपये होता. तर सोमवारी हाच दर १ लाख ४५ हजारांवर पोहोचला.

ऐन सणासुदीला सोने - चांदीच्या दरात वाढ झाली होती. मात्र आता सण संपताच दरात मोठी घसरण झाली आहे. सण संपल्यानंतर दागिन्यांची मागणीही घटली आहे. त्यामुळे दर घसरल्याचा अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केलाय. याशिवाय आंतरराष्ट्रीय बाजारातील घसरणीमागे जागतिक परिस्थिती कारणीभूत असल्याचं म्हटलं जातंय. पण लाँग टर्ममध्ये सोने आणि चांदीच्या किंमतीत वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जातेय.

कु. राणी बुलबुले
कु. शैलेजा कोपलवाड

27/10/2025

भारताच्या GDPपेक्षा Appleची मार्केट व्हॅल्यू जास्त

Appleचे बाजार भांडवल ४ ट्रिलियन डॉलरच्या वर पोहोचलं आहे. भारतीय चलनानुसार कंपनीचं बाजार मूल्य ३५२ लाख कोटी रुपयांवर पोहोचलंय. हा आकडा भारताच्या जीडीपी इतका आहे. वर्ल्ड बँकेच्या पोर्टनुसार भारताचा जीडीपी जवळपास ३.९१ ट्रिलियन डॉलर इतका आहे.

काउंटरपॉइंट रिसर्चच्या डेटानुसार, अमेरिका आणि चीनमध्ये iPhone17ची सुरुवातीची विक्री ही जुन्या मॉडेलच्या तुलनेत १४ टक्के जास्त झालीय. भारतासह जगभरात iPhone 17ला चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

बाजारमूल्य ४ ट्रिलियन डॉलरच्या वर पोहोचणारी ॲपल ही तिसरी कंपनी ठरली आहे. याआधी एनवीडिया आणि मायक्रोसॉफ्टने हा मैलाचा दगड गाठला आहे. एनवीडियाचं बाजारमूल्य ४१५ लाख कोटी रुपये इतकं आहे. तर मायक्रोसॉफ्टचं बाजारमूल्य ३५८ लाख कोटी रुपये आहे. या दोन्ही कंपन्या अनुक्रमे पहिल्या आणि दुसऱ्या स्थानावर आहेत.

ॲपलचे शेअर्स काही वेळासाठी २६९.८९ डॉलरवर पोहोचले होते. यामुळे कंपनीचं बाजारमूल्य ४.००५ ट्रिलियन डॉलरवर पोहोचलं. मात्र दिवसअखेर शेअर्स ०.१ टक्के वाढीसह बंद झाला. तर बाजारमूल्य ३.९९२ ट्रिलियन डॉलर इतकं झालं.

शेअर मार्केटमध्ये ही ॲपलच्या शेअर्समध्ये तेजी आयफोन १७ आणि आयफोन एअरच्या लोकप्रियतेमुळं आलीय. लाँचिंगच्या काही आठवड्याच्या आतच नव्या आयफोनने धुमाकूळ घातलाय. आयफोन एअरलासुद्धा चांगला प्रतिसाद मिळत आहे. ॲपल कंपनीच्या फायद्यात अर्धा वाटा हा आयफोनचा आहे.

ॲपलनं ९ सप्टेंबरला जागतिक बाजारात नवा आयफोन लाँच केला होता. यात आयफोन १७, आयफोन १७ प्रो, आयफोन १७ प्रो मॅक्स आणि आयफोन एअरचा समावेश आहे. आयफोन एअर हा स्लिम फोन असून यात बॅक पॅनेलवर सिंगल कॅमेरा आहे.

कु. कार्तिका पगडाला
कु. गजानन राजरवाड

28/10/2025

आठव्या वेतन आयोगात किती सदस्य असणार ? वेतन आयोग कधीपासून लागू होणार ?

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आठव्या वेतन आयोगाच्या संदर्भ अटींना मंजुरी दिली आहे. आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेपासून 18 महिन्यात शिफारशी केंद्र सरकारला सादर कराव्या लागणार आहेत.

आठवा वेतन आयोग लागू झाल्यास याचा 50 लाख केंद्रीय कर्मचारी आणि 69 लाख पेन्शनधारकांना फायदा होईल. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यासंदर्भात माहिती दिली.

8th Pay Commission Structure: आठव्या वेतन आयोगाची रचना कशी असणार?

आठवा केंद्रीय वेतन आयोग ही तात्पुरती संस्था आहे. या आयोगाला एक अध्यक्ष असेल, एक

ISBN NO. 978-81-990957-8-6

सदस्य (अर्धवेळ) आणि एक सदस्य सचिव असेल. या आयोगाची स्थापना जेव्हा होईल त्या तारखेपासून 18 महिन्यात शिफारशी सादर कराव्या लागतील. जर आवश्यकता असेल तेव्हा अंतिम शिफारशी सादर केल्यानंतर एखाद्या बाबीवर अंतरिम रिपोर्ट देखील द्यावा लागेल.

आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशी देताना या गोष्टींचा विचार करावा लागणार

आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशी सादर करताना अध्यक्ष, सदस्य, सचिव यांना देशातील आर्थिक स्थिती आणि वित्तीय विवेकाची गरज, विकासात्मक खर्च आणि कल्याणकारी उपाययोजना राबवण्यासाठी पुरेशी संसाधने आहेत का याची खात्री करण्याच गरज, योगदान न देणाऱ्या निवृत्तीवेतन योजनांचा विनाअनुदानित खर्ज, आठवा वेतन आयोग काही शिफारशींसह जी राज्य सरकारं स्वीकारतील त्यांच्या आर्थिक स्थिती जो परिणाम होऊ शकतो त्याचा विचार करणं. केंद्राच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि खासगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध असलेली सध्याची वेतन रचना, फायदे आणि कामाची परिस्थिती याचा विचार करावा लागेल.

आठव्या वेतन आयोगाचे अध्यक्ष कोण?

सुप्रीम कोर्टाच्या माजी न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई या आठव्या वेतन आयोगाच्या अध्यक्ष असतील. आयआयएम बंगळुरुच्या प्राध्यापक पलक घोष या सदस्य (अर्धवेळ) असतील. तर, पेट्रोलियम आणि नॅचुरल गॅस विभागाचे सचिव पकंज जैन हे सदस्य सचिव असतील.

दरम्यान, केंद्र सरकारनं आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्यानंतर तो 1 जानेवारी 2026 पासून लागू होऊ शकतो. तर, आयोगाच्या स्थापनेला मंजुरी केंद्रानं जानेवारी महिन्यात दिली होती.

कु. वैष्णवी औंढेकर
कु. शिवानी यादव

29/10/2025

आता अमेझॉनमध्ये लेऑफ्सचं वारं, 14000 कर्मचाऱ्यांना कामावरुन काढणार

अमेझॉन डॉट कॉम आयएनसी या कंपनीकडून कर्मचारी कपातीची आणखी एक फेरी राबवली जाणार आहे. अमेरिकेत ही दुसरी सर्वात मोठी कर्मचारी कपात असेल. कंपनी एआयमधील गुंतवणूक वाढवणार असल्यानं 14000 कर्मचाऱ्यांना कामावरुन कमी केलं जाईल.

अमेझॉन कंपनीकडे 1.56 दशलक्ष पूर्णवेळ आणि पार्ट टाईम कर्मचारी गेल्या वर्षीच्या अखेरपर्यंत होते. यापैकी अमेझॉनच्या कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांची संख्या 350000 इतकी आहे.

करोनाच्या काळात मागणी वाढल्यानं अधिक कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली होती.

यापूर्वी पुस्तक, उपकरणं आणि सेवा विभागातील कर्मचाऱ्यांची कपात करण्यात आली आहे.

अमेझॉनचे सीईओ अँडी जेस्सी यांनी जून महिन्यात जनेटिव्ह एआय टूल्सचा वापर सुरु करण्यात आला आहे. यामुळं पुढील काही वर्षात कॉर्पोरेट वर्कफोर्सची संख्या कमी होईल.

कु. प्रतीक्षा घरणे
कु. सावित्रा पावडे

29/10/2025

छठ पूजा सणादरम्यान देशभरात ५०,००० कोटींची उलाढाल

देशभरात छठ पूजेचा उत्साह दिसून आला. लोकांच्या उत्साहाचा परिणाम अर्थव्यवस्थेवर देखील दिसून आला. छठ पूजेच्या निमित्ताने बिहारसह देशभरात जोरदार खरेदी- विक्री झाल्याचे दिसून आले.

यामुळे व्यवसायाला गती मिळाली. कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (CAIT) च्या अहवालानुसार एकट्या बिहारमध्ये १५,०००

 ISBN NO. 978-81-990957-8-6

कोटी रुपयांचा व्यवसाय झाला. तर, देशभरातील उलाढाल ५०,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त झाली, असा अंदाज आहे.

मंगळवारी सकाळी उगवत्या सूर्याला प्रार्थना करून चार दिवस चालणाऱ्या छठ पूजा उत्सवाचा समारोप झाला. कॅटचा अंदाज आहे की एकट्या दिल्लीने अंदाजे ८,००० कोटी रुपयांची विक्री केली, तर बिहार आणि झारखंडने अनुक्रमे अंदाजे १५,००० कोटी रुपयांची विक्री केली. कॅटने जारी केलेल्या अहवालात व्यवसायाची माहिती देण्यात आली आहे. कॅट भारतात दरवर्षी सण आणि लग्नांवर किती खर्च केला जातो याची माहिती देते.

कॅटचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि दिल्ली चांदणी चौकचे खासदार प्रवीण खंडेलवाल यांनी सांगितले की, बिहार, झारखंड, पूर्व उत्तर प्रदेश आणि पूर्वांचल या पारंपारिक छठ पूजा सण प्रामुख्याने साजरा राज्यांमध्ये छठ दरम्यान चांगलाच व्यवसाय झाला. दरम्यान, दिल्ली आणि NCR प्रदेशातील मोठ्या पूर्वांचल लोकसंख्येने लक्षणीय व्यवसाय केला.

कॅटच्या मते, पूजा साहित्य, तात्पुरत्या संरचना, सुरक्षा आणि स्वच्छता सेवांवर मोठा खर्च झाला. पश्चिम बंगालमध्ये, स्थलांतरित समुदायांनी गंगेच्या काठावर भव्य उत्सव आयोजित केले. तर, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि राजस्थान सारख्या राज्यांमध्ये, तलाव आणि घाटांची दुरुस्ती करण्यात आली आणि नवीन सुविधा बांधण्यात आल्या. ओडिशा, कर्नाटक आणि तेलंगणामध्ये, स्थलांतरित लोकसंख्येमुळे स्थानिक बाजारपेठांमध्ये लक्षणीय खरेदी झाली.

छठ सणाचा आर्थिक परिणाम आता महानगरे आणि राज्यांमध्ये पसरला आहे, जिथे स्थलांतरित समुदायांमुळे स्थानिक वस्तूंची मागणी वाढली आहे. छठ सणाच्या खरेदीमध्ये केळी, ऊस, नारळ, हंगामी फळे, तांदूळ, धान्य इत्यादी कृषी उत्पादनांचा समावेश होता, तर प्रसाद आणि मिठाईमध्ये ठेकुआ, खीरचे साहित्य, लाडू, गुळाचे पदार्थ, टोपल्या, दिवे, पाने, फुले, मातीची भांडी, पॅकिंग साहित्य यासारख्या पूजा साहित्यांचा समावेश होता. घाट बांधकाम, प्रकाशयोजना, सुरक्षा, स्वच्छता, बोट सेवा इत्यादी उत्सवाशी संबंधित सेवांच्या व्यवसायात मोठी वाढ झाली.

30/10/2025

भारताचा रशियासोबत विमान निर्मीतीचा ऐतिहासिक करार

गेल्या काही महिन्यांपासून भारत आणि अमेरिकेतील व्यापारी संबंध चांगलेच ताणले आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर जवळपास ५० टक्के आयात शुल्क लादलं आहे. इतकचं नव्हे तर, भारताच्या व्यापार आणि आंतरराष्ट्रीय धोरणांवर सातत्याने टीका करत आहेत. याचा भारताला मोठ्या प्रमाणात आर्थिक फटकाही बसला आहे. त्यातच भारताने रशियाकडून तेल आयात करू नये, यासाठी ट्रम्प सतत दबावही टाकत आहेत. अशातच एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे.

भारत आणि रशिया यांनी विमाननिर्मिती क्षेत्रात एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (HAL) आणि रशियाच्या युनायटेड एअरक्राफ्ट कॉर्पोरेशन (UAC) यांच्यात सुखोई सुपरजेट SJ-100 या नागरी विमानाच्या संयुक्त निर्मितीसाठी ऐतिहासिक करार झाला आहे.

* भारत रशियात विमाननिर्मिती करार

* HAL आणि UAC यांच्यात सुखोई सुपरजेट SJ-100 या नागरी विमान निर्मिती करार

* या प्रकल्पाचे उद्दिष्ट प्रादेशिक हवाई संपर्क वाढवणे आणि देशांतर्गत विमान उत्पादनाला चालना देणे

या सामंजस्य करारानुसार दोन्ही देश नागरी विमान उद्योगातील सहकार्य वाढवणार आहेत. HAL आणि UAC यांच्या भागीदारीत तयार होणाऱ्या या प्रकल्पामुळे भारताला विमाननिर्मितीच्या क्षेत्रात स्वदेशी क्षमतांचा नवा टप्पा गाठता येणार आहे. या करारामुळे देशांतर्गत नागरी विमान वाहतूक क्षेत्रात मोठी क्रांती घडू

 ISBN NO. 978-81-990957-8-6

शकते, तसेच "मेक इन इंडिया" उपक्रमाला देखील बळ मिळेल, असा अंदाज तज्ञांनी व्यक्त केला आहे.

भारत आणि रशियामध्ये विमाननिर्मिती क्षेत्रात ऐतिहासिक सहकार्याचा नवा अध्याय सुरू झाला आहे. हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (HAL) आणि रशियाच्या युनायटेड एअरक्राफ्ट कॉर्पोरेशन (UAC) यांनी सुखोई सुपरजेट SJ-100 या नागरी प्रवासी विमानाच्या संयुक्त निर्मितीसाठी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

वृत्तानुसार, HAL आणि UAC यांच्या सहकार्यातून भारत आता SJ-100 नागरी विमानांचे उत्पादन सुरू करण्यासाठी सज्ज झाला आहे. या प्रकल्पाचे उद्दिष्ट प्रादेशिक हवाई संपर्क वाढवणे आणि देशांतर्गत विमान उत्पादनाला चालना देणे हे आहे.

तज्ञांच्या मते, या उपक्रमामुळे भारतातील नागरी विमान वाहतूक उद्योगासाठी नवीन युगाची सुरूवात होईल. प्रादेशिक विमानांच्या वाढत्या मागणीची पूर्तता होईल तसेच देशातील तांत्रिक कौशल्य, रोजगार आणि गुंतवणुकीच्या संधींनाही चालना मिळेल. हा करार "मेक इन इंडिया" आणि "आत्मनिर्भर भारत" या उपक्रमांना बळ देणारा ठरेल, असा अंदाज वर्तवला जात आहे.

रशियाची राजधानी मॉस्कोमध्ये आज राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी या करारावर स्वाक्षरी केली आहे. या कराराच्या माध्यामातून भारताने पहिल्यांदाच संपूर्ण प्रवासी विमानाचं उत्पादन करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. यासंबंधी हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडचे प्रभात रंजन आणि ओलेग बोगोमोलोव्ह यांच्या उपस्थित या भारत आणि रशिया सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

केंद्राच्या यूडीएएन योजनेअंतर्गत प्रादेशिक हवाई संपर्क वाढवण्यासाठी या निर्णयाला महत्त्वाची चाल मानली जात आहे. उद्योग तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, पुढील दशकात भारताला प्रादेशिक हवाई प्रवासाची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी या श्रेणीतील किमान २०० जेट्सची गरज भासेल. तसेच, हिंद महासागर क्षेत्रातील जवळच्या आंतरराष्ट्रीय गंतव्यस्थळांना सेवा देण्यासाठी सुमारे ३५० अतिरिक्त विमानांची आवश्यकता राहील. त्यामुळे हा करार भारताच्या विमानवाहतूक क्षेत्रासाठी एक निर्णायक आणि दूरगामी पाऊल ठरणार आहे.

31/10/2025

देशाच्या अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे महत्त्वपूर्ण योगदान

नीती आयोगाच्या मते, भारताच्या एकूण जीव्हीए (ग्रॉस व्हॅल्यू ॲडेड) मध्ये सुमारे ५५ टक्के योगदान देत सेवा क्षेत्र (Service Sector) देशाच्या आर्थिक विकासाचा मुख्य आधार बनले आहे.

नीती आयोगाच्या सर्व्हिसेस विभागाच्या प्रोग्राम डायरेक्टर डॉ. सोनिया पंत यांनी सांगितले, 'नीती आयोगात सर्व्हिसेस डिव्हिजन हे एक नवे विभाग आहे, जो विशेषतः सेवा क्षेत्रावर लक्ष केंद्रित करण्यासाठी स्थापन करण्यात आला आहे. हे क्षेत्र देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठे योगदान देणारे आणि अत्यंत महत्त्वाचे आहे.'

त्यांनी माहिती दिली की नीती आयोगाच्या सर्व्हिसेस विभागाने दोन अहवाल तयार केले आहेत. 'इंडियाज सर्व्हिसेस सेक्टर: इनसाइट फ्रॉम जीव्हीए ट्रेंड्स अँड स्टेट लेव्हल डायनॅमिक्स' आणि 'इंडियाज सर्व्हिसेस सेक्टर: इनसाइट फ्रॉम एम्प्लॉयमेंट ट्रेंड्स अँड स्टेट लेव्हल डायनॅमिक्स'. पंत यांनी सांगितले की हे दोन्ही अहवाल सेवा क्षेत्रातील उत्पादन आणि रोजगाराशी संबंधित स्वतंत्र मूल्यांकनावर आधारित आहेत.

अहवालात डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर सुधारण्याची, कुशल मानवी संसाधन (skilled human capital) वाढवण्याची, नवोन्मेष (innovation) इकोसिस्टम तयार करण्याची आणि व्हॅल्यू चेनमध्ये सेवा क्षेत्राचे एकत्रीकरण करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे. यामुळे भारत डिजिटल, व्यावसायिक आणि ज्ञान-आधारित सेवांमध्ये एक विश्वासार्ह जागतिक नेता म्हणून उदयास येऊ शकतो. नीती आयोगाच्या

 ISBN NO. 978-81-990957-8-6

अहवालात असे नमूद केले आहे की संरचनात्मकदृष्ट्या मागे राहिलेले राज्ये आता वेगाने प्रगती करणाऱ्या राज्यांच्या बरोबरीने पुढे येत आहेत. ही वाढती कन्वर्जन्सची प्रवृत्ती दाखवते की भारतातील सेवा क्षेत्रातील हा बदल सर्वसमावेशक (inclusive) होत आहे.

'इंडियाज सर्व्हिसेस सेक्टर: इनसाइट फ्रॉम एम्प्लॉयमेंट ट्रेंड्स अँड स्टेट लेव्हल डायनॅमिक्स' या शीर्षकाचा अहवाल सेवा क्षेत्रातील रोजगारावर केंद्रित आहे. हा अहवाल एनएसएस (२०११-१२) आणि पीएलएफएस (२०१७-१८ ते २०२३-२४) मधील आकडेवारीवर आधारित आहे. तो भारतातील सेवा क्षेत्रातील कार्यबलाबाबत लिंग, प्रदेश, शिक्षण आणि व्यवसाय या घटकांच्या संदर्भात दीर्घकालीन आणि बहुआयामी दृष्टीकोन प्रदान करतो.

संशोधनातून असे दिसते की सेवा क्षेत्र देशातील रोजगारवाढीचे आणि कोविड महामारीनंतरच्या आर्थिक पुनरुत्थानाचे प्रमुख केंद्र बनले आहे, तरी काही आव्हाने अजूनही कायम आहेत. हा अहवाल सेवा क्षेत्राला उत्पादनक्षम, उच्च-गुणवत्तेच्या आणि सर्वसमावेशक नोकऱ्यांचा प्रमुख चालक मानतो. तसेच भारतातील रोजगारातील बदल आणि २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र होण्याच्या भारताच्या ध्येयात सेवा क्षेत्राची निर्णायक भूमिका असल्यावरही तो भर देतो.

31/10/2025

सेन्सेक्स तब्बल 593 अंकांनी घसरला, तर निफ्टी 25,878 वर; कारण काय?

काल झालेल्या तेजीनंतर आज गुरुवारच्या(30 ऑक्टोबर) दिवशी देशांतर्गत शेअर बाजारात मोठी घसरण झाली. काल बाजारात चांगली वाढ झालेली. मात्र, आज ट्रम्प आणि जिनपिंग यांच्यात व्यापार चर्चा होण्याची शक्यता होती त्यामुळेच सकाळी सेन्सेक्स 247 अंकांच्या घसरणीसह तर निफ्टी 70 अंकांच्या घसरणीसह उघडला.

दिवसभर शेअर बाजार लाल रंगातच व्यवहार करत होता. शेवटी, 593 अंकांची घसरण होऊन सेन्सेक्स 84404.46 अंकांवर बंद झाला तर निफ्टी 176 अंकांच्या घसरणीसह 25,887.85 अंकांवर बंद झाला.

आजच्या दिवशी बाजारात बहुतेक क्षेत्रीय निर्देशांक खाली गेले. ज्यासाठी धातु, आयटी, फास्ट-मूविंग कंज्यूमर गुड्स (FMCG) आणि फार्मा शेअर्स प्रमुख कारण ठरले. तरीही PSU बँकांनी सकारात्मक प्रदर्शन करत बाजाराला थोडासा आधार दिला. यात Canara Bank या PSU बँक शेअरमध्ये 4% वाढ झाली.

Bharati Airtel सह अनेक शेअर्समध्ये घसरण

आजच्या सत्रात बहुतेक शेअर्समध्ये घसरण झाली. यात सेन्सेक्समधील मुख्यतः Bharti Airtel, Sun Pharma, Hindustan Unilever, Bajaj Finserv, Power Grid आणि Bajaj Finance यांचा समावेश आहे.

दरम्यान, Grindwell Norton, BHEL, Vaibhav Global Ltd, Five Star Business Ltd, L&T, BHEL, Adani Ports, UltraTech Cement, Maruti, आणि Titan हेच काही शेअर्स वाढीसाठी हिरव्या रंगात बंद झाले. तर, बाजारात L&T, SBI Insurance आणि Reliance शेअर्सची सर्वाधिक मागणी होती.

आज बाजारात घसरण का झाली?

1. अमेरिकन फेड रिझर्व्हकडून व्याजदर कपात, पण डिसेंबरबाबत अनिश्चितता -

अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हने बुधवारी व्याजदरात 25 बेसिस पॉइंट्स म्हणजेच 0.25% कपात करून तो 3.75% वर आणला. पण डिसेंबर महिन्यात पुन्हा दरकपात होईलच असे स्पष्टपणे सांगितले नाही. त्यामुळे गुंतवणूकदारांनी बाजारात जास्त रस दाखविला नाही.

2. सेन्सेक्स, निफ्टी उच्चांकामुळे बाजारात झालेल्या नफा-वसुलीचा प्रभाव

 ISBN NO. 978-81-990957-8-6

या महिन्यात सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्ही निर्देशांकांमध्ये 5% पेक्षा जास्त वाढ झाली होती. त्यामुळे गुंतवणूकदारांनी आज काही प्रमाणात शेअर विक्री करून नफा वसूल केला.

3. आशियाई बाजारात घसरण

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनी अध्यक्ष शी जिनपिंग यांच्या भेटीनंतर ट्रम्प यांनी चीनवरील आयात शुल्क 57% वरून 47% केले. तसेच जिनपिंग यांच्याशी सकारात्मक चर्चा झाल्याचे समजल्याने भारतासह आशियाई बाजारात घसरण झाली.

4. सेन्सेक्स F&O (फ्युचर्स अँड ऑप्शन्स) एक्स्पायरीचा दबाव

आज ऑक्टोबर महिन्याच्या सेन्सेक्स F&O कॉन्ट्रॅक्ट्सची एक्स्पायरी आहे. त्यामुळे ट्रेडिंगमध्ये अस्थिरता वाढली.

1 नोव्हेंबरपासून बदलणार 5 मोठे नियम

नोव्हेंबर 2025 पासून महत्वाच्या नियमांमध्ये बदलहोणार आहे. याचा थेट परिणाम तुमच्या खिशावर होणार आहे. यामध्ये आधार कार्ड, बँक अकाउंट, क्रेडिट कार्ड, आणि गॅस सिलेंडरच्या नियमांमध्ये बदल होणार आहे.

बदलणाऱ्या नियमांबद्दल जाणून घेऊयात सविस्तर माहिती.

1) आधार कार्ड: पहिला आणि सर्वात महत्त्वाचा नियम आधार कार्डबाबत आहे. आता तुम्हाला नाव, पत्ता, जन्म तारीख किंवा मोबाईल नंबर अपडेट करायचा असेल, तर आधार केंद्रावर जायची गरज नाही! सगळं काही ऑनलाईन करता येणार. UIDAI आता तुमची माहिती PAN कार्ड, पासपोर्ट, रेशन कार्डसारख्या सरकारी डेटाबेसला आपोआप चेक करेल. म्हणजे, कागदपत्रं मॅन्युअली अपलोड करण्याची झंझटच संपली. फक्त फिंगरप्रिंट किंवा डोळ्यांचा स्कॅन करायचा असेल, तरच केंद्रावर जावं लागेल. बाकीचं काम घरात बसून होईल!

2) SBI क्रेडिट कार्ड बदल: जर तुम्ही SBI क्रेडिट कार्ड वापरत असाल, तर हा नियमामुळे तुमचा खिसा थोडा हलका होऊ शकतो. Unsecured कार्डवर आता 3.75 टक्के चार्ज लागेल. यासोबत CRED, CheQ, Mobikwik सारख्या थर्ड पार्टी ॲप्समधून जर तुम्ही शाळा-कॉलेजची फी भरली, तर 1 टक्के एक्स्ट्रा चार्ज लागणार. पण, जर तुम्ही थेट शाळेच्या वेबसाइटवरुन किंवा त्यांच्या मशीनवर पेमेंट केलं, तर कोणताही चार्ज नाही. यासोबत 1,000 रुपयांपेक्षा जास्त रक्कम वॉलेटमध्ये लोड केली, तरी 1 टक्के शुल्क लागेल.

3) बँक नॉमिनीत बदल: बँक आणि लॉकरच्या नियमात मोठा 'मास्टरस्ट्रोक' झाला आहे. आता बँक अकाउंट, लॉकर आणि सेफ कस्टडीसाठी चार (4) लोकांना नॉमिनी बनवू शकता. आधी फक्त एकाच व्यक्तीला नॉमिनी करता यायचं. पण आता तुम्ही ठरवू शकता, की कोणाला किती हिस्सा द्यायचा.

4) म्युच्युअल फंडाबद्दल: तुम्ही जर शेअर बाजारात किंवा म्युच्युअल फंडात गुंतवणूक करत असाल, तर SEBI (सेबी) ने नियम कडक केले आहेत. AMC (ॲसेट मॅनेजमेंट कंपनी) चे मोठे अधिकारी, कर्मचारी किंवा त्यांचे नातेवाईक जर ₹15 लाखांपेक्षा जास्त व्यवहार करत असतील, तर ती माहिती कंपनीला त्यांच्या 'वरिष्ठ अधिकाऱ्याला' (Compliance Officer) द्यावी लागेल. याचा उद्देश एकच आहे - म्युच्युअल फंडात जास्त पारदर्शकता आणणे.

5) LPG, CNG, PNG - किंमत बदलणार: गॅसचे दरात महिन्याच्या 1 तारखेला जसा बदल होतो, तसाच LPG (गॅस सिलेंडर), CNG आणि PNG च्या किमतीतही बदल होण्याची शक्यता आहे. किमती वाढतात की कमी होतात, हे 1 नोव्हेंबरला कळेल. तर मित्रांनो, 1 नोव्हेंबरपासून हे 5 मोठे नियम लागू होतील. त्यामुळे क्रेडिट कार्ड

 ISBN NO. 978-81-990957-8-6

वापरताना जपून वापरा आणि बँक नॉमिनेशन लगेच 4 लोकांचं करून घ्या!

कु. राणी बुलबुले
कु. शैलेजा कोपलवाड

विश्व बचत दिवस

गभरात दरवर्षी ३१ ऑक्टोबर हा दिवस विश्व बचत दिवस म्हणून साजरा केला जातो। या दिवसाचा उद्देश लोकांना बचत करण्याची सवय लावणे हा आहे. जेणेकरून ते भविष्यासाठी, आपत्कालीन परिस्थितीसाठी किंवा वृद्धापकाळासाठी आर्थिक साठा तयार करू शकतील.

भारतामध्ये मात्र, ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या निधनानंतर हा दिवस ३० ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो.

काळानुसार बचतीच्या पद्धतींमध्ये मोठा बदल झाला आहे. बचत आता केवळ पैसे साठवण्यापुरती मर्यादित नसून ती गुंतवणूक-केंद्रित झाली आहे. अलीकडच्या काळात अनेक आर्थिक उपाय (financial solutions) सामान्य लोकांमध्ये लोकप्रिय होत आहेत. कोरोना महामारीच्या काळात एसआयपी (Systematic Investment Plan) लोकांमध्ये झपाट्याने लोकप्रिय झाले. यात कोणीही व्यक्ती दरमहा ठरावीक रक्कम एखाद्या म्युच्युअल फंडात किंवा गुंतवणुकीच्या इतर साधनांमध्ये जमा करतो. एसआयपीचा सर्वात मोठा फायदा म्हणजे कंपाउंडिंग (चक्रवाढ)चा लाभ. दीर्घकाळ नियमित गुंतवणुकीने मोठा निधी उभा करता येतो. म्युच्युअल फंडातील एसआयपी इन्फ्लो सप्टेंबर महिन्यात ४ टक्क्यांनी वाढून विक्रमी २९,३६१ कोटी रुपये झाला आहे, जो ऑगस्टमध्ये २८,२६५ कोटी रुपये होता.

असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया (AMFI) च्या आकडेवारीनुसार, सप्टेंबरमध्ये एकूण एसेट अंडर मॅनेजमेंट (AUM) वाढून ७५.६ लाख कोटी रुपये झाले, जे ऑगस्टमध्ये ७५.२ लाख कोटी रुपये होते. ईटीएफ (Exchange Traded Fund) मध्ये गुंतवणुकीचा कलही गेल्या काही वर्षांत वेगाने वाढला आहे. ईटीएफ म्हणजे विविध सिक्युरिटीजचा संग्रह, ज्यात निफ्टी५० सारखे इंडेक्स, सरकारी किंवा कॉर्पोरेट बाँड्स, तसेच सोने आणि चांदीसारख्या कमॉडिटीजचा समावेश असतो. वर्ल्ड गोल्ड कौन्सिलच्या आकडेवारीनुसार, भारताच्या गोल्ड ईटीएफ मध्ये ऑगस्ट २०२५ मध्ये २३३ दशलक्ष डॉलर्सचे निव्वळ गुंतवणूक प्रवाह (net inflow) नोंदले गेले, जे जुलैतील १३९ दशलक्ष डॉलर्सपेक्षा ६७ टक्के अधिक आहे. याशिवाय, फिक्स्ड डिपॉझिट (FD), रिकरिंग डिपॉझिट (RD) आणि सेव्हिंग अकाउंट्स यांसारखी पारंपरिक बचतीची साधने आजही लोकांच्या विश्वासाला पात्र ठरत आहेत.

01/11/2025

शेअर बाजारात मोठी घसरण

सेन्सेक्स ५९२.६७ अंकांनी म्हणजेच ०.७०% ने घसरला

निफ्टीमध्येही १७६.०५ अंकांनी म्हणजेच ०.६८% ने घसरण

शेअर बाजारात गुरुवारी (30 ऑक्टोबर) मोठी घसरण झाली. प्रमुख क्षेत्रांमधील कमकुवततेमुळे सेन्सेक्स ५९२.६७ अंकांनी म्हणजेच ०.७०% ने घसरून ८४,४०४.४६ वर बंद झाला.

निफ्टीमध्येही १७६.०५ अंकांनी म्हणजेच ०.६८% ने घसरून २५,८७७.८५ वर बंद झाला. निफ्टी बँक निर्देशांकही ०.६१% ने घसरून ५८,०३१ वर बंद झाला. या घसरणीमुळे गुंतवणूकदारांना एकाच दिवसात ३ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले. बीएसईचे मार्केट कॅप ३ लाख कोटी रुपयांनी घसरून ४७२ लाख कोटी रुपयांवर आले.

अमेरिकन फेडरल रिझर्व्हने २५ बेसिस पॉइंट व्याजदर कपात जाहीर केल्यानंतर शेअर बाजारात ही घसरण झाली आहे. जिओजित इन्व्हेस्टमेंट्सचे संशोधन प्रमुख विनोद नायर

 ISBN NO. 978-81-990957-8-6

म्हणाले की, फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष पॉवेल यांनी २०२५ पर्यंतची ही शेवटची दर कपात असू शकते असे संकेत दिले. या विधानामुळे आणखी सवलती मिळण्याची अपेक्षा कमी झाली. यामुळे अमेरिकन डॉलर मजबूत झाला, ज्यामुळे भारतासह अनेक देशांच्या शेअर बाजारांमध्ये घसरण झाली.

१. अमेरिका-चीन करार निश्चित झालेला नाही!

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांची भेट झाली. बैठकीत काही व्यापार मुद्द्यांवरही चर्चा झाली. ट्रम्प यांनी बैठकीला "अद्भुत" असे वर्णन केले आणि म्हटले की त्यामुळे अनेक समस्या सुटल्या आहेत. तथापि, गुंतवणूकदार संशयास्पद दिसले. चीनकडून आलेल्या पहिल्या अधिकृत निवेदनात असे सूचित करण्यात आले आहे की अद्याप कोणताही करार झालेला नाही.

२. रुपया दबावाखाली

बहुप्रतीक्षित अमेरिका-चीन व्यापार करार गुंतवणूकदारांना आश्वस्त करण्यात अपयशी ठरला, ज्यामुळे आशियाई चलनांवर दबाव निर्माण झाला. बाजार निरीक्षकांच्या मते, चलन व्यापारी ट्रम्पच्या भूमिकेतील बदलाबद्दल विशेषतः साशंक आहेत. त्यांना भीती आहे की ते लवकरच टॅरिफ धमकी पुन्हा सुरू करू शकतात आणि जोखीम टाळण्यास सुरुवात करू शकतात. यामुळे अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य आणखी घसरले.

३. फार्मा शेअर्सवर दबाव

आजच्या व्यवहारात फार्मा शेअर्समध्ये मोठी घसरण झाली. डॉ. रेड्डी यांचे शेअर्स जवळजवळ ५% घसरले, जे विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचले. कॅनडाच्या फार्मास्युटिकल ड्रग्ज डायरेक्टरेटने सेमॅग्लुटाइड इंजेक्शनसाठी त्यांच्या ANDS (ॲब्रेव्हिएटेड न्यू ड्रग सबमिशन) साठी नॉन-कॉम्प्लायन्स नोटीस जारी केल्यामुळे हे घडले. नोटीसमध्ये सबमिशनच्या विशिष्ट भागांवर स्पष्टीकरण मागितले गेले.

४. शेअर बाजारात नफा-बुकिंग

आज शेअर बाजारात नफा-बुकिंग दिसून आली. कारण या महिन्यात सेन्सेक्स आणि निफ्टी ५% पेक्षा जास्त वाढले होते, जे त्यांच्या विक्रमी पातळीच्या अगदी जवळ पोहोचले होते. विश्लेषकांचा असा विश्वास आहे की यामुळेच गुंतवणूकदारांनी नफा बुक करण्याचा निर्णय घेतला.

५. आशियाई बाजारपेठेतून संमिश्र संकेत

शी जिनपिंग यांच्याशी झालेल्या बैठकीनंतर ट्रम्प यांनी चिनी वस्तूंवरील कर ५७% वरून ४७% पर्यंत कमी केले. तरीही, आशियाई बाजारपेठा मंदावल्या होत्या. अमेरिकेने चीनवरील कर कमी केले आणि व्याजदरही कमी केले, तरीही आशियाई बाजारपेठांमध्ये व्यापार मंदावला. चीनचा शांघाय कंपोझिट ०.७% खाली होता. हाँगकाँगचा हँग सेंग, सिंगापूरचा स्ट्रेट्स टाईम्स आणि सिंगापूरचा बेंचमार्क सुमारे ०.३% घसरला. गुरुवारी जपानचा निक्केई आणि दक्षिण कोरियाचा कोस्पी प्रत्येकी ०.३% वाढला.

कु. साधना मुंडे
कु. भूमीका नागडा

1/11/2025

बँक खातेधारकांसाठी मोठी बातमी

जर तुमचे बँक खाते असेल किंवा तुम्ही ते उघडणार असाल तर ही बातमी उपयुक्त ठरू शकते. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने बँकांमध्ये नॉमिनी सुविधेबाबत नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.

नवीन नियम 1 नोव्हेंबर 2025 पासून लागू होतील. हे नियम बचत खाती, मुदत ठेवी (FD), लॉकर्स आणि सुरक्षित ठिकाणी ठेवलेल्या वस्तूंना लागू होतील.

RBI ने स्पष्टपणे सांगितले आहे की नॉमिनीची सुविधा उपलब्ध आहे याची माहिती बँकांना देणे बंधनकारक असेल, ज्यामुळे मृत्यूनंतर दाव्याची प्रक्रिया सोपी होईल. जर एखादा ग्राहक नॉमिनीला जोडू इच्छित नसेल तर बँक खाते उघडण्यास नकार देऊ शकत नाही. ग्राहकाने फक्त लेखी स्वरूपात नमूद करावे की त्यांना नॉमिनी जोडू नये. जर त्यांनी लेखी अर्ज दिला नाही, तर बँक त्यांच्या रेकॉर्डमध्ये नोंदवेल की ग्राहकाने नॉमिनी जोडू नये असा निर्णय घेतला आहे.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

जर एखाद्या नामनिर्देशित व्यक्तीचा कोणत्याही कारणास्तव मृत्यू झाला तर नामनिर्देशन अवैध ठरेल आणि अशा प्रकरणांमध्ये दाव्याची प्रक्रिया नामनिर्देशित व्यक्ती नसलेल्या खात्यासाठी नियमांच्या अधीन असेल. सरकारने अलीकडेच बँकिंग कायदे (सुधारणा) कायदा, 2025 ला मान्यता दिली आहे. या कायद्यानुसार, ग्राहक आता चार नामनिर्देशित व्यक्ती जोडू शकतील आणि प्रत्येक नामनिर्देशित व्यक्तीसाठी वेगळा वाटा किंवा टक्केवारी देऊ शकतील. याव्यतिरिक्त, ग्राहक उत्तराधिकारी नामनिर्देशित व्यक्तीचा पर्याय देखील निवडू शकतात, म्हणजे जर पहिल्या नामनिर्देशित व्यक्तीचा मृत्यू झाला तर पुढील नामनिर्देशित व्यक्ती आपोआप सक्रिय होईल.

जर एखाद्या नामनिर्देशित व्यक्तीचे नाव कायदेशीररित्या चुकीचे असल्याचे आढळले आणि बँकेने ते नाकारले, तर बँकेने तीन दिवसांच्या आत लेखी कारणे द्यावीत. जर नामनिर्देशित व्यक्तीचा मृत्यू झाला तर त्यांचे नामांकन आपोआप रद्द होईल. आरबीआयने पूर्वी अशी अट घातली होती की बँकांनी ग्राहकाच्या मृत्यूनंतर 15 दिवसांच्या आत दावे निकाली काढावेत आणि कोणत्याही विलंबाची भरपाई करावी.

कु. तनुजा सूर्यवंशी
कु. स्नेहा जोंधले

2/11/2025

लग्नाचे मूहूर्त: सोन्याचे दर

नोव्हेंबर महिन्यापासून लग्नाचे मूहूर्त सुरु होणार आहे. लग्नसमारंभात दागिने बनवले जातात. दरम्यान, त्यामुळे सोन्याचे दर कमी व्हावेत, असं सर्वांना वाटत होते. आज हे दर पुन्हा घसरले आहेत. त्यामुळे जर तुम्हाला सोने खरेदी करायचे असेल तर आधी दर जाणून घ्या.

Gold Rate Perdiction : पुढच्या वर्षी सोन्याचे दर नवा रेकॉर्ड बनवणार,किंमत ऐकून पायाखालची जमीन सरकेल, बाबा वेंगांची भविष्यवाणी

सोन्याचे आजचे दर (Gold Rate Today)

आज २४ कॅरेट सोन्याचे दर प्रति तोळ्यामागे २८० रुपयांनी घसरले आहेत. आज सोन्याच्या किंमती १,२३,००० रुपये आहेत. ८ ग्रॅम सोन्याचे दर ९८,४०० रुपये आहेत. हे दर २२४ रुपयांनी कमी झाले आहेत. १० तोळ्यामागे सोन्याचे दर २,८०० रुपयांनी कमी झाले आहेत. हे दर सध्या १२,३०,००० रुपये आहेत.

Gold Rate Fall: धनत्रयोदशीपासून सोन्याचे दर घसरले, तब्बल ७६०० रूपयांनी झालं स्वस्त; वाचा सविस्तर

२२ कॅरेट सोन्याचे दर (22k Gold Rate)

आज २२ कॅरेट सोन्याचे दर प्रति तोळा १,१२,७५० रुपये आहेत. हे दर २५० रुपयांनी घसरले आहेत. ८ ग्रॅम सोन्याचे दर २०० रुपयांनी घसरले असून सध्या ९०,२०० रुपये झाले आहेत. १० तोळ्यामागे २,५०० रुपयांची घसरण झाली आहे. हे दर ११,२७,५०० आहेत.

१८ कॅरेट सोन्याचे दर (18k Gold Rate)

आज १८ कॅरेट सोन्याचे दर प्रति तोळ्यामागे २१० रुपयांनी घसरले आहेत. हे दर ९२,२५० रुपये झाले आहेत. ८ ग्रॅममागे सोन्याचे दर १६८ रुपयांनी घसरले असून ते सध्या ७३,८०० रुपये झाले आहेत. १० तोळ्यामागे सोन्याचे दर २१०० रपयांनी घसरले असून ते ९,२२,५०० झाले आहेत.

कु. कार्तिका पगडाला
कु. गजानन राजरवाड

अमेरिकन डॉलरला धोबीपछाड! RBI चा धाडसी निर्णय काय? सोन्यावर काय परिणाम होणार

रिझर्व्ह बँकेने अमेरिकन डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आतापर्यंतचे सर्वात मोठे पाऊल टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

त्यानुसार आता आरबीआय परदेशात ठेवलेले सोने परत भारतात आणणार आहे.

सध्या सोन्याच्या साठ्यांपैकी 65 टक्के भाग हा भारतात आहे. तर ऊर्वरीत परदेशात आहे.

रशियाने परकीय चलन साठ्यावर नियंत्रण ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर भारताने त्या दिशेने पाऊल टाकले आहे. आरबीआयचा हा निर्णय केवळ धोरणात्मकच नाही तर भारताच्या आर्थिक स्वावलंबनासाठीचे एक पाऊल आहे.

काही वृत्तानुसार, सप्टेंबर 2025 पर्यंत आरबीआयकडे एकूण 880 टन सोने होते, त्यापैकी 576 टन, म्हणजेच सुमारे ६५%, आता भारतात सुरक्षित आहे. चार वर्षांपूर्वी हा आकडा केवळ 38 टक्के इतका होता. याचा अर्थ आरबीआयने गेल्या 4 वर्षांत 280 टन सोने देशात परत आणून इतिहास रचला आहे.

चालू आर्थिक वर्षात (एप्रिल-सप्टेंबर 2025) आरबीआयने परदेशातून 64 टन सोने देशात परत आणले. आरबीआयच्या एकूण परकीय चलन साठ्यात आता सोन्याचा वाटा 13.92 टक्के इतका आहे. हा साठा मार्च महिन्यात 11.7 टक्के इतका होता. यापूर्वी रिझर्व्ह बँकेच्या राखीव निधीचा मोठा वाटा हा बँक ऑफ इंग्लंड आणि बँक फॉर इंटरनॅशनल सेटलेंट्सकडे होता.

अनेक तज्ज्ञांच्या मते, हा निर्णय 2022 मधील रशियाच्या परकीय गंगाजळी गोठवण्याशी संबंधित आहे. जेव्हा अमेरिकेसह काही युरोपियन देशांनी रशियाचे सोने आणि मालमत्ता गोठवण्याचा निर्णय घेतला, तेव्हा आपल्या देशाची संपत्ती, मालमत्ता आपल्याच देशात सुरक्षित ठेवण्याचे भान अनेक देशांना आले.

भारत हा केवळ सोनेच परत आणत आहे असे नाही तर सोन्याची मोठी खरेदी सुद्धा करत आहे. कारण भारताला अमेरिकन डॉलरवरील अवलंबित्व कमी करायचे आहे. भारताने डॉलरच्या वर्चस्वाला आव्हान दिले नाही. तर सोने सुरक्षा धोरणही चपखलपणे राबवले आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जेव्हा डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर 50 टक्के टॅरिफ लावण्याचा निर्णय घेतला. तेव्हाच भारताने अमेरिकेतील गुंतवणूक कमी करण्यास सुरुवात केली होती. भारताचे हे पाऊल हुशारीचे आणि शहाणपणाचे मानल्या जात आहे.

कु. निकिता तोमर
कु. अंकिता तोमर

3/11/2025

स्टार्टअपचा गेमचेंजेर! डिजिटल युगात टिकायचंय? मग शिका सोशल मीडियाचं मार्केटिंग कौशल्य

जागृतीने आपला व्यवसाय स्टार्टअप आणि पुढे ऑनलाईनमध्ये रूपांतरित केलेल्या व्यवसायासाठी सोशल मीडिया स्ट्रॅटेजी वापरण्याचा निर्णय घेतला. सर्व उत्पादने ग्राहकाला मोबाईलवर सहज पाहता येऊन ती विकत घेण्यासाठीची सुविधाही तिने उपलब्ध करून दिली.

यासाठी थोडेसे प्रशिक्षण घेतल्यावर तिला हे सहज शक्य झाले; पण हे करण्यापूर्वी तिने याचा थोडा अभ्यास केला आणि काही सोशल मीडिया इन्फ्लुएंसर यांच्याबरोबर चर्चाही केली. यासाठी तिने काही डिजिटल कौशल्ये शिकणे आवश्यक आहे हे जाणले आणि इन्साइट्स, व्ह्यूज, इंटरॅक्शन्स, फॉलोअर्स, आणि ऑडिओ ट्रेंडिंग या संकल्पनांची माहिती घेतली.

जागृतीने उत्पादनांचे व्हिडिओ; तसेच शॉर्ट आणि रील्स बनवण्यासाठी गुगल व्हिड्स, कॅन्व्हा, इन व्हिडिओ, पोस्टर मेकर आदी ॲप्स शिकून त्या कौशल्याचा वापर इन्स्टाग्रामवर उत्पादनांची जाहिरात करण्यासाठी सुरू केला. उत्पादनांच्या प्रमोशनसाठी एक किंवा दोन मिनिटांचे आकर्षक व्हिडिओ किंवा ग्राफिक्स पोस्टर आपण अशी योग्य ॲप वापरून तयार करू शकतो हे जागृतीने जाणले.

या ॲप्समध्ये अनेक प्रकारची टेम्प्लेट्स उपलब्ध असतात, ज्यामुळे आपल्याला आकर्षक जाहिरात बनवायला खूप मदत होते. आपल्या

 ISBN NO. 978-81-990957-8-6

डिजिटल सुरक्षिततेसाठी जागृतीने यांसारख्या अनेक ॲप्सच्या वापराबाबतची सेफ्टी आणि सिक्युरिटीची सेटिंग फोनमध्ये आवश्यकतेनुसार करून घेतली. साधारणतः तरुण महिला ग्राहक जास्त करून इन्स्टाग्राम वापरताना दिसतात, तर मध्यमवर्गीय गृहिणींचा सर्वांत जास्त वापर फेसबुकवर असतो. थ्रेड्ससारखे समाजमाध्यमसुद्धा लोकप्रिय होत आहे, हे ओळखून जागृतीने उत्पादनासाठी सोशल मीडियाची निवड केली.

फेसबुक, इन्स्टाग्राम आणि थ्रेड्स या तिन्ही माध्यमांसाठी आपण एकत्रितपणे किंवा स्वतंत्रपणे आपल्या उद्योगाच्या उत्पादनांची रील्स बनवून त्यांची जाहिरात करू शकतो हे जाणून जागृतीने उत्पादन प्रमोशनची स्ट्रॅटेजी ठरवली. सर्वांत प्रभावी गोष्ट काय आहे, माहीत आहे? जर तुमचा ग्राहक वर्ग विशिष्ट भौगोलिक परिसरात असेल, तर तुम्ही जाहिरात करताना फक्त त्याच परिसरातील मोबाईलवर ती दिसेल, असे सेटिंग करू शकता.

तसेच, आपला ग्राहक कोणत्या वयोगटात आहे, यानुसारही सोशल मीडियावर जाहिरात मांडणी करणे आवश्यक आहे. यासाठी अनेक एआय ॲप्लिकेशन्स आपल्या मोबाईलच्या प्लेस्टोअरमध्ये उपलब्ध आहेत, ज्यामुळे शॉर्ट्स बनवणे खूप सोपे होते. थोड्या प्रशिक्षणाने आणि या सर्व कौशल्यांनी आपण एक प्रगतशील व्यावसायिक म्हणून ऑनलाइन जगतात स्वतंत्र अस्तित्व जागृतीने सिद्ध केले आहे.

या गोष्टी लक्षात ठेवा

- योग्य सोशल मीडियाची प्लॅटफॉर्मची निवड करा.
- उत्पादन माहितीचे ग्राफिक आकर्षक बनवा.
- व्हिडिओ शॉर्ट्स किंवा रील्स निर्मितीसाठी योग्य एआय ॲप्लिकेशनची निवड करा.
- व्हिडिओ शॉर्ट्स आणि रील्समध्ये आपले निवेदन आकर्षक असावे.
- संपर्कासाठीचे माध्यम ठळकपणे दर्शवा.
- पार्श्वसंगीताची आणि आवाजाची निवड सुस्पष्ट असावी.

कु. वैष्णवी औंढेकर कु. शिवानी यादव

4/11/2025

सोने 10000 तर चांदी 20000 रुपयांनी झाले स्वस्त, का घसरले सोन्याचे भाव?

सलग दुसऱ्या आठवड्यात त्यांच्या किमती कमी झाल्या आहेत. विशेषतः जेव्हा देशात लग्नसराईचा हंगाम सुरू झाला आहे. अशा परिस्थितीत, किमती इतक्या वेगाने का घसरत आहेत यावर चर्चा सुरू झाली आहे.

या तीन कारणांमुळे किमती घसरत

सोन्या-चांदीच्या किमती सलग दुसऱ्या आठवड्यात घसरल्या. तज्ञांनी याची तीन प्रमुख कारणे सांगितली आहेत. पहिले, अमेरिकन डॉलरची मजबूती, दुसरे, जागतिक भू-राजकीय तणाव कमी होणे आणि तिसरे, यूएस फेडरल रिझर्व्हचा व्याजदरांवरील ठाम भूमिका.

मोठ्या प्रमाणात प्रॉफिट बुकिंग हे देखील कारण

या आठवड्यात (Gold Price Today) एमसीएक्सवर डिसेंबरमधील सोन्याचा वायदा भाव ₹2,219 ने घसरून प्रति 10 ग्रॅम ₹1,17,628 या नीचांकी पातळीवर आला. नऊ आठवड्यांची तेजी खंडित झाल्यानंतर ही घसरण दिसून आली. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, "जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणात नफा बुकिंग झाल्यामुळे सोने प्रति औंस $4,000 (सुमारे 28.34 ग्रॅम) पर्यंत घसरले. देशांतर्गत बाजारातही सोने किंचित सुधारण्यापूर्वी ₹1,19,000 च्या खाली आले.

एमसीएक्सवरील सोन्याचा भाव 1,23,000 रुपयांवरून 1,18,000 रुपयांवर आला आणि नंतर तो सुमारे 1,21,500 रुपयांवर आला. तसेच, फेडच्या टिप्पण्यांनंतर डॉलर निर्देशांक मजबूत झाला, ज्यामुळे परदेशी खरेदीदारांसाठी सोने महाग झाले. वाढत्या बाँड उत्पन्नामुळे व्याज नसलेले सोने कमी आकर्षक झाले. आंतरराष्ट्रीय बाजारातही दबाव दिसून आला. कॉमेक्सवरील डिसेंबर डिलिव्हरीसाठी सोन्याचा भाव 141.3

 ISBN NO. 978-81-990957-8-6

डॉलर्सने घसरून 3,996.5 डॉलर्स प्रति औंसवर बंद झाला.

सणासुदीच्या खरेदीमुळे वाढला दबाव

रशिया-युक्रेन तणावात घट, ट्रम्प-शी जिनपिंग यांच्यातील सकारात्मक चर्चा, फेडची कडक भूमिका आणि भारतात उत्सवी खरेदीचा शेवट या सर्वांमुळे सोन्यावरील दबाव वाढला, असे तज्ज्ञांचे मत आहे. तथापि, यादरम्यान चांदीने सुधारणा दर्शविली. एमसीएक्सवर डिसेंबर फ्युचर्स चांदी 817 रुपयांनी वाढली, तर कॉमेक्सवर ती 48.16 डॉलर प्रति औंसवर जवळजवळ स्थिर राहिली. ही घसरण एक नैसर्गिक सुधारणा आहे असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. परंतु दीर्घकाळात, मध्यवर्ती बँकांकडून सोन्याची खरेदी, वाढती कर्जे, महागाई आणि डॉलरपासूनचे अंतर हे सोन्यासाठी सकारात्मक आहेत.

15 दिवसांत मोठी घसरण

इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन (IBJA) मध्ये गेल्या 15 दिवसांत सोने आणि चांदीच्या किमतीत मोठी घसरण झाली आहे. 24 कॅरेट सोने 10 ग्रॅम प्रति 10,059 रुपयांनी घसरले आहे, तर चांदी 20,105 रुपयांनी (Gold rate today) प्रति किलोग्रॅमने घसरली आहे. 17 ऑक्टोबर रोजी IBJA वर सोन्याने 1,30,874 रुपयांचा उच्चांक गाठला होता. गेल्या ट्रेडिंग सत्रात तो 10,059 रुपयांनी घसरला आणि 1,20,815 रुपयांवर आला. दुसरीकडे, 17 ऑक्टोबर रोजी चांदीचा भाव 1,69230 रुपये (Silver rate today) प्रति किलोग्रॅम होता, जो आता 1,49,125 रुपयांवर घसरला आहे.

5/11/2025

शेअर मार्केट

तुम्ही जर शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करत असाल वॉरेन बफेट हे नाव कधी ना कधी नक्कीच ऐकलं असेल. वॉरेन बफेट यांनी आपली ९० टक्क्यांपेक्षा जास्त संपत्ती ही शेअर बाजारातील गुंतवणुकीतून कमावली आहे.

मात्र, गेल्या काही महिन्यांपासून वॉरेन बफेट सातत्याने बाजारातून पैसे काढत आहेत. बफेट यांची जगप्रसिद्ध गुंतवणूक कंपनी बर्कशायर हॅथवेने २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीत एक नवा ऐतिहासिक विक्रम नोंदवला आहे. कंपनीचा रोख साठा म्हणजेच कॅश रिझर्व्ह वाढून ३८१.७ अब्ज डॉलर्स इतका झाला आहे, जो आतापर्यंतचा कंपनीचा सर्वात मोठा रोख साठा आहे.

९५ वर्षीय वॉरेन बफेट कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावरून पायउतार होण्याची तयारी करत असताना हा अहवाल आला आहे. कंपनीनुसार, सीईओ म्हणून बफेट यांचा हा शेवटचा तिमाही निकाल असेल. बफेट यांनी स्पष्ट केले की, बाजारात असलेली अनिश्चितता आणि व्यापाराशी संबंधित सावधगिरी यामुळे कंपनीने या तिमाहीतही आक्रमक गुंतवणुकीपासून दूर राहणे पसंत केले.

विक्री अधिक, खरेदी कमी

बर्कशायर हॅथवेने सलग १२ व्या तिमाहीत जेवढे शेअर्स खरेदी केले, त्यापेक्षा जास्त शेअर्स विकले आहेत. कंपनीने या तिमाहीत ६.१ अब्ज डॉलर्स मूल्याचे शेअर्स विकले आहेत. विशेष म्हणजे, कंपनीने सलग पाचव्या तिमाहीत स्वतःचे शेअर्स बायबॅक केले नाहीत, तर याच दरम्यान कंपनीच्या शेअर्सची किंमत बाजाराच्या तुलनेत मागील काही महिन्यांत पिछाडीवर राहिली आहे.

यापूर्वी वर्षाच्या सुरुवातीला वॉरेन बफेट यांनी युनायटेड हेल्थ ग्रुपमध्ये १.६ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली होती आणि ऑक्सीकेम खरेदी करण्यासाठी ९.७ अब्ज डॉलर्सची ऑफर दिली होती. मे महिन्यात सीईओ पद सोडण्याची घोषणा केल्यापासून बर्कशायरचे शेअर्स सुमारे १२% नी घसरले आहेत.

विमा व्यवसायातून विक्रमी नफा

बर्कशायर हॅथवेचा ऑपरेटिंग प्रॉफिट ३४% नी वाढून १३.४९ अब्ज डॉलर्स वर पोहोचला आहे, जो विश्लेषकांच्या अंदाजित नफ्यापेक्षा खूप जास्त आहे. ही वाढ प्रामुख्याने विमा अंडररायटिंग

 ISBN NO. 978-81-990957-8-6

व्यवसायातील उत्कृष्ट कामगिरीमुळे झाली आहे. कंपनीचे निव्वळ उत्पन्न देखील १७% नी वाढून ३०.८ अब्ज डॉलर्स झाले आहे. कंपनीची एकूण महसूल वाढ केवळ २% राहिली, जी अमेरिकेच्या आर्थिक विकास दरापेक्षा कमी आहे. कंपनीने कबूल केले की, ग्राहक विश्वासात घट आणि आर्थिक अनिश्चिततेचा व्यवसायावर परिणाम झाला आहे.

बफेट यांच्या निवृत्तीनंतर 'कॅश रिझर्व्ह'चे काय होणार?

९५ वर्षांचे वॉरेन बफेट आता सीईओ पद सोडत आहेत. कंपनीने पुष्टी केली आहे की, व्हाईस चेअरमन ग्रेग एबेल हे आता बर्कशायर हॅथवेची धुरा सांभाळतील. बफेट हे मात्र चेअरमन म्हणून कंपनीशी जोडलेले राहतील. विश्लेषकांना भेडसावणारा सर्वात मोठा प्रश्न हा आहे की, बर्कशायरजवळ जमा असलेल्या ३८२ अब्ज डॉलर्सच्या रोख रकमेचे काय केले जाईल? काही तज्ज्ञांचे मत आहे की, कंपनीने सुमारे एक ट्रिलियन डॉलर्सचे मूल्यांकन पार केले आहे आणि आता १९६७ नंतर प्रथमच लाभांश देण्यावर विचार करू शकते.

बर्कशायर अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेचा 'बॅरोमीटर'

अमेरिकेच्या नेब्रास्का राज्यातील ओमाहा शहरात स्थित असलेल्या बर्कशायर हॅथवेला तेथील अर्थव्यवस्थेचा 'बॅरोमीटर' मानले जाते. कंपनीकडे विमा, रेल्वे, ऊर्जा आणि उत्पादन अशा अनेक महत्त्वाच्या व्यवसायांची मालकी आहे. त्यामुळे कंपनीचे तिमाही निकाल अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेची गती कोणत्या दिशेने जात आहे, याचे संकेत देतात.

कु. पायलकौर जाधव
कु. साक्षी ठाकूर

6/11/2025

चीन पाकिस्तानने केला भारताचा मोठा गेम, मालदीवने भारताला दगा देत थेट तुर्कीसोबत

युक्रेन युद्धामुळे संपूर्ण जगाची समीकरणे बदलली आहेत. त्यामध्येच अमेरिका आणि पाक यांच्यातील जवळीकता वाढल्याचेही बघायला मिळतंय. मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मुइझ्झू यांच्या प्रशासनाने तुर्कीमधून आणखी ड्रोन आयात केली आहेत.

यापूर्वीच मालदीवचे आणि भारताचे संबंध ताणलेले असताना पुन्हा एकदा मोहम्मद मुइझ्झू यांनी भारताविरोधात मोठे पाऊल उचलल्याचे बघायला मिळतंय. समुद्रावर करडी नजर ठेवण्यासाठी भारताकडून घेतलेल्या डॉर्नियर विमानांच्या जागी तुर्कीचे ड्रोन मालदीवला हवी होती. मोठा करार मालदीवने केला असून यामध्ये फक्त मालदीवच नाही तर चीन आणि पाकिस्तानही सहभागी आहे.

मालदीवचा तुर्कीसोबतचा नवीन ड्रोन करार यामुळे भारताच्या त्याच्या शेजारच्या क्षेत्राबद्दलच्या चिंता वाढू शकतात आणि हा धोका आहे. भारत सुरूवातीपासूनच याला जोरदार विरोध करताना दिसतंय. मात्र, मालदीवने भारताच्या विरोधात जात असून ड्रोनची खरेदी केलीये. मालदीवच्या अधाधु दैनिकाने याबद्दल वृत्त दिले असून त्यांनी म्हटले की, तुर्कीहून तीन बायरक्तार टीबी 2 ड्रोन नुकताच मालदीवमध्ये दाखल झाले.

गान आंतरराष्ट्रीय विमानतळावर ते पोहोचले आहेत. या ड्रोन खरेदीबद्दलची आणि कोणत्या मार्गाने मालदीवमध्ये हे ड्रोन दाखल झाले याबद्दलची सविस्तर बातमी अधाधु दैनिकाने दिलीये. मालदीव राष्ट्रीय संरक्षण दल आता एक ड्रोन तळ स्थापन करत आहे. दुसऱ्या महायुद्धापासून गान हे ऐतिहासिकदृष्ट्या इंग्लंडच्या रॉयल एअर फोर्सचे तळ आहे. मात्र, मालदीव स्वतंत्र झाल्यानंतर ब्रिटिशांनी ते सोडले.

हेच नाही तर भारताच्या दबावामुळे अधाधूने असाही दावा केला आहे की, एमएनडीएफच्या अधिकाऱ्यांनी ड्रोनची देण्याबाबत स्पष्टपणे नकार दिला. सध्या या ड्रोनची चाचणी सुरू असल्याचीही माहिती मिळतंय. मोहम्मद मुइझ्झू सरकारचा खोटेपणा जगापुढे येताना दिसतोय. ड्रोन खरेदीची किंमत जाहिर

 ISBN NO. 978-81-990957-8-6

करणे त्यांनी टाळलंय. अधाधू यांनी अंदाजे किंमत $37 दशलक्ष असल्याचा अंदाज लावला आहे.मालदीवची अर्थव्यवस्था जवळजवळ कोसळण्याच्या मार्गावर असताना हा करार केलाय.

मालदीवला हाताला धरून भारताविरोधात मोठा गेम करण्याच्या तयारीत पाकिस्तान आणि चीन असल्याचे बघायला मिळतंय. मागील काही वर्षांपासून भारत आणि मालदीवचे संबंध तणावात आहेत. पाकिस्तान आणि चीन हे संबंध अधिक बिघडवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, भारताला त्याच्या शेजारी देशांवर बारीक लक्ष ठेवणे आवश्यक आहे. भारताला लागून असलेल्या पश्चिम हिंद महासागर क्षेत्रात पाकिस्तान, चीन आणि तुर्कीजी नवीन प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत, ही भारतासाठी अत्यंत जास्त चिंतेची बाब नक्कीच आहे.

कु. दुर्गा संतोष साखरे
कु. संभाजी तोटरे

7/11/2025

अमोल मुजुमदार

अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखेर भारतीय महिला क्रिकेट संघाने ICC महिला विश्वचषकावर आपलं नाव कोरलं आहे. अंतिम सामन्यात टीम इंडियाने दमदार खेळ करत दक्षिण आफ्रिकेचा पराभव केला आणि इतिहास रचला. ही भारताच्या महिला संघाची पहिली ICC ट्रॉफी आहे. मैदानावर खेळाडूंनी अप्रतिम कामगिरी केली, पण या विजयामागे आणखी एक व्यक्ती तितकाच कौतुकास पात्र आहे तो म्हणजे टीम इंडियाचा मुख्य प्रशिक्षक अमोल मुजुमदार.

अनेकांना त्यांचं नाव ऐकून कदाचित आश्चर्य वाटेल, पण अमोल मुजुमदार हे भारतीय क्रिकेटच्या इतिहासातलं एक असं नाव आहे, ज्यांनी 11,000 हून अधिक धावा केल्या, पण तरीही त्यांना टीम इंडियाच्या जर्सीमध्ये खेळण्याची संधी मिळाली नाही.

अमोल मुजुमदार कोण आहेत?

11 नोव्हेंबर 1974 रोजी मुंबईत जन्मलेल्या अमोल मुजुमदार यांना लहानपणापासूनच क्रिकेटची आवड होती. त्यांची फलंदाजी इतकी जबरदस्त होती की त्यांनी केवळ 19 व्या वर्षी रणजी ट्रॉफी पदार्पणात नाबाद 260 धावांची खेळी करत विश्वविक्रम केला होता. तब्बल दोन दशके हा विक्रम त्यांच्या नावावर राहिला.

मुजुमदार हे मुंबई क्रिकेटचे आधारस्तंभ मानले जातात. त्यांनी रणजी ट्रॉफीत तब्बल 171 सामने खेळले आणि 48.13 च्या सरासरीने 11,167 धावा केल्या. त्यांच्या नावावर 30 शतके आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली मुंबईने 37वा रणजी किताब जिंकला होता. इतकं जबरदस्त करिअर असूनही त्यांना भारतीय संघात स्थान मिळालं नाही. त्यांच्या नशिबाने त्यांच्यावर अन्याय केला, पण त्यांनी हार मानली नाही.

2014मध्ये क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर अमोल मुजुमदार यांनी प्रशिक्षक म्हणून नवा प्रवास सुरू केला. त्यांनी अंडर-19 आणि अंडर-23 संघांना मार्गदर्शन केलं, तसेच तीन वर्षं ते राजस्थान रॉयल्सचे बॅटिंग कोच होते. त्यानंतर त्यांनी मुंबई रणजी संघाचे प्रशिक्षक म्हणून उत्कृष्ट कामगिरी केली.

ऑक्टोबर 2023 मध्ये BCCI ने त्यांची भारतीय महिला संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती केली. त्यांनी संघाचा खेळ सुधारण्यासाठी नव्या स्ट्रॅटेजी तयार केल्या, खेळाडूंचा आत्मविश्वास वाढवला आणि एक नवा संघ निर्माण केला.

2025 मध्ये त्यांची मेहनत फळाला आली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय महिला संघाने पहिल्यांदाच विश्वचषक जिंकला, आणि इतिहासात सुवर्णाक्षरांनी नाव कोरलं. तसं पाहिलं तर, खेळाडू म्हणून नशिबाने त्यांना संधी दिली नाही, पण प्रशिक्षक म्हणून त्यांनी भारताला शिखरावर पोहोचवलं आहे.

अमोलच्या नेतृत्वाखाली द्रविड आणि गांगुली खेळले अमोल हा शालेय काळातच सचिन तेंडुलकर आणि विनोद कांबळीचा सहकारी होता.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

शारदाश्रमच्या ऐतिहासिक सामन्यात सचिन-विनोदने विक्रमी भागीदारी केली तेव्हा पुढचा फलंदाज म्हणून पॅड बांधून बसलेला अमोलच होता. पण त्याचा नंबर आलाच नाही.

पहिल्याच रणजी सामन्यात नाबाद 260 धावा करून वर्ल्ड रेकॉर्ड करणाऱ्या अमोलकडे सगळ्यांचे लक्ष गेले. तो भारताच्या अंडर-19 संघाचा उपकर्णधार होता आणि त्याच्या नेतृत्वाखाली द्रविड आणि गांगुली खेळले. पण राष्ट्रीय संघातल्या निवडीचं राजकारण, विभागीय लॉबिंग आणि एका सिलेक्टरशी झालेला वाद, या सगळ्यामुळे अमोलची कारकीर्द 'मुंबईपुरती'च मर्यादित राहिली.

तरीही तो हारला नाही. त्याने रणजीमध्ये सलग शतकं ठोकली, मुंबईला अनेकदा विजेते केलं आणि अखेर 11,000 हून अधिक धावा करून स्वतःचा ठसा उमटवला. क्रिकेटमधील संयम आणि धैर्य त्याच्या रक्तातच होतं. जे त्याला पुढे कोचिंगच्या कारकिर्दीतही उपयोगी पडलं.

आज अमोल मुझुमदार भारतीय महिला संघाचा यशस्वी मुख्य प्रशिक्षक आहे. त्याच्या मार्गदर्शनाखाली टीम इंडियाने पहिल्यांदाच वर्ल्ड कप जिंकला आहे. ज्या फलंदाजाला स्वतः भारतासाठी खेळायची संधी मिळाली नाही, त्याने आपल्या प्रशिक्षणातून भारताला जागतिक विजेता बनवलं. अमोल मुजुमदार यांची ही कहाणी खरंच प्रेरणादायी आहे.

8/11/2025

भारताने जगाला दाखवली ताकद; १८ महिन्यांतील सर्वोत्तम आकडे, जीडीपी'त ८.२% दराने वाढ

२०२५-२६ च्या दुसऱ्या तिमाहीत भारताचा वास्तविक जीडीपी ८.२% दराने वाढला

भारताची राजकोषीय तूट ८.२५ लाख कोटी होती.

२०२५-२६ च्या दुसऱ्या तिमाहीत ८.२ टक्के जीडीपी विकास दर लोकांच्या कठोर परिश्रम

दुसऱ्या तिमाहीत भारताच्या अर्थव्यवस्थेने उल्लेखनीय कामगिरी केली. चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या दुसऱ्या तिमाहीत भारताचा वास्तविक जीडीपी ८.२% दराने वाढला, सरकारी आकडेवारीनुसार, मागील आर्थिक वर्षाच्या याच तिमाहीत तो ५.६% होता. सरकारने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, जुलै-सप्टेंबर तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्थेने ८.२% विकास दर गाठला, जो सहा तिमाहींमधील सर्वाधिक आहे. जीएसटी दरांमध्ये कपात झाल्यामुळे कारखान्यांनी वापर वाढण्याची अपेक्षा ठेवून अधिक उत्पादने तयार केली म्हणून हे घडले. दुसऱ्या तिमाहीत जीडीपी (GDP) वाढ मागील तीन महिन्यांतील ७.८% आणि वर्षापूर्वी याच कालावधीत ५.६% वाढीपेक्षा चांगली होती. जीडीपीमध्ये १४% वाटा असलेल्या उत्पादन क्षेत्राने दुसऱ्या तिमाहीत ९.१% वाढ नोंदवली.

८.२५ लाख कोटींवर राजकोषीय तूट

दरम्यान, या आर्थिक वर्षांच्या पहिल्या सात महिन्यांत, एप्रिल ते ऑक्टोबर दरम्यान भारताची राजकोषीय तूट ८.२५ लाख कोटी होती. ही वार्षिक अंदाजाच्या ५२.६% आहे. ही राजकोषीय तूट गेल्या वर्षीच्या ४६.५% पेक्षा जास्त आहे.

लोकांच्या परिश्रम व उद्यमशीलतेचे परिणाम : पंतप्रधान

जीडीपीच्या मजबूत आकड्यांबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM Narendra Modi) म्हणाले, २०२५-२६ च्या दुसऱ्या तिमाहीत ८.२ टक्के जीडीपी विकास दर लोकांच्या कठोर परिश्रम आणि उद्यमशीलतेचे प्रतिबिंबित करतो. २०२५-२६ च्या दुसऱ्या तिमाहीत ८.२ टक्के जीडीपी विकास दर खूप उत्साहवर्धक आहे. हे आमच्या विकास समर्थक धोरणांचा आणि सुधारणाचा प्रभाव प्रतिबिंबित करते. हे आमच्या लोकांच्या कठोर परिश्रम आणि उद्योजकतेचे देखील प्रतिबिंबित करते आमचे सरकार सुधारणांना पुढे नेत राहील."

औद्योगिक उत्पादन डेटा १ डिसेंबरला होणार जाहीर

ISBN NO. 978-81-990957-8-6

सरकारने असेही जाहीर केले की, ऑक्टोबर २०२५ साठी भारताचा औद्योगिक उत्पादन डेटा १ डिसेंबर रोजी जाहीर केला जाईल, अखिल भारतीय औद्योगिक उत्पादन निर्देशांक (आयआयपी) डेटा सहसा दर महिन्याच्या २८ तारखेला किंवा २८ तारखेला सुट्टी असल्यास पुढील कामकाजाच्या दिवशी जाहीर केला जातो. सरकारने एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे की ऑक्टोबर २०२५ चा आयआयपी २८ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध होणार होता. २०२५-२६ च्या दुसऱ्या तिमाहीसाठी (जुलै-सप्टेंबर) जीडीपीचा तिमाही अंदाज आयआयपी प्रकाशनासोबत प्रकाशित होणार असल्याने, ऑक्टोबर २०२५ साठी आयआयपी प्रकाशनाची तारीख बदलण्यात आली आहे,

कु. पायलकौर जाधव
कु. साक्षी ठाकूर

9/11/2025

कोणत्या कामांसाठी क्रेडिट कार्ड वापरू नये? जाणून घ्या

क्रेडिट कार्ड जितके फायद्याचे तितके नुकसानदायक सुद्धा ठरते. जर तुम्ही त्याचा स्मार्टली वापर केला तर खिसा रिकामा व्हायला वेळ लागणार नाही. काही अशी ठिकाणं आहेत. जिथं क्रेडिट कार्डचा वापर न करणे फायद्याचे ठरते. नाहीतर मोठे नुकसान होईल.

क्रेडिट कार्ड खरेदीवर चांगली ऑफर्स, कॅशबॅक, रिवॉर्ड्स मिळत असतील तर जरुर वापर करा. पण गरज नसताना आणि कोणताही फायदा नसताना अनावश्यक खर्च करत असाल तर क्रेडिट कार्डचा वापर लागलीच बंद करा. यामुळे तुमच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर वाढेल.

क्रेडिट कार्ड वापरताना नेहमी एक काळजी घ्या. क्रेडिट कार्डचा वापर हा महिन्याकाठी 30 टक्क्यांपेक्षा अधिक व्हायला नको हे पाहा. त्यामुळे तुम्हाला वेळेच्या आता क्रेडिट कार्डचे पेमेंट करता येईल.

क्रेडिट कार्डचा वापर प्रामाणित आणि योग्य ठिकाणीच करा. कोणत्याही वेबसाईटवर जाऊन काहीही खरेदी करु नका. नाहीतर तुम्ही एखादा स्कॅमचा शिकार होऊ शकतात. असुरक्षित वेबसाईटचा वापर अजिबात करू नका.

जर सार्वजनिक वायफायचा वापर करत असाल तर अशावेळी क्रेडिट कार्डचा अजिबात वापर करू नका. ऑनलाईन स्कॅमर्सला तुम्ही आवताण तर देत नाही ना याची काळजी घ्या. कारण हे स्कॅमर्स तुमच्या सर्व पैशांवर डल्ला मारतील.

क्रेडिट कार्ड डाऊन पेमेंट करत असाल आणि उर्वरीत रक्कम हप्त्याने चुकती करत असाल तर अधिक जागरूक राहा. कारण एक हप्ता मागे पुढे झाला तर तुम्हाला क्रेडिट कंपन्या, बँका व्याजाचा मोठा दणका देतात. एकदा का चक्रव्याढ व्याजाच्या फेऱ्यात अडकलात तर मग पुढे मोठे अवघड होते.

कु. कार्तिका पगडाला
कु. गजानन राजरवाड

10/11/2025

अमेरिकेनं भारतावर ५० टक्के टॅरिफ: जीडीपीची

अमेरिकेनं भारतावर ५० टक्के टॅरिफ लावलाय. भारत आणि चीन रशियाकडून तेलाची खरेदी करतात. या पैशांचा वापर रशिया हा युक्रेनविरोधातील युद्धात फंड म्हणून करत आहे, त्यामुळे युद्धविराम होत नसल्याचा आरोप डोनाल्ड ट्रम्प यांनी केला. दरम्यान डोनाल्ड ट्रम्प यांनी लावलेल्या टॅरिफचा मोठा परिणाम भारताच्या जीडीपीवर होईल असा अंदाज तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत होता. मात्र हे सगळे अंदाज चुकीचे ठरताना दिसत आहेत. कारण जीडीपीची आकडेवारी समोर आली असून, भारतानं मोठी झेप घेतल्याचं दिसत आहे.

चालू आर्थिक वर्षाच्या जुलै-सप्टेंबर कालावधीत देशाचा नाममात्र जीडीपी ८.७ टक्के दराने वाढला असल्याची माहिती मंत्रालयानं दिलीय. दरम्यान दुय्यम आणि तृतीयक क्षेत्रांची मजबूत कामगिरीमळे जीडीपी वाढीचा दर आठ टक्क्यांपेक्षा जास्त राहिलाय, असं सरकारने जारी केलेल्या निवेदनात म्हटलंय. आर्थिक वर्ष २६ च्या दुसऱ्या तिमाहीत दुय्यम क्षेत्राचा विकास दर ८.१

 ISBN NO. 978-81-990957-8-6

टक्के आणि तृतीयक क्षेत्राचा विकास दर ९.२ टक्के होता.

दुय्यम क्षेत्रात येणाऱ्या उत्पादन क्षेत्राचा विकास दर ९.१ टक्के आणि बांधकाम क्षेत्राचा विकास दर ७.२ टक्के राहिला आहे. तृतीयक क्षेत्रातील वित्तीय, रिअल इस्टेट आणि व्यावसायिक सेवांमध्ये १०.२ टक्के वाढ झालीय. सरकारी आकडेवारीनुसार, कृषी आणि संलग्न क्षेत्रांमध्ये ३.५ टक्के वाढ झाली आहे. आर्थिक वर्ष २६ च्या दुसऱ्या तिमाहीत खासगी उपभोग खर्च (PFCE) पीएफसीई ७.९ टक्क्यांनी वाढला. हा मागील आर्थिक वर्षात ६.४ टक्के होता. आर्थिक वर्ष २६ च्या दुसऱ्या तिमाहीत निर्यात ५.६ टक्क्यांनी वाढली आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या याच कालावधीत ३ टक्के होती. चालू आर्थिक वर्षाच्या जुलै-सप्टेंबर कालावधीत आयात १२.८ टक्क्यांनी वाढली आहे.

मजबूत उत्पादन क्षेत्र आणि वाढलेला ग्राहक खर्च यामुळे ही वाढ शक्य झाली आहे. गेल्या वर्षीच्या याच तिमाहीत (FY24-25) ही वाढ 5.6 % होती. तर, चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत ती 7.8% होती, जी पाच तिमाहींमधील सर्वाधिक होती.

भारतीय रिझर्व्ह बँकेने (RBI) 7% वाढीचा अंदाज वर्तवला होता, त्यापेक्षा ही वाढ खूपच जास्त आहे. महागाई विचारात न घेता मोजलेली नॉमिनल जीडीपी वाढ या तिमाहीत8.7% राहिली. विशेष म्हणजे, पहिल्या तिमाहीत नॉमिनल जीडीपी वाढ तीन तिमाहींच्या नीचांकी पातळीवर, म्हणजे 8.8% वर आली होती. या जबरदस्त वाढीचा शेअर बाजार, सोन्याच्या किमती आणि व्याज दरांवर काय परिणाम होईल, हे आपण सोप्या भाषेत समजून घेऊया.

सोन्याच्या किंमतीवर परिणाम

जीडीपीची वेगवान वाढ आणि सोन्याच्या किंमती यांच्यात व्यस्त संबंध असतो. याचा अर्थ असा की जेव्हा अर्थव्यवस्था (जीडीपी) वेगाने वाढते, तेव्हा सोन्याच्या किमतीत सामान्यतः घट होते किंवा त्या स्थिर राहतात. जेव्हा जीडीपीची गती वाढते, तेव्हा ते अर्थव्यवस्थेचे मजबूत आरोग्य आणि कंपन्यांच्या नफ्यात वाढ होण्याची अपेक्षा दर्शवते. यामुळे गुंतवणूकदारांचा धोका पत्करण्याचा कल वाढतो. गुंतवणूकदार सोन्यासारख्या सुरक्षित गुंतवणुकीतून पैसे काढून शेअर्स, रिअल इस्टेट आणि बॉण्ड्ससारख्या अधिक जोखमीच्या मालमत्तांमध्ये गुंतवतात, कारण त्यांना त्यातून अधिक परतावा मिळण्याची अपेक्षा असते. सोन्याची मागणी कमी झाल्यामुळे त्याच्या किमतीवर दबाव येतो.

शेअर बाजार

दुसऱ्या तिमाहीतील जीडीपीचे आकडे अपेक्षेपेक्षा चांगले आले असले तरी, तज्ज्ञांच्या मते याचा शेअर बाजारावर फारसा मोठा परिणाम होणार नाही. याचे कारण म्हणजे अमेरिकेच्या टॅरिफचा पूर्ण परिणाम ऑक्टोबर-डिसेंबर तिमाहीच्या जीडीपी आकडेवारीत दिसेल. मात्र, तिसऱ्या तिमाहीत जीएसटीमधील कपात आणि सणासुदीच्या काळात वाढलेली मागणी यांचाही सकारात्मक परिणाम दिसून येईल. तरीही, सेंसेक्स आणि निफ्टी 50 मध्ये थोडी तेजी येण्याची शक्यता आहे. पण, मिड-कॅप आणि स्मॉल-कॅप कंपन्यांच्या शेअर्समध्ये फारशी उलथापालथ होण्याची अपेक्षा नाही. याचे मुख्य कारण म्हणजे या कंपन्यांच्या शेअर्सची किंमत आधीच खूप वाढलेली आहे. तसेच, बाजारात पैशांची कमतरता जाणवत आहे.

इक्विनॉमिक्स रिसर्च प्रायव्हेट लिमिटेडचे संस्थापक आणि हेड ऑफ रिसर्च जी. चोक्कलिंगम यांनी मिंटला सांगितले की, 'जीडीपीचे आकडे सकारात्मक आहेत. पण, मला वाटत नाही की पैशांच्या कमतरतेमुळे याचा व्यापक बाजारावर मोठा परिणाम होईल.' ते पुढे म्हणाले, 'सेंसेक्स आणि निफ्टी 50 वाढत राहतील. या आर्थिक वर्षाच्या अखेरपर्यंत यात 3-5% वाढ शक्य आहे, जी मजबूत आर्थिक आकडेवारीमुळे टिकून राहील.'

व्याज दर

जिओजित इन्व्हेस्टमेंट्सचे चीफ इन्व्हेस्टमेंट स्ट्रॅटेजिस्ट व्ही. के. विजयकुमार यांच्या मते, दुसऱ्या

ISBN NO. 978-81-990957-8-6

तिमाहीतील जीडीपीचे आकड्यांमुळे बाजारातील तेजीला आणखी बळ मिळेल. पण, यामुळे रिझर्व्ह बँकेकडून व्याज दरात कपात होण्याची शक्यता कमी होऊ शकते. विजयकुमार यांनी सांगितले की, 'या आकडेवारीचा एक परिणाम असा आहे की डिसेंबरमध्ये व्याज दरात कपात होण्याची शक्यता नाही. अर्थव्यवस्थेला सध्या कोणत्याही अतिरिक्त मौद्रिक प्रोत्साहनाची गरज नाही.' भारतीय रिझर्व्ह बँकेची मौद्रिक धोरण समिती ३ ते ५ डिसेंबर दरम्यान बैठक घेणार आहे. याच बैठकीत व्याज दरांबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल.

कु. राणी बुलबुले
कु. शैलेजा कोपलवाड

11/11/2025

कोणत्या कामांसाठी क्रेडिट कार्ड वापरू नये? जाणून घ्या

क्रेडिट कार्ड जितके फायद्याचे तितके नुकसानदायक सुद्धा ठरते. जर तुम्ही त्याचा स्मार्टली वापर केला तर खिसा रिकामा व्हायला वेळ लागणार नाही. काही अशी ठिकाणं आहेत. जिथं क्रेडिट कार्डचा वापर न करणे फायद्याचे ठरते. नाहीतर मोठे नुकसान होईल.

क्रेडिट कार्ड खरेदीवर चांगली ऑफर्स, कॅशबॅक, रिवॉर्ड्स मिळत असतील तर जरुर वापर करा. पण गरज नसताना आणि कोणताही फायदा नसताना अनावश्यक खर्च करत असाल तर क्रेडिट कार्डचा वापर लागलीच बंद करा. यामुळे तुमच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर वाढेल.

क्रेडिट कार्ड वापरताना नेहमी एक काळजी घ्या. क्रेडिट कार्डचा वापर हा महिन्याकाठी 30 टक्क्यांपेक्षा अधिक व्हायला नको हे पाहा. त्यामुळे तुम्हाला वेळेच्या आता क्रेडिट कार्डचे पेमेंट करता येईल.

क्रेडिट कार्डचा वापर प्रामाणित आणि योग्य ठिकाणीच करा. कोणत्याही वेबसाईटवर जाऊन काहीही खरेदी करु नका. नाहीतर तुम्ही एखादा स्कॅमचा शिकार होऊ शकतात. असुरक्षित वेबसाईटचा वापर अजिबात करू नका.

जर सार्वजनिक वायफायचा वापर करत असाल तर अशावेळी क्रेडिट कार्डचा अजिबात वापर करू नका. ऑनलाईन स्कॅमर्सला तुम्ही आवताण तर देत नाही ना याची काळजी घ्या. कारण हे स्कॅमर्स तुमच्या सर्व पैशांवर डल्ला मारतील.

क्रेडिट कार्ड डाऊन पेमेंट करत असाल आणि उर्वरीत रक्कम हप्त्याने चुकती करत असाल तर अधिक जागरूक राहा. कारण एक हप्ता मागे पुढे झाला तर तुम्हाला क्रेडिट कंपन्या, बँका व्याजाचा मोठा दणका देतात. एकदा का चक्रव्याढ व्याजाच्या फेऱ्यात अडकलात तर मग पुढे मोठे अवघड होते.

कु. वैष्णवी औंढेकर
कु. शिवानी यादव

12/11/2025

खात्यात ३३१ कोटी रुपये, तरीही चालवतोय बाईक टॅक्सी; ED घरी पोहोचली, समोर आलं अवाक् करणारं प्रकरण

एका ड्रायव्हरच्या बँक खात्यात ३३१ कोटी रुपये जमा असल्याचं प्रकरण समोर आलंय. ही रक्कम केवळ आठ महिन्यांत ड्रायव्हरच्या खात्यात जमा झाली आहे.

उदयपूर येथे झालेल्या एका शाही विवाहाच्या खर्चासाठी या खात्यातून एक कोटी रुपयांचे पेमेंट झाल्यानंतर हे प्रकरण सक्तवसुली संचालनालयाच्या (ED) निदर्शनास आलं.

ईडीच्या अधिकाऱ्यांनी तपास केल्यावर असे आढळले की या 'कोट्यधीश' खात्याची माहिती खुद्द रॅपिडो ड्रायव्हरलाही नाही आणि तो अत्यंत मुश्किलने आपला घरखर्च चालवत आहे. ईडी अधिकाऱ्यांचा असा विश्वास आहे की हे एक 'म्यूल खातं' (Mule Account) आहे, ज्याचा वापर काळ्या पैशाची हेराफेरी करण्यासाठी केला जात आहे.

अधिकाऱ्यांचा विश्वास आहे की हे खातं "म्यूल अकाउंट" म्हणून वापरले गेले आहे. म्यूल अकाउंट म्हणजे असे बँक खाते जे एकतर भाड्यानं घेतलं जातं किंवा बनावट/प्रॉक्सी कागदपत्रांच्या

 ISBN NO. 978-81-990957-8-6

आधारावर उघडलं जातं, जेणेकरून अवैध पैसा वारंवार वेगवेगळ्या खात्यांमध्ये फिरवता येईल.

प्राथमिक तपासात ईडीला आढळलं की ड्रायव्हरच्या खात्यात जमा झालेली बहुतेक रक्कम अनेक अज्ञात स्रोतांकडून आली आणि त्वरित इतर संशयास्पद खात्यांमध्ये पाठवली गेली. यापैकी किमान एका स्रोताचा थेट संबंध अवैध ऑनलाइन बेटिंगशी आहे. इतर स्रोत आणि अंतिम लाभार्थींची ओळख पटवण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे.

कु. निकिता तोमर
कु. अंकिता तोमर

13/11/2025

अमेरिकेकडून रशियाची कोंडी, सराफ बाजारात मोठा गेमचेंज! चीनने सगळा खेळ पलटवला, भारतात सोन्याच्या दरांचं गणित बदलणार?

सोन्याएवढी ताकद जगात कोणामध्येही नाही. सोन्याच्या मदतीने कठीण परिस्थितीत देश आपली डळमळणारी अर्थव्यवस्था टिकवून ठेवू शकतात, म्हणूनच गेल्या काही महिन्यांपासून चीन आणि भारतासारखे देश सतत सोने खरेदी करत आहेत.

सोन्याची खरेदी ट्रेंडमध्ये असताना रशियाने आपल्या तिजोरीत जमा केलेल्या सोन्याबाबत मोठा निर्णय घेतला आहे ज्याचा परिणाम जागतिक सराफा बाजारावर दिसून येणे अपेक्षित आहे.

रशियावर ओढवली नामुष्की

रशियाची मध्यवर्ती बँकेवर पहिल्यांदाच आपल्याकडील फिजिकल सोनं विकायची नामुष्की ओढवली आहे. रशियाच्या मध्यवर्ती बँकेने पहिल्यांदाच बाजारात आपले भौतिक सोने विकण्यास सुरुवात केली असून या सोन्याच्या विक्रीवरून रशियावरील आर्थिक दबाव स्पष्ट दिसून येत आहे. युक्रेनमध्ये युद्ध सुरु असताना अमेरिकेच्या रशियाच्या तेल कंपन्यांवरील निर्मबंधामुळे रशियन अर्थव्यवस्थेवरील बजेट दबाव वेगाने वाढत आहे.

जगातील पाचवा सर्वाधिक सोन्याचा भंडार

रशियाकडे 2,300 टन सोन्याचा साठा असून याआधी राष्ट्रीय संपत्ती निधीद्वारे सोन्याची आभासी खरेदी आणि विक्री व्हायची पण, आता पहिल्यांदाच फिजिकल सोनं विकायची वेळ रशियावर ओढवली आहे. रशिया आपली बजेट तूट भरून काढण्यासाठी या सुरक्षित मालमत्तेचे रोखीत रूपांतर करत आहे. याशिवाय युक्रेनशी युद्ध, रशियन तेलावरील निर्बंध आणि अमेरिका आणि युरोपियन युनियनने लादलेल्या निर्बंधांमुळे घटत्या निर्यातीमुळे रशिया वाढत्या आर्थिक दबावाचा सामना करत आहे.

गेल्या दोन वर्षांत रशियाच्या नॅशनल वेल्थ फंडच्या सोन्याच्या साठ्यात लक्षणीय घट झाली आहे. युक्रेन युद्धाआधी फंडमध्ये एकूण 405.7 टन सोने होते, जे आता 173.1 टनांवर कमी झाले आहे. अर्थ मंत्रालयाने अर्थसंकल्पीय तूट भरून काढण्यासाठी 232.6 टन सोने विकले आहे. अशा परिस्थितीत, युक्रेनमध्ये युद्धाचा वाढता खर्च आणि निर्बंधांमुळे घटत्या महसुलाला तोंड देण्यासाठी रशिया आपल्याकडील राखीव संसाधने विकत असल्याचे दिसत आहे.

सोन्याची विक्री किती योग्य

तेल आणि गॅसच्या उत्पन्नात घट आणि अमेरिकेसह आंतरराष्ट्रीय निर्बंधांमुळे मर्यादित परकीय चलनामुळे, रशिया सोन्याचा वापर करून आपला परकीय चलन साठा वाढवण्याचा प्रयत्न करत असल्याचे तज्ञांचे मत आहे. मात्र, तज्ञ सावधगिरीचे याकडे एक पाऊल म्हणून पाहत आहेत कारण अशा धोरणामुळे दीर्घकाळात देशाची तिजोरी कमकुवत होऊ शकते. सध्या सोन्याची किंमत गगनाला भिडली आहे परिणामी, रशिया भौतिक सोने विकून आपला परकीय चलन साठा वाढवून आर्थिक दबाव कमी करण्याचा प्रयत्न करत आहे.

चीनकडूनही सोन्याच्या साठ्यात वाढ सुरूच

दरम्यान, एकीकडे रशियाने फिजिकल सोनं विक्रीला काढलं आहे तर दुसरीकडे, चीनच्या तिजोरीत सोन्याची वाढ सुरूच आहे. चीनने 2025 मध्ये मोठ्या प्रमाणात सोने खरेदी केले असून यावर्षी आतापर्यंत चीनने अंदाजे 240 टन सोने खरेदी केले आहे. यासह, चीनचा सोन्याचा साठा

 ISBN NO. 978-81-990957-8-6

2,304 टनांवर पोहोचला तर, भारताकडे 880 टन सोन्याचा साठा आहे.

कु. प्रतीक्षा घरणे
कु. सावित्रा पावडे

14/11/2025

नवीकरणीय ऊर्जा ते जैव-अर्थव्यवस्था! 2047 पर्यंत भारतात 48 दशलक्ष हरित रोजगार निर्माण होणार

भारताची हरित अर्थव्यवस्था 2047 भाकीत 48 दशलक्ष हरित रोजगार निर्माण होणार भारतातील 36 क्षेत्रांमध्ये अब्जावधींच्या संधी

India Green Economy: कौन्सिल ऑन एनर्जी, एन्व्हायरोन्मेंट अँड वॉटर (सीईईडब्ल्यू)ने आज लाँच केलेल्या नवीन व स्वतंत्र संशोधनानुसार भारत एकत्रितपणे ४.१ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्स अंदाजे ३६० लाख कोटी रूपये हरित गुंतवणूक आकर्षित करू शकतो, परिणामत: ४८ दशलक्ष (४.८ कोटी) फुल-टाइम इक्विव्हॅलण्ट (एफटीई) रोजगार निर्माण होऊ शकतात.

२०४७ मध्ये भारत १.१ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्स अंदाजे ९७.७ लाख कोटी रुपये वार्षिक हरित बाजारपेठ निर्माण करू शकतो.

या अद्वितीय राष्ट्रीय मूल्यांकनाने ऊर्जा परिवर्तन, परिपत्र अर्थव्यवस्था व जैव-अर्थव्यवस्था आणि निसर्ग-आधारित उपायांमध्ये ३६ हरित मूल्य साखळ्यांना निदर्शनास आणले आहे, ज्या एकत्रितपणे भारताच्या 'विकसित भारत'च्या दिशेने वाटचालीसाठी महत्वपूर्ण हरित आर्थिक संधी देतात. हरित अर्थव्यवस्था म्हणजे फक्त सौर पॅनेल आणि इलेक्ट्रिक वेईकल्सना चालना देणे असा समज आहे. पण, या संशोधनामधून जैव-आधारित सामग्री, कृषी वनीकरण, हरित बांधकाम, पर्यावरण-सुसंगत पर्यटन, परिपत्र उत्पादन, कचऱ्यापासून मूल्य निर्माण करणारे उद्योग आणि निसर्गावर आधारित उपजीविकेमधील व्यापक संधींना निदर्शनास आणण्यात आले आहे, जे प्रत्येक पुढील दोन दशकांत बिलियन डॉलर्स क्षेत्रांमध्ये विकसित होऊ शकतात आणि संसाधन सुरक्षा व स्थिरता प्रबळ करू शकतात.

15/11/2025

टॅरिफ: निर्यात

भारतावर 50 टक्के टॅरिफ लावला आहे. भारत रशियाकडून तेल खरेदी करतो म्हणून भारतावर 25 टक्के अतिरिक्त टॅरिफ लावण्यात आला आहे. आता अमेरिकेमध्ये भारतीय वस्तुंवर 50 टक्के टॅरिफ आकारला जात आहे.

याचा मोठा फटका हा आता भारताच्या निर्यातीला बसला आहे, आंतरराष्ट्रीय बाजारातून भारतासाठी मोठी बातमी समोर आली आहे.अमेरिकेच्या टॅरिफ धोरणाचा भारताच्या निर्यात क्षेत्राला मोठा झटका बसला आहे, मे ते ऑक्टोबर या काळात भारतामधून अमेरिकेत होणाऱ्या निर्यातीला मोठा फटका बसला आहे. निर्यातीमध्ये जवळपास 28.5 टक्क्यांनी घट झाली आहे. विशेष म्हणजे ज्या वस्तूंवर झिरो टॅरिफ आहे, अशा वस्तूंच्या निर्यातीमध्ये देखील मोठी घट झाली आहे. ज्या वस्तूंवर झिरो टॅरिफ आहे, अशा वस्तूंच्या निर्यातीमध्ये देखील 25.8 टक्क्यांनी घसरण झाली आहे.

त्यामुळे आता चिंता व्यक्त केली जात आहे, त्यामुळे आता थिंक टँक जीटीआरआयकडून निर्यात प्रोत्साहन वाढवण्याचा सल्ला सरकारला देण्यात आला आहे. निर्यातीसाठी अनुकूल वातावरण तयार करावे, तसेच अमेरिका भारतावरील अतिरिक्त टॅरिफ हटवेल यासाठी वातावरण निर्मिती करावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत. अमेरिकेच्या टॅरिफचा भारताला दुहेरी फटका बसला आहे, एक तर भारतावर इतर देशांपेक्षा जास्त टॅरिफ आहे, त्यामुळे निर्यातीला प्रचंड फटका बसला आहे. त्यासोबतच ज्या वस्तूंवर झिरो टॅरिफ आहे, त्या वस्तूंच्या निर्यातीला देखील मोठा फटका बसला आहे.

भारतामधून अमेरिकेत होणाऱ्या निर्यातीला जीटीआरआयने तीन श्रेणींमध्ये विभागले आहे,

 ISBN NO. 978-81-990957-8-6

पहिली श्रेणी आहे, ज्यावर झिरो टॅरिफ आहे. ज्यामध्ये स्मार्टफोन, औषधे, आणि पेट्रोलियम उत्पादनाचा समावेश आहे. ज्या वस्तूंवर झिरो टॅरिफ आहे, त्या वस्तूंचा एकूण निर्यातीमध्ये 40.3 टक्के वाटा आहे. मात्र या वस्तूंच्या निर्यातीमध्ये देखील मोठी घसरण झाली आहे, ही निर्यात तब्बल 25.8 टक्क्यांनी घटली आहे. यामुळे मोठं नुकसान झालं आहे, भारताला मोठा फटका बसला आहे. भारतानं रशियाकडून तेलाची खरेदी करू नये अशी अमेरिकेची भूमिका आहे, त्यामुळे भारतावर हा टॅरिफ लावण्यात आला आहे.

कु. निकिता गाजलवाड
कु. राधिका नरहिरे

16/11/2025

सिगारेटचा झुरका महागणार! गुटख्यासह पान मसाल्याच्या किमतीही वाढणार, नवा कायदा येणार

तंबाखू, पान मसाला आणि सिगारेटसह संबंधित वस्तूंचे दर आगामी काळात वाढणार आहेत. या वस्तूंवरील GST रद्द होणार आहे, मात्र या वस्तूवरील कर तसाच ठेवण्यासाठी केंद्र सरकार लोकसभेत जीएसटी भरपाई उपकर किंवा दुसरा कर लागू करण्यासाठी दोन विधेयके सादर करण्याची शक्यता आहे.

यामुळे या वस्तूंच्या किमतीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. कार केंद्रीय उत्पादन शुल्क सुधारणा विधेयक 2025 आणि आरोग्य सुरक्षा ते राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक 2025 ही विधेयकी अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्याकडून सादर केली जाण्याची शक्यता आहे.

याबाबत पीटीआयने सूत्रांच्या हवाल्याने म्हटले की, केंद्रीय उत्पादन शुल्क सुधारणा विधेयक 2025 मध्ये सिगारेटसारख्या तंबाखू उत्पादनांवर उत्पादन शुल्क लादले जाणार आहे. तसेच आरोग्य सुरक्षा ते राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक 2025 पान मसाल्यावरील उपकराची जागा घेणार आहे. या विधेयकांचा उद्देश राष्ट्रीय सुरक्षा आणि सार्वजनिक आरोग्य खर्च पूर्ण करण्यासाठी निधी उभारणे आहे.

सध्या किती कर आहे?

तंबाखू आणि पान मसाला 28% जीएसटी कराच्या कक्षेत आहे, तसेच यावर भरपाई उपकरही वेगवेगळ्या दरांनी आकारला जातो. 1 जुलै 2017 रोजी जीएसटी लागू करताना, जीएसटीच्या अंमलबजावणीमुळे काही राज्यांना झालेल्या महसुली नुकसानाची भरपाई करण्यासाठी 30 जून 2022 पर्यंत पाच वर्षांसाठी भरपाई उपकर प्रणाली लागू करण्यात आली होती. नंतर हा उपकर 31 मार्च 2026 पर्यंत वाढवण्यात आला आहे. त्यामुळे यावर दुहेरी कर आकारला जात आहे.

तंबाखू आणि पान मसाल्यावरील उपकर

जीएसटी परिषदेने 3 सप्टेंबर 2025 रोजी, कर्जाची परतफेड होईपर्यंत तंबाखू आणि पान मसाल्यासह संबंधित उत्पादनांवर भरपाई उपकर सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला होता. सरकारने जीएसटी दर 5 टक्के आणि 18 टक्के अशा दोन गटात लागू करण्याचा निर्णय घेतला तेव्हा काही वस्तूंवरील भरपाई उपकर संपला होता. मात्र काही वस्तूंवर 40% दर निश्चित करण्यात आला होता. आता केंद्रीय उत्पादन शुल्क दुरुस्ती विधेयक 2025 आणि आरोग्य सुरक्षा ते राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक 2025 द्वारे तंबाखू, सिगारेट आणि पान मसाला सारख्या पदार्थांवर नवीन कर लादणार आहे. जो सध्याच्या करापेक्षा जास्त असण्याचीही शक्यता आहे. त्यामुळे या उत्पादनांच्या किमती आणखी वाढू शकतात.

कु. पायलकौर जाधव
कु. साक्षी ठाकूर

17/11/2025

जगात सर्वाधिक सोने कोणत्या देशाकडे ? भारताचा क्रमांक कितवा ? पहा टॉप देशांची यादी

 ISBN NO. 978-81-990957-8-6

सोने असणे म्हणजे ती व्यक्ती श्रीमंत असणे हे समीकरण प्राचीन काळापासून आहे. सोने केवळ दागिन्यांच्या रुपात नव्हे तर सोन्याचा साठा हा देशांच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो.

डिजिटल करन्सीच्या काळात सोने सुरक्षा, स्थिरता आणि धनाचे प्रतिक म्हणून आज देखील जास्त महत्वाचे आहे.मग प्रश्न निर्माण होतो की कोणत्या देशाकडे सर्वाधिक सोने आहे.

जगात सर्वाधिक सोने (GOLD) कोणाकडे ?

ट्रेडिंग इकॉनॉमिक्सच्या ताज्या रिपोर्टनुसार संयुक्त राज्य अमेरिकेकडे (USA) सप्टेंबर २०२५ पर्यंत ८,१३३ टन सोने आहे. वास्तविक अमेरिका अनेक वर्षांपासून सोन्याचे सर्वात मोठे भंडार असलेला देश आहे. आणि साल २००० पासून जवळपासून अमेरिकेच्या सोन्याचा साठा स्थिर आहे.त्यामुळे या यादीत पहिल्या क्रमांकावर अमेरिकेचा नंबर आहे. युरोपातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेला जर्मनीकडे ३,३५० टन सोने आहे.जे साल २००० मध्ये ३,४६८ टन होते. यामुळे जर्मनी जगात दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक सोने असलेला देश आहे.

रशियाच्याजवळ किती सोने ?

या यादीत तिसऱ्या क्रमांकावर इटलीचा नंबर आहे. सप्टेंबर २०२५ पर्यंत या युरोपीय देशाकडे २,४५२ टन सोने आहे.भारताचा खास दोस्त फ्रान्सकडे सध्या २,४३७ टन सोने आहे.त्यामुळे जगात फ्रान्स सोन्याच्या बाबतीत चौथ्या क्रमांकावर आहे. भारताचा सर्वात मोठा मित्र देश रशियाकडे २,३३० टन सोने आहे. रशिया त्यामुळे या यादीत पाचव्या क्रमांकावर आहे. हे आकडे सप्टेंबर २०२५ चे आहेत.

भारताकडे जपानपेक्षा जास्त सोने

भारताचा शेजारील देश चीनकडे २,३०४ टन सोने आहे. याआधी चीनकडे २,२९९ टन सोने होते. म्हणजे हे स्पष्ट आहे की चीन हळूहळू आपला सोन्याचा साठा वाढवत आहे. सर्वात जास्त सोने बाळगणाऱ्या देशाच्या यादीत चीनचा सहावा क्रमांक आहे. युरोपातील छोटा देश स्वित्झर्लंडकेड सध्याच्या काळात १,०४० टन सोने आहे. तसेच भारताचे बोलायचे झाले तर सध्या भारताकडे ८८० टन सोने आहे, जे आतापर्यंतचे सर्वाधिक सोने आहे. भारत सोन्याच्या बाबतीत ८ वा देश आहे. भारताचा मित्र जपानकडे ८४६ टन सोने आहे. जपान या यादीत नवव्या क्रमांकावर आहे.

कु. कार्तिका पगडाला
कु. गजानन राजरवाड

18/11/2025

एका रशियन रुबलचे भारतात किती रुपये होतात? रुपया मोठा की रुबल ?

भारताचा जीडीपी जुलै ते सप्टेंबरमध्ये ८.२ टक्के ग्रोथ रेटने वाढला आहे. सध्या भारत ४.३ ट्रीलियन डॉलरच्या जीडीपीसह जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था आहे.तर रशियाच्या नंबर नववा आहे. रशियाचा जीडीपी २.५४ ट्रीलियन डॉलर आहे.

चलनात जास्त अंतर नाही...

आता रशियाची करन्सी आणि भारतीय रुपयांची तुलना केली तर यात जास्त अंतर नाही. Xe कन्वर्टरच्या अनुसार एका रशियाच्या एका रुबलची किंमत भारतात १.१६ रुपयांच्या बरोबर आहे. म्हणजे दोन्हीत केवळ १६ पैशांचे अंतर आहे.रशियाच्या रुबलची किंमत भारतीय रुपयांपेक्षा १६ पैसे जास्त आहे. भारताचा एक रुपया ०.८५ रशियन रुबलच्या बरोबर आहे. डॉलरशी तुलना करता एका डॉलरची किंमत ७७.२० रशियन रुबलच्या बरोबर आहे.जर एक अमेरिकन डॉलर भारतात ९० रुपयांच्या बरोबर आहे.

कु. राणी बुलबुले
कु. शैलेजा कोपलवाड

19/11/2025

रुपयाचे गडगडणे किती धोक्याचे?

रुपयाची घसरण' हा कायमच सार्वजनिक चर्चेचा एक लोकप्रिय मुद्दा राहिला आहे. ऐंशीच्या दशकात गंगाधर गाडगीळ यांच्या अर्थकथांमधील जोडपे बंडू आणि स्नेहलता हेही रुपयाच्या

 ISBN NO. 978-81-990957-8-6

कोसळण्याने गांगरून गेले होते, यावरूनच हे दुखणे किती जुनाट आहे हे लक्षात येईल.

रुपया आणि डॉलर यांचा विनिमय दर किंवा कोणत्याही दोन देशांच्या चलनांतील विनिमय दर ठरण्यामागे त्या देशांतील आयात-निर्यात, 'Balance Of payment' या प्रमुख घटकांबरोबरच दोन देशांतील प्रचलित व्याजदर, चलनफुगवटा (inflation), मध्यवर्ती बँकांची धोरणे, चलन बाजारांत व्यवहार करणाऱ्या गुंतवणूकदारांची मानसिकता अशा अनेक घटकांवर अवलंबून असतो. हा एक क्लिष्ट अर्थशास्त्रीय विषय आहे. मात्र, त्या खोल डोहात न जाता शेअर बाजारांतील गुंतवणूकदारांनी या मुद्द्याकडे कसे पाहावे?

१९४७ मध्ये रुपया आणि डॉलर हे समान पातळीवर होते, म्हणजेच एक रुपया देऊन एक डॉलर मिळत होता. तेव्हापासून ७८ वर्षांत डॉलरच्या दरात ९० पटीने वाढ झाली आहे. मिरची, लिंबू, कोथिंबिरीचे आणि बहुतेक सगळेच भाव डॉलरपेक्षा जास्त वेगाने वाढले आहेतच, की मग डॉलरची वाढ म्हणजे राष्ट्रीय आपत्ती ही ओरड कशाला? ठीक आहे, डॉलर ९० पटीने महागला. मग नक्की काय बिघडले? देश दिवाळखोरीत गेला, की अर्थव्यवस्था कोसळली? रोजगार समाप्त झाले, की दारिद्र्य वाढले? डॉलर ९० रुपये असताना आज देशाची आर्थिक स्थिती उत्तम आहे, की पूर्वी ती अधिक चांगली होती? अर्थात, देशांतर्गत उत्पादनांतील पिछाडी, परदेशी वस्तूंवरील वाढती भिस्त वा परावलंबित्व याचे दुरान्वयानेही समर्थन करायला नको, असा खर्च नक्कीच हिताचा नाही, यात शंका नको.

शेवटी सांगायचे काय? अर्थशास्त्रात पूर्णतः वाईट किंवा शतप्रतिशत उत्तम, असे काही अभावानेच असते. प्रत्येक मोठ्या अर्थशास्त्रीय घटनेस असंख्य पदर असतात, वेगवेगळ्या छटा असतात. तेव्हा विनिमय दरांसारख्या किचकट विषयांचा एकांगी, एककल्ली परिणाम कसा शक्य आहे? डॉलरचे दर चढे राहिल्याने मुलांना शिक्षणासाठी परदेशात पाठविलेल्या मंडळींना डॉलर विकत घ्यावयाचे असल्यामुळे ती कष्टी होणे स्वाभाविक आहे. मात्र, त्याचवेळी अमेरिकेत नोकरी करणारे भारतीय तरुण जे तिकडून भारतात पैसे पाठवतात, त्याचे काय? वाढणारा डॉलर कमिन्स वा मारुतीसारख्या कंपन्यांना हानिकारक आहे, तर दुसरीकडे तोच औषधनिर्माण आणि माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रातील कंपन्यांना फायदेशीर असतोच की.

विनिमयदराच्या बाबत रुपया गडगडला, घसरला, कमकुवत झाला...असे 'भीतीप्रद' शब्दप्रयोग ऐकायला मिळाल्याने या बाबतीत आपला नकारात्मक दृष्टिकोन बनला आहे कदाचित; पण असे नसते. A Stronger currency is not always a good thing.. तसे असते, तर इतिहासात अनेकदा घडविलेले चलनाच्या अवमूल्यनाचे (Devaluation) पाऊल उचलले गेलेच नसते. तेव्हा सारांश, केवळ 'रुपया कोसळतोय, म्हणून भारतीय बाजारांत गुंतवणूक करू नका' हा सल्ला व्हॉट्सॲपवरील विनोदांइतकाच हलका घेण्याजोगा आहे.

कु. वैष्णवी औंढेकर
कु. शिवानी यादव

20/11/2025

श्रम संहितेतील ठळक बदल

वेतन संज्ञेची व्याख्या

मूळ वेतन या शब्दाची नवी व्याख्या म्हणजे बेसिक पगार, महागाई भत्ता आणि रिटेनिंग अलाउन्स हे एकूण वेतनाच्या किमान ५० टक्के असावे, अशी अनिवार्यता करण्यात आली आहे.

पूर्वी कंपन्या बेसिक कमी ठेवून घरभाडे भत्ता, स्पेशल अलाउन्स, इतर भत्ते काही अंशी अधिक देऊन 'मूळ वेतन' कमी दाखवू शकत होत्या, ज्यामुळे पीएफ, ग्रॅच्युइटीसाठी भरावयाची रक्कम

 ISBN NO. 978-81-990957-8-6

त्यामानाने कमी होत होती. या नव्या नियमांनी मूळ वेतन वाढविण्यास भाग पाडले आहे. त्यामुळे, 'सीटीसी' तशीच राहिली, तर भत्ते कमी होण्यामुळे कर्मचाऱ्यांचा घरी नेण्याचा (टेक होम) पगार थोडा कमी होण्याची पुरेपूर शक्यता आहे, त्यामुळे, कर्ज पात्रता योग्यतेवर व मासिक खर्चावर तत्काळ नकारात्मक परिणाम होऊ शकतो. मात्र, दीर्घकालीन दृष्टीने हे निवृत्तिनियोजन बळकट करेल आणि सामाजिक सुरक्षा वाढवेल.

ओव्हरटाइम

कामाच्या तासांचा विचार केला, तर नियमांमध्ये जास्त काम करण्यास स्पष्ट संरक्षण दिले आहे. ओव्हरटाइम काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतन दराच्या किमान दुप्पट वेतन द्यावे लागेल. वार्षिक पगारी रजेची पात्रतादेखील शिथिल करण्यात आली आहे. कामगार आता २४० दिवसांऐवजी १८० दिवसांच्या सेवेनंतर पात्र होऊ शकतात. त्यामुळे नव्या कर्मचाऱ्यांना रजेचे फायदे मिळविण्यासाठी संपूर्ण वर्ष वाट पाहावी लागणार नाही.

गॅरंटीड किमान वेतन

सर्वांत मोठा बदल म्हणजे संघटित किंवा असंघटित क्षेत्रातील प्रत्येक कर्मचाऱ्यांना आता किमान वेतनाची हमी दिली जाईल. पूर्वी, राज्य आणि उद्योग क्षेत्रानुसार किमान वेतन नियम वेगवेगळे होते, ज्यामुळे बरेच कामगार त्यात समाविष्ट होत नव्हते. नव्या व्यवस्थेत, केंद्र राष्ट्रीय स्तरावर किमान वेतन निश्चित करेल आणि कोणत्याही राज्याला त्या पातळीपेक्षा कमी वेतन निश्चित करण्याची परवानगी दिली जाणार नाही. यामुळे देशभरात अधिक एकरूपता आणि निष्पक्षता येईल, अशी अपेक्षा आहे.

महिला-पुरुष समानता

महिला-पुरुष समानतेच्या दिशेने प्रगतीशील वाटचाल करताना, महिला सर्व क्षेत्रांमध्ये रात्रीच्या पाळीमध्ये काम करू शकतात, त्यांनी त्यांची संमती दिली तर. नियोक्त्यांनी त्यांना पुरेशी सुरक्षितता आणि वाहतूक व्यवस्था सुनिश्चित करायला हवी. लिंग-आधारित वेतन भेदभावदेखील स्पष्टपणे प्रतिबंधित करण्यात आला आहे.

घरून काम

घरून काम करण्याची व्यवस्था औपचारिकरीत्या ओळखली गेली आहे, विशेषतः सेवा-क्षेत्रातील भूमिकांमध्ये. नियोक्ता आणि कर्मचाऱ्यांमधील परस्पर संमतीने ती अमलात आणता येईल.

नियुक्तिपत्र अनिवार्य

पारदर्शकता सुधारण्यासाठी, असंघटित क्षेत्रातील कामगारांसह सर्व नियोक्त्यांनी आता प्रत्येक नव्या कर्मचाऱ्याला औपचारिक नियुक्तिपत्र जारी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. हे केवळ वेतन आणि नोकरीची पुष्टी करत नाही, तर कामगारांना सामाजिक सुरक्षा लाभांचे हक्कदेखील सुरक्षित करते. लाखो अनौपचारिक कामगार, अनेकदा कागदपत्रांशिवाय काम करतात, त्यांच्या नोकरी स्थिरतेच्या दिशेने हे एक मोठे पाऊल आहे.

आरोग्य तपासणी

कंपन्यांनी आता ४० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या सर्व कामगारांना मोफत वार्षिक आरोग्य तपासणी करणे गरजेचे आहे. यामुळे प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेला प्रोत्साहन मिळाले असून, जीवनशैलीशी संबंधित परिस्थितींच्या नियमित निरीक्षणाला प्रोत्साहन देते. हा मोठा बदल ठरावा.

वेतनचक्र

आर्थिक स्थिरता हा आणखी एक महत्त्वाचा भाग आहे. नियोक्त्यांनी एका निश्चित वेळेच्या आत वेतन दिले पाहिजे, जसे की मासिक वेतन चक्रासाठी सात दिवसांच्या आत किंवा कर्मचारी संघटना सोडल्यानंतर दोन कामकाजाच्या दिवसांच्या आत. वेळेवर देयके मिळणे हे तात्पुरते कामगार आणि संघटित क्षेत्रातील कामगार दोघांनाही फायदेशीर ठरेल, अशी अपेक्षा आहे.

कामगार सुरक्षा

कामगार सुरक्षिततेबाबतही दक्षता घेण्यात आली असून, घर आणि कामाच्या ठिकाणी प्रवास करताना होणारे अपघात आता रोजगाराशी संबंधित मानले जातील, अशा प्रकरणांमध्ये नुकसानभरपाईचे अधिकार निश्चित केले आहेत.

ग्रॅच्युइटी

 ISBN NO. 978-81-990957-8-6

सेवकांची निश्चित मुदतीसाठी व सर्वसाधारणपणे नियुक्त केलेले सेवक अशी विभागणी केली आहे. त्यात सर्वसाधारणपणे नियुक्त केलेल्या सेवकांना पाच वर्षांच्या सतत सेवेनंतर ग्रॅच्युइटी मिळू शकते. ठराविक काळासाठी परंतु, एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी नियुक्त केलेल्या सेवकासाठी करार संपल्यावर ग्रॅच्युइटी मिळेल, असा बदल आहे. याखेरीज प्रत्येक वर्षासाठी १५ दिवसांची ग्रॅच्युइटी मिळेल. परंतु, ग्रॅच्युइटीची आकडेमोड करताना पूर्वीच्या ३० दिवसांऐवजी २६ दिवस धरण्यात येतील. या बदलामुळे मोठ्या प्रमाणात ग्रॅच्युइटीची रक्कम वाढेल. सरकारी नोकरांसाठी करमुक्त रक्कम २५ लाख रुपये, तर इतरांसाठी २० लाख रुपये असेल.

कु. निकिता तोमर
कु. अंकिता तोमर

01/12/2025

रेपो दर

चलनवाढीचा दबाव कमी झाल्यामुळे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) त्यांच्या आगामी पतधोरण बैठकीत रेपो दरात 0.25 टक्के कपात करू शकते. जर नियामक बँकेने रेपो दरात कपात जाहीर केली तर त्याचा थेट फायदा सर्वसामान्यांना होईल.

कर्जाचे हप्ते कमी होतील आणि स्वस्त दरात कर्ज मिळण्याची शक्यताही वाढेल. ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित किरकोळ महागाई गेल्या दोन महिन्यांपासून सरकारच्या 2 टक्क्यांच्या कमी लक्ष्यापेक्षा कमी आहे.

काही तज्ञांचे म्हणणे आहे की, आर्थिक तेजीमुळे आरबीआय व्याजदर कमी करणार नाही. सरकारी खर्चात कपात, लक्ष्यित सरकारी गुंतवणूक आणि जीएसटी दर कपात यासारख्या सुधारणांमुळे ही तेजी बळकट झाली आहे. चलनविषयक धोरण समितीची बैठक ३-५ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे. आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा ५ डिसेंबर रोजी निर्णय जाहीर करतील. मध्यवर्ती बँकेने गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये दर कमी करण्यास सुरुवात केली होती.

रेपो दर एकूण १ टक्क्यांनी कमी करून ५.५ टक्के केला होता. ऑगस्टमध्ये ही कपात थांबवण्यात आली होती. काही तज्ञांच्या मते, महागाईचा दबाव कमी झाल्यामुळे आरबीआय येत्या बैठकीत प्रमुख व्याजदरात ०.२५ टक्के कपात करू शकते. एचडीएफसी बँकेच्या अहवालानुसार, या वर्षी आर्थिक वाढ अपेक्षेपेक्षा जास्त आहे आणि चलनवाढ अपेक्षेपेक्षा कमी आहे. अहवालात म्हटले आहे की, आगामी निर्णय हा अत्यंत स्पर्धात्मक असेल. दुसऱ्या सहामाहीत विकासदरात काही जोखीम आहेत.

आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या तिसऱ्या तिमाहीपर्यंत महागाई ४ टक्क्यांपेक्षा कमी राहण्याची अपेक्षा आहे, त्यामुळे या बैठकीत आणखी ०.२५ टक्के दर कपात होऊ शकते असे आम्हाला वाटते. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या आर्थिक संशोधन विभागाच्या अहवालात असे म्हटले आहे की, मजबूत जीडीपी वाढ आणि अतिशय कमी चलनवाढीमुळे आरबीआयला आता या आठवड्यात होणाऱ्या एमपीसी बैठकीत व्याजदरांची दिशा बाजाराला स्पष्टपणे कळवावी लागेल.

बँक ऑफ बडोदाचे मुख्य अर्थतज्ज्ञ मदन सबनवीस म्हणाले की, आगामी धोरणात रेपो दराबाबत चुरशीची स्पर्धा असेल. चलनविषयक धोरण भविष्याकडे पाहणाऱ्या दृष्टिकोनातून तयार केले जात असल्याने, सध्या व्याजदर योग्य पातळीवर असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत, व्याजदरात कोणताही बदल व्हावा असे आम्हाला वाटत नाही."

क्रिसिलचे मुख्य अर्थतज्ज्ञ धर्मकीर्ती जोशी म्हणाले की, डिसेंबरमध्ये रेपो दरात ०.२५ टक्के कपात केली जाऊ शकते. आर्थिक वाढ मजबूत राहिली आहे, परंतु ऑक्टोबरमध्ये किरकोळ महागाईत झालेल्या तीव्र घसरणीमुळे कपातीसाठी अधिक जागा निर्माण झाली आहे.

कु. प्रतीक्षा घरणे
कु. सावित्रा पावडे

 ISBN NO. 978-81-990957-8-6

02/12/2025

नोव्हेंबरमध्ये एफपीआय का पळाले? परदेशी गुंतवणूकदारांनी एका महिन्यात 3,700 कोटी विकले

शेअर बाजार परदेशी गुंतवणूकदारांच्या कृतींमुळे पुन्हा एकदा संपूर्ण गोंधळात पडला आहे. ऑक्टोबरमध्ये परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी यांनी १४,६१० कोटी रुपये गुंतवलयाने तेव्हा थोडासा दिलासा मिळाला. परकीय पैसा पुन्हा रुळावर आला आहे. परंतु नोव्हेंबर सुरू होताच परिस्थिती पुन्हा बदलली. परदेशी गुंतवणूकदारांनी एकाच वेळी ३,७६५ कोटी रुपये काढून घेतले, ज्यामुळे जागतिक बाजाराची भीती अद्याप कमी झालेली नाही. परदेशी गुंतवणूकदार काही दिवस खरेदी करतात, तर काही दिवस विक्री करतात त्यामुळे त्यांच्या गुंतवणुकीची दिशा निश्चित नाही.

यूएस फेडरल रिझर्व्ह नेमकं काय करेल किंवा दर कमी करेल का? या दुविधेने परदेशी गुंतवणूकदारांनी जोखीम घेण्याचे धाडस कमी केले आहे. त्याशिवाय, मजबूत डॉलर, कमकुवत टेक स्टॉक्स आणि अस्थिर कच्च्या तेलाच्या किमती यासुद्धा याला कारणीभूत आहेत. यामुळे, जागतिक जोखीम बंदचा परिणाम उदयोन्मुख अर्थव्यवस्थांवर स्पष्टपणे दिसून येत आहे.

शेअर बाजारात नोव्हेंबरमध्ये आयटी, ग्राहक सेवा आणि आरोग्यसेवा क्षेत्रांना सर्वाधिक फटका बसला असून जागतिक तंत्रज्ञानातील उलथापालथीचा थेट परिणाम भारतीय तंत्रज्ञानवर झाला. अनेक एफपीआयनी या क्षेत्रांमधून माघार घेतली आणि त्यांचे पोर्टफोलिओ हलके करण्याचा निर्णय घेतल्याने घसरण झाली.

शेअर बाजार उसळी घेत असला किंवा देशांतर्गत संकेत सकारात्मक असले तरी जगातील सर्वात प्रतिष्ठित विश्लेषक देखील जागतिक वारे कोणत्या दिशेने वाहतील हे सांगू शकत नाहीत. नोव्हेंबरमध्ये परदेशी गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणात विक्री केली. परंतु, यूएस फेडची कोंडी, जागतिक तंत्रज्ञानातील चढउतार आणि प्राथमिक बाजाराकडे वळल्यामुळे बाजारातून ३,७६५ कोटी रुपयांची रक्कम काढून घेण्यात आली.

शेअर बाजार सध्या दोन प्रमुख घटकांवर लक्ष केंद्रित करत असून यामध्ये प्रथम अमेरिकेत फेडरल रिझर्व्ह कोणत्या दिशेने जाईल यावर अवलंबून आहे तर दुसरीकडे भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार करारात किती प्रगती झाली. या दोन गोष्टींवर डिसेंबरचा एफपीआय ट्रेंड पूर्णपणे अवलंबून असेल. आतापर्यंत एकूणच, २०२५ मध्ये एफपीआयनी भारतीय शेअर बाजारातून १.४३ लाख कोटी रुपये काढले आहेत.

कु. निकिता गाजलवाड
कु. राधिका नरहिरे

03/12/2025

सोनं आणखी महागणार, 2026 मध्ये सोनं 35 -40 हजारांनी वाढणार

2025 हे वर्ष सोन्यात गुंतवणूक करणाऱ्यांना दमदार रिटर्न देणारं ठरलंय. कारण, या वर्षी सोन्याचे दर 53 टक्क्यांनी वाढलेत. म्हणजेच ज्यांनी डिसेंबर 2024 मध्ये सोन्यात गुंतवणूक केली असेल त्यांना जोरदार फायदा झाला आहे.

आगामी 2026 या वर्षात सोनं आणखी महाग होणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. सोन्याचे दर सध्याच्या स्तरावरुन 15 ते 30 टक्क्यांनी वाढतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. वर्ल्ड गोल्ड काऊन्सिलनं हा अंदाज वर्तवला आहे. म्हणजेच 24 कॅरेट सोन्याचा एका तोळ्याचा दर 127000 ते 130000 रुपयांच्या दरम्यान आहे. यात 30 टक्क्यांची वाढ म्हणजे. साधारणपणे 35 हजार ते 40 हजार रुपयांची वाढ होऊ शकते.

Gold Rate Hike : सोने आणखी महागणार

वर्ल्ड गोल्ड काऊन्सिलच्या एका नोटमध्ये हा अंदाज वर्तवण्यात आला आहे. 2025 मध्ये सोन्याचे दर 53 टक्क्यांनी वाढले आहेत. अमरिकेचं टॅरिफ आणि भूराजनैतिक अस्थिरतेच्या कारणामुळं

 ISBN NO. 978-81-990957-8-6

गुंतवणूकदारांमध्ये चिंतेचं वातावरण निर्माण झाल्यानं त्यांनी सोन्यात गुंतवणूक केली. 2025 मध्ये जगभरातील केंद्रीय बँकांनी सोनं मोठ्या प्रमाणावर खरेदी केलं. वर्ल्ड गोल्ड काऊन्सिलच्या रिपोर्टनुसार डायवर्सिफिकेशन आणि स्थिरता लक्षात गेता केंद्रीय बँकांनी सोन्याची खरेदी वाढवली.

वर्ल्ड गोल्ड काऊन्सिलच्या रिपोर्टनुसार कोसळत असलेले यील्ड, वाढता राजनैतिक तणाव यामुळं गुंतवणुकीचा सुरक्षित पर्याय म्हणून सोन्यातील गुंतवणूक वाढली. या परिस्थितीत सोन्याचे दर 2026 मध्ये 15 ते 30 टक्क्यांनी वाढू शकतात.

2025 मध्ये ग्लोबल गोल्ड ईटीएफ म्हणजेच एक्सचेंज ट्रेडेड फंडस्मध्ये 77 अब्ज डॉलर्सची गुंतवणूक गुंतवणूक झाली आहे. वर्ल्ड गोल्ड काऊन्सिलच्या डेटानुसार त्यांच्या होल्डिंगमध्ये 700 टनाहून अधिक सोनं जमा झालंय. वर्ल्ड गोल्ड काऊन्सिलच्या अंदाजे 2026 मध्ये जर सोन्याचे दर घसरले तर 5 ते 20 टक्क्यांची घसरण होऊ शकते.

कु. पाणेरी खिल्लारे
कु. कृष्णा वर्ताळे

04/12/2025

सोन्याचे दर

इंडियन बुलियन ज्वेलर्स असोसिएशनकडून दिवसातून दोनदा सोन्याचे दर जाहीर केले जातात. त्यांच्या वेबसईटनुसार 4 डिसेंबरला 24 कॅरेट सोन्याचा एका तोळ्याचा दर 127850 रुपये इतका आहे. तर, 22 कॅरेट सोन्याचा एका तोळ्याचा दर 124780 रुपये आहे. तर, एक तोळे 20 कॅरेट सोनं खरेदी करण्यासाठी 113780 रुपये मोजावे लागतील.

2025 मध्ये सोन्याच्या गुंतवणूकदारांना जोरदार रिटर्न मिळाले आहेत. 31 डिसेंबरला 24 कॅरेट सोन्याचा दर 75000 रुपयांच्या दरम्यान होता. 4 डिसेंबरला 24 कॅरेट सोन्याचा दर 127850 रुपये तोळा झाला आहे. म्हणजेच जवळपास 52000 रुपयांची वाढ झालीय. दुसरीकडे चांदीच्या दरात देखील मोठी वाढ झाली आहे. चांदीचे दर 86000 रुपये किलो होते. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर चांदीचा दर 184727 रुपयांवर पोहोचला.

4 डिसेंबरचे सोन्याचे 10 ग्रॅमचे दर

24 कॅरेट सोने : 127850 रुपये

22 कॅरेट सोने : 124780 रुपये

20 कॅरेट सोने : 113780 रुपये

18 कॅरेट सोने : 103550 रुपये

14 कॅरेट सोने : 82460 रुपये

कु. साधना मुंडे
कु. भूमीका नागडा

05/12/2025

विमान उड्डाणे रद्द करणं इंडिगोला पडलं महागात! तब्बल 7 हजार 160 कोटी रुपयांचं नुकसान

देशातील सर्वात मोठी विमान कंपनी इंडिगोला पायलट आणि क्रू मेंबर्सची कमतरता भासत आहे. यामुळे एअरलाइनला 200 हून अधिक उड्डाणे रद्द करावी लागली आहेत. या निर्णयामुळे कंपनीला शेअर बाजारात मोठा फटका बसला आहे. ट्रेडिंग सत्रादरम्यान, कंपनीचे शेअर्स 3 टक्क्यांपेक्षा जास्त घसरले, ज्यामुळे तिचे मूल्यांकन 7160 कोटींनी कमी झाले.

नोव्हेंबरमध्येही कंपनीला अनेक उड्डाणे रद्द करावी लागली. गेल्या काही दिवसांत, एअरलाइनच्या समस्या आणखी वाढल्या आहेत, ज्यामुळे नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (DGCA) हस्तक्षेप करून या प्रकरणावर एअरलाइनकडून स्पष्टीकरण मागितले आहे. कंपनीला पीक सीझनमध्ये तिचे कामकाज कसे सुव्यवस्थित करायचे याचा तपशीलवार आराखडा सादर करण्यास सांगितले आहे.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

कंपनीच्या शेअर्समध्ये लक्षणीय घसरण दिसून आली

बीएसईच्या आकडेवारीनुसार, देशातील सर्वात मोठ्या विमान कंपन्यांपैकी एक असलेल्या इंडिगोच्या शेअर्समध्ये लक्षणीय घसरण दिसून आली. ट्रेडिंग सत्रादरम्यान कंपनीचा शेअर 3.30 टक्क्यांनी घसरला आणि तो 5407.30 च्या नीचांकी पातळीवर पोहोचला. कंपनीचा शेअर आदल्या दिवशी 5592.50 वर व्यवहार करत होता. दुपारी 3 वाजता कंपनीचा शेअर 5428 वर व्यवहार करत होता, जो जवळजवळ 3 टक्क्यांनी घसरला. सकाळी कंपनीचा शेअर 5499 वर उघडला होता. 18 ऑगस्ट रोजी कंपनीचा शेअर 52 आठवड्यांच्या उच्चांकी 6225 वर पोहोचला. तेव्हापासून, त्यात 13 टक्क्यांहून अधिक घसरण दिसून आली आहे.

कंपनीला 7160 कोटी रुपयांचा तोटा

कंपनीच्या शेअर्समध्ये घसरण झाल्यामुळे, इंडिगोच्या मूल्यांकनातही लक्षणीय घट झाली आहे. गुरुवारी व्यवहार बंद होताना कंपनीचे बाजार भांडवल 216200.51 कोटी रुपये होते, ते गुरुवारी व्यवहार सत्रात 209040.86 कोटी रुपयांवर घसरले. याचा अर्थ व्यवहार सत्रात कंपनीला 7160 कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला. तज्ञांचा असा विश्वास आहे की जोपर्यंत विमान कंपनीच्या कामकाजात सुधारणा होत नाही तोपर्यंत तिच्या शेअर्सवर दबाव राहू शकतो.

200 हून अधिक उड्डाणे रद्द

गुरुग्रामस्थित विमान कंपनी तिच्या वैमानिकांसाठी नवीन उड्डाण-कर्तव्य आणि विश्रांती कालावधी नियमांच्या प्रकाशात तिच्या उड्डाणे चालविण्यासाठी आवश्यक क्रू सदस्यांची व्यवस्था करण्यात संघर्ष करत आहे. यामुळे, इंडिगोने गुरुवारी मुंबई, दिल्ली आणि बेंगळुरू या तीन विमानतळांवरून तसेच देशभरातील इतर शहरांमधून 200 हून अधिक उड्डाणे रद्द केली. दिवसभरात मुंबई विमानतळावर रद्द झालेल्या उड्डाणांची संख्या 86 (41आगमन आणि 45 निर्गमन) होती. बेंगळुरूमध्ये 73 उड्डाणे रद्द झाली, ज्यात 41 आगमनांचा समावेश होता. त्याव्यतिरिक्त, गुरुवारी दिल्ली विमानतळावर 33 उड्डाणे रद्द करण्यात आली. सूत्रांनी सांगितले की दिवस पुढे सरकत असताना रद्द होणाऱ्या संख्येत वाढ होण्याची अपेक्षा आहे.

समस्या कशामुळे निर्माण होत आहे?

दिल्ली, मुंबई, चेन्नई, कोलकाता, बेंगळुरू आणि हैदराबाद या सहा प्रमुख विमानतळांवर एअरलाइनची वेळेवर कामगिरी (ओटीपी) 3 डिसेंबर रोजी 19.7 टक्क्यांपर्यंत घसरली कारण त्यांना त्यांच्या सेवा चालविण्यासाठी आवश्यक असलेल्या कर्मचाऱ्यांची भरती करण्यात अडचण येत होती. २ डिसेंबर रोजी ही संख्या ३५ टक्के होती, तर ही संख्या जवळजवळ निम्मी आहे. एफडीटीएल (फ्लाइट ड्युटी टाइम लिमिट) नियमांच्या दुसऱ्या टप्प्याच्या अंमलबजावणीपासून इंडिगोला क्रूची तीव्र कमतरता भासत आहे, ज्यामुळे सर्व विमानतळांवर उड्डाणे रद्द होत आहेत आणि कामकाजात लक्षणीय विलंब होत आहे, असे एका सूत्राने बुधवारी सांगितले.

कु. दुर्गा संतोष साखरे
कु. संभाजी तोटरे

06/12/2025

झिरो कमिशनसोबत 'भारत टॅक्सी' सेवा लॉन्च; मिळणार अल्प दरात राइड्स, जाणून घ्या दर आणि बुकिंग प्रक्रिया

ओला आणि उबरला टक्कर देण्यासाठी 'भारत टॅक्सी' ही नवी सहकारी टॅक्सी सेवा सुरू करण्यात आली आहे. वाहन चालकांना अधिक फायदा मिळावा यासाठी ही योजना आणण्यात आली असून सध्या दिल्ली आणि गुजरातमध्ये ही सेवा सुरू आहे.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

पुढील काळात ही सेवा देशभरात सुरू करण्याची तयारी आहे. मेट्रो शहरांपासून ते इतर शहरांपर्यंत ओला, उबर आणि रॅपिडोला टक्कर देण्यासाठी भारत टॅक्सी मैदानात उतरली आहे.

भारत टॅक्सी म्हणजे काय?

भारत टॅक्सीभारताची ही पहिली सहकारी टॅक्सी सेवा आहे. केंद्र सरकारच्या सहकार मंत्रालयाने आणि नॅशनल ई-गव्हर्नन्स डिव्हिजनने मिळून हा प्लॅटफॉर्म तयार केला आहे. या प्लॅटफॉर्मचं संचालन मल्टी-स्टेट को-ऑपरेटिव्हमार्फत होतं. यात ड्रायव्हर्स 'सारथी सदस्य' असतात आणि तेच हिस्सेदारही असतात. त्यामुळे नफा-तोटा, धोरणे आणि निर्णयांमध्ये त्यांचा थेट सहभाग असतो.

भारत टॅक्सी कशी काम करते?

भारत टॅक्सी ॲप ओला-उबरप्रमाणे GPS-आधारित आहे. यात रिअल-टाइम ट्रॅकिंग, भाडे, SOS बटण, ट्रिप शेअर, UPI/कार्ड पेमेंट, विविध भाषा अशा सर्व सुविधा आहेत.

यातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे यात, इतर ॲप्सप्रमाणे प्रत्येक राइडवर कमिशन न घेता, येथे ड्रायव्हर फक्त एक छोटी सब्सक्रिप्शन (सदस्यता) फी भरतात आणि त्यानंतर संपूर्ण भाडे त्यांच्याकडेच राहते.

यातून प्रवाशांना काय फायदा?

ॲपमध्ये आपल्या प्रवासाचे ट्रॅकिंग, पोलिस इंटिग्रेशन, SOS बटण, 24×7 सपोर्ट आणि तक्रार निवारणाची सोय दिली आहे. विशेष बाब म्हणजे जास्त मागणी असली तरी भाडे कृत्रिमरीत्या वाढणार नाही. भाडेही स्थिर आणि पारदर्शक ठेवलेले आहे.

भारत टॅक्सीमध्ये ड्रायव्हर कसे रजिस्टर करतात?

Google Play Store वरून 'Bharat Taxi Driver' ॲप डाउनलोड करा.

मोबाइल नंबर टाकून OTP द्वारे रजिस्ट्रेशन करा.

आवश्यक कागदपत्रे अपलोड करा - ड्रायव्हिंग लायसन्स आणि वाहनाची RC अनिवार्य आहेत. परमिट, इन्शुरन्स, फिटनेस, PUC इत्यादी काही कागदपत्रे अनेक ठिकाणी ऐच्छिक ठेवली आहेत.

डॉक्युमेंट व्हेरिफिकेशन पूर्ण झाल्यानंतर ड्रायव्हर राइड घेण्यास सुरुवात करू शकतात.

कु. गुरप्रीतकौर मोगलीवाले
कु. संध्या पदमगिरवार

07/12/2025

अर्थमंत्र्यांकडून 'आरोग्य सुरक्षा ते राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक २०२५' सादर

निर्मला सीतारामन यांनी गुरुवारी लोकसभेत आरोग्य सुरक्षा ते राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक २०२५ सादर केले. या विधेयकांतर्गत पान मसाला यांसारख्या उत्पादनांवर उपकर (सेस) आकारला जाणार आहे.

या विधेयकात गरजेच्या वस्तूंवर कर लागू होणार नाही आणि पान मसाला यांसारख्या उत्पादनांवरून मिळणारा महसूल राज्यांसोबत वाटून आरोग्यविषयक योजनांवर खर्च केला जाईल.

अर्थमंत्री म्हणाल्या, 'हा उपकर असून कोणत्याही गरजेच्या वस्तूंवर तो लागू नाही. या विधेयकाचा उद्देश आरोग्यासाठी हानिकारक 'डी-मेरिट' वस्तूंवर कर लावणे हा आहे. या उपकरामुळे त्यांच्या किमती वाढतील व त्यांचा वापर कमी होईल, हा त्यामागील हेतू आहे. सीतारामन यांनी पुढे सांगितले की वस्तू व सेवा कर (जीएसटी) अंतर्गत पान मसाल्यावर ४० टक्के कर आकारला जातो. या नव्या उपकरामुळे जीएसटी महसुलावर कोणताही परिणाम होणार नाही.

प्रस्तावित विधेयकानुसार उपकर पान मसाला उत्पादन करणाऱ्या कारखान्यांतील यंत्रसामग्रीच्या उत्पादन क्षमतेवर आधारित असेल आणि हा जीएसटी व्यतिरिक्त आकारला जाईल. अर्थमंत्री म्हणाल्या, 'प्रत्येक कारखान्याची उपकर देयता त्यांच्या उत्पादन क्षमतेनुसार ठरेल. त्या म्हणाल्या, 'या उपकरातून मिळणाऱ्या महसुलाचा काही भाग आरोग्य जनजागृती किंवा

 ISBN NO. 978-81-990957-8-6

आरोग्यविषयक इतर योजना राबवण्यासाठी राज्यांसोबत वाटला जाईल.'

पान मसाल्यावर उत्पाद शुल्क (Excise Duty) लावता येत नसल्याने सरकारने हा उपकर लागू करण्यासाठी हे विधेयक आणले असून, तो जीएसटीच्या अतिरिक्त आकारला जाईल. यापूर्वी बुधवारी लोकसभेत सेंट्रल एक्साइज अॅक्ट १९४४ मध्ये बदल करून, तंबाखूवर ४० टक्के जीएसटी व्यतिरिक्त उत्पाद शुल्क लावण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला आहे. सध्या पान मसाला, तंबाखू आणि त्यासंबंधित उत्पादनांवर २८ टक्के जीएसटी आणि वेगवेगळ्या दराने क्षतिपूर्ती उपकर आकारला जातो. क्षतिपूर्ती उपकर संपल्यानंतर जीएसटी दर ४० टक्क्यांवर जाईल.

कु. तनुजा सूर्यवंशी
कु. स्नेहा जोंधले

08/12/2025

भारत-रशियाने टॅरिफला तोंड देण्यासाठी काढला 'ब्रह्मास्त्र'; 5 वर्षे अमेरिकाला होणार पश्चात्ताप

5 डिसेंम्बर शुक्रवारी हैदराबाद हाऊस येथे रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात झालेल्या शिखर परिषदेत संरक्षण, व्यापार, सहकार्य आणि ऊर्जा यासह विविध मुद्द्यांवर चर्चा झाली.

रशिया-युक्रेन युद्ध आणि भारत आणि रशियावर अमेरिकेने घातलेली बंदी देखील चर्चेचा केंद्रबिंदू होती. अमेरिकेने रशियाकडून भारताच्या तेल खरेदीवर ५० टक्के टॅरिफ लादला आहे. असे असूनही, भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे थांबवलेले नाही. आता, पंतप्रधान मोदी आणि पुतिन यांनी संयुक्तपणे ट्रम्पच्या टॅरिफला तोंड देण्याचा मार्ग शोधला आहे. भारत आणि रशियामधील हे ब्रह्मास्त्र अमेरिकेला पुढील पाच वर्षांसाठी पश्चात्ताप करायला लावेल.

रशियाचे अध्यक्ष पुतिन आणि पंतप्रधान मोदी यांनी ट्रम्पच्या टॅरिफला तोंड देण्यासाठी पंचवार्षिक योजनेवर सहमती दर्शविली आहे. भारत आणि रशियामधील ही भागीदारी दोन्ही देशांमधील आर्थिक आणि व्यापारी भागीदारी मजबूत करेल आणि अमेरिकेच्या टॅरिफमुळे झालेल्या नुकसानाची भरपाई करेल. पुतिन यांचे प्राथमिक लक्ष ट्रम्प यांनी भारतावर लादलेल्या टॅरिफची भरपाई करण्यावर होते. त्यांच्या भेटीपूर्वीच, राष्ट्रपती पुतिन यांना अमेरिकेच्या शुल्कामुळे भारताला होणाऱ्या आर्थिक नुकसानाबद्दल खूप चिंता होती. म्हणूनच, त्यांच्या भेटीपूर्वी त्यांनी रशियन अधिकाऱ्यांना भारताला होणाऱ्या नुकसानाची भरपाई करण्यासाठी एक व्यापक योजना विकसित करण्याचे निर्देश दिले. ही योजना आता पंतप्रधान मोदी आणि पुतिन यांनी मंजूर केली आहे. भारत आणि रशिया मुक्त व्यापार करारावरही पुढे जात आहेत. भारतावर ५०% शुल्क लादणारे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना असे वाटले की यामुळे नवी दिल्लीला अमेरिकेसमोर शरण जावे लागेल आणि रशियाकडून तेल खरेदी करणे थांबवावे लागेल. तथापि, असे झाले नाही. भारताने त्याचा जवळचा मित्र रशियाकडून तेल खरेदी करणे थांबवले नाही किंवा अमेरिकेसमोर झुकण्यास तयार झाला नाही, तर त्याऐवजी त्याचे स्वतंत्र परराष्ट्र धोरण चालू ठेवले. india-russia-launch-brahmastra-for-tariff पंतप्रधान मोदींच्या मजबूत नेतृत्वामुळे, भारताचा जीडीपी अमेरिकेच्या शुल्कापुढे झुकल्याशिवाय वाढत राहिला आहे. यामुळे अमेरिकेला धक्का बसला आहे. भारत आणि रशियाने आता केलेल्या पाच वर्षांच्या व्यापार करारामुळे अमेरिकेला त्याचा खूप पश्चाताप होईल. भारत आणि रशियामधील या भागीदारीमुळे अमेरिकेचे आर्थिक, व्यापार आणि धोरणात्मक नुकसान होईल.

जेव्हा ट्रम्प यांनी भारतावर ५०% कर लादला तेव्हा पंतप्रधान मोदींनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना दयेची विनंती केली नाही, उलट पर्याय शोधण्यास सुरुवात केली. भारताने आफ्रिका, आशिया आणि युरोपमधील काही भागीदार देशांसोबत व्यापार वाढवायला सुरुवात केली. पंतप्रधान मोदींच्या या निर्णयामुळे हळूहळू

 ISBN NO. 978-81-990957-8-6

अमेरिकेचे कर भारतासाठी अप्रभावी झाले. रशियानेही भारताला पाठिंबा दिला आणि तेलाच्या किमती आणखी कमी केल्या. यामुळे ट्रम्पच्या करिष्मा असूनही भारताच्या अर्थव्यवस्थेला गती मिळाली. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाच्या या करिष्माने डोनाल्ड ट्रम्पला मोठा धक्का बसला. परिणामी, ट्रम्प यांची भारताबाबतची भूमिका मऊ पडली आहे. आता, अमेरिका स्वतः भारतासोबत व्यापार करार करण्यास उत्सुक आहे. india-russia-launch-brahmastra-for-tariff भारत आणि रशियाने २०२४ मध्ये २०३० पर्यंत १०० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त व्यापार करण्याचे लक्ष्य ठेवले होते, परंतु पंतप्रधान मोदींनी शुक्रवारी सांगितले की हे लक्ष्य खूप आधी साध्य केले जाईल. भारत आणि रशियाने आरोग्य, गतिशीलता आणि लोक-ते-लोक देवाणघेवाण यासह अनेक क्षेत्रांमध्ये सहकार्य करारांवर स्वाक्षरी केली. पंतप्रधान मोदींनी पत्रकार परिषदेत सांगितले की गेल्या आठ दशकांत जगात अनेक चढ-उतार असूनही, भारत आणि रशियामधील मैत्री ध्रुवाच्या ताऱ्यासारखी चमकत आहे. या विधानाद्वारे, पंतप्रधान मोदींनी अमेरिकेला एक शक्तिशाली संदेश दिला.

कु. पायलकौर जाधव
कु. साक्षी ठाकूर

09/12/2025

RBI ची मोठी घोषणा: रेपो रेटमध्ये 0.25% कपात; कार लोन EMI कमी होणार

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने नवीन वर्ष सुरू होण्यापूर्वीच ग्राहकांना मोठा दिलासा देत रेपो रेटमध्ये 0.25% ची कपात जाहीर केली आहे. याचा फायदा कार खरेदीदारांना मिळणार आहे.

रेपो रेट कमी होताच बँका त्वरित कर्जावरील व्याजदर कमी करतात, ज्यामुळे कार लोनची EMI देखील आपोआप घटते.

यापूर्वी RBI ने 2025 मधील फेब्रुवारी, एप्रिल आणि जून महिन्यांत रेपो रेट कमी केला होता. आता झालेल्या नव्या कपातीनंतर कार लोन अधिक स्वस्त झाले आहे.

SBI च्या कार लोनवरील नव्या व्याजदरात बदल

SBI च्या अधिकृत वेबसाइटनुसार 13 ऑक्टोबर 2025 पर्यंत कार लोनचा व्याजदर 8.75% होता. RBI च्या 25 बेसिस पॉइंट कपातीनंतर हा दर घटून 8.50% झाला आहे. ही छोटी वाटणारी कपातसुद्धा EMI वर मोठा फरक निर्माण करते.

10 लाख, 15 लाख आणि 20 लाखांच्या कार लोनवर नवीन EMI किती?

1) 10 लाखांचे कार लोन (5 वर्षे कालावधी)

जुनी EMI (8.75%): ₹20,673

नवी EMI (8.50%): ₹20,517

मासिक बचत: ₹156

2) 15 लाखांचे कार लोन

जुनी EMI: ₹30,956

नवी EMI: ₹30,775

मासिक बचत: ₹181

3) 20 लाखांचे कार लोन

जुनी EMI: ₹41,274

नवी EMI: ₹41,033

मासिक बचत: ₹241

ग्राहकांना कसा फायदा?

EMIमध्ये प्रत्येक महिन्याला काहीशे रुपयांची घट दिसत असली तरी, वर्षभरात ही बचत एकत्रितपणे मोठी रक्कम बनते. कार खरेदीचा विचार करणाऱ्या ग्राहकांसाठी हा योग्य काळ मानला जात आहे.

कु. कार्तिका पगडाला
कु. गजानन राजरवाड

 ISBN NO. 978-81-990957-8-6

10/12/2025

डॉलरच्या तुलनेत रूपया कमकुवत; सोने-चांदीच्या किमती आणखी वाढणार?

आंतरराष्ट्रीय सराफा बाजार स्थिर राहिले तरी अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपयाची कमकुवतता देशांतर्गत सोने आणि चांदीच्या किमती वाढवण्यासाठी पुरेशी ठरण्याची शक्यता वाढली आहे. बाजार अहवालांनुसार, रुपयातील २०-३० पैशांची घसरण देखील अनेकदा भारतात सोन्याच्या किमती प्रति १० ग्रॅम १०० ते १५० रूपयांनी वाढवतात.

त्यामुळे रूपया दबावात राहिल्यास दोन्ही धातुंच्या किमती आगामी काळात आणखी वाढण्याची चिन्हे आहेत.

आंतरराष्ट्रीय स्तरावर सोने आणि चांदीचा व्यापार डॉलरमध्ये होतो, तर देशांतर्गत किंमत रुपयांमध्ये ठरवली जाते. म्हणूनच, जागतिक सोन्याचे दर अपरिवर्तित राहिले तरीही कमकुवत रुपया आयात महाग करतो, स्थानिक बाजारावर त्याचे प्रतिबिंब उमटते. सुवर्ण व्यावसायिकांच्या म्हणण्यानुसार, अलिकडच्या व्यापार सत्रांमध्ये जागतिक अनिश्चितता आणि परकीय निधीच्या बाहेर जाण्यामुळे रुपयात चढ-उतार होत असल्याने दिवसातून अनेक वेळा किंमतींमध्ये सुधारणा कराव्या लागत आहेत. सोन्यासोबत चांदीच्या दराचा चढता आलेख कायम आहे, जो रुपयाच्या कमकुवतपणा सोबत सातत्याने वाढत आहे.

देशांतर्गत बाजारपेठेत सोन्याच्या किमती बऱ्याच वेळा आंतरराष्ट्रीय किमती स्थिर असतानाही वाढताना दिसून येतात. डॉलरच्या तुलनेत रुपया कमकुवत झाल्याच्या स्थितीत सध्याची वेळ गुंतवणूकदार आणि किरकोळ खरेदीदार दोघांसाठीही महत्त्वाची मानली जात आहे. सणासुदीसह लग्नाच्या हंगामात मागणी वाढलेली असली, तरी ग्राहक किमतींवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

काही जण पुढील काळातील दरवाढीमुळे बसणारा आर्थिक भूर्दंड टाळण्यासाठी खरेदी वाढवत आहेत. रुपया आणखी दबावाखाली राहिला तर देशांतर्गत सोने-चांदीच्या किमती पुन्हा उच्चांक गाठू शकतात. दिवाळीच्या आधी १७ ऑक्टोबरला जळगावमध्ये सोन्याने प्रति १० ग्रॅम एक लाख ३५ हजारांचा उच्चांक केला होता. आताही सोने एक लाख ३० हजाराच्या पुढेच आहे. मागील उच्चांकाच्या जवळपास असलेल्या सोन्याच्या दरात रूपयात सुधारणा न झाल्यास आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

चांदीत १० दिवसांत २० हजारांनी वाढ

जळगाव शहरातील सुवर्ण बाजारपेठेत २४ नोव्हेंबरपर्यंत सातत्याने घट झाल्याने चांदीचे दर एक लाख ५९ हजार ६५० रूपयांपर्यंत घसरले होते. मात्र, त्यानंतर चांदीच्या दरात दिवसागणिक वाढ होत गेली. ज्यामुळे चार डिसेंबरपर्यंत चांदीचे दर जीएसटीसह प्रति किलो एक लाख ८५ हजार ४०० रूपयांपर्यंत वधारले. गेल्या १० दिवसांत चांदीत २० हजारांपेक्षा अधिक दरवाढ नोंदवली गेली आहे. दिवाळीपूर्वी १५ ऑक्टोबरला जळगावमध्ये चांदीने एक लाख ९० हजाराचा उच्चांक केला होता. रूपयात सुधारणा न झाल्यास मागील उच्चांकापर्यंत पोहोचण्यासाठी चांदीला जास्त दिवस लागणार नाही, असे चांदीच्या व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

कु. राणी बुलबुले
कु. शैलेजा कोपलवाड

11/12/2025

फक्त ७.१०% च्या व्याजदरावर 'इकडे' मिळतंय होमलोन; ₹८० लाखांच्या कर्जासाठी किती हमी मंथली सॅलरी, EMI किती?

जर तुम्ही स्वतःचं घर खरेदी करण्याचं स्वप्न पाहत असाल आणि त्यासाठी होम लोन घेण्याचा विचार करत असाल, तर तुमच्यासाठी एक चांगली बातमी आहे. सध्या बँक ऑफ महाराष्ट्र केवळ ७.१०% च्या सुरुवातीच्या व्याजदरानं होमलोन देत आहे.

पण प्रश्न असा आहे की, ₹८० लाख कर्ज घेण्यासाठी तुमचा मासिक पगार किती असावा

 ISBN NO. 978-81-990957-8-6

आणि त्या कर्जावर तुमचा मासिक ईएमआय किती होईल? तुम्हाला किती पगाराची आणि ईएमआय प्लॅनची आवश्यकता असेल, जेणेकरून तुम्ही कोणत्याही आर्थिक दबावाशिवाय तुमच्या नवीन घरात प्रवेश करू शकाल हे आपण जाणून घेण्याचा प्रयत्न करू.

सुरुवातीचा दर म्हणजे सर्वात स्वस्त होम लोन

होम लोन किंवा कोणत्याही कर्जाचा जो सुरुवातीचा व्याज दर बँक ऑफर करते, तो तिचा सर्वात स्वस्त व्याज दर असतो. या दरानं कर्ज त्या ग्राहकाला सहज मिळू शकते, ज्याचा सिबिल स्कोर (CIBIL Score) ८०० किंवा त्याहून अधिक असतो. बँक ऑफ महाराष्ट्रच्या अधिकृत वेबसाइटनुसार, ती सध्या ७.१० टक्के च्या सुरुवातीच्या दरानं होमलोन ऑफर करत आहे. अशा परिस्थितीत, जर तुमचा सिबिल स्कोर (३०० ते ९०० दरम्यान मोजला जातो) उत्कृष्ट असेल, तर तुम्ही होमलोनसाठी अर्ज करू शकता.

₹८० लाख कर्जासाठी किती असावा पगार?

होम लोनसाठी पात्रता तुमचं मासिक उत्पन्न, वय, सिबिल स्कोर आणि कर्जाच्या कालावधीवर अवलंबून असते. जर तुम्ही उत्कृष्ट सिबिल स्कोरसह २० वर्षांसाठी बँक ऑफ महाराष्ट्रकडून ₹८० लाख होम लोनसाठी अर्ज करत असाल, तर ७.१०% व्याजदराच्या आधारावर, तुमच्या पगारची गणना केल्यास, तुमचं किमान मासिक वेतन (Minimum Monthly Salary) ₹१,१३,७०० इतकं असलं पाहिजे. जर तुम्ही १५ वर्षांसाठी कर्ज घेऊ इच्छित असाल, तर तुमचा किमान पगार ₹१,३१,६०० असावा. जर तुम्ही २५ वर्षांच्या कालावधीसाठी कर्ज घेऊ इच्छित असाल, तर तुमचा किमान पगार ₹१,०३,८०० असावा.

किती असेल ईएमआय?

बँक ऑफ महाराष्ट्रच्या होम लोन कॅल्क्युलेटरनुसार, २० वर्षांच्या कर्ज परतफेड कालावधीसाठी ७.१०% व्याजदराच्या आधारावर ८० लाख रुपयांच्या होम लोनचा ईएमआय ₹६२,५०५ इतका बनेल. या आधारावर, तुम्ही होम लोनच्या रकमेव्यतिरिक्त फक्त ₹७०,०१,२०६ इतके व्याज भराल. बँकेला एकूण ₹१,५०,०१,२०६ परत करावे लागतील. जर तुम्ही १५ वर्षांसाठी कर्ज घेतले, तर मासिक हप्ता ₹७२,३५४ बनेल. जर तुम्ही २५ वर्षांसाठी कर्ज घेतले, तर मासिक हप्ता ₹५७,०५४ असेल.

एकूणच, हे समजून घ्या की कर्ज फेडण्याची मुदत जेवढी कमी असेल, तेवढं व्याज कमी भरावं लागेल. कर्ज फेडण्याची मुदत जेवढी जास्त असेल, तेवढं व्याज जास्त भरावं लागेल. शक्य असल्यास कमी कालावधीच्या होम लोनची निवड करणं शहाणपणाचा निर्णय ठरू शकतो.

कु. वैष्णवी औंढेकर
कु. शिवानी यादव

12/12/2025

सलग तिसऱ्या महिन्यात जागतिक खाद्य किमती कोसळल्या..; पण धान्य मात्र महाग

जागतिक चलनवाढीच्या दबावादरम्यान, नोव्हेंबर महिना ग्राहकांसाठी दिलासा देणारा ठरला.संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेच्या (एफएओ) मते, जागतिक अन्नधान्याच्या किमती सलग तिसऱ्या महिन्यात घसरल्या. दूध, तेल, साखर आणि मांस यासारख्या प्रमुख वस्तू स्वस्त झाल्या, तर धान्य गटात वाढ झाली असून सोयबिनच्या देखील किंमती वाढल्या आहेत. एफएओचा जागतिक अन्न किंमत निर्देशांक नोव्हेंबरमध्ये १२५.१ अंकांवर होता, जो ऑक्टोबर २०२५ च्या तुलनेत १.२ टक्के कमी आहे आणि मार्च २०२२ च्या त्याच्या विक्रमी उच्चांकापेक्षा जवळजवळ २२ टक्के कमी आहे.

एफएओच्या सप्टेंबर २०२५ च्या ताज्या अहवालात असे दिसून आले आहे की, वाढत्या जागतिक महागाईच्या पार्श्वभूमीवर नोव्हेंबरमध्ये अन्नधान्याच्या चर किमतींमध्ये लक्षणीय घट

 ISBN NO. 978-81-990957-8-6

झाली. ऑक्टोबरच्या तुलनेत निर्देशांक घसरला आणि वार्षिक आधारावर, नोव्हेंबर २०२४ च्या तुलनेत २.१ टक्के कमी होता. पाम, सूर्यफूल आणि रेपसीड तेलाच्या किमतीत घट झाली, तर ब्राझीलमध्ये बायोडिझेलची मागणी वाढल्यामुळे सोयाबीन तेल थोडे महाग झाले. मलेशियामध्ये अपेक्षेपेक्षा जास्त पाम तेलाचे उत्पादन झाल्याचा परिणाम दिसतो.

दुसरीकडे, गहू, मक्याच्या दरात वाढ झाली आहे. नोव्हेंबरमध्ये धान्य किमत निर्देशांक १०५.५ व होता, जो ऑक्टोबरच्या तुलनेत १.८% आणि एकूण १.३ वाढला. तथापि, तो गेल्या वर्षीपेक्षा ५.३% कमी आहे जागतिक गव्हाच्या किमती २.५% वाढल्या.

ब्राझीलमध् मजबूत मागणी आणि अर्जेंटिना आणि ब्राझीलमध्ये पावसामुळे पुरवठा खंडित झाल्यामुळे मक्याच्या किमती वाढल्या, बाजारी आणि ज्वारीच्या किमतीही वाढल्या, ज्याचा थेट परिणाम जागतिक सोयाबीनच्या किमती वाढण्यावर झाला.

या वाढीला अनेक कारणे आहेत. डॉलर-रुपया यांच्यातील चढ-उतार, अमेरिकेने लावलेले अतिरिक्त टॅरिफ आणि जागतिक स्तरावरील व्यापारावर होणारे बदल या सगळ्यांचा खाद्य किंमतीवर परिणाम झाला आहे. तसेच, आयात-निर्यात यांमधील घट देखील खाद्य किंमतीवर परिणाम केल्याचे दिसून येत आहे. यावर सरकार काय उपाययोजना करते याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. मात्र यामुळे ग्राहकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे तर काही प्रमाणात त्यांच्या खिशाला कात्री लागण्याची शक्यता आहे.

कु. निकिता तोमर
कु. अंकिता तोमर

13/12/2025

फ्लाइट्सच्या गोंधळात बाजारात धुव्वा उडाला, नुकसानीचा आकडा वाचून गुंतवणूकदारही थक्क; कोट्यवधींची राखरांगोळी

भारतातील आघाडीची एअरलाइन्स इंडिगोच्या संकटाचा परिणाम सर्वत्र जाणवत आहे. एकीकडे गेल्या पाच दिवसांत गंभीर कामकाजातील व्यत्ययांमुळे शेकडो उड्डाणे रद्द करण्यात आली, ज्यामुळे एअरलाइनच्या विमानांनी प्रवास करणाऱ्यांना मोठी गैरसोय झाली.

त्याचवेळी, या दरम्यान, इंडिगोमध्ये गुंतवणूक करणारे गुंतवणूकदारही गंभीर संकटात सापडले आहेत. खरंच, सहा महिन्यांत झालेल्या नुकसानापेक्षा फक्त पाच दिवसांत एअरलाइनचा शेअर जास्त घसरला आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, इंडिगोच्या संकटामुळे दुहेरी फटका बसत आहे.

इंडिगोला दुहेरी दणका

एकीकडे इंडिगोच्या उड्डाणे रद्द झाल्यामुळे प्रवाशांचे हाल होत असताना दुसरीकडे, एअरलाइनच्या मूळ कंपनी, इंटरग्लोब एव्हिएशनच्या शेअर्समध्ये गुंतवणूक करणारे गुंतवणूकदार हताश झाले आहेत. संकटाच्या पार्श्वभूमीवर इंडिगोच्या शेअर्समध्ये सतत गळती सुरु असताना, सोमवार, आठवड्याचा पहिला दिवसही इंडिगो गुंतवणूकदारांसाठी अपवाद ठरला नाही. सोमवारी बाजाराच्या ओपनिंगला शेअर्स 4% पेक्षा जास्त घसरले आणि 5110 रुपयांवर उघडल्यानंतर सकाळी 9:30 वाजेपूर्वी शेअर 5,179 रुपयांवर पोहोचला आणि 5,001 रुपयांपर्यंत खाली आला.

एअरलाइन्स पाठोपाठ शेअरचेही हाल बेहाल

गेल्या पाच दिवसांत हजारो उड्डाणे रद्द करणाऱ्या भारतातील सर्वात मोठ्या विमान कंपनीच्या शेअर्समध्ये त्या कालावधीत जवळपास 11% पडझड झाली असून या काळात 5,796 रुपयांवरून 5,174 रुपयांवर घसरला. अलिकडेच शेअरमध्ये झालेल्या तीव्र घसरणीचा परिणाम एअरलाइन कंपनीच्या मार्केट कॅपवरही झाला आणि 2.08 लाख कोटी रुपयांच्या खाली आला आहे.

इंडिगो विमानाचे उड्डाण कॅन्सल... कॅन्सल...

 ISBN NO. 978-81-990957-8-6

इंडिगोच्या माहितीनुसार शनिवारी रद्द झालेल्या विमानांची संख्या शुक्रवारी 1000 हून कमी होऊन 850 पेक्षा कमी झाली. दिल्ली, मुंबई, गुवाहाटी आणि हैदराबाद सारख्या प्रमुख विमानतळांवर हजारो प्रवासी अडकून पडले होते तर, अनेक प्रवाशांनी शेवटच्या क्षणी अपडेट्स मिळणे, विमान कंपन्यांकडून खराब संपर्क आणि देशभरातील विमान वेळापत्रक विस्कळीत झाल्यामुळे लांब रांगेत वाट पाहणे अशी तक्रार केली.

इंडिगोचा 610 कोटी रुपयांचा परतावा

या दरम्यान, इंडिगोने आतापर्यंत रद्द केलेल्या किंवा गंभीरपणे विलंब झालेल्या विमानांसाठी 610 कोटींचे परतफेड प्रक्रिया केली असून शनिवारपर्यंत प्रवाशांना 3,000 नग सामान पोहचवले आहे. देशातील विमान वाहतूक नेटवर्क वेगाने सामान्य होत आहे आणि ऑपरेशन्स पूर्णपणे स्थिर होईपर्यंत सर्व सुधारणात्मक उपाययोजना सुरू राहतील, असे सरकारने सांगितले. शनिवारी, सरकारने विमान कंपन्यांना रविवारी संध्याकाळपर्यंत रद्द केलेल्या विमानांसाठी तिकिटांचे परतफेड पूर्ण करण्याचे आणि पुढील 48 तासांत प्रवाशांना हरवलेले सामान पोहोचवण्याचे निर्देश दिले होते.

दरम्यान, नागरी विमान वाहतूक महासंचालनालय, DGCAने इंडिगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एल्बर्स यांना अधिकृत कारणे दाखवा नोटीस बजावली आहे, ज्यामध्ये अलिकडच्या मोठ्या ऑपरेशनल समस्यांसाठी एअरलाइनला जबाबदार धरले आहे आणि 'नियोजन, देखरेख आणि संसाधन व्यवस्थापनातील मोठ्या कमतरता' असल्याचे म्हटले आहे.

14/12/2025

आता घर घेणं सोपं होणार! केंद्र सरकार २५ लाख रुपयांपर्यंत कमी व्याजदराने गृहकर्ज देणार; पण कुणाला?

प्रत्येकाचे स्वतःचे घर असण्याचे स्वप्न असते. वाढत्या मालमत्तेच्या किमतींमुळे सामान्य लोकांना घर परवडणे कठीण होत चालले आहे. केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना घर खरेदी करणे थोडे सोपे जाते.

केंद्र सरकार आपल्या कर्मचाऱ्यांना हाऊस बिल्डिंग ॲडव्हान्स (HBA) योजनेअंतर्गत अत्यंत कमी व्याजदराने गृहकर्ज देते. केंद्र सरकारचे कर्मचारी स्वतःचे घर घेण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

केंद्र सरकारची हाऊस बिल्डिंग ॲडव्हान्स (HBA) योजना केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या घरांच्या गरजा पूर्ण करण्यास लक्षणीयरीत्या मदत करते. या योजनेअंतर्गत केंद्र सरकार कर्मचाऱ्यांना घर बांधण्यासाठी, खरेदी करण्यासाठी, नूतनीकरण करण्यासाठी किंवा खरेदी करण्यासाठी अत्यंत कमी व्याजदराने कर्ज देते. यामुळे कर्मचाऱ्यांवरील आर्थिक भार कमी होतो आणि त्यांच्या भविष्यासाठी सुरक्षितता मिळते.

सरकारने HBA ची कमाल मर्यादा वाढवून अधिक उपयुक्त बनवली आहे. केंद्र सरकारी कर्मचारी त्यांच्या मूळ पगाराच्या + महागाई भत्त्याच्या ३४ पट किंवा जास्तीत जास्त २५ लाख रुपये, जे कमी असेल ते कर्ज घेऊ शकतात. विशिष्ट मर्यादेत घराच्या नूतनीकरणासाठी किंवा विस्तारासाठी देखील निधी उपलब्ध आहे. या योजनेअंतर्गत सरकार कमी व्याजदराने कर्ज देते.

एचबीए सामान्यतः ६% ते ७.५% पर्यंत निश्चित व्याजदर आकारतात. तर खाजगी बँकांच्या गृहकर्जाचे दर खूपच जास्त असतात. याव्यतिरिक्त ही योजना निश्चित व्याजदर देते. याचा अर्थ कर्जाच्या संपूर्ण कालावधीत दर वाढण्याचा कोणताही धोका नाही. ज्यामुळे कर्मचाऱ्यांना काळजी न करता त्यांचे बजेट नियोजन करता येते.

पाच वर्षे सेवा पूर्ण केलेल्या आणि यापूर्वी कोणत्याही सरकारी गृहनिर्माण योजनेचा लाभ घेतलेला नसलेल्या सर्व केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल. काही अटींच्या अधीन राहून तात्पुरते कर्मचारी देखील अर्ज करू शकतात. जर पती-पत्नी दोघेही केंद्र सरकारी कर्मचारी असतील तर त्यापैकी फक्त एकालाच या योजनेचा लाभ घेता येईल.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

कु. प्रतीक्षा घरणे
कु. सावित्रा पावडे

15/12/2025

भारत आणि अमेरिका व्यापार

भारताने अगोदरच स्पष्ट केले की, भारत कोणत्याही परिस्थितीमध्ये आपल्या शेतकऱ्यांचे नुकसान होऊ देणार नाहीये. भारत आम्हाला फक्त त्यांच्या वस्तू विकतो पण आमच्याकडून काहीच खरेदी करत नाही, अशी अमेरिकेची ओरड होती. शेवटी आता दोन्ही देशांमधील व्यापार करार अंतिम टप्प्यात आहे. व्यापार करार जवळपास पूर्ण होण्याचे संकेत असताना टॅरिफ कमी करण्याबद्दल अमेरिकेने अजिबात भूमिका जाहीर केली नाही. हेच नाही तर उलट भारताच्या तांदळावर टॅरिफ लावण्याचे संकेत त्यांच्याकडून देण्यात आली.

भारत आणि अमेरिकेत व्यापार चर्चा सुरू असतानाच पुन्हा एकदा तणाव वाढला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतातून आयात होणाऱ्या तांदळावर अतिरिक्त शुल्क लादण्याचा विचार करत असल्याचे म्हटले आहे. एकीकडे व्यापार करार अंतिम टप्प्यात आहेत सांगणारे ट्रम्प दुसरीकडे भारताच्या तांदळावर अतिरिक्त टॅरिफ लावण्याचा विचार करत आहेत. याचा थेट फटका भारतातील शेतकऱ्यांना बसेल.

भारत अमेरिकेला अत्यंत कमी किंमतीमध्ये तांदूळ विकत आहे. यामुळे तेथील शेतकऱ्यांचे नुकसान होत असून बाजारपेठेत भारत, व्हिएतनाम आणि थायलंडला तांदूळ वाढला आहे आणि तो स्वस्त भावात मिळत असल्याने ग्राहक त्याची खरेदी करत आहेत. ज्यामुळे अमेरिकन शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, असा ट्रम्प यांचा आरोप आहे. शेतकऱ्यांसाठी आर्थिक मदतीची घोषणा करताना ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमध्ये हे विधान केले.

भारताने 2024-25 मध्ये अमेरिकेला 23.4 दशलक्ष टन तांदूळ निर्यात केला. भारताच्या एकूण 5.24 दशलक्ष टन बासमती तांदळाच्या 5 टक्क्यांपेक्षा कमी आहे. जर भारताने अमेरिकेत निर्यात बंद केली तर अमेरिकेच्या मार्केटमध्ये मोठा भूकंप येईल. अमेरिकेच्या बाजारपेठेत वस्तूंच्या किंमती वाढू शकतात. भारतासोबतचा व्यापार थांबल्यानंतर अमेरिकेला व्हिएतनामसारख्या पुरवठादारांवर अवलंबून राहावे लागेल.

विशेष म्हणजे भारताने अमेरिकेसोबतचा व्यापार जर पूर्णपणे थांबवला तर अमेरिकेच्या तुलनेत भारताचे कमी नुकसान होईल, अधिक नुकसान अमेरिकेलाच सहन करावे लागेल. अमेरिकेला अजूनही काही मोठे धक्के सहन करावे लागू शकतात. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार थांबविल्याने अजून काही क्षेत्रांवरही परिणाम होईल. अमेरिकेत शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही कमी होईल.

कु. निकिता गाजलवाड
कु. राधिका नरहिरे

16/12/2025

भारताच्या बासमतीनं मैदान मारलं

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अन्य देशांमधून येणाऱ्या बासमती तांदळावर टॅरिफ लावण्याची धमकी दिली आहे. याचा सर्वाधिक फटका भारताला बसण्याची शक्यता आहे. कारण अमेरिकेला सर्वाधिक तांदूळ निर्यात करणाऱ्या देशांच्या यादीत भारताचा क्रमांक बराच वरचा लागतो.

आधी भारत अमेरिकेहून येणाऱ्या गव्हावर अवलंबून होता. पण आता तोच भारत अमेरिकेला तांदूळ निर्यात करत आहे. भारताकडून करावी लागणारी तांदूळ आयात कमी करण्यासाठी अमेरिकेनं बरेच प्रयत्न केले. त्यासाठी टेक्समती (Texmati) आणि जसमती (Jasmati) सारख्या तांदळांच्या जातींची शेती सुरु केली. पण यातील कोणत्याच तांदळाला बासमतीची बरोबरी जमली नाही. त्यामुळे बासमतीची आयात कायम राहिली.

टेक्सासमधील राईसटेक कंपनीनं अमेरिकेत पिकणाऱ्या लांब दाण्याच्या तांदळाचा बासमती सोबत संकर करुन एक नवीन प्रजात तयार केली. बासमतीसारखा सुगंधी आणि लांब दाण्याचा तांदूळ तयार करणं या हेतूनं प्रयोग केला गेला. अमेरिकेच्या वातावरणात पिकू शकेल, अशी प्रजात विकसित करण्यात आली. या प्रजातीला टेक्समती

 ISBN NO. 978-81-990957-8-6

नाव देण्यात आलं. हे नावच अतिशय हास्यास्पद होतं. बरेच प्रयत्न करुनही टेक्समतीला बासमतीची बरोबरी करता आली नाही. टेक्समतीला ना बासमतीसारखा सुगंध होता, ना त्या दाण्याचा आकार लांब होता. यानंतर अमेरिकेनं बासमतीचा आकार आणि थाई चमेलीचा सुगंध एकत्र करुन जसमती तांदूळ आणला. पण हा प्रयोगदेखील फोल ठरला.

भारतीय बासमतीला टक्कर देण्यासाठी टेक्समती आणि जसमती तांदूळ १९८० च्या दशकात बाजारात आणले गेले. पण चार दशकं उलटून गेल्यावरही बासमतीच आघाडीवर आहे. त्यामुळे अमेरिकेनं देशात बासमतीची विक्री कायम ठेवली. भारतातून अमेरिकेला होणाऱ्या तांदळाच्या एकूण निर्यातीत बासमतीचा हिस्सा ८५ टक्क्यांहून अधिक आहे. अमेरिकेतली भारतीय आणि आरोग्याबद्दल जागरुक असणारे ग्राहक बासमतीला प्राधान्य देतात. त्यामुळे बासमतीनं अमेरिकेच्या बाजारपेठेतील मजबूत स्थान टिकवलं आहे.

भारतीय बासमती तांदळाचा अमेरिकेच्या बाजारपेठेतील दर ८८० ते ९०० डॉलर प्रति टन इतका आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षापर्यंत भारताचा अमेरिकेला आयात होणाऱ्या बासमती तांदळातील हिस्सा ८८ टक्के होता. २०२३ मध्ये आयात ९ टक्क्यांनी वाढून २,७०,००० मेट्रिक टनांवर पोहोचली. २०२४-२५ मध्ये २२.५ मिलियन मेट्रिक ट्रन तांदूळ निर्याण करण्यात आला. या तांदळाचं एकूण मूल्य ३९२ मिलियन डॉलर होतं. यात ८६ टक्के बासमती तांदूळ होता. पण थाई चमेली तांदूळ ९७ टक्के भागिदारीसह या श्रेणीत पहिल्या क्रमांकावर आहे.

कु. पाणेरी खिल्लारे
कु. कृष्णा वर्ताळे

17/12/2025

मेक्सिकोने भारतावर लादला 50% टॅरिफ; भारताच्या 11 अब्ज डॉलर व्यापारावर संकट! कोणत्या वस्तूंना बसणार फटका?

जगभरात पुन्हा एकदा टॅरिफ वॉर सुरू होताना दिसत आहे. अमेरिकेने आधीच अनेक देशांवर आयात शुल्क वाढवून त्यांना मोठा झटका दिला होता, आणि आता त्यांचा शेजारी देश मेक्सिकोनेही तसाच मोठा निर्णय घेतला आहे.

मेक्सिकोने चीनसह अनेक आशियाई देशांमधून येणाऱ्या वस्तूंवर 50% पर्यंत उच्च टॅरिफ लावण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेसारखाच हा टॅरिफ दर असेल. मेक्सिकोच्या सेनेटने या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे आणि हे नवे टॅरिफ पुढील वर्षी म्हणजे 2026 पासून लागू होणार आहेत.

भारताला सर्वाधिक फटका

मेक्सिकोच्या या निर्णयाचा सर्वाधिक फटका चीन, भारत, दक्षिण कोरिया, थायलंड आणि इंडोनेशिया या देशांना बसणार आहे. या सर्व देशांमधून येणाऱ्या ऑटो पार्ट्स, टेक्सटाइल, स्टील आणि इतर वस्तूंवर मेक्सिको 50% पर्यंत टॅरिफ आकारणार आहे. सेनेटमध्ये पास झालेल्या प्रस्तावानुसार, काही वस्तूंवर टॅरिफ ३५% पर्यंत वाढवण्यात आले आहे.

मेक्सिकोने हा निर्णय का घेतला?

अमेरिकेच्या पावलावर पाऊल ठेवत मेक्सिकोनेही स्थानिक उद्योगांना संरक्षण देण्यासाठी टॅरिफ वाढवण्याचा हा निर्णय घेतला आहे. याचा प्रत्यक्ष परिणाम किती होईल हे पुढील काळातच कळेल. दरम्यान, व्यापार समूहांनी या निर्णयाचा तीव्र विरोध केला आहे.

काही रिपोर्टनुसार, मेक्सिकोने हा टॅरिफ वाढवण्याचा निर्णय अमेरिकेला खुश करण्यासाठी आणि पुढील वर्षी 3.76 अब्ज डॉलर्सचे अतिरिक्त उत्पन्न मिळवण्यासाठी घेतला आहे, कारण देश राजकोषीय तूट भरून काढण्याचा प्रयत्न करत आहे.

1400 वस्तूंवर टॅरिफ

मेक्सिकोच्या सेनेटने मंजूर केलेले हे सुधारित विधेयकानुसार 1400 आयात वस्तूंवर टॅरिफ लागू होणार आहे. मेक्सिकोने यापूर्वीही चीनी वस्तूंवर टॅरिफ वाढवण्याची घोषणा केली होती आणि

 ISBN NO. 978-81-990957-8-6

अमेरिकेला खुश करण्याचा प्रयत्न केला होता, परंतु त्याचा मोठा परिणाम दिसून आला नव्हता.

भारत-मेक्सिको व्यापार

- गेल्या काही वर्षांत भारत आणि मेक्सिको यांच्यातील व्यापार वाढत आहे.
- 2022 मध्ये दोन्ही देशांमधील व्यापार 11.4 अब्ज डॉलर इतका होता.
- 2023 मध्ये किंचित घट होऊन तो 10.6 अब्ज डॉलर झाला.
- 2024 मध्ये व्यापार पुन्हा वाढला आणि 11.7 अब्ज डॉलर या सर्वकालीन उच्चांकावर पोहोचला.

ऑटो क्षेत्राला मोठा फटका

भारताचा मेक्सिकोसोबतचा व्यापार हा फायद्यामध्ये आहे. 2024 मध्ये भारताने 8.9 अब्ज डॉलरची निर्यात केली होती तर फक्त 2.8 अब्ज डॉलरची आयात केली होती. त्यामुळे व्यापारात तब्बल 6.1 अब्ज डॉलरचा फायदा होता.

भारताकडून प्रामुख्याने कार, कमर्शियल वाहने, ऑटो पार्ट्स, मशीनरी, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, ऑर्गेनिक केमिकल आणि ॲल्युमिनियम यांची निर्यात होते. आता 50% टॅरिफ मुळे या क्षेत्रांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

कु. साधना मुंडे
कु. भूमीका नागडा

18/12/2025

फेड रिझर्व्हने केली सलग तिसऱ्यांदा व्याजदरात कपात; भारतीय शेअर बाजार आणि सोन्याच्या किमतींवर काय परिणाम होणार?

अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हने बुधवारी व्याजदरात 25 बेसिस पॉइंट्सने कमी करण्याचा निर्णय घेतला. जेरोम पॉवेल यांच्या नेतृत्वाखालील अमेरिकन फेडरल रिझर्व्हच्या फेडरल ओपन मार्केट कमिटीने (FOMC) दोन दिवसीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

12 सदस्यांच्या FOMC समितीतील 9 सदस्यांनी 25 बेसिस पॉइंट्सने व्याजदर कपातीवर मतदान केले.

महागाई वाढण्याचा धोका

बैठकीनंतर यूएस फेडचे अध्यक्ष जेरोम पॉवेल म्हणाले की, अमेरिकेत उच्च महागाईदर कायम असताना आणि रोजगार बाजार कमकुवत होत आहे. त्यामुळे फेडने व्याजदर 3.50% ते 3.75% च्या दरम्यान केला आहे.

सध्या महागाई वाढण्याचा धोका अजूनही उंचावलेला, तर रोजगार कमी होण्याचा धोका वाढलेला आहे. त्यामुळे ही परिस्थिती अमेरिकेसाठी आव्हानात्मक असल्याचे पॉवेल म्हणाले.

अमेरिकन फेडची ही डिसेंबरमधील दरकपात सप्टेंबर 2025 पासून सलग तिसरी दरकपात ठरली आहे. डिसेंबर 2024 नंतर फेडने व्याजदरात कोणताही बदल केला नव्हता, मात्र यावर्षी सप्टेंबरमध्ये प्रथमच दरकपात करत पुन्हा दरकपातीच्या चक्राची सुरुवात झाली.

शेअर बाजारावर काय परिणाम होईल?

फेडच्या निर्णयाचा परिणाम भारतीय बाजारावर होणार आहे. तज्ज्ञांचे मत आहे की शेअर बाजार वाढ दिसून येईल. त्याचबरोबर डॉलरवर दबाव वाढण्याची शक्यता आहे. यामुळे रुपया मजबूत होऊ शकतो.

सोन्याचे भाव वाढणार

फेड दरातील कपातीमुळे गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणुकीचा पर्याय म्हणून सोन्यात गुंतवणुकीला प्राधान्य देऊ शकतात.याधीच मागच्या आठवड्यात रिझर्व बँकेने रेपो दरात कपात केल्याने सोन्याचे भाव वाढले होते,आणि आता अमेरिकन फेडनेही व्याजदरात कपात केली आहे, त्यामुळे थोड्या दिवसांमध्ये सोन्याच्या भाव वाढण्याची शक्यता आहे.

कु. दुर्गा संतोष साखरे
कु. संभाजी तोटरे

 ISBN NO. 978-81-990957-8-6

19/12/2025

भारतात वाढणार जीसीसी क्षेत्राचे वर्चस्व

भारतातील ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स (जीसीसी) क्षेत्राचा आकार साल २०३० पर्यंत १०५ अब्ज डॉलर होण्याची अपेक्षा आहे. गुरुवारी जाहीर झालेल्या सरकारी आकडेवारीनुसार, ही वाढ सरकारच्या धोरणांना मिळणारा पाठिंबा, मजबूत प्रतिभा आणि उच्च-स्तरीय संशोधन व विकास (आरअँडडी) कार्यांच्या विस्तारामुळे होत आहे.

सध्या देशात १,७०० हून अधिक जीसीसी कार्यरत आहेत, ज्यांनी वित्त वर्ष २०२४ मध्ये ६४.६ अब्ज डॉलर उत्पन्न मिळवले. हे केंद्रे १९ लाखांहून अधिक लोकांना रोजगार देतात. वित्त वर्ष २०१९ मध्ये ही कमाई ४०.४ अब्ज डॉलर होती आणि तेव्हापासून ती दरवर्षी सुमारे ९.८ टक्के दराने वाढत आहे.

केंद्रांची संख्या २०३० पर्यंत वाढून २,४०० पर्यंत पोहोचू शकते आणि यामध्ये २८ लाखांहून अधिक लोक काम करू शकतात. यामुळे भारत जागतिक कंपन्यांसाठी अधिक पसंतीचे ठिकाण म्हणून उदयास येईल. जीसीसी म्हणजे अशी केंद्रे जी कंपन्या आपल्या मूळ संस्थेला विविध सेवा देण्यासाठी विदेशात स्थापन करतात. ही केंद्रे प्रामुख्याने बेंगळुरू, हैदराबाद, पुणे, चेन्नई, मुंबई आणि एनसीआर येथे आहेत. आता ही केंद्रे फक्त सपोर्ट सेवा न देता इंजिनिअरिंग आरअँडडी, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सायबर सुरक्षा आणि सेमीकंडक्टरसारख्या प्रगत क्षेत्रांत कार्यरत आहेत.

इंजिनिअरिंग रिसर्च अँड डेव्हलपमेंटशी संबंधीत जीसीसीची वाढ इतर केंद्रांच्या तुलनेत १.३ पट वेगाने होत आहे. अहवालात म्हटले आहे की भारत जागतिक विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित (एसटीईएम) कार्यबलात २८ टक्के योगदान देतो, तर जागतिक सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग प्रतिभेत भारताचा २३ टक्के वाटा आहे. जागतिक भूमिका ६,५०० वरून २०३० पर्यंत ३०,००० हून अधिक होऊ शकतात.

भारताचा जीसीसी हब बनण्याचा प्रवास पायाभूत सुविधा, नावीन्य, कौशल्य विकास आणि सहायक धोरणे यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे शक्य झाला आहे. स्किल इंडिया, डिजिटल इंडिया आणि फ्युचर स्किल्स प्राइम यांसारखे कार्यक्रम देशातील युवकांना नव्या डिजिटल तंत्रज्ञानाने सक्षम करत आहेत. आर्थिक सर्वेक्षण २०२४-२५ मध्ये नमूद केले आहे की जीसीसी आता फक्त बॅक-ऑफिस राहिलेले नाहीत, तर एरोस्पेस, संरक्षण आणि प्रगत उत्पादन क्षेत्रांसारख्या मोठ्या विभागांतही महत्त्वाची भूमिका निभावत आहेत. अहवालात म्हटले आहे, 'जीसीसी आता कंपनीच्या सपोर्ट सेंटरमधून स्ट्रॅटेजिक सेंटरमध्ये रूपांतरित होत आहेत. हा बदल अतिशय जलद गतीने होत आहे.'

कु. संध्या पदमगिरवार

20/12/2025

सोनं की शेअर बाजार! पुढच्या वर्षी कोण देणार सर्वात जास्त रिटर्न? ब्रोकरेज फर्मने केली भविष्यवाणी

चालू वर्ष संपत आले असताना शेअर बाजाराने जरी उच्चांक गाठला असला, तरी गुंतवणूकदारांना अपेक्षेइतका परतावा मिळालेला नाही. टॅरिफचा फटका, रुपयाची घसरण आणि परदेशी गुंतवणूकदारांची (FPI) सातत्याने झालेली विक्री यामुळे शेअर बाजारात मोठी घसरण पाहायला मिळाली.

दुसरीकडे, सोने आणि चांदीच्या किमतींनी मात्र परताव्याच्या बाबतीत अनेक विक्रम मोडले आहेत. वायदा बाजारात सोन्याने गुंतवणूकदारांना सुमारे 71 टक्के परतावा दिला आहे, तर चांदीने तब्बल 121 टक्के कमाई करून दिली आहे. वर्षअखेरीपर्यंत या किमतींमध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

आता सर्वात मोठा प्रश्न असा आहे की, 2026 मध्ये सोने, चांदी की शेअर बाजार कोण जास्त परतावा देणार? याबाबत देशातील आघाडीची

 ISBN NO. 978-81-990957-8-6

ब्रोकरेज फर्म कोटक सिक्युरिटीजने अंदाज वर्तवला आहे.

शेअर बाजारासाठी कोणते घटक निर्णायक ठरणार?

सप्टेंबर 2024 मधील उच्चांकानंतर भारतीय शेअर बाजारात सुमारे 17 टक्क्यांची घसरण झाली होती. मात्र 2025 अखेरीस निफ्टी 50 ने पुन्हा एकदा नवा 'ऑल टाइम हाय' गाठला आहे. लार्ज-कॅप कंपन्यांचे शेअर्स तुलनेने चांगले कामगिरी करताना दिसले, तर मिड-कॅप आणि स्मॉल-कॅप शेअर्स घसरताना दिसले.

ऑटोमोबाईल, बँकिंग आणि मेटल क्षेत्राने चांगली कामगिरी केली, तर आयटी आणि FMCG क्षेत्रात अस्थिरता होती. परदेशी गुंतवणूकदारांची विक्री सुरू असतानाही देशांतर्गत गुंतवणूकदारांनी बाजाराला आधार दिला. त्यामुळे भारतीय इक्विटी मार्केटवरील विश्वास अधिक वाढला आहे. IPO आणि प्राथमिक बाजारही तेजीत होता.

निफ्टीबाबत काय अंदाज?

आर्थिक वर्ष 2027 मध्ये निफ्टीच्या नफ्यात 17.6 टक्के, तर आर्थिक वर्ष 2028 मध्ये 14.8 टक्के वाढ होण्याची अपेक्षा आहे. डिसेंबर 2026 पर्यंत निफ्टी 29,120 अंकांपर्यंत पोहोचू शकतो. यामध्ये आर्थिक वर्ष 2028 साठी Earnings Per Share (EPS) 1,456 रुपये आणि Price-to-Earnings (P/E) रेशो 20 गृहित धरलेला आहे.

बुल केसमध्ये निफ्टी 32,032 अंकांपर्यंत जाऊ शकतो, तर बियर केसमध्ये तो 26,208 अंकांपर्यंत घसरू शकतो. 2026 साठी संभाव्य 'हॉट सेक्टर्स' म्हणून बँकिंग व वित्तीय सेवा (BFSI), टेक्नॉलॉजी, हेल्थकेअर आणि हॉस्पिटॅलिटी क्षेत्रांकडे पाहिले जात आहे.

सोन्या-चांदीची चमक कायम राहणार?

2025 मध्ये सोन्याने दमदार कामगिरी केली. आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याची किंमत 55 टक्क्यांहून अधिक वाढून 4,000 डॉलर प्रति औंसच्या पुढे गेली. जागतिक अनिश्चितता, भू-राजकीय तणाव आणि सेंट्रल बँकांकडून मोठ्या प्रमाणात झालेली खरेदी ही यामागची प्रमुख कारणे आहेत.

भारतात वायदा बाजारात सोन्याच्या किमतींमध्ये आतापर्यंत सुमारे 71 टक्क्यांची वाढ झाली आहे. यामध्ये रुपयाच्या घसरणीचाही मोठा वाटा आहे. चांदीने मात्र यंदा सोन्यालाही मागे टाकले असून वायदा बाजारात 121 टक्क्यांची झेप घेतली आहे. सेफ-हेवन मागणी, पुरवठ्यातील कमतरता यामुळे चांदीच्या किमती वाढल्या.

कोटक सिक्युरिटीज मत काय?

कोटक सिक्युरिटीजचे एमडी आणि सीईओ श्रीपाल शाह यांनी सांगितले की, "जागतिक आव्हाने असतानाही भारत हा चांगल्या वाढीचे केंद्र राहिले आहे. कॉर्पोरेट कमाई चांगली राहण्याची अपेक्षा आणि अनुकूल धोरणात्मक वातावरणामुळे आम्ही भारतीय इक्विटीबाबत सकारात्मक आहोत."

ते पुढे म्हणाले, "2026 मध्ये सोने सुरक्षित गुंतवणुकीचा पर्याय म्हणून आपली चमक कायम ठेवेल. तरुण गुंतवणूकदारांचा वाढता सहभाग बाजाराला अधिक बळ देईल आणि मार्केटमध्ये नव्या संधी निर्माण होतील."

उद्योग क्षेत्राबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, सेबीच्या अलीकडील सर्वेक्षणानुसार 63 टक्के कुटुंबांना किमान एका सिक्युरिटी मार्केट प्रोडक्टची माहिती आहे, मात्र प्रत्यक्षात फक्त 9.5 टक्के कुटुंब गुंतवणूक करतात. यावरून भारतीय इक्विटी बाजारात अजूनही मोठ्या संधी असल्याचे दिसत आहे. ब्रोकरेज फर्म्सनी गुंतवणूक अधिक सोपी आणि सर्वसामान्यांसाठी सुलभ करण्याची गरज आहे, असेही त्यांनी नमूद केले.

कु. तनुजा सूर्यवंशी
कु. स्नेहा जोंधळे

 ISBN NO. 978-81-990957-8-6

21/12/2025

रुपया 91 पार; 1 डॉलर = 91.07 रुपये!

कारण काय? महागाई वाढणार का?

जागतिक बाजारातील संकेतांमुळे रोजच घसरत जाणारा रुपयाने आज ऐतिहासिक नीचांक गाठला. पहिल्यांदाच रुपयाची किंमत डॉलरच्या तुलनेत ९१ रुपयांच्या पुढे गेली आहे. भारतीय शेअर बाजारात परदेशी गुंतवणूकदारांकडून सुरु असलेली विक्री आणि वयापाराबाबतच्या अनिश्चिततेमुळे दबाव कायम आहे आणि त्याचा परिणाम रुपयाचे मूल्य घसरण्यावर होत आहे.

गेल्या १० दिवसांत रुपया ९० ते ९१ च्या दरम्यान व्यवहार करत होता. गेल्या पाच दिवसांचा विचार करता रुपयात जवळपास १% घसरण झाली आहे. सकाळी ११.३८ वाजता रुपया डॉलरच्या तुलनेत ९१.०७५ वर व्यवहार करत होता.

आज दिवसाच्या सुरुवातीला बाजार उघडताच रुपयाने ०.१ टक्क्यांनी घसरून ९०.८३ असा नवा विक्रम नोंदविला. पण थोड्याच वेळात ९१ रुपयांचा नीचांक गाठत सकाळचा विक्रम मोडला आणि इतिहासात पहिल्यांदा रुपया डॉलरच्या तुलनेत ९१ पुढे गेला. याआधी झालेल्या घसरणीचा प्रभाव आजही कायम दिसून आला. सोमवारी एकाच दिवशी रुपयात तब्बल २९ पैशांची घसरण झाली होती.

FII विक्रीचा मोठा परिणाम

"आज इतकी मोठी घसरण अपेक्षित नव्हती, कारण नोव्हेंबरमधील बाजारातील व्यापाराची आकडेवारी अपेक्षेपेक्षा चांगली झाली होती. पण, मागच्या खूप दिवसांपासून सातत्याने सुरू असलेली FII विक्री रुपयासाठी चिंतेचा विषय ठरत आहे आणि त्यामुळेच आजची घसरण जाहली आहे." असे मत जिओजित इन्व्हेस्टमेंट्सचे मुख्य गुंतवणूक सल्लागार व्ही.के. विजयकुमार यांनी सांगितले.

रुपयाला कमजोर होऊ देण्याची RBI ची भूमिका

बाजारात जेव्हा रुपया कमजोर होतो तेव्हा RBI बाजारात हस्तक्षेप करून समतोल साधण्याचा प्रयत्न करत असते. मात्र सध्याच्या स्थितीमध्ये मध्यवर्ती बँकेची भूमिका रुपयाला थोडा कमजोर होऊ देण्याची आहे. कारण, नोव्हेंबरमध्ये महागाई फक्त 0.71 टक्के आहे. त्यामुळे रुपयाच्या घसरणीचा अर्थव्यवस्थेवर फारसा परिणाम होणार नाही अशी रिझर्व बँकेची अपेक्षा आहे. उलट, भारताची व्यापार तूट ऑक्टोबरमधील 41.68 अब्ज डॉलरवरून नोव्हेंबरमध्ये 24.53 अब्ज डॉलरपर्यंत कमी झाली आहे, जे रुपयासाठी सकारात्मक आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

रुपयावर दबाव राहण्याची शक्यता

तज्ञांच्या मते, "भारत-अमेरिका व्यापार कराराला होणारा उशीर आणि एफआयआय विक्रीमुळे रुपया सध्या कमजोर राहू शकतो. मात्र, डॉलर कमकुवत झाला किंवा रिझर्व बँकेने हस्तक्षेप केला, तर रुपयाला थोडा आधार मिळू शकतो".

सध्याच्या घडीला गुंतवणूकदारांचे लक्ष आता बँक ऑफ इंग्लंड, युरोपियन सेंट्रल बँक आणि बँक ऑफ जपान यांच्या चलनविषयक धोरणांकडे असेल. तज्ज्ञांच्या मते, डॉलर-रुपया व्यवहार येत्या काळात 90.30 ते 91 या पट्ट्यात राहील.

कु. पायलकौर जाधव

कु. साक्षी ठाकूर

22/12/2025

रुपाया घसरणीचे कारण काय

रुपया रसातळाला पोहोचण्यामागे मुख्य कारणे म्हणजे भारत-अमेरिका व्यापार करारातील विलंब आणि परदेशी निधीकडून सतत विक्री आहे. रुपयाच्या घसरणीत सक्रियपणे हस्तक्षेप करण्यापासून परावृत्त करण्याचा सरकारचा निर्णय हा जाणूनबुजून केलेल्या रणनीतीचा भाग असू शकतो असे तज्ज्ञांचे मत आहे. निर्यात स्पर्धात्मकता राखण्यासाठी हे केले जाऊ शकते असे त्यांचे मत असून रुपया काही प्रमाणात घसरला तर अशी शक्यता आहे.

एचडीएफसी सिक्युरिटीजचे संशोधन विश्लेषक दिलीप परमार म्हणाले, 'भारतीय रुपया विक्रमी नीचांकी पातळीवर घसरला आहे, ज्यामुळे आशियाई चलनांमध्ये सर्वात वाईट कामगिरी

 ISBN NO. 978-81-990957-8-6

करणारा चलन बनला. व्यापार शिल्लक डेटा सुधारल्यानंतरही रुपयाला कोणताही आधार मिळालेला नाही.' या वर्षी रुपया 6% घसरला आहे.

घसरत्या रुपयाचा निर्यातीशी काय संबंध?

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आयात शुल्काच्या दबावात नोव्हेंबरमध्ये भारताची निर्यात 19.37% वाढून 38.12 अब्ज डॉलर्सवर पोहोचली, ज्यामुळे देशाची व्यापार तूट पाच महिन्यांच्या नीचांकी 24.53 अब्ज डॉलर्सवर कमी झाली. पण, आता तुम्ही विचाराल की घसरता रुपया आणि निर्यातीचा संबंध काय आहे? तर दोघांमध्ये थेट आणि सकारात्मक संबंध आहे. अमेरिकन डॉलरसारख्या इतर चलनांच्या तुलनेत रुपया घसरतो तेव्हा परदेशी खरेदीदारांसाठी भारतीय वस्तू आणि सेवा स्वस्त होतात.

कु. कार्तिका पगडाला
कु. गजानन राजरवाड

23/12/2025

बेरोजगारी 9 महिन्यांच्या नीचांकी पातळीवर

काही महिन्यांपासून देशातील बेरोजगारी वाढली असल्याची चर्चा सुरू होती. दरम्यान, आता एक मोठी माहिती समोर आली आहे. नोव्हेंबर २०२५ मध्ये १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या लोकांसाठी बेरोजगारीचा दर ४.७ टक्क्यांपर्यंत घसरला, हा ऑक्टोबर २०२५ मध्ये ५.२ टक्के होता.

सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या मते, नोव्हेंबर २०२५ मध्ये १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या लोकांसाठी बेरोजगारीचा दर ४.७ टक्क्यांपर्यंत घसरला, हा एप्रिल २०२५ नंतरचा सर्वात कमी आहे.

नोव्हेंबर २०२५ मध्ये ग्रामीण बेरोजगारीचा दर ३.९ टक्क्यांपर्यंत घसरला, तर शहरी बेरोजगारीचा दर ६.५ टक्क्यांपर्यंत घसरला, हा एप्रिल २०२५ मध्ये नोंदवलेल्या त्याच्या मागील सर्वात कमी पातळीच्या बरोबरीचा आहे. एप्रिल २०२५ मध्ये बेरोजगारीचा दर ५.१ टक्के होता. निवेदनानुसार, एकूणच, ग्रामीण रोजगारात वाढ, महिलांच्या सहभागात वाढ आणि शहरी कामगार मागणीत हळूहळू सुधारणा यामुळे कामगार बाजारातील परिस्थिती मजबूत होत असल्याचे ट्रेंड दर्शवतात.

पुरुष आणि महिला दोघांमध्येही बेरोजगारी कमी झाली

नोव्हेंबर २०२५ मध्ये १५ वर्षे आणि त्यावरील वयाच्या पुरुष आणि महिला दोघांमध्येही बेरोजगारीचा दर लक्षणीयरीत्या कमी झाला असल्याचे मंत्रालयाने म्हटले आहे. महिलांमध्ये, बेरोजगारीचा दर नोव्हेंबर २०२५ मध्ये ४.८ टक्क्यांपर्यंत घसरला, जो ऑक्टोबर २०२५ मध्ये ५.४ टक्के होता. ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागातील महिलांसाठी बेरोजगारीचा दर अनुक्रमे ४ टक्क्यांवरून ३.४ टक्के आणि ९.७ टक्क्यांवरून ९.३ टक्के झाला आहे. शिवाय, पुरुषांसाठी एकूण बेरोजगारीचा दर नोव्हेंबर २०२५ मध्ये ४.६ टक्क्यांपर्यंत घसरला, जो ऑक्टोबर २०२५ मध्ये ५.१ टक्के होता.

प्रदेशनिहाय आकडेवारीचा विचार करता, नोव्हेंबर २०२५ मध्ये ग्रामीण आणि शहरी पुरुषांसाठी बेरोजगारीचा दर अनुक्रमे ४.१% आणि ५.६% होता, जो मागील महिन्यात ४.६% आणि ६.१% होता. एप्रिल-नोव्हेंबर २०२५ दरम्यान पुरुष, महिला आणि सर्व व्यक्तींसाठी बेरोजगारीच्या दरात सातत्यपूर्ण आणि व्यापक घट दिसून आली. ही घट ग्रामीण भागात अधिक स्पष्टपणे दिसून आली, तिथे नोव्हेंबरमध्ये पुरुष आणि महिला दोन्ही बेरोजगारी दर त्यांच्या सर्वात कमी पातळीवर पोहोचले. शहरी भागातील बेरोजगारीचे दर उच्च राहिले परंतु कालावधीच्या अखेरीस त्यात सुधारणा झाली.

महिला लोकसंख्या प्रमाण देखील वाढते

नोव्हेंबर २०२५ मध्ये १५ वर्षे आणि त्यावरील वयोगटातील व्यक्तींसाठी महिला लोकसंख्या प्रमाण (WPR) मध्ये व्यापक सुधारणा दिसून आली. ग्रामीण भागात महिला कामगार

 ISBN NO. 978-81-990957-8-6

शक्ती प्रमाण (WPR) एप्रिल २०२५ मध्ये ५५.४ टक्क्यांवरून नोव्हेंबर २०२५ मध्ये ५६.३ टक्क्यांपर्यंत वाढले, तर त्याच कालावधीत एकूण WPR ५२.८ टक्क्यांवरून ५३.२ टक्क्यांपर्यंत वाढले. शहरी भागात WPR तुलनेने स्थिर राहिला. ग्रामीण महिला WPR एप्रिल २०२५ मध्ये ३६.८ टक्क्यांवरून नोव्हेंबर २०२५ मध्ये ३८.४ टक्क्यांपर्यंत वाढला, ज्यामुळे या कालावधीत एकूण महिला WPR मध्ये ३२.५ टक्क्यांवरून ३३.४ टक्क्यांपर्यंत वाढ झाली.

LFPR मध्ये वाढ

एकूण कामगार संख्येत वाढ झाली, ती जून २०२५ मध्ये ५१.२ टक्क्यांवरून नोव्हेंबर २०२५ मध्ये ५३.२ टक्क्यांपर्यंत वाढली. १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या व्यक्तींमध्ये एकूण LFPR नोव्हेंबर २०२५ मध्ये ५५.८ टक्क्यांपर्यंत वाढला, जो एप्रिल २०२५ नंतरचा सर्वोच्च स्तर आहे.

कामगार शक्ती सहभाग दर (LFPR) मध्ये वाढ प्रामुख्याने ग्रामीण भागातून झाली, तिथे तो एप्रिल २०२५ मध्ये ५८.० टक्क्यांवरून नोव्हेंबर २०२५ मध्ये ५८.६ टक्क्यांपर्यंत वाढला. मागील महिन्याच्या तुलनेत, ग्रामीण LFPR ५७.८ टक्क्यांवरून ५८.६ टक्क्यांपर्यंत वाढला, तर शहरी LFPR किरकोळ प्रमाणात घटला, जो ५०.५ टक्क्यांवरून ५०.४ टक्क्यांपर्यंत घसरला.

कु. राणी बुलबुले
कु. शैलेजा कोपलवाड

24/12/2025

जागतिक AI रँकिंगमध्ये भारत तिसऱ्या क्रमांकावर; एका वर्षात चार स्थानांनी घेतली झेप

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा भारताने गाठला आहे. स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या ग्लोबल एआय व्हायब्रन्सी इंडेक्स २०२४ नुसार, भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मजबूत AI देश म्हणून उदयास आला आहे.

भारताने अमेरिका आणि चीननंतर या यादीत तिसरे स्थान पटकावले आहे. विशेष म्हणजे, २०२३ मध्ये भारत या निर्देशांकात सातव्या क्रमांकावर होता, म्हणजेच भारताने फक्त एका वर्षात चार स्थानांनी झेप घेत युनाइटेट किंगडम (ब्रिटन) आणि दक्षिण कोरियाला मागे टाकले आहे.

स्टॅनफोर्ड विद्यापीठाने विकसित केलेला ग्लोबल एआय व्हायब्रन्सी इंडेक्स, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात देशाची स्पर्धात्मकता मोजतो. हा निर्देशांक, संशोधन आणि विकास (रिसर्च एंड डेवलपमेंट), प्रतिभा, आर्थिक गतिविधी, पायाभूत सुविधा, प्रशासन आणि जनमत यासह अनेक प्रमुख पॅरामीटर्सचा विचार करतो. या स्तंभांच्या आधारे, एक भारित गुण तयार केला जातो, जो देशाची एआय तंत्रज्ञान विकसित करण्याची, अंमलात आणण्याची क्षमता दर्शवितो.

अहवालानुसार, ७८.६० गुणांसह अमेरिका पहिल्या क्रमांकावर आहे. एआय संशोधन, आर्थिक वापर, पायाभूत सुविधा, खाजगी गुंतवणूक, संगणकीय क्षमता आणि एआय मॉडेल निर्मितीमध्ये अमेरिका अजूनही आघाडीवर आहे. जेमिनी २.० प्रो, ओ१ आणि लामा ३.१ सारखे मॉडेल्स अमेरिकेची ही ताकद दाखवतात.

चीन ३६.९५ गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. एआय संशोधन, प्रकाशने, पेटंट आणि नवीन एआय मॉडेल्सच्या लाँचमध्ये चीन मजबूत उभा दिसतो आणि त्याची सरकारी रणनीती एआयला अर्थव्यवस्थेत व्यापकपणे समाकलित करते.

दरम्यान, भारत २१.५९ गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे, जो २०२३ मध्ये सातव्या स्थानावरून लक्षणीय वाढ आहे. इतर प्रमुख देशांमध्ये दक्षिण कोरिया (१७.२४) आणि युनायटेड किंग्डम (१६.६४) पाचव्या स्थानावर आहे.

भारताच्या वेगाने वाढत्या क्रमवारीमागे काही महत्त्वाची कारणे सांगितली जात आहेत.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

एआयला प्रोत्साहन देणाऱ्या सरकारी धोरणांमुळे, स्टार्टअप्ससाठी अनुकूल वातावरण आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारीमुळे एआय इकोसिस्टम मजबूत झाली आहे. सॉफ्टवेअर, डेटा सायन्स आणि अभियांत्रिकीमध्ये भारतात एक मजबूत प्रतिभा समूह आहे, ज्यामुळे या क्षेत्रात जलद वाढ झाली आहे.

भारताची प्रगती ही योगायोग नाही तर संरचनात्मक आणि धोरणात्मक प्रयत्नांचा परिणाम आहे. डिजिटल इंडिया, इंडियाएआय मिशन आणि एआय संशोधन संस्थांना सरकारी पाठिंबा नवीन उपक्रमांना गती देत आहेत. याव्यतिरिक्त, भारताला त्याची विशाल डेटा इकोसिस्टम आणि परवडणारी पण कुशल मानवी संसाधने जागतिक एआय गुंतवणुकीसाठी आकर्षक बनवतात.

कु. वैष्णवी औंढेकर
कु. शिवानी यादव

25/12/2025

नोव्हेंबरमध्ये महागाई थंडावली; अन्नधान्याच्या किमती ०.३२ टक्क्यांनी घसरल्या

देशातील महागाईमध्ये मोठी घट झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत अनेक वस्तूंचे दर कमी झाल्याने महागाईत घट झाली आहे.

सरकारी आकडेवारीनुसार नोव्हेंबरमध्ये घाऊक महागाई (-) ०.३२ टक्के होती, जी ऑक्टोबरमध्ये (-) १.२१ टक्के होती. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये हा दर २.१६ टक्के नोंदवला गेला होता. आकडेवारीनुसार, महिन्या-दर-महिना आधारावर, डाळी आणि भाज्यांसारख्या अन्नपदार्थांच्या किमती वाढल्या, ज्यामुळे घाऊक महागाईत काही सुधारणा झाली. उद्योग मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, नोव्हेंबर २०२५ मध्ये चलनवाढीचा नकारात्मक स्तर प्रामुख्याने अन्नपदार्थ, खनिज तेल, कच्चे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू, मूलभूत धातूंचे उत्पादन आणि वीज यांच्या किमतींमध्ये घट झाल्यामुळे होता.

घाऊक किंमत निर्देशांक घाऊक पातळीवर वस्तूंच्या किमतींमधील सरासरी बदल मोजतो. नकारात्मक महागाई किंवा डिफ्लेशन म्हणजे गेल्या वर्षीच्या तुलनेत अनेक प्रमुख वस्तूंच्या किमती कमी झाल्या आहेत. यावरून थेट असे दिसून येते की, घाऊक बाजारात वस्तू पूर्वपेक्षा स्वस्त झाल्या. घाऊक महागाईच्या तुलनेत, नोव्हेंबरमध्ये किरकोळ महागाईत थोडीशी वाढ झाली. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या मते, किरकोळ महागाई 0.71% होती. ऑक्टोबरमध्ये ती 0.25% होती जी 46 बेसिस पॉइंटने वाढल्याचे दिसून आले. अन्न निर्देशांकातही घट झाल्याचे दिसून आले. नोव्हेंबरमध्ये अन्न निर्देशांकाचा घाऊक महागाई दर -२.६०% होता. याचा अर्थ असा आहे की, गेल्या वर्षीच्या तुलनेत घाऊक पातळीवर अन्नपदार्थ स्वस्त झाले आहेत. याचा भविष्यात किरकोळ किमतींवर परिणाम होऊ शकतो.

या घाऊक महागाई दराच्या घसरणीमुळे मात्र, शेतकऱ्यांवर त्याचा नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे. कारण, भारतीय बाजारपेठात अन्नधान्यांच्या किंमती स्वस्त झाल्या तर शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न घटेल. ज्यामुळे शेतीसाठी लागणारी रक्कम आणि घेतलेल्या कर्जाचे व्याजदर या सगळयांची सारवासारव करण्यासाठी शेतकऱ्याला आर्थिक संकटाला सामोरे जावे लागेल. मात्र, सामान्य जनतेसाठी ही बातमी आनंददायक आहे. सध्या वाढत्या महागाईत ही घट ग्राहकांची आर्थिक बचत करेल. वर्षाच्या शेवटी मिळालेली ही आनंदवार्ता ग्राहकांना दिलासा देईल.

कु. निकिता तोमर
कु. अंकिता तोमर

27/12/2025

EV कार

इंधनाचे दर आणि प्रदुषणावर पर्याय म्हणून इलेक्ट्रिक वाहनांना जास्त पसंती दिली जात आहे. भारतात सध्या ईलेक्ट्रिक कार आणि बाइकने मार्केट व्यापून टाकलं आहे. स्कुटर, बाईक आणि

 ISBN NO. 978-81-990957-8-6

कार आता ईलेक्ट्रिक सेगमेंटमध्ये चांगले पर्याय मिळत आहे.

सुरुवातील चार्जिंगच्या समस्येमुळे लोक ईव्ही गाड्या खरेदीकडे फारसे वळत नव्हते. पण, आता ईव्ही गाड्यांमध्ये चार्जिंगची समस्या दूर झाली. पण अजूनही किंमतीच्या बाबतीत इलेक्ट्रिक गाड्या महाग आहे. पण, आता केंद्र सरकारने नवीन धोरण आणणार आहे. ज्यामुळे इलेक्ट्रिक वाहनांच्या किंमती कमी होणर आहे.

इलेक्ट्रिक वाहनांमध्ये सगळ्यात महत्त्वाचा पार्ट म्हणजे बॅटरी आहे. ही बॅटरी तयार करण्यासाठी भारत हा चीनवर अवलंबून आहे. त्यामुळे आता चीनची ही मक्तेदारी आता मोडीत निघणार आहे. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, भारत आता लवकरच लिथियम आणि निकेल प्रोसेसिंगसाठी अनुदान योजना आणणार आहे. भारतात बॅटरी तयार करणाऱ्या कंपन्यांना गुंतवणुकीसाठी १५ टक्के रक्कम कॅपिटल सबसिटी म्हणून परत मिळणार आहे. ही योजना १ एप्रिल २०२६ पासून सुरू होणारा आहे. या योजनेमुळे भारतात बॅटरीचं उत्पादन वाढेल आणि बॅटरीच्या किंमतीही कमी होतील.

काय आहे भारताची बॅटरी धोरण योजना?

भारतात ईलेक्ट्रिक वाहनांसाठी लागणाऱ्या बॅटरी या परदेशातून आयात कराव्या लागते. जगात चीन हा सर्वात मोठा बॅटरी उत्पादक देश आहे. एकट्या चीनकडे जगभरातल्या उत्पादनापैकी ८० टक्के वाटा आहे. त्यामुळे चीन जो दर ठरवतो, त्यावर सगळे देश अवलंबून आहे. भारताने आता हीच अडचण दूर करण्यासाठी बॅटरीसाठी लागणारा कच्चा माल लिथिनियम आणि निकेल भारतात तयार करण्यासाठी प्रोत्साहन देणार आहे. जर भारतात बॅटरी तयार करण्यास सुरुवात झाली तर भारतात इलेक्ट्रिक कार आणि दुचाकीच्या किंमतीत २० ते ३० टक्के कपात होऊ शकते. केंद्र सरकारने बॅटरीचा प्लांट उभारण्यासाठी मदत करणार आहे. या योजनेत ५ वर्षांचा उन्सेंटिव्ह म्हणजे सानुग्रह अनुदान दिला जाईल. ज्या कंपन्यांचा लिथियम प्रोसेसिंग प्लांट्सना त्यांच्या वार्षिक नेट सेल्स टर्नओव्हरच्या 40% पर्यंत आणि निकेल प्लांट्सना 25 टक्क्यांपर्यंत आर्थिक लाभ मिळणार आहे.

लिथियम आणि निकेल प्रकल्प असे असेल?

या योजनेनुसार, केंद्र सरकार २ लिथियम आणि २ निकेलचे मोठे प्रकल्प आणणार आहे, जे 2030 पर्यंत देशाची संपूर्ण मागणी पूर्ण करण्याची क्षमता ठेवतील. मात्र, ही सबसिडी प्रत्येकाला मिळणार नाही. यासाठी सरकारने कडक निकष असणार आहे. लिथियम रिफायनरीची किमान क्षमता 30,000 मेट्रिक टन आणि निकेल रिफायनरीची क्षमता 50,000 मेट्रिक टन असण्याची गरज आहे. ज्या कंपन्या टेक्नॉलॉजीच्या दृष्टा मजबूत आहे, अशा कंपन्यांची निवड होणार आहे. भारतात सध्या रिलायन्स, JSW आणि अदानीसारख्या मोठ्या ग्रुप्सचे या सेक्टरमध्ये आधीपासून काम आहे.

योजना कशी असेल?

गट लिथियम निकल

- अनुदान किती गुंतवणुकीचा 15% गुंतवणुकीचा 15%
- जास्तीत जास्त इन्सेंटिव्ह सेल्स टर्नओव्हर 40% सेल्स टर्नओव्हर 25%
- किमान क्षमता 30,000 मेट्रिक टन 50,000 मेट्रिक टन
- प्रभावी तारीख 1 अप्रैल 2026 1 अप्रैल 2026

या योजनेसाठी काय आहे गरजेचं?

भारतात जर लिथियम आणि निकेल प्रकल्प उभारायचे असतील तर त्यासाठी सगळ्याच महत्त्वाचे म्हणजे, खनिजांच्या मायनिंगपासून ते प्रक्रियेपर्यंत सगळी व्यवस्था तयार करावी लागणार आहे. भारत सध्या ऑस्ट्रेलिया आणि चिली या दोन देशाकडून लिथियम रिफायनिंग तंत्रज्ञानासाठी चर्चा करत आहे. ही योजना सध्या कागदावर आहे, जर प्रत्यक्षात ही योजना भारतात सुरू झाली तर इलेक्ट्रिक वाहनांच्या किंमती तर कमी होतीलच, निर्यात क्षेत्रातही भारत पाऊल ठेऊ शकतो.

 ISBN NO. 978-81-990957-8-6

९५ % युरोपीय कंपन्या आता भारतात गुंतवणूक वाढवणार

जागतिक गुंतवणूक नकाशावर भारत एक विश्वासार्ह केंद्र म्हणून नावारूपाला येत आहे. भारतात कार्यरत असलेल्या ९५% पेक्षा जास्त ईयू कंपन्या पुढील पाच वर्षांत त्यांचा व्यवसाय वाढवण्याची आणि नवीन गुंतवणूक करण्याची योजना आखत आहेत, असे फेडरेशन ऑफ युरोपियन बिझनेस इन इंडियाच्या सर्वेक्षणातून समोर आले आहे.

३५% कंपन्या ५ वर्षांत किमान ५० दशलक्ष युरो (४५० कोटी रुपये) गुंतवण्याची तयारी करत आहेत.

योजना कशी असेल?

गट	लिथियम	निकल
अनुदान किती	गुंतवणुकीचा 15%	गुंतवणुकीचा 15%
जास्तीत जास्त इन्सेंटिव्ह	सेल्स टर्नओव्हर 40%	सेल्स टर्नओव्हर 25%
किमान क्षमता	30,000 मेट्रिक टन	50,000 मेट्रिक टन
प्रभावी तारीख	1 अप्रैल 2026	1 अप्रैल 2026

28/12/2025

रुपयाचे अमेरिकी डॉलरपुढे ९२ पर्यंत लोटांगण

अमेरिकेच्या डॉलरपुढे ९२ च्या ऐतिहासिक नीचांकापर्यंत रुपया कोलमडल्याचे गुरुवारी चलन बाजारात खळबळ उडवून देणारे चित्र दिसून आले. तेलाच्या आंतरराष्ट्रीय किमतीचा पुन्हा पिंपामागे ७० डॉलरपुढे भडका झाल्याने निर्माण केलेली धास्ती आणि परदेशी गुंतवणुकीची निरंतर माघारीचा हा गंभीर परिणाम दिसून आला.

आंतरबँक परकीय चलन बाजारात, रुपयातील व्यवहार ९१.९५ पातळीवर खुले झाले आणि सुरुवातीला त्यांनी ९१.८२ च्या उच्चांकाला गाठले. परंतु नंतर घसरण होऊन डॉलरच्या तुलनेत ९२ च्या ऐतिहासिक नीचांकाला त्याने लोळण घेतली. दिवसाचे व्यवहार थंडावताना तो काहीसा सावरला, तरी ९१.९६ (तात्पुरता) या आपल्या सर्वकालीन नीचांकी बंद पातळीजवळ स्थिरावला.

बुधवारी, रुपया ३१ पैशांनी घसरून डॉलरच्या तुलनेत ९१.९९ या आतापर्यंतच्या सर्वात नीचांकी बंद पातळीवर पोहोचला होता. त्या तुलनेत गुरुवारी तो ३ पैशांनी वधारलाच आहे. परंतु गेल्या आठवड्यात २३ जानेवारीला नोंदवलेल्या डॉलरमागे ९२ चा सार्वकालिक नीचांकी पातळीशी तो पुन्हा भिडताना दिसून आला.

संसदेत मांडल्या गेलेल्या आर्थिक पाहणी अहवालात, बाह्य क्षेत्रातील धोके आणि परदेशी निधीच्या बहिर्गमनाबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली आहे. तथापि अमेरिकी व्यापार शुल्काचा ताण पाहता रुपयातील ताजी तीव्र घसरण वाईट नसल्याचाही या अहवालाचा शेरा आहे.

महिन्याच्या अखेरीस आयातदारांची मागणी आणि खबरदारी म्हणून केलेले हेजिंग अर्थात किमतीबाबत बचावात्मक उपायांमुळे रुपयाच्या अवमूल्यानाला वेग आला आहे, असे विश्लेषकांनी नमूद केले. नजीकच्या काळातील भारताच्या चलनाची दिशा ही बऱ्या-वाईट जागतिक संकेतांवरूनच निश्चित होत राहील, असाही त्यांचा होरा आहे.

कु. निकिता गाजलवाड
कु. राधिका नरहिरे

29/12/2025

जगात सर्वाधिक कर्ज कोणत्या देशावर, यादीमध्ये भारत कितव्या स्थानी?

जानेवारी 2026 च्या डेटानुसार तसेच आर्थिक सर्वेक्षण 2025-26 नुसार अनेक मोठ्या अर्थव्यवस्था आजघडीला कर्जाच्या ओझ्याखाली दबल्या आहेत. युद्धामुळे, वाढत्या जनसंख्येमुळे, योजनांवरील खर्चामुळे अनेक देशांची अर्थव्यस्था राजकोषीय तुटीत आहेत.

अशा स्थितीत कोणत्या देशावर किती कर्ज आहे, असे विचारले जात आहे.

भारत यात कोणत्या स्थानावर आहे, याबाबतही विचारणा होत आहे. अमेरिका या देशावर इतर देशांच्या तुलनेत सर्वाधिक कर्ज आहे. या देशावर साधारण 38.3 ट्रिलियन डॉलर्स कर्ज

 ISBN NO. 978-81-990957-8-6

आहे. सैन्यावरचा खर्च, कल्याणकारी योजना यावर होणाऱ्या अतिरिक्त खर्चामुळे या देशाला कर्ज घेण्याची वेळ वारंवार येते.

कर्जाच्या बाबतीत चीन दुसऱ्या स्थानावर आहे. चीनवर एकूण 18.7 ट्रिलियन डॉलरचे कर्ज आहे. पायाभूत सुविधांवरील खर्च आणि आर्थिक प्रोत्साहनपर योजनांमुळे चीनवर एवढं कर्ज घेण्याची वेळ आलेली आहे. कर्जाच्या बाबतीत जपान हा देश तिसऱ्या स्थानावर आहे.

या देशावर एकूण 9.8 ट्रिलियन डॉलर सरकारी कर्ज आहे. ब्रिटन म्हणजेच युनायडेट किंग्डम हा देश कर्जाच्या बाबतीत चौथ्या स्थानावर आहे. या देशावर एकूण 4.1 ट्रिलियन डॉलर सरकारी कर्ज आहे.

तर फ्रान्स या देशावर 3.9 ट्रिलियन डॉलर सरकारी कर्ज असून हा देश पाचव्या स्थानावर आहे. कर्जबाजारी देशांच्या यादीत इटली हा देश सातव्या स्थानी असून या देशावर 3.5 ट्रिलियन डॉलर कर्ज आहे. कर्जाच्या बाबतीत भारत सहाव्या स्थानावर आहे. भारतावर 3.8 ट्रिलियन डॉलरचे कर्ज आहे.

कु. पाणेरी खिल्लारे
कु. कृष्णा वर्ताळे

30/12/2025

'लाडकी बहीण' सारख्या योजनांमुळे महाराष्ट्र महसुली तुटीत गेला; केंद्रीय आर्थिक पाहणी अहवालात ताशेरे

केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर देशाच्या अर्थव्यवस्थेवर प्रकाश टाकणारा आर्थिक सर्वेक्षण अहवाल (Economic Survey) सादर करण्यात आला. या अहवालात लाडकी बहीण सारख्या योजनांवर (Ladki Bahin Yojana) ताशेरे ओढण्यात आले आहेत.

राज्यांवर महसुली तुटीचा बोजा वाढत असल्याचं निरीक्षण सर्वेक्षण अहवालात नोंदवण्यात आलं आहे. लाडकी बहीण सारख्या योजनांमुळे महाराष्ट्र महसुली तुटीत गेल्याचं अहवालात नोंदवण्यात आलं आहे. तसंच महिला कामगारांच्या श्रमशक्तीतील सहभागावर नकारात्मक परिणाम झाल्याचंही निरीक्षण यामध्ये नोंदवण्यात आलं आहे.

आर्थिक सर्वेक्षण हा अहवाल दरवर्षी केंद्रीय अर्थसंकल्पापूर्वी संसदेत मांडला जातो आणि तो देश व राज्यांच्या आर्थिक आरोग्याचा आरसा मानला जातो. यंदाच्या अहवालात राज्यांच्या वित्तीय शिस्तीवर विशेष भर देण्यात आला असून महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्यालाही या पार्श्वभूमीवर इशारा देण्यात आला आहे.

Maharashtra Revenue Deficit : महाराष्ट्रात वाढती महसुली तूट

देशातील सर्वाधिक औद्योगिक आणि महसुली उत्पन्न देणाऱ्या राज्यांपैकी एक असलेला महाराष्ट्र आता महसुली तुटीत गेल्याचे या अहवालात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. वाढता चालू खर्च, लोककल्याणकारी योजनांचा मोठा आर्थिक भार आणि उत्पन्नाच्या तुलनेत खर्चाचा वाढता वेग ही यामागची प्रमुख कारणे असल्याचे आर्थिक सर्वेक्षण सूचित करते.

आर्थिक सर्वेक्षणानुसार, महाराष्ट्राचे चालू उत्पन्न म्हणजे कर आणि इतर महसूल हे चालू खर्च भागवण्यासाठी अपुरे ठरत आहे. वेतन, निवृत्तीवेतन, व्याज देयके आणि अनुदानाधारित योजनांमुळे खर्चात मोठी वाढ झाली आहे. परिणामी, काही वर्षांपूर्वी महसुली शिल्लक दाखवणारा महाराष्ट्र आता महसुली तुटीच्या गटात पोहोचला असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे.

Ladki Bahin Yojana : 'लाडकी बहीण'सारख्या योजनांवर केंद्राची अप्रत्यक्ष टीका

आर्थिक सर्वेक्षणात 'लाडकी बहीण'सारख्या मोठ्या प्रमाणावर रोख लाभ देणाऱ्या लोककल्याणकारी योजनांवर अप्रत्यक्ष ताशेरे ओढण्यात आले आहेत. अशा योजनांमुळे तात्काळ सामाजिक दिलासा मिळत असला, तरी दीर्घकालीन स्वरूपात राज्याच्या महसुली संतुलनावर मोठा ताण येतो, असे या अहवालात सूचित करण्यात आले आहे. यामुळे पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि भांडवली

 ISBN NO. 978-81-990957-8-6

गुंतवणुकीसाठी उपलब्ध निधी मर्यादित होण्याचा धोका वाढतो.

India Budget : महिला कामगारांच्या श्रमशक्तीवर नकारात्मक परिणाम

आर्थिक सर्वेक्षणातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे महिला कामगारांच्या श्रमशक्तीतील सहभागावर (Female Labour Force Participation Rate) होणारा नकारात्मक परिणाम. काही रोख अनुदान योजनांमुळे महिलांचा रोजगार व कामाच्या बाजारातील सक्रिय सहभाग कमी होण्याची शक्यता निर्माण होत असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. दीर्घकाळात याचा परिणाम महिलांच्या आर्थिक स्वावलंबनावर आणि राज्याच्या एकूण उत्पादकतेवर होऊ शकतो, असा इशारा अहवालात देण्यात आला आहे.

कु. साधना मुंडे
कु. भूमीका नागडा

31/12/2025

Economic Survey Of India : महाराष्ट्रातील पिकांच्या पॅटर्नमध्ये लक्षणीय बदल

आर्थिक सर्वेक्षणात महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राबाबतही महत्त्वाची निरीक्षणे नोंदवण्यात आली आहेत. राज्यात पारंपरिक अन्नधान्य पिकांपेक्षा नगदी पिकांकडे शेतकऱ्यांचा कल वाढत असल्याचे दिसून येते. हवामान बदल, पाण्याची उपलब्धता, बाजारपेठेतील मागणी आणि किमती यांचा पिकांच्या पॅटर्नवर मोठा प्रभाव पडत असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

आर्थिक शिस्तीचा स्पष्ट इशारा

केंद्राच्या आर्थिक सर्वेक्षणातून एकूणच संदेश स्पष्ट आहे की, लोककल्याणकारी योजना आणि आर्थिक शिस्त यामध्ये संतुलन राखणे अत्यावश्यक आहे. अन्यथा महसुली तूट वाढणे, कर्जाचा बोजा वाढणे आणि विकासात्मक खर्चाला मर्यादा येण्याचा धोका राज्यांसमोर उभा राहू शकतो. महाराष्ट्रासाठी हा अहवाल आगामी अर्थसंकल्पीय आणि आर्थिक धोरण ठरवताना एक महत्त्वाचा इशारा मानला जात आहे.

आर्थिक सर्वेक्षण अहवालातील महत्त्वाचे मुद्दे

देशाच्या संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन कालपासून सुरू झाले आहे. अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे आज लोकसभेत अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आर्थिक सर्वेक्षण अहवाल सादर केला आहे.

यानुसार, आर्थिक वर्ष 2026-27 मध्ये भारताच्या अर्थव्यवस्थेचा विकासदर 6.8 ते 7.2 टक्क्यांच्या दरम्यान राहण्याचा अंदाज आहे. हा अंदाज सध्याच्या आर्थिक वर्षासाठी अपेक्षित असलेल्या 7.4 टक्के विकासदरापेक्षा कमी असल्याने, पुढच्या वर्षात अर्थव्यवस्थेच्या गतीत किंचित मंदी येण्याची शक्यता आहे.

आर्थिक सर्वेक्षण अहवाल म्हणजे काय?

अर्थ मंत्रालयाच्या आर्थिक व्यवहार विभागाने तयार केलेला आर्थिक सर्वेक्षण अहवाल हा सरकारच्या आर्थिक कामगिरीचा अहवाल असून केंद्रीय अर्थसंकल्पाच्या आधी संसदेत सादर केला जातो. त्यामध्ये देशाच्या जीडीपी आणि गेल्या वर्षभरातील प्रगती किंवा वाढीचे वर्णन केले जाते आणि पुढील धोरणांची रूपरेषा ठरवली जाते. पहिला आर्थिक सर्वेक्षण अहवाल 1950-51 मध्ये सादर करण्यात आला होता.

अर्थव्यवस्था स्थिर

आर्थिक सर्वेक्षणात भारताची अर्थव्यवस्था स्थिर असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, जागतिक बाजारांमधील मंद वाढ आणि टॅरिफमुळे निर्माण होणारे व्यापारातील अडथळे यामुळे निर्यात आणि गुंतवणूकदारांवर काही प्रमाणात प्रभाव पडू शकतो, असा इशाराही सर्वेक्षणात देण्यात आला आहे.

आर्थिक सर्वेक्षण 2026 मध्ये नमूद करण्यात आले आहे की, अमेरिकेने लादलेल्या मोठ्या टॅरिफ वाढीनंतरही भारताच्या अर्थव्यवस्थेने वेग पकडला आहे. 2025 मध्ये अमेरिकेने काही भारतीय निर्यातींवर एकत्रित 50 टक्के टॅरिफ लावण्याचा निर्णय घेतल्यानंतर विकासदराचे अंदाज कमी

 ISBN NO. 978-81-990957-8-6

करण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्ष कामगिरी अपेक्षेपेक्षा चांगली ठरल्याचे सर्वेक्षणात सांगण्यात आले आहे. यामागे सरकारने केलेल्या संरचनात्मक सुधारणा आणि धोरणात्मक उपाययोजना कारणीभूत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे, ज्यामुळे बाह्य दबाव असूनही अर्थव्यवस्थेची वाढ कायम राहिली आहे.

आर्थिक सर्वेक्षणातील महत्त्वाच्या गोष्टी

आर्थिक वर्ष 2025 मध्ये राजकोषीय तूट GDP च्या 4.8% वर राहिली, आणि 2026 साठी ही 4.4% वर आणण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

एप्रिल-डिसेंबर 2025 मध्ये महागाई दर 1.7% वर आला कारण भाज्या व डाळींच्या किमती कमी झाल्यामुळे महागाई नियंत्रणात राहिली आहे.

2025 मध्ये रुपयाची कामगिरी अपेक्षेपेक्षा कमी राहिली, पण अमेरिकी टॅरिफ्सचा प्रभाव कमी करण्यास मदत करू शकतो.

अन्नधान्य उत्पादन 3,320 लाख टन झाले, रबी पिकांची पेरणी 3.3% वाढली, ज्यामुळे ग्रामीण उत्पन्न आणि देशाची अन्नसुरक्षा सुधारली आहे.

Managed Disorder, Disorderly Multipolar Breakdown, Systemic Shock Cascade, ज्यासाठी भारताने आर्थिक बफर्स मजबूत करणे आवश्यक आहे.

या सर्वेक्षणानुसार, कंपन्या नव्या धोरणात्मक सुधारणांशी जुळवून घेत असल्याने गुंतवणूक आणि ग्राहक मागणीमध्ये सुधारणा होण्याची शक्यता आहे

कु. कार्तिका पगडाला
कु. गजानन राजरवाड

Gold (24 Karat) Rate in India

Year	Gold (24 Karat) Rate in India (approximate in INR/10gm)
2026 (January 29)	1,83,050.00
2025 (December 19)	1,36,570.00
2025 (October 13)	1,27,820
2025 (September 24)	1,17,570
2025 (August 29)	1,05,170
2025 (April 22)	1,02,170
2025 (March 1)	87,550
2025 (Feb 1)	85,300
2024	78,245
2023	63,203
2022	55,017
2021	48,099
2020	50,151
2019	39,108
2018	31,391
2017	29,156
2016	27,445
2015	24,931
2014	26,703
2013	28,422
2012	30,859
2011	27,329
2010	20,728
2009	16,686
2008	13,630
2007	10,598
2006	9,265
2005	7,638
2004	6,307
2003	5,600
2002	4,990
2001	4,300
2000	4,400

***

 ISBN NO. 978-81-990957-8-6

Month wise Average Price of Gold and Silver

Year	Month	Bullion_Type	Price	Units
2025	November	Standard Gold	122962	price in rupees per 10 grams
2025	November	Silver	155010	price in rupees per kilogram
2025	October	Standard Gold	121908	price in rupees per 10 grams
2025	October	Silver	155904	price in rupees per kilogram
2025	September	Standard Gold	109591	price in rupees per 10 grams
2025	September	Silver	129257	price in rupees per kilogram
2025	August	Standard Gold	99696	price in rupees per 10 grams
2025	August	Silver	114032	price in rupees per kilogram
2025	July	Standard Gold	97581	price in rupees per 10 grams
2025	July	Silver	110958	price in rupees per kilogram



 ISBN NO. 978-81-990957-8-6



 ISBN NO. 978-81-990957-8-6

Month wise Sensex

Date	Price	Open	High	Low	Vol.	Change %
31-12-2025	85,220.60	84,793.58	85,437.17	84,705.57	11.62M	0.64%
30-12-2025	84,675.08	84,600.99	84,806.99	84,470.94	6.95M	-0.02%
29-12-2025	84,695.54	85,004.75	85,250.00	84,637.86	53.31M	-0.41%
26-12-2025	85,041.45	85,225.28	85,378.51	84,937.82	4.83M	-0.43%
24-12-2025	85,408.70	85,533.11	85,738.18	85,342.19	8.43M	-0.14%
23-12-2025	85,524.84	85,690.10	85,704.93	85,342.99	6.10M	-0.05%
22-12-2025	85,567.48	85,145.90	85,601.33	85,145.86	6.12M	0.75%
19-12-2025	84,929.36	84,756.79	85,067.50	84,734.96	9.10M	0.53%
18-12-2025	84,481.81	84,518.33	84,780.19	84,238.43	14.96M	-0.09%
17-12-2025	84,559.65	84,856.26	84,889.45	84,415.98	11.24M	-0.14%
16-12-2025	84,679.86	85,025.61	85,059.96	84,620.61	9.58M	-0.63%
15-12-2025	85,213.36	84,891.75	85,278.63	84,840.32	10.63M	-0.06%
12-12-2025	85,267.66	85,051.03	85,320.82	84,956.74	8.18M	0.53%
11-12-2025	84,818.13	84,456.75	84,906.93	84,150.19	15.84M	0.51%
10-12-2025	84,391.27	84,607.49	85,020.34	84,313.62	8.77M	-0.32%
09-12-2025	84,666.28	84,742.87	84,947.89	84,382.96	8.50M	-0.51%
08-12-2025	85,102.69	85,624.84	85,722.97	84,875.59	10.65M	-0.71%
05-12-2025	85,712.37	85,125.48	85,796.72	85,078.12	7.92M	0.52%
04-12-2025	85,265.32	84,987.56	85,487.21	84,949.98	17.90M	0.19%
03-12-2025	85,106.81	85,150.64	85,269.68	84,763.64	17.38M	-0.04%
02-12-2025	85,138.27	85,325.51	85,553.51	85,053.00	5.84M	-0.59%
01-12-2025	85,641.90	86,065.92	86,159.02	85,489.65	8.45M	-0.08%
28-11-2025	85,706.67	85,791.55	85,969.89	85,577.82	6.39M	-0.02%
27-11-2025	85,720.38	85,745.05	86,055.86	85,473.85	15.81M	0.13%
26-11-2025	85,609.51	84,503.44	85,644.19	84,478.13	13.84M	1.21%
25-11-2025	84,587.01	85,008.93	85,110.24	84,536.73	6.17M	-0.37%
24-11-2025	84,900.71	85,320.04	85,473.47	84,710.11	9.64M	-0.39%
21-11-2025	85,231.92	85,347.40	85,609.40	85,187.84	14.17M	-0.47%
20-11-2025	85,632.68	85,470.92	85,801.70	85,201.22	24.29M	0.52%
19-11-2025	85,186.47	84,643.78	85,236.77	84,525.98	8.86M	0.61%
18-11-2025	84,673.02	85,042.37	85,042.41	84,558.36	10.66M	-0.33%
17-11-2025	84,950.95	84,700.50	84,988.09	84,581.08	10.48M	0.46%
14-11-2025	84,562.78	84,060.14	84,697.87	84,029.32	8.85M	0.10%
13-11-2025	84,478.67	84,525.89	84,919.43	84,253.05	25.58M	0.01%
12-11-2025	84,466.51	84,238.86	84,652.01	84,166.75	9.14M	0.71%
11-11-2025	83,871.32	83,671.52	83,936.47	83,124.03	16.47M	0.40%
10-11-2025	83,535.35	83,198.20	83,754.49	83,197.67	11.91M	0.38%
07-11-2025	83,216.28	83,150.15	83,390.11	82,670.95	15.94M	-0.11%
06-11-2025	83,311.01	83,516.69	83,846.35	83,237.65	17.92M	-0.18%
04-11-2025	83,459.15	84,000.64	84,068.01	83,412.77	9.51M	-0.62%
03-11-2025	83,978.49	83,835.10	84,127.00	83,609.54	1.35M	0.05%

 ISBN NO. 978-81-990957-8-6

31-10-2025	83,938.71	84,379.79	84,712.79	83,905.66	13.27M	-0.55%
30-10-2025	84,404.46	84,750.90	84,906.95	84,312.65	14.20M	-0.70%
29-10-2025	84,997.13	84,663.68	85,105.83	84,638.68	13.56M	0.44%
28-10-2025	84,628.16	84,625.71	84,986.94	84,219.39	12.94M	-0.18%
27-10-2025	84,778.84	84,297.39	84,932.08	84,294.20	11.96M	0.67%
24-10-2025	84,211.88	84,667.23	84,707.44	83,957.15	13.58M	-0.41%
23-10-2025	84,556.40	85,154.15	85,290.06	84,445.25	25.72M	0.15%
21-10-2025	84,426.34	84,484.67	84,665.44	84,286.40	3.39M	0.07%
20-10-2025	84,363.37	84,269.30	84,656.56	84,196.79	10.94M	0.49%
17-10-2025	83,952.19	83,331.78	84,172.24	83,206.08	14.33M	0.58%
16-10-2025	83,467.66	82,794.79	83,615.48	82,791.35	27.40M	1.04%
15-10-2025	82,605.43	82,197.25	82,727.02	82,084.37	10.64M	0.70%
14-10-2025	82,029.98	82,404.54	82,573.37	81,781.62	12.57M	-0.36%
13-10-2025	82,327.05	82,049.16	82,438.50	82,043.14	9.04M	-0.21%
10-10-2025	82,500.82	82,075.45	82,654.11	82,072.93	13.74M	0.40%
09-10-2025	82,172.10	81,900.00	82,247.73	81,667.68	23.15M	0.49%
08-10-2025	81,773.66	81,899.51	82,257.74	81,646.08	15.22M	-0.19%
07-10-2025	81,926.75	81,883.95	82,309.56	81,787.48	13.91M	0.17%
06-10-2025	81,790.12	81,274.79	81,846.42	81,155.88	8.77M	0.72%
03-10-2025	81,207.17	80,684.14	81,251.99	80,649.57	13.62M	0.28%
01-10-2025	80,983.31	80,173.24	81,068.43	80,159.90	22.27M	0.89%
30-09-2025	80,267.62	80,541.77	80,677.82	80,201.15	7.08M	-0.12%
29-09-2025	80,364.94	80,588.77	80,851.38	80,248.84	8.57M	-0.08%
26-09-2025	80,426.46	80,956.01	81,033.09	80,332.41	10.74M	-0.90%
25-09-2025	81,159.68	81,574.31	81,840.73	81,092.89	14.80M	-0.68%
24-09-2025	81,715.63	81,917.65	82,045.47	81,607.84	15.07M	-0.47%
23-09-2025	82,102.10	82,147.37	82,370.38	81,776.53	9.30M	-0.07%
22-09-2025	82,159.97	82,151.07	82,583.16	81,997.29	10.31M	-0.56%
19-09-2025	82,626.23	82,946.04	82,978.63	82,485.92	9.65M	-0.47%
18-09-2025	83,013.96	83,108.92	83,141.21	82,704.92	14.61M	0.39%
17-09-2025	82,693.71	82,506.40	82,741.95	82,490.47	14.65M	0.38%
16-09-2025	82,380.69	81,852.11	82,443.48	81,779.94	8.21M	0.73%
15-09-2025	81,785.74	81,925.51	81,998.51	81,744.70	10.53M	-0.15%
12-09-2025	81,904.70	81,758.95	81,992.85	81,641.38	11.06M	0.44%
11-09-2025	81,548.73	81,217.30	81,642.22	81,216.91	13.55M	0.15%
10-09-2025	81,425.15	81,504.36	81,643.88	81,235.42	11.83M	0.40%
09-09-2025	81,101.32	81,129.69	81,181.37	80,927.97	6.31M	0.39%
08-09-2025	80,787.30	80,904.40	81,171.38	80,733.07	8.74M	0.09%
05-09-2025	80,710.76	81,012.42	81,036.56	80,321.19	8.19M	-0.01%
04-09-2025	80,718.01	81,456.67	81,456.67	80,608.94	17.03M	0.19%
03-09-2025	80,567.71	80,295.99	80,671.28	80,004.60	17.06M	0.51%
02-09-2025	80,157.88	80,520.09	80,761.14	80,008.50	8.19M	-0.26%
01-09-2025	80,364.49	79,828.99	80,406.84	79,818.38	6.03M	0.70%
29-08-2025	79,809.65	80,010.83	80,310.74	79,741.76	12.45M	-0.34%

 ISBN NO. 978-81-990957-8-6

28-08-2025	80,080.57	80,754.66	80,775.71	80,013.02	7.85M	-0.87%
26-08-2025	80,786.54	81,377.39	81,450.28	80,685.98	20.48M	-1.04%
25-08-2025	81,635.91	81,501.06	81,799.06	81,364.86	9.71M	0.40%
22-08-2025	81,306.85	81,951.48	81,993.61	81,291.77	6.73M	-0.85%
21-08-2025	82,000.71	82,220.46	82,231.17	81,921.22	10.05M	0.17%
20-08-2025	81,857.84	81,671.47	81,985.62	81,494.50	9.37M	0.26%
19-08-2025	81,644.39	81,319.11	81,755.88	81,315.44	10.85M	0.46%
18-08-2025	81,273.75	81,315.79	81,765.77	81,202.42	19.28M	0.84%
14-08-2025	80,597.66	80,625.28	80,751.18	80,489.86	7.24M	0.07%
13-08-2025	80,539.91	80,492.17	80,683.74	80,319.00	12.31M	0.38%
12-08-2025	80,235.59	80,508.51	80,997.67	80,164.36	10.29M	-0.46%
11-08-2025	80,604.08	79,885.36	80,636.05	79,772.46	8.64M	0.93%
08-08-2025	79,857.79	80,478.01	80,550.40	79,775.84	23.21M	-0.95%
07-08-2025	80,623.26	80,262.98	80,737.55	79,811.29	37.53M	0.10%
06-08-2025	80,543.99	80,694.98	80,834.43	80,448.82	5.25M	-0.21%
05-08-2025	80,710.25	80,946.43	81,010.49	80,554.40	10.92M	-0.38%
04-08-2025	81,018.72	80,765.83	81,093.19	80,500.51	9.86M	0.52%
01-08-2025	80,599.91	81,074.41	81,317.51	80,495.57	14.68M	-0.72%
31-07-2025	81,185.58	80,695.50	81,803.27	80,695.15	9.71M	-0.36%
30-07-2025	81,481.86	81,594.52	81,618.96	81,187.06	7.21M	0.18%
29-07-2025	81,337.95	80,620.25	81,429.88	80,575.45	12.29M	0.55%
28-07-2025	80,891.02	81,299.97	81,557.41	80,776.44	5.14M	-0.70%
25-07-2025	81,463.09	82,065.76	82,069.51	81,397.69	9.96M	-0.88%
24-07-2025	82,184.17	82,779.95	82,784.24	82,047.22	14.01M	-0.66%
23-07-2025	82,726.64	82,451.87	82,786.43	82,279.73	10.09M	0.66%
22-07-2025	82,186.81	82,527.43	82,538.17	82,110.63	23.92M	-0.02%
21-07-2025	82,200.34	81,918.53	82,274.03	81,518.66	15.26M	0.54%
18-07-2025	81,757.73	82,193.62	82,334.75	81,608.13	8.31M	-0.61%
17-07-2025	82,259.24	82,753.53	82,757.09	82,219.27	8.76M	-0.45%
16-07-2025	82,634.48	82,534.66	82,784.75	82,342.94	7.62M	0.08%
15-07-2025	82,570.91	82,233.16	82,743.62	82,221.74	9.87M	0.39%
14-07-2025	82,253.46	82,537.87	82,537.87	82,010.38	18.11M	-0.30%
11-07-2025	82,500.47	82,820.76	83,040.74	82,442.25	10.72M	-0.83%
10-07-2025	83,190.28	83,658.20	83,742.28	83,134.97	7.55M	-0.41%
09-07-2025	83,536.08	83,625.89	83,781.36	83,382.28	7.83M	-0.21%
08-07-2025	83,712.51	83,387.03	83,812.31	83,320.95	15.31M	0.32%
07-07-2025	83,442.50	83,398.08	83,516.82	83,262.23	6.23M	0.01%
04-07-2025	83,432.89	83,306.81	83,477.86	83,015.83	8.77M	0.23%
03-07-2025	83,239.47	83,540.74	83,850.09	83,186.74	9.56M	-0.20%
02-07-2025	83,409.69	83,790.72	83,935.01	83,150.77	10.57M	-0.34%
01-07-2025	83,697.29	83,685.66	83,874.29	83,572.51	19.08M	0.11%

 ISBN NO. 978-81-990957-8-6